शोधप्रकाशन ग्रंथमाला- ६३

# श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत

ओवीबद्ध मराठी पारायणग्रंथ

रचना

**शेषनारायण देवाप्पा पसारकर**

**शैवभारती शोधप्रतिष्ठान**

डी. ३५/७७, जंगमवाडी मठ,


वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१

श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत (मराठी)
रचना : शे० दे० पसारकर
Shree Siddhant Shikhamani Tatvamrit (Marathi)
By S. D. Pasarkar
ISBN : 978-93-82639-03-9

प०पू० श्रीकाशीजगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या पंचविसाव्या पीठारोहण-वर्धापनदिनानिमित्त (कार्तिक वद्य पंचमी, शके १९३५) 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषानुवाद योजनेच्या अंतर्गत हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.

प्रकाशक : शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तर प्रदेश). स्थिरभाष : (0542) 2450546
अक्षरसंयोजन : शिवशक्ती कम्प्यूटर प्रोसेस, जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१
मुद्रक : बा०धों० कोरे, शिव ऑफसेट प्रिंटर्स, 'शिवसदन', माधवनगर रोड, सांगली. स्थिरभाष : (0233) 2644127, 2622504
© प्रकाशक
प्रथमावृत्ती : २० जानेवारी २०१३, प्रती ५,००० । द्वितीयावृत्ती : १० मार्च २०१३ (महाशिवरात्री), प्रती १५,०००
पुनर्मुद्रण : १९ ऑगस्ट २०१३, प्रती १५,००० (+ पॉकेट बुक प्रथमावृत्ती : १९ ऑगस्ट २०१३, प्रती १५,०००)
एकूण प्रती ५०,०००
मूल्य : दोनशे रुपये (२०० रुपये)

ग्रंथासाठी संपर्क
श्रीधर श्रीराम पैलवान, १७०४, सोमवार पेठ, भवानी गल्ली, तासगाव, जि० सांगली. चरभाष : 9527806750, 9372148096
एस० के० हिरेमठ, ५५/४०, शाहीर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर. स्थिरभाष : (0217) 2727221 / चरभाष : 9960222151, 9421033706



श्रीमद् रंभापुरी वीरसिंहासनाधीश्वर


## श्री १००८ जगद्गुरू प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी

वीरसिंहासन महापीठ, बाळेहोन्नूर, जि० चिक्कमगळूर (कर्नाटक) यांचे

## शुभाशीर्वचन

श्रीकाशीजगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा पारायणग्रंथ प्रथमत: कन्नड भाषेत तयार करून कर्नाटकात प्रसिद्ध केला होता. त्यावेळी आम्ही त्या ग्रंथाला आपला शुभसंदेश दिला होता. आता श्रीकाशीमहास्वामीजींच्या आग्रहपूर्वक आदेशावरून सोलापूरचे मराठीचे प्राध्यापक डॉ० शे० दे० पसारकर यांनी वीरशैवधर्मग्रंथ 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर मराठी ओवीबद्ध भाष्य लिहून महाराष्ट्रातील सर्व सद्भक्तांना पारायणग्रंथ तयार करून दिल्याबद्दल आम्हाला अत्यंत आनंद वाटत आहे. महाराष्ट्रामध्ये धर्मग्रंथ आणि संतचरित्रांवरील ओवीग्रंथांचे पारायण करण्याची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील वीरशैव मठाधिपती शिवाचार्य आणि समस्त सद्भक्तगण संतशिरोमणी मन्मथस्वामीकृत 'परमरहस्य' ग्रंथाचे पारायण करीत होते. आता त्याचबरोबर त्यांनी धर्मग्रंथ 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' ग्रंथाचे सुद्धा पारायण करावे. त्या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे ऐहिक भोगभाग्य आणि लिंगांगसामरस्यरूपी मुक्ती सर्वांना प्राप्त होईल. मराठी ओवीबद्ध पारायणग्रंथ रचलेले डॉ० शे० दे० पसारकर व त्यांच्या धर्मपत्नी सौ० उषा आणि कुटुंबियांना जगद्गुरू पंचाचार्यांचे अनंत मंगलाशीर्वाद.

३ डिसेंबर २०१२ **इत्याशिष:**



श्रीमद् उज्जयिनी सद्धर्मसिंहासनाधीश्वर

**श्री १००८ जगद्गुरू सिद्धलिंगराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी**

सद्धर्मसिंहासन महापीठ, उज्जयिनी, जि० बळ्ळारी (कर्नाटक) यांचे

## शुभाशीर्वचन

शिवाच्या मुखारविंदातून निघालेले २८ शिवागमांचे संपूर्ण सार म्हणजेच ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ होय. शिवाचा उपदेशच श्रीजगद्गुरू रेणुकाचार्यांनी अगस्त्यऋषींना उपदेशिला. म्हणून हा ग्रंथ शिवाचा कृपाप्रसादच होय. मूळ संस्कृतामधील हा ग्रंथ ‘श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत’ या नावाने पसारकर यांनी मराठीत ओवीबद्ध केल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व शिवभक्तांना पारायण करण्यासाठी अत्यंत सोपे झाले आहे. डॉ० पसारकरांनी काशीपीठात दोन महिने सपत्निक वास्तव्य करून ३८११ ओव्यांची रचना केली. तो खरोखरच ज० विश्वाराध्यांचा मंगलाशीर्वादच होय. संस्कृतमधील हा ग्रंथ आता पूर्णपणे मराठी ओवीछंदात आल्यामुळे या ग्रंथाचे पारायण आणि स्वाध्याय करणे मराठी भक्तांना अत्यंत सुलभ झाले आहे. अत्यल्प वेळामध्ये एवढ्या ओव्या लिहून ग्रंथ सिद्ध करणाऱ्या पसारकरांची साहित्यरचनाशैली खरोखर आश्चर्यजनक आहे. अशा या प्रासादिक ग्रंथाचे सर्व सद्भक्तांनी पारायण करून आपले जीवन सफल करून घ्यावे. ज० पंचाचार्यांनी डॉ० शे० दे० पसारकरांना उदंड आयुष्य आणि उत्तम आरोग्य देऊन त्यांच्याकडून अधिक वीरशैव साहित्याची सेवा करवून घ्यावी. त्यांना आणि त्यांच्या संपूर्ण परिवाराला अनंत मंगलाशीर्वाद.

३ डिसेंबर २०१२ **इत्याशिष:**



श्रीशैलसूर्यसिंहासनाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू डॉ० चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी

श्रीशैलसिंहासन महापीठ, श्रीक्षेत्र श्रीशैल, जि० कर्नूल (आंध्र प्रदेश) यांचे

# शुभाशीर्वचन

सोलापूरचे मराठी वीरशैव साहित्याचे थोर अभ्यासक, समीक्षक, लेखक व कवी डॉ० शे० दे० पसारकर यांनी श्रीकाशीजगद्गुरू महास्वामीजींच्या आदेशावरून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर मराठी ओवीबद्ध भाष्य केल्याबद्दल आम्हाला अत्यंत आनंद वाटत आहे. आपल्या देशामध्ये 'श्रीमद्भगवद्गीता' आणि 'श्रीसिद्धान्तशिखामणी' हे दोन्ही ग्रंथ योगशास्त्र प्रतिपादन करणारे अमूल्य ग्रंथ आहेत. भगवद्गीता उपनिषदांचे सार आहे तर श्रीसिद्धान्तशिखामणी कामिकादिवातुलान्त अठ्ठावीस शिवागमांचे सार आहे. भगवद्गीतेप्रमाणे श्रीसिद्धान्तशिखामणीसुद्धा एक विश्वव्यापी योगप्रतिपादक ग्रंथ आहे. श्रीकाशीजगद्गुरू महास्वामीजींनी स्वत: या ग्रंथाचा कन्नड अनुवाद करून प्रथमत: पारायणग्रंथ सिद्ध केला. त्यानंतर त्यांनी विविध भाषक विद्वानांकडून हिंदी, तेलुगू, तमिळ, मलयालम, इंग्लिश आणि रशियन भाषेत सुद्धा हा पारायणग्रंथ तयार करून त्या त्या प्रांतामध्ये व देशामध्ये त्याचे प्रकाशन करून श्रीसिद्धान्तशिखामणीचा विश्वस्तरावर प्रचार-प्रसार केला आहे. सध्या महाराष्ट्रातील भाविक भक्तासाठी मराठी वीरशैव साहित्याचे गाढे अभ्यासक आणि कविमनाचे डॉ० शे० दे० पसारकर यांच्याकडून हा ग्रंथ मराठीत ओवीबद्ध करून घेतला असून तो महाराष्ट्रातील भक्तांना अत्यंत उपयोगी सिद्ध होणार आहे. श्रद्धाळू सद्भक्तांनी या प्रासादिक ग्रंथाचे पारायण व स्वाध्याय करून भोग-मोक्ष प्राप्त करून घ्यावेत. श्री ज० पंचाचार्यांच्या मंगलाशीर्वादाने डॉ० पसारकरांना उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य प्राप्त होऊन उत्तरोत्तर वीरशैव साहित्याची सेवा त्यांच्याकडून घडो हा मंगलाशीर्वाद.

३ डिसेंबर २०१२ **इत्याशिष:**



श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहानाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

जंगमवाडी मठ, श्रीक्षेत्र काशी (वाराणसी) यांचे

# शुभाशीर्वचन

'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' हा मराठी ओवीबद्ध पारायणग्रंथ काशीपीठाच्या शैवभारती शोधप्रतिष्ठानच्या शोधप्रकाशन ग्रंथमालेचे ६३ वे पुष्प म्हणून प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा वीरशैवांचा अत्यंत प्राचीन व प्रामाणिक असा धर्मग्रंथ आहे. वेदागमपारंगत योगिकुलचक्रवर्ती श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी रेणुक-अगस्त्य यांच्या संवादरूपाने संस्कृत भाषेत या ग्रंथाची रचना केली आहे. हा अपूर्व आणि अद्वितीय असा ग्रंथ महाराष्ट्रातील भाविक भक्तांना सुबोध व्हावा यासाठी मराठी वीरशैव साहित्याचे अभ्यासक-संशोधक, चिंतक व कवी डॉ० शे० दे० पसारकर यांनी या ग्रंथावर 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' या नावाने ओवीबद्ध भाष्य लिहिले आहे.

शे० दे० पसारकर यांनी पुणे येथे जगद्गुरू विश्वाराध्य विद्यार्थि-निलयात राहून पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला आणि मराठी विषयात एम्०ए० ही पदवी प्राप्त केली. सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करीत प्रसिद्ध विचारवंत डॉ० निर्मलकुमार फडकुले यांच्या मार्गदर्शनाखाली 'मन्मथशिवलिंग यांच्या परमरहस्य या ग्रंथाचा सर्वांगीण चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाकडून पीएच्०डी० ही पदवी मिळवली. त्यांनी गद्य-पद्यरूपात विविध आणि विपुल साहित्यसृजन केले. श्रीमन्मथचरितामृत, श्रीरमतेरामकथामृत, अभंगसिद्धायन, श्रीसिद्धरामायण, चंद्रसावली इत्यादी काव्यग्रंथांबरोबरच कादंबरी, नाटक, स्पष्टीकरण-भाष्य, संशोधन-लेखसंग्रह; श्रीलक्ष्मणगाथा, श्रीसिद्धरामेश्वरांची वचने, श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य इ० ग्रंथांची संपादने आणि महाराष्ट्रातील भाविक भक्तांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारा 'जन्म हा

अखेरचा' हा श्रीकाशीजगद्गुरूंच्या आशीर्वचनांचा अनुवादग्रंथ अशी विपुल आणि वैविध्यपूर्ण साहित्यनिर्मिती करून पसारकरांनी प्रथितयश साहित्यिक अशी स्वत:ची ओळख निर्माण केली. श्रीकाशीमहास्वामीजींच्या आग्रहपूर्वक आदेशावरून त्यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ सिद्ध करून मराठी वीरशैव साहित्यामध्ये मोलाचे योगदान दिले आहे.

महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, एकनाथ आदींनी गीता-भागवत ग्रंथांवर मराठी ओवीबद्ध भाष्ये लिहून मराठी भाविकांना त्यांचे रहस्य समजावून सांगण्याचा मार्ग प्रशस्त केला. वीरशैव संत श्रीमन्मथस्वामींनी सुद्धा 'परमरहस्य' या संस्कृत ग्रंथावर ओवीबद्ध भाष्य रचून वीरशैव सद्भक्तांना वीरशैव तत्त्वज्ञान समजावून दिले. हे सर्व पाहिल्यानंतर खूप वर्षांपासून आमच्या मनामध्ये 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या वीरशैव धर्मग्रंथावर मराठी ओवीबद्ध भाष्य व्हावे आणि त्याचे सर्वांनी पारायण करावे, असा विचार घोळत होता. हे कार्य कोण पूर्ण करील असा विचार करीत असताना डॉ० शे० दे० पसारकर हे मराठी गद्यपद्यरचना करण्यात अत्यंत निष्णात असल्याची जाणीव होऊन त्यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर भाष्य लिहावे अशी अपेक्षा आम्ही व्यक्त केली. आमच्या अपेक्षेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन ते सपत्निक १४ सप्टेंबर २०१२ रोजी काशीला आले. श्रीकाशीविश्वनाथ व श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांचा मंगलाशीर्वाद घेऊन त्यांनी श्रीगुरूवर संपूर्ण श्रद्धा ठेवून ग्रंथरचनेला प्रारंभ केल्यामुळे अवघ्या दोन महिन्यांत, १९ नोव्हेंबर २०१२ या दिवशी स्कंदषष्ठीच्या पावन मुहूर्तावर त्यांनी ग्रंथ लिहून पूर्ण केला. त्यांनी हे कार्य अत्यंत समर्थपणे पूर्ण केल्यामुळे केवळ आमचीच इच्छा पूर्ण झाली असे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील भाविक भक्तांची फार वर्षांची इच्छा पूर्ण झाली आहे. हा ग्रंथ मुद्रित झाला असून या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका, गाव अशा पातळीवर ठिकठिकाणी ग्रंथदिंडी काढून करण्याची खूप मोठी योजना काशीपीठाने आखलेली आहे. या योजनेमध्ये सर्व भाविक भक्तांनी तनमनधनाने सेवा करून सहभागी व्हावे आणि कृतार्थता अनुभवावी.

शे० दे० पसारकर यांनी दोन महिने अखंड परिश्रम करून हे कार्य पूर्णत्वाला नेले. 'विद्याध्ययनं तप:' या उक्तीप्रमाणे त्यांनी तपश्चर्यारूपानेच ग्रंथलेखन केले आहे. एखादे कार्य सिद्ध होण्यासाठी क्रिया, ज्ञान व भावना यांची नितांत आवश्यकता असते. पसारकरांनी दररोज १६ तासांपेक्षा

अधिक वेळ लेखनकार्य केल्यामुळे त्यांच्याठायी असलेल्या क्रियाशक्तीची पराकाष्ठा झाली आहे. यापूर्वीही अनेक वर्षे ते सदैव ज्ञानयज्ञात रत असल्यामुळे त्यांच्याकडून 'जन्म हा अखेरचा' यासारख्या बृहद् ग्रंथाचे लेखन झाले. अशा कार्यात सातत्याने समर्पित भावनेने गढून गेल्यामुळे त्यांच्या ज्ञानशक्तीचा पूर्णरूपाने विनियोग झाला आहे. विशेष म्हणजे भगवान शिव आणि श्रीगुरू यांच्यासमोर अकिंचन भावनेने समर्पित होऊन भावावेशात ग्रंथलेखन केल्यामुळे त्यांच्या भावशक्तीचाही कस लागला आहे. अशा प्रकारे क्रियाशक्ती, ज्ञानशक्ती व भावशक्ती यांच्या उत्कृष्ट अनुकूलतेने हा उत्कृष्ट ग्रंथ सिद्ध झाला आहे.

त्यांच्या लेखनयज्ञामध्ये त्यांच्या सुविद्य धर्मपत्नी सौ० उषाताई यांचेही मोठे योगदान आहे. जसजसे लेखन होत गेले तसतसे संगणकीय अक्षरलेखनाचे कार्य निर्दोषपणे सौ० उषाताईंनी केले. 'पतिरेव गुरु: स्त्रीणां' अशी शास्त्रोक्ती आहे. उषाताईंनी गुरुरूप पतीची उत्कृष्ट सेवा केलेली पाहिल्यावर आम्हाला वाचस्पती मिश्र आणि भामती या दंपतीचे स्मरण झाले. भविष्यकाळात या दंपतीला उत्तम आरोग्य लाभून 'इतोऽपि अतिशयेन' वीरशैव साहित्यसेवा आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत घडो असा जगद्गुरू पंचाचार्य, श्रीकाशीविश्वनाथ आणि अन्नपूर्णा माता यांचा मंगलाशीर्वाद!

'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर संस्कृत, हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि रशियन अशा अनेक भाषांत गद्य पारायणग्रंथ सिद्ध झाले आहेत. आता मराठी भाविकांसाठी ओवीबद्ध स्वरूपात 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' हा पारायणग्रंथ प्रसिद्ध होत आहे. प्रत्येक वीरशैवाने इष्टलिंगपूजनानंतर या ग्रंथाचे पारायण केले पाहिजे. या ग्रंथात एकूण २१ अध्याय आहेत. प्रतिदिवशी ३ अध्याय याप्रमाणे पठण केले तर एका सप्ताहात पारायण पूर्ण होते. प्रतिदिवशी एक अध्याय वाचला तर २१ दिवसांत पारायण पूर्ण होते. या ग्रंथात १०१ उपस्थले आहेत. दररोज एका स्थलाचे पारायण केले तर १०१ दिवसांतही हे पारायण पूर्ण करता येईल. ज्याला शक्य असेल त्याला विशेष पर्वकाळी श्रद्धाभक्तीने एका दिवसातही संपूर्ण ग्रंथपारायण करता येईल. ग्रंथपारायण हे जपासमान असल्यामुळे पारायणकर्त्याला पुण्यप्राप्ती होते. त्या पुण्याईने त्यांना अपेक्षित भोग-भाग्य प्राप्त होतात. पारायणाबरोबरच स्वाध्याय आणि चिंतन केले तर शिवाद्वैतज्ञान प्राप्त होऊन लिंगांगसामरस्य मुक्ती प्राप्त होते. यांपैकी कोणत्याही

विधीने, निमित्ताने श्रद्धाभक्तीने पारायण करून भाविकांनी भोग-मोक्ष प्राप्त करून घ्यावेत.

डॉ॰ पसारकरांनी रचलेला ओवीबद्ध ग्रंथ हा संस्कृत 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वरील मराठी भाष्य तर आहेच, परंतु त्याचबरोबर अध्याय २ ते २१ पर्यंत प्रारंभी कृतयुगापासून ते कलियुगापर्यंत होऊन गेलेल्या सर्व पंचाचार्यांना त्यांनी क्रमश: वंदन केलेले आहे. त्यामुळे भाविकांना सहजपणे जगद्गुरू पंचाचार्यांच्या सर्व नामांचे स्मरण व नमन घडते. अध्याय ५ ते अध्याय २० पर्यंत प्रारंभीच्या ओव्यांतून त्यांनी भगवान शिवाची अष्टोत्तरशत नामे गुंफून शिवाला नमस्कार केला आहे. त्यामुळे पारायणकर्त्याला शिव-अष्टोत्तरशतनामाचा सहजपणे जप घडतो. २१ व्या अध्यायाच्या प्रारंभी त्यांनी लिंगाष्टकातील शिवस्तुतिपर विशेषणांचा उपयोग केल्यामुळे पारायणकर्त्याला लिंगाष्टक म्हटल्याचेही पुण्य लाभते. याशिवाय या ग्रंथात पंचाचार्यांची उत्पत्ती, त्यांची चतुर्युगांतील नावे, उत्पत्तिस्थाने, सूत्र, गोत्र यांचे विवेचन करून अष्टावरण व पंचाचार यांचेही विवरण केलेले आहे. इष्टलिंग फुटले किंवा हरवले तर भक्ताने त्यावेळी कोणते प्रायश्चित्त घ्यावे यासंबंधीची माहितीदेखील 'कारणागमा'च्या आधारे या ग्रंथात आली आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'तील तत्त्वज्ञानाबरोबरच ही सर्व माहिती योग्य ठिकाणी गुंफल्यामुळे हा ग्रंथ सर्वांगसुंदर झाला असून याच्या पठण-पारायणामुळे मराठी भाविकांना विशेष फलप्राप्ती होणार आहे. मठाच्या कार्यात सेवारत असलेले व ग्रंथमुद्रणकार्यात सहभागी असलेले श्रीमती नलिनी गंगाधर चिरमे, शैवभारती शोधप्रतिष्ठानचे कार्यवाह डॉ॰ जी॰ सी॰ केंडदमठ, संस्कृत श्लोकांची अक्षरजुळणी करणारे चिदानंद ओ॰ हिरेमठ (कसगी), मित्तल ऑफसेटचे जोहरी व ज्यांचे या कार्याला हातभार लागले त्या सर्व सद्भक्तांना मंगल आशीर्वाद.

या पारायणग्रंथासाठी श्रीमद् रंभापुरी, श्रीमद् उज्जयिनी व श्रीशैल जगद्गुरूंनी आपले मंगलाशीर्वाद दिल्याबद्दल त्यांच्या श्रीचरणी अनंत नमस्कार.

।। ॐ शांति: शांति: शांति:।।

३ डिसेंबर २०१२

# भूमिका

प्रात:स्मरणीय प०पू० श्रीकाशीजगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी' ओवीबद्ध करण्याचा आदेश दिला आणि फारशी कुवत नसतानाही मी या कार्यात स्वत:ला झोकून दिले. माझ्या वयाच्या दहाव्या वर्षीच आईने पांडवप्रताप, शिवलीलामृत, रामविजय, हरिविजय हे ग्रंथ माझ्या हातात ठेवले आणि ओवी वाचून तिचा अर्थ सांगायला शिकवले. त्यामुळे ओवीशी चांगलाच परिचय झाला आणि ऋणानुबंधही जुळला. पुढे 'श्रीमन्मथचरितामृत' आणि 'श्रीरमतेरामकथामृत' हे ओवीग्रंथही लिहून झाले. परंतु एवढ्या अल्प शिदोरीवर 'श्रीसिद्धान्तशिखामणी'सारख्या तत्त्वज्ञानपर संस्कृत ग्रंथावर ओवीरचना करण्याचे धाडस कोणी केले नसते. मी ते केले याला कारण प०पू० श्रीकाशीजगद्गुरूंची आज्ञा. त्यांच्या कृपाशीर्वादाच्या बळावरच हे लेखनकार्य सिद्धीला गेले.

श्रीकाशीविश्वनाथाचा, श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांचा आणि प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींचा मंगलाशीर्वाद घेऊन सोमवार, दि० १७ सप्टेंबर २०१२ या दिवशी सकाळी लेखनकार्याला आरंभ झाला आणि सोमवार, दि० १९ नोव्हेंबर २०१२ या दिवशी, स्कंदषष्ठीच्या सुमुहूर्तावर सायंकाळी लेखनाला विराम मिळाला. तीन हजार आठशे अकरा ओव्या लिहून झाल्या. त्या पाहून माझा मीच अचंबित झालो. दोन महिन्यांच्या अल्प कालावधीत एका तत्त्वज्ञानपर ग्रंथावर ओवीबद्ध भाष्य लिहून झाले यावर माझाच विश्वास बसेना. श्रीगुरुकृपेमुळेच हे शक्य झाले, अशी माझी श्रद्धा आहे. त्यामुळे श्रीगुरुकृपेचे माहात्म्य वर्णिताना 'म्हणौनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे। श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।।' असे कविकुलचक्रवर्ती ज्ञानदेवांनी का म्हटले आहे तेही कळले.

दोन महिने श्रीकाशीजंगमवाडी मठातील वास्तव्यात मी ३५ वर्षांपूर्वीचे विद्यार्थिजीवन पुन्हा अनुभवले. परीक्षा जवळ आली की विद्यार्थी जसे अभ्यासाचे वेळापत्रक तयार करतात तसे मी लेखनाचे वेळापत्रक तयार केले. मधला भोजन-विश्रांतीचा काळ वगळता पहाटे चार ते रात्री दहापर्यंत लेखनाचा उद्योग चालू असे. ओवी म्हणजे गद्य नव्हे. ती पदरात पडावी म्हणून वाट पाहावी लागे. ती चांगली जमली की मनात आनंद दाटे, नाही जमली तर निराशा. बसून बसून पायांवर सूज येऊ लागली. हे सर्व अडथळे पार करीत लेखनाची नौका शेवटी पैलथडीला पोहोचलीच. तीही आश्चर्य वाटावे इतक्या

अल्प काळात. हे श्रीगुरुकृपेचे माहात्म्य नव्हे तर काय?

नंदननाम संवत्सरात साठ वर्षांपूर्वी माझा जन्म झाला आणि याच संवत्सरात वयाच्या एकसष्टाव्या वर्षात हा ओवीग्रंथ लिहून पूर्ण झाला, हाही एक योगायोगच. मला असे वाटते की वयाच्या दहाव्या वर्षापासून ओवीरचनेची जी साधना माझ्याकडून घडली ती याच कार्यासाठी असावी. ती या कार्यामुळे फलद्रूप झाली. मी संस्कृत भाषेचा पंडित नाही, परंतु जेथे काही शंका आली तेथे प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींकडून तिचे निरसन करून घेतले. अर्थ स्पष्ट करून घेतला. दोन महिने आम्हाला जसा काशीवास घडला तसाच प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींचा दिव्य, संजीवक सहवासही घडला. त्यांच्या संगतीत असताना आपण एका विशाल ज्ञानवृक्षाच्या सावलीत विसावलो आहोत असाच आनंदानुभव मी नित्य घेत आलो. त्यामुळे लेखनाची गाडी कुठेही अडली नाही. या ग्रंथलेखनासाठी प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींनी संपादित केलेला अन्वयार्थासह मराठी 'श्रीसिद्धान्तशिखामणी', मरितोंटदार्यांचे संस्कृत व्याख्यान, 'जन्म हा अखेरचा' हा ग्रंथ आणि डॉ० राधेश्याम चतुर्वेदी यांची या ग्रंथावरील 'ज्ञानवती' ही हिंदी व्याख्या हे साहित्य खूपच उपयुक्त ठरले. अवतीभोवती असे ज्ञानदीप तेवत असल्यामुळेच तत्त्वज्ञानाच्या गूढ गुहेत शिरताना भय वाटले नाही.

हे ग्रंथलेखन हातावेगळे झाल्यामुळे मनात एक प्रकारची कृतार्थता दाटून राहिली आहे. संस्कारसंपन्न आईवडिलांच्या उदरी जन्म झाला, बालपणीच ओवी-अभंगांचे बाळकडू मिळाले, श्रीगुरू सिद्धलिंग शिवाचार्य साखरखेर्डेकरांचा अनुग्रह लाभून मी वीरशैव साहित्याकडे वळलो, त्यानंतर कळस म्हणजे प०पू० श्रीकाशीजगद्गुरूंच्या कृपानुग्रहाला पात्र ठरलो आणि 'जन्म हा अखेरचा' लिहिताना, 'श्रीलक्ष्मणगाथा' व 'परमरहस्य' संपादित करताना जी धन्यता अनुभवली तेवढीच, किंबहुना अधिकच धन्यता 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' पूर्ण झाल्यावर अनुभवास आली.

माझ्या सर्व लेखनकार्यात सतत सोबत करीत मला सांसारिक व्यवधानांपासून दूर ठेवणारी माझी पत्नी सौ० उषा आणि बाल्यावस्थेत असल्यापासूनच वडिलांच्या लेखनकार्यात व्यत्यय न आणता त्या कार्याला साहाय्य करणाऱ्या माझ्या मुली- केतकी (सौ० केतकी विवेक अनसिंगकर) आणि अबोली (सौ० अबोली बसवराज कारभारी-तंगशेट्टी) यांच्यामुळे माझा गृहस्थाश्रम खरोखर धन्य झाला. आमच्या सर्व पसारकर परिवाराने माझे मन:स्वास्थ्य सांभाळले. त्यामुळे मला शांतपणे लेखनकार्य करता आले.

या ग्रंथातील 'श्रीसिद्धान्तशिखामणिध्यानम्-माहात्म्यम् व श्रीसिद्धान्तशिखामणे: आरार्तिक्यम्' ह्या संस्कृत रचना पं० जगन्नाथशास्त्रीजी तैलंग,

वाराणसी यांच्या आहेत. त्यांचा आणि ग्रंथ वाचून मौलिक सूचना करणारे व संस्कृत श्लोकांचे आत्मीयतेने मुद्रितशोधन करणारे आमचे परममित्र पं० शिवाप्पा खके, चारठाणा (परभणी) यांचा मी अत्यंत ऋणी आहे. जंगमवाडी मठातील श्रीमती नलिनी चिरमे वहिनी, श्री० पंचाक्षरी लिगाडे व त्यांचे सर्व सहकारी, श्री० चिदानंद हिरेमठ (कसगी) आणि शैवभारती शोधप्रतिष्ठानचे कार्यवाह डॉ० जी० सी० केंडदमठ या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार.

शेवटी प०पू० श्रीकाशीजगद्गुरू भगवद्पादांच्या अखंड कृपानुग्रहाची याचना करून थांबतो. इति शिवम्.

जंगमवाडी मठ, वाराणसी, ३ डिसेंबर २०१२ **- शे० दे० पसारकर**

## निवेदन


प०पू० श्रीशैलजगद्गुरू व प०पू० श्रीकाशीजगद्गुरू यांच्या अमृतहस्ते २० जानेवारी २०१३ या दिवशी सोलापूर येथे या ग्रंथाचे मोठ्या थाटामाटात प्रकाशन झाले. ५००० प्रतींची आवृत्ती अवघ्या दोन महिन्यांत संपली. म्हणून महाशिवरात्रीच्या पर्वकाळी १५,००० प्रतींची दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर प०पू० श्रीशैलजगद्गुरू व प०पू० श्रीकाशीजगद्गुरू यांच्या दिव्य सान्निध्यात ७ जून ते ६ जुलै २०१३ या काळात महाराष्ट्रात ग्रंथप्रचार अभियान राबविण्यात आले. अनेक शहरांत व गावांत ग्रंथदिंडी, ग्रंथलोकार्पण-सोहळा उत्साहात साजरा झाला. समाजबांधवांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभल्यामुळे या काळात सर्व मुद्रित प्रती संपल्या. त्यामुळे या ग्रंथाचे पुनर्मुद्रण (प्रती १५,०००) करण्यात येत आहे. याबरोबरच १५,००० प्रतींची पॉकेट बुक आवृत्तीही प्रकाशित होत आहे. अवघ्या ७-८ महिन्यांच्या कालावधीत या ग्रंथाच्या ५०,००० प्रती मुद्रित झाल्या, हा या क्षेत्रातील एक उच्चांकच ठरेल. ग्रंथाच्या मुद्रितशोधनास श्री० काशीनाथ सर्जे, सोलापूर यांनी आत्मीयतेने सहकार्य केले. त्यांचे मन:पूर्वक आभार.

सर्व ग्रंथग्राहक व ग्रंथवाचक, ग्रंथमुद्रणासाठी अर्थसाहाय्य करणारे दानशूर आणि ग्रंथमुद्रक श्री० बा० धों० कोरे, शिव ऑफसेट प्रिंटर्स, सांगली या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.

'उषास्वप्न', १२६ ब, मार्कंडेय नगर, सोलापूर (महाराष्ट्र) **- शे० दे० पसारकर**

१७ जुलै २०१३ स्थिरभाष : 0217 - 2602301 / चरभाष : 9420 780 570, 8087559904

।। श्री जगद्‌गुरु पंचाचार्या: प्रसीदन्तु ।।



।। ॐ नम: पंचाचार्येभ्यो नम: पंचाननमुखोद्भूतेभ्यो नम: पंचसूत्रकर्तृभ्यो
नम: पंचाक्षरमनुस्वरूपेभ्यो नम: शिवाद्वैतविद्यासम्प्रदायकर्तृभ्यो
नमो वीरशैवमहामतसंस्थापकेभ्यो नमो जगद्‌गुरुभ्य: ।।

## ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणि न्यासादि:।।

### अथ ऋष्यादिन्यास:

अस्य श्रीसिद्धान्तशिखामणिशास्त्रमहामन्त्रस्य भगवान् श्रीशिवयोगिशिवाचार्य ऋषि: । अनुष्टुप् छन्द: ।
श्री सच्चिदानन्दस्वरूप: परशिवो देवता । सच्चिदानन्दरूपाय शिवाय ब्रह्मणे नम: इति बीजम् ।
अमृतार्थं प्रपन्नानां या सुविद्याप्रदायिनी इति शक्ति: । शिवज्ञानकरं वक्ष्ये सिद्धान्तं शृणु सादरम् इति कीलकम् ।

### अथ करन्यास:

एक एव शिवस्साक्षाच्चिदानन्दमयो विभु इति अंगुष्ठाभ्यां नम: । निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपंचक इति तर्जनीभ्यां नम: ।
अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामक इति मध्यमाभ्यां नम: । देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थित इति अनामिकाभ्यां नम: ।
मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थित इति कनिष्ठिकाभ्यां नम: ।
बीजे यथांऽकुर: सिद्धस्तथाऽत्मनि शिव: स्थित इति करतलकरपृष्ठाभ्यां नम: ।

### अथ अंगन्यास:

एक एव शिवस्साक्षाच्चिदानन्दमयो विभु इति हृदयाय नम: । निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपंचक इति शिरसे स्वाहा ।
अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामक इति शिखायै वषट् । देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थित इति कवचाय हुम् ।
मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थित इति नेत्रत्रयाय वौषट् । बीजे यथांऽकुर: सिद्धस्तथाऽत्मनि शिव: स्थित इति अस्त्राय फट् ।
श्रीशिवप्रीत्यर्थे श्रीसिद्धान्तशिखामणिपाठे विनियोग: ।

## ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणिध्यानम् ।।

स्वस्ति श्रीगणनायकेन मुनयेऽगस्त्याय तत्त्वार्थिने शिष्याय प्रतिबोधिते भगवता श्रीरेणुकेन स्वयम् ।
तात! त्वं शिवयोगिवर्यसुकृतिर्मे मानसे मन्दिरे श्रीसिद्धान्तशिखामणे वस सदा ज्ञानप्रदीपो भव ।।१।।

शरणागतदीनार्तपरित्राणैकहेतवे । श्रीरेणुकगणेशाय ज्ञानमुद्राय ते नमः ।।२।।

अगस्त्यसंशयव्रातमहाध्वान्तांशुमालिनम् । वन्दे शिवसुतं देवं रेणुकाख्यं जगद्गुरुम् ।।३।।

नमः शिवाचार्यवराय तुभ्यं श्रीवीरशैवागमसागराय । विनाऽपि तैलं भवताऽत्र येन प्रज्वालितो ज्ञानमणिप्रदीपः ।।४।।

यस्मिन्नागमशास्त्रतत्त्वमखिलं सम्यक् च संसूचितं भक्तैर्वांच्छितभुक्तिमुक्तिफलदं यत्कल्पवृक्षात्मकम् ।
तं शैवागमसम्मतं निगमविद् विद्वद्भिरासेवितं श्रीसिद्धान्तशिखामणिं प्रतिदिनं ध्यायेत् सदा सादरम् ।।५।।

पूज्यश्रीशिवयोगिवर्यरचितं सिद्धान्तरत्नाकरं सूक्ष्मं धार्मिकतात्त्विकस्थलयुतं चैकाधिकं तत् शतम् ।
त्रैलोक्यं पदमादिमं परपदं सर्वान्तिमे योजितं श्रीसिद्धान्तशिखामणिं दिनदिनं ध्यायेत् सदा शांतिदम् ।।६।।

## ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणिमाहात्म्यम् ।।

यः पठेत् प्रयतो नित्यं श्रीसिद्धान्तशिखामणिम् । शिवसायुज्यमाप्नोति भयशोकादिवर्जितः ।।१।।
सदाऽध्ययनशीलस्य श्रीसिद्धान्तशिखामणेः । क्षीयन्ते सर्वपापानि पूर्वजन्मकृतानि च ।।२।।
जलस्नानाद् वरं पुंसां श्रीसिद्धान्तशिखामणौ । ज्ञानार्णवे सदा स्नानं संसारमलनाशनम् ।।३।।
श्रीरेणुकगणाध्यक्षमुखपद्माद्विनिःसृतः । कण्ठपीठे सदा धार्यः श्रीसिद्धान्तशिखामणिः ।।४।।
श्रीरेणुकगणाध्यक्षवचनामृतसागरम् । पायं पायं सदा पुंसां पुनर्जन्म न विद्यते ।।५।।
सर्वागमव्रजोगावस्तासां दोग्धा च रेणुकः । वत्सोऽगस्त्यः सुधीर्भोक्ता दुग्धं शिखामणिर्महान् ।।६।।
एकं शास्त्रं श्रीशिवाद्वैतसंज्ञम् एको देवः श्रीमहादेव एव ।
एको मन्त्रः शैवपंचाक्षरोऽयम् कर्माप्येकं इष्टलिंगार्चनं हि ।।७।।

## ।। अथ फलश्रुतिः ।।

श्रीवेदागमवीरशैवसरणिं श्रीषट्स्थलोद्यन्मणिं
श्रीजीवेश्वरयोगपद्मतरणिं श्रीगोप्यचिन्तामणिम् ।
श्रीसिद्धान्तशिखामणिं लिखयिता यस्तं लिखित्वा परान्
श्रुत्वा श्रावयिता स याति विमलां भुक्तिं च मुक्तिं पराम् ।।

|| अथ श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृतं प्रारभ्यते ||

## अनुक्रमणिका


| अध्याय | श्लोक | ओवीसंख्या | पृ॰क्र॰ |
|---|---|---|---|
| अध्याय पहिला | ३२ | १७९ | १ |
| अध्याय दुसरा | ३५ | १११ | २१ |
| अध्याय तिसरा | ९० | १३९ | ३५ |
| अध्याय चौथा | ५५ | १०८ | ५७ |
| अध्याय पाचवा | ७८ | २१४ | ७३ |
| अध्याय सहावा | ६३ | २२१ | १०१ |
| अध्याय सातवा | ६७ | १४४ | १२८ |
| अध्याय आठवा | ४९ | ११६ | १४८ |
| अध्याय नववा | ९५ | ३५० | १६४ |
| अध्याय दहावा | ७९ | १७६ | २०५ |
| अध्याय अकरावा | ७७ | १३७ | २३० |
| अध्याय बारावा | ४८ | १७९ | २५१ |
| अध्याय तेरावा | ३७ | १२३ | २७३ |
| अध्याय चौदावा | ४४ | १३४ | २८९ |
| अध्याय पंधरावा | ७१ | १६९ | ३०७ |
| अध्याय सोळावा | ८४ | २४९ | ३३० |
| अध्याय सतरावा | ८६ | २१३ | ३६१ |
| अध्याय अठरावा | ७७ | १६९ | ३९० |
| अध्याय एकोणिसावा | ९७ | २३३ | ४१४ |
| अध्याय विसावा | ८७ | ३०२ | ४४६ |
| अध्याय एकविसावा | ५४ | १४५ | ४८२ |
| **एकूण** | **१४०५** | **३८११** | |

# अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीजगद्‌गुरु पंचाचार्येभ्यो नमः । श्रीउमामहेश्वराभ्यां नमः। श्रीमन्मथस्वामिने नमः ।। ॐ नमो जी एकदंता । गणनायका शिवसुता । प्रज्ञा-प्रतिभेचा तू दाता । वक्रतुंडा गणपती ।।१।। आरंभिले ग्रंथलेखन । ते कृपेने करावे पूर्ण । अल्पमती मी विद्याहीन । म्हणूनि तुला वंदितो ।।२।। सारस्वतांची स्फूर्तिझरी । वीणावादिनी वागीश्वरी । विश्वमोहिनी तूच खरी । तुला माये वंदितो ।।३।। सुखदु:खांच्या संसारगाथा । आदिकालापासून त्याच सर्वथा । परि तुझ्या कृपेने कथा-। रूप धारण करिती गे ।।४।। काव्य महाकाव्य नाटक । अशी रूपे अनेकानेक । त्यांत तुझे दिसे कौतुक । रसिक-सारस्वतांना ।।५।। ग्रंथरचनेसाठी म्हणून । तुझे मागतो कृपादान । सिद्धीस नेई परिपूर्ण । कामना माझी स्नेहाळे ।।६।। जय जय शिवा विश्वरूपा । अनादिसिद्ध मायबापा । तुझी होता पूर्ण कृपा । अशक्य काही नसेचि ।।७।। अनंत ब्रह्मांडांच्या कोटी । वसती तुझ्या रोमापोटी । उत्पत्ति-स्थिति-लय राहाटी । तुझ्याठायी पूर्णत्वे ।।८।। वेलीवरी फुलावे पान । अथवा हळूच जावे गळून । तुझ्या इच्छामात्रेकरून । हे कवतिक घडतसे ।।९।। तळहातीच्या गूढ रेषा । कोणा भ्रमविती दाही

दिशा । कोण्या सुबुद्धा बैसे फासा । वासनेचा अनिवार ।।१०।। कोणाचे आयुष्य वाळवंट । क्रमता जीवास होती कष्ट । उमलण्याआधीच नष्ट । फूल कोठे होतसे ।।११।। फुलांचे ताटवे गंधित । कोणाच्या झुलती दारात । कोणाचे जीवनसंगीत । सरे सुगंधी श्वासापरी ।।१२।। कोणाचे आयुष्य तरल । कोणाच्या अंतरी कंटक-सल । हे प्राक्तन-फेरे सकल । घडती तुझ्या साक्षीने ।।१३।। जे तुजला अनन्यशरण । त्यांना सोसवे प्राक्तन दारुण । येर जे भ्रमती दिशाहीन । ते कळवळती व्यर्थचि ।।१४।। तुझ्या स्मरणी चालता वाट । कंटकशल्ये होती बोथट । तुझ्या कृपेचा वाहता पाट । देह-मन शांत होय ।।१५।। जय जय शिवा सर्वोत्तमा । भक्तकामकल्पद्रुमा । तूचि मूळ शिवागमा । म्हणूनि ग्रंथा साह्य करी ।।१६।। शिवागमांचे सार सकळ । ज्या ग्रंथात बिंबले निर्मळ । तो 'श्रीसिद्धान्तशिखामणी' निखळ । वीरशैवांचा धर्मग्रंथ ।।१७।। त्या ग्रंथाचा अनुवाद । मराठीत करावा सिद्ध । यालागी प्रवर्तलो मी अबुद्ध । म्हणूनि शिवा साह्य करी ।।१८।। तुझ्या कृपेने कामना सरती । होईल माझी देवा निश्चिती । ग्रंथ रचूनि माझी मती । आणि वाणी शुद्ध व्हावी ।।१९।। रेवण मरुळ एकोराम । पंडित विश्वाराध्य परम । या पंचाचार्यांस प्रणाम । माझा असो साष्टांग ।।२०।। पंचपीठांवरी विद्यमान । आचार्य जे शीलसंपन्न । त्यांनाही करितो वंदन । अत्यादरपूर्वक ।।२१।। पंचपीठांत विख्यात

पीठ । श्रीकाशीजंगमवाडी मठ । ज्ञानसिंहासन ज्ञानपीठ । श्रीविश्वाराध्य जगद्गुरूंचे ।।२२।। आरूढ ज्ञानसिंहासनावर । महास्वामीजी श्रीचंद्रशेखर । उगवला जैसा दिनकर । अंतराळी तेजस्वी ।।२३।। अज्ञान दूर दवडावे । स्वत्वाचे भान घडवावे । ऐसा धर्मजागर स्वभावे । महास्वामींनी आरंभिला ।।२४।। ज्ञाननिष्ठ सत्त्वशील । कीर्तिवंत करुणाबहुल । अशा आचार्यांचे पदकमल । वंदूनि मी धन्य झालो ।।२५।। जगद्गुरूंच्या आज्ञेवरून । आरंभिले ग्रंथलेखन । श्रीसिद्धान्तशिखामणी संपूर्ण । ओवीबद्ध करावा ।।२६।। संस्कृत भाषा श्रीमंत । जरी ज्ञानभाषा समर्थ । तरी तिचा कळाया अर्थ । मराठी जनांस कठीण ।।२७।। म्हणूनि वीरशैवसिद्धान्त । ओवूनिया मराठीत । सिद्ध करावा पारायणग्रंथ । जगद्गुरूंची आज्ञा ही ।।२८।। महास्वामीजींचा वरदहस्त । मम मस्तकावरी सतत । म्हणूनि प्रवर्तलो मी येथ । लेखनकामाठी कराया ।।२९।। जरी मी अल्पबुद्धी असेन । तरी त्यांच्या कृपेने तरेन । आणि होईल पूर्ण लेखन । मनी हा दृढ विश्वास ।।३०।। पेरातूनि उगवे पेर । इक्षुदंड होई थोर । तैसा ओवी-ओवीतून विस्तार । पावेल ग्रंथ हळूहळू ।।३१।। मजला करणे प्रवृत्त । हे तर केवळ निमित्त । लिहिणारा लिहितो ग्रंथ । मी बाहुले समर्थाचे ।।३२।। मग चिंता करू कशाला? । वृथा वागवू मीपणाला? । ज्याचे कर्तृत्व त्याला । अर्पूनि मी मुक्त होतो ।।३३ ।। नमो महास्वामी पलसिद्ध ।

ज्यांची योगलीला अगाध । साखरखेर्डे ग्राम प्रसिद्ध । तेथे समाधिस्थ सद्गुरू ।।३४।। अभिषिक्त त्या पट्टस्थानी । वेदान्ताचार्य श्रीसिद्धलिंग स्वामी । त्यांचा अनुग्रहीत मी । आदरे त्यांना वंदितो ।।३५।। बसवादी शरण समस्त । ज्ञानेश्वरादी सकल संत । मन्मथ-लक्ष्मणादी शिवसंत । यांना वंदन त्रिवार ।।३६।। कलाकवी मुक्तेश्वर । श्रीधरस्वामी नाझरेकर । सर्व कथाकवींस सादर । मनोभावे वंदितो ।।३७।। ग्रंथकर्ते कविवर्य । श्रीशिवयोगी शिवाचार्य । भाष्यकर्ते श्रीमरितोंटदार्य । या दोघांसी वंदितो ।।३८।। श्रीरमतेराम सद्गुरू । माझ्या मायपित्याचे श्रीगुरू । संसारसागरीचे तारू । त्यांना वंदन सादर ।।३९।। तुम्ही श्रोते-वाचक भाविक । मर्मज्ञ आणि चिकित्सक । शुद्धान्त:करणी विवेक । जागृत तुमचा सदैव ।।४०।। ज्ञानसरोवरीचे मराळ । भक्षूनि तत्त्वमुक्ताफळ । क्रमता गूढ अंतराळ । अथकपणे अध्यात्माचे ।।४१।। जिज्ञासेच्या सरितेकाठी । तुमची सदैव असे राहाटी । नित्य जपता ओठी । गुज शिवनामाचे ।।४२।। भक्तिप्रेमाच्या लोटे । तुमच्या नयनी पूर दाटे । भारावूनि नेत्रपुटे । मिटती दळासारखी ।।४३।। आप-पर ऐसा भाव । नेणेचि तुमची जाणीव । सर्वांभूती प्रेमभाव । हृदयाकाशी दाटलेला ।।४४।। सद्ग्रंथांच्या श्रवणी । कदापि न पुरे धणी । मन आतून फुलूनी । जाय कमळासारखे ।।४५।। असे तुम्ही प्रज्ञावंत । श्रोते-वाचक उपस्थित । मग मज उणे येथ । कशाचे जी

असेल? ।।४६।। तुमची केवळ स्नेहदृष्टी । उभवील साहित्याची सृष्टी । तरी आता कासवदृष्टी । विलोकावे मजकडे ।।४७।। आपुले बालक म्हणून । मजला घ्यावे सांभाळून । मज अशक्य तरी लेखन । करवूनि घ्यावे सप्रेम ।।४८।। न्यून ते करावे पुरते । अधिक ते करावे सरते । आनंदाच्या डोही पुरते । सर्वकाळ न्हावे जी ।।४९।। द्यावे मजकडे अवधान । एकाग्र करावे अंत:करण । अद्भुत शिवसिद्धान्त श्रवण । आता पुढे करावा ।।५०।। पृथ्वीवरी नाना देश । त्यात एक भारतवर्ष । विविध धर्मांची विशेष । जन्मभूमी असे ही ।।५१।। त्यात वीरशैवधर्म महान । आगमोक्त सनातन । त्याचे युगीयुगी स्थापन । केले पंचाचार्यांनी ।।५२।। तोच प्राचीन इतिहास । श्रोतेहो कथितो तुम्हांस । पाशुपततंत्र-सुप्रभेदागमांस । ठेवूनिया साक्षीला ।।५३।। वीरशैवधर्माचा हा विशेष । करिता षट्स्थलांचा प्रवास । एकाच जन्मी साधकास । मुक्ती देई सहज ।।५४।। न पाहता नारी नर । सर्वांना मिळे समान संस्कार । जातिवर्णादी भेद समग्र । या धर्मात नसतीच ।।५५।। साधकहृदयीची भक्ती । पाहून श्रीगुरू दीक्षा देती । वर्ण-आश्रमांपासून मुक्ती । मिळे याच धर्मात ।।५६।। उद्धराया मानव-जाती । या धर्माची झाली उत्पत्ती । म्हणूनि सर्वांनी भक्ति-। पूर्वक हाचि आचरावा ।।५७।। शिवाच्या पंचमुखांपासून । उत्पन्नले पंच शिवगण । रेणुक दारुक घंटाकर्ण । धेनुकर्ण नि विश्वकर्ण हे ।।५८।।

सद्योजातमुखातून । रेणुकगणाचे अवतरण । वामदेवमुखातून । उद्भवले दारुक ।।५९।। अघोर-मुखातून घंटाकर्ण । तत्पुरुषमुखातून धेनुकर्ण । शिवाचे पाचवे मुख ईशान । तेथून विश्वकर्ण प्रकटले ।।६०।। ह्या पंच शिवगणांनी भूवर । शिवाज्ञेने घेतले अवतार । चहू युगांत केला जागर । वीरशैवधर्माचा ।।६१।। ते कोण कोठे गेले । कोणत्या लिंगातूनि उद्भवले । हे ठाऊक व्हावे सगळे । म्हणूनि संक्षिप्त सांगतो ।।६२।। कोण्या युगी नाम कोण । कोणते पीठ सिंहासन । क्षेत्र गोत्र सूत्र कंथा जाण । आणि दंड कोणता ।।६३।। हे ध्यानी घेऊनि नीट । वीरशैवांनी करावे पाठ । आपुला धर्म परंपरा पीठ । असावे सर्व ठाऊक ।।६४।। आंध्रदेशी कोल्लिपाक पुर । तेथे लिंग सोमेश्वर । त्या लिंगातूनि अवतार । रेणुक घेती युगीयुगी ।।६५।। कृतयुगी एकाक्षर शिवाचार्य । त्रेतायुगी एकवक्त्र शिवाचार्य । द्वापरी रेणुक शिवाचार्य । कलियुगी रेवणाराध्य या नावे ।।६६।। कर्नाटकात बाळेहोन्नूर । तेथे स्थापिले पीठ मनोहर । वीरसिंहासन गोत्र वीर । हरित्कंथा अश्वत्थदंड ।।६७।। कर्नाटकी प्रसिद्ध श्रेष्ठ । हेच रंभापुरी पीठ । आचार्यांचे करितो स्पष्ट । कार्य ऐका सादर ।।६८।। कृतयुगी ब्रह्मादी देवांलागून । केले नीलमणी-लिंगधारण । पंचाक्षरी महामंत्र उपदेशून । दाखविला मोक्षमार्ग ।।६९।। त्रेतायुगी कौशिकादी ऋषींना । मनू-यक्ष-गंधर्व-किन्नरांना । करविली रत्नमय लिंगधारणा । केला पंचाक्षर मंत्रोपदेश ।।७०।।

द्वापरी महर्षी अगस्त्यास । केला पडविडी-सूत्रोपदेश । त्याचि सूत्राचा विस्तार विशेष । श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ हा ।।७१।। रेवणाराध्य नामे कलियुगात । अवतार घेऊनि शिवाद्वैत । उपदेशिले उद्धरिले अनंत । शिवभक्त वीरत्व देऊनी ।।७२।। रेवणसिद्ध पर्यायनाम । जनांस बोधिले शिवागम । ऐसे वीरपीठाचे महिमान । ध्यानी धरा श्रोतेहो ।।७३।। क्षिप्रातीरी मनोहर । वटक्षेत्र श्रीसिद्धेश्वर । त्या लिंगातूनि अवतार । दारुक घेती युगीयुगी ।।७४।। त्यांची नामे ऐका सादर । कृतयुगात द्व्यक्षर । त्रेतायुगात द्विवक्त्र । द्वापरयुगी दारुक ।।७५।। कलियुगी मरुळाराध्य अभिधान । स्थापिले सद्धर्मसिंहासन । मध्यप्रांती उज्जयिनी महान । तेथे पीठ विराजित ।।७६।। नंदीगोत्र पलाशदंड करी । कंथा रक्तवर्ण साजिरी । ब्रह्मादी देवांस कृतयुगांतरी । लिंगधारणा करविली ।।७७।। मंत्र पंचाक्षरी उपदेशिला । त्यांना मोक्षमार्ग दाविला । त्रेतायुगी कश्यपादी ऋषिसमूहाला । गंधर्वादींना उपदेशिले ।।७८।। दधीचि ऋषीस द्वापरी पवित्र । उपदेशिले वृष्टि-सूत्र । कलियुगी शिवाद्वैत सर्वत्र । बोधूनि सद्धर्म जागविला ।।७९।। कालांतरे कर्नाटकात । बल्लारीनिकट उज्जयिनीत । पीठ झाले स्थलांतरित । मध्यप्रांतामधूनी ।।८०।। क्षेत्र पवित्र द्राक्षाराम जाण । तेथे रामनाथलिंगातून । युगीयुगी घंटाकर्ण । योगबळे अवतरती ।।८१।। त्र्यक्षर नाम कृतयुगात । त्रिवक्त्र नाम त्रेतायुगात । घंटाकर्ण

द्वापरात । कलीत एकोरामाराध्य ।।८२।। हिमालयी केदारक्षेत्रात । स्थापिले वैराग्यपीठ निवांत । तेचि वैराग्यसिंहासन सांप्रत । उखीमठात स्थित असे ।।८३।। भृंगीगोत्र वेणुदंड करी । कंथा नीलवर्ण साजिरी । उपदेशिला पंचाक्षरी । कृतयुगी ब्रह्मादींना ।।८४।। वसिष्ठादी ऋषिगणा । केली त्रेतायुगी लिंगधारणा । यक्षगंधर्वकिन्नरांना । उपदेशिला महामंत्र ।।८५।। द्वापरी महर्षी व्यासास । केला लम्बन-सूत्रोपदेश । उजळिला शिवाद्वैतप्रकाश । कलियुगी सर्वत्र ।।८६।। अज्ञ जनांस बोधिले । मनी वैराग्य बिंबविले । कार्य संपता विलीन झाले । रामनाथलिंगात ।।८७।। आंध्रप्रदेशात श्रीशैल । क्षेत्र पुरातन विशाल । तेथे शिव नांदतो प्रेमळ । मल्लिकार्जुन या नामे ।।८८।। युगीयुगी त्या लिंगातून । अवतीर्ण होती धेनुकर्ण । कृतयुगी चतुरक्षर अभिधान । त्रेतात होते चतुर्वक्त्र ।।८९।। द्वापरात धेनुकर्ण । कलीत पंडिताराध्य अभिधान । जागविली मनामनांतून । सूर्यासम शिवभक्ती ।।९०।। स्थापिले पीठ श्रीशैलात । तेचि श्रीशैलपीठ सर्वज्ञात । सूर्यसिंहासन विख्यात । आहे त्याच पीठा-मध्ये ।।९१।। न्यग्रोधदंड वृषभगोत्र । कंथा धवलवर्ण पवित्र । कृतयुगी पंचाक्षरी मंत्र । उपदेशिला ब्रह्मादींना ।।९२।। त्रेतायुगी ऋषी गंधर्व । लिंगधारी केले सर्व । प्रकटला तेजस्वी सूर्य । जणू आचार्यरूपाने ।।९३।। सानंद मुनीस द्वापरी पवित्र । उपदेशिले मुक्तागुच्छ-सूत्र । आणि कलियुगात

सर्वत्र । उद्धरिले जनलोक ।।९४।। परमपावन काशीक्षेत्र । आनंदकानन शिवक्षेत्र । विश्वेश्वर लिंगरूपे पवित्र । तेथे नांदतो शंकर ।।९५।। विश्वेश्वर ज्योतिर्लिंगातून । उद्‌भवले युगीयुगी विश्वकर्ण । कृतयुगी पंचाक्षर अभिधान । पंचवक्त्र त्रेतायुगी ।।९६।। विश्वकर्ण द्वापरात । विश्वाराध्य कलियुगात । या नामे झाले विख्यात । चहुयुगी विश्वकर्ण ।।९७।। काशीक्षेत्री जंगमवाडी मठ । तेथे स्थापिले ज्ञानपीठ । ज्ञानसिंहासन नामे श्रेष्ठ । तेचि आहे विख्यात ।।९८।। स्कंदगोत्र बिल्वदंड करी । कंथा पीतवर्ण साजिरी । चतुर्युगांत पंचाक्षरी । उपदेशिला महामंत्र ।।९९।। कृतयुगी ब्रह्मादी देवगणा । नीलरत्नांची लिंगधारणा । करवून, उपदेशून मंत्र जाणा । दाखविला मोक्षमार्ग ।।१००।। त्रेतायुगी ऋषिगण-। यक्ष-गंधर्व-किन्नरांसी जाण । रत्नलिंग देऊन । उपदेशिला महामंत्र ।।१०१।। द्वापरी महर्षी दुर्वासास । केला पंचवर्ण-महासूत्रोपदेश । कलियुगी सर्व मानवांस । ज्ञान देऊनि उद्धरिले ।।१०२।। वीरवृत्ती सद्धर्मपालन । वैराग्य तेजवृत्ती ज्ञान । अशा पंचगुणांची महान । देती शिकवण पंचपीठे ।।१०३।। उद्‌भवले ज्या लिंगातून । त्याच लिंगात होती विलीन । आपुले कार्य पूर्ण करून । पंचाचार्य जगद्‌गुरू ।।१०४।। वीरशैव विद्यापरंपरा । सांगतो श्रोतेहो अवधारा । आदिविद्यागुरू शंकरा-। पासूनि तिचा उगम ।।१०५।। शिवाने कथिले शिवाद्वैत । प्रथम पार्वती-शिवगणांप्रत । आचार्यरूपे होऊनि

अवतरित । शिवगणे कथिले ऋषींना ।।१०६।। पंचाचार्यांनी पाच सूत्रांत । ऋषींस कथिला सिद्धान्त । तोचि ऋषींनी विवरूनि ग्रंथांत । दिला मानवमात्रासी ।।१०७।। ज्ञानपरंपरा ही जाण । अद्यापही असे अक्षुण्ण । आचार्यांकडूनि मिळे ज्ञान । पट्टाधिकारी-जंगमांस ।।१०८।। त्यांच्याकडून भक्तांप्रत । तेच शिवज्ञान होते प्राप्त । ऐसा ज्ञानप्रवाह अविरत । वाहत आला युगीयुगी ।।१०९।। विविध प्रांती झाले संत । त्यांनी ज्ञानौघ केला समर्थ । रचूनि आपुल्या भाषेत ग्रंथ । ज्ञान दिले लोकांना ।।११०।। बसवेश्वरादी शिवशरण । त्यांनी कन्नड वचने रचून । हेचि शिवाद्वैतज्ञान । नेले लोकांपर्यंत ।।१११।। श्रीपती आदी पंडितत्रयांनी । संस्कृत-तेलुगू ग्रंथांमधूनी । पाल्कुरिकी सोमनाथादी कवींनी । दिले हाती लोकांच्या ।।११२।। महाराष्ट्रात मन्मथस्वामींनी । शांतलिंग-लक्ष्मणादींनी । हेचि ज्ञान मराठीतूनी । देऊनि लोका धैर्य दिले ।।११३।। महाराष्ट्रात शिवाचार्य । अद्यापीही करिती कार्य । भजन कीर्तन शिवनामसप्ताह । अव्याहत चालती ।।११४।। संस्कृतासह लोकभाषांत । शिवज्ञानप्रवाह अखंडित । असा आला आणि प्रवाहित । पुढेही होत राहिला ।।११५।। आता श्रोतेहो सावध होऊन । करावा शिवसिद्धान्त श्रवण । जे ऐकता जन्ममरण-। भयापासून मिळे मुक्ती ।।११६।। वेद म्हणजे निगम जाण । ते जन्मले शिव-नि:श्वासातून । जे प्रकटले शिव-वाणीतून । ते आगम म्हणविले ।।११७।। ऐसे

अठ्ठावीस शिवागम पूर्ण । त्यांची नामे भिन्न भिन्न । ती करितो आता कथन । जिज्ञासू श्रोत्यां-कारणे ।।११८।। कामिक योगज चिन्त्यागम । कारण अजित दीप्तागम । सूक्ष्म अंशुमान सहस्रागम । सुप्रभेद निःश्वास ।।११९।। अनल वीर विजय । मकुट विमल स्वायंभुव । बिम्ब प्रोद्गीत रौरव । ललित आणि सिद्धागम ।।१२०।। पारमेश्वर चंद्रज्ञान । शर्वोक्त आणि संतान । किरण आणि वातुल जाण । हे अठ्ठावीस शिवागम ।।१२१।। शिवागमी उत्तरभागात । प्रतिपाद्य षट्स्थलसिद्धान्त । तोचि विवरिला या ग्रंथात । शिवयोगी शिवाचार्यांनी ।।१२२।। रेणुकाचार्य-अगस्त्यमुनी । यांच्या तात्त्विक संवादातूनी । उत्पन्नला श्रीसिद्धान्तशिखामणी । म्हणूनि म्हणती 'रेणुकगीता' ।।१२३।। गुरु-शिष्याचा संवाद । यात साठला पूर्णबोध । त्याचा श्रोतेहो आस्वाद । घ्यावा हळुवार मनाने ।।१२४।। तरी आता सावध सावध । चित्त श्रवणी करा बद्ध । जन्मी एका मुक्तिपद-। दाता ग्रंथ ऐकावा ।।१२५।।

### शिवस्तुती

त्रैलोक्यसंपदालेख्यसमुल्लेखनभित्तये । सच्चिदानंदरूपाय शिवाय ब्रह्मणे नमः ।।१।।

स्वर्ग मृत्यू पाताळ । हे त्रैलोक्य अति विशाल । त्यात नांदती सकळ । चर अचर सर्वही ।।१२६।। त्रैलोक्याचे हे वैभव । जरी रेखाटावे सर्व । तरी त्यास एकमेव । आधारभिंत शिवचि ।।१२७।। असा

**सच्चिदानंदरूप । परशिव ब्रह्मरूप । नत होऊनि सुखरूप । वंदितो मी अत्यादरे ।।१२८।।**

ब्रह्मेति व्यपदेशस्य विषयं यं प्रचक्षते । वेदान्तिनो जगन्मूलं तं नमामि परं शिवम् ।।२।।

यस्योर्मिबुद्बुदाभासः षट्त्रिंशत्तत्त्वसंचयः । निर्मलं शिवनामानं तं वंदे चिन्महोदधिम् ।।३।।

**ज्यापासूनि विश्व झाले निर्माण । वेदान्ती म्हणती ब्रह्म पूर्ण । जे जगताचे मूलकारण । त्या परशिवास नमस्कार ।।१२९।। शिवापासूनि भूमीपर्यंत । विश्व छत्तीस तत्त्वयुक्त । शुद्ध शुद्धाशुद्ध अशुद्ध त्यात । तत्त्वे तीन प्रकारची ।।१३०।। ही छत्तीस तत्त्वे सारी । लाटा-तरंग-बुद्बुदापरी । परशिव-चैतन्यसागरी । विहरती सहजभावे ।।१३१।। आणव मायीय कार्मिक । या त्रिमलांविरहित देख । निर्मल चित्सागर शिव एक । त्यास माझा नमस्कार ।।१३२।।**

यद्भासा भासते विश्वं यत्सुखेनानुमोदते । नमस्तस्मै गुणातीतविभवाय परात्मने ।।४।।

सदाशिवमुखाशेषतत्त्वोन्मेषविधायिने । निष्कलंकस्वभावाय नमः शांताय शंभवे ।।५।।

**जो प्रकाशता विश्व उजळत । जो तुष्टता विश्व तुष्टत । वैभवसंपन्न त्रिगुणरहित । त्या परशिवास नमस्कार ।।१३३।। सदाशिवापासूनि चौतीस । सर्व तत्त्वांचा जो करी विकास । त्या निर्मल शांतस्वरूप शंभूस । नमस्कार नमस्कार ।।१३४।।**

स्वेच्छाविग्रहयुक्ताय स्वेच्छावर्तनवर्तिने । स्वेच्छाकृतत्रिलोकाय नमः सांबाय शंभवे ।।६।।

यत्र विश्राम्यतीशत्वं स्वाभाविकमनुत्तमम् । नमस्तस्मै महेशाय महादेवाय शूलिने ।।७।।

**स्वेच्छेने करी देहधारण । इच्छाशक्तीने विश्वसृजन । जो करी स्वेच्छावर्तन । त्या शिवा नमितो अंबेसह ।।१३५।। जो श्रेष्ठ विश्वस्वामी । त्रिशूलधारी अंतर्यामी । त्या महेश्वर महादेवास मी । वंदिले अति आदरे ।।१३६।।**

## शक्तिस्तुती

यामाहुः सर्वलोकानां प्रकृतिं शास्त्रपारगाः । तां धर्मचारिणीं शंभोः प्रणमामि परां शिवाम् ।।८।।

यया महेश्वरः शंभुर्नामरूपादिसंयुतः । तस्यै मायास्वरूपायै नमः परमशक्तये ।।९।।

**जी परशिवाशी अभिन्न । पंडित मानिती विश्वकारण । त्या परशिवेस वंदन । जी शिवाची धर्मपत्नी ।।१३७।। अनाम अरूप महेश्वर । जिच्यामुळे झाला नामरूपाकार । त्या मायाशक्तीस नमस्कार । माझा असो सदैव ।।१३८।।**

शिवाद्यादिसमुत्पन्नशान्त्यतीतपरोत्तराम् । मातरं तां समस्तानां वंदे शिवकरीं शिवाम् ।।१०।।

इच्छाज्ञानादिरूपेण या शंभोर्विश्वभाविनी । वंदे तां परमानंदप्रबोधलहरीं शिवाम् ।।११।।

अमृतार्थं प्रपन्नानां या सुविद्याप्रदायिनी । अहर्निशमहं वंदे तामीशानमनोरमाम् ।।१२।।

**प्रथम परशिवापासून । प्रकटली शान्त्यतीतोत्तरा कला जाण । जी श्रेष्ठ त्या कलेहून । माता सहा कलांची ।।१३९।। अशी मातृरूपी कल्याणकारी । सर्वमंगला भुवनेश्वरी । जी शिवाची हृदयेश्वरी । त्या शिवेला नमस्कार ।।१४०।। शिवाची धर्मचारिणी । इच्छा-ज्ञान-क्रियारूपिणी । परमानंदबोध-प्रवाहिनी । विश्वप्रकाशिनी तिला नमू ।।१४१।। अमृतत्व व्हावे प्राप्त । म्हणूनि जे शरणागत । त्यांना शिवजीवैक्याची देत । विद्या जी कृपाळुत्वे ।।१४२।। ती शिवाची मनमोहिनी । अमृतत्वप्रदायिनी । ती नमितो निशिदिनी । मी भक्तिभावनेने ।।१४३।।**

## ग्रंथकार-वंशवर्णन

कश्चिदाचारसिद्धानामग्रणीः शिवयोगिनाम् । शिवयोगीति विख्यातः शिवज्ञानमहोदधिः ।।१३।।

शिवभक्तिसुधासिंधुजृम्भणामलचंद्रिका । भारती यस्य विदधे प्रायः कुवलयोत्सवम् ।।१४।।

**शिवयोगी शिवाचार्य थोर । ज्यांनी रचिला ग्रंथ सुंदर । शिवागमांचे सर्व सार । श्रीसिद्धान्त-शिखामणीत आणिले ।।१४४।। त्यांच्या वंशी कोण कोण । विद्वान योगी गेले होऊन । तेचि करितो आता कथन । मर्मज्ञ श्रोत्यांकारणे ।।१४५।। शिवज्ञानाचा महासागर । अंगी बाणला सदाचार ।**

**शिवयोग्यांत अग्रेसर । 'शिवयोगी' ख्यात नामे ।।१४६।। त्यांची वाणी रसवंती । ऐकता श्रोतृमनी शिवभक्ती । उचंबळे जैसी येई भरती । सागरी दिनी पौर्णिमेच्या ।।१४७।। चांदणरात्री शीतल । जैसे उमले चंद्रकमल । तैसी मने होती प्रफुल्ल । त्यांना सामोरी पाहता ।।१४८।।**

तस्य वंशे समुत्पन्नो मुक्तामणिरिवामलः । मुद्ददेवाभिधाचार्यो मूर्धन्यः शिवयोगिनाम् ।।१५।।
मुद्दानात्सर्वजन्तूनां प्रणतानां प्रबोधतः । मुद्ददेवेति विख्याता समाख्या यस्य विश्रुता ।।१६।।

**त्या शिवयोग्याच्या वंशात । जे श्रेष्ठ शिवयोग्यांत । ते जन्मले 'मुद्ददेव' ज्ञानवंत । आचार्य मोत्या-सारखे ।।१४९।। शरणागत मानवांस । करूनिया ज्ञानोपदेश । ते देती बहू संतोष । म्हणूनि नाव 'मुद्ददेव' ।।१५०।।**

तस्यासीन्नन्दनः शांतः सिद्धनाथाभिधः शुचिः । शिवसिद्धान्तनिर्णेता शिवाचार्यः शिवात्मकः ।।१७।।
वीरशैवशिखारत्नं विशिष्टाचारसंपदम् । शिवज्ञानमहासिंधुं यं प्रशंसन्ति देशिकाः ।।१८।।

**त्या मुद्ददेवांचा सुपुत्र । 'सिद्धनाथ' नामे पवित्र । राग-द्वेष अणुमात्र । त्यांच्या चित्तास शिवेना ।।१५१।। ते प्रत्यक्ष शिवरूप । शिवाद्वैताचे ज्ञानदीप । शिवागमांचा साक्षेप-। पूर्वक करिती**

**निर्णय ।।१५२।। पती पशू पाश पदार्थ तीन । क्रिया चर्चा योग ज्ञान । हे आगमिक चतुष्पाद जाण । दाखविती विवरूनी ।।१५३।। वीरशैवांचा मुकुटमणी । आचारसंपन्न शिवज्ञानी । ऐसी प्रशंसा सत्त्वगुणी । करिती अन्य आचार्य ।।१५४।।**

यस्याचार्यकुलाज्जाता सतामाचारमातृका । शिवभक्तिः स्थिरा यस्मिन् जज्ञे विगतविप्लवा ।।१९।।

तस्य वीरशिवाचार्यशिखारत्नस्य नंदनः । अभवच्छिवयोगीति सिंधोरिव सुधाकरः ।।२०।।

चिदानंदपराकाशशिवानुभवयोगतः । शिवयोगीति नामोक्तिर्यस्य याथार्थ्ययोगिनी ।।२१।।

**ज्या आचार्यकुलातून । सज्जनांचे आचार झाले उत्पन्न । त्या पवित्र कुलात जनन । झाले सिद्धनाथांचे ।।१५५।। म्हणूनि निर्दोष प्रशांत । निर्मल शिवभक्ती स्थित । सिद्धनाथांच्या हृदयात । सदैव होती जागती ।।१५६।। त्या सिद्धनाथांचा सुत । 'शिवयोगी' नामे ख्यात । पित्यास अतीव आनंद देत । जैसा चंद्र सागरासी ।।१५७।। शिवसाक्षात्कारामुळे । त्यांचे बाह्याभ्यंतर उजळे । म्हणूनि सार्थकत्व पावले । 'शिवयोगी' नाम ते ।।१५८।।**

शिवागमपरिज्ञानपरिपाकसुगंधिना । यदीयकीर्तिपुष्पेण वासितं हरितां मुखम् ।।२२।।

येन रक्षावती जाता शिवभक्तिः सनातनी । बौद्धादिप्रतिसिद्धान्तमहाध्वांतांशुमालिना ।।२३।।

स महावीरशैवानां धर्ममार्गप्रवर्तकः । शिवतत्त्वपरिज्ञानचंद्रिकावृतचंद्रमाः ।।२४।।

**शिवागमांचे पूर्ण ज्ञाते । ऐसे वाखाणी जग त्याते । कीर्तिसुगंधे घमघमे ते । अवघे विश्व त्यांच्या हो ।।१५९।। नास्तिक प्रतिसिद्धान्तांस । खंडूनि रक्षिले शिवाचारास । जैसा दिनकर अंधारास । दवडी आपुल्या तेजाने ।।१६०।। श्रेष्ठ वीरशैवांलागून । केले धर्ममार्गप्रवर्तन । दूर दवडिले अज्ञान । मनांतूनि लोकांच्या ।।१६१।। चंद्र शोभे चांदण्याने । तैसे शिवज्ञानचंद्रिकेने । 'शिवयोगी' शोभती मने । आल्हादवीत भक्तांची ।।१६२।।**

आलोक्य शैवतंत्राणि कामिकाद्यानि सादरम् । वातुलान्तानि शैवानि पुराणान्यखिलानि तु ।।२५।।

वेदमार्गाविरोधेन विशिष्टाचारसिद्धये । असन्मार्गनिरासाय प्रमोदाय विवेकिनाम् ।।२६।।

**कामिकापासूनि वातुलागम । ऐसे अठ्ठावीस शिवागम । आणिक शिवपुराणे परम । अभ्यासिली साक्षेपे ।।१६३।। वेदांस न आणिता बाध । शिवाचार केला सिद्ध । कुमार्गासी करूनि रोध । विवेकी जनांस तुष्ट केले ।।१६४।।**

सर्वस्वं वीरशैवानां सकलार्थप्रकाशनम् । अस्पृष्टमखिलैर्दोषैरादृतं शुद्धमानसैः ।।२७।।

तेष्वागमेषु सर्वेषु पुराणेष्वखिलेषु च । पुरा देवेन कथितं देव्यै तन्नन्दनाय च ।।२८।।

तत्संप्रदायसिद्धेन रेणुकेन महात्मना । गणेश्वरेण कथितमगस्त्याय पुनः क्षितौ ।।२९।।

वीरशैवमहातंत्रमेकोत्तरशतस्थलम् । अनुग्रहाय लोकानामभ्यधात् सुधियां वरः ।।३०।।

**जो वीरशैवांचे सार समस्त । जो सर्वदोषविरहित । ज्यास शिरी धारण करीत । शुद्धान्तःकरणी शिवयोगी ।।१६५।। शिवागम-पुराणांत । विवरिला जो शिवसिद्धान्त । तो पार्वती-षडाननांप्रत । पूर्वी कथिला शिवाने ।।१६६।। रेणुकाचार्यांनी अगस्तीला । षट्स्थलसिद्धान्त कथिला । पिंडापासूनि ज्ञानशून्यस्थला-। पर्यंत एकशे एक स्थले ।।१६७।। ते वीरशैव महातंत्र । जवळी न ठेविता अणुमात्र । शिवयोगी शिवाचार्यांनी सर्वत्र । केले प्रकट जनांसाठी ।।१६८।।**

सर्वेषां शैवतंत्राणामुत्तरत्वान्निरुत्तरम् । नाम्ना प्रतीयते लोके यत्सिद्धान्तशिखामणिः ।।३१।।

अनुगतसकलार्थे शैवतंत्रैः समस्तैः
प्रकटितशिवबोधाद्वैतभावप्रसादे ।

विदधतु मतिमस्मिन् वीरशैवा विशिष्टाः
पशुपतिमतसारे पंडितश्लाघनीये ।।३२।।

हा अपूर्व षट्स्थलसिद्धान्त । शैवतंत्राच्या उत्तरभागात । प्रतिपादिला सर्व सिद्धान्तांत । शिरोभागी विराजिला ।।१६९।। 'श्रीसिद्धान्तशिखामणी' म्हणून । या ग्रंथाचे नामाभिधान । सर्व ग्रंथांत श्रेष्ठ संपूर्ण । ग्रंथ असे हा तात्त्विक ।।१७०।। शैवतंत्रांचा रहस्यार्थ । या ग्रंथी झाला अभिव्यक्त । यात प्रकटले शिवाद्वैत । जे आदरिले विद्वज्जनी ।।१७१।। पाशुपतमताचे सार । या ग्रंथात साठले मधुर । सर्व वीरशैवांनी अत्यादर-। पूर्वक हा अभ्यासावा ।।१७२।। याचे करिता अध्ययन । आणि करिता आचरण । तरी जन्ममृत्यूचे ग्रहण । जन्मी एका सुटेल ।।१७३।। जो करील शिवभक्ती । त्यास एका जन्मीच मुक्ती । गर्जे आगमांची उक्ती । 'जन्म हा अखेरचा' ।।१७४।। आता पुढील कथाभाग । मनी ठेवूनि अनुराग । जैसे भ्रमर चुंबिती पराग । तैसा हळू अनुभवावा ।।१७५।। हा ग्रंथ अति मधुर । वीरशैवधर्मबीजांकुर । वीरशैवांनी पूर्ण तत्पर । असावे अभ्यासी साधनी ।।१७६।। श्रीसिद्धान्त-शिखामणिप्रसाद । यात साठला पूर्ण शिवबोध । भाविक जिज्ञासू भक्तांनी स्वाद । चाखूनि व्हावे

**कृतार्थ ।।१७७।। शिवस्वरूप जगद्‌गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१७८।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्‌भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । प्रथमोऽध्याय पूर्ण हा ।।१७९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अनुक्रमवर्णनो नाम प्रथमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय दुसरा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु एकाक्षर शिवाचार्याय नमः ।। सच्चिदानंद परशिवा । जाणूनि घेई माझ्या भावा । देवा पूर्णत्वासी न्यावा । तत्त्वप्रकाशक ग्रंथ हा ।।१।। जे वीरशैव मार्ग भुलले । आपुल्या स्वत्वास विसरले । शिवभक्तीस विन्मुख झाले । अन्य पंथी प्रवर्तूनी ।।२।। उणा नसता स्वधर्म । तरी आचरिती परधर्म । त्यांना दाखविणे मर्म । विवरूनि या ग्रंथात ।।३।। तो समृद्ध वीरशैवविचार । बिंबवावा लोकमनावर । यासाठी मांडिला जागर । या ग्रंथाच्या रचनेचा ।।४।। म्हणूनि शिवा साह्य करी । प्रमादालस्य विघ्ने वारी । प्रकटूनि मम अंतरी । निमित्त मला करावे ।।५।। मागील अध्यायी झाले कथन । ग्रंथकाराचे वंशवर्णन । श्रीसिद्धान्तशिखामणीचे महिमान । सार शिवागमांचे ।।६।। तुम्ही श्रोते चिकित्सक । शुद्धांत:करणी भाविक । वीरशैवधर्माचे पाईक । पुढे ऐकाया सिद्ध व्हा ।।७।।**

सच्चिदानंदरूपाय सदसद्व्यक्तिहेतवे । नमः शिवाय सांबाय सगणाय स्वयंभुवे ।।१।।
सदाशिवमुखाशेषतत्त्वमौक्तिकशुक्तिकाम् । वंदे माहेश्वरीं शक्तिं महामायादिरूपिणीम् ।।२।।
अस्ति सच्चित्सुखाकारमलक्षणपदास्पदम् । निर्विकल्पं निराकारं निरस्ताशेषविप्लवम् ।।३।।

भाव-अभावरूप संसार । त्याच्या निर्मितीस आधार । सच्चिदानंदरूप ईश्वर । परशिव स्वयंभू ।।८।। प्रमथगणांच्या मेळ्यात । ज्याचा वास सदोदित । अंकी अंबा विराजित । नमस्कार त्या शिवासी ।।९।। सदाशिवापासूनि भूमीपर्यंत । चौतीस तत्त्वमौक्तिके समस्त । जन्मती ज्या शिंपलीत । ती शक्ती महेश्वराची ।।१०।। तिला शुद्धविद्या म्हणती । महामाया आणि प्रकृती । शिवासी अभिन्न ती शक्ती । त्या पार्वतीस नमस्कार ।।११।। प्रपंचमूळ शिवब्रह्म जाण । त्याचे लक्षण सांगणे कठीण । विकल्परहित भेद-आकारहीन । उपद्रवरहित ते ।।१२।। ते ब्रह्म केवळ सत्‌रूप । चित्‌रूप आनंदरूप । निरवयव निर्लेप । परिपूर्ण स्वत:त ।।१३।।

परिच्छेदकथाशून्यं प्रपंचातीतवैभवम् । प्रत्यक्षादिप्रमाणानामगोचरपदे स्थितम् ।।४।।

देश वस्तू आणि काले । विश्व सर्व भेदिलेले । यास परिच्छेद दिले । नाव तत्त्ववेत्त्यांनी ।।१४।। देश म्हणजे ठिकाण । त्याचे सर्वांसी असे बंधन । वस्तू व्यक्ती असो जाण । राहे एका ठिकाणी ।।१५।। एके ठायी वस्तू वसे । ती दुजे ठायी नसे । शोधिता तेथे न गवसे । हाच देशपरिच्छेद ।।१६।। परि शिवब्रह्म सर्वत्र । भरूनि राहिले एकमात्र । ते नाही ऐसा तिळमात्र । ठाव नसे ब्रह्मांडी ।।१७।। ते ब्रह्मांडा व्यापूनि उरले । ब्रह्मांडाच्याही ते पलीकडले । येथे तेथे हे शब्द नुरले । ऐसे बृहद् तत्त्व

ते ।।१८।। म्हणूनि देशभेदातून । सर्वस्वी मुक्त शिव पूर्ण । दुसरा वस्तुभेद जाण । तो श्रोतेहो सांगतो ।।१९।। घट आणि मठ पाहता । ते वेगळे दिसती सर्वथा । दोन्ही पदार्थांत समानता । किंचिन्मात्र नसेचि ।।२०।। घट हा नसेचि मठ । आणि मठ हा नसेचि घट । परस्परभिन्न ते, एकवट । काही केल्या होती ना ।।२१।। परि तैसा नाही शिव । विश्वी व्यापिला एकमेव । त्यासी तुळावी ऐसी अभिनव । वस्तू दुजी नसेचि ।।२२।। म्हणूनि वस्तुपरिच्छेदापासून । अलिप्त परशिव असे पूर्ण । तैसाचि काल-परिच्छिन्न । नसे शिव कदापि ।।२३।। भूत वर्तमान भविष्य । यांनी बांधिली वस्तू मनुष्य । विशिष्ट काळी त्यांचे आयुष्य । व्यतीत होते सर्वही ।।२४।। भूतकाळीची वस्तू वा नर । वर्तमानात नच येणार । वर्तमानात ज्यांचा वावर । त्यांचा भविष्यी असेना ।।२५।। परि परशिव नाही ऐसा । तो सर्वकाळी सरिसा । भूत-वर्तमान-भविष्यावरी ठसा । त्याचा सदैव असेचि ।।२६।। तो काळाने नाही बांधला । तो प्रकृती प्रपंचापलीकडला । प्रत्यक्षअनुमानादी प्रमाणे त्याला । नच शकती आकळू ।।२७।।

स्वप्रकाशं विराजन्तमनामयमनौपमम् । सर्वज्ञं सर्वगं शांतं सर्वशक्ति निरंकुशम् ।।५।।

सृष्टिनिर्मिती अगोदर । तो होता कैसा सर्वेश्वर । ज्यामुळे झाला विस्तार । पुढे सर्व प्रपंचाचा ।।२८।। शिवब्रह्म स्वयंप्रकाशित । जननमरणापासूनि मुक्त । सर्वज्ञ आणि उपमारहित । सर्वांतर्यामी

वसलेले ।।२९।। राग-द्वेषाच्या विरहित । सर्वसामर्थ्यवान शांत । सर्वव्यापी सर्वमुक्त । नव्हते कोणा-अधीन ।।३०।।

शिवरुद्रमहादेवभवादिपदसंज्ञितम् । अद्वितीयमनिर्देश्यं परं ब्रह्म सनातनम् ।।६।।

तो परब्रह्म शिव । त्यास म्हणती रुद्र महादेव । भव ऐसे त्याचेच नाव । एकमेव तो होता ।।३१।। तो सर्व भेदांपलीकडे । कोणाच्या दृष्टीसी न पडे । गाता त्या ब्रह्मरूपाचे पवाडे । मौन पडे वाणीसी ।।३२।। भेद म्हणजे ऐका काय । सजातीय विजातीय । आणि स्वगत तो होय । ऐसे भेद त्रिविध ।।३३।। मनुष्यजाती असे एक । परि माणसांत भेद कितीक । रूप वर्ण स्वभाव आणिक । मती भिन्न प्रकारची ।।३४।। पशुजाती एक जरी । व्याघ्र सिंह हरणे सारी । अस्वले कोल्हे नानापरी । प्राणी असती अनेक ।।३५।। हंस बगळे काक । कोकीळ पारवे चक्रवाक । ऐसी पक्षिजाती अनेक । भेदांनीच भरलेली ।।३६।। जाती एक तरी भेद । हाचि सजातीय-भेद । शिवब्रह्म निर्विवाद । मुक्त भेदातून या ।।३७।। सजातीय-भेद करावा । तरी दुजा सजातीय असावा । शिवब्रह्मासारखा शोधावा । लागेल दुसरा शिवब्रह्म ।।३८।। परि एकचि शिव परिपूर्ण । दुजे नाही त्यासमान । सजातीय-भेदास कारण । तेथे काही उरेना ।।३९।। दुसरा भेद विजातीय । मनुष्य पशू पक्षी सर्व । यांच्यामध्ये सजातीय । कोणी

**असेना कोणाचा ।।४०।। मनुष्य हा मनुष्य पाही । तो पशू नसे काही । पक्षी हा पशू नाही । पशू हा पक्षी नसे ।।४१।। हे सगळे भिन्न भिन्न । हा विजातीय-भेद जाण । शिवब्रह्म या भेदातून । मुक्त असे सर्वस्वी ।।४२।। सृष्टिआधी परशिवतत्त्व । त्याचे एकमात्र अस्तित्व । त्यासम विजातीय तत्त्व । दुसरे नव्हते कोणते ।।४३।। विजातीय-भेदासी म्हणून । तेथे किंचित नव्हते स्थान । आता तिसरा स्वगत-भेद कथन । करू श्रोत्यांकारणे ।।४४।। मनुष्यदेह दिसे एक । परि त्यास अवयव अनेक । हात पाय डोळे नाक । इंद्रिये ती वेगळाली ।।४५।। हात हा पाय नव्हे । पाय हा हात नव्हे । ऐसे इंद्रियभेद अवघे हे । हाच स्वगत-भेद असे ।।४६।। मनुष्यदेह एक भासला । तरी तो विविध भेदे ग्रासिला । वृक्ष शाखा-पल्लव-फळे डवरला । एक असूनि भेदयुक्त ।।४७।। एक दिसे घर आपुले । पण भिंती छत खांब वेगळे । यासी ज्ञात्यांनी संबोधिले । स्वगत-भेद या नावे ।।४८।। परि शिवब्रह्माच्या ठायी । हा भेद नाही नाही । शिवब्रह्म अशरीरी पाही । तेथे कैसै अवयव? ।।४९।। मनुष्य पक्षी वृक्ष घर । यांना सर्व आकार-प्रकार । जे तत्त्व निरवयव निराकार । तेथे स्वगत-भेद कैसा? ।।५०।। सजातीय विजातीय स्वगत । या त्रिभेदांपासूनि मुक्त । शिवब्रह्म ते शाश्वत । अनिर्देश्य अद्वितीय ।।५१।।**

तत्र लीनमभूत् पूर्वं चेतनाचेतनं जगत् । स्वात्मलीनं जगत्कार्यं स्वप्रकाश्यं तदद्भुतम् ।।७।।

शिवाभिधं परं ब्रह्म जगन्निर्मातुमिच्छया । स्वरूपमादधे किंचित्सुखस्फूर्तिविजृम्भितम् ।।८।।

**हे विश्व चर अचर । सृष्टिनिर्मिती अगोदर । शिवब्रह्मातचि स्थिर । होते लीन होऊनी ।।५२।। ब्रह्मी लीन झाल्यामुळे । आंतरबाह्य इंद्रिया नाकळे । स्वतेजे विश्वासी उजळे । अद्भुत ते शिवब्रह्म ।।५३।। जगनिर्मिती करावी आपण । या इच्छेने शिवपरब्रह्म जाण । करिते झाले रूप धारण । स्फूर्तिमय उल्हसित ।।५४।।**

निरस्तदोषसंबंधं निरुपाधिकमव्ययम् । दिव्यमप्राकृतं नित्यं नीलकंठं त्रिलोचनम् ।।९।।

चंद्रार्धशेखरं शुद्धं शुद्धस्फटिकसन्निभम् । शुद्धमुक्ताफलाभासमुपास्यं गुणमूर्तिभिः ।।१०।।

**जन्ममरण-दोषमुक्त । अविद्यादी उपाधिरहित । अविनाश त्रिकालाबाधित । दिव्य ते शिवस्वरूप ।।५५।। त्रिगुणात्मक प्रकृतिसंबंध-। रहित ते नित्यसिद्ध । नीलकंठ त्रिलोचन ही प्रसिद्ध । नामे शिव-रूपाची ।।५६।। अर्धचंद्रे शोभते भाळ । स्फटिकासम शुद्ध निर्मळ । रूप ते मोत्यासम तेजाळ । ब्रह्मादी देव उपासिती ।।५७।।**

विशुद्धज्ञानकरणं विषयं सर्वयोगिनाम् । कोटिसूर्यप्रतीकाशं चंद्रकोटिसमप्रभम् ।।११।।

अप्राकृतगुणाधारमनंतमहिमास्पदम् ।

निर्मल ज्ञानासी कारण । सर्व योग्यांचे ते ध्यान । कोटी सूर्यांच्या समान । तेजस्वी ते शिवरूप ।।५८।। कोटी चंद्र प्रकटावे । तैसे कांतिमान स्वभावे । सर्वज्ञत्वादी गुण आघवे । तयांचा तो आश्रय ।।५९।। अनंत महिम्यांचा आधार । असे शिवरूप निराकार । त्यात लीन चराचर । सृष्टी होती प्रारंभी ।।६०।। इच्छा झाली परशिवास । की निर्मावे अद्भुत जगास । आणि करावा क्रमविकास । सर्व जीवमात्राचा ।।६१।।

तदीया परमा शक्तिः सच्चिदानंदलक्षणा ।।१२।।

समस्तलोकनिर्माणसमवायस्वरूपिणी । तदिच्छयाऽभवत् साक्षात्तत्स्वरूपानुसारिणी ।।१३।।

विमर्शशक्ती शिवाठायी । तादात्म्यरूपे वसे अक्षयी । विश्वनिर्मितीस ती होई । उपादान-कारण ।।६२।। सच्चिदानंदरूपी शक्ती । विकासता उपजे सृष्टी । संकोचता तीच कल्पांती । आवरी विश्वपसारा ।।६३।। जसा कवचातूनि कासव । पसरी आपुले हातपाय । कालांतराने अवयव । घेई आत ओढूनी ।।६४।। तैसा विमर्शशक्तीत । ब्रह्मांडपसारा असे सुप्त । विभागपरामर्श-अवस्थेत । तीच धरिते सृष्टिरूप ।।६५।। शक्तिविकासे सृष्टी घडे । शक्तिसंकोचे सृष्टी विघडे । सृष्टीसह शक्ती पुढे । लीन होई ब्रह्मात ।।६६।। विमर्शशक्तीमधून । हे विश्व होई निर्माण । ते भासते रूपांत विभिन्न । परि

**शक्तिस्वरूप ते ।।६७।।**

स शंभुर्भगवान् देवः सर्वज्ञः सर्वशक्तिमान् । जगत्सिसृक्षुः प्रथमं ब्रह्माणं सर्वदेहिनाम् ।।१४।।

कर्तारं सर्वलोकानां विदधे विश्वनायकः । तस्मै प्रथमपुत्राय शंकरः शक्तिमान् विभुः ।।१५।।

सर्वज्ञः सकला विद्याः सानुग्रहमुपादिशत् । प्राप्तविद्यो महादेवाद् ब्रह्मा विश्वनियामकात् ।।१६।।

समस्तलोकान्निर्मातुं समुद्यमपरोऽभवत् ।

**संपत्ती यश ज्ञान । शोभा वैराग्य धर्म जाण । या षडैश्वर्याने संपन्न । भगवान विश्वनायक ।।६८।। त्या सर्वज्ञ सर्वशक्तिमान शिवाने । घडविण्यासाठी चौदा भुवने । त्यात निर्माया प्राणि-जीवने । निर्मिला समर्थ ब्रह्मदेव ।।६९।। शिवे होऊनि शक्तियुक्त । निर्मिलेला प्रथम सुत । त्या ब्रह्मदेवासी अनुग्रहीत । करूनि विद्या उपदेशिल्या ।।७०।। जगन्नियामक महादेव । त्यांच्याकडूनि विद्यावैभव । संपादूनि ब्रह्मदेव । सज्ज झाला निर्मितीसी ।।७१।।**

कृतोद्योगोऽपि निर्माणे जगतां शंकराज्ञया ।।१७।।

अज्ञातोपायसंपत्तेरभवन्माययाऽऽवृतः । विधातुमखिलान् लोकानुपायं प्राप्तुमिच्छया ।।१८।।

पुनस्तं प्रार्थयामास देवदेवं त्रियंबकम् ।

**शिवाज्ञेने उद्युक्त होऊन । करू लागला विश्वसृजन । परि काही केल्या त्याच्याहातून । विश्वनिर्मिती होईना ।।७२।। केले अपार प्रयास । पण होईना जगविकास । बैसला होऊनि निराश । किंकर्तव्यमूढ विधाता ।।७३।। मायेने आवृत्त झाला । उपाय सुचेनाच त्याला । शेवटी शरण गेला । परमपित्या शिवासी ।।७४।। करावी प्रपंचोत्पत्ती । त्याची अवगत व्हावी युक्ती । एकवटूनि शक्ती भक्ती । त्याने प्रार्थिले त्रिलोचना ।।७५।।**

नमस्ते देवदेवेश नमस्ते करुणाकर ।।१९।।

अस्मदादिजगत्सर्वनिर्माणनविधिक्षम । उपायं वद मे शंभो जगत्सृष्टौ जगत्पते ।।२०।।

सर्वज्ञः सर्वशक्तिस्त्वं सर्वकर्ता सनातनः ।

**देवाधिदेवा महादेवा । तूच सकल भक्तांचा विसावा । अफाट विश्वसंसार निर्मावा । अशी आज्ञा केली मज ।।७६।। माझ्यासह विश्वसृजन । करावयास तू समर्थ पूर्ण । म्हणूनि दयानिधे वंदन । तुला करितो वारंवार ।।७७।। तू सर्वज्ञ सर्वकर्ता । जगत्पती उमाभर्ता । सर्वशक्तिमान शाश्वता । कृपा करी माझ्यावरी ।।७८।। जगनिर्मिती करावी कैसी । उपाय सुचेनाचि मजसी । तो सांगूनि माझी उदासी । दूर करावी दयाळा ।।७९।।**

इति संप्रार्थितः शंभुर्ब्रह्मणा विश्वनायकः ।।२१।।

उपायमवदत् तस्मै लोकसृष्टिप्रवर्तनम् । उपायमीश्वरेणोक्तं लब्ध्वाऽपि चतुराननः ।।२२।।

न समर्थोऽभवत् कर्तुं नानारूपमिदं जगत् ।

**विधात्याची प्रार्थना ऐकून । विश्वनायक झाला प्रसन्न । कैसे करावे विश्वनिर्माण । उपाय त्यास सांगितला ।।८०।। उपाय ऐकूनि चतुरानन । करू लागे पुन्हा प्रयत्न । चतुर्दश भुवने निर्माण । कराया ठरे असमर्थ ।।८१।। नाना योनी नाना जीव । पशू पक्षी जलचर मानव । ऐसे विराट विशाल वैभव-। संपन्न ब्रह्मांड बहुरूपी ।।८२।। प्रयत्न करूकरूनि श्रमला । थकला भागला घर्मे भरला । परि नाही समर्थ ठरला । निर्मितीस विधाता ।।८३।।**

पुनस्तं प्रार्थयामास ब्रह्मा विह्वलमानसः ।।२३।।

देवदेव महादेव जगत्प्रथमकारण । नमस्ते सच्चिदानंद स्वेच्छाविग्रहराजित ।।२४।।

भव शर्व महेशान सर्वकारणकारण । भवदुक्तो ह्युपायो मे न किंचिज्ज्ञायतेऽधुना ।।२५।।

**मग जहाला व्याकूळ । दाटूनि आले नेत्री जळ । म्हणे देवाधिदेवा तळमळ । शांत करी मनीची ।।८४।। तू जगाचे आदिकारण । स्वेच्छेने करिसी देहधारण । सर्व कारणांचेही तू कारण ।**

**सच्चिदानंदस्वरूपा ।।८५।। भवा शर्वा महेश्वरा । मजवरती कृपा करा । तुम्ही कथिला उपाय खरा । मज जगनिर्मितीचा ।।८६।। पण तो किंचितही मला । नाही महादेवा कळला । म्हणूनि विनवितो तुम्हाला । पुन:पुन्हा शंकरा ।।८७।।**

सृष्टिं विधेहि भगवन् प्रथमं परमेश्वर । ज्ञातोपायस्ततः कुर्यां जगत्सृष्टिमुमापते ।।२६।।

**उमापती शिवशंकरा । तुम्ही सृष्टी निर्माण करा । ती मी पाहून परमेश्वरा । मग निर्मीन जगास ।।८८।। जशी जशी तुम्ही निर्माल । तशी तशी मज कळेल । मग ही सृष्टी विशाल । घडेल माझ्याहातूनी ।।८९।।**

इत्येवं प्रार्थितः शंभुर्ब्रह्मणा विश्वयोनिना । ससर्जात्मसमप्रख्यान् सर्वगान् सर्वशक्तिकान् ।।२७।।

प्रबोधपरमानंदपरिवाहितमानसान् । प्रमथान् विश्वनिर्माणप्रलयापादनक्षमान् ।।२८।।

**विधात्याचे ऐकूनि बोल । द्रवले शिव करुणाबहळ । त्यांनी स्वसामर्थे सकळ । असंख्य गण निर्मिले ।।९०।। रेणुक दारुक घंटाकर्ण । धेनुकर्ण विश्वकर्ण । हे प्रमुख शिवगण । त्यात पाच जाणावे ।।९१।। हेचि होऊनि लिंगोद्भव । स्थापिती धर्म वीरशैव । आणि उद्धरती जड जीव । युगानुयुगी असंख्य ।।९२।। हे असती पंचाचार्य मूळ । हेचि शिवाज्ञेने भूमंडळ । दुमदुमविती सकळ ।**

**शिवभक्ती प्रेरूनी ।।९३।। वीर नंदी भृंगी जाण । वृषभ स्कंद पाच जण । हे गोत्रपुरुष शिवगण । पाच वीरशैवांचे ।।९४।। हे पाच गोत्रपुरुष । वीरशैव वंशाचे मूळ पुरुष । यांच्यापासूनि होती विशेष । उत्पन्न वीरशैव कुळे ती ।।९५।। हे शिवगण तरी कैसे । ते प्रत्यक्ष शिवासरिसे । सर्वगामी सर्वशक्तिमान ऐसे । परमज्ञाने भरलेले ।।९६।। मन आणि विश्वसृजन । कराया संहाराया पूर्ण । समर्थ ऐसे शिवगण । पाहूनि विस्मित विधाता ।।९७।।**

तेषु प्रमथवर्गेषु सृष्टेषु परमात्मना । रेणुको दारुकश्चेति द्वावभूतां शिवप्रियौ ।।२९।।

सर्वविद्याविशेषज्ञौ सर्वकार्यविचक्षणौ । मायामलविनिर्मुक्तौ महिमातिशयोज्ज्वलौ ।।३०।।

**शिवनिर्मित असंख्य प्रमथ । रेणुक दारुक दोघे त्यात । शिवासी ते प्रिय अत्यंत । तेधवा होते जहाले ।।९८।। ते सर्व विद्यापारंगत । कुशल सकल कार्यात । होते त्रिमलांपासूनि मुक्त । आणव मायीय कार्मिक ह्या ।।९९।। शिवासारखे तेज:पुंज । विरागी प्रभावी महाराज । उत्कृष्ट गुणांमुळे सहज । प्रिय झाले शिवासी ।।१००।।**

आत्मानंदपरिस्फूर्तिरसास्वादनलंपटौ । शिवतत्त्वपरिज्ञानतिरस्कृतभवामयौ ।।३१।।

नानापथमहाशैवतंत्रनिर्वाहतत्परौ । वेदान्तसारसर्वस्वविवेचनविचक्षणौ ।।३२।।

**आत्मानंदरसास्वादात । तल्लीन ते सदोदित । शिवतत्त्वाचे ज्ञान यथार्थ । अंतरात साठलेले ।।१०१।। संसाररोगापासून । पूर्ण मुक्त दोघेजण । जन्म आणिक मरण-। भय नव्हते तयांना ।।१०२।। उत्कृष्ट शिवाद्वैतसिद्धान्त । तो नाना युक्तींनी प्रतिष्ठापित । कराया तत्पर समर्थ । होते रेणुक दारुक ।।१०३।। उपनिषदांचे सर्वस्वसार । उलगडण्यात ते निपुण चतुर । सर्व शिवगण जे थोर थोर । त्यांत दोघे अग्रगण्य ।।१०४।।**

नित्यसिद्धौ निरातंकौ निरंकुशपराक्रमौ । तादृशौ तौ महाभागौ संवीक्ष्य परमेश्वरः ।।३३।।

समर्थौ सर्वकार्येषु विश्वासपरमाश्रितौ । अन्तःपुरद्वारपालौ निर्ममे नियतौ विभुः ।।३४।।

**नित्यसिद्ध ते निर्भय । महापराक्रमी अजेय । अशा दोघांसी पाहूनि निर्णय । घेतला शिव-शंभूंनी ।।१०५।। शुद्धात्मे सर्वकार्यकुशल । परम विश्वासपात्र निर्मल । अंतःपुरात द्वारपाल । त्यांना शिवे नेमिले ।।१०६।।**

गणेश्वरौ रेणुकदारुकावुभौ विश्वासभूतौ नवचंद्रमौलेः ।

अन्तःपुरद्वारगतौ सदा तौ वितेनतुर्विश्वपतेस्तुसेवाम् ।।३५।।

**भाळी नवचंद्रधारण । जो करी फणींद्रभूषण । त्याचे परम विश्वासू गण । होते रेणुक**

**दारुक ।।१०७।। दारी ठेवूनि पहारा । रक्षूनिया अंत:पुरा । सदा सेविती शंकरा । जागृत ते राहूनी ।।१०८।। रेणुक आणि दारुक गण । या दोघांचे झाले अवतरण । हा कथाभाग केला कथन । भाविक जिज्ञासू श्रोत्यांना ।।१०९।। शिवस्वरूप जगद्‌गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।११०।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्‌भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । द्वितीयोऽध्याय पूर्ण हा ।।१११।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ रेणुकदारुकावतरणं नाम द्वितीयः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय तिसरा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु द्व्यक्षर शिवाचार्याय नमः ।। जय जय शिवा पंचानना । भक्त-पाशविमोचना । कलिमलदहना उमारमणा । कामदहना चिद्रूपा ।।१।। तुझे नाम आशुतोष । अल्पभक्तीने तोषतोस । हा भक्तमनीचा विश्वास । ठरवी सार्थ शंकरा ।।२।। कोणी वाहता पुष्प-फळा । त्याने तुष्टतोसी जाश्वनिळा । कोणी वाहता बिल्वदळा । त्यास नेतोस कैलासी ।।३।। मार्कंडेयाचे आयुष्य अल्प । त्याला दिले चौदा कल्प । संतोषे भक्तीने स्वल्प । ऐसा दुजा देव कोण? ।।४।। आता पुरवी माझी आस । सामर्थ्य देई रचनेस । पांगळ्याला लंघवितोस । गिरिशिखरे उत्तुंग ।।५।। माझे मागणे त्यापुढे । परशिवा आहेच केवढे? । तुझा दृष्टिक्षेप पडे । तरी उजळे भाग्य माझे ।।६।। आता श्रोतेहो सावधान । द्वितीयाध्यायी झाले कथन । अवतरले रेणुक दारुक गण । शिवे स्थापिले अंत:पुरी ।।७।। त्यापुढे परिसावी कथा । आणूनि सावधपण चित्ता । संतोष होईल शिवभक्ता । मनी उठतील भावोर्मी ।।८।।**

कदाचिदथ कैलासे कलधौतशिलामये । गंधर्ववामनयनाक्रीडामौक्तिकदर्पणे ।।१।।

मंदारबकुलाशोकमाकंदप्रायभूरुहे । मल्लीमरन्दनिष्यन्दपानपीनमधुव्रते ।।२।।

कुंकुमस्तबकामोदकूलंकषहरिन्मुखे । कलकंठकुलालापकंदलद्रागबंधुरे ।।३।।

**रौप्य शिलांनी सजलेला । एकदा कैलासपर्वत शोभला । जणू मोतियांचा दर्पण केला । गंधर्व-स्त्रियांच्या क्रीडेस्तव ।।९।। तेथे फुलले बकुल मंदार । अशोक-आम्रादी तरूवर । पुष्ट विहरती भ्रमर । पुष्पमकरंद सेवूनी ।।१०।। कुंकुमवर्णी सुगंधी फुले । त्यांचा सर्वत्र गंध दरवळे । ओल्या गंधित वायूमुळे । दिशा झाल्या सुगंधित ।।११।। वृक्षांच्या शाखाशाखांतून । कोकीळ पक्षी करिती गायन । पंचमालापांनी भरून । आसमंत राहिला ।।१२।।**

किन्नरीगीतमाधुर्यपरिवाहितगह्वरे । सानंदवरयोगीन्द्रवृंदालंकृतकन्दरे ।।४।।

हेमारविंदकलिकासुगंधिरसमानसे । शातकुंभमयस्तंभशतोत्तुंगविराजिते ।।५।।

माणिक्यदीपकलिकामरीचिद्योतितान्तरे । द्वारतोरणसंरूढशंखपद्मनिधिद्वये ।।६।।

**रम्य कैलास पर्वतावर । किन्नर स्त्रिया गाती मधुर । दुमदुमले गिरिकंदर । त्यांच्या मंजुळ शब्दांनी ।।१३।। नि:शब्द गूढ गुहांतून । सानंद आदी शिवयोगी गण । बैसले लावूनि शिवध्यान । तेणे गुहा शोभल्या ।।१४।। सुवर्णकमळांच्या कळ्यांनी । गेले मानससरोवर भरूनी । स्रवणाऱ्या गंध-**

**सुगंधित जहाले ।।१५।। कैलासशिखरे उंच सरळ । भेदिती निळे अंतराळ । सुवर्णस्तंभासम तेजाळ । दिव्य भासती चक्षूंसी ।।१६।। माणिक-रत्नदीपांतून । निघती तेजोमय प्रकाशकिरण । त्या प्रकाशाने उजळून । गेले कैलास-अंत:पुर ।।१७।। तोरणस्तंभ महाद्वारी । ठेविले शंख पद्म त्यावरी । ते निधी स्तंभावरी । उभय जाण विराजले ।।१८।।**

मुक्तातारकितोदारवितानांबरमण्डिते । स्पर्शलक्षितवैडूर्यमयभित्तिपरम्परे ।।७।।
संचरत्प्रमथश्रेणीपदवाचालनूपुरे । प्रवालवलभीशृंगशृंगारमणिमण्टपे ।।८।।
वन्दारुदेवमुकुटमन्दाररसवासितम् । रत्नसिंहासनं द्विव्यमध्यस्तं परमेश्वरम् ।।९।।

**कैलासमंटपाचे छत । विशाल वस्त्रे अलंकृत । त्यावरी जडविले मोती शोभत । नभी नक्षत्रां- सारखे ।।१९।। जे स्पर्शाने जाणवे केवळ । त्या वैडूर्यरत्नांनी तेजाळ । मंटप-भिंती निर्मळ । सुशोभित झालेल्या ।।२०।। उतरते शिखर-छत । प्रवाळ-रत्नांनी अलंकृत । नूपुरध्वनी त्या रत्नमंटपात । घुमे प्रमथगणांचा ।।२१।। तेहतीस कोटी देव सगळे । वंदिती शिवशंभूची पाउले । मंदारफुलांचा गंध दरवळे । देवमुकुटी खोविलेल्या ।।२२।। त्या परिमळाने दरवळून । गेले नवरत्नखचित सिंहासन । त्या सिंहासनी विराजमान । होते शिव परमेश्वर ।।२३।।**

तमास्थानगतं देवं सर्वलोकमहेश्वरम् । त्र्यन्तकमलारण्यविहारकलहंसकम् ।।१०।।

उदारगुणमोंकारशुक्तिकापुटमौक्तिकम् । सर्वमंगलसौभाग्यसमुदायनिकेतनम् ।।११।।

संसारविषमूर्च्छालुजीवसंजीवनौषधम् । नित्यप्रकाशनैर्मल्यकैवल्यसुरपादपम् ।।१२।।

**मध्यस्थानी देववेष्टित । सर्वलोकस्वामी शोभत । जणू उपनिषत्कमलवनात । विहरतो राजहंस ।।२४।। मंगल सौभाग्याचे आगर । औदार्यगुणयुक्त परमेश्वर । प्रणव-शिंपल्यातील मनोहर । शोभे मोत्यासारखा ।।२५।। संसारविषाने मूर्च्छित जन । त्यांना तो संजीवनी औषधासमान । स्वयंप्रकाशित निर्मल पूर्ण । कैवल्याचा कल्पतरू ।।२६।।**

अनंतपरमानंदमकरंदमधुव्रतम् । आत्मशक्तिलतापुष्यत्त्रिलोकीपुष्पकोरकम् ।।१३।।

ब्रह्माण्डकुण्डिकाषण्डपिण्डीकरणपण्डितम् । समस्तदेवताचक्रचक्रवर्तिपदे स्थितम् ।।१४।।

**करीत पुष्परसाचे पान । जैसा भ्रमर होई तल्लीन । तैसे आत्मानंदात मग्न । झाले शिव परमात्मा ।।२७।। स्वत:ठायी नित्य शक्तिवेली-। वरी पोषिली त्रिलोक पुष्पकळी । त्या कळीसमान शोभली । दिसे तेथे शिवमूर्ती ।।२८।। माती तुडवून कालवून । कुंभार करितो पिंडीकरण । घटकुंडादी पात्रे निर्माण । जैसी करितो मृत्तिकेची ।।२९।। तैसी ब्रह्मांडांची निर्मिती । कौशल्ये सहज करी**

**उमापती । आणि आवरूनि कल्पांती । करी लीन स्वत:त ।।३०।। ब्रह्मांडरूपी पात्रे समस्त । एकत्र करण्यात जो पंडित । तो शोभे सर्व देवसमूहात । चक्रवर्ती सम्राटासम ।।३१।।**

चंद्रबिम्बायुतच्छायादायादद्युतिविग्रहम् । माणिक्यमुकुटज्योतिर्मंजरीपिंजराम्बरम् ।।१५।।
चूडालं सोमकलया सुकुमारबिसाभया । कल्याणपुष्पकलिकाकर्णपूरमनोहरम् ।।१६।।

**दहा सहस्र चंद्रद्युती । तैसी उज्ज्वल देहकांती । कोट्यवधी देवांची माथी । झुकती पदी शिवाच्या ।।३२।। देवमुकुटांतील रत्नप्रभा । वाढवी शिववस्त्रांची शोभा । नवरंगांची खुलली आभा । दृष्टिसुखा वाढवीत ।।३३।। बिसतंतूसम चंद्रकला कोवळी । विराजली त्याचिया भाळी । शोभे कल्याणपुष्पकळी । कर्णी कुंडलासमान ।।३४।।**

मुक्तावलयसंबद्धमुंडमालाविराजितम् । पर्याप्तचंद्रसौंदर्यपरिपन्थिमुखश्रियम् ।।१७।।
प्रातःसम्फुल्लकमलपरियायत्रिलोचनम् । मंदस्मितमितालापमधुराधरपल्लवम् ।।१८।।

**गुंफिलेली मोत्यांत । शोभे मुंडमाला कंठात । लाजवी पूर्णचंद्राप्रत । मुखकांती तयाची ।।३५।। प्रात:काळी उमले कमळ । तैसे तीनही नेत्र प्रफुल्ल । अधरपाकळ्या सुकोमल । मंदस्मित-मितालापे ।।३६।।**

गण्डमण्डलपर्यंतक्रीडन्मकरकुण्डलम् । कालिम्ना कालकूटस्य कण्ठनाले कलंकितम् ।।१९।।

मणिकंकणकेयूरमरीचिकरपल्लवैः । चतुर्भिः संविराजन्तं बाहुमन्दारशाखिभिः ।।२०।।

गौरीपयोधराश्लेषकृतार्थभुजमध्यमम् । सुवर्णब्रह्मसूत्रांकं सूक्ष्मकौशेयवाससम् ।।२१।।

**कानी कुंडले मकराकार । ती रुळती कपोलावर । कंठनाल दिसे निळसर । हलाहल-प्राशनाने ।।३७।। कल्पतरूच्या शाखांसमान । चतुर्भुजा शोभायमान । कंकणरत्नप्रभेने पूर्ण । शोभिवंत कर-बाहू ।।३८।। गौरीस्तनालिंगनामुळे । वक्ष:स्थलाचे सार्थक झाले । अंगी रेशीमवस्त्र, केले-। धारण सुवर्ण ब्रह्मसूत्र ।।३९।।**

नाभिस्थानावलंबिन्या नवमौक्तिकमालया । गंगयेव कृताश्लेषं मौलिभागावतीर्णया ।।२२।।

पदेन मणिमंजीरप्रभापल्लवितश्रिया । चंद्रवत्स्फाटिकं पीठं समावृत्य स्थितं पुरः ।।२३।।

**कंठी मोतियांची माळ । रुळे नाभीपर्यंत तेजाळ । जणू जटेतून उतरूनि स्नेहाळ । गंगेने शिवा आलिंगिले ।।४०।। चंद्रकांतमणिनिर्मित । चौरंगी ठेविले पद शोभिवंत । रत्ननूपुरतेजे झळाळत । पल्लवासम ते शोभले ।।४१।। एक पाय चौरंगावर । दुसरा दुमडूनि घेतला वर । ऐसे आसन साधूनि शंकर । ताठ होते बैसले ।।४२।।**

वामपार्श्वनिवासिन्या मंगलप्रियवेषया । समस्तलोकनिर्माणसमवायस्वरूपया ।।२४।।

इच्छाज्ञानक्रियारूपबहुशक्तिविलासया । विद्यातत्त्वप्रकाशिन्या विनाभावविहीनया ।।२५।।

**विश्वनिर्मितीचे उपादानकारण । जी सौंदर्याची अद्‌भुत खाण । ती पार्वती मंगलवेष लेऊन । विराजे शिवाच्या वामभागी ।।४३।। इच्छा-ज्ञान-क्रियायुक्त । करी आत्मविद्यातत्त्व प्रकाशित । ती शोभे शिवासमवेत । अविनाभावसंबंधाने ।।४४।।**

संसारविषकांतारदाहदावाग्निलेखया । धम्मिल्लमल्लिकामोदझंकुर्वद्‌भृंगमालया ।।२६।।

संपूर्णचंद्रसौभाग्यसंवादिमुखपद्मया । नासामौक्तिकलावण्यनाशीरस्मितशोभया ।।२७।।

मणिताटंकरंगान्तर्वलितापांगलीलया । नेत्रद्वितयसौंदर्यनिन्दितेन्दीवरत्विषा ।।२८।।

**संसाररूपी विषवन । जाळणाऱ्या ज्वालेसमान । पार्वती ती शोभायमान । दिसे अति तेजस्वी ।।४५।। वेणीत माळलेली फुले । तयांचा सुगंध दरवळे । आनंदूनि मधूप सगळे । गुंजारव करिताती ।।४६।। पूर्णचंद्रासम उज्ज्वल । कांतियुक्त मुखकमल । नासिकेत नथ तेजाळ । मंद हास्य मुखावरी ।।४७।। नीलरत्नांची कर्णभूषणे । धारण केली पार्वतीने । त्या रंगमंचावरी नर्तने । चालली नेत्रकटाक्षांची ।।४८।। नेत्रांवरी नीलप्रभा । पडता खुले ऐसी आभा । नीलकमलांचीही शोभा । तेथे जाई लाजून ।।४९।।**

कुसुमायुधकोदंडकुटिलभ्रूविलासया । बंधूककुसुमच्छायाबंधुभूताधरश्रिया ।।२९।।

कंठनालजितानंगकम्बुबिब्बोकसंपदा । बाहुद्वितयसौभाग्यवंचितोत्पलमालया ।।३०।।
स्थिरयौवनलावण्यशृंगारितशरीरया । अत्यंतकठिनोत्तुंगपीवरस्तनभारया ।।३१।।
मृणालवल्लरीतंतुबंधुभूतावलग्नया । शृंगारतटिनीतुंगपुलिनश्रोणिभारया ।।३२।।

**भ्रूविलास तिचे मोहक । जणू मदनधनू वक्र सुरेख । जास्वंदी फुलांची कोवळीक । सरस ओठी साठलेली ।।५०।। कामदेवाचा शंखध्वनी । उणा ऐसी मंजुळ वाणी । नीलकमलमाळेस आर्णी । लज्जा भुजासौंदर्य ।।५१।। चिरयौवन लावण्याने । उन्नत पुष्ट स्तनभाराने । नटले गौर शरीर देखणे । नेत्रांची पारणे फेडीत ।।५२।। कमलवेलीचा कोमल देठ । तैसा नाजूक कटिप्रांत । शृंगारनदीचे उंच तट । तैसे नितंब विशाल ।।५३।।**

कुसुंभकुसुमच्छायाकोमलांबरशोभया । शृंगारोद्यानसंरंभरंभास्तंभोरुकांडया ।।३३।।
चूतप्रवालसुषमासुकुमारपदाब्जया । स्थिरमंगलशृंगारभूषणालंकृतांगया ।।३४।।
हारनूपुरकेयूरचमत्कृतशरीरया । चक्षुरानंदलतया सौभाग्यकुलविद्यया ।।३५।।

**कुसुंबी रंगी कोमल अंबर । परिधानले देहावर । रंभास्तंभासम शृंगार-। वनी जघन शोभती ।।५४।। आम्रपाने तांबूस कोमल । तैसे तिचे पदकमल । सौभाग्यालंकारे नित्य मंगल । देह झाला**

**सुशोभित ।।५५।। कंठी शोभे रत्नहार । पायी रुणझुणती नूपुर । बाहुभूषणादी अलंकार । देह सुंदर डुल्लतो ।।५६।। तिची देहलता सुंदर । नेत्रांस आनंद देई अपार । सर्व सौभाग्यांचे आगर । कुलविद्यास्वरूपिणी ।।५७।।**

उमया सममासीनं लोकजालकुटुंबया । अपूर्वरूपमभजन् परिवाराः समन्ततः ।।३६।।
पुंडरीकाकृतिस्वच्छं पूर्णचंद्रसहोदरम् । दधौ तस्य महालक्ष्मीः सितमातपवारणम् ।।३७।।

**विश्वातील सर्व जन । जिचे आप्त सुहृद स्वजन । त्या उमेसह उमारमण । सिंहासनी बैसलेले ।।५८।। ते अत्यंत देखणे सुंदर । भोवती उभा सुरपरिवार । सर्वभावे सेविती शंकर । नतमस्तक होऊनी ।।५९।। कमलाकार श्वेतवर्ण । उज्ज्वल पूर्णचंद्रासमान । ऐसे छत्र लक्ष्मी धरून । होती उमामाथ्यावरी ।।६०।।**

तन्त्रीझंकारशालिन्या संगीतामृतविद्यया । उपतस्थे महादेवमुपान्ते च सरस्वती ।।३८।।
झणत्कंकणजातेन हस्तेनोपनिषद्वधूः । ओंकारतालवृन्तेन वीजयामास शंकरम् ।।३९।।

**आपुली वीणा झंकारून । झंकारयुक्त अमृत गायन । करीत सरस्वती अर्चन । उमा-महेश्वराचे ।।६१।। किणकिणवीत कंकणे । उपनिषद्-स्त्रिया कराने । ॐकाररूपी पंख्याने । वारा घालिती शंकरासी ।।६२।।**

चलच्चामरिकाहस्ता झंकुर्वन्मणिकंकणाः । आसेवन्त तमीशानमभितो दिव्यकन्यकाः ।।४०।।

चामराणां विलोलानां मध्ये तन्मुखमंडलम् । रराज राजहंसानां भ्रमतामिव पंकजम् ।।४१।।

**उभ्या उमामहेश्वराभोवती । देवकन्या सौंदर्यमूर्ती । कंकणध्वनी करीत ढाळिती । चवऱ्या उभयतांवरी ।।६३।। त्या चवऱ्यांच्या मधून । दिसे शिवाचे कमलवदन । जैसे हंसभ्रमणाच्या मधून । दिसे कमळ सरोवरी ।।६४।।**

मंत्रेण तमसेवन्त वेदाः सांगविभूतयः । भक्त्या चूडामणिं कांतं वहन्त इव मौलिभिः ।।४२।।

तदीयायुधधारिण्यस्तत्समानविभूषणाः । अंगभूताःस्त्रियः काश्चिदासेवन्त तमीश्वरम् ।।४३।।

**वेद षडंगांनी युक्त । शिक्षा कल्प व्याकरण निरुक्त । छंद आणि ज्योतिष ही षट् । अंगे असती वेदांची ।।६५।। उपनिषदे वेदान्तपर । ती सर्व मिळूनि वेद-शिर । उपनिषद्रूप मस्तकावर । शिरोरत्न शिवब्रह्म ।।६६।। शिरी धारण करूनि त्रिनेत्र । वेद जपूनि प्रणवमंत्र । जणू गाती शिवस्तोत्र । भक्तिभावपूर्वक ।।६७।। वेदपुरुषासमान । सर्व आयुधे भूषणे धारण । करूनि वेदांगरूपी स्त्रिया अर्चन । करिती परमेश्वराचे ।।६८।।**

आप्ताधिकारिणः केचिदनन्तप्रमुखा अपि । अष्टौ विद्येश्वरा देवमभजन्त समन्ततः ।।४४।।

ततो नंदी महाकालश्चण्डो भृंगी रिटिस्ततः ।

सेनानिर्गजवक्त्रश्च रेणुको दारुकस्तथा । घंटाकर्णः पुष्पदंतः कपाली वीरभद्रकः ।।४५।।

एवमाद्या महाभागा महाबलपराक्रमाः । निरंकुशमहासत्त्वा भेजिरे तं महेश्वरम् ।।४६।।

**शिवाचे विद्येश्वर आठ । सूक्ष्म शिवोत्तम अनंत । त्रिमूर्ती एकरुद्र श्रीकंठ । एकनेत्र शिखंडी ।।६९।। ते राहूनि शिवाभोवती । तन-मनाने सेवा करिती । शिवाचा विश्वास त्यांच्यावरती । असती अधिकारप्राप्त ते ।।७०।। प्रमथगणांची नसे गणती । त्यांची नावे सांगावी किती । परि त्यात जी मुख्य ती । आता येथे सांगतो ।।७१।। रेणुक दारुक घंटाकर्ण । धेनुकर्ण विश्वकर्ण । वीर नंदी भृंगी जाण । वृषभ आणि स्कंद ते ।।७२।। महाकाल पुष्पदंत । चंड भृंगी रिटी समर्थ । कपाली आदी असंख्यात । असती गण शिवाचे ।।७३।। हे प्रमुख भाग्यवान । महापराक्रमी शक्तिमान । भक्तिभावे उमारमण । अर्चिती स्वये सेविती ।।७४।।**

अणिमादिकमैश्वर्यं येषां सिद्धेरपोहनम् । ब्रह्मादयःसुरा येषामाज्ञालंघनभीरवः ।।४७।।

मोक्षलक्ष्मीपरिष्वंगमुदिता येऽन्तरात्मना । येषामीषत्करं विश्वसर्गसंहारकल्पनम् ।।४८।।

**या प्रमथांचे कोणते लक्षण । तेचि सांगतो श्रोत्यांलागून । त्यांच्या सिद्धीसामोरी दीन । अणिमादी**

**अष्टसिद्धी ।।७५।। त्यांची उल्लंघण्यासी आज्ञा । नसे ब्रह्मादी देवांची प्राज्ञा । जैसी अनुल्लंघनीय शिवाज्ञा । तैसीच या प्रमथांची ।।७६।। ते आपुल्या अंतरंगात । मोक्षलक्ष्मीच्या आलिंगने तृप्त । विश्वनिर्माण-संहार समर्थ-। पणे सहज शकती करू ।।७७।।**

ज्ञानशक्तिः परा येषां सर्ववस्तुप्रकाशिनी । आनंदकणिका येषां हरिब्रह्मादिसंपदः ।।४९।।

आकांक्षन्ते पदं येषां योगिनो योगतत्पराः । कांक्षणीयफलो येषां संकल्पः कल्पपादपः ।।५०।।

**प्रकाशावी वस्तू, व्यक्ती । ऐसी लाभली ज्ञानशक्ती । ब्रह्मादिकांची ती संपत्ती । ज्ञानानंद-कणासम ।।७८।। संपादिण्या प्रमथस्थान । योगी योगसाधनी निमग्न । प्रमथांचे संकल्प जाण । सिद्धिदायक कल्पवृक्ष ।।७९।।**

कर्मकालादिकार्पण्यचिंता येषां न विद्यते । येषां विक्रमसन्नाहा मृत्योरपि च मृत्यवः ।।५१।।

ते सारूप्यपदं प्राप्ताः प्रमथा भेजिरे शिवम् । ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्राद्या विश्वतंत्राधिकारिणम् ।।५२।।

आयुधालंकृतप्रान्ताः परितस्तं सिषेविरे ।

**कर्म-कालापासून । जी कृपणता होई उत्पन्न । तिच्या चिंतेपासून । मुक्त होते प्रमथ ।।८०।। त्यांची विक्रम-कृत्ये अती । की मृत्यूस वाटे मृत्यूची भीती । शिवसारूप्य पावले ते, करिती । सेवा**

**महेश्वराची ॥८१॥ ब्रह्मा विष्णू इंद्रदेव । आणिक तेहतीस कोटी देव । शस्त्रे अलंकृत होऊनि सर्व । त्रिलोकाधिपतीसी सेविती ॥८२॥**

आदित्या वसवो रुद्रा यक्षगंधर्वकिन्नराः ॥५३॥

दानवा राक्षसा दैत्याः सिद्धा विद्याधरोरगाः । अभजन्त महादेवमपरिच्छिन्नसैनिकाः ॥५४॥

**सूर्य वसू रुद्र कुबेर । गंधर्व राक्षस किन्नर । दानव दैत्य सिद्ध विद्याधर । शेषनागादी सर्पकुळे ॥८३॥ हे आपुले सैन्य घेऊन । उभे शंकरासी वेष्टून । नानाप्रकारे सेवा अर्चन । करिती परमेश्वराचे ॥८४॥**

वसिष्ठो वामदेवश्च पुलस्त्यागस्त्यशौनकाः । दधीचिर्गौतमश्चैव सानंदशुकनारदाः ॥५५॥

उपमन्युभृगुव्यासपाराशरमरीचयः । इत्याद्या मुनयः सर्वे नीलकंठं सिषेविरे ॥५६॥

**वसिष्ठ वामदेव पुलस्त्य देख । दधीचि अगस्त्य शौनक । गौतम सानंद पाराशर शुक । नारद भृगू उपमन्यू ॥८५॥ मरीचि व्यास आदी ऋषिगण । नीलकंठाच्या सेवेत मग्न । अंतरंगात उचंबळून । भरते येई भक्तीला ॥८६॥**

पार्श्वस्थपरिवाराणां विमलांगेषु बिम्बितः । सर्वान्तर्गतमात्मानं स रेजे दर्शयन्निव ॥५७॥

क्षणं स शंभुर्देवानां कार्यभागं निरूपयन् । क्षणं गंधर्वराजानां गानविद्यां विभावयन् ।।५८।।

**उभा परिवार शिवाभोवती । त्यांची शरीरे निर्मल कांती । त्यांत बिंबली शिवमूर्ती । सुबक रेखीव सुंदर ।।८७।। जणू सर्वांच्या अंतर्यामी । केवळ नांदतो मीच मी । ऐसे दर्शवी विश्वस्वामी । शिवशंभू परमात्मा ।।८८।। क्षणी देवांना काम सांगती । कधी गंधर्वगान ऐकती । असे स्वेच्छावर्तन करिती । पार्वतीरमण त्यावेळी ।।८९।।**

ब्रह्मविष्णवादिभिर्देवैः क्षणमालापमाचरन् । क्षणं देवमृगाक्षीणां लालयन्नृत्यविभ्रमम् ।।५९।।

व्यासादीनां क्षणं कुर्वन् वेदोच्चारेषु गौरवम् । विदधानः क्षणं देव्या मुखे बिम्बाधरे दृशः ।।६०।।

**कधी ब्रह्माविष्णूशी संवाद । करिती बोलती मधुशब्द । कधी देवांगनांचे पद-। न्यास पाहूनि प्रशंसिती ।।९०।। कधी व्यासांचे वेदोच्चार । वाखाणिती शब्दे मधुर । कधी उमेचे बिंबाधर । मुख प्रेमे अवलोकिती ।।९१।।**

हास्यनृत्यं क्षणं पश्यन् भृंगिणा परिकल्पितम् । नंदिना वेत्रहस्तेन सर्वतंत्राधिकारिणा ।।६१।।

अमुंचता सदा पार्श्वमात्माभिप्रायवेदिना । चोदितान् वासयन् कांश्चिद्विसृजन् भ्रूविलासतः ।।६२।।

संभावयंस्तथा चान्यानन्यानपि नियामयन् । समस्तभुवनाधीशमौलिलालितशासनः ।।६३।।

अकुंठशक्तिरव्याजलावण्यललिताकृतिः ।

**कधी भृंगीचे विनोदपूर्ण । नृत्य पाहती उत्सुक होऊन । कार्यकुशल वेत्रहस्त नंदीकडून । काही लोकांस बोलाविती ।।९२।। नेत्रसंकेते काहीजण । देती दूर पाठवून । काही जणांना प्रिय भाषण । करूनिया तोषविती ।।९३।। काही लोकांना शासिती फार । ऐसा करिती स्वेच्छाव्यवहार । शंकराचा राजव्यापार । चाललेला सहजभावे ।।९४।। शिव त्रैलोक्याधिपती । त्यांच्याठायी अप्रतिहत शक्ती । सर्व भुवनांचे अधिपती । आज्ञा पाळिती तयांची ।।९५।।**

स्थिरयौवनसौरभ्यशृंगारितकलेवरः ।।६४।।

आत्मशक्त्यमृतास्वादरसोल्लासितमानसः । स्वाभाविकमहैश्वर्यविश्रामपरमावधिः ।।६५।।

निष्कलंकमहासत्त्वनिर्मितानेकविग्रहः । अखंडारातिदोर्दण्डकण्डूखंडनपण्डितः ।।६६।।

चिंतामणिः प्रपन्नानां श्रीकंठः परमेश्वरः ।

**शंकराअंगी यौवन स्थिर । तेणे गंधित सुशोभित शरीर । आत्मशक्ति-अमृत मधुर । प्राशने मन संतुष्ट ।।९६।। सगुण गोमटे शिवब्रह्म । महा ऐश्वर्याचे विश्रामधाम । निष्कलंक महाशक्तीतूनि परम । दिव्य निघाली जी रूपे ।।९७।। त्या दिव्य रूपांचा धारक । शिवशंकर जगन्नायक । तोचि स्पंदतो**

**असंख्य देख । हृदयांतूनि जीवांच्या ।।९८।। तो श्रीकंठ उमाकांत । जे सज्जन-शत्रू अपरिमित । त्यांच्या बाहुबलाची रग समस्त । जिरविण्यास समर्थ तो ।।९९।। शुद्धांत:करणी शरणागत । त्यांचे पुरवी मनोरथ । ऐसा तो चिंतामणी समर्थ । माहेरच भक्तांचे ।।१००।।**

सभान्तरगतं तंत्र रेणुकं गणनायकम् ।।६७।।

प्रसादं सुलभं दातुं तांबूलं स तमाह्वयत् । शंभोराह्वानसन्तोषसंभ्रमेणैव दारुकम् ।।६८।।

उल्लंघ्य पार्श्वमगमल्लोकनाथस्य रेणुकः ।

**शिवसभा भरली दाट । तिचा काय वर्णावा थाट । गंधर्व किन्नरादी भाट । गोड गाती शिव-गीते ।।१०१।। शिवगणांची जहाली दाटी । बैसल्या देव-ऋषींच्या कोटी । देवांगनांनी गोमटी । नृत्ये तेथे आरंभिली ।।१०२।। देवकंठांतल्या फुलमाळा । परिमळाने दरवळल्या । कैलास अवघा गंधाळला । प्रसन्नला आसमंत ।।१०३।। उमेसह शिवशंकर । विराजित सिंहासनावर । त्यांनी वरी केला कर । सभा स्तब्ध जहाली ।।१०४।। शिवगण जरी असंख्य । त्यात पाच गण प्रमुख । रेणुक हे गणनायक । तेथे होते बैसले ।।१०५।। तांबूल प्रसाद द्यावा म्हणून । शिवाने करसंकेत करून । त्यांस घेतले बोलावून । सिंहासनासमीप ।।१०६।। शिवे आपणा पाचारिले । या आनंदे हृदय भरले । मोदभरे**

**उचलूनि पावले । निघाले त्वरेने शिवाकडे ।।१०७।। मार्गात बसले दारुक गण । त्यांसी गेले ओलांडून । हर्षभरात नाही भान । रेणुकांसी राहिले ।।१०८।।**

तमालोक्य विभुस्तत्र समुल्लंघितदारुकम् ।।६९।।

माहात्म्यं निजभक्तानां द्योतयन्निदमब्रवीत् । रे रे रेणुक दुर्बुद्धे कथमेष त्वयाऽधुना ।।७०।।

उल्लंघितः सभामध्ये मम भक्तो हि दारुकः । लंघनं मम भक्तानां परमानर्थकारणम् ।।७१।।

आयुः श्रियं कुलं कीर्तिं निहन्ति हि शरीरिणाम् ।

**रेणुके दारुकासी ओलांडिले । हे शिवासी नाही रुचले । मग ते रेणुकास बोलले । भक्तमहिमा दाखवाया ।।१०९।। अरे उतावीळ रेणुका । का ओलांडिले दारुका? । दारुक भक्त माझा निका । त्याचा केला अवमान ।।११०।। जो जाई मद्‌भक्ता ओलांडून । अथवा त्यांचा करी अपमान । त्याचे आयुष्य वित्त कूल पूर्ण । आणि कीर्ती नाशते ।।१११।।**

मम भक्तमवज्ञाय मार्कण्डेयं पुरा यमः ।।७२।।

मत्पादताडनादासीत् स्मरणीयकलेवरः । भृगोश्च शंकुकर्णस्य मम भक्तिमतोस्तयोः ।।७३।।

कृत्वानिष्टमभूद् विष्णुर्विकेशो दशयोनिभाक् ।

**मार्कंडेय माझा भक्त । त्याची यम अवज्ञा करीत । मग मी करिता पदाघात । झाला यम नामशेष ।।११२।। माझे भक्त भृगू शंकुकर्ण । त्यांचा छळ करी रमारमण । तेणे विष्णूचे झाले मुंडन । घ्यावे लागले जन्म दहा ।।११३।।**

मद्भक्तेन दधीचेन कृत्वा युद्धं जनार्दनः ।।७४।।

भग्नचक्रायुधः पूर्वं पराभवमुपागमत् । कृताश्वमेधो दक्षोऽपि मद्भक्तांश्च गणेश्वरान् ।।७५।।

अवमत्य सभामध्ये मेषवक्त्रोऽभवत् पुरा ।

**दधीचि माझा भक्त पूर्ण । विष्णूने त्याच्याशी केले रण । तेणे त्याचे मोडले सुदर्शन । आणि जहाला पराभूत ।।११४।। पूर्वी दक्षाने यज्ञ केला । अवमानिले मम भक्त-गणाला । तेणे दक्ष शिरोविहीन झाला । वीरभद्राकडून ।।११५।। मग लावूनि मेषवक्त्र । त्याला जीवन दिले मात्र । इथे तिथे हिंडे सर्वत्र । मेषवदन घेऊनी ।।११६।।**

श्वेतस्य मम भक्तस्य दुरतिक्रमतेजसः ।।७६।।

औदासीन्येन कालोऽपि मया दग्धः पुराऽभवत् । एवमन्येऽपि बहवो मद्भक्तानामतिक्रमात् ।।७७।।

परिभूता हताश्चासन् भक्ता मे दुरतिक्रमाः ।

**पराक्रमी भक्त श्वेत । त्यास यमे दुर्लक्षिले फक्त । यमासी केले भस्मसात । मीच तेव्हा क्रोधाने ।।११७।। मद्भक्तांसी ओलांडून । त्यांचा केला अवमान । तेणे हरले काही जण । काही गेले मृत्युपंथे ।।११८।। म्हणूनि कोणी माझ्या भक्ता । ओलांडू नयेचि सर्वथा । दाखवू नये अनास्था । आणि अपमान करू नये ।।११९।।**

अविचारेण मद्भक्तो लंघितो दारुकस्त्वया ।।७८।।

एष त्वं रेणुकानेन जन्मवान् भव भूतले । इत्युक्तः परमेशेन भक्तमाहात्म्यशंसिना ।।७९।।

प्रार्थयामास देवेशं प्रणिपत्य स रेणुकः ।

**म्हणूनि रेणुका ऐक । तू अवमानिला भक्त दारुक । यास्तव तुजला भूलोक । आता प्राप्त होईल ।।१२०।। जन्म घेणे आता प्राप्त । हे चुकेचिना तुजप्रत । ऐकूनि रेणुक तेथ । स्तब्ध क्षणैक जहाले ।।१२१।। भक्तप्रशंसक शंकर । त्यांची आज्ञा ऐकता सत्वर । रेणुके घातला नमस्कार । आणि प्रार्थू लागले ।।१२२।।**

मानुषीं योनिमासाद्य महादुःखविवर्धिनीम् ।।८०।।

जात्यायुर्भोगवैषम्यहेतुकर्मोपपादिनीम् । समस्तदेवकैंकर्यकार्पण्यप्रसवस्थलीम् ।।८१।।

महातापत्रयोपेतां वर्णाश्रमनियन्त्रिताम् । विहाय त्वत्पदाम्भोजसेवां किं वा वसाम्यहम् ।।८२।।

यथा मे मानुषो भावो न भवेत् क्षितिमंडले । तथा प्रसादं देवेश विधेहि करुणानिधे ।।८३।।

**रेणुक म्हणती मनुष्ययोनी । देवा केवळ दुःखखाणी । तेथे सतत गाऱ्हाणी । दुःखाचीच महादेवा ।।१२३।। जाती आयुष्य आणि भोग । यांच्यात व्हावा वैषम्य-रोग । अशीच घडती कर्मे सवेग । तेथे जीवाकडूनी ।।१२४।। लागे देवतांतरा भजावे । त्रिविध ताप तेथे साहावे । वर्णाश्रमबंधनी लागे राहावे। ती दैन्याची जन्मभूमी ।।१२५।। सोडूनि तुमची चरणसेवा । भूलोकी कैसा राहू शिवा? । मनुष्य-योनीचा गुंतागोवा । देऊ नका मजलागी ।।१२६।। करुणासागर परमेश्वरा । माझ्यावरी अनुग्रह करा । भूलोकी मज शंकरा । जन्म घ्यावा लागू नये ।।१२७।।**

इति संप्रार्थितो देवो रेणुकेन महेश्वरः । मा भैषीर्मम भक्तानां कुतो भीतिरिहेष्यति ।।८४।।

श्रीशैलस्योत्तरे भागे त्रिलिंगविषये शुभे । कोल्लिपाक्याभिधानोऽस्ति कोऽपि ग्रामो महत्तरः ।।८५।।

सोमेश्वराभिधानस्य तत्र वासवतो मम । अस्पृशन् मानुषं भावं लिंगात्प्रादुर्भविष्यसि ।।८६।।

**रेणुकांनी केली प्रार्थना । मग बोलिला कैलासराणा । बा रेणुका मद्भक्तांना । भय कसले असेल? ।।१२८।। श्रीशैलाच्या उत्तरेस । मंगलमय तेलंग देश । तेथे कोल्लिपाकी नामे विशेष । गाव**

**असे विशाल ।।१२९।। त्या कोल्लिपाकी क्षेत्रात । मी सोमेश्वरलिंगरूपे ख्यात । लिंगातूनि त्या प्रादुर्भूत । दिव्यरूपे तू होशील ।।१३०।।**

मदीयलिंगसंभूतं मद्भक्तपरिपालकम् । विस्मिता मानुषाः सर्वे त्वां भजन्तु मदाज्ञया ।।८७।।
मदद्वैतपरं शास्त्रं वेदवेदान्तसंमतम् । स्थापयिष्यसि भूलोके सर्वेषां हितकारकम् ।।८८।।
मम प्रतापमतुलं मद्भक्तानां विशेषतः । प्रकाशय महीभागे वेदमार्गानुसारतः ।।८९।।

**ममाज्ञेने सोमेश्वर । लिंगातूनि घेशील अवतार । तुला पाहता भक्तवर । विस्मित होऊनि सेवितील ।।१३१।। जनलोकांचे व्हावे हित । यास्तव स्थापिशील शिवाद्वैत । जे वेदोपनिषदांना संमत । आणि आगमोक्त असे ।।१३२।। माझा प्रताप अतुल । तो रूढवी भूलोकी सकळ । मद्भक्तांचाही प्रताप समूळ । प्रकाशित करशील ।।१३३।। वेदमार्गा अनुसरावे । लोक मद्भजनी रमावे । ऐसे कार्य करूनि व्हावे । कृतकार्य रेणुका ।।१३४।।**

इत्युक्त्वा परमेश्वरः स भगवान् भद्रासनादुत्थितो
ब्रह्मोपेन्द्रमुखान् विसृज्य विबुधान् भ्रूसंज्ञया केवलम् ।

पार्वत्या सहितो गणैरभिमतैः प्राप स्वमन्तःपुरं
क्षोणीभागमवातरत् पशुपतेराज्ञावशाद् रेणुकः ।।९०।।

**इतुके बोलूनि उमारमण । उठले सिंहासनावरून । भ्रूसंकेते सर्व देवांलागून । पाठविले स्वस्थानी ।।१३५।। प्रिय गण आणि उमेसमवेत । शिव गेले अंत:पुरात । जाण्यास कोल्लीपाकी गावात । रेणुक सज्ज जहाले ।।१३६।। तिसरा अध्याय झाला पूर्ण । श्रोते पावले समाधान । रेणुक-अगस्त्य भेटीचे वर्णन । ऐका पुढील अध्यायी ।।१३७।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१३८।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । तृतीयोऽध्याय पूर्ण हा ।।१३९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ रेणुकस्य भूलोकावगतिर्नाम तृतीयः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय चौथा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु त्र्यक्षर शिवाचार्याय नमः ।। जो सर्वदा शुभंकर । नमू स्वसंवेद्य शंकर । ज्याच्याठायी निरंतर । नांदे विरति-वैभव ।।१।। जयजयाजी सदाशिवा । पंचमुखा महादेवा । सद्योजाता वामदेवा । अघोरा तत्पुरुषा ईशाना ।।२।। तव कृपेने लेखणी झरे । उमटती कागदावरी अक्षरे । ओवी-ओवीतून अवतरे । तत्त्वज्ञान-साहित्य ।।३।। नसता व्यासंग अभ्यास । प्रवर्तलो मी लेखनास । तू पाठीशी हा विश्वास । दृढ आहे मानसी ।।४।। तुझे देणे जगावेगळे । पुरविशी सर्वांचे सर्व लळे । माझे ग्रंथरचनेचे डोहाळे । तेही पुरवी दयाळा ।।५।। श्रोतेहो आता पुढे ऐका । शिवे आज्ञा केली रेणुका । त्यानुसार ते भूलोका । आले अवतीर्ण होण्यासी ।।६।।**

अथ त्रिलिंगविषये कोल्लिपाक्यभिधे पुरे । सोमेश्वरमहालिंगात् प्रादुरासीत् स रेणुकः ।।१।।

प्रादुर्भूतं तमालोक्य शिवलिंगात् त्रिलिंगजाः । विस्मिताः प्राणिनः सर्वे बभूवुरतितेजसम् ।।२।।

**तेलंग देशी मनोहर । भव्य कोल्लिपाक नगर । तेथे लिंग सोमेश्वर । नामे सर्वप्रसिद्ध ।।७।। ब्राह्ममुहूर्ती प्रात:काळी । जमली होती भक्तमंडळी । पूजा करूनि शिवनामावळी । गात होते**

भक्तीने ।।८।। नमो शिवा त्रिलोचना । शंभु शंकरा पंचानना । सोमा शांता ईशाना । सदाशिवा श्रीकंठा ।।९।। नागभूषणा गौरीनाथा । वृषभध्वजा शाश्वता । सहस्राक्षा अनंता । महादेवा परमेश्वरा ।।१०।। शूलपाणि महेश्वरा । वामदेवा शशिशेखरा । त्रिपुरांतका जटाधरा । विश्वेश्वरा अष्टमूर्ते ।।११।। शिपिविष्टा नीललोहिता । मृत्युंजया गणनाथा । त्रिलोकेशा परशुहस्ता । विष्णुवल्लभा सर्वज्ञा ।।१२।। वीरभद्रा त्र्यंबका । दक्षाध्वरहरा सात्त्विका । भूतपते पाशविमोचका । जगद्रूपा जगद्गुरू ।।१३।। ऐसा शिवनामगजर । गेले गर्जूनि अवघे अंबर । तेथे रेणुक गणेश्वर । गुप्तरूपे पातले ।।१४।। लिंगाकडे लाविली दृष्टी । आकर्षिली योगशक्ती । क्षणात लक्षविद्युत्कांती । तैसे तेज दाटले ।।१५।। कडकडले नभोमंडळ । डळमळले महीतळ । जणू खचली नक्षत्रमाळ । प्रलय वाटे जहाला ।।१६।। थरथरले मंदिर देखणे । लिंगातूनि फाकली किरणे । रूप तेजस्वी गोजिरवाणे । क्षणार्धात प्रकटले ।।१७।। सोमेश्वर महालिंगातून । प्रकटले रेणुक शिवगण । तेज:पुंज दिव्य रूप पाहून । तेलंग-जन विस्मित ।।१८।।

भस्मोद्धूलितसर्वांगं साररुद्राक्षभूषणम् ।
लिंगधारणसंयुक्तं लिंगपूजापरायणम् । जटामुकुटसंयुक्तं त्रिपुंड्रांकितमस्तकम् ।।३।।
कटीतटीपटीभूतकंथापटलबंधुरम् । दधानं योगदंडं च भस्माधारं कमंडलुम् ।।४।।

**भस्मोद्धूलित शरीर । जणू दुजा कर्पूरगौर । रुद्राक्षभूषणे अंगभर । उत्तमोत्तम शोभती ।।१९।। मस्तकी इष्टलिंग मनोहर । लिंगपूजनी अति तत्पर । शिरी शोभे जटाभार । भाळी त्रिपुंड्र रेखलेले ।।२०।। कंथा कसली कमरेस । तेणे रूप दिसे लोभस । शोभा आणिती द्वय करांस । योगदंड-कमंडलू ।।२१।।**

शिवाद्वैतपरिज्ञानपरमानंदमोदितम् । निर्धूतसर्वसंसारवासनादोषपंजरम् ।।५।।
शिवागमसुधासिंधुसमुन्मेषसुधाकरम् । चित्तारविंदसंगूढशिवपादाम्बुजद्वयम् ।।६।।

**शिवाद्वैतज्ञान प्राप्त । त्या परमानंदे प्रमुदित । पिंजरा झाला नष्ट समस्त । संसारवासना-दोषांचा ।।२२।। शिवागमांचा अमृतसागर । उचंबळविणारे ते सुधाकर । शिवपदकमलांनी अंतर । गूढतेने भरलेले ।।२३।। नकळता कोणास । हृदयी ध्याती शिवपदांस । सदा अंतर्मुख मानस । आत्मचिंतनी रमलेले ।।२४।।**

यमादियोगतंत्रज्ञं स्वतंत्रं सर्वकर्मसु । समस्तसिद्धसंतानसमुदायशिखामणिम् ।।७।।
वीरसिद्धान्तनिर्वाहकृतपट्टनिबंधनम् । आलोकमात्रनिर्भिन्नसमस्तप्राणिपातकम् ।।८।।

**यम नियम आसन । प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान । समाधी ही अष्टांगे जाण । मुनिवर्या अगस्त्या ।।२५।। या अष्टांगयोगात पारंगत । स्वतंत्र सर्व कार्यात । सिद्धवंशसमूहात । सर्वश्रेष्ठ ते होते ।।२६।।**

वीरशैवमतस्थापनेस्तव । कटिबद्ध झाले सर्वथैव । दृष्टिक्षेपे पातके सर्व । नष्ट करीत लोकांची ।।२७।। येथे कोणी घेईल शंका । जडलिंगातूनि उद्‌भव रेणुका । खरेच घडले असेल का । ऐसे कधीकाळी कुठे? ।।२८।। ही शंका दूर व्हावी । तरी काही प्रमाणे पाहावी । आणि भूमिका समजूनि घ्यावी । शुद्ध अंत:करणाने ।।२९।। सर्व जगत् शिवमय । ऐसे वेदागम सांगती सर्व । शिवब्रह्म चैतन्यमय । असे ज्ञाते सांगती ।।३०।। जे चैतन्य अत्यंत गूढ । त्यासी मूढ म्हणती जड । विश्वरूप जरी चंद्रचूड । तरी मग जड उरे कोठे? ।।३१।। चर्मदृष्टीस जे जड भासे । ते मुळात चैतन्यरूप असे । लिंग जड परि त्यात वसे । अत्यंत गूढ चैतन्य ।।३२।। याच सुप्त चैतन्यापासून । उद्‌भवले रेणुक शिवगण । येथे शंकेसी कारण । काही असेनाच की ।।३३।। जन्म आणि प्राकट्यसामर्थ्य । या दोहींचे भिन्न अर्थ । त्या एक मानूनि व्यर्थ । वाद पाखंडी घालिती ।।३४।। पंचाचार्यांचा लिंगातून । नाही झाला जन्म नूतन । ते प्रकटले हे समजून । घेतले पाहिजे सर्वांनी ।।३५।। मातापिता असतील । तरीच बाळ जन्मेल । सर्वज्ञात हा निसर्गातील । नियम असे अटळ ।।३६।। जो नित्यमुक्त सनातन । योगसिद्ध शिवा-समान । त्यासी नसे कदापि जनन । आणि नसती मायपिता ।।३७।। बाल्य तारुण्य वृद्धपण । तो मुक्त या अवस्थांतून । तो सर्वत्र चिरतरुण । स्वेच्छामात्रे प्रकटतो ।।३८।। भक्त प्रल्हादासाठी । प्रकटला

**स्तंभातूनि जगजेठी । आणि भक्त मार्कंडेयासाठी । शिव प्रकटले लिंगातूनी ।।३९।। तैसे रेणुक योगबळे । लिंगातूनि प्रकटले । जन्म आणि प्राकट्य वेगळे । हे जाणावे नि:शंकपणे ।।४०।।**

तमपृच्छन् जनाः सर्वे नमन्तः को भवानिति । इति पृष्टो महायोगी जनैर्विस्मितमानसैः ।।९।।

प्रत्युवाच शिवाद्वैतमहानंदपरायणः । पिनाकिनः पार्श्ववर्ती रेणुकाख्यगणेश्वरः ।।१०।।

**दिव्यदेही रेणुका पाहून । अंतरी विस्मित झाले जन । विचारिती नमस्कारून । आपण कोण महाराजा? ।।४१।। शिवाद्वैत महानंदात । निमग्न शिवसहवासात । त्या रेणुकांनी लोकांप्रत । उत्तर दिले ऐसे हे ।।४२।।**

केनचित्कारणेनाहं शिवलिंगादिहाभवम् । नाम्ना रेणुकसिद्धोऽहं सिद्धसंताननायकः ।।११।।

स्वच्छंदचारी लोकेऽस्मिन् शिवसिद्धान्तपालकः । खंडयन् जैनचार्वाकबौद्धादीनां दुरागमान् ।।१२।।

इत्युक्त्वा पश्यतां तेषां विषयस्थिरचक्षुषाम् । उत्थाय व्योममार्गेण मलयाद्रिमुपागमत् ।।१३।।

**सोमेश्वर लिंगातून । माझे जहाले प्रकटन । विशेष कार्य करण्यासी महान । मी अवतरलो भूलोकी ।।४३।। सर्व सिद्धसमूहात । मी रेणुकसिद्ध ख्यात । स्वेच्छेने सर्व लोकांत । मी स्वच्छंदे वावरतो ।।४४।। ईश्वरा वेदा मानिती अप्रमाण । ऐसी बहुत शास्त्रे जाण । त्यांचे करूनिया खंडन ।**

**रक्षीन शिवाद्वैतासी ।।४५।। लोक पाहती एकटक । आणि उठूनि अचानक । आकाशमार्गे गेले रेणुक । निघूनि मलयगिरीकडे ।।४६।।**

नवचंदनकांतारकंदलन्मंदमारुतम् । अभंगुरभुजंगस्त्रीसंगीतरससंकुलम् ।।१४।।

करिपोतकराकृष्टस्फुरदेलातिवासितम् । वराहदंष्ट्रिकाध्वस्तमुस्तासुरभिकंदरम् ।।१५।।

**नूतन चंदनवृक्षांवरून । वाहे गंधित मंद पवन । त्या परिमळाने दरवळून । गेला मलयाचल तो ।।४७।। तेथे नागस्त्रियाही विपुल । त्यांच्या गानरसाने मंजुळ । दुमदुमूनि गेला अचल । मंद मधुर निनादे ।।४८।। हत्तिणींची बाळे सानुली । वेलदोड्यांच्या उपटिती वेली । त्या सुवासे भरूनि गेली । वृक्षराजी सर्वही ।।४९।। रानवराहांचे सुळे । उकरिती वाळ्याची मुळे । त्याचा घमघमाट दरवळे । पर्वताच्या गुहांतूनी ।।५०।।**

पटीरदलपर्यंकप्रसुप्तव्याधदंपतिम् । माधवीमल्लिकाजातीमंजरीरेणुरंजितम् ।।१६।।

तत्र कुत्रचिदाभोगसर्वर्तुकुसुमद्रुमे । अपश्यदाश्रमं दिव्यमगस्त्यस्य महामुनेः ।।१७।।

**निसर्गसुंदर मलयपर्वती । चंदनपर्णांच्या शय्येवरती । शयन करिती किरातदंपती । अनुभविती सुखनिद्रा ।।५१।। जाई जुई माधवी फुले । हलती डोलती वायुबळे । पराग-मंजिऱ्यांचा दरवळे । गंध**

**भोवती सर्वत्र ।।५२।। फुलती सर्व ऋतूंत । अशा पुष्पांनी बहरला पर्वत । त्यावरी दिव्य आश्रम स्थित । अगस्त्यमुनींचा देखिला ।।५३।।**

मंदारचंदनप्रायैर्मण्डितं तरुमंडलैः । शाखाशिखरसंलीनतारकागणकोरकैः ।।१८।।

मुनिकन्याकरानीतकलशाम्बुविवर्धितैः । आलवालजलास्वादमोदमानमृगीगणैः ।।१९।।

**पारिजात चंदन तरुवर । उत्तुंग इतुके स्पर्शिती अंबर । नक्षत्रे उंच तरुशाखांवर । भासती शुभ्र कळ्यांसम ।।५४।। मुनिकन्या जल कलशांतून । घालूनि आश्रमतरूंचे करिती विवर्धन । आळ्यातील जल प्राशून । सुखावे हरिणीसमूह ।।५५।।**

हेमारविंदनिष्यन्दमकरंदसुगंधिभिः । मरालालापवाचालुवीचिमालामनोहरैः ।।२०।।

इंदीवरवरज्योतिरन्धीकृतहरिन्मुखैः । लोपामुद्रापदन्यासचरितार्थतटांकितैः ।।२१।।

**सुंदर सुवर्णकमलांतून । मकरंद येई ओथंबून । तेणे सरोवरीचे जीवन । सुगंधित जहाले ।।५६।। हंसे करिता ध्वनी मधुर । उठती जली तरंग मनोहर । हंसध्वनी-गुंजने परिसर । दुमदुमला आश्रमाचा ।।५७।। नीलकमलांनी व्यापिली । सरोवरे सर्व तेथली । तेणे नीलप्रभा संचली । कुंद झाल्या दशदिशा ।।५८।। लोपामुद्रेच्या चरणखुणांनी । तडागकाठ गेले भरूनी । जणू अनुभविती**

**क्षणोक्षणी । मनामाजी कृतार्थता ।।५९।।**

हारनीहारकर्पूरहरहासामलोदकैः । नित्यनैमित्तिकस्नाननियमार्थैस्तपस्विनाम् ।।२२।।

प्रकृष्टमणिसोपानैः परिवीतं सरोवरैः । विमुक्तसत्त्ववैरस्यं ब्रह्मलोकमिवापरम् ।।२३।।

**मुक्ताहार किंवा कर्पूर । की शिवाचे हास्य मधुर । तैसे निर्मळ सरोवर । नीर शुभ्र नितळ ।।६०।। तपस्वी जन नियमाने । करिती नित्यनैमित्तिक स्नाने । श्रेष्ठ रत्नांनी सोपाने । अलंकृत तेथली ।।६१।। आश्रमातील प्राणी सर्व । विसरले वैरभाव । प्रतिब्रह्मलोकच दिव्य । जणू भासे परिसर ।।६२।।**

हूयमानाज्यसंतानधूमगन्धिमहास्थलम् । शुकसंसत्समारब्धश्रुतिशास्त्रोपबृंहणम् ।।२४।।

तस्य मध्ये समासीनं मूले चंदनभूरुहः । सुकुमारदलच्छायादूरितादित्यतेजसः ।।२५।।

**होमात घृताचे हवन । घृतगंधित धुमे भरले गगन । शुक करिती मंजुळ गायन । वेदशास्त्र-वचनांचे ।।६३।। आकाशमार्गे रेणुके येऊन । पाहिला दिव्य आश्रम पूर्ण । ऋषी अगस्त्य तेथे चंदन-। तरूखालती बसलेले ।।६४।। चंदनपर्णे सुकुमार । दाट होती वृक्षांवर । तेणे सूर्यझळा अणुमात्र । लागतीना अगस्तीसी ।।६५।।**

तडित्पिंगजटाभारैस्त्रिपुंडांकितमस्तकैः । भस्मोद्धूलितसर्वांगैः स्फुरद्रुद्राक्षभूषणैः ।।२६।।

नववल्कलवासोभिर्नानानियमधारिभिः । परिवीतं मुनिगणैः प्रमथैरिव शंकरम् ।।२७।।

**विद्युल्लतेसम पिंगटवर्णी । जटाभारे युक्त मुनी । भाळी त्रिपुंड्र शुभ्रवर्णी । भस्मचर्चित सर्वांग ।।६६।। रुद्राक्षभूषणे धारिलेले । नूतन वल्कले नेसलेले । अशा ऋषिसमूहाने वेढले । होते अगस्त्य महर्षी ।।६७।। प्रमथगणांच्या मेळ्यात । शोभे जैसा शितिकंठ शांत । तैसे मुनिगणसमूहात । अगस्त्यमुनी शोभले ।।६८।।**

समुज्ज्वलजटाजालैस्तपःपादपपल्लवैः । स्फुरत्सौदामिनीकल्पैर्ज्वालाजालैरिवानलम् ।।२८।।

विशुद्धभस्मकृतया त्रिपुंड्रांकितरेखया । त्रिस्रोतसेव सम्बद्धशिलाभागं हिमाचलम् ।।२९।।

**तपतरूची पालवी कोमल । किंवा सौदामिनीचा लोळ । तैशा जटा ऊर्ध्व उज्ज्वल । अगस्ती भासती ज्वालेसम ।।६९।। भाळ शुभ्र त्रिपुंड्रमंडित । जणू गंगेचे तीन स्रोत । कड्यावरूनि अव्याहत । झेप घेती दरीमध्ये ।।७०।।**

भस्मालंकृतसर्वांगं शशांकमिव भूगतम् । वसानं वल्कलं नव्यं बालातपसमप्रभम् ।।३०।।

वडवाग्निशिखाजालसमालीढमिवार्णवम् । सर्वासामपि विद्यानां समुदायनिकेतनम् ।।३१।।

**बालसूर्याचे कोवळे ऊन । तैसे वल्कल केले परिधान । सर्वांगी शुभ्र भस्मविलेपन । तेणे झाली**

**शुभ्र वपू ।।७१।। तो शुभ्र देह पाहून । वाटे सोडूनि आकाशस्थान । चंद्रच आला उतरून । आज जणू भूलोकी ।।७२।। सर्व विद्यांनी व्याप्त । त्यांचे अंतरंग तृप्त । सागराच्या उदरात । जैसा सुप्त वडवानल ।।७३।।**

न्यक्कृतप्राकृताहन्तं निरूढशिवभावनम् । तृणीकृतजगज्जालं सिद्धीनामुदयस्थलम् ।।३२।।

मोहांधकारतपनं मूलबोधमहीरुहम् । ददर्श स महायोगी मुनिं कलशसंभवम् ।।३३।।

**अष्टसिद्धींचे उगमस्थान । अगस्त्य ऋषी परिपूर्ण । प्राकृत अहंभावापासून । मुक्त होते सर्वस्वी ।।७४।। शिवभावे दृढ अंतर । तृणवत् मानिती संसार । नष्टला मोह-अंध:कार । प्रतिसूर्य तेजस्वी ।।७५।। मूळज्ञानाचा कल्पवृक्ष । ज्याचे ज्ञान अपरोक्ष । त्या कुंभोद्‌भवासी प्रत्यक्ष । रेणुकाचार्यांनी पाहिले ।।७६।।**

तमागतं महासिद्धं समीक्ष्य कलशोद्भवः । गणेन्द्रं रेणुकाभिख्यं विवेद ज्ञानचक्षुषा ।।३४।।

तस्यानुभावं विज्ञाय सहसैव समुत्थितः । लोपामुद्राकरानीतैरुदकैरतिपावनैः ।।३५।।

पादौ प्रक्षालयामास स तस्य शिवयोगिनः ।

**रेणुकाचार्य येता समोर । हेचि रेणुक गणेश्वर । ऐसे अगस्त्यांनी सत्वर । जाणले ज्ञानचक्षूंनी ।।७७।।**

**त्यांचा प्रभाव जाणून । आदरे उत्थित होऊन । करूनिया चरणवंदन । उच्चासनी बैसविले ।।७८।। लोपामुद्रेने आणिले जल । प्रक्षाळिले पदकमल । दाटूनि आला केवळ । मनी मोद उभयतांच्या ।।७९।।**

संपूज्य तं यथाशास्त्रं तन्नियोगपुरस्सरम् ।।३६।।

मुनिर्विनयसंपन्नो निषसादासनान्तरे । समासीनं मुनिवरं सर्वतेजस्विनां विभुम् ।।३७।।

उवाच शांतया वाचा रेवणः सिद्धशेखरः ।

**शास्त्रविधीनुसार । पूजिले रेणुक गणेश्वर । आज्ञा घेऊनि आसनावर । दुज्या बैसले विनयाने ।।८०।। सर्व तेजस्वी ऋषींत । श्रेष्ठ अगस्त्य अत्यंत । त्यांस बोलती शांत स्वरात । रेणुक सिद्धमुकुटमणी ।।८१।।**

निर्विघ्नं वर्तसे किं नु नित्या ते नियमक्रिया ।।३८।।

अथ वाऽगस्त्य तेजस्विन् कुतः स्युस्तेऽन्तरायकाः । विंध्यो निरुद्धो भवता विश्वोल्लंघनविभ्रमः ।।३९।।

नहुषो रोषलेशात् ते सद्यः सर्पत्वमागतः ।

**काय अगस्त्या निर्विघ्न । चालले तुझे वर्तन? । काय नित्य नियमक्रिया पूर्ण । चालल्या ना यथास्थित? ।।८२।। तुज कैसे विघ्न प्राप्त? । विंध्याचल वाढता नभात । त्यासी रोधूनि तू ध्वस्त ।**

**त्याचा केला दुरभिमान ।।८३।। पूर्वी राजा नहुषाने । जिंकिला देवेन्द्र साहसाने । परि तुझ्या किंचित् रोषाने । तो जहाला सर्परूप ।।८४।।**

आचान्ते भवता पूर्वं पंकशेषाः पयोधयः ।।४०।।

जीर्णस्ते जाठरे वह्नौ दृप्तो वातापिदानवः । एवंविधानां चित्राणां सर्वलोकातिशायिनाम् ।।४१।।

कृत्यानां तु भवान् कर्ता कस्तेऽगस्त्य समप्रभः ।

**पूर्वी एका आचमनात । तू रिचविलेस उदरात । सप्तसागर मग तेथ । केवळ उरला पंकचि ।।८५।। वातापी दैत्य उन्मत्त । शिरला तुझिया उदरात । त्यासी तू जठराग्नीत । पचविले तत्काळ ।।८६।। ऐसे लोकविलक्षण । चमत्कारित लीलावर्तन । दुजा कोणी तुझ्यासमान । असेचिना जगात ।।८७।।**

शिवाद्वैतपरानंदप्रकाशनपरायणम् ।।४२।।

भवन्तमेकं शंसन्ति प्रकृत्या संगवर्जितम् । पुरा हैमवतीसूनुरवदत् ते षडाननः ।।४३।।

शिवधर्मोत्तरं नाम शास्त्रमीश्वरभाषितम् ।

**शिवज्ञानानंद परमपावन । त्याचे कराया प्रकाशन । तूचि एकमात्र जाण । स्वभावतः तत्पर ।।८८।। सर्वसंगपरित्यागी । तूचि एक श्रेष्ठ योगी । ऐसी प्रशंसा जगी । करिती लोक तुझी गा ।।८९।। पार्वतीपुत्र**

**कार्तिकास । शिवे उपदेशिले शिवधर्मोत्तर शास्त्रास । उपदेशिले त्याचि रहस्यास । तुजलागी षडानने ।।९०।।**

भक्तिः शैवी महाघोरसंसारभयहारिणी ।।४४।।

त्वया राजन्वती लोके जाताऽगस्त्य महामुने । इति तस्य वचः श्रुत्वा सिद्धस्य मुनिपुंगवः ।।४५।।

गंभीरगुणया वाचा बभाषे भक्तिपूर्वकम् ।

**हे अगस्त्या महाघोर । दुस्तर हा संसारसागर । त्याचे भय हरिते थोर । शिवभक्ती निर्मळ ।।९१।। ऐसी भयहारिणी शिवभक्ती । तुझ्याकारणे ख्यात जगती । ऐकूनि मुनिपुंगव बोलती । अगस्त्य भक्तिपूर्वक ।।९२।।**

अहमेव मुनीन्द्राणां लालनीयोऽस्मि सर्वदा ।।४६।।

भवदागमसंपत्तिर्मां विना कस्य संभवेत् । स्थिरमद्य शिवज्ञानं स्थिरा मे तापसक्रिया ।।४७।।

भवद्दर्शनपुण्येन स्थिरा मे मुनिराजता ।

**आचार्यवरा आपण । मम आश्रमी येऊन । दिधले मज दर्शन । हे माझे अहोभाग्य ।।९३।। नच लाभे अन्य ऋषीस । मीच सभाग्य विशेष । ठरलो ऋषिप्रशंसेस । पात्र आणि धन्य झालो ।।९४।। आपल्या दर्शन-पुण्यामुळे । माझे शिवज्ञान स्थिरावले । तपस्या स्थिर आणि ठरले । ऋषिश्रेष्ठत्व**

**अबाधित ।।९५।।**

संसारसर्पदष्टानां मूर्च्छितानां शरीरिणाम् ।।४८।।

कटाक्षस्तव कल्याणं समुज्जीवनभेषजम् । समस्तलोकसंदाहतापत्रयमहानलः ।।४९।।

त्वत्पदाम्बुकणास्वादादुपशाम्यति देहिनाम् ।

**संसारसर्पे दंश केला । त्या विषे जो मूर्च्छित झाला । आपली कृपादृष्टी त्या जीवाला । कल्याणप्रद संजीवनी ।।९६।। तापत्रय-महाअनल । जाळूनि लोका करितो विकल । त्याचा दाह होई शीतल । आपल्या पादोदक-थेंबाने ।।९७।।**

रेणुकं त्वां विजानामि गणनाथं शिवप्रियम् ।।५०।।

अवतीर्णमिमां भूमिं मदनुग्रहकांक्षया । भवादृशानां सिद्धानां प्रबोधध्वस्तजन्मनाम् ।।५१।।

प्रवृत्तिरीदृशी लोके परानुग्रहकारिणी ।

**शिवप्रेमासी पात्र अत्यंत । आपण रेणुकाचार्य गणनाथ । माझ्या अनुग्रहाप्रीत्यर्थ । अवतरला मी जाणतो ।।९८।। शिवाज्ञेने चुकले जन्ममरण । आणि सर्वसिद्धिसंपन्न । भूलोकी योगीश्वर आपणा-समान । लोकानुग्रहास्तव संचरती ।।९९।।**

त्वन्मुखाच्छ्रोतुमिच्छामि सिद्धान्तं श्रुतिसंमतम् ।।५२।।

सर्वज्ञ वद मे साक्षाच्छैवं सर्वार्थसाधकम् । सद्यः सिद्धिकरं पुंसां सर्वयोगीन्द्रसेवितम् ।।५३।।

दुराचारैरनाघ्रातं स्वीकृतं वेदवेदिभिः । शिवात्मैक्यमहाबोधसंप्रदायप्रवर्तकम् ।।५४।।

**जे श्रुतिसंमत शिवाद्वैत । ज्याने प्राप्त होती सकल पुरुषार्थ । जे दुर्जनस्पर्शविरहित । सिद्धिदायक सर्वांसी ।।१००।। जे स्वीकारिले वैदिकांनी । जे योगिश्रेष्ठांस प्रिय मनातूनी । मनोरथ पुरती पूर्णपणी । ज्यामुळे जीवमात्राचे ।।१०१।। ते शिवजीवैक्य महाज्ञान । जो बोधितो तो वीरशैव सिद्धान्त महान । सर्वज्ञा आपल्या मुखातून । श्रवण करू इच्छितो ।।१०२।। तरी आचार्य महाराज । मजवरी कृपा करावी आज । आणि बोधावे मजसी गुज । ह्रदयामधले शिवाच्या ।।१०३।।**

उक्त्वा भवान् सकललोकमहोपकारं
सिद्धान्तसंग्रहमनादृतबाह्मतंत्रम् ।
सद्यः कृतार्थयितुमर्हति दिव्ययोगिन्
नानागमश्रवणवर्तितसंशयं माम् ।।५५।।

**नाना आगमांचे अध्ययन । करूनि शंकित झाले मन । वेदसंमत, नास्तिकमतखंडन । करणारे जे**

**शिवशास्त्र ।।१०४।। जे करिते सर्व लोककल्याण । ते शिवसिद्धान्तशास्त्र उपदेशून । माझे करावे शंकानिरसन । कृतार्थ मज करूनिया ।।१०५।। ऐसी विनंती करिता अगस्त्य । रेणुकाचार्य बोधिती सिद्धान्त । तो श्रोतेहो पुढील अध्यायात । श्रवण करा जीवेभावे ।।१०६।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१०७।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । चतुर्थोऽध्याय पूर्ण हा ।।१०८।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ रेणुकागस्त्यदर्शनप्रसंगो नाम चतुर्थः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय पाचवा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु चतुरक्षर शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः महेश्वराय । शंभवे नमः शशिशेखराय । पिनाकिने नमः वामदेवाय । विरूपाक्षाय नमः कपर्दिने ।।१।। वृषभध्वजा नागभूषणा । विश्वसाक्षी सर्गस्थित्यंतकारणा । भव भवांतका त्रिमलहरणा । आनंदवनविलासा ।।२।। तव कृपेने करितो लेखन । हाचि माझा यज्ञ जाण । शुद्ध होईल वाणी मन । मिळेल मज प्रसाद ।।३।। मागील अध्यायी केले श्रवण । अगस्त्य प्रार्थिती रेणुकालागून । जे करी सर्व लोककल्याण । ते निरूपावे शिवशास्त्र ।।४।। ते दिव्य शिवाद्वैत । श्रोतेहो एकाग्र करूनि चित्त । श्रवण करा सुटेल निश्चित । ग्रहण जन्ममरणाचे ।।५।।**

अथागस्त्यवचः श्रुत्वा रेणुको गणनायकः । ध्यात्वा क्षणं महादेवं साम्बमाह समाहितः ।।१।।

अगस्त्य मुनिशार्दूल समस्तागमपारग । शिवज्ञानकरं वक्ष्ये सिद्धान्तं शृणु सादरम् ।।२।।

**अगस्त्यमुनीचे ऐकूनि वचन । गणनायक रेणुकांनी एक क्षण । शांतचित्ते केले ध्यान । अंबेसह महादेवाचे ।।६।। मग बोलती अगस्त्याप्रत । तू सकल निगमागमपारंगत । शिवज्ञानदायक सिद्धान्त ।**

**सांगतो ऐक सादर ।।७।।**

अगस्त्य खलु सिद्धान्ता विख्याता रुचिभेदतः । भिन्नाचारसमायुक्ता भिन्नार्थप्रतिपादकाः ।।३।।

सांख्यं योगः पांचरात्रं वेदाः पाशुपतं तथा । एतानि मानभूतानि नोपहन्यानि युक्तिभिः ।।४।।

**रुचिभेदानुसार । सांगती भिन्न भिन्न आचार । भिन्नार्थ प्रतिपादक फार । असती ख्यात सिद्धान्त ।।८।। कपिलमुनीचे सांख्यशास्त्र । पतंजलीचे योगशास्त्र । वासुदेवे उपदेशिले पांचरात्र-। रूपी वैष्णवसिद्धान्त ।।९।। शिवरचित पाशुपतशास्त्र । जैमिनीचे पूर्वमीमांसाशास्त्र । ही सर्व शास्त्रे प्रमाण सर्वत्र । त्यांचे खंडन करू नये ।।१०।।**

वेदः प्रधानं सर्वेषां सांख्यादीनां महामुने । वेदानुसरणादेषां प्रामाण्यमिति निश्चितम् ।।५।।

पांचरात्रस्य सांख्यस्य योगस्य च तथा मुने । वेदैकदेशवर्तित्वं शैवं वेदमयं मतम् ।।६।।

**सांख्यादी सहा शास्त्रे जाण । वेदांसी मानिती प्रमाण । वेदाधारे विषयप्रतिपादन । करिती सर्व आपुलाले ।।११।। म्हणूनि वेद हे मुख्य प्रमाण । षट्शास्त्रे ही उपप्रमाण । मानिती सर्व विद्वज्जन । वेदमार्गाचे अनुयायी ।।१२।। पांचरात्र सांख्य योग । मानिती वेदांचा एक भाग । परि वेदानुगामी सांग । नसती अगस्त्य मुनिवरा ।।१३।। परि पूर्ण शैवशास्त्र । सर्व वेदांसी मानी पवित्र । अनुसरे त्यांस**

**एकमात्र । म्हणूनि ते वेदमय ।।१४।।**

वेदैकदेशवर्तिभ्यः सांख्यादिभ्यो महामुने । सर्ववेदानुसारित्वाच्छैवतन्त्रं विशिष्यते ।।७।।

शैवतन्त्रमिति प्रोक्तं सिद्धान्ताख्यं शिवोदितम् । सर्ववेदार्थरूपत्वात् प्रामाण्यं वेदवत् सदा ।।८।।

**ज्यांना अंशत: वेद मान्य । ती सांख्यादी शास्त्रे अन्य । त्यांत शैवशास्त्र अग्रगण्य । जे पूर्ण वेदानुसारी ।।१५।। शैवशास्त्र शिवप्रणीत । त्यास म्हणती 'सिद्धान्त' । मानिती वेदांइतुके प्रमाणभूत । वेदार्थरूप असल्याने ।।१६।।**

आगमा बहुधा प्रोक्ताः शिवेन परमात्मना । शैवं पाशुपतं सोमं लाकुलं चेति भेदतः ।।९।।

तेषु शैवं चतुर्भेदं तन्त्रं सर्वविनिश्चितम् । वामं च दक्षिणं चैव मिश्रं सिद्धान्तसंज्ञकम् ।।१०।।

शक्तिप्रधानं वामाख्यं दक्षिणं भैरवात्मकम् । सप्तमातृपरं मिश्रं सिद्धान्तं वेदसंमतम् ।।११।।

**सर्वज्ञ परशिव ब्रह्म । त्याने कथिले अनेक आगम । त्यांत शैव पाशुपत सोम । लाकुल असे चार भेद ।।१७।। वाम दक्षिण मिश्र सिद्धान्त । ऐसे चार भेद शैवागमांत । शास्त्रवेत्त्यांनी निश्चित । केले असती पूर्वीच ।।१८।। शैवतंत्र नामे 'वाम' जाण । करी शक्तीचे उपासन । भैरवासी पूजी 'दक्षिण' । 'मिश्र' सप्तमातृकांसी ।।१९।। ब्राह्मी वैष्णवी माहेश्वरी । वाराही चामुंडा इंद्राणी कौमारी । ही**

**सप्तमातृकांची सारी । नावे जाणा श्रोतेहो ॥२०॥ 'सिद्धान्त' नामक शैवतंत्र । करी शिवोपासना मात्र । हे वेदानुगामी एकमात्र । अन्य तिन्ही नसतीच ॥२१॥**

वेदधर्माभिधायित्वात् सिद्धान्ताख्यः शिवागमः । वेदबाह्यविरोधित्वाद् वेदसंमत उच्यते ॥१२॥

वेदसिद्धान्तयोरैक्यमेकार्थप्रतिपादनात् । प्रामाण्यं सदृशं ज्ञेयं पण्डितैरेतयोः सदा ॥१३॥

**शिवागम 'सिद्धान्त' नामक । वेदधर्माचा प्रतिपादक । वेदविरोधी सिद्धान्ताचा विरोधक । म्हणूनि वेदसंमत हा ॥२२॥ वेदांत आणि सिद्धान्तात । प्रतिपादिला एकचि अर्थ । म्हणूनि त्यांचे प्रामाण्य पंडित । एकसमान मानिती ॥२३॥**

सिद्धान्ताख्ये महातन्त्रे कामिकाद्ये शिवोदिते । निर्दिष्टमुत्तरे भागे वीरशैवमतं परम् ॥१४॥

**कामिकापासून वातुलापर्यंत । ऐसे अट्ठावीस आगमग्रंथ । शिवे उपदेशिले त्यास 'सिद्धान्त । महातंत्र' नाव असे ॥२४॥ आगमांच्या उत्तरभागात । प्रतिपादिले वीरशैवमत । विवरण पूर्वभागात । असे शैवमताचे ॥२५॥**

विद्यायां शिवरूपायां विशेषाद् रमणं यतः । तस्मादेते महाभागा वीरशैवा इति स्मृताः ॥१५॥

वीशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिका । तस्यां रमन्ते ये शैवा वीरशैवास्तु ते मताः ॥१६॥

**शिवस्वरूपी विद्येत विशेष । जे रमती घेती रस । त्या भाग्यशाली जनांस । 'वीरशैव' नाव असे ।।२६।। 'वी' शब्दाचा विद्या अर्थ । 'र' म्हणजे होती रत । शिवजीवैक्यबोधक विद्येत । जे रमती ते वीरशैव ।।२७।।**

विद्यायां रमते यस्मान्मायां हेयां श्ववद्रहेत् । अनेनैव निरुक्तेन वीरमाहेश्वरः स्मृतः ।।१७।।

वेदान्तजन्यं यज्ज्ञानं विद्येति परिकीर्त्यते । विद्यायां रमते तस्यां वीर इत्यभिधीयते ।।१८।।

**शिवजीवैक्यबोधक । विद्येत जे रमती लोक । त्यांस असे अन्वर्थक । नाव 'वीरमाहेश्वर' ।।२८।। संसाररूपी मायेलागून । जे मानिती श्वानासमान । आणि त्यागिती झडझडून । ते वीरमाहेश्वर ।।२९।। करिता उपनिषदांचे अध्ययन । लाभे शिवजीवैक्यबोधक ज्ञान । त्या ज्ञानासी अभिधान । 'विद्या' ऐसे दिले असे ।।३०।। त्या विद्येत जे रमती । तिचे श्रवण-मनन-निदिध्यास करिती । त्यांना 'वीर' ऐसे संबोधिती । ज्ञाते अगस्त्य मुनिवरा ।।३१।।**

शैवैर्माहेश्वरैश्चैव कार्यमन्तर्बहिःक्रमात् । शिवो महेश्वरश्चेति नात्यन्तमिह भिद्यते ।।१९।।

**वीरमाहेश्वर आणि वीरशैव । उभयतांचे समान ध्येय । आंतरक्रिया करिती वीरशैव । वीरमाहेश्वर बाह्यक्रिया ।।३२।। क्रियेत जरी भेद दिसे । तरी दोघांचे लिंगार्चन एक असे । जैसा एकचि शिव वसे ।**

**सगुण-निर्गुण रूपांत ।।३३।। उपासकांची नावे भिन्न । परि उपासना एकसमान । दोघांत आत्यंतिक जाण । नसे भेद कदापि ।।३४।।**

यथा तथा न भिद्यन्ते शैवा माहेश्वरा अपि । शिवाश्रितेषु ते शैवा ज्ञानयज्ञरता नराः ।।२०।।

माहेश्वराः समाख्याताः कर्मयज्ञरता भुवि । तस्मादभ्यन्तरे कुर्युः शैवा माहेश्वरा बहिः ।।२१।।

**शिव आणि महेश्वर । यांच्यात भेद न तिळभर । तैसा वीरशैव आणि वीरमाहेश्वर । यांच्यात भेद नसेचि ।।३५।। वीरशैव करिती ज्ञानयज्ञ । वीरमाहेश्वर कर्मयज्ञ । ऐसी त्यांची भूलोकी सुज्ञ-। जनांत असे प्रसिद्धी ।।३६।। अंतरंगी वीरशैवांनी । बहिरंगी वीरमाहेश्वरांनी । रत व्हावे शिवपूजनी । ऐसे सांगतो सिद्धान्त ।।३७।। ज्ञानयज्ञरत वीरशैवे । इष्टलिंगासही पूजावे भावे । वीरमाहेश्वरांनी जीवे । हृदयी पूजावे चिल्लिंग ।।३८।। ज्ञान आणि कर्म जाण । शिवभक्ताचे पंख दोन । दोन्ही पंखबळे उड्डाण । करावे शिवसामरस्य-नभी ।।३९।। जरी एक पंख छाटला । तरी उडता नये पक्ष्याला । तैसे केवळ ज्ञाने वा कर्मे भक्ताला । न लाभेचि शिवत्व ।।४०।। वीरशैव असो वा माहेश्वर । असावे ज्ञान-कर्मयज्ञी तत्पर । दोन्हीमुळेच येई सत्वर । मुक्तिपद हातांसी ।।४१।।**

वीरशैवास्तु षड्भेदाः स्थलधर्मविभेदतः । भक्तादिव्यवहारेण प्रोच्यन्ते शास्त्रपारगैः ।।२२।।

शास्त्रं तु वीरशैवानां षड्विधं स्थलभेदतः । धर्मभेदसमायोगाद् अधिकारिविभेदतः ।।२३।।

**स्थलभेद आचारभेद जाण । आणि अंतर्बाह्य लिंगार्चन । यांमुळे मानिती शास्त्रप्रवीण । सहा भेद वीरशैवांचे ।।४२।। स्थल धर्माचरण अधिकार । या भेदांनी सहा प्रकार । वीरशैवांचे झाले थोर । ते 'षट्स्थल' म्हणविती ।।४३।। कराया शास्त्राचे अध्ययन । सांगती अनुबंधचतुष्टय जाण । अधिकारी संबंध विषय हे तीन । चौथे प्रयोजन जाणावे ।।४४।। ज्याची धर्मात निष्ठा अत्यंत । मुक्तीची इच्छा वसे मनात । तो वीरशैव या शास्त्रात । 'अधिकारी' जाणावा ।।४५।। शास्त्र 'प्रकाशक' असे पूर्ण । त्यामुळे 'प्रकाश्य' ज्ञान । हा प्रकाश्य-प्रकाशक जाण । असे 'संबंध' येथला ।।४६।। एकशे एक स्थलांचे ज्ञान । हाचि येथील 'विषय' महान । शिवजीवैक्यमुक्ती हे 'प्रयोजन' । जाणावे या ग्रंथाचे ।।४७।।**

आदौ भक्तस्थलं प्रोक्तं ततो माहेश्वरस्थलम् । प्रसादिस्थलमन्यत्तु प्राणलिंगिस्थलं ततः ।।२४।।
शरणस्थलमाख्यातं षष्ठमैक्यस्थलं मतम् ।

**हे षट्स्थल कोणते । ते ऐकावे सावध चित्ते । पहिले भक्तस्थल जाण ते । दुसरे स्थल माहेश्वर ।।४८।। तिसरे प्रसादिस्थल । चौथे प्राणलिंगिस्थल । पाचवे शरणस्थल । आणि ऐक्यस्थल सहावे ।।४९।। या सहा स्थलांतून । होई वीरशैवाचे उन्नयन । अंती ऐक्यस्थळी जाऊन । शिवरूप तो होतो ।।५०।।**

सांगितले सिद्धान्तात । हा प्रवास एकाच जन्मात । पूर्ण करितो शिवभक्त । म्हणूनि जन्म अखेरचा ।।५१।। श्रोतेहो वीरशैवदर्शनात । सांगितला भक्तिपथ । भक्तिमार्गानेच होतो मुक्त । जीव भवपाशातूनी ।।५२।। वीरशैवांची षट्स्थले महान । हे मुक्तीचे सहा सोपान । भक्ताचा आंतर-विकासक्रम पूर्ण । सूक्ष्मपणे विवरिती ।।५३।। वीरशैवशास्त्रानुसार । भक्तीचे सहा प्रकार । एकेका स्थलात एकेक स्थिर । भक्ती होते जाणा हो ।।५४।। शिवभक्ती एकचि असे । ती सहा अंगांतूनि विलसे । कोणते अंग कोण्या स्थली वसे । तेही आता सांगेन ।।५५।। श्रद्धाभक्ती निष्ठाभक्ती । अवधानभक्ती अनुभवभक्ती । आनंदभक्ती समरसभक्ती । अशी भक्ती षड्विध ।।५६।। शिव गुरू गुरुवाक्य यांवर । आणि धर्मग्रंथ-वचनांवर । ठेवणे दृढ विश्वास निर्धार-। पूर्वक ती 'श्रद्धाभक्ती' ।।५७।। भक्तस्थलातील भक्ताठायी । श्रद्धाभक्ती असे पाही । श्रद्धेनेच साध्य होई । लिंग-अंग-सामरस्य ।।५८।। निश्चयपूर्वक जी तिष्ठते । तीच 'निष्ठाभक्ती' असते । इष्टलिंगाविण न राहते । अन्य ठायी ती स्थिर ।।५९।। पाऊसथेंब स्वाती नक्षत्रात । पडे समुद्रातील शिंपल्यात । तो मोती होई तेजयुक्त । तो पुन्हा थेंब न होय ।।६०।। जळाचे होते हिम पूर्ण । ते वितळता पुन्हा जीवन । जळाचे

बाष्प होता जाण । ते पुन्हा जळरूप होतसे ।।६१।। परि जळापासूनि झाला मोती । तो पुन्हा जळ न होय निश्चिती । तैसी माहेश्वरस्थलात निष्ठाभक्ती । शिवाठायी अचल ।।६२।। जो प्रसादिस्थलातील भक्त । तो असे सावधचित्त । लिंगधारण प्रसादसेवन यांत । तो दक्ष सर्वकाळ ।।६३।। म्हणूनि त्याच्याठायी भक्ती । तिला नाव 'अवधानभक्ती' । प्राणलिंगिस्थलातील भक्ती । ती 'अनुभवभक्ती' असे ।।६४।। प्राणलिंगिस्थली भक्तास । दिसे अंतरंगी प्रकाश । येई अंतर्लिंग अनुभवास । म्हणून ती अनुभवभक्ती ।।६५।। साधकासी शरणस्थलात । आनंद होई अपरिमित । तो सदा निमग्न आत्मानंदात । त्याची 'आनंदभक्ती' असे ।।६६।। जल मिसळावे जलात । किंवा दूध मिळावे दुधात । तैसा साधक होई शिवात । समरस ऐक्यस्थलीचा ।।६७।। ध्येय ध्याता ध्यान । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । ह्या त्रिपुटी जाती सरून । ऐक्यस्थलात सर्वही ।।६८।। शिवात जीव होई समरस । म्हणूनि नाम या भक्तीस । 'समरसभक्ती' ऐसे विशेष । दिले वीरशैवाचार्यांनी ।।६९।। एकचि भक्तितत्त्व असे । ते षट्स्थलभेदाने विभक्त दिसे । षड्विध होऊनि विलसे । समवेत षट्स्थलांच्या ।।७०।। भक्तस्थली साधकाठायी । श्रद्धाभक्ती असे पाही । त्याचे विवेचन लवलाही । आता पुढे ऐकावे ।।७१।। ज्ञाननिष्ठ अगस्त्य मुनीस । रेणुकाचार्य करिती उपदेश । तोचि कथितो श्रोत्यांस । ऐका सादर होऊनी ।।७२।।

## अंगस्थलांतर्गत भक्तस्थल

भक्तस्थलं प्रवक्ष्यामि प्रथमं कलशोद्भव ।।२५।।

तदवान्तरभेदांश्च समाहितमनाः शृणु । शैवी भक्तिः समुत्पन्ना यस्यासौ भक्त उच्यते ।।२६।।

तस्यानुष्ठेयधर्माणामुक्तिर्भक्तस्थलं मतम् ।

**ऐक अगस्त्या सावचित्त । पहिले स्थल जाण भक्त । ते आणि त्याची समस्त । उपस्थलेही सांगतो ।।७३।। शिवाविषयी भक्ती पूर्ण । मनी ज्यांच्या झाली उत्पन्न । तेचि स्त्रीपुरुष भक्तिसंपन्न । शिवभक्त जाणावे ।।७४।। त्यांचे कैसे अनुष्ठान । कोणते करावे धर्माचरण । याचे करी जे प्रतिपादन । तेचि असे भक्तस्थल ।।७५।।**

अवान्तरस्थलान्यत्र प्राहुः पंचदशोत्तमाः ।।२७ ।।

पिण्डता पिण्डविज्ञानं संसारगुणहेयता । दीक्षा लिंगधृतिश्चैव विभूतेरपि धारणम् ।।२८ ।।

रुद्राक्षधारणं पश्चात् पंचाक्षरजपस्तथा । भक्तमार्गक्रिया चैव गुरोर्लिंगस्य चार्चनम् ।।२९ ।।

जंगमस्य तथा ह्येषां प्रसादस्वीकृतिस्तथा । अत्र दानत्रयं प्रोक्तं सोपाधि निरुपाधिकम् ।।३० ।।

सहजं चेति निर्दिष्टं समस्तागमपारगैः । एतानि शिवभक्तस्य कर्तव्यानि प्रयत्नतः ।।३१ ।।

**भक्तस्थलाची पंचदश । असती उपस्थले विशेष । ती ऐकावी सावकाश । एकाग्र चित्ते-करूनी ।।७६।। पिंडस्थल पिंडज्ञानस्थल । संसारहेयस्थल गुरुकारुण्यस्थल । लिंगधारणस्थल विभूतिधारणस्थल । रुद्राक्षधारणस्थल सातवे ।।७७।। पंचाक्षरीजपस्थल भक्तमार्गक्रियास्थल । उभयस्थल त्रिविधसंपत्तिस्थल । चतुर्विधसारायस्थल सोपाधिदानस्थल । निरुपाधिदानस्थल चौदावे ।।७८।। सहजदानस्थल पंधरावे । ऐसे पंधरा भेद जाणावे । या स्थली कथिले प्रयत्ने करावे । आचरण शिवभक्तांनी ।।७९।।**

**पिंडस्थल** - (१)

बहुजन्मकृतैः पुण्यैः प्रक्षीणे पापपंजरे । शुद्धान्तःकरणो देही पिण्डशब्देन गीयते ।।३२।।

शिवशक्तिसमुत्पन्ने प्रपंचेऽस्मिन् विशिष्यते । पुण्याधिकः क्षीणपापः शुद्धात्मा पिण्डनामकः ।।३३।।

**जीव घेई अनंत जन्म जाण । भ्रमे चौऱ्यांशी लक्ष योनींतून । वनस्पती पशू पक्षी होऊन । जीवसृष्टीतूनि फिरे ।।८०।। अंती येऊनि मनुष्यदेही । तेथे जन्मजन्मांतरे घेई । अनंत जन्मांतूनि पाही । करी पुण्यसंचय ।।८१।। निषिद्ध कर्मे त्यागून । विहित कर्मांचे करी आचरण । तेणे पातके नष्ट होऊन । अंतःकरण शुद्ध होई ।।८२।। ज्याचे मन अतिनिर्मल । जैसे गंगोत्रीचे स्फटिकजल । तोचि**

**असे निर्व्याज कोमल । जीव 'पिंड' नामक ।।८३।। सर्व योनींत मनुष्यजनन । ज्ञाते मानिती अंतिम जाण । मुक्तिसंभव या जन्मी म्हणून । मुक्तीचे हा महाद्वार ।।८४।। जगी जन्मलेला जीव । करीत जन्मोजन्मी पापक्षय । जेव्हा करी पुण्यसंचय । तेव्हा 'पिंड' होई तो ।।८५।। अन्य जे जीव साधारण । त्यापासूनि हा श्रेष्ठ विलक्षण । शरीर वाणी आणि मन । ही त्रिकरणे शुद्ध त्याची ।।८६।।**

एक एव शिवः साक्षाच्चिदानन्दमयो विभुः । निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपंचकः ।।३४।।

अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामकः । देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थितः ।।३५।।

मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थितः ।

**परशिव सर्व भेदरहित । एकमेव सर्वव्यापी प्रपंचरहित । निराकार सत्त्वादिगुणविरहित । असे सच्चिदानंदस्वरूप ।।८७।। अनादी अविद्यासंबंधाने । शिवांश हा जीव होऊनि भ्रमे । पशु-पक्षी-मनुष्य-रूपे जन्मे । चौऱ्यांशी लक्ष योनींतूनी ।।८८।। परि त्याच्या हृदयी स्थिर । मायाशक्तियुक्त महेश्वर । जीवाचे सर्व व्यवहार । प्रेरी आत राहूनी ।।८९।।**

चन्द्रकान्ते यथा तोयं सूर्यकान्ते यथानलः ।।३६।।

बीजे यथांकुरः सिद्धस्तथात्मनि शिवः स्थितः । आत्मत्वमीश्वरत्वं च ब्रह्मण्येकत्र कल्पितम् ।।३७।।

बिम्बत्वं प्रतिबिम्बत्वं यथा पूषणि कल्पितम्  । गुणत्रयविभेदेन  परतत्त्वे  चिदात्मनि ।।३८।।

भोक्तृत्वं चैव भोज्यत्वं प्रेरकत्वं च कल्पितम् ।

**पाहा चंद्रकांत मण्यात । जल जैसे असे सुप्त । किंवा अग्नी सूर्यकांत-। मण्यामध्ये असे तो ।।९०।। धान्यबीजात अंकुर । स्वभावत: असतो स्थिर । तैसा सर्वव्यापी शंकर । जीवांहृदयी राहतो ।।९१।। हाती घेऊनि दर्पण । पाहता सूर्य त्यातून । सूर्यबिंब दिसे जाण । सुस्पष्ट दर्पणात ।।९२।। हाती नसता दर्पण । सूर्यात नाही बिंबपण । तैसेचि प्रतिबिंबपण । तेही नसे प्रत्यक्ष ।।९३।। बिंबत्व-प्रतिबिंबत्व पाही । हे कल्पित असे सूर्याठायी । तैसे ईश्वरत्व-जीवत्व हेही । परब्रह्माठायी कल्पित ।।९४।। शिवतत्त्व एकचि असे । ते त्रिविध झाले शक्तिविलासे । जीव जगत् ईश्वर ऐसे । भासे तीन रूपांत ।।९५।। जीवपण भोक्तृत्व । जगत् हे भोज्यत्व । ईश्वर हे प्रेरकत्व । त्रिगुणभेदे कल्पिलेले ।।९६।।**

गुणत्रयात्मिका शक्तिर्ब्रह्मनिष्ठा सनातनी ।।३९।।

तद्वैषम्यात् समुत्पन्ना तस्मिन् वस्तुत्रयाभिधा ।

**चिद्रूप परशिवब्रह्मात । त्रिगुणात्मक शक्ती शाश्वत । असे अविनाभावसंबंधे युक्त । तिला म्हणती विमर्शशक्ती ।।९७।। सत्त्व रज तम तीन । हे तिच्याठायी वसती गुण । त्यांच्या वैषम्याने जाण । होते**

**त्रिधा शिवतत्त्व ।।९८।। पाहा मयुरीच्या अंड्यात । पिलाचे अवयव पिसारा सुप्त । जैसा रसस्वरूपात । असतो जन्माआधीच ।।९९।। किंवा वृक्षाच्या बीजात । फांद्या पर्ण फुले समस्त । असती सुप्तावस्थेत । वृक्षजन्माआधीच ।।१००।। तैसेचि हे समग्र विश्व । उत्पत्तीआधी सावयव । शिवाच्या विमर्शशक्तीत सर्व । असते सुप्त रूपात ।।१०१।। शक्तीच्या या अवस्थेस । म्हणती अविभाग-परामर्श । या अवस्थेत नसतो दृश्य । भव्य ब्रह्मांडपसारा ।।१०२।। करावी ब्रह्मांडाची रचना । ऐसी शिवाठायी कामना । जागृत होता शक्ती जाणा । उठे क्षुब्ध होऊनी ।।१०३।। तिच्याठायीचे सत्त्व-रज-तमोगुण । या गुणांचे विघडे प्रमाण । मग त्यातूनि होई निर्माण । वैचित्र्यपूर्ण विश्व हे ।।१०४।। शक्तीच्या या क्षुब्ध अवस्थेस । म्हणती विभाग-परामर्श । तिची अवस्था अविभाग-परामर्श । असे विश्वजन्मा-आधी ।।१०५।। तिच्याठायीचे सत्त्व-रज-तमोगुण । हे होती विषम त्रिगुण । तेणे जीव जगत् ईश्वर ही तीन । रूपे दिसती शिवाची ।।१०६।।**

किंचित्सत्त्वरजोरूपं भोक्तृसंज्ञकमुच्यते ।।४०।।

अत्यन्ततामसोपाधिर्भोज्यमित्यभिधीयते । परतत्त्वमयोपाधिर्ब्रह्मचैतन्यमीश्वरः ।।४१।।

भोक्ता भोज्यं प्रेरयिता वस्तुत्रयमिदं स्मृतम् । अखण्डे ब्रह्मचैतन्ये कल्पितं गुणभेदतः ।।४२।।

**किंचित् सत्त्व अधिक रजोगुण । या गुणांनी मिश्रित जे चैतन्य । तो जीव त्यास 'भोक्ता' अभिधान । ऐसे आहे शास्त्रात ।।१०७।। अत्यंत तमोगुण उपाधियुक्त । जे चैतन्य तेचि हे जगत् समस्त । रसरूपादी विषयांसहित । त्यास 'भोज्य' हे नाव ।।१०८।। या दोहोंपरिस उत्कृष्ट अत्यंत । परतत्त्व शुद्ध सत्त्वगुणयुक्त । नाम असे त्या चैतन्याप्रत । 'प्रेरक' आणि 'ईश्वर' ।।१०९।। अखंड एक ब्रह्मचैतन्य । परि त्रिगुणभेदाने जाण । भोक्ता भोज्य प्रेरयिता तीन । असे त्रिविध कल्पिले ।।११०।।**

अत्र प्रेरयिता शम्भुः शुद्धोपाधिर्महेश्वरः । संमिश्रोपाधयः सर्वे भोक्तारः पशवः स्मृताः ।।४३।।

भोज्यमव्यक्तमित्युक्तं शुद्धतामसरूपकम् । सर्वज्ञः प्रेरकः शम्भुः किंचिज्ज्ञो जीव उच्यते ।।४४।।

अत्यन्तगूढचैतन्यं जडमव्यक्तमुच्यते ।

**या तिन्ही पदार्थांत देख । शुद्ध सत्त्वगुणे युक्त प्रेरक । जे तत्त्व सुखकारक । त्यासी म्हणती महेश्वर ।।१११।। मिश्र उपाधियुक्त जीव । जे भोगिती सुखदुःखे सर्व । ते भोक्ते त्यांना नाव । पशू ऐसे असे ।।११२।। दृष्टीस जे जे दिसे उघड । ज्या विश्वासी म्हणती जड । तेचि अव्यक्त अत्यंत गूढ । असे चैतन्य जाणावे ।।११३।। याचि अव्यक्त प्रकृतीस । माया म्हणती ज्ञानी पुरुष । प्रेरयिता-जीव-भोज्य या भेदांस । कारण शक्ती शिवाची ।।११४।।**

उपाधिः पुनराख्यातः शुद्धाशुद्धविभेदतः ।।४५।।

शुद्धोपाधिः परा माया स्वाश्रयाऽमोहकारिणी । अशुद्धोपाधिरप्येवमविद्याश्रयमोहिनी ।।४६।।

अविद्याशक्तिभेदेन जीवा बहुविधाः स्मृताः ।

**माया उपाधी असे द्विविध । शुद्ध आणिक अशुद्ध । त्यांत जी विशुद्ध । तीच श्रेष्ठ माया असे ।।११५।। 'ऊर्ध्वमाया' नाव विशेष । ती कधी न मोही आश्रयास । परशिवब्रह्म महेश । हाचि तिचा आश्रय ।।११६।। अशुद्ध उपाधीस माया नाव । ती मोहात पाडिते सर्व जीव । जीवात्मे हाचि तिचा आश्रय । तिला म्हणती 'अधोमाया' ।।११७।। जिला अविद्या म्हणती ज्ञानी । तीच ही अधोमाया मोहिनी । जीवा भ्रमविते अनंत जन्मांतूनी । पाडूनि मोहात आपुल्या ।।११८।। अविद्येच्या अंशभेदा-मुळे । असंख्य जीव जन्मासी आले । आणि तिच्याच करणीमुळे । भ्रमत बैसले संसारी ।।११९।।**

मायाशक्तिवशादीशो नानामूर्तिधरः प्रभुः ।।४७।।

सर्वज्ञः सर्वकर्ता च नित्यमुक्तो महेश्वरः । किंचित्कर्ता च किंचिज्ज्ञो बद्धोऽनादिशरीरवान् ।।४८।।

**शुद्धमायायुक्त महेश्वर । सद्योजात वामदेव अघोर । तत्पुरुष ईशान आदी थोर । रूपे करितो धारण ।।१२०।। अनेक अवतार घेऊन । करी जीवमात्रांचे कल्याण । त्यांच्या बुद्धीलागून । प्रेरयिता**

**ठरे तो ।।१२१।। तो सर्वज्ञ सर्वकर्ता । नित्यमुक्त सर्वनियंता । ब्रह्मांडांचा शासनकर्ता । ब्रह्मांडाचा अधिपती ।।१२२।। बद्ध जीव शरीरधारण । करी अनादी कालापासून । झाला अल्पकर्ता अल्पज्ञ जाण । संसारभोग भोगीत ।।१२३।।**

अविद्यामोहिता जीवा ब्रह्मैक्यज्ञानवर्जिताः । परिभ्रमन्ति संसारे निजकर्मानुसारतः ।।४९।।

देवतिर्यङ्मनुष्यादिनानायोनिविभेदतः । चक्रनेमिक्रमेणैव भ्रमन्ति हि शरीरिणः ।।५०।।

जात्यायुर्भोगवैषम्यकारणं कर्म केवलम् ।

**जीव अविद्येमुळे मोहित । झाले शिवैक्यज्ञानरहित । भ्रमती जन्मजन्मान्तरात । आपुल्या कर्मानुसार ।।१२४।। कधी देव पशू पक्षिगण । कधी मनुष्ययोनीत जनन । चौऱ्यांशी लक्ष योनींतून । भ्रमत राहती पुनःपुन्हा ।।१२५।। जैसे भ्रमे गाडीचे चाक । सवे आऱ्याही भ्रमती अनेक । तैसे देहधारी जीव असंख्य । भ्रमती संसारचक्रासवे ।।१२६।। कोणत्या जातीत व्हावे जनन । किती असावे आयुष्यमान । कोणते भोग नशिबी येऊन । ते भोगावे लागतील ।।१२७।। कारण असे या वैषम्याप्रत । केवळ त्याचे पूर्वकर्मसंचित । ते भोगताना कर्म करी सतत । पुढील जन्म घेण्यासी ।।१२८।। एकातून उगवे दुसरे । दुसऱ्यातून पुन्हा तिसरे । जन्मे घेऊनि कर्मे भोगूनि न सरे । जन्मचक्र जीवाचे ।।१२९।।**

एतेषां देहिनां साक्षी प्रेरकः परमेश्वरः ।।५१।।

एतेषां भ्रमतां नित्यं कर्मयन्त्रनियन्त्रणे । देहिनां प्रेरकः शम्भुर्हितमार्गोपदेशकः ।।५२।।

पुनरावृत्तिरहितमोक्षमार्गोपदेशकः ।

**संसारी भ्रमती जीव असंख्य । त्यांच्या कर्मयंत्राचा नियंत्रक । आणिक कर्मांचा प्रेरक । साक्षिभूत परमेश्वर ।।१३०।। सर्व प्राणिमात्रांचा प्रेरक । शंभू असे सुखकारक । आत्मकल्याण मार्गोपदेशक । असे मुक्तिमार्गाचा ।।१३१।।**

स्वकर्मपरिपाकेन प्रक्षीणमलवासनः ।।५३।।

शिवप्रसादाज्जीवोऽयं जायते शुद्धमानसः । शुद्धान्तःकरणे जीवे शुद्धकर्मविपाकतः ।।५४।।

जायते शिवकारुण्यात् प्रस्फुटा भक्तिरैश्वरी । जन्तुरन्त्यशरीरोऽसौ पिण्डशब्दाभिधेयकः ।।५५।।

**पक्व होता जीवाचे कर्म पूर्ण । मल वासना होती क्षीण । शिवानुग्रहे अंत:करण । होई अति परिशुद्ध ।।१३२।। शुद्धकर्माच्या पक्वतेमुळे । जीवाचे अंत:करण शुद्ध झाले । मग त्यावरी कृपाघन वर्षले । शिवकृपेचे अनिवार ।।१३३।। मनी दाटूनि शिवभक्ती । पावलांना मिळे गती । शिव-जीवैक्याच्या दिशेने पडती । जीवाची त्या पावले ।।१३४।। त्याचा विद्यमान जन्म । मग ठरतो जन्म**

अंतिम । ऐशा परिशुद्ध जीवाचे नाम । 'पिंड' ऐसे जाणावे ।।१३५।।

## पिंडज्ञानस्थल - (२)

शरीरात्मविवेकेन पिण्डज्ञानी स कथ्यते । शरीरमेव चार्वाकैरात्मेति परिकीर्त्यते ।।५६।।

शरीर आणि आत्मा भिन्न । हे दृढ होई हृदयी ज्ञान । त्या पिंडस्थली साधकालागून । पिंडज्ञानी नाव असे ।।१३६।। स्वत:स मानूनि शरीर । मनुष्य वागतो जन्मभर । देहाच्या आत वस्तू थोर । असते आत्मा नावाची ।।१३७।। हे त्याच्या नसते गावी । गातो देहाचीच थोरवी । आणि सर्व लाड पुरवी । देहाचेचि जन्मभर ।।१३८।। जन्म झाल्यापासून । देहाला बसतो कवटाळून । शरीर म्हणजेच आपण । ऐसे दृढ मानितो ।।१३९।। मग शरीर आणि इंद्रियांसोबत । संसारदु:खात बसे पिचत । बैल जसा फिरे सतत । घाण्याभोवती अटळपणे ।।१४०।। परि जो पिंडस्थली साधक । त्याच्या हृदयी जागे विवेक । नसे शरीर आणि आत्मा एक । हे उमजे म्हणूनि पिंडज्ञानी ।।१४१।। जे चार्वाक-सिद्धान्ती । ते देहासीच आत्मा मानिती । देहापलीकडे भिन्न जगती । वस्तू म्हणती नाहीच ।।१४२।। नाही स्वर्ग नाही नरक । कोठे कसला विष्णु-शिवलोक? । मृत्यू झाल्यावर सर्वएक । सरते त्या माणसाचे ।।१४३।। खावे प्यावे करावी मौज । त्यासाठी काढावे कर्ज । ते फेडण्याची तजवीज । करू नये काहीच ।।१४४।।

**होता शरीराची राख । कोण म्हणेल कर्ज टाक? । म्हणूनि सर्वांनी करावा देख । ऋण काढून साजरा सण ।।१४५।। चार्वाकाची ही तत्त्व-फोड । सामान्यांसी लागे गोड । शरीराचे पुरविणे कोड । सर्वांनाच प्रिय असे ।।१४६।। प्रत्यक्ष प्रमाण एकमेव । डोळ्यांसी जे दिसते विश्व । तेचि खरे अन्य सर्व । खोटे मानिती चार्वाक ।।१४७।। मनुष्याचा देह मांसल । चार महाभूतांचा संघात केवळ । पृथ्वी आप तेज वायू सकळ । एकत्र येऊनि घडे देह ।।१४८।। त्यात दिसते जी चेतनता । ती एकत्रिकरणाचा परिणाम तत्त्वता । जैसे काथ चुना पान कालवता । लाल होई संपूर्ण ।।१४९।। विघटन होता चार भूतांत । त्यांचा संयोग होतो नष्ट । मग तो देह होतो मृत । मेला म्हणती लोक त्यासी ।।१५०।। हेचि चार्वाक तत्त्वज्ञान । सामान्यांस होई मान्य । काही तत्त्वज्ञही अन्य । वस्तूंसी आत्मा मानिती ।।१५१।।**

इन्द्रियाणां तथात्मत्वमपरैः परिभाष्यते । बुद्धितत्त्वगतैर्बौद्धैर्बुद्धिरात्मेति गीयते ।।५७।।

नेन्द्रियाणां न देहस्य न बुद्धेरात्मता भवेत् । अहंप्रत्ययवेद्यत्वाद् अनुभूतस्मृतेरपि ।।५८।।

**इंद्रियांचा संघात देह । म्हणूनि तोचि आत्मा होय । ज्ञान-कर्म ही दशेन्द्रिये । आत्मा मानिती काही जण ।।१५२।। शरीरात बुद्धी प्रमुख । म्हणून तीच आत्मा देख । ऐसे मानिती तार्किक । बौद्धमतानुयायी ते ।।१५३।। घेता विषयाचे ज्ञान । अथवा करिता आठवण । या दोही ठायी अहम्-।**

**प्रत्यये आत्मा जाणवे ।।१५४।। इंद्रिये बुद्धी शरीर । ही सर्व माझी म्हणे नर । जे 'माझे' असे साचार । ते 'मी' होऊ न शके ।।१५५।। ज्याच्याठायी वसे मीपण । तोचि असे आत्मा चेतन । शरीर-इंद्रिये-बुद्धीपासून । तो वेगळा सर्वस्वी ।।१५६।।**

शरीरेन्द्रियबुद्धिभ्यो व्यतिरिक्तः सनातनः । आत्मस्थितिविवेकी यः पिण्डज्ञानी स कथ्यते ।।५९।।

नश्वराणि शरीराणि नानारूपाणि कर्मणा । आश्रितो नित्य एवासाविति जन्तोर्विवेकिता ।।६०।।

शरीरात् पृथगात्मानमात्मभ्यः पृथगीश्वरम् । प्रेरकं यो विजानाति पिण्डज्ञानीति कथ्यते ।।६१।।

**शरीर-इंद्रिये-बुद्धीहून । भिन्न असा जो सनातन । त्या आत्मस्वरूपाचे ज्ञान । ज्याला असे तो पिंडज्ञानी ।।१५७।। कर्मानुसार जीवालागून । नाशिवंत शरीरे भिन्न भिन्न । करावी लागती धारण । त्यात आत्मा वेगळा ।।१५८।। देह परिवर्तनीय अशाश्वत । त्यात नांदे तो आत्मा नित्य । अमर असा विवेक सत्य । यास म्हणावे पिंडज्ञान ।।१५९।। शरीराहूनि आत्मा भिन्न । आत्म्याहूनि ईश्वर भिन्न । तो आत्म्याचा प्रेरक हे ज्ञान । ज्यास असे तो पिंडज्ञानी ।।१६०।।**

**संसारहेयस्थल** – (३)

निरस्तहृत्कलंकस्य नित्यानित्यविवेकिनः । संसारहेयताबुद्धिर्जायते वासनाबलात् ।।६२।।

ज्याच्या हृदयीचा मळ । जाऊनि ते झाले निर्मळ । नित्यानित्यवस्तुविवेक प्रबळ । ज्याच्याठायी नांदतो ।।१६१।। शुभ वासनेच्या बळे । त्याची परमार्थी बुद्धी वळे । संसाराचे व्यर्थपण कळे । त्यास वाटे त्याज्य तो ।।१६२।। कोणती वस्तू आहे स्थिर । आणि कोणती असे अस्थिर । हाचि नित्यानित्य-वस्तुविचार । असे जाण मुनिवरा ।।१६३।। अनेक जन्मांचे पुण्यसंचित । त्यामुळे विवेक दृढावे जीवात । आसक्ती न राहे संसारात । हेचि संसारहेयस्थल ।।१६४।।

ऐहिके क्षणिके सौख्ये पुत्रदारादिसंभवे । क्षयित्वादियुते स्वर्गे कस्य वांच्छा विवेकिनः ।।६३।।

इहलोकी स्त्रीपुत्रादिंमुळे । जीवास जे सुख मिळे । ते क्षणभंगुर सगळे । येई अनुभवासी ।।१६५।। क्षितिजावरी टेकले आकाश । ते कधीही न लागे हातास । तैसा संसारी सुखाभास । जीवास नित्य चकवितो ।।१६६।। शब्दस्पर्शादी पंचविषयी । जीव सुखाचा शोध घेई । ते मिळाले वाटताक्षणी जाई । निसटून हातातूनी ।।१६७।। आपुल्या शरीराची सावली । कवळाया धाव घेतली । ती पुढे पुढेच गेली । हाती न लागे कधीही ।।१६८।। सुखाचा मुखवटा घालून । दुःखच ये पुढे धावून । गेले जीव कळवळून । सुखरूपी दुःख भोगता ।।१६९।। म्हणूनि जो विवेकी पुरुष । तो न लागे संसार-गळास । स्वर्गसुखाचेही त्यास । नसे काही अप्रूप ।।१७०।। पुण्य असेतो स्वर्गभोग । नंतर मृत्युलोकी येणे

**भाग । तेणे स्वर्गसुखी अनुराग । नसे विवेकी जीवासी ।।१७१।। या सर्व विचाराने । त्यास संसारसुख वाटे उणे । संसाराविषयी त्याने । धरिलेली हेयबुद्धी ।।१७२।।**

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च । जन्तुर्मरणजन्मभ्यां परिभ्रमति चक्रवत् ।।६४।।

**जो जन्मास आला जीव । त्यावरी मृत्यूचा पडे घाव । राजा-रंक असो वा पशू-मानव । जाणे भाग यमाघरी ।।१७३।। तो दडला सप्तपाताळात । किंवा बैसला सैन्याच्या व्यूहात । त्याच्या खांद्यावरी हात । पडे मृत्युदूताचा ।।१७४।। मृतासी दिधले संजीवन । त्या ऋषींसही आले मरण । सुटला नाही हातून । जगी कोणी मृत्यूच्या ।।१७५।। पहिलावहिला घेता श्वास । त्याचा सुरू होतो मृत्युप्रवास । वय वाढे तसतसे आयुष्य । उणे होत जातसे ।।१७६।। सूर्य प्रकाशे नभोमंडळ । अंती नशिबी अस्ताचल । फूल गंधित उमले कोमल । अंती जाई कोमेजूनी ।।१७७।। तैसा जन्मे संसारात । त्याला मृत्यू येई निश्चित । मरत्यासी पुन्हा जीवित । लाभे पुनर्जन्माने ।।१७८।। जन्ममृत्यूच्या फेऱ्यात । जीव भ्रमती अखंडित । चक्र भ्रमे हे अविरत । अनादिकाळापासूनी ।।१७९।।**

मत्स्यकूर्मवराहांगैर्नृसिंहमनुजादिभिः । जातेन निधनं प्राप्तं विष्णुनापि महात्मना ।।६५।।

भूत्वा कर्मवशाज्जन्तुर्ब्राह्मणादिषु जातिषु । तापत्रयमहावह्निसन्तापाद् दह्यते भृशम् ।।६६।।

**मत्स्य कूर्म वराह । नृसिंह आणि मानव । ऐसे अनेक भव । घ्यावे लागले विष्णूसी ।।१८०।। दुष्टजन संहाराया । आणि भक्तासी रक्षाया । भूवरी अवतार घेऊनिया । विष्णू अंती निमाला ।।१८१।। देवासही न चुके मरण । माणूस कोण गेला लागून? । इच्छा असो नसो मरण । स्वीकारावेच लागते ।।१८२।।**

कर्ममूलेन दुःखेन पीड्यमानस्य देहिनः । आध्यात्मिकादिना नित्यं कुत्र विश्रान्तिरिष्यते ।।६७।।

आध्यात्मिकं तु प्रथमं द्वितीयं चाधिभौतिकम् । आधिदैविकमन्यच्च दुःखत्रयमिदं स्मृतम् ।।६८।।

**गळ्यात बांधूनि दोर । फरफटत नेती जनावर । त्याचा आक्रोश कानावर । जाईचना कोणाच्या ।।१८३।। तैसा जीवात्मा कर्माधीन । जिकडे नेईल कर्म जाण । जाणे लागे त्याच्यामागून । भोग भोगाया निमूटपणे ।।१८४।। कोणी कोठे असो जन्मला । तरी भाजती त्रिताप ज्वाला । त्यांच्यापासूनि सुटला । नाही कोणता जीवात्मा ।।१८५।। या दुःखांनी जे गांजती । त्यांना मिळेनाच विश्रांती । ते केवळ तळमळती । त्रितापरूपी अग्नीत ।।१८६।। हे त्रिताप कोणते ऐक । पहिले दुःख आध्यात्मिक । दुसरे ते आधिभौतिक । तिसरे आधिदैविक असे ।।१८७।।**

आध्यात्मिकं द्विधा प्रोक्तं बाह्याभ्यन्तरभेदतः । वातपित्तादिजं दुःखं बाह्यमाध्यात्मिकं मतम् ।।६९।।

रागद्वेषादिसम्पन्नमान्तरं परिकीर्त्यते । आधिभौतिकमेतद्धि दुःखं राजादिभूतजम् ।।७०।।
आधिदैविकमाख्यातं ग्रहयक्षादिसम्भवम् ।
दुःखैरेतैरुपेतस्य कर्मबद्धस्य देहिनः । स्वर्गे वा यदि वा भूमौ सुखलेशो न विद्यते ।।७१।।

**बाह्य आणि आंतर । आध्यात्मिक दुःखाचे हे प्रकार । वातपित्तादिंमुळे होई ज्वर । त्यासम दुःखे बाह्य ती ।।१८८।। रागद्वेषादिकांमुळे । जेव्हा हृदय सारखे जळे । त्या दुःखासी नाव मिळे । आंतर आध्यात्मिक दुःख ।।१८९।। राजा आणि लोकांकडून । जी दुःखे होती उत्पन्न । ती आधिभौतिक जाण । इतरांमुळे होणारी ।।१९०।। भूत-प्रेत-ग्रह-यक्षापासून । जो होई त्रास दारुण । नाव असे त्या दुःखालागून । आधिदैविक जाण ते ।।१९१।। या त्रितापांनी जो पीडित । तो असो स्वर्गी वा मृत्युलोकात । त्यासी सुख न मिळे किंचित । ही रेघ दगडावरली ।।१९२।।**

तटित्सु वीचिमालासु प्रदीपस्य प्रभासु च । सम्पत्सु कर्ममूलासु कस्य वा स्थिरतामतिः ।।७२।।

**वीज मेघमालेतील । तिचे तेज क्षणकाल । तरंग जळावरील । क्षणभंगुर असाच ।।१९३।। दिव्याची उजळे ज्योत । ती प्रतिक्षणी जाई सरत । तैसीच सर्व कर्मार्जित । संपत्तीही अस्थिर ।।१९४।। चक्रवर्तींनी पराक्रमाने । जी संपादिली सिंहासने । ती काळप्रभावाने । गेली नष्ट होऊनी ।।१९५।।**

**धनवंतांची संपत्ती । जिच्यामुळे उतले मातले किती । ती स्थिर कोठे जगती । राहिली ते पाहावे ।।१९६।। जेथे झडले किती मुजरे । नत झाली कितीक शिरे । तेथे वाहते भयाण वारे । भग्न अवशेषांतूनी ।।१९७।। सर्व ब्रह्मांडांचा नायक । तो खरा जगदात्मा विश्वचालक । परि तुकडा बळकावून मी मालक । म्हणतो क्षुद्र माणूस ।।१९८।। मृत्यूचे येता निमंत्रण । जावे लागते सर्व सोडून । सुतळीचा तोडाही घेऊन । जाणे शक्य नसेचि ।।१९९।। ऐश्वर्यादी वस्तू अस्थिर । हे जाणती विवेकी नर । तैसेचि हे चंचल शरीर । ऐसे भान राखिती ।।२००।।**

मलकोशे शरीरेऽस्मिन् महादुःखविवर्धने । तडिदंकुरसंकाशे को वा रुच्येत पण्डितः ।।७३।।

नित्यानन्दचिदाकारमात्मतत्त्वं विहाय कः । विवेकी रमते देहे नश्वरे दुःखभाजने ।।७४।।

**जे मलमूत्राचे कोठार । विद्युल्लतेसम चंचल अस्थिर । दुःखदायक हे शरीर । क्लेश अनेक भोगविते ।।२०१।। अशा देहाविषयी प्रेम जाण । वाटायचे काय कारण? । म्हणूनि जे विवेकी जन । ते त्यास महत्त्व नेदिती ।।२०२।। सच्चिदानंदरूप चैतन्य जाण । जे प्रकाशते नित्य हृदयातून । त्या तत्त्वासी त्यागूनि कोण । प्रेम करील देहावरी? ।।२०३।।**

विवेकी शुद्धहृदयो निश्चितात्मसुखोदयः । दुःखहेतौ शरीरेऽस्मिन् कलत्रे च सुतेषु च ।।७५।।

सुहृत्सु बन्धुवर्गेषु धनेषु कुलपद्धतौ । अनित्यबुद्ध्या सर्वत्र वैराग्यं परमश्नुते ।।७६।।

**ज्याचे हृदय निष्पाप । ज्यासी जाणवे आत्मरूप । तो उदासीन स्त्री-पुत्रात खूप । राहे विवेकी पुरुष ।।२०४।। शरीर स्त्री पुत्र कलत्र । हे दुःखाचे मूळमात्र । जाणूनि तो अणुमात्र । त्यात लिंपेनाच कधी ।।२०५।। आप्त मित्र परिवार । द्रव्य आणि कुलाचार । हे जाणूनि क्षणभंगुर । करी धारण वैराग्य ।।२०६।।**

विवेकिनो विरक्तस्य विषयेष्वात्मरागिणः । संसारदुःखविच्छेदहेतौ बुद्धिः प्रवर्तते ।।७७।।

नित्यानित्यविवेकिनः सुकृतिनः शुद्धाशयस्यात्मनो
ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्रमुख्यविभवेष्वस्थायितां पश्यतः ।
नित्यानन्दपदे निराकृतजगत्संसारदुःखोदये
साम्बे चन्द्रशिरोमणौ समुदयेद्भक्तिर्भवध्वंसिनी ।।७८।।

**जो असे विवेकी मुळात । तो निरिच्छ विषयसुखात । सदा रमे आत्मरूपात । अंतर्मुख होऊनी ।।२०७।। व्हावा संसारदुःखांचा नाश । या विचारे भरे मानस । त्याचा सुरू होई प्रवास । अखेरच्या जन्माकडे ।।२०८।। नित्य-अनित्याचा करी विचार । निष्पाप, सत्कर्मी अतितत्पर । त्यासी**

**ऐश्वर्यही क्षणभंगुर । वाटे ब्रह्मादिकांचे ।।२०९।। जो नित्यानंदाचे मूलस्थान । करितो संसारदुःखे हरण । नित्य आनंदरूप करी धारण । मस्तकी शुभ्र चंद्र जो ।।२१०।। त्या शिवाविषयी भक्ती पूर्ण । त्याच्या ह्रदयी होई उत्पन्न । तो संसारासी हेय मानून । जाई पुढील स्थलात ।।२११।। असो श्रोतेहो प्रसंग पुढील । श्रवण करावा मने कोमल । तुमच्याही ह्रदयी उजळेल । मुक्तिप्रद शिवभक्ती ।।२१२।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।२१३।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । पंचमोऽध्याय पूर्ण हा ।।२१४।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतभक्तस्थले पिंडपिंडज्ञानसंसारहेयस्थलप्रसंगो नाम पंचमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय सहावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु पंचाक्षर शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः नीललोहिताय । शूलपाणये नमः शंकराय । विष्णुवल्लभाय नमः शिपिविष्टाय । अंबिकानाथाय नमः खट्वांगिने ।।१।। शिवा तुझ्या इच्छेवाचून । तृणाचेही न हाले पान । माझे हे ग्रंथलेखन । तुझ्या कृपेने चाललेले ।।२।। बालकाचा धरूनि हात । अक्षरे लिहवितो पंडित । त्याच अनुभवे मी कृतार्थ । जहालो लेखन करिताना ।।३।। श्रोतेहो भक्तस्थलातील । पिंड पिंडज्ञानस्थल । आणि संसारहेयस्थल । यांचे निरूपण ऐकिले ।।४।। भक्तस्थलातील गुरुकारुण्यस्थल । आणि लिंगधारणस्थल । अगस्तीस आता निरूपतील । जगद्गुरू रेणुकाचार्य ।।५।। गुरू लिंग जंगम । प्रसाद पादोदक भस्म । रुद्राक्ष मंत्र यांवरी परम । होईल विवरण यापुढे ।।६।। हे अष्टविषय म्हणाल कोण । ते वीरशैवांचे अष्टावरण । त्यावरी स्वतंत्र विवेचन । केले अन्य ग्रंथांत ।।७।। अष्टावरण म्हणजे काय । त्याचाही असावा परिचय । म्हणूनि कथितो श्रोत्यांस्तव । आता संक्षिप्त रूपाने ।।८।। झाकणे आणि घालणे कुंपण । हे 'आवरण' शब्दाचे अर्थ दोन । वस्त्रे करूनि परिधान । मनुष्य झाकतो शरीर ।।९।। थंडीवाऱ्यापासूनि स्वभावे ।

आपुल्या शरीरासी रक्षावे । यास्तव घालितो जुने नवे । कपडे माणूस अंगावरी ।।१०।। कुंपण घालूनि शेतास । रक्षितो शेतकरी पिकास । हे नित्य येई अनुभवास । अवतीभोवती पाहता ।।११।। तैसीच आवरणे अष्ट । ज्या असती प्रवृत्ती अनिष्ट । त्यापासूनि शिवाचारनिष्ठ । भक्तांचे करिती रक्षण ।।१२।। काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह हे विकार । भक्तासी ग्रासून छळती फार । धर्माचरण करिताना ।।१३।। अन्यही दुष्ट मनोवृत्ती । शिवभक्ताचा अंत पाहती । त्या वृत्तींपासूनि वाचविती । अष्ट आवरणे भक्ताला ।।१४।। योद्धा उतरे रणांगणात । अंगावरी घालूनि चिलखत । मग झेलतो शस्त्राघात । सहजपणे शत्रूंचे ।।१५।। तैसेच अरिष्टांपासून । शिवभक्तांचे करिती रक्षण । ही आठ आवरणे म्हणून । त्यांस म्हणती रक्षाकवच ।।१६।। 'साधकाची अंगे' ऐसे । अष्टावरणासी नाव असे । शरीरव्यापार चालती जैसे । साहाय्याने अंगांच्या ।।१७।। 'अंग' म्हणजे अवयव । हस्त-पाद-नेत्रादी सर्व । त्यांच्याद्वारेच करितो जीव । सर्व व्यवहार आपुला ।।१८।। तैसे साधकाच्या परमार्थ-। व्यवहारात होती साहाय्यभूत । परमार्थ चाले सुरळीत । म्हणूनि अंगे ही साधकाची ।।१९।। गुरु-लिंगजंगमादी अष्ट । जी आधी उल्लेखिली स्पष्ट । तीच अष्टावरणे इष्ट । असती शिवभक्तासी ।।२०।। गुरू लिंग जंगम जाण । ही पूजनीय आवरणे तीन । विभूती रुद्राक्ष मंत्र पूर्ण । ही पूजेची साधने ।।२१।।

पादोदक प्रसाद दोन । ही पूजेची फळे पूर्ण । ऐसे हे अष्टावरण । ध्यानी धरावे सुस्पष्ट ।।२२।। देहधारी गुरू जाण । तो जाणा स्थूल आवरण । त्याने उपदेशिले जे ज्ञान । ते सूक्ष्म आवरण जाणावे ।।२३।। देहावरील इष्टलिंग । ते स्थूल, परि प्राणलिंग । आणि अंतरातील भावलिंग । हे सूक्ष्म आवरण ।।२४।। शिवयोगी जंगम जाण । हे असे स्थूल आवरण । त्याने उपदेशिले जे तत्त्वज्ञान । ते सूक्ष्म आवरण जाणावे ।।२५।। शरीरावरील विभूती । ती स्थूल, परंतु चित्ती । शिवचिंतनी अखंड वृत्ती । ते सूक्ष्म आवरण ।।२६।। रुद्राक्ष रुळे देहावरी । ते स्थूल, परि सर्व जीवमात्री । समभाव पाहणे नेत्री । हे सूक्ष्म रुद्राक्षधारण ।।२७।। जपणे पंचाक्षर मंत्र । हे स्थूल, परि अंतरात पवित्र । शिवजीवैक्य ज्ञान हे मात्र । असे सूक्ष्म आवरण ।।२८।। गुरु-लिंग-जंगमांच्या पादपूजेत । जे प्राप्त होते पवित्र तीर्थ । ते स्थूल, परि गुरुशिष्यैक्यज्ञान प्राप्त । ते सूक्ष्म जाणावे ।।२९।। गुरु-लिंगादीचे अवशिष्ट अन्न । तोचि स्थूल प्रसाद जाण । त्याने मन जे होई प्रसन्न । ते सूक्ष्म आवरण जाणावे ।।३०।। ऐशापरी स्थूल सूक्ष्म जाण । असे द्विविध अष्टावरण । होतो भक्ताचा प्रवास पूर्ण । स्थूलाकडूनि सूक्ष्माकडे ।।३१।। यातील स्थल गुरुकारुण्य । गुरू हे असे एक आवरण । यालागी केले विवेचन । आता ऐका गुरुलक्षणे ।।३२।।

**दीक्षागुरुकारुण्यस्थल** - (४)

ततो विवेकसम्पन्नो विरागी शुद्धमानसः । जिज्ञासुः सर्वसंसारदोषध्वंसकरं शिवम् ।।१।।

उपैति लोकविख्यातं लोभमोहविवर्जितम् । आत्मतत्त्वविचारज्ञं विमुक्तविषयभ्रमम् ।।२।।

शिवसिद्धान्ततत्त्वज्ञं छिन्नसन्देहविभ्रमम् । सर्वतन्त्रप्रयोगज्ञं धार्मिकं सत्यवादिनम् ।।३।।

कुलक्रमागताचारं कुमार्गाचारवर्जितम् । शिवध्यानपरं शान्तं शिवतत्त्वविवेकिनम् ।।४।।

भस्मोद्धूलननिष्णातं भस्मतत्त्वविवेकिनम् । त्रिपुंड्रधारणोत्कण्ठं धृतरुद्राक्षमालिकम् ।।५।।

लिंगधारणसंयुक्तं लिंगपूजापरायणम् । लिंगांगयोगतत्त्वज्ञं निरूढाद्वैतवासनम् ।।६।।

लिंगांगस्थलभेदज्ञं श्रीगुरुं शिववादिनम् ।

**गुरुकृपेविण काही । भक्तास तरणोपाय नाही । गुरुकृपेसाठी देही । योग्यता असावी लागते ।।३३।। आत्म-अनात्मविचार । नित्य-अनित्यवस्तुविचार । याचे ज्ञान समग्र । त्याच्याजवळी पाहिजे ।।३४।। कोणती वस्तू नित्य चेतन । कोणती अनित्य अचेतन । याचा निर्णय त्वरित जाण । बुद्धीने घ्यावा लागतो ।।३५।। संसाराविषयी वैराग्य पूर्ण । मनी असावे दृढ बिंबून । असावे शुद्ध अंत:करण । नष्ट होऊनि मनोमळ ।।३६।। विशुद्ध अंत:करणात । आत्म्याचे प्रतिबिंब त्वरित । पडे जैसे स्वच्छ**

दर्पणात । बिंब दिसे सुस्पष्ट ।।३७।। ज्ञानप्राप्तीची इच्छा उत्कट । हृदयी असावी सदा तेवत । ऐशा जिज्ञासू शिष्याप्रत । लाभे पूर्ण गुरुकृपा ।।३८।। विवेकसंपन्नता वैराग्य पूर्ण । जिज्ञासा शुद्ध अंतः-करण । हे ज्याच्याठायी चार गुण । तो पात्र गुरुकृपेसाठी ।।३९।। या गुणांनी जो परिपूर्ण । तो संसारसुख अनित्य जाणून । संसारासी हेय मानून । वर्तत असे जगात ।।४०।। जो संसारदोष-ध्वंसकर । त्या परशिवाचा करी विचार । सद्गुरूसी शरण रिघे सत्वर । जाणाया महा-लिंगासी ।।४१।। तो श्रीगुरू कैसा असावा । ते श्रवण करी कलशोद्भवा । तो लोकप्रसिद्ध मुक्त असावा । लोभमोहापासूनी ।।४२।। आत्मतत्त्वाचा चिंतक पूर्ण । त्यास असावे यथार्थ ज्ञान । विषयसुखाच्या भ्रमातून । मुक्त असावा सर्वस्वी ।।४३।। शिवागमसिद्धान्त-जाणता । सर्वशास्त्रप्रयोगज्ञाता । संशय-भ्रमापासून सर्वथा । पूर्ण मुक्त असावा ।।४४।। सत्यवक्ता धर्माचरणी । तत्पर गुरुपरंपरांच्या आचरणी । कुमार्गाचारवर्जित, शिवचिंतनी । मग्न सदैव असावा ।।४५।। शिवतत्त्वाच्या विवेकात । गढलेला स्वभावे शांत । भस्मोद्धूलनात निष्णात । भस्मतत्त्वाचा जाणता ।।४६।। त्रिपुंड्रधारणी तत्पर । रुद्राक्षमालाविभूषित शरीर । धारण केलेले देहावर । असावे इष्टलिंगासी ।।४७।। इष्टलिंगपूजनी आसक्त । असावे लिंग-अंग-योगतत्त्व ज्ञात । दृढ असावी

शिवाद्वैत-। भावना हृदयी तयाच्या ।।४८।। लिंग-अंगस्थलांचे पूर्ण । त्यास असावे सम्यक् ज्ञान । सर्वकाळ वाणीतून । मंगलवचने स्रवावी ।।४९।। ऐशा लक्षणांनी जो युक्त । त्या सद्गुरूपुढे व्हावे नत । दर्भ घेऊनि हातात । शरण जावे शिष्याने ।।५०।।

सेवेत परमाचार्यं शिष्यो भक्तिभयान्वितः ।।७।।

षण्मासान् वत्सरं वापि यावदेष प्रसीदति ।

**भक्ति-भययुक्त अंत:करणे । सद्गुरुसेवा भक्ताने । करावी वर्ष सहा महिने । अथवा प्रसन्न होई तोवरी ।।५१।। चतुर्विध असे गुरुसेवा । आप्तसेवा स्थानसेवा । तिसरी असे अंगसेवा । सद्भावसेवा चतुर्थ ।।५२।। सखा सोयरा आप्त । सद्गुरूसी मानितो भक्त । आणि सेवितो सदोदित । ती असे 'आप्तसेवा' ।।५३।। गुरुघर-कृषी-तपाची स्थाने । त्यांची नित्य निगा राखणे । ऐसे भक्ताचे जे वागणे । तिला म्हणती 'स्थानसेवा' ।।५४।। स्वकरे गुरूंचे चरणसंवाहन । करूनि राखणे त्यांचे मन । ऐसे भक्ताचे जे वर्तन । तिला नाव 'अंगसेवा' ।।५५।। श्रीगुरूविषयी सदैव । मनी बाळगणे सद्भाव । या सेवेसी असे नाव । 'सद्भावसेवा' ऐसे ।।५६।। ऐसी चतुर्विध सेवा करावी । श्रीगुरूची प्रीती संपादावी । मग तो देतो मोक्षपदवी । संतुष्ट होऊनि भक्तासी ।।५७।।**

प्रसन्नं परमाचार्यं भक्त्या मुक्तिप्रदर्शकम् ।।८।।

प्रार्थयेदग्रतः शिष्यः प्रांजलिर्विनयान्वितः । भो कल्याण महाभाग शिवज्ञानमहोदधे ।।९।।

आचार्यवर्य सम्प्राप्तं रक्ष मां भवरोगिणम् ।

**जो शिवतत्त्वाचे देई ज्ञान । तो सद्गुरू होता प्रसन्न । शिष्याने द्वयकर जोडून । त्यास प्रार्थावे विनयाने ।।५८।। हे कल्याणकारक महाभाग्यवंत । शिवज्ञानसागर श्रेष्ठ ख्यात । मी जहालो भवरोगग्रस्त । शरण आलो रक्षण करी ।।५९।।**

इति शुद्धेन शिष्येण प्रार्थितः परमो गुरुः ।।१०।।

शक्तिपातं समालोक्य दीक्षया योजयेदमुम् । दीयते च शिवज्ञानं क्षीयते पाशबन्धनम् ।।११।।

यस्मादतः समाख्याता दीक्षेतीयं विचक्षणैः । सा दीक्षा त्रिविधा प्रोक्ता शिवागमविशारदैः ।।१२।।

वेधारूपा क्रियारूपा मन्त्ररूपा च तापस ।

**शुद्धान्तःकरणी शिष्याने । केली प्रार्थना ऐकूनि कर्णे । गुरूने पाहावी शक्तिपात-चिन्हे । रोमांच अश्रू इत्यादी ।।६०।। परशिव महालिंगाचे ज्ञान । जी देते प्राप्त करून । मल माया कर्म तीन । या पाशांना नाशिते ।।६१।। असा भवनाशक संस्कार । ज्यास दीक्षा म्हणती मान्यवर । ती दीक्षा द्यावी**

सत्वर । श्रीगुरूने शिष्यासी ।।६२।। कोणकोणते तीन पाश । सांगतो त्यांचे विशेष । या पाशांमुळे जीवात्म्यास । पशू ऐसे संबोधिती ।।६३।। पाश म्हणजेच मल । आणवमल मायामल । आणि तिसरा कार्मिक मल । हे असती मलत्रय ।।६४।। इच्छा-ज्ञान-क्रियाशक्ती । परशिवाठायी पूर्णत्वे वसती । त्याच जेव्हा संकोचिती । त्यांना म्हणती मलत्रय ।।६५।। इच्छाशक्ती जीवाठायी । ती संकोचता आणवमल होई । आणि अणुभाव येई । जीवात्म्याच्या हृदयात ।।६६।। परशिवस्वरूप पूर्ण असून । तो स्वत:सी समजे लहान । या अनुभवासी अभिधान । आणवमल ऐसे असे ।।६७।। परशिवाची ज्ञानशक्ती । संकोचता जीवाठायी ती । भेदबुद्धीची निर्मिती । करी जीवाच्या बुद्धीत ।।६८।। मी वेगळा तू वेगळा । जग वेगळे शिव निराळा । अभेदत्व दिसेनाच डोळा । तिला म्हणती मायामल ।।६९।। क्रियाशक्ती संकोचली । तीच कार्मिक मल झाली । शुभाशुभ वासनारूपे ठेली । जीवास कर्मी गुंतवाया ।।७०।। जेव्हा कर्म करी नर । त्याचा उमटे मनी संस्कार । त्याच संस्कारासी थोर । ज्ञाते 'वासना' संबोधिती ।।७१।। पुन्हा कराया तेचि आचरण । हीच वासना असे कारण । शुभ आणि अशुभ दोन । प्रकार हे वासनेचे ।।७२।। परिवर्तन होता वासनेत । तरी कर्म बदले निश्चित । वाल्ह्याचे रूपांतर वाल्मीकीत । होते सर्वज्ञात हे ।।७३।। म्हणूनि परिवर्तन वासनेत । घडविणे हाचि असे

**पुरुषार्थ । वासनापरिवर्तने कर्मात । परिवर्तन घडतेच ।।७४।। श्रीगुरू दीक्षासंस्काराने । त्रिमलाचे उखडती ठाणे । आणि होई शुद्ध सोने । जीवनाचे शिष्याच्या ।।७५।। हे तपस्वी अगस्त्य पंडित । जे शिवागमांत पारंगत । त्यांनी तीन भेद येथ । सांगितले दीक्षेचे ।।७६।। वेधादीक्षा क्रियादीक्षा । आणि तिसरी मांत्री दीक्षा । श्रीगुरूने शिष्यपरीक्षा । करूनि द्याव्या त्यासी ह्या ।।७७।।**

गुरोरालोकमात्रेण हस्तमस्तकयोगतः ।।१३।।

यः शिवत्वसमावेशो वेधादीक्षेति सा मता । मान्त्री दीक्षेति सा प्रोक्ता मन्त्रमात्रोपदेशिनी ।।१४।।

**कृपादृष्टीने शिष्याकडे पाहत । मस्तकी ठेवूनि वरदहस्त । श्रीगुरू शिवतत्त्व जागवीत । त्याच्या अंतर्यामीचे ।।७८।। हीच वेधादीक्षा जाण । दुसरी मांत्री करितो कथन । ज्याचे केल्यामुळे मनन । करितो रक्षण आपुले जो ।।७९।। तो पंचाक्षर मंत्र गुप्तपणे । शिष्य-कर्णात श्रीगुरूने । विधिपूर्वक उपदेशिणे । हीच मांत्री दीक्षा असे ।।८०।।**

कुण्डमण्डलिकोपेता क्रियादीक्षा क्रियोत्तरा । शुभमासे शुभतिथौ शुभकाले शुभेऽहनि ।।१५।।

विभूतिं शिवभक्तेभ्यो दत्त्वा ताम्बूलपूर्वकम् । यथाविधि यथायोगं शिष्यमानीय देशिकः ।।१६।।

स्नातं शुक्लाम्बरधरं दन्तधावनपूर्वकम् । मण्डले स्थापयेच्छिष्यं प्राङ्मुखं तमुदङ्मुखः ।।१७।।

शिवस्य नाम कीर्तिं च चिन्तामपि च कारयेत् ।

**पंचकलशांचे स्थापन । स्वस्तिवाचन-मंडपादी क्रिया करून । केले जाते लिंगधारण । तिचे नाव क्रियादीक्षा ।।८१।। पवित्र मासात शुभ तिथीस । शुभकाली शुभ दिवस । विडा-विभूती देऊन शिवभक्तास । गुरूने द्यावे निमंत्रण ।।८२।। शिष्ये करूनि दंतधावन । श्वेत वस्त्रे करावी परिधान । त्यासी गुरूने मंडपी आणून । पूर्वाभिमुख बैसवावे ।।८३।। स्वतः उत्तराभिमुख बैसून । शिवध्यान शिवनामोच्चारण । करवूनि घ्यावे शिष्याकडून । भक्तिपूर्वक यथाविधी ।।८४।।**

विभूतिपट्टं दत्त्वाग्रे यथास्थानं यथाविधि ।।१८।।

पंचब्रह्ममयैस्तत्र स्थापितैः कलशोदकैः । आचार्यः सममृत्विग्भिस्त्रिः शिष्यमभिषिंचयेत् ।।१९।।

**शास्त्रोक्त विधीने पूर्ण । सर्वांगी करावे विभूतिधारण । मंडपात करावे स्थापन । पंचब्रह्मरूप पंचकलश ।।८५।। पंचाचार्य परंपरानुगत । श्रीगुरू शिवाचार्य पट्टाभिषिक्त । त्यांनी शिष्यासी करावे अभिषिंचित । कलशांतील जलाने ।।८६।। त्यावेळी आगमपारंगत । ऋत्विजांनी उच्च स्वरात । वेदघोष करावा मुक्त । श्रीगुरू जल सिंचताना ।।८७।।**

अभिषिच्य गुरुः शिष्यमासीनं परितः शुचिम् । ततः पंचाक्षरीं शैवीं संसारभयतारिणीम् ।।२०।।

तस्य दक्षिणकर्णे तु निगूढमपि कीर्तयेत् । छन्दो रूपमृषिं चास्य देवतान्यासपद्धतिम् ।।२१।।

**अभिषिंचनानंतर । जो समीप बैसला शिष्यवर । त्यासी उपदेशावा पंचाक्षर । दक्षिण कर्णी गूढपणे ।।८८।। जो संसारभय करी दूर । तो महामंत्र पंचाक्षर । शिष्याविना कानावर । अन्य कोणाच्या पडू नये ।।८९।। मग पंचाक्षरी मंत्राचे । स्वरूप छंद ऋषी देवता यांचे । ज्ञान देऊनि न्यासपद्धतीचे । द्यावे स्वरूप समजावूनी ।।९०।। दीक्षालक्षणगुरुकारुण्य-। स्थलाचे संपले निरूपण । आता पुढती लिंगधारण-। स्थल कथितो मुनिवरा ।।९१।। श्रोते स्मरा मागील कथन । विवरिलेले अष्टावरण । त्यात लिंग हे आवरण । एक असे कथिले हे ।।९२।। इष्टलिंग देहावरील । ते आवरण असे स्थूल । प्राण-भावलिंग अंतरातील । हे सूक्ष्म आवरण असे ।।९३।। लिंगस्वरूप आणि लिंगधारण । याचे पुढती विवेचन । मन:पूर्वक करा श्रवण । तेणे ज्ञान वाढेल ।।९४।।**

**लिंगधारणस्थल** - (५)

स्फाटिकं शैलजं वापि चन्द्रकान्तमयं तु वा । बाणं वा सूर्यकान्तं वा लिंगमेकं समाहरेत् ।।२२।।

सर्वलक्षणसंपन्ने तस्मिंल्लिंगे विशोधिते । पीठस्थितेऽभिषिक्ते च गन्धपुष्पादिपूजिते ।।२३।।

मन्त्रपूते कलां शैवीं योजयेद्विधिना गुरुः ।

**श्रीगुरूने शिष्याहाती । इष्टलिंग द्यावे पुढती । ते कैसे असावे हे चित्ती । जपूनि ठेवी कुंभोद्भवा ।।९५।। स्फटिकापासूनि निर्मिलेले । अथवा शिळेतूनि कोरलेले । किंवा बाण नर्मदेतले । घ्यावे लिंगाकरिता ।।९६।। अथवा चंद्रकांत सूर्यकांत । ह्या मण्यांपासूनि निर्मित । एक लिंग सर्वलक्षणयुक्त । घ्यावे पूर्ण परीक्षूनी ।।९७।। ते करपीठावरी ठेवावे । पंचगव्याने शुद्ध करावे । पंचामृताने अभिषेकावे । पूजावे गंधपुष्पादींनी ।।९८।। शिष्यमस्तकी जी स्थित । त्या शिवकलेसी करूनि आमंत्रित । पंचाक्षर-मंत्रे सुसंस्कृत । लिंगात तिला स्थापावे ।।९९।।**

शिष्यस्य प्राणमादाय लिंगे तत्र निधापयेत् ।।२४।।

तल्लिंगं तस्य तु प्राणे स्थापयेदेकभावतः । एवं कृत्वा गुरुर्लिंगं शिष्यहस्ते निधापयेत् ।।२५।।

**शिष्याचा आकर्षूनि प्राण । तो शिवकलेने जे परिपूर्ण । त्या लिंगी करावा स्थापन । विधिपूर्वक श्रीगुरूने ।।१००।। मग ते लिंग शिष्य-प्राणात । तादात्म्याने करावे स्थापित । जीवकला सामरस्ययुक्त । लिंग द्यावे शिष्यकरी ।।१०१।। मग श्रीगुरूंनी शिष्यास । करावा पूर्ण उपदेश । लिंग-अंगसंबंध त्यास । समजावूनी सांगावा ।।१०२।।**

प्राणवद्धारणीयं तत्प्राणलिंगमिदं तव । कदाचित्कुत्रचिद्वापि न वियोजय देहतः ।।२६।।

यदि प्रमादात्पतिते लिंगे देहान्महीतले । प्राणान् विमुंच सहसा प्राप्तये मोक्षसम्पदः ।।२७।।

**शिष्या ऐक देऊनि अवधान । हे तुझे प्राणलिंग जाण । सदैव शरीरावरी करी धारण । तुझ्या प्राणासारखे ।।१०३।। कोठेही येवो कसाही प्रसंग । तुझे शरीर आणि लिंग । यांचा होऊ नये वियोग । यासाठी सावध राहावे ।।१०४।। देहापासूनि होऊनि अलग । चुकूनि भूमीवर पडले लिंग । तरी तत्काळ करी प्राणत्याग । तुज मिळेल मोक्षपद ।।१०५।। याचा इतुकाचि इत्यर्थ । कोणत्याही परिस्थितीत । देहापासूनि लिंग वियुक्त । होऊ नये हे ध्यानी घे ।।१०६।।**

इति सम्बोधितः शिष्यो गुरुणा शास्त्रवेदिना । धारयेत् शांकरं लिंगं शरीरे प्राणयोगतः ।।२८।।

**शास्त्रवेत्त्या श्रीगुरूकडून । शिष्ये उपदेश करावा श्रवण । शिवरूप इष्टलिंग आमरण । धारण करावे देहावरी ।।१०७।। ऐसा हा दीक्षासंस्कार । श्रीगुरू करिती शिष्यावर । त्याच्या जीवनी आमूलाग्र । घडे यामुळे परिवर्तन ।।१०८।। जीवनी परिवर्तन घडावे । ऐसी इच्छा मनी बळावे । तरी ब्रह्मनिष्ठ गुरूसी जावे । शरण हाचि उपाय ।।१०९।। शरीरावरील इष्टलिंग । हृदयातील प्राणलिंग । कारणशरीरातील भावलिंग । ही संपत्ती शिष्याची ।।११०।। हेचि शाश्वत लिंगैश्वर्य । शिष्यासी देती श्रीगुरुवर्य । या ऐश्वर्यापुढे सर्व । तुच्छ शिष्याने मानावे ।।१११।। असो आता ऐक पुढती । लिंगधारणेची महती ।**

**आणि धारणाची पद्धती । पूर्ण अवधान देऊनी ।।११२।।**

लिंगस्य धारणं पुण्यं सर्वपापप्रणाशनम् । आदृतं मुनिभिः सर्वैरागमार्थविशारदैः ।।२९।।

लिंगधारणमाख्यातं द्विधा सर्वार्थसाधकैः । बाह्यमाभ्यन्तरं चेति मुनिभिर्मोक्षकांक्षिभिः ।।३०।।

**लिंगधारण पुण्यदायक । असे सर्वपापनाशक । आगमज्ञात्या ऋषिमहर्षींनी देख । केले लिंग-धारण ।।११३।। सर्वार्थसाधक लिंगधारण । त्याचे मुमुक्षू ऋषींनी जाण । असती कथिले भेद दोन । बाह्य आणि आभ्यंतर ।।११४ ।।**

चिद्रूपं परमं लिंगं शांकरं सर्वकारणम् । यत्तस्य धारणं चित्ते तदान्तरमुदाहृतम् ।।३१।।

चिद्रूपं हि परं तत्त्वं शिवाख्यं विश्वकारणम् । निरस्तविश्वकालुष्यं निष्कलं निर्विकल्पकम् ।।३२ ।।

सत्तानन्दपरिस्फूर्तिसमुल्लासकलामयम् । अप्रमेयमनिर्देश्यं मुमुक्षुभिरुपासितम् ।।३३।।

परं ब्रह्म महालिंगं प्रपंचातीतमव्ययम् ।

**सर्व जगाचे मूलकारण । चिद्रूप लिंग परम पूर्ण । त्यास हृदयी करणे धारण । हे लिंगधारण आभ्यंतर ।।११५।। ते अंतर्लिंगरूप ब्रह्म जाण । जड प्रपंचाहूनि विलक्षण । म्हणूनि त्यास विद्वान । 'चिद्रूप' ऐसे संबोधिती ।।११६।। सर्व जीवांहून वेगळे । तेणे 'परमतत्त्व' म्हणती सगळे । ते निरवयव**

**असल्यामुळे । नाव दिले 'निष्कल' ।।११७।। ते चराचर प्रपंचाचे मूळ । तरी प्रपंचदोषांपासून सकळ । मुक्त सर्वस्वी, भेदरहित निर्मळ । म्हणूनि म्हणती 'निर्विकल्प' ।।११८।। सत् चित् आनंद स्फूर्ती उत्साह । आदी सप्तदश कला सर्व । ते त्याचे स्वरूपी, ते अप्रमेय । आणि अनिर्देश्य असे ।।११९।। अनिर्देश्य असूनि मोक्षार्थी जन । करिती त्याचे उपासन । ते विश्वातीत त्रिकालाकडून । असे पूर्ण अबाधित ।।१२०।। ऐसे जे शिवपरब्रह्म पूर्ण । महालिंग त्याचेच अभिधान । तेचि प्रकाशे हृदयांतून । अंतर्लिंग जीवांच्या ।।१२१।।**

तदेव सर्वभूतानामन्तस्त्रिस्थानगोचरम् ।।३४।।

मूलाधारे च हृदये भ्रूमध्ये सर्वदेहिनाम् । ज्योतिर्लिंगं सदा भाति यद्ब्रह्मेत्याहुरागमाः ।।३५।।

अपरिच्छिन्नमव्यक्तं लिंगं ब्रह्म सनातनम् । उपासनार्थमन्तःस्थं परिच्छिन्नं स्वमायया ।।३६।।

**ब्रह्म म्हणती आगमांतरी । तेचि ज्योतिर्लिंग नांदते जीवांतरी । मूलाधारी हृदयस्थानावरी । आणि भ्रूमध्यस्थानात ।।१२२।। ही मुख्य स्थाने तीन । तेथे असते प्रकाशमान । गुरूपदेशानेच ज्ञान । होई त्याच्या स्वरूपाचे ।।१२३।। अंतरी नांदते सनातन । ते ब्रह्म अव्यक्त अपरिच्छिन्न । स्वमायेने झाले परिच्छिन्न । उपासनेस्तव भक्तांच्या ।।१२४।। विश्वव्यापी शिव महान । इष्टलिंगरूपे होई लहान ।**

**करिता यावे पूजन ध्यान । निजभक्तांसी म्हणूनिया ।।१२५।। ज्याच्यामध्ये सामावले । हे प्रचंड ब्रह्मांड सगळे । तो शिव करपीठी खेळे । इष्टलिंगरूपाने ।।१२६।।**

लयं गच्छति यत्रैव जगदेतच्चराचरम् । पुनः पुनः समुत्पत्तिं तल्लिंगं ब्रह्म शाश्वतम् ।।३७।।

तस्माल्लिंगमिति ख्यातं सत्तानन्दचिदात्मकम् । बृहत्वाद् बृंहणत्वाच्च ब्रह्मशब्दाभिधेयकम् ।।३८।।

**हे संपूर्ण चराचर विश्व । ज्याच्याठायी पावते लय । आणि ज्याच्यातूनि सर्व । पुनश्च होते उत्पन्न ।।१२७।। ऐसे जे परब्रह्म शाश्वत । तेचि 'लिंग' नामे ख्यात । सर्वांहूनि असे बृहत् । म्हणूनि 'ब्रह्म' संबोधिती ।।१२८।। ज्यासी म्हणती परब्रह्म । त्याचेच महालिंग असे नाम । आणि महालिंग हेचि ब्रह्म । दृढ चित्ती धरावे ।।१२९।।**

आधारे हृदये वापि भ्रूमध्ये वा निरन्तरम् । ज्योतिर्लिंगानुसन्धानमान्तरं लिंगधारणम् ।।३९।।

आधारे कनकप्रख्यं हृदये विद्रुमप्रभम् । भ्रूमध्ये स्फटिकच्छायं लिंगं योगी विभावयेत् ।।४०।।

**मूलाधारस्थानी वा हृदयात । अथवा भ्रूकुटिमध्यात । ध्यावे ज्योतिर्मय लिंग सतत । हेचि आंतर लिंगधारण ।।१३०।। लिंगधारण कैसे करावे । शिवयोग्याने, सांगतो बरवे । मूलाधारस्थानी मानावे । लिंग सुवर्णासमान ।।१३१।। पोवळ्यासारखे हृदयात । स्फटिकासमान भ्रूमध्यात । प्रकाशमान लिंग**

**असे नांदत । ऐसा भाव धरावा ।।१३२।। त्या त्या स्थानी त्या समान । लिंग प्रकाशे ऐसे मानून । त्या लिंगाचे करावे ध्यान । अंतर्यामी आपुल्या ।।१३३।।**

निरुपाधिकमाख्यातं लिंगस्यान्तरधारणम् । विशिष्टं कोटिगुणितं बाह्यलिंगस्य धारणात् ।।४१।।

ये धारयन्ति हृदये लिंगं चिद्रूपमैश्वरम् । न तेषां पुनरावृत्तिर्घोरसंसारमण्डले ।।४२।।

**अंतरी करणे लिंगधारण । त्यास निरुपाधिक हे अभिधान । ते बाह्य लिंगधारणेहून । श्रेष्ठ कोटी गुणांनी ।।१३४।। चिद्रूप अंतर्लिंग हृदयात । धारण करिती जे शिवभक्त । त्यांना या संसारचक्रात । जन्मा येणे नलगे ।।१३५।।**

अन्तर्लिंगानुसंधानमात्मविद्यापरिश्रमः । गुरूपासनशक्तिश्च कारणं मोक्षसम्पदाम् ।।४३।।

वैराग्यज्ञानयुक्तानां योगिनां स्थिरचेतसाम् । अन्तर्लिंगानुसन्धाने रुचिर्बाह्ये न जायते ।।४४।।

**चिद्रूप अंतर्लिंगध्यान । अध्यात्मशास्त्राचे मनन-चिंतन । आणि गुरुसेवा ही तीन । साधने मोक्षप्राप्तीची ।।१३६।। वैराग्यसंपन्न ज्ञानयुक्त । योगिजन जे स्थिरचित्त । अंतर्लिंगानुसंधानात । त्यांना गोडी अधिक ।।१३७।।**

ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च वासवाद्याश्च लोकपाः । मुनयः सिद्धगन्धर्वा दानवा मानवास्तथा ।।४५।।

सर्वे च ज्ञानयोगेन सर्वकारणकारणम् । पश्यन्ति हृदये लिंगं परमानन्दलक्षणम् ।।४६।।

**ब्रह्माविष्णुरुद्रादी देव । इंद्रादी दिक्पाल मुनी सिद्ध गंधर्व । दानव मानवादी सर्व । हृदयी ध्याती लिंगासी ।।१३८।। सर्व कारणांचे कारण । परमानंदस्वरूप लिंग ब्रह्म पूर्ण । त्याचे ज्ञानदृष्टीने दर्शन । घेती आपुल्या हृदयांत ।।१३९।।**

तस्मात्सर्वप्रयत्नेन शांकरं लिंगमुत्तमम् । अन्तर्विभावयेद्विद्वान् अशेषक्लेशमुक्तये ।।४७।।

अन्तर्धारयितुं लिंगमशक्तः शक्त एव वा । बाह्यं च धारयेल्लिंगं तद्रूपमिति निश्चयात् ।।४८।।

**अविद्या राग द्वेष । अस्मिता आणि अभिनिवेश । नांदती हे पंचक्लेश । हृदयी दुःखद जीवाच्या ।।१४०।। या पंचक्लेशांचे निखंदन । करी अंतर्लिंगानुसंधान । म्हणूनि शिवभक्ताने प्रयत्न-। पूर्वक ध्यावे लिंगासी ।।१४१।। अंतर्लिंगधारणेत । समर्थ असो वा असमर्थ । त्याने स्फटिकादिपासूनि निर्मित । धारण करावे इष्टलिंग ।।१४२।। जे माझिया करपीठावर । विराजे इष्टलिंग सुंदर । ते हृदयस्थ महालिंगाचे मनोहर । रूप आहे या निश्चयाने ।।१४३।। अंतर्लिंगाचे कराया स्मरण । तत्स्वरूप जे इष्टलिंग पूर्ण । त्याचे देहावरी धारण । अवश्यमेव करावे ।।१४४।।**

लिंगं तु त्रिविधं प्रोक्तं स्थूलं सूक्ष्मं परात्परम् । इष्टलिंगमिदं स्थूलं यद्बाह्ये धार्यते तनौ ।।४९।।

प्राणलिंगमिदं सूक्ष्मं यदन्तर्भावनामयम् । परात्परं तु यत्प्रोक्तं तृप्तिलिंगं तदुच्यते ।।५०।।

**स्थूल सूक्ष्म परात्पर । ऐसे लिंगाचे तीन प्रकार । धारण करिती जे देहावर । ते स्थूल इष्टलिंग ।।१४५।। हृदयामाजी सूक्ष्मलिंग । त्यासी म्हणती प्राणलिंग । जे श्रेष्ठ परात्पर भावलिंग । तृप्तिलिंग त्यास म्हणती ।।१४६।।**

भावनातीतमव्यक्तं परब्रह्म शिवाभिधम् ।

इष्टलिंगमिदं साक्षादनिष्टपरिहारतः । धारयेदवधानेन शरीरे सर्वदा बुधः ।।५१।।

**नाशूनि संसारपाश अनिष्ट । लाभूनि देई परमुक्ती इष्ट । तेचि इष्टलिंग श्रेष्ठ । असे परब्रह्म-स्वरूप ।।१४७।। जे भावनातीत अव्यक्त । शिव नामे प्रसिद्ध निगमागमांत । ते परब्रह्मचि व्यक्त । झाले इष्टलिंगातूनी ।।१४८।। ऐसे इष्टलिंग ज्ञानी जने । धारण करावे सावधपणे । मनी विचार वागविणे । देव आहे देहावरी ।।१४९।।**

मूर्ध्नि वा कण्ठदेशे वा कक्षे वक्षःस्थलेऽपि वा । कुक्षौ हस्तस्थले वापि धारयेल्लिंगमैश्वरम् ।।५२।।

नाभेरधस्ताल्लिंगस्य धारणं पापकारणम् । जटाग्रे त्रिकभागे च मलस्थाने न धारयेत् ।।५३।।

**ऐक कोणकोणत्या ठायी । लिंगधारण करावे देही । मस्तकी कंठी कक्षेतही । वक्ष:स्थळी वा**

उदरावरी ।।१५०।। धारण करावे करतली । पण करू नये नाभीच्या खाली । जटेवरी पाठीवरी मलस्थली । करू नये धारण ।।१५१।। जरी तेथे केले धारण । तरी ते पापासी कारण । लिंगधारणेची स्थले म्हणून । नीट घ्यावी समजूनी ।।१५२।।

लिंगधारी सदा शुद्धो निजलिंगं मनोरमम् । अर्चयेद् गन्धपुष्पाद्यैः करपीठे समाहितः ।।५४।।

बाह्यपीठार्चनादेतत् करपीठार्चनं वरम् । सर्वेषां वीरशैवानां मुमुक्षूणां निरन्तरम् ।।५५।।

इष्टलिंगधारक शिवभक्त । परिशुद्ध असे सदोदित । त्याने करपीठावरी स्थित । करावे इष्टलिंगासी ।।१५३।। मग करूनि एकाग्र मन । गंधपुष्पादींनी करावे पूजन । बैसले हृदयस्थ परब्रह्म जाण । करतली या भावनेने ।।१५४।। लिंग न ठेविता बाह्यपीठावर । ते ठेवूनि करपीठावर । पूजावे नित्य हेचि श्रेयस्कर । मुमुक्षू वीरशैवांना ।।१५५।। इष्टलिंग स्थूलदेहावरी । प्राणलिंग सूक्ष्मशरीरी । भावलिंग कारणशरीरी । असे वीरशैवांच्या ।।१५६।। प्राण-भावलिंगाचे ज्ञान । नसे ज्या साधका-लागून । त्याने इष्टलिंगाचे पूजन । तीन वेळा करावे ।।१५७।। ते ऐक कैसे करावे । इष्टलिंगास अभिषेकावे । भस्म लावूनि मंत्रास जपावे । मग ठेवावे लिंगाकारी ।।१५८।। हे झाले पहिले पूजन । मग स्वतः भस्म-रुद्राक्षादी धारण । करूनि सिद्ध व्हावे पूजेलागून । ही झाली 'अंग'पूजा ।।१५९।। आता

करावे दुसरे पूजन । इष्टलिंगास रुद्राभिषेक करून । सर्व पूजाद्रव्यांनी पूर्ण । यथासांग पूजावे ।।१६०।। भस्म गंध बेल फूल । धूपदीपनैवेद्यादी सकल । अर्पूनि करावा निश्चल । मनाने गुरुमंत्रजप ।।१६१।। मग लिंगासी जी अर्पिली । बेलफुले ती सगळी । नेत्रांस भाळास लावूनि खाली । ठेवावी आदर-पूर्वक ।।१६२।। ही दुसरी पूजा जहाली । आता तिसरी पाहिजे केली । इष्टलिंग असे करतळी । त्यास करावा अभिषेक ।।१६३।। वस्त्राने पुसूनि भस्म लावावे । त्यावरी तीन पळी तीर्थ घालावे । ते घालताना क्रमशः शब्द उच्चारावे । गुरु-लिंग-पादोदक ।।१६४।। एक पळी तीर्थ घालावे । 'गुरुपादोदक' ऐसे म्हणावे । दुसरी पळी घालताना उच्चारावे । 'लिंगपादोदक' हे शब्द ।।१६५।। तिसऱ्यांदा तीर्थ घालून । 'जंगमपादोदक' उच्चारून । मग ते तीर्थ संपूर्ण । प्राशन करावे आदरे ।।१६६।। ही जाणावी पूजा तिसरी । लिंग वंदूनि लिंगाकारी । ठेवूनि पारायण करावे चतुरी । श्रीसिद्धान्तशिखामणीचे ।।१६७।। अशा करूनि पूजा तीन । इष्ट-प्राण-भावलिंगासी जाण । केल्या ऐसा भाव पूर्ण । मनी धरावा भक्ताने ।।१६८।। अगस्त्या वीरशैवांनी पूर्ण । ज्ञानोत्तरही करावे आचरण । ऐक्यस्थली झाला म्हणून । लिंगपूजन त्यागू नये ।।१६९।।

ब्रह्मविष्ण्वादयो देवा मुनयो गौतमादयः । धारयन्ति सदा लिंगमुत्तमांगे विशेषतः ।।५६।।

लक्ष्म्यादिशक्तयः सर्वाः शिवभक्तिविभाविताः । धारयन्त्यलिकाग्रेषु शिवलिंगमहर्निशम् ।।५७।।

**ब्रह्मा विष्णू आदी देव । गौतमादी ऋषी सर्व । निजमस्तकी सदैव । करिती लिंगधारण ।।१७०।। लक्ष्म्यादी शिवभक्तिसंपन्न । शक्तिदेवता करिती लिंगधारण । म्हणूनि स्त्री-पुरुषांनी समान । लिंगधारण करावे ।।१७१।।**

वेदशास्त्रपुराणेषु कामिकाद्यागमेषु च । लिंगधारणमाख्यातं वीरशैवस्य निश्चयात् ।।५८।।

ऋगित्याह पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते । तस्मात्पवित्रं तल्लिंगं धार्यं शैवमनामयम् ।।५९।।

**वेदशास्त्रपुराणांत । कामिकादी आगमांत । प्रतिपादिला सिद्धान्त । स्पष्ट लिंगधारणेचा ।।१७२।। ऋग्वेदात 'पवित्रं ते' मंत्रात । संबोधिले ब्रह्मणस्पती शिवाप्रत । चतुर्मुख ब्रह्माचा अधिपती साक्षात । शिव असे हा अर्थ ।।१७३।। हे ब्रह्मणस्पते शिवादिभूम्यन्त । तुझे लिंगरूप छत्तीस तत्त्वांत । व्याप्त असूनि ते अत्यंत । पवित्र असे तुझ्यासाठी ।।१७४।। म्हणूनि निर्दोष लिंगरूप शिव । शरीरी धारण करावा सदैव । ऐसे ऋग्वेदात अभिनव । लिंगधारण कथिले असे ।।१७५।।**

ब्रह्मेति लिंगमाख्यातं ब्रह्मणः पतिरीश्वरः । पवित्रं तद्धि विख्यातं तत्सम्पर्कात्तनुः शुचिः ।।६०।।

**ते चतुर्मुख ब्रह्माचा पती । परब्रह्मनामे त्याची ख्याती । त्याच्या पवित्र संपर्के अती । तनू होते**

**परिशुद्ध ।।१७६।। जाणूनि वीरशैवांनी हे प्रमाण । नित्य करावे लिंगधारण । तेणे दोष जळूनि पूर्ण । देह-मन शुद्ध होई ।।१७७।।**

अतप्ततनुरज्ञो वै आमः संस्कारवर्जितः । दीक्षया रहितः साक्षान्नाप्नुयाल्लिंगमुत्तमम् ।।६१।।

**ज्याने केले नाही तपाचरण । ज्याचे परिपक्व नाही अंतःकरण । ज्यावरी वैराग्य नाही प्रसन्न । जो शिवसंस्कारवंचित ।।१७८।। नित्यानित्यवस्तुविवेक । ज्याच्याठायी नाही चोख । ज्यावरी गुरुकृपा-दृष्टी क्षणैक । फिरली नाही कधीच ।।१७९।। ज्यासी गुरुकारुण्य नाही प्राप्त । जो शिवदीक्षेपासूनि वंचित । त्याने लिंग घेऊनि विकत । घालू नये गळ्यामध्ये ।।१८०।। स्त्रीने मंगळसूत्र घेऊन । स्वतःच्या गळ्यात घातले आपण । तरी तिचे झाले लग्न । ऐसे कोणी म्हणेना ।।१८१।। विवाहसंस्कार झाल्याविण । ती विवाहिता न होय जाण । तैसे गुरुदीक्षेविना धारण । केले ते लिंगधारण नव्हे ।।१८२।। गुरूकडूनि दीक्षा घ्यावी । मगच लिंगधारणा करावी । त्याने भोगप्राप्ती मोक्षपदवी । मिळे अन्यथा नाहीच ।।१८३।।**

अघोराऽपापकाशीति या ते रुद्र शिवा तनूः । यजुषा गीयते यस्मात् तस्माच्छैवोऽघवर्जितः ।।६२।।

**हे रुद्रा तव लिंगरूपी शरीर । निष्पाप मंगलमय अघोर । ऐसा मंजुळ शिवस्वर । यजुर्वेदाने**

**आळविला ।।१८४।। म्हणूनि इष्टलिंगधारक वीरशैव । तो निष्पाप असे सदैव । ऐसे लिंगधारण एकमेव । आहे कल्याणकारक ।।१८५।।**

यो लिंगधारी नियतान्तरात्मा नित्यं शिवाराधनबद्धचित्तः ।

स धारयेत् सर्वमलापहत्यै भस्मामलं चारु यथाप्रयोगम् ।।६३।।

**ज्या लिंगधारकाचे निर्मल मन । जो नित्य शिवपूजेत तल्लीन । अशा शिवभक्ताने परिमार्जन । सर्व दोषांचे होण्यासाठी ।।१८६।। मनोहर आणि निर्मळ । ऐसे भस्म शुभ्रधवल । धारण करूनि आपुले भाल । सुशोभित करावे ।।१८७।। ऐसे हे लिंगधारणस्थल । श्रोतेहो विवरिले सकळ । रेणुकाचार्य बोधिती प्रेमळ । मुनी अगस्त्यालागूनी ।।१८८।। लिंग वीरशैवांचे धन । लिंग वीरशैवांचा प्राण । केल्याने लिंगधारण । होते मलत्रयनिवृत्ती ।।१८९।। लिंगधारण-पूजा-ध्यान । याने पापे नष्ट होऊन । जीव होऊनि पुण्यवान । पुण्यकुंजच होतसे ।।१९०।। मनोवृत्ती बाहेरी पळे । लिंगध्याने ती आत वळे । आत्मदर्शन त्यामुळे । होई मुमुक्षू जीवांना ।।१९१।। म्हणूनि श्रोतेहो ध्यानी धरावे । लिंगधारण सदैव करावे । लिंगपूजा-ध्यान करूनि व्हावे । कृतकृत्य जीवनात ।।१९२।। लिंगधारण करा हे कथिले । पण ते खाली पडले, फुटले । झाले अवमानित, हरवले । तर काय करावे भक्ताने? ।।१९३।। तेही**

सांगतो तुम्हांस । श्रवण करावे सावकाश । 'कारणागमा'त पार्वतीस । सर्व शिवाने कथिले हे ।।१९४।। पार्वतीने केले प्रश्न । शिवाने केले समाधान । तेचि संक्षिप्त करून । साध्या शब्दांत सांगतो ।।१९५।। निद्रेत अवधान हरवले । लिंग अंगाखाली आले । तर ते अवमानित झाले । त्यावेळी काय करावे ।।१९६।। निद्रेचा भर विशेष । पत्नीचा पाय लागे पतीस । सकाळी पतीसी वंदिता दोष । तिचा जाई निघूनी ।।१९७।। तैसे भक्ताने सकाळी उठून । लिंग दोन्ही डोळ्यांसी लावून । त्यासी करिता वंदन । तो होय दोषमुक्त ।।१९८।। पूजेची चुकली वेळ । तर मंत्र जपावा अष्टोत्तरशत वेळ । आपत्काळी पूजा-जप सकळ । चुकला तर घ्यावे प्रायश्चित्त ।।१९९।। दुसरे दिनी स्नान करून । गुरू आणि लिंगाची क्षमा प्रार्थून । इष्टलिंगपूजा यथासांग करून । मंत्र सहस्रवेळा जपावा ।।२००।। गंधाक्षता फूल बिल्वपान । जर पूजेवेळी पडले न्यून । तर प्रत्येक न्यूनासाठी जाण । करावा जप एकशे आठ ।।२०१।। लिंग पडता भूवरी । त्यास त्वरित घेऊनि करी । क्षमा मागूनि जपावा सत्वरी । अष्टोत्तरशत वेळा मंत्र ।।२०२।। श्रीगुरूने दिले जे इष्टलिंग । ते हरवले अथवा झाले भंग । तरी फुटले तुकडे जोडूनि सांग । कलान्यास करूनि पुजावे ।।२०३।। इष्टलिंगाचे झाले चूर्ण । तर श्रीगुरूकडूनि घ्यावे नूतन । गुरूने चूर्ण लिंगातील कलान्यास पूर्ण । नव्या लिंगात करावा ।।२०४।। जर हरवले

इष्टलिंग । तर तत्क्षणी करावा प्राणत्याग । ते शक्य नसेल तरी मग । त्याचा शोध करावा ।।२०५।। एकवीस दिवसपर्यंत । आहार न घेता किंचित । मूलमंत्र सर्वत्र जपत । इष्टलिंग शोधावे ।।२०६।। ते न सापडले तर जाण । करावे वेगी प्राणार्पण । ते शक्य नसे तरी गुरूकडून । घ्यावे नूतन इष्टलिंग ।।२०७।। हरवल्या लिंगातील शिवकला । श्रीगुरूने आकर्षूनि सगळ्या । नव्या लिंगात पाहिजे केल्या । प्रतिष्ठापित समंत्र ।।२०८।। याउपरी सापडले जुने लिंग । तरी ते गुरूसी दाखवूनि मग । गुर्वाज्ञेने जळी सवेग । निक्षेपावे सत्वर ।।२०९।। पार्वती पुसे शंकरालागून । लिंग हरवता सोडिला प्राण । तरी त्याचा अंत्यसंस्कार जाण । सांगा कैसा करावा ।।२१०।। जरी लिंगरहित शरीर । तरी त्यावरी न होय संस्कार । अन्य लिंग घालूनि केला तर । प्राणत्याग ठरे निरर्थक ।।२११।। शिव म्हणती तू सुजाण । तू विचारिला उचित प्रश्न । लिंग हरवताक्षणी त्यागिला प्राण । तरी तो गेला मोक्षासी ।।२१२।। प्राणार्पण नाही निरर्थक । त्या जीवाचे झाले सार्थक । त्यासी लाभला शिवलोक । हे निश्चित जाणावे ।।२१३।। परि लिंगरहित शरीर । त्याचा कैसा करावा अंत्यसंस्कार? । तरी नूतन लिंग घेऊनि त्यावर । गुरूने संस्कार करावे ।।२१४।। हरवल्या लिंगातील कलांस । आवाहन करूनि अशेष । नूतन लिंगात करावा न्यास । श्रीगुरूने समंत्र ।।२१५।। मृत जीवाच्या देहावर । ते लिंग

**घालावे सत्वर । मग करावा अंत्यसंस्कार । लिंगासहित मृताचा ।।२१६।। श्रोतेहो कारणागमातील । श्लोकाधारे हे विवरिले सकळ । परि स्वत:वर अशी वेळ । येऊ नये हे पाहावे ।।२१७।। इष्टलिंगास प्राणापरी जपावे । पूर्ण प्रमादरहित वागावे । ते पडावे फुटावे हरवावे । ऐसे घडू देऊ नये ।।२१८।। आता पुढील अध्यायात । अधिक विवरिला शिवसिद्धान्त । तो श्रवण करावयास शांत । चित्त असावे श्रोत्यांचे ।।२१९।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।२२०।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । षष्ठोऽध्याय पूर्ण हा ।।२२१।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतभक्तस्थले दीक्षागुरुकारुण्यलिंगधारणस्थलप्रसंगो नाम षष्ठः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय सातवा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु एकवक्त्र शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः श्रीकंठाय । भक्तवत्सलाय नमः भवाय । शर्वाय नमः त्रिलोकेशाय । शितिकंठाय नमः कपालिने ।।१।। मागील अध्यायी झाले कथन । गुरुकारुण्य लिंगधारण । या स्थलांचे केले विवरण । जगद्‌गुरू रेणुकाचार्यांनी ।।२।। कंठी रुळे इष्टलिंग । शुभ्र भस्मचर्चित सर्वांग । रुद्राक्षभूषित अशा अव्यंग । वीरशैवास पाहता ।।३।। मनी आनंदा ये भरती । झरती दोन्ही नेत्रपाती । भासे उभा आहे पुढती । शिवगण प्रत्यक्ष ।।४।। देहावरील धर्मचिन्ह । हृदयी घडवी परिवर्तन । चिन्ह बाह्य परिणाम पण । अंतरंगी होत असे ।।५।। जरी दूध करणे उष्ण । तरी ते पात्रात ठेवून । पात्रालाच बाहेरून । द्यावी लागे उष्णता ।।६।। जसजसे बाहेर पात्र तापते । तसतसे आत दूध उकळते । तैसेच अंतरंगी घडते । परिवर्तन बाह्यचिन्हांनी ।।७।। बाह्य इष्टलिंगधारण । घडवी अंतरी प्राणलिंगार्चन । तैसेच भस्म-रुद्राक्षधारण । दृष्टी करी अंतर्मुख ।।८।। असो आता ऐका पुढती । भस्मधारणाची महती । जिज्ञासू अगस्त्यमुनीप्रती । उपदेशिती जगद्‌गुरू ।।९।। वीरशैवांचे अष्टावरण । भस्म त्यातील एक आवरण । सर्वांगी करणे भस्मलेपन । हे

**भूषण वीरशैवांचे ।।१०।। बाह्यदेहावरी शोभे विभूती । अंतरी प्रकाशे भस्मज्योती । परशिवात मनोवृत्ती । लीन होता भक्ताची ।।११।। ती चेतनस्वरूप जाण । होई तेचि चिद्‌भस्मधारण । ते सूक्ष्म, भस्मधारण । स्थूल बाह्यदेहावरी ।।१२।। ज्या भाळी नाही भस्म । ते धिक्काराचे कारण परम । 'धिक् भस्मरहितं फालम्' । असे ज्ञानी सांगती ।।१३।।**

**भस्मधारणस्थल** - (६)

भस्मधारणसंयुक्तः पवित्रो नियताशयः । शिवाभिधानं यत्प्रोक्तं भासनाद्भसितं तथा ।।१।।

महाभस्मेति संचिन्त्य महादेवं प्रभामयम् । वर्तन्ते ये महाभागा मुख्यास्ते भस्मधारिणः ।।२।।

**भस्मधारणाने शिवभक्त । होई निश्चल पवित्र चित्त । शिवास जाबाल श्रुतीत । संबोधिले 'भस्म' नामे ।।१४।। जो भक्त करी भस्मध्यान । त्याने केले शिवध्यान । आणि पंचाक्षरी मंत्रस्मरण । ऐसे साच जाणावे ।।१५।। निजप्रकाशाने विश्व समस्त । शिव करितो प्रकाशित । म्हणूनि त्यास 'भसित' । ऐसे एक नाव असे ।।१६।। प्रकाशमान महादेवालागून । जे मानिती महाभस्म जाण । त्याचे सतत करिती ध्यान । ते निरुपाधिक भस्मधारी ।।१७।।**

शिवाग्न्यादिसमुत्पन्नं मंत्रन्यासादियोगतः । तदुपाधिकमित्याहुर्भस्मतंत्रविशारदाः ।।३।।

विभूतिर्भसितं भस्म क्षारं रक्षेति भस्मनः । एतानि पंचनामानि हेतुभिः पंचभिर्भृशम् ।।४।।

**पंचब्रह्म मंत्र न्यास । या योगे जे भस्म विशेष । उत्पन्नले शिवाग्नीतूनि त्यास । तज्ज्ञ म्हणती सोपाधिक ।।१८।। विभूती भसित भस्म तीन । क्षार आणि रक्षा जाण । ही पाच नावे कारण-। भेदे सोपाधिक भस्माची ।।१९।।**

विभूतिर्भूतिहेतुत्वाद् भसितं तत्त्वभासनात् । पापानां भर्त्सनाद्भस्म क्षरणात् क्षारमापदाम् ।।५।।

रक्षणात् सर्वभूतेभ्यो रक्षेति परिगीयते ।

**असे ऐश्वर्यासी कारण । म्हणून 'विभूती' हे अभिधान । करी शिवतत्त्वाचे प्रकाशन । म्हणूनि म्हणती 'भसित' ।।२०।। पापांचे करी भर्त्सन । म्हणूनि नाव 'भस्म' जाण । त्रितापांचा करी क्षय म्हणून । 'क्षार' नामे संबोधिती ।।२१।। भूतप्रेतांपासून । आणि अनिष्ट ग्रहांपासून । करी साधकाचे रक्षण । म्हणूनि 'रक्षा' नाव असे ।।२२।।**

नन्दा भद्रा च सुरभिः सुशीला सुमनास्तथा ।।६।।

पंच गावो विभोर्जाताः सद्योजातादिवक्त्रतः । कपिला कृष्णा च धवला धूम्रा रक्ता तथैव च ।।७।।

नन्दादीनां गवां वर्णाः क्रमेण परिकीर्तिताः । सद्योजाताद्विभूतिश्च वामाद्भसितमेव च ।।८।।

अघोराद्भस्म संजातं तत्पुरुषात् क्षारनाम च । रक्षा चेशानवक्त्राच्च नंदादिद्वारतोऽभवत् ।।९।।

**शिवाच्या पंचमुखांतून । झाल्या पाच दिव्य गायी उत्पन्न । सद्योजातमुखातून । नंदा उत्पन्न जहाली ।।२३।। भद्रा वामदेवमुखातून । सुरभी अघोरमुखातून । सुशीला तत्पुरुषमुखातून । ईशानमुखातून सुमना ।।२४।। कपिल कृष्ण श्वेत । धूम्र आणि रक्त । अनुक्रमे त्या गार्यींत । होते पाच वर्ण असे ।।२५।। नंदेच्या गोमयापासून । झाली विभूती निर्माण । भद्रेच्या गोमयापासून । झाले उत्पन्न भसित ।।२६।। भस्म सुरभीपासून । क्षार सुशीलेपासून । रक्षा सुमनेपासून । अशी झाली पाच भस्मे ।।२७।।**

धारयेन्नित्यकार्येषु विभूतिं च प्रयत्नतः । नैमित्तिकेषु भसितं क्षारं काम्येषु सर्वदा ।।१०।।

प्रायश्चित्तेषु सर्वेषु भस्म नाम यथाविधि । रक्षा च मोक्षकार्येषु प्रयोक्तव्या सदा बुधैः ।।११।।

**नित्यकर्माच्या वेळी । विभूती धारण करावी भाळी । नैमित्तिक कर्म-काळी । धारण करावे भसित ।।२८।। काम्य कर्मात क्षार लावावे । प्रायश्चित्त घेताना भस्म चर्चावे । मोक्षप्राप्तीसाठी स्वभावे । धारण करावे रक्षाभस्म ।।२९।। अशा विशिष्ट कार्यकाळी । विशिष्ट भस्म चर्चावे भाळी । वीरशैव मतानुयायांनी सगळी । विधिपूर्वक जाणूनी ।।३०।।**

नन्दादीनां तु ये वर्णाः कपिलाद्याः प्रकीर्तिताः । त एव वर्णा विख्याता भूत्यादीनां यथाक्रमम् ।।१२।।

भस्मोत्पादनमुद्दिष्टं चतुर्धा तंत्रवेदिभिः । कल्पं चैवानुकल्पं तु उपकल्पमकल्पकम् ।।१३।।

एषामादिममुत्कृष्टमन्यत् सर्वमभावतः ।

**गार्यींचे जे जे वर्ण । तेचि त्या त्या भस्माचेही वर्ण । विभूतीचा कपिलवर्ण । कृष्णवर्ण भसिताचा ।।३१।। भस्म असे शुभ्रधवल । क्षार धुरकट रक्षा लाल । भस्मनिर्मिती-प्रक्रिया सकळ । शास्त्रवेत्त्यांनी निवेदिली ।।३२।। भस्म-उत्पत्तीचे कल्प । अनुकल्प उपकल्प अकल्प । ऐसे चतुर्विध भेद त्यात कल्प । ही उत्तम प्रक्रिया ।।३३।। कल्पनिर्मित भस्मधारण । वीरशैवांनी करावे सुजाण । ते अप्राप्त तरी मग अन्य तीन । प्रक्रियानिर्मित लावावे ।।३४।।**

यथाशास्त्रोक्तविधिना गृहीत्वा गोमयं नवम् ।।१४।।

सद्येन वामदेवेन कुर्यात् पिण्डमनुत्तमम् । शोषयेत्पुरुषेणैव दहेद् घोराच्छिवाग्निना ।।१५।।

कल्पं तद्भस्म विज्ञेयमनुकल्पमथोच्यते । वनेषु गोमयं यच्च शुष्कं चूर्णीकृतं तथा ।।१६।।

दग्धं चैवानुकल्पाख्यमापणादिगतं तु यत् । वस्त्रेणोत्तारितं भस्म गोमूत्राबद्धपिण्डितम् ।।१७।।

दग्धं प्रागुक्तविधिना भवेद्भस्मोपकल्पकम् । अन्यैरापादितं भस्माप्यकल्पमिति निश्चितम् ।।१८।।

**करीत सद्योजातमंत्रोच्चार । झेलावे ताजे गोमय वरच्यावर । ते पडू नये भूमीवर । ऐसी घेऊनि**

**दक्षता ।।३५।। करीत वामदेवमंत्रोच्चारण । करावे त्याचे गोळे लहान । जपत तत्पुरुषमंत्र महान । ते उन्हात वाळवावे ।।३६।। अघोरमंत्र उच्चारीत । ते जाळावे पवित्र अग्नीत । भस्म करूनि ठेवावे पात्रात । ते 'कल्पभस्म' जाणावे ।।३७।। रानी पडलेले शुष्क शेण । ते आणूनि चूर्ण करून । पूर्वोक्त विधीने करणे निर्माण । त्यासी म्हणती 'अनुकल्प' ।।३८।। गोमय धरावे गोळे करावे । आणि उन्हात वाळवावे। या क्रियांस येथे बरवे । स्थान नसे किंचित ।।३९।। दुकानातून भस्म आणून । वस्त्रगाळ करून गोमूत्री भिजवून । त्याचे गोळे करून ते जाळून । पूर्वोक्त विधीने करावे ।।४०।। त्यास 'उपकल्प' अभिधान । 'अकल्प' भस्म ते सर्व संस्कारहीन । ऐसे भस्मनिर्मितीचे जाण । चार प्रकार निवेदिले ।।४१।।**

एष्वेकतममादाय पात्रेषु कलशादिषु । त्रिसन्ध्यमाचरेत् स्नानं यथासंभवमेव वा ।।१९।।

**प्रक्रियानिर्मित भस्म घ्यावे । ते कलश-पात्रात ठेवावे । विधियुक्त भस्मस्नान करावे । दिवसातूनि तीन वेळा ।।४२।। ते जरी शक्य नसेल । तरी अवश्य करावे एकवेळ । भस्मस्नानाने निर्मळ । होई बाह्याभ्यंतर ।।४३।।**

स्नानकाले करौ पादौ प्रक्षाल्य विमलाम्भसा । वामहस्ततले भस्म क्षिप्त्वाच्छाद्यान्यपाणिना ।।२०।।

अष्टकृत्वाथ मूलेन मौनी भस्माभिमन्त्र्य च । शिर ईशानमन्त्रेण पुरुषेण मुखं तथा ।।२१।।

हृत्प्रदेशमघोरेण वामदेवेन गुह्यकम् । पादौ सद्येन सर्वांगं प्रणवेनैव सेचयेत् ।।२२।।

**कैसे करावे भस्मस्नान । अवधानपूर्वक करा श्रवण । जले हस्तपाद धुऊन । वाम करतली भस्म घ्यावे ।।४४।। त्यावरी ठेवावा उजवा हस्त । पंचाक्षरमंत्र शास्त्रसंमत । जपूनि ते अभिमंत्रित । आठ वेळा करावे ।।४५।। ईशानमंत्रे मस्तकावर । तत्पुरुषमंत्रे मुखावर । अघोरमंत्रे हृदयावर । वामदेवमंत्रे गुह्यभागी ।।४६।। सद्योजातमंत्रे पायांवर । ॐकारमंत्रे सर्वांगावर । भस्म उधळावे हळुवार । ह्याला नाव भस्मोद्धूलन ।।४७।। अंगावरी पडले भस्मकण । त्यांचे सर्वांगी करावे लेपन । याचे नाव भस्मस्नान । ऐक सुजाण घटोद्भवा ।।४८।।**

भस्मना विहितं स्नानमिदमाग्नेयमुत्तमम् । स्नानेषु वारुणाद्येषु मुख्यमेतन्मलापहम् ।।२३।।

**मुनिवर्या धर्मशास्त्रात । स्नाने पवित्र कथिली सप्त । तीच आता संक्षिप्त । तुजला येथे सांगतो ।।४९।। मांत्रस्नान भौमस्नान । आग्नेयस्नान वायव्यस्नान । दिव्यस्नान वारुणस्नान । मानसस्नान सातवे ।।५०।। वेदमंत्रांचा घोष करून । मस्तकावरी जल सिंचन । करणे यासी मांत्रस्नान । नाव असे शास्त्रात ।।५१।। पवित्र सरितेतील देख । ओल्या मृत्तिकेचा तिलक । रेखूनि भूषविणे मस्तक । यासी म्हणती भौम-स्नान ।।५२।। सर्व वस्तूंचे करणे दहन । ही शक्ती अग्नीत विद्यमान । भस्मस्नानात ते सामर्थ्य पूर्ण ।**

**म्हणून आग्नेय स्नान ते ।।५३।। सायंकाळी गो-खुरांनी । धूळ उडे भरे पवनी । तो पवन जाय अंग स्पर्शूनी । जाण वायव्यस्नान ते ।।५४।। सकाळी अथवा सायंकाळी । पडली असता उन्हे कोवळी । अवचित पाऊस भिजवी अवेळी । त्यासी नाव दिव्यस्नान ।।५५।। वाहणाऱ्या नितळ जलात । वा तुडुंब भरल्या सरोवरात । अवगाहन करूनि होणे स्नात । जाण वारुणस्नान ते ।।५६।। घंटानादाने निनादून । घुमत राहावे शिवसदन । तैसे अखंड अंतरी भगवच्चिंतन । जाण मानसस्नान ते ।।५७।। ऐसी पवित्र स्नाने सप्त । निरूपिली धर्मशास्त्रात । भस्मस्नान सर्व स्नानांत । सर्वश्रेष्ठ मानिले ।।५८।। मांत्र भौम वायव्य दिव्य । वारुण या स्नानांनी बाह्य-। मलांचा नाश होई असह्य । जे लिंपिती शरीरासी ।।५९।। मानसस्नानाने केवळ । अंतरीचे नाशती मळ । परि भस्मस्नानाने समूळ । अंतर्बाह्य मलनाश ।।६०।। दोन्ही मलांचा करी नाश । ऐसे भस्मस्नान विशेष । म्हणूनि शिवभक्तांनी अहर्निश । तेचि केले पाहिजे ।।६१।।**

भस्मस्नानवतां पुंसां यथायोगं दिनेदिने । वारुणाद्यैरलं स्नानैर्बाह्यदोषापहारिभिः ।।२४।।
आग्नेयं भस्मना स्नानं यतिभिस्तु विधीयते । आर्द्रस्नानात्परं भस्म आर्द्रे जन्तुवधो ध्रुवम् ।।२५।।
आर्द्रं तु प्रकृतिं विद्यात् प्रकृतिं बन्धनं विदुः । प्रकृतेस्तु प्रहाणार्थं भस्मना स्नानमिष्यते ।।२६।।

**यथाविधी भस्मस्नान । जे करिती त्यांना प्रयोजन । नसे जलादी स्नानांचे, कारण । ते बाह्य-मलनाशक ।।६२।। तपस्वी आणि योगी लोक । भस्मस्नान आग्नेय नामक । नित्य करिती ते एक । श्रेष्ठ जलस्नानापेक्षा ।।६३।। जलस्नान करिता नकळत । जीवजंतू मरती अगणित । तैसी हिंसा भस्म-स्नानात । नाही घडत कधीही ।।६४।। जल ही असे प्रकृती । ज्ञाते तिला बंधन मानिती । प्रकृतीपासूनि मिळावी मुक्ती । म्हणूनि करिती भस्मस्नान ।।६५।।**

ब्रह्माद्या विबुधाः सर्वे मुनयो नारदादयः । योगिनः सनकाद्याश्च बाणाद्या दानवा अपि ।।२७।।

भस्मस्नानयुताः सर्वे शिवभक्तिपरायणाः । निर्मुक्तदोषकलिला नित्यशुद्धा भवन्ति हि ।।२८।।

**ब्रह्मा विष्णू आदी देव । नारद-सनकादी मुनी योगी सर्व । बाणासुरादी दानव । नित्य करिती भस्मस्नान ।।६६।। ते भस्मस्नानाने युक्त । सदा लीन शिवभक्तीत । तेणे सर्वदोषरहित । होऊनि झाले परिशुद्ध ।।६७।।**

नमः शिवायेति भस्म कृत्वा सप्ताभिमन्त्रितम् । उद्धूलयेत्तेन देहं त्रिपुण्ड्रं चापि धारयेत् ।।२९।।

सर्वांगोद्धूलनं चापि न समानं त्रिपुण्ड्रकैः । तस्मात् त्रिपुण्ड्रमेवैकं लिखेदुद्धूलनं विना ।।३०।।

**भस्म हाती घेऊन । 'नमः शिवाय' मंत्र जपून । सात वेळा अभिमंत्रून । उधळावे सर्वांगी ।।६८।। त्या**

**भस्माचे त्रिपुंड्र देखणे । भालप्रदेशी सुरेख रेखणे । ते पाहता उल्हासावी मने । वीरशैव भाविकांची ।।६९।। सरोवर शोभे कमळांमुळे । सागर देखणा लाटांमुळे । आकाश उजळे चंद्रामुळे । तैसे भाळ त्रिपुंड्राने ।।७०।। सर्वांगी केले भस्मोद्धूलन । परि ते न होय त्रिपुंड्रासमान । जरी नाही केले भस्मसिंचन । तरी त्रिपुंड्र लावावे ।।७१।।**

त्रिपुण्ड्रं धारयेन्नित्यं भस्मना सलिलेन च । स्थानेषु पंचदशसु शरीरे साधकोत्तमः ।।३१।।
उत्तमांगे ललाटे च श्रवणद्वितये तथा । गले भुजद्वये चैव हृदि नाभौ च पृष्ठके ।।३२।।
बाहुयुग्मे ककुद्देशे मणिबन्धद्वये तथा । त्रिपुण्ड्रं भस्मना धार्यं मूलमन्त्रेण साधकैः ।।३३।।

**श्रेष्ठ वीरशैव साधकाने । त्रिपुंड्रधारणाची पंधरा स्थाने । जाणूनि रेखावे भस्माने । जलमिश्रित त्रिपुंड्र ।।७२।। मस्तक कपाळ दोन्ही कर्ण । कंठ द्वयभुजा हृदयस्थान । नाभी पाठ दंड दोन । मान आणि मनगटे ।।७३।। अशा पंधरा स्थानांवर । करीत पंचाक्षरमंत्रोच्चार । शिवभक्ते त्रिपुंड्र सुंदर । शुभ्र स्वच्छ रेखावे ।।७४।।**

वामहस्ततले भस्म क्षिप्त्वाच्छाद्यान्यपाणिना । अग्निरित्यादिमन्त्रेण स्पृशन् वाराभिमन्त्र्य च ।।३४।।
त्रिपुण्ड्रमुक्तस्थानेषु दध्यात् सजलभस्मना । शिवं शिवंकरं शान्तं स प्राप्नोति न संशयः ।।३५।।

भस्म वाम करतलावर । घेऊनि झाकावा उजवा कर । 'अग्निरिति भस्म' हा मंत्रोच्चार । करीत स्पर्शून जल शिंपावे ।।७५।। जलमिश्रित भस्म घेऊनी । त्याचे त्रिपुंड्र पंधरा स्थानी । धारण करावे शिवभक्तांनी । अति श्रद्धापूर्वक ।।७६।। ऐसा जो शुद्ध त्रिपुंड्रधारक । तो जे शांत शिवरूप शुभ-कारक । ते प्राप्त करूनि नि:शंक । घेई जाण कुंभोद्भवा ।।७७।।

मध्यांगुलित्रयेणैव स्वदक्षिणकरस्य तु । षडंगुलायतं मानमपि वाऽलिकमानकम् ।।३६।।
नेत्रयुग्मप्रमाणेन फाले दध्यात् त्रिपुण्ड्रकम् । मध्यमानामिकांगुष्ठैरनुलोमविलोमतः ।।३७।।
धारयेद्यस्त्रिपुण्ड्रांकं स रुद्रो नात्र संशयः ।

तर्जनी मध्यमा अनामिका । दक्षिण कराच्या अंगुली देखा । त्यांनी रेखाव्या भस्मरेखा । कपाळभरून सुरेख ।।७८।। दोन्ही नेत्रांच्या मर्यादेत । सहा अंगुलीपर्यंत । त्रिपुंड्र धारण करावे सदोदित । ही पहिली पद्धती ।।७९।। दुसरी पद्धती विलक्षण । ऐक अगस्त्या चित्त देऊन । तिला अनुलोम-विलोम धारण । ऐसे म्हणती पंडित ।।८०।। मध्यमा अनामिका या दोन । बोटांनी उजवीकडे डावीकडून । मध्ये अंतर ठेवून । दोन रेखा काढाव्या ।।८१।। मग दोन रेखांच्या मधून । डावीकडे उजवीकडून । अंगठ्याने एक रेषा आखून । त्रिपुंड्र पूर्ण करावे ।।८२।। त्रिपुंड्रधारणाची ही रीत । श्रेष्ठ मानिती सर्वांत । जो

**त्रिपुंड्रधारण करी सदोदित । तो रुद्र यात न संशय ।।८३।।**

ऋजु श्वेतमनुव्याप्तं स्निग्धं श्रोत्रप्रमाणकम् ।।३८।।

एवं सल्लक्षणोपेतं त्रिपुण्ड्रं सर्वसिद्धिदम् । प्रातःकाले च मध्याह्ने सायाह्ने च त्रिपुण्ड्रकम् ।।३९।।

कदाचिद्भस्मना कुर्यात् स रुद्रो नात्र संशयः ।

एवंविधं विभूत्या च कुरुते यस्त्रिपुण्ड्रकम् । स रौद्रधर्मसंयुक्तस्त्रयीमय इति श्रुतिः ।।४०।।

**त्रिपुंड्र असावे शुभ्रधवल । रेषा असाव्या अति सरळ । त्यांची परस्परांत सरमिसळ । न व्हावी हे पाहावे ।।८४।। ते असावे स्पष्ट अत्यंत । रेखावे दोन्ही कानांपर्यंत । ऐसे त्रिपुंड्र लक्षणयुक्त । मनोरथ पूर्ण करी ।।८५।। सकाळी माध्यान्ही सायंकाळी । जो त्रिपुंड्र धारण करितो भाळी । तो प्रत्यक्ष शिव चंद्रमौळी । यात संशय न किंचित ।।८६।। तो पूर्ण शिवाचारदक्ष । असे वेदत्रयस्वरूप प्रत्यक्ष । ऐसी श्रुती देती साक्ष । महती ही त्रिपुंड्रधारणाची ।।८७।।**

ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च देवाः शक्रपुरोगमाः । त्रिपुण्ड्रं धारयन्त्येव भस्मना परिकल्पितम् ।।४१।।

वसिष्ठाद्या महाभागा मुनयः श्रुतिकोविदाः । धारयन्ति सदाकालं त्रिपुण्ड्रं भस्मना कृतम् ।।४२।।

**ब्रह्मा विष्णू रुद्र इंद्रादी देव । त्रिपुंड्रधारण करिती सर्व । वेदज्ञ वसिष्ठादी ऋषी सदैव । करिती**

**त्रिपुंड्रधारण ।।८८।।**

शैवागमेषु वेदेषु पुराणेष्वखिलेषु च ।
स्मृतीतिहासकल्पेषु विहितं भस्मपुण्ड्रकम् । धारणीयं समस्तानां शैवानां च विशेषतः ।।४३।।
नास्तिको भिन्नमर्यादो दुराचारपरायणः । भस्मत्रिपुण्ड्रधारी चेन्मुच्यते सर्वकिल्बिषैः ।।४४।।

**शिवागम-वेद-पुराणांत । स्मृति-इतिहास-कल्पशास्त्रांत । भस्मधारणविधी अत्यंत । स्पष्ट कथिला कुंभोद्भवा ।।८९।। म्हणूनि सर्वांनी बरवे । भाळी त्रिपुंड्र रेखावे । वीरशैवांनी धारण करावे । अवश्यमेव प्रीतीने ।।९०।। जो वेदविरुद्धाचारी । नास्तिक असो वा दुराचारी । धर्मशास्त्राची मर्यादा जरी । त्याने उल्लंघिली असेल ।।९१।। त्याने करिता त्रिपुंड्रधारण । मुक्त होई सर्व पापांतून । ऐसे त्रिपुंड्राचे महिमान । आहे हे ध्यानी धरावे ।।९२।। भस्म हा अलंकार सात्त्विक । धारण करिती भक्त भाविक । त्याने चित्तस्थैर्य देख । लाभूनि होय आत्मलाभ ।।९३।। सोन्यारूप्याचे अलंकार । धारकासी करिती अस्थिर । त्याच्या प्रदर्शनातच चूर । चित्त होते जाणा हो ।।९४।। जर दागिना अंगावरला । कोणीच नाही पाहिला । तर लागून राहते मनाला । हुरहूर दिवसभरी ।।९५।। तैसे नव्हे भस्मभूषण । ते कोणी न्याहाळावे म्हणून । भक्त नाही प्रदर्शन । त्याचे कधी मांडीत ।।९६।। आपुले मन व्हावे प्रसन्न । हे**

**भस्मधारणाचे कारण । आणि शिवजीवैक्यज्ञान । हा लाभ सर्वश्रेष्ठ ।।९७।। आता रुद्राक्षधारणाची महती । रेणुकाचार्य विवरिती । सद्भाव धरूनिया चित्ती । श्रवण करिती अगस्त्य ।।९८।। अष्टावरणातील एक । रुद्राक्ष हे आवरण देख । बाह्य रुद्राक्षधारण लौकिक । ते स्थूल आवरण असे ।।९९।। अक्ष म्हणजे नेत्र । रुद्र-अक्ष म्हणजे शिवनेत्र । शिवाच्या दृष्टीत सर्वत्र । समत्वभाव भरलेला ।।१००।। जो भक्त करी रुद्राक्षधारण । त्याच्या दृष्टीत होई परिवर्तन । त्यासी सर्व भूते समान । दिसू लागती सर्वत्र ।।१०१।। शिवदृष्टी लाभणे पूर्ण । हेचि सूक्ष्म रुद्राक्षधारण । श्रोतेहो आता विवरण । ऐका पुढे रुद्राक्षाचे ।।१०२।।**

**रुद्राक्षधारणस्थल** - (७)

भस्मना विहितस्नानस्त्रिपुण्ड्रांकितमस्तकः । शिवार्चनपरो नित्यं रुद्राक्षमपि धारयेत् ।।४५।।

रुद्राक्षधारणादेव मुच्यन्ते सर्वपातकैः । दुष्टचित्ता दुराचारा दुष्प्रज्ञा अपि मानवाः ।।४६।।

**भस्मोद्धूलन भस्मस्नान । मस्तकी त्रिपुंड्रधारण । विधिवत् शिवभक्ताने करून । रुद्राक्ष धारण करावे ।।१०३।। जे दुष्ट वृत्तीचे दुराचारी । भ्रष्टबुद्धीचे अविचारी । त्यांची रुद्राक्षधारणेने सारी । नष्ट होती पातके ।।१०४।।**

पुरा त्रिपुरसंहारे त्रिनेत्रो जगतां पतिः । उदपश्यत् पुरां योगमुन्मीलितविलोचनः ।।४७।।

निपेतुस्तस्य नेत्रेभ्यो बहवो जलबिन्दवः । तेभ्यो जाता हि रुद्राक्षा रुद्राक्षा इति कीर्तिताः ।।४८।।

**रुद्राक्ष कैसे झाले उत्पन्न । याची एक कथा पुरातन । पूर्वी तारकासुरासी तीन । अति दुष्ट पुत्र होते ।।१०५।। तारकाक्ष कमलाक्ष विद्युन्माली । त्यांनी खडतर तपस्या केली । ब्रह्मदेवाकडूनि घेतली । तीन नगरे अभेद्य ।।१०६।। आपण आहोत अमर । ऐसा वाढला अहंकार । त्यांनी देवदेवतांवर । अत्याचार बहू केले ।।१०७।। देवांनी होऊनि संत्रस्त । मनोभावे प्रार्थिला उमानाथ । शंकर सज्ज झाले संतप्त । होऊनि त्रिपुरसंहारासी ।।१०८।। त्रिपुरे एकत्र येण्यासाठी । शिवे लाविली अनिमिष दृष्टी । त्या दृष्टीतूनि झाली वृष्टी । योगाश्रूंची अपार ।।१०९।। योगाश्रू भूमीवरी पडले । त्यातूनि रुद्राक्ष उत्पन्नले । रुद्र-अक्षापासूनि झाले । म्हणूनि नाव रुद्राक्ष ।।११०।।**

रुद्रनेत्रसमुन्पन्ना रुद्राक्षा लोकपावनाः । अष्टत्रिंशत्प्रभेदेन भवन्त्युत्पत्तिभेदतः ।।४९।।

**रुद्रनेत्रापासून उत्पन्न । म्हणूनि लोकांस करिती पावन । उत्पत्तिभेदावरून । त्यांचे प्रकार अडतीस ।।१११।।**

नेत्रात्सूर्यात्मनः शम्भोः कपिला द्वादशोदिताः । श्वेताः षोडशसंजाताः सोमरूपाद्विलोचनात् ।।५०।।

कृष्णा दशविधा जाता वह्निरूपाद्विलोचनात् । एवमुत्पत्तिभेदेन रुद्राक्षा बहुधा स्मृता ।।५१।।

सूर्यनेत्र चंद्रनेत्र । आणि तिसरा अग्निनेत्र । यामुळे शंकर त्रिनेत्र-। धारी असे जहाले ।।११२।। सूर्याच्या कला द्वादश । चंद्राच्या कला षोडश । अग्नीच्या असती दश । नामे त्यांची सांगतो ।।११३।। तपिनी धूम्रा तापिनी । मरिचा रुची ज्वलिनी । सुषम्ना भोगदा बोधिनी । विश्वा धारिणी आणि क्षमा ।।११४।। या बारा सूर्यकलांपासून । बारा रुद्राक्ष झाले उत्पन्न । कपिलवर्णाचे, करी श्रवण । सोळा कला चंद्राच्या ।।११५।। अमृता मानदा पूषा रती । तुष्टा पुष्टा शशिनी धृती । चंद्रिका ज्योत्स्ना कांती श्री प्रतीती । अंगदा पूर्णा पूर्णामृता ।।११६।। ह्या सोळा चंद्रकलांपासून । सोळा प्रकारचे रुद्राक्ष निर्माण । झाले त्यांचा शुभ्रवर्ण । आता कथितो अग्निकला ।।११७।। धूम्रा अर्ची ऊष्मा ज्वलिनी । सुश्री सुरूपा विस्फुल्लिंगिनी । कपिला हव्यकव्यवहा ज्वालिनी । या दश कला अग्नीच्या ।।११८।। दश अग्निज्वालांपासून । झाले दहा रुद्राक्ष कृष्णवर्ण । त्यांचे उत्पत्तिभेदांवरून । झाले प्रकार अडतीस ।।११९।।

अच्छिद्रं कनकप्रख्यमनन्यधृतमुत्तमम् । रुद्राक्षं धारयेत् प्राज्ञः शिवपूजापरायणः ।।५२।।

यथास्थानं यथावक्त्रं यथायोगं यथाविधि । रुद्राक्षधारणं वक्ष्ये रुद्रसायुज्यसिद्धये ।।५३।।

लागली नाही कीड ज्यास । जे सोन्यासारखे लोभस । ज्याने भूषविले नाही देहास । कोणाच्याही आजवरी ।।१२०।। ऐसे रुद्राक्ष उत्तम पूर्ण । तेचि करावे नित्य धारण । बुद्धिमान शिवपूजापरायण ।

**अशा शिवभक्ताने ।।१२१।। हे अगस्त्या करी श्रवण । शिवसायुज्य मुक्तीलागून । किती मुखांचे किती धारण । रुद्राक्ष करावे सांगतो ।।१२२।।**

शिखायामेकमेकास्यं रुद्राक्षं धारयेद् बुधः । द्वित्रिद्वादशवक्त्राणि शिरसि त्रीणि धारयेत् ।।५४।।
षट्त्रिंशद्धारयेन्मूर्ध्नि नित्यमेकादशानान् । दशसप्तपंचवक्त्रान् षट षट् कर्णद्वये वहेत् ।।५५।।
षडष्टवदनान् कण्ठे द्वात्रिंशद्धारयेत् सदा । पंचाशद्धारयेद् विद्वान् चतुर्वक्त्राणि वक्षसि ।।५६।।
त्रयोदशमुखान् बाह्वोर्धरेत् षोडश षोडश । प्रत्येकं द्वादश वहेन्नवास्यान् मणिबन्धयोः ।।५७।।
चतुर्दशमुखं यज्ञसूत्रमष्टोत्तरं शतम् । धारयेत् सर्वकालं तु रुद्राक्षं शिवपूजकः ।।५८।।

**शिखेत एकमुखी एक रुद्राक्ष । मस्तकी दोन-तीन-बारामुखी तीन रुद्राक्ष । मस्तकाभोवती अकरामुखी छत्तीस । असे करावे धारण ।।१२३।। पंच-सप्त-दशमुखी दोन दोन । सहा रुद्राक्षांनी भूषवावे कर्ण । सहा-आठमुखी सोळा सोळा एकूण । बत्तीस कंठी बांधावे ।।१२४।। चार मुखांचे पन्नास । वक्षःस्थळी धारण करावे विशेष । त्रयोदशमुखी षोडश षोडश । बांधावे दोन बाहूंवरी ।।१२५।। नऊमुखी द्वादश द्वादश । दोन मनगटी रुद्राक्ष चोवीस । एकशे आठ चतुर्दश-। मुखी ब्रह्मसूत्रासम ।।१२६।। एकशे आठ रुद्राक्षमाळा । वीरशैवांनी घालावी गळा । ऐसा रुद्राक्षधारणाचा सगळा । विधी घ्यावा जाणूनी ।।१२७।।**

एवं रुद्राक्षधारी यः सर्वकाले तु वर्तते । तस्य पापकथा नास्ति मूढस्यापि न संशयः ।।५९।।

ब्रह्महा मद्यपायी च स्वर्णहृद् गुरुतल्पगः ।

मातृहा पितृहा चैव भ्रूणहा कृतघातकः । रुद्राक्षधारणादेव मुच्यते सर्वपातकैः ।।६०।।

**सर्वकाळ जो माणूस । धारण करितो रुद्राक्षास । तो मूढ तरी पापस्पर्श । त्यास कधी होईना ।।१२८।। असो मद्यपी वा ब्रह्मघातकी । गुरुभार्यागमनी वा सुवर्णचोर की । भ्रूणहत्यारा वा मातृपितृघातकी । असो कृतघ्न कैसाही ।।१२९।। त्याने करिता रुद्राक्षधारण । पापे ध्वस्त होती पूर्ण । ऐसे रुद्राक्ष-धारणाचे महिमान । असे जाण अगस्त्या ।।१३०।।**

दर्शनात् स्पर्शनाच्चैव स्मरणादपि पूजनात् । रुद्राक्षधारणाल्लोके मुच्यन्ते पातकैर्जनाः ।।६१।।

ब्राह्मणो वान्त्यजो वापि मूर्खो वा पण्डितोऽपि वा । रुद्राक्षधारणादेव मुच्यते सर्वपातकैः ।।६२।।

**रुद्राक्षाचे घेता दर्शन । स्पर्श-स्मरण-पूजन-धारण । करिता लोक पापांतून । मुक्त होती जगातील ।।१३१।। ब्राह्मण असो वा पददलित । अज्ञ असो वा पंडित । रुद्राक्षधारणाने मुक्त । सर्व होती पापांतूनी ।।१३२।।**

गवां कोटिप्रदानस्य यत्फलं भुवि लभ्यते । तत्फलं लभते मर्त्यो नित्यं रुद्राक्षधारणात् ।।६३।।

मृत्युकाले च रुद्राक्षं निष्पीड्य सह वारिणा । यः पिबेच्चिन्तयन् रुद्रं रुद्रलोकं स गच्छति ॥६४॥

**एक कोटी गाई दान । केल्याने लाभे पुण्य पूर्ण । तेवढेच रुद्राक्षधारण । केल्यावरी लाभते ॥१३३॥ जवळी येता अंतकाळ । रुद्राक्ष धुतलेले जळ । प्राशन करिता तत्काळ । रुद्रलोकी तो जाई ॥१३४॥**

भस्मोद्धूलितसर्वांगा धृतरुद्राक्षमालिकाः । ये भवन्ति महात्मानस्ते रुद्रा नात्र संशयः ॥६५॥

**सर्वांग भस्मविभूषित । रुळती रुद्राक्षमाळा कंठात । तो प्रत्यक्ष रुद्रचि असे यात । नाही संशय अगस्त्या ॥१३५॥**

नित्यानि काम्यानि निमित्तजानि कर्माणि सर्वाणि सदापि कुर्वन् ।
योऽभस्मरुद्राक्षधरो यदि स्याद् द्विजो न तस्यास्ति फलोपपत्तिः ॥६६॥

**नित्य नैमित्तिक काम्यकर्म । सर्व आचरितो यथाकर्म । तो असेल जरी ब्राह्मण परम । परि भस्म-रुद्राक्षवियुक्त ॥१३६॥ त्याने कितीही केले कर्मानुष्ठान । तरी ते न फळेचि जाण । म्हणूनि भस्म-रुद्राक्षधारण । अवश्यमेव करावे ॥१३७॥**

सर्वेषु वर्णाश्रमसंगतेषु नित्यं सदाचारपरायणेषु ।
श्रुतिस्मृतिभ्यामिह चोद्यमानो विभूतिरुद्राक्षधरः समानः ॥६७॥

ब्राह्मणादी चतुर्वर्णांत । ब्रह्मचर्यादी आश्रमांत । जे असती सदाचाररत । त्या सर्व लोकांमध्ये ।।१३८।। जो करी नित्य भस्मधारण । तोचि असे श्रेष्ठ सर्वांहून । स्तुत्य श्रुति-स्मृतीकडून । तो असे सर्वदा ।।१३९।। समत्वबुद्धीचे प्रतीक । रुद्राक्षधारण असे एक । तो समान मानितो लोक । शिवसमदृष्टीमुळे ।।१४०।। म्हणूनि रुद्राक्षांनी शरीर । भक्तांनी भूषवावे निरंतर । आणि समदृष्टीने निर्वैर । पाहावे सर्व जीवमात्र ।।१४१।। संपले रुद्राक्षधारणस्थल । पुढे ऐकावे पंचाक्षरीजपस्थल । जगद्‌गुरू रेणुकाचार्य कथितील । शिष्योत्तम अगस्त्यासी ।।१४२।। शिवस्वरूप जगद्‌गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१४३।। श्रीसिद्धान्तशिखामणि-तत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । सप्तमोऽध्याय पूर्ण हा ।।१४४।।

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतभक्तस्थले विभूतिरुद्राक्षधारणप्रसंगो नाम सप्तमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय आठवा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‍गुरु द्विवक्त्र शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः शिवाप्रियाय । उग्राय नमः गंगाधराय । अंधकासुरसूदनाय नमः ललाटाक्षाय । कालकालाय नमः कामारये ।।१।। तुझे नाम येता वदनी । पापे पळती दशदिशांनी । होई अमृतत्वाचा जीवनी । लाभ सहज-मात्रेचि ।।२।। जो नाम घेई एकवेळ । त्याचे न पाहता जातिकुळ । सायुज्य पदवी देतोसी अढळ । ऐसे तुझे कृपाळुत्व ।।३।। तुझ्या नाममंत्राची महती । वर्णायासी देई शक्ती । जरी असेन अल्पमती । तरी बोलेन तव कृपे ।।४।। श्रोतेहो व्हावे सावधान । शुद्धचित्ते करावे श्रवण । जगद्‍गुरू रेणुकाचार्य ज्ञान । निरूपतील अगस्तीसी ।।५।। पंचाक्षर मंत्र महान । ते परशिवाचे अभिधान । मंत्र हे एक आवरण । असे अष्टावरणात ।।६।। वाणी-मनाने पवित्र । जपणे पंचाक्षरी महामंत्र । हे स्थूल आवरण मात्र । असे जाणा श्रोतेहो ।।७।। मंत्र जपता जपता महान । अंतरी प्रकटे शिवजीवैक्यज्ञान । तेचि सूक्ष्म आवरण । ऐसे मनी जाणावे ।।८।। हे पंचाक्षरीजपस्थल । ऐका जातील मनोमळ । मन-बुद्धी होईल निर्मळ । मोक्षसुखाचे राज्य लाभे ।।९।।**

## **पंचाक्षरीजपस्थल** - (८)

धृतश्रीभूतिरुद्राक्षः प्रयतो लिंगधारकः । जपेत्पंचाक्षरीविद्यां शिवतत्त्वप्रबोधिनीम् ।।१।।

**विभूति-रुद्राक्षधारणे पुनीत । झाला जो लिंगधारी शिवभक्त । त्याने प्रसिद्ध जो श्रीरुद्रात । तो पंचाक्षरी मंत्र जपावा ।।१०।। पंचाक्षर मंत्र व्यापक । परशिवतत्त्वाचा प्रकाशक । शिवजीवैक्यज्ञान-प्रदायक । हृदयी धरावा भक्तीने ।।११।।**

शिवतत्त्वात् परं नास्ति यथा तत्त्वान्तरं महत् । तथा पंचाक्षरीमन्त्रान्नास्ति मन्त्रान्तरं महत् ।।२।।

ज्ञाते पंचाक्षरीमन्त्रे किं वा मन्त्रान्तरैः फलम् । ज्ञाते शिवे जगन्मूले किं फलं देवतान्तरैः ।।३।।

सप्तकोटिषु मन्त्रेषु मंत्रः पंचाक्षरो महान् । ब्रह्मविष्ण्वादिदेवेषु यथा शंभुर्महत्तरः ।।४।।

**शिवतत्त्वापेक्षा महान । नसे दुसरे तत्त्व विद्यमान । तैसा पंचाक्षरी महामंत्राहून । श्रेष्ठ अन्य मंत्र नसे ।।१२।। जे विश्वाचे मूलकारण । त्या शिवाचे झाल्यावरी ज्ञान । नसेचि काही प्रयोजन । अन्य देवता-ज्ञानाचे ।।१३।। तैसे सर्व मंत्रांचे मूळ । जो पंचाक्षरीच केवळ । त्याच्या ज्ञानानंतर सकळ । अन्य मंत्र निरर्थक ।।१४।। सप्तकोटी मंत्रांत । पंचाक्षरी मंत्र श्रेष्ठ पुनीत । ब्रह्मादी तेहतीस कोटी देवांत । श्रेष्ठ असे शिव जसा ।।१५।।**

अशेषजगतां हेतुः परमात्मा महेश्वरः । तस्य वाचकमंत्रोऽयं सर्वमंत्रैककारणम् ।।५।।

तस्याभिधानमन्त्रोऽयमभिधेयश्च स स्मृतः । अभिधानाभिधेयत्वान्मन्त्रात् सिद्धः परः शिवः ।।६।।

**सर्व विश्वाचे कारण । जो परमात्मा शिव पूर्ण । त्याचा वाचक मंत्र जो कारण । असे सर्व मंत्रांसी ।।१६।। पंचाक्षरी शिवाचे अभिधान । अभिधेय असे शिव पूर्ण । अभिधान-अभिधेयसंबंधे जाण । मंत्र करितो शिव सिद्ध ।।१७।।**

नमःशब्दं वदेत्पूर्वं शिवायेति ततः परम् । मंत्रः पंचाक्षरो ह्येष सर्वश्रुतिशिरोगतः ।।७।।

आदितः परिशुद्धत्वान्मलत्रयवियोगतः । शिव इत्युच्यते शम्भुश्चिदानन्दघनः प्रभुः ।।८।।

**'नमः' शब्दाचा प्रथम उच्चार । 'शिवाय' शब्दाचा नंतर । हा महामंत्र पंचाक्षर । असे वेदांच्या शीर्षस्थानी ।।१८।। जो परशिव चिदानंदघन । मलत्रयविरहित संपूर्ण । तो अत्यंत परिशुद्ध म्हणून । 'शिव' त्यासी संबोधिती ।।१९।।**

आस्पदत्वादशेषाणां मंगलानां विशेषतः । शिवशब्दाभिधेयो हि देवदेवस्त्रियम्बकः ।।९।।

शिव इत्यक्षरद्वन्द्वं परब्रह्मप्रकाशकम् । मुख्यवृत्त्या तदन्येषां शब्दानां गुणवृत्तयः ।।१०।।

**सर्व मंगलांचा आश्रय । त्र्यंबक हा देवाधिदेव । असे विशेषत्वाने म्हणून 'शिव' । हे त्यासी**

**अभिधान ।।२०।। मुख्य वृत्तीने केवळ 'शिव' । हे परब्रह्माचे प्रकाशक नाव । ते शिवस्वरूपाचे वैभव । दाखविते साक्षात् ।।२१।। भव शंकर ईशान । आदी शिवाची जी नावे जाण । ती गुणवृत्तीने स्वरूपवर्णन । करिती म्हणूनि गौण ती ।।२२।।**

तस्मान्मुख्यतरं नाम शिव इत्यक्षरद्वयम् । सच्चिदानंदरूपस्य शंभोरमिततेजसः ।।११।।

**शंभू अपरिमित तेजोघन । सच्चिदानंदस्वरूप पूर्ण । 'शिव' हेचि त्याचे जाण । मुख्य श्रेष्ठ नाव असे ।।२३।। अष्टादश विद्यांत उत्कृष्ट । चार वेद असती श्रेष्ठ । चहू वेदांत श्रीरुद्र बलिष्ठ । त्यात श्रेष्ठ अष्टम अनुवाक् ।।२४।। अष्टम अनुवाकात साच । 'नमः शिवाय शिवतराय च' । हा मंत्र श्रेष्ठ त्यात 'शिव' हीच । दोन अक्षरे श्रेष्ठतम ।।२५।। मंत्रांमध्ये सप्तकोटी । 'शिव' ही द्वय अक्षरे गोमटी । तेणे पंचाक्षर मंत्र शेवटी । ठरला असे सर्वश्रेष्ठ ।।२६।। शिव हा परमपावन शब्द । त्याचे अर्थ असती विविध । जो सर्वांसी कल्याणप्रद । त्यासी 'शिव' हे नाव ।।२७।। देव असो वा दानव मानव । सर्वांप्रती समान भाव । म्हणूनि त्यास म्हणती शिव । शिवदृष्टी असल्याने ।।२८।। सर्वज्ञता अनादिबोध तृप्ती । स्वतंत्रता नित्य अलुप्तशक्ती । अनंतशक्ती ही षडैश्वर्यसंपत्ती । त्याच्याठायी परिपूर्ण ।।२९।। म्हणूनि त्याचे नाव 'शिव' । आणव-माया-कार्मिक मलत्रय । यांच्याविरहित, तो आश्रय । असे इच्छा-**

**शक्तीचा ।।३०।। लोककल्याणाकारण । सृष्ट्योत्पत्तीची इच्छा उत्पन्न । होतसे त्याच्याठायी पूर्ण । तो असे पूर्ण प्रकाशरूप ।।३१।। तो निर्विकार परम । तो शुद्ध बुद्ध नित्य परब्रह्म । सर्व जीव पावती विराम । त्याच्यातच कल्पांती ।।३२।। प्राणिमात्र-कल्याणकारकत्व । उत्कृष्ट गुणविशेषत्व । अनादि मलत्रयरहितत्व । आश्रय इच्छादी शक्तींचा ।।३३।। संपूर्ण जगताचा जे आधार । स्वप्रकाशरूप निर्विकार । ज्याने व्यापिले चराचर । त्या तत्त्वाचे 'शिव' नाम ।।३४।।**

एतन्नामावलम्बेन मंत्रः पंचाक्षरः स्मृतः । यस्मादतः सदा जप्यो मोक्षकांक्षिभिरादरात् ।।१२।।

यथाऽनादिर्महादेवः सिद्धः संसारमोचकः । तथा पंचाक्षरो मन्त्रः संसारक्षयकारकः ।।१३।।

**जे मोक्षार्थी शिवभक्त । त्यांनी 'शिव' शब्दाने घटित । ऐसा पंचाक्षरी मंत्र सतत । परमादरे जपावा ।।३५।। अनादी परशिवब्रह्म चिद्घन । मुक्त करी संसारबंधनातून । तैसा पंचाक्षरी मंत्र महान । छेदी संसारपाशासी ।।३६।।**

पंचभूतानि सर्वाणि पंचतन्मात्रकाणि च । ज्ञानेन्द्रियाणि पंचापि पंचकर्मेन्द्रियाणि च ।।१४।।

पंचब्रह्माणि पंचापि कृत्यानि सह कारणैः । बोध्यानि पंचभिर्वर्णैः पंचाक्षरमहामनोः ।।१५।।

**पंचाक्षरमंत्र करी संसारनाश । पण कारणही तोच सृष्टीस । जी पंचधा तत्त्वे विशेष । ती प्रकाशितो**

**पंचाक्षरी ।।३७।। पृथ्व्यादी महाभूते पाच । गंध-रसादी तन्मात्रा पाच । नेत्र-नासिकादी ज्ञानेन्द्रिये पाच । वाक्-हस्तादी पंच कर्मेन्द्रिये ।।३८।। शिव-अमूर्तादी सादाख्य पंच । सदाशिव-ईशादी ब्रह्म पंच । आचार-शिवादी लिंगे पंच । सृष्टि-स्थित्यादी पंचकृत्ये ।।३९।। अगस्त्या ही सर्व जाण । प्रकाशित पंचाक्षर मंत्रापासून । म्हणूनि तो संसारनाशासी कारण । तैसाच निर्मितीसही असे ।।४०।।**

पंचधा पंचधा यानि प्रसिद्धानि विशेषतः । तानि सर्वाणि वस्तूनि पंचाक्षरमयानि हि ।।१६।।

**पराशक्ती आदिशक्ती । इच्छाशक्ती ज्ञानशक्ती । क्रियाशक्ती ह्या पंचशक्ती । आणि पंच ज्ञानेंद्रिये ।।४१।। आचारलिंग गुरुलिंग । शिवलिंग जंगमलिंग । आणि पाचवे प्रसादलिंग । ही पंचलिंगे, पंच कर्मेंद्रिये ।।४२।। मन बुद्धी अहंकार । प्रकृती पुरुष हे चराचर । जे जे पंचसंख्येने साकार । ते सर्व पंचाक्षरमय ।।४३।। पाहा सुवर्णाचे कुंडल । जैसे सुवर्णचि असे मूळ । तैसे पंचसंख्यानिर्दिष्ट ते सकळ । असे पंचाक्षरमय ।।४४।।**

ओंकारपूर्वो मंत्रोऽयं पंचाक्षरमयः परः । शैवागमेषु वेदेषु षडक्षर इति स्मृतः ।।१७।।

मंत्रस्यास्यादिभूतेन प्रणवेन महामनोः । प्रबोध्यते महादेवः केवलश्चित्सुखात्मकः ।।१८।।

प्रणवेनैकवर्णेन परब्रह्म प्रकाश्यते । अद्वितीयं परानन्दं शिवाख्यं निष्प्रपंचकम् ।।१९।।

पंचाक्षराआधी ॐकार । लाविता तो होई षडक्षर । मग त्यासी षडक्षर मंत्र साचार । संबोधिती वेदागम ।।४५।। मंत्रारंभीचा प्रणव । बोधितो चिदानंदरूप महादेव । निष्प्रपंच अद्वितीय शिव । होय प्रकाशित प्रणवाने ।।४६।। 'ॐकार' शब्द उच्चारणे । हेचि शिवाचे स्तवन करणे । यासम स्तुती अन्य शब्दाने । होत नाही कोणत्या ।।४७।। ॐकारास दुजे नाव । शास्त्रात म्हणती 'प्रणव' । प्रणव शब्दाचे अभिनव । अर्थ कथिले शास्त्रांनी ।।४८।। प्र म्हणजे प्राकृतिक भवार्णव । नूतन नौका म्हणजे णव । संसारसागरात तारी प्रणव । म्हणूनि नाव ते त्याचे ।।४९।। प्र म्हणजे प्रपंचबाधा । ण म्हणजे न होय कदा । व म्हणजे जो जपतो सदा । प्रणवमंत्र तो साधक ।।५०।। जो प्रणवजप करितो सतत । तो संसारबाधेपासूनि मुक्त । आणखीही एक अर्थ । ज्ञात्यांनी कथिला असे ।।५१।। प्र म्हणजे प्रकर्षाने । ण म्हणजे नयति घेऊनि जाणे । व म्हणजे तुम्हास बळाने । नेतो मोक्षासी प्रणव तो ।।५२।।

परमात्ममनुर्ज्ञेयः सोऽहंरूपः सनातनः । जायते हसयोर्लोपादोमित्येकाक्षरो मनुः ।।२०।।

'सोऽहम्' या अजपा मंत्रात । स ह हे वर्ण होता लुप्त । उरे ॐ हे अवशिष्ट । एकमेव एकाक्षर ।।५३।। ॐ म्हणजे प्रणव जाण । ते निष्प्रपंच ब्रह्माचे प्रतिपादन । करी आणि ते असे कारण । लिंगांग-सामरस्याचे ।।५४।। अ उ म हे वर्ण । सत् चित् आनंद ह्या तीन । परब्रह्मस्वरूपाचे बोधन । करिती

**जाण अगस्त्या ।।५५।।**

प्रणवेनैव मंत्रेण बोध्यते निष्कलः शिवः । पंचाक्षरेण मंत्रेण पंचब्रह्मतनुस्तथा ।।२१।।

निष्कलः संविदाकारः सकलो विश्वमूर्तितः । उभयात्मा शिवो मंत्रे षडक्षरमये स्थितः ।।२२।।

**चिन्मय ब्रह्म म्हणजे 'निष्कल' । सगुण ईश्वर म्हणजे 'सकल' । सद्योजातादी पंचब्रह्मासी अखिल । 'सकल' ऐसे नाव असे ।।५६।। निष्कल हे ज्ञानस्वरूप । सकल हे विश्वरूप । निष्कल-सकल उभयरूप । असे शिव परमात्मा ।।५७।। 'निष्कल' शिवरूपाचे ज्ञान । प्रणवमंत्र देई करून । पंचाक्षरी मंत्र ज्ञान । देई 'सकल' रूपाचे ।।५८।। प्रणवयुक्त पंचाक्षर । ज्यासी म्हणती षडक्षर । त्याने दोन्ही शिवरूपांचा समग्र । बोध होतो जाणिजे ।।५९।।**

मूलं विद्या शिवः शैवं सूत्रं पंचाक्षरस्तथा । एतानि नामधेयानि  कीर्तितानि महामनोः ।।२३।।

पंचाक्षरीमिमां विद्यां प्रणवेन षडक्षरीम् । जपेत् समाहितो भूत्वा शिवपूजापरायणः ।।२४।।

**मूलमंत्र विद्यामंत्र । शिवमंत्र शैवसूत्रमंत्र । आणि पंचाक्षरमंत्र । ही पाच नावे मंत्राची ।।६०।। सर्व मंत्रांचे असे मूळ । म्हणूनि यासी नाव 'मूल' । मंत्रजपे विद्या सकळ । प्राप्त म्हणूनि 'विद्यामंत्र' ।।६१।। सर्व मंगलकारक मंत्र । म्हणूनि म्हणती 'शिवमंत्र' । शिव आणि भक्तांमधील सूत्र । म्हणूनि 'शैवसूत्र'**

**हा ।।६२।। पाच अक्षरांनी घडला । म्हणूनि 'पंचाक्षर' म्हणती याला । असती या महामंत्राला । पाच नामे अशी ही ।।६३।। महाविद्या पंचाक्षरी । ॐकार मिसळता होय षडक्षरी । प्रणवयुक्त शिव-पंचाक्षरी । जपावा शिवपूजानिष्ठाने ।।६४।। पंचाक्षर मंत्रात बीजाक्षर । संयुक्त होता पाच प्रकार । होती पहिला प्रसादपंचाक्षर । मायापंचाक्षर दुसरा तो ।।६५।। तिसरा सूक्ष्मपंचाक्षर । चौथा स्थूलपंचाक्षर । पाचवा मूलपंचाक्षर । ऐसे पाच जाणावे ।।६६।।**

प्राणायामत्रयं कृत्वा प्राङ्मुखोदङ्मुखोऽपि वा । चिन्तयन् हृदयाम्भोजे देवदेवं त्रियम्बकम् ।।२५।।
सर्वालंकारसंयुक्तं सांबं चन्द्रार्धशेखरम् । जपेदेतां महाविद्यां शिवरूपामनन्यधीः ।।२६।।

**पूर्व वा उत्तराभिमुख बैसून । प्राणायाम करावे तीन । सर्व वृत्ती एकवटून । स्थिर कराव्या हृदयकमली ।।६७।। सालंकृत पार्वतीसह । ध्यावा चंद्रमौळी महादेव । एकाग्रतेने जपावा एकमेव । शिवस्वरूप महामंत्र ।।६८।।**

जपस्तु त्रिविधः प्रोक्तो वाचिकोपांशुमानसः । श्रूयते यस्तु पार्श्वस्थैर्यथा वर्णसमन्वयः ।।२७।।
वाचिकः स तु विज्ञेयः सर्वापाशप्रभंजनः । ईषत्स्पृष्ट्वाधरपुटं यो मंदमभिधीयते ।।२८।।
पार्श्वस्थैरश्रुतः सोऽयमुपांशुः परिकीर्तितः ।

अस्पृष्टवाधरमस्पन्दि जिह्वाग्रं योऽन्तरात्मना । भाव्यते वर्णरूपेण स मानस इति स्मृतः ।।२९।।

**वाचिक उपांशू मानसिक । ऐसा जप त्रिविध देख । जो स्पष्ट ऐकती लोक । तो 'वाचिक' जप असे ।।६९।। सामान्यत: लोक भोवती । हाचि वाचिक जप करिती । याने पापे नष्ट होती । जी घडती इंद्रियांकडून ।।७०।। हलती किंचित दोन अधर । ऐकू न ये मंत्रोच्चार । हा 'उपांशू' जपप्रकार । ध्यानी घेई कुंभोद्‌भवा ।।७१।। ओठ जिव्हा न हाले । जप अंतरंगात चाले । मन मंत्रोच्चारात गुंतले । तो जप जाण 'मानस' ।।७२।।**

यावन्तः कर्मयज्ञाद्या व्रतदानतपांसि च । सर्वे ते जपयज्ञस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ।।३०।।

माहात्म्यं वाचिकस्यैतज्जपयज्ञस्य कीर्तितम् । तस्माच्छतगुणोपांशुः साहस्रो मानसः स्मृतः ।।३१।।

**ज्योतिष्टोमादी यज्ञाचरण । चांद्रायणादी व्रते जाण । गोभू-दाने पंचाग्निसाधन । ही जरी केली एकत्र ।।७३।। ती सर्वही मिळून । नाही जपयज्ञासमान । जपाच्या सोळाव्या अंशाशी जाण । तुळू न शकती कदापि ।।७४।। जे हे आता कथिले फल । ते वाचिक जपाचे केवळ । त्याहूनि उपांशू जपाचे फल । शतपटीने अधिक ।।७५।। वाचिक जप एकपट । त्याहूनि उपांशू शतपट । उपांशूपेक्षा सहस्र-पट । मानसजप फलप्रद ।।७६।।**

वाचिकात् तदुपांशोश्च जपादस्य महामनोः । मानसो हि जपः श्रेष्ठो घोरसंसारनाशकः ।।३२।।

एतेष्वेतेन विधिना यथाभावं यथाक्रमम् । जपेत् पंचाक्षरीमेतां विद्यां पाशविमुक्तये ।।३३।।

**जो मुमुक्षू साधक । त्याने जप करावा मानस देख । तो घोर संसारनाशक । श्रेष्ठ वाचिक-उपांशुहूनी ।।७७।। तीन जपांपैकी पूर्वोक्त । कोणताही जपावा विधियुक्त । यथाक्रम भक्ताने जपता मुक्त । होई संसारपाशातूनी ।।७८।।**

अनेन मूलमंत्रेण शिवलिंगं प्रपूजयेत् । नित्यं नियमसम्पन्नः प्रयतात्मा शिवात्मकः ।।३४।।

भक्त्या पंचाक्षरेणैव यः शिवं सकृदर्चयेत् । सोऽपि गच्छेच्छिवस्थानं मंत्रस्यास्यैव गौरवात् ।।३५।।

**यमनियमादींनी संपन्न । शुद्ध अंत:करणे प्रतिदिन । शिवभक्ते मूलमंत्र जपून । लिंगपूजन करावे ।।७९।। पंचाक्षरी जपूनि एकवेळ । जो शिवलिंगपूजा करील । त्या भक्तासी प्राप्त होईल । मंत्रबळाने शिवलोक ।।८०।।**

अब्भक्षा वायुभक्षाश्च ये चान्ये व्रतकर्शिताः । तेषामेतैर्व्रतैर्नास्ति शिवलोकसमागमः ।।३६।।

तस्मात्तपांसि यज्ञाश्च व्रतानि नियमास्तथा । पंचाक्षरार्चनस्यैते कोट्यंशेनापि नो समाः ।।३७।।

**जे राहती जल पिऊन । अथवा करिती वायू भक्षण । करिती खडतर तपाचरण । त्यांना मिळेना**

**शिवलोक ॥८१॥ परि जो जपे पंचाक्षरी सतत । शिवलोक त्यासी सहज प्राप्त । म्हणूनि सर्व तपाचरणांत । श्रेष्ठ असे जपयज्ञ ॥८२॥ जे पंचाक्षरीसह होते पूजन । त्याच्या कोट्यंशासमान । तप यज्ञ व्रते नियम जाण । न होती कधीच ॥८३॥**

अशुद्धो वा विशुद्धो वा सकृत् पंचाक्षरेण यः । पूजयेत् पतितो वापि मुच्यते नात्र संशयः ॥३८॥

सकृदुच्चारमात्रेण पंचाक्षरमहामनोः । सर्वेषामपि जन्तूनां सर्वपापक्षयो भवेत् ॥३९॥

**पापी असो वा पुण्यवान । त्याने एकवेळ पंचाक्षरी जपून । पूजिला शिव तरी तो संसारातून । मुक्त होई निस्संशय ॥८४॥ पंचाक्षर महामंत्र प्रबळ । तो जरी उच्चारिला एकवेळ । तरी प्राणिमात्रांच्या सकळ । पापांचा होई संहार ॥८५॥**

अन्येऽपि बहवो मन्त्रा विद्यन्ते सकलागमे । भूयो भूयः समभ्यासात् पुरुषार्थप्रदायिनः ॥४०॥

एष मंत्रो महाशक्तिरीश्वरप्रतिपादकः । सकृदुच्चारणादेव सर्वसिद्धिप्रदायकः ॥४१॥

**शिवागमांत मंत्र अनेक । ते अनेकवार पुरश्चरणपूर्वक । जपल्यावरी उपासक । होती कृतार्थ-मनोरथ ॥८६॥ परि पंचाक्षरी सामर्थ्यवान । करी शिवजीवैक्याचे प्रतिपादन । त्याचे एकदा करिता उच्चारण । सर्व सिद्धी लाभती ॥८७॥**

पंचाक्षरीं समुच्चार्य पुष्पं लिंगे विनि:क्षिपेत् । यस्तस्य वाजपेयानां सहस्रफलमिष्यते ।।४२।।

अग्निहोत्रं त्रयो वेदा यज्ञाश्च बहुदक्षिणाः । पंचाक्षरजपस्यैते कोट्यंशेनापि नो समाः ।।४३।।

**जपूनि शिवपंचाक्षरी निर्मळ । जो वाहतो इष्टलिंगावरी फूल । सहस्र वाजपेय यज्ञांचे फल । त्यास प्राप्त होतसे ।।८८।। अग्निहोत्र त्रयवेदाध्ययन । ज्योतिष्टोमादी यागयजन । आणि षोडश दाने जाण । हे मिळूनि सर्वही ।।८९।। जो पंचाक्षर जपयज्ञ महान । त्यांच्या कोट्यंशासमान । कधीही न होती जाण । ऐसा श्रेष्ठ पंचाक्षरी ।।९०।।**

पुरा सानन्दयोगीन्द्रः शिवज्ञानपरायणः । पंचाक्षरं समुच्चार्य नारकानुदतारयत् ।।४४।।

सिद्ध्या पंचाक्षरस्यास्य शतानन्दः पुरा मुनिः । नरकं स्वर्गमकरोत् संगिरस्यापि पापिनः ।।४५।।

**पूर्वी शिवज्ञानपरायण । सानंद गणेश्वराने जाण । शिवपंचाक्षरी मंत्र उच्चारून । नारकी जीवांसी उद्धरिले ।।९१।। शतानंद ऋषीश्वराने । पंचाक्षरी मंत्रसामर्थ्याने । संगिर नामे पातक्याकारणे । स्वर्गच केला नरकाचा ।।९२।।**

उपमन्युः पुरा योगी मन्त्रेणानेन सिद्धिमान् । लब्धवान् परमेशानाच्छैवशास्त्रप्रवक्तृताम् ।।४६।।

वसिष्ठवामदेवाद्या मुनयो मुक्तकिल्बिषाः । मंत्रेणानेन संसिद्धा महातेजस्विनोऽभवन् ।।४७।।

**उपमन्यू योग्याने प्राचीन काळी । ह्या मंत्राने सिद्धी संपादिली । आचार्य पदवी शिवशास्त्रातली । मिळविली शिवाकडूनी ।।९३।। वसिष्ठ-वामदेवादी ऋषी समस्त । झाले या मंत्रे पापमुक्त । घेतली सिद्धी करूनि प्राप्त । जहाले महातेजस्वी ।।९४।।**

ब्रह्मादीनां च देवानां जगत्सृष्ट्यादिकर्मणि । मंत्रस्यास्यैव माहात्म्यात् सामर्थ्यमुपजायते ।।४८।।

किमिह बहुभिरुक्तैर्मन्त्रमेवं महात्मा
प्रणवसहितमादौ यस्तु पंचाक्षराख्यम् ।
जपति परमभक्त्या पूजयन् देवदेवं
स गतदुरितबंधो मोक्षलक्ष्मीं प्रयाति ।।४९।।

**पंचाक्षरी-मंत्रमहिमेमुळे । ब्रह्मा-विष्णु-रुद्रांसी लाभले । उत्पत्ति-स्थिति-संहार सगळे । करायासी सामर्थ्य ।।९५।। अगस्त्या काय सांगू अधिक । जो शिवभक्त भक्तिपूर्वक । शिवपूजा करूनि जपतो देख । प्रणवयुक्त पंचाक्षरी ।।९६।। तो सर्व पातकांतूनि मुक्त । होऊनि करितो मोक्षलक्ष्मी प्राप्त । पंचाक्षरी मंत्राचे सामर्थ्य । ऐसे आहे जगती या ।।९७।। रेणुकाचार्य अगस्त्यालागून । सांगती जपयज्ञाचे महिमान । श्रोतेहो तुम्हीही समजून । घ्यावे आदरपूर्वक ।।९८।। गुरुमुखातूनि होती प्राप्त । ती**

दिव्य अक्षरे मंत्र विख्यात । सप्त कोटी मंत्रांत । श्रेष्ठ मंत्र पंचाक्षरी ।।९९।। मंत्र दिसे जरी लहान । परि अत्यंत सामर्थ्यवान । जैसा महाकाय हत्तीवरी नियंत्रण । ठेवितो सान अंकुश ।।१००।। लहान ठिणगी कापसात । पडता ढीग करी भस्मसात । तैशा पापराशी अनंत । पंचाक्षरी भस्म करी ।।१०१।। शिवाशी यावा संबंध जुळून । ऐसा विचार करी मन । त्यासाठी सुलभ असे साधन । पंचाक्षरी मंत्रचि ।।१०२।। जप करणे मन:पूर्वक । म्हणजे शिवासी मारणे हाक । ती पुन:पुन्हा मारिता साधक । शिव देती प्रतिसाद ।।१०३।। मंत्रजप नव्हे प्रदर्शन । ते हृदयस्थ शिवाला आवाहन । हे शिवभक्ताने जाणून । मानस जप करावा ।।१०४।। अगर्भ सगर्भ सध्यान । हे जपाचे प्रकार तीन । जप केला प्राणायामाविण । त्यास म्हणती 'अगर्भ' ।।१०५।। प्राणायामासह केला जप । तर तो असे 'सगर्भ' जप । शिवध्यानासह करिता जप । तो असे 'सध्यान' ।।१०६।। मानसजप सध्यान । तो सर्व जपांत श्रेष्ठ जाण । ज्यासी मुक्तीची आस पूर्ण । त्याने हाचि करावा ।।१०७।। आपुल्या श्रीगुरूकडून । घ्यावी न्यासपद्धती समजून । करन्यास देहन्यास करून । मग करावा मंत्रजप ।।१०८।। घरी देवघरात गोशालेत । रम्य पर्वतावरी पवित्र वनात । नदीकाठी वा शिवालयात । जप करावा साधकाने ।।१०९।। सूर्य अग्नी गुरू दीप । चंद्र गाय विप्र आप । यांच्या साक्षीने करावा जप । पूर्व-उत्तराभिमुख

**बैसुनी ।।११०।। जपास आसनावरी बैसावे । ते कुशासन वा कंबलासन असावे । ते शुद्ध निर्मळ करूनि घ्यावे । साधकाने जपासाठी ।।१११।। जपगणना कराया सकळ । हाती असावी रुद्राक्षमाळ । मन असावे अत्यंत निश्चल । जपयज्ञ करिताना ।।११२।। डाव्या करतलावर । ठेवूनि इष्टलिंग मनोहर । जप करिता तो सत्वर । होई अत्यंत फलदायी ।।११३।। म्हणूनि अत्यंत भक्तियुक्त । अंत:करणे मंत्र जपत । करूनि घ्यावे कृतार्थ । जीवन वीरशैवांनी ।।११४।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशी-महास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।११५।। श्रीसिद्धान्त-शिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । अष्टमोऽध्याय पूर्ण हा ।।११६।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतभक्तस्थले पंचाक्षरीजपस्थलप्रसंगो नाम अष्टमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय नववा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु त्रिवक्त्र शिवाचार्याय नमः । ॐ शिवाय नमः भीमाय । कृपानिधये नमः परशुहस्ताय । मृगपाणये नमः जटाधराय । कैलासवासिने नमः कवचिने ।।१।। शब्दातूनि शब्द प्रसवत । ग्रंथ चालला विस्तारत । हे तुझ्या कृपादृष्टीचे सामर्थ्य । आले माझ्या प्रत्यया ।।२।। तूचि गुरू मातापिता । तूचि सर्वकर्ताहर्ता । वरदहस्त माझिया माथा । असाच पुढती राहू दे ।।३।। श्रोतेहो पंचाक्षरीजपस्थल । रेणुकाचार्यांनी विवरिले सकळ । आता भक्तमार्गक्रियास्थल । श्रवण करावे आवडीने ।।४।।**

**भक्तमार्गक्रियास्थल** - (९)

भूतिरुद्राक्षसंयुक्तो लिंगधारी सदाशिवः । पंचाक्षरजपोद्योगी शिवभक्त इति स्मृतः ।।१।।

**भाळी त्रिपुंड्र ठसठशीत । रुद्राक्षमाळ रुळे गळ्यात । वक्ष:स्थळावरी शोभत । इष्टलिंग साजिरे ।।५।। जपे नित्य पंचाक्षर मंत्र । अंतर्बाह्य निर्मल पवित्र । अशा साधकासी सर्वत्र । शिवभक्त म्हणूनि जाणती ।।६।। त्याचे होताचि दर्शन । वाटे उभे शिवभगवान । आणि विघ्नांसी पळता जाण ।**

**भुई थोडी होतसे ।।७।। भूलोकीचा ईश्वर । भासे ऐसे दिव्य शरीर । अशा शिवभक्तासी वारंवार । भावे वंदन करावे ।।८।। शिवभक्ताच्या ठायी जाण । बाणली असे भक्ती परिपूर्ण । ती नवविधा तिचे लक्षण । ऐक आता सांगतो ।।९।।**

श्रवणं कीर्तनं शंभोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।२।।
एवं नवविधा भक्तिः प्रोक्ता देवेन शंभुना । दुर्लभा पापिनां लोके सुलभा पुण्यकर्मणाम् ।।३।।

**श्रवण कीर्तन स्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । ही भक्ती नवविधा ।।१०।। शिवकथा ऐकावी कानी । गावी शिवाची गुणगाणी । शिवध्यान अंतःकरणी । एकाग्रभावे करावे ।।११।। शिवचरणाची करावी सेवा । मनोभावे पूजावे शिवा । प्रेमभराने घालावा । नमस्कार शिवासी ।।१२।। शिवदास्य पत्करावे । शिवाचा जिवेभावे सखा व्हावे । शिवासी अर्पण करावे । तन-मन-धन आपुले ।।१३।। पुण्यवंताकडूनि सहज घडे । पापात्म्यांच्या दृष्टीस न पडे । ऐसी नवविधा चहुकडे । भक्ती असे गाजती ।।१४।। भक्तीचे नऊ प्रकार । कथिले सदाशिवाने सविस्तर । अगस्त्या श्रवण करी सादर । भक्तमार्गक्रियास्थल ।।१५।।**

अधमे चोत्तमे वापि यत्र कुत्रचिदूर्जिता । वर्तते शांकरी भक्तिः स भक्त इति गीयते ।।४।।

भक्तिः स्थिरीकृता यस्मिन् म्लेच्छे वा द्विजसत्तमे । शंभोः प्रियः स विप्रश्च न प्रियो भक्तिवर्जितः ।।५।।

**असो अधम वा उत्तम जाण । ज्याच्या अंगी बिंबली पूर्ण । उत्कट शिवभक्ती त्या मनुजालागून । शिवभक्त म्हणावे ।।१६।। ज्याच्याठायी दृढ शिवभक्ती । तो शंकरासी प्रिय अती । ब्राह्मण असो वा अन्य याती । त्याचे नसे महत्त्व ।।१७।। जरी वेदपाठक ब्राह्मण । परि असे शिवभक्तिहीन । तरी तो न होय जाण । प्रिय कधी शिवासी ।।१८।।**

सा भक्तिर्द्विविधा ज्ञेया बाह्याभ्यंतरभेदतः । बाह्या स्थूलांतरा सूक्ष्मा वीरमाहेश्वरादृता ।।६।।

सिंहासने शुद्धदेशे सुरम्ये रत्नचित्रिते । शिवलिंगस्य पूजा या सा बाह्या भक्तिरुच्यते ।।७।।

**बाह्य आणि आभ्यंतर । हे शिवभक्तीचे दोन प्रकार । बाह्य भक्ती स्थूल, आभ्यंतर । भक्तीस म्हणती सूक्ष्म भक्ती ।।१९।। बाह्यभक्तीचे आचरण । होई वीरमाहेश्वरांकडून । आभ्यंतर भक्ती जाण । आचरिती वीरशैव ।।२०।। रमणीय पवित्र स्थानी । रत्नजडित सिंहासनी । इष्टलिंग ठेवूनि रमणे पूजनी । जाण बाह्यभक्ती ती ।।२१।।**

लिंगे प्राणं समाधाय प्राणे लिंगं तु शांभवम् । स्वस्थं मनस्तथा कृत्वा न किंचित् चिंतयेद् यदि ।।८।।

साऽऽभ्यन्तरा भक्तिरिति प्रोच्यते शिवयोगिभिः । सा यस्मिन् वर्तते तस्य जीवनं भ्रष्टबीजवत् ।।९।।

**प्राण समरस लिंगात । आणि लिंग समरस प्राणात । करूनि राहे स्थिरचित्त । अन्य चिंतन न करिता ।।२२।। लिंगचि आपुला प्राण । ऐसी जी भावस्थिती जाण । तिलाच शिवयोगी निपुण । म्हणती भक्ती आभ्यंतर ।।२३।। ज्याच्या अंतरी ही उपजे । त्याची कर्मे होती दग्धबीजे । तो जीव पुनश्च न उपजे । या मर्त्य लोकात ।।२४।।**

बहुनात्र किमुक्तेन गुह्यात् गुह्यतरा परा । शिवभक्तिर्न संदेहस्तया युक्तो विमुच्यते ।।१०।।

प्रसादादेव सा भक्तिः प्रसादो भक्तिसंभवः । यथैवांकुरतो बीजं बीजतो वा यथांकुरः ।।११।।

**काय सांगू आभ्यंतर । ही भक्ती श्रेष्ठ गुह्यतर । ज्याच्याठायी होईल स्थिर । तो मुक्त यात न संशय ।।२५।। शिवकृपाप्रसादामुळे । हृदयी ही भक्ती उमले । आणि भक्ती केल्यामुळे । मिळे शिवप्रसाद ।।२६।। अंकुर उपजे बीजातून । आणि बीज अंकुरापासून । तैसा परस्परसापेक्ष जाण । प्रसाद-भक्ती संबंध ।।२७।।**

प्रसादपूर्विका येयं भक्तिर्मुक्तिविधायिनी । नैव सा शक्यते प्राप्तुं नरैरेकेन जन्मना ।।१२।।

अनेकजन्मशुद्धानां श्रौतस्मार्तानुवर्तिनाम् । विरक्तानां प्रबुद्धानां प्रसीदति महेश्वरः ।।१३।।

**मुक्तिदात्री ही भक्ती । शिवप्रसादाने तिची प्राप्ती । एका जन्मामाजी ती । संपादिणे अशक्य ।।२८।।**

**ज्याने जन्मजन्मांतरात । केली उत्तम कर्मे विहित । श्रुति-स्मृतींना अनुसरीत । झाला असे परिशुद्ध ।।२९।। शिवध्यान शिवानुसंधान । शिवतत्त्वविवेचन नामस्मरण । यात रत जो विरागी पूर्ण । त्यावरी करिती शिव कृपा ।।३०।।**

प्रसन्ने सति मुक्तोऽभून्मुक्तः शिवसमो भवेत् । अल्पभक्त्यापि यो मर्त्यस्तस्य जन्मत्रयात्परम् ।।१४।।

**शिव होताचि प्रसन्न । भक्त मुक्त होय शिवासमान । जो अल्प भक्तियुक्त त्यासी तीन । जन्मांत लाभे मुक्तिपद ।।३१।। जो पुरुष पूर्ण भक्तियुक्त । तो एका जन्मीच होय मुक्त । लिंगपूजारत वीरशैव भक्त । एकाच जन्मी मुक्त होई ।।३२।।**

न योनियंत्रपीडा वै भवेन्नैवात्र संशयः । सांगाऽन्यूना च या सेवा सा भक्तिरिति कथ्यते ।।१५।।

सा पुनर्भिद्यते त्रेधा मनोवाक्कायसाधनैः । शिवरूपादिचिन्ता या सा सेवा मानसी स्मृता ।।१६।।

जपादि वाचिकी सेवा कर्मपूजा च कायिकी ।

**शिवभक्ती ज्याच्याठायी । त्यास गर्भवास दुःख नाही । पुनर्जन्माचे कारण काही । उरेचिना तयासी ।।३३।। नवविधा भक्तीचे भेद दोन । एक सांगा दुसरी न्यून । जी पूर्णभक्ती ती 'सांगा' जाण । अल्पभक्ती ती 'न्यूना' ।।३४।। नवविधा भक्ती उपरोक्त । सक्रिय असे देह-मनात । तीच 'सांगा' म्हणजे**

**अंगासहित । परिपूर्ण भक्ती असे ।।३५।। मन वाणी देह यांमुळे । 'सांगा' भक्तीचे भेद झाले । मानसिक वाचिक कायिक सगळे । हे तीनही प्रकार ।।३६।। नित्य शिवरूपाचे चिंतन । ही मानसिक भक्ती पूर्ण । शिवमंत्राचे उच्चारण । ही भक्ती वाचिक ।।३७।। लिंगपूजेसाठी शरीर । झिजविणे वारंवार । यास संबोधिती चतुर । कायिक भक्ती या नामे ।।३८।।**

बाह्यमाभ्यंतरं चैव बाह्याभ्यंतरमेव वा ।।१७।।
मनोवाक्कायभेदैश्च त्रिधा तद्भजनं विदुः । मनो महेशध्यानाढ्यं नान्यध्यानरतं मनः ।।१८।।
शिवनामरता वाणी वाङ्मता चैव नेतरा । लिंगैः शिवस्य चोद्दिष्टैस्त्रिपुण्ड्रादिभिरंकितः ।।१९।।
शिवोपचारनिरतः कायः कायो न चेतरः ।

**वर कथिली जी भक्ती । तिचे पुन्हा तीन भेद होती । बाह्यभक्ती आभ्यंतरभक्ती । आणि भक्ती बाह्याभ्यंतर ।।३९।। शिवध्यानी रत पूर्ण । ते मनचि असे मन । जे मन करी अन्य ध्यान । ते मन मनचि नव्हे ।।४०।। जी शिवनामी तल्लीन । ती वाणी हीच वाणी जाण । जी रत होई नामी आन । ती वाणी वाणीच नव्हे ।।४१।। भस्म-रुद्राक्ष चिन्हांकित । जो तत्पर शिवपूजेत । तो देह हाचि देह निश्चित । अन्य देह देहचि नव्हे ।।४२।। अनन्यभावे शिवचिंतन । करणे ही मानसिक भक्ती जाण ।**

**करणे शिवस्तुति-भजन । ही भक्ती वाचिक ।।४३।। अनन्यभावे शिवपूजन । करणे ही कायिक भक्ती जाण । ऐसे भक्तिप्रकार तीन । ध्यानी धरावे अगस्त्या ।।४४।।**

अन्यात्मविदितं बाह्यं शंभोरभ्यर्चनादिकम् ।।२०।।

तदेव तु स्वसंवेद्यमाभ्यंतरमुदाहृतम् । मनो महेशप्रवणं बाह्याभ्यंतरमुच्यते ।।२१।।

पंचधा कथ्यते सद्भिस्तदेव भजनं पुनः । तपः कर्म जपो ध्यानं ज्ञानं चेत्यनुपूर्वकम् ।।२२।।

**बाह्य आभ्यंतर बाह्याभ्यंतर । असे पूजेचे तीन प्रकार । जेव्हा शिवपूजादी कर्मे इतर । लोक पाहती नेत्रांनी ।।४५।। तेव्हा ते जाणावे बाह्यपूजन । इतरांस न कळता घडे पूजन । तेव्हा ती आभ्यंतर पूजा जाण । आता ऐक बाह्याभ्यंतर ।।४६।। कावळ्यासी नेत्र दोन । बुबुळ मात्र एकचि जाण । एकचि बुबुळ अधूनमधून । दोन्ही नेत्री फिरतसे ।।४७।। तैसे शिवभक्ताचे मन निर्मळ । इष्टलिंगी स्थिरावे काही काळ । मग स्थिरावे हृदयकमलातील । अंतर्लिंगात काही क्षण ।।४८।। इष्टलिंगात आणि अंतर्लिंगात । आळीपाळीने होई रत । ऐसे घडता जाणावी तेथ । बाह्याभ्यंतर लिंगपूजा ।।४९।। पंचविध असे शिवार्चन । तप कर्म जप ध्यान । आणि पाचवा प्रकार ज्ञान । हेचि शिवपंचयज्ञ ।।५०।।**

शिवार्थे देहसंशोषस्तपः कृच्छ्रादि नो मतम् । शिवार्चा कर्म विज्ञेयं बाह्यं यागादि नोच्यते ।।२३।।

जपः पंचाक्षराभ्यासः प्रणवाभ्यास एव वा । रुद्राध्यायादिकाभ्यासो न वेदाध्ययनादिकम् ।।२४।।

ध्यानं शिवस्य रूपादिचिन्ता नात्मादिचिन्तनम् । शिवागमार्थविज्ञानं ज्ञानं नान्यार्थवेदनम् ।।२५।।

इति पंचप्रकारोऽयं शिवयज्ञः प्रकीर्तितः ।

**नित्य शिवपूजा करणे । त्यासी लागती पूजासाधने । गंध पुष्प बिल्वपाने । धूप-दीप-अक्षतादी ।।५१।। ती संपादन करण्यास । जे पडती कष्ट सायास । त्यासाठी हर्षे झिजविणे देहास । यास म्हणती 'तपयज्ञ' ।।५२।। कृच्छ्र-चांद्रायणादी व्रते करून । जे करिती देहशोषण । ते नव्हे तपाचरण । मान्य वीरशैवांसी ।।५३।। धर्मशास्त्रे कथिली कर्माचरणे । ती यज्ञयागादी निष्ठेने आचरणे । यास कर्मयज्ञ या नामे । संबोधिती जरी कोणी ।।५४।। वीरशैवांचे नित्यकर्म जाण । करणे इष्टलिंग-पूजन । तेचि खरे कर्माचरण । अन्य कर्म हे कर्म नव्हे ।।५५।। पवित्र शिवपंचाक्षर । तो जपावा वारंवार । प्रणव-रुद्राध्यायाभ्यास निरंतर । करणे हाचि 'जपयज्ञ' ।।५६।। वेदादिकांचे करणे अध्ययन । हा जपयज्ञ नव्हे मान्य । हृदयी शिवरूपाचे नित्य चिंतन । करणे हाचि 'ध्यानयज्ञ' ।।५७।। शरीरोपाधी आत्म्यालागून । त्याचे अहंरूप चिंतन । करणे त्यासचि ध्यान । म्हणू नये कोणीही ।।५८।। प्राप्त होई शिवागमांपासून । तेचि केवळ असे ज्ञान । ते संपादिणे हाचि 'ज्ञानयज्ञ'**

**जाण । अन्य शास्त्रज्ञान ज्ञान नव्हे ।।५९।। ऐसे तपयज्ञ कर्मयज्ञ । जपयज्ञ ध्यानयज्ञ । ज्ञानयज्ञ हे पंचयज्ञ । करितो तोचि वीरशैव ।।६०।। यासाठी न पाहावा मुहूर्त मात्र । सोमवार वा शिवरात्र । श्रावणमास धनुर्मास पवित्र । हे पाहावे लागेना ।।६१।। लिंगपूजारत वीरशैवास । बारा महिने श्रावणमास । त्याने सर्वचि रात्रींस । शिवरात्र मानावे ।।६२।। त्याच्यासाठी सर्व वार । झाले जाणा सोमवार । त्याचे पंचयज्ञसत्र । अखंड चालले पाहिजे ।।६३।। ज्याच्या दृष्टीत खेळे शिवभाव । ज्यास भासे शिवरूप विश्व । त्याच्यासाठी वार तिथी पर्व । शुभ सर्व जहाले ।।६४।। याचा इतुकाचि इत्यर्थ । असो कोणताही वार तिथी मुहूर्त । वीरशैवाने पंचयज्ञ अविरत । निष्ठापूर्वक करावे ।।६५।।**

अनेन पंचयज्ञेन यः पूजयति शंकरम् । भक्त्या परमया युक्तः स वै भक्त इतीरितः ।।२६।।

पूजनाच्छिवभक्तस्य पुण्या गतिरवाप्यते । अवमानान्महाघोरो नरको नात्र संशयः ।।२७।।

**शिवपंचयज्ञ करून । जो करी शंकराचे पूजन । त्याचि साधकासी जाण । शिवभक्त म्हणावे ।।६६।। अशा जो पूजितो भक्तास । तो पूजक जाई सद्गतीस । अपमानिता घोर त्यास । प्राप्त नरक निश्चित ।।६७।।**

शिवभक्तो महातेजाः शिवभक्तिपराङ्मुखान् । न स्पृशेन्नैव वीक्षेत न तैः सह वसेत् क्वचित् ।।२८।।

यदा दीक्षाप्रवेशः स्याल्लिंगधारणपूर्वकः । तदाप्रभृति भक्तोऽसौ पूजयेत् स्वागमस्थितान् ।।२९।।

**जो तेजस्वी शिवभक्त । त्याची वेगळी वर्तनरीत । शिवभक्तिहीनासी किंचित । त्याने स्पर्श करू नये ।।६८।। श्रीगुरूकडून दीक्षापूर्वक । जो जहाला लिंगधारक । त्याने जे वागती आगमिक । त्या शिवभक्तांसी सन्मानावे ।।६९।।**

स्वमार्गाचारनिरताः सजातीया द्विजास्तु ये । तेषां गृहेषु भुंजीत नेतरेषां कदाचन ।।३०।।

स्वमार्गाचारविमुखैर्भविभिः प्राकृतात्मभिः । प्रेषितं सकलं द्रव्यमात्मलीनमपि त्यजेत् ।।३१।।

नार्चयेदन्यदेवांस्तु न स्मरेन्न च कीर्तयेत् । न तन्निवेद्यमश्नीयाच्छिवभक्तो दृढव्रतः ।।३२।।

**जे आचारनिष्ठ दीक्षासंपन्न । वीरशैव लिंगपूजापरायण । त्यांच्या गृही घ्यावे भोजन । अन्य गृही घेऊ नये ।।७०।। जे वीरशैवाचारहीन । त्यांनी जरी पाठविले धन । ते स्वीकारार्ह असे तरी पूर्ण । त्याचा त्याग करावा ।।७१।। जो शिवभक्त दृढव्रती । त्याने अन्य देवांची पूजा-स्तुती । ध्यान आदी कल्पांती । करू नये सर्वथा ।।७२।। अन्य देवांसी अर्पण । केले कोणी पदार्थ अन्न । त्याचे शिवभक्ताने सेवन । करू नये कदापि ।।७३।।**

यद्गृहेष्वन्यदेवोऽस्ति तद्गृहाणि परित्यजेत् । नान्यदेवार्चकान् मर्त्यान् पूजाकाले निरीक्षयेत् ।।३३।।

सदा शिवैकनिष्ठानां वीरशैवाध्ववर्तिनाम् । नहि स्थावरलिंगानां निर्माल्याद्युपयुज्यते ।।३४।।

**शिवाविण अन्य देव । ज्या गृही असती सदैव । त्या गृहात कधी पाय । शिवभक्ताने ठेवू नये ।।७४।। करिताना लिंगपूजन । जे अन्य देवांचे करिती पूजन । त्यांच्या मुखांचे दर्शन । घेऊ नये कदापि ।।७५।। देव-ऋषि-मानवांनी स्थापिली । स्थावरलिंगे जी भूमंडळी । त्यांचा प्रसाद-निर्माल्ये सगळी । निषिद्ध वीरशैवांसी ।।७६।। स्थावरलिंगासी जे पदार्थ । अर्पिले त्याचे सेवन किंचित । जो वीरशैव लिंगयुक्त । त्याने कधी करू नये ।।७७।। श्रोतेहो ऐका या स्थानी । एक शंका येईल मनी । की स्थावरलिंगालागूनी । नमस्कारावे की नाही? ।।७८।। उपचारपूजन समरसपूजन । हे पूजेचे प्रकार दोन । इष्टलिंगाची समरस होऊन । पूजा करावी शिवभक्ते ।।७९।। स्थावरलिंग-कुलदैवताचे जाण । उपचारभावे करावे पूजन । या पूजेने भक्तालागून । दोष नाही लागत ।।८०।। जी स्त्री पतिपरायण । ती पतीशी पूर्ण समरस होऊन । त्याला करूनि सर्वस्व अर्पण । सेवा करिते सर्वकाळ ।।८१।। सासू सासरा दीर । यांचीही सेवा करी चतुर । परि ती सेवा उपचार-। भावे असे करीत ।।८२।। तैसाच स्थावरलिंगपूजनी । उपचारभाव असावा मनी । आणि इष्टलिंगपूजनी । समरसभाव असावा ।।८३।।**

यत्र स्थावरलिंगानामपायः परिवर्तते । अथवा शिवभक्तानां शिवलांछनधारिणाम् ।।३५।।

तत्र प्राणान् विहायापि परिहारं समाचरेत् । शिवार्थं मुक्तजीवश्चेच्छिवसायुज्यमाप्नुयात् ।।३६।।

**परंतु असो स्थावरलिंग । त्यासी कोणी करू पाहे भंग । तरी तेथे प्राणपणे शिवलिंग । रक्षावे शिवभक्ताने ।।८४।। भस्म-रुद्राक्षविभूषित । जंगम असो वा शिवभक्त । त्यासी उपद्रव असेल होत । तो त्वरित निवारावा ।।८५।। शिवकार्यासाठी वेचिता प्राण । पावे शिवसायुज्य पूर्ण । त्याच्या प्राणाचेही जाण । होते सार्थक शेवटी ।।८६।। योद्धा पडता धारातीर्थी । त्यासी मिळते वीरगती । तैसी शिवभक्तासी सद्‌गती । लाभे अशा प्रसंगी ।।८७।।**

शिवनिन्दाकरं दृष्ट्वा घातयेदथवा शपेत् । स्थानं वा तत्परित्यज्य गच्छेद्यद्यक्षमो भवेत् ।।३७।।

यत्र चाचारनिंदास्ति कदाचित्तत्र न व्रजेत् । यद्‌गृहे शिवनिंदास्ति तद्‌गृहाणि परित्यजेत् ।।३८।।

यः सर्वभूताधिपतिं विश्वेशानं विनिन्दति । न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि ।।३९।।

**जो शिवनिंदा करी व्यर्थ । त्याचे करावे पारिपत्य । त्यासाठी नसेल सामर्थ्य । तरी वाक्ताडन करावे ।।८८।। हे जरी अशक्य असेल । तरी ते स्थान त्यागावे तत्काळ । करूनि बंद कर्णपटल । शिवभक्ताने आपुले ।।८९।। शिवाचाराची चेष्टा जेथे । होई जाऊ नये तेथे । शिवनिंदा घडे त्या गृहाते । त्वरित जावे त्यागूनी ।।९०।। सर्वभूताधिपती शंकर । जो त्रैलोक्याचा ईश्वर । त्याची निंदा**

**करी जो नर । तो पापात्मा केवळ ॥९१॥ त्या पापातूनि मुक्ती । त्याला नसेचि कल्पांती । घेतली प्रायश्चित्ते किती । तरी सर्व निरर्थक ॥९२॥**

शिवपूजापरो भूत्वा पूर्वकर्म विसर्जयेत् । अथवा पूर्वकर्म स्यात् सा पूजा निष्फला भवेत् ॥४०॥

उत्तमां गतिमाश्रित्य नीचां वृत्तिं समाश्रितः । आरूढपतितो ज्ञेयः सर्वकर्मबहिष्कृतः ॥४१॥

**शिवदीक्षा घेतल्यावर । जो जहाला शिवपूजातत्पर । त्या शिवभक्ताने सत्वर । पूर्वकर्मे त्यागावी ॥९३॥ शिवदीक्षा घेण्यापूर्वी । पूजीत असे ज्या देवदेवी । त्यांचे घेऊ नये नावही । मग पूजन दूरचि ॥९४॥ शिवाविण अन्य देव । त्यास नसती पूजनीय । अन्य देवतांसह शिव । जरी पूजिला मूढाने ॥९५॥ तरी ती शिवपूजा होय निष्फळ । ते पूजेचे सोंग केवळ । पूजेचे किंचितही फळ । मिळेना त्या पूजकासी ॥९६॥ प्राप्त झाली उत्तम गती । तरी अवलंबितो नीचवृत्ती । त्या नरासी संबोधिती । 'आरूढपतित' या नावे ॥९७॥ कराया धर्मकृत्याप्रत । तो पात्र नव्हे निश्चित । तो सर्वकर्मबहिष्कृत । असे पूर्ण जाणावे ॥९८॥**

पंचाक्षरोपदेशी च नरस्तुतिकरो यदि । सोऽलिंगी स दुराचारी कुकविः स तु विश्रुतः ॥४२॥

चर्मपात्रे जलं तैलं न ग्राह्यं भक्तितत्परैः । गृह्यते यदि भक्तेन रौरवं नरकं व्रजेत् ॥४३॥

**ज्याने पंचाक्षरी महामंत्र । श्रीगुरूकडूनि घेतला पवित्र । त्याने नरस्तुती किंचिन्मात्र । करू नये कदापि ।।९९।। त्याने केले नरस्तवन । वा नरस्तुतिपर काव्यलेखन । तरी तो अलिंगी दुराचारी जाण । कुकवी आणि शास्त्रद्रोही ।।१००।। चर्मपात्रात कधी तेल । आणि घेऊ नये जल । जो शिवभक्त तैसे घेईल । तो जाईल रौरवी ।।१०१।।**

न तस्य सूतकं किंचित्प्राणलिंगांगसंगिनः । जन्मनोऽथं मृतोत्थं च विद्यते परमार्थतः ।।४४।।

लिंगार्चनरतायाश्च ऋतौ नार्या न सूतकम् । तथा प्रसूतिकायाश्च सूतकं नैव विद्यते ।।४५।।

गृहे यस्मिन् प्रसूता स्त्री सूतकं नात्र विद्यते । शिवपादाम्बुसंस्पर्शात् सर्वपापं प्रणश्यति ।।४६।।

**जो शिवभक्त प्राणलिंगधारक । त्यासी अणुमात्र नसे सूतक । जन्म होवो वा मृत्यू देख । तो पवित्र पूर्णतः ।।१०२।। जरी घरात जन्मले बाळ । वा कोणावर ओढवला काळ । तरी इष्टलिंगपूजा सकळ । यथासांग करावी ।।१०३।। लिंगधारण नित्यव्रत । त्यासी म्हणती वीरव्रत । शुभ अशुभ घडले घरात । तरी ते लागे करावे ।।१०४।। मरो जननी अथवा जनक । आप्त-सखा-पुत्रादिक । लिंगपूजेत नाही सूतक । म्हणूनि ते पाळू नये ।।१०५।। स्त्रिया लिंगार्चनरत । त्यांना ऋतुकाळ होता प्राप्त । अथवा स्त्री होता प्रसूत । सूतक नसे सर्वथा ।।१०६।। शिवभक्ताच्या गृहात । होता शिवभक्त स्त्री प्रसूत । त्या**

**गृहास नाही किंचित । सूतकाचे कारण ।।१०७।। गुरू अथवा जंगम जाण । यांच्या पादोदकाचे सिंचन । करिता सर्व दोष पापे पूर्ण । नष्ट होती सहज ।।१०८।।**

शिवस्थानानि तीर्थानि विशिष्टानि शिवार्चकः । शिवयात्रोत्सवं नित्यं सेवेत परया मुदा ।।४७।।

शिवक्षेत्रोत्सवमहायात्रादर्शनकांक्षिणाम् । मार्गेऽन्नपानदानं च कुर्यान्माहेश्वरो जनः ।।४८।।

**शिवपूजक भक्ताने । पाहावी विख्यात शिवस्थाने । शिवतीर्थे करूनि आवडीने । शिवयात्रा-उत्सव करावा ।।१०९।। काशी श्रीशैल केदार । पाहावी पंचपीठे मनोहर । ज्योतिर्लिंगे रामेश्वर । आदीकरून पाहावी ।।११०।। तीर्थी होई देवदर्शन । परि तेथे इष्टलिंगपूजन । केल्यावरी ते सहस्रपटीने । होते फलदायक ।।१११।। म्हणूनि करावी तीर्थाटने । न्याहाळावी लोकस्थिती नयने । सृष्टिसौंदर्याने पारणे । घ्यावे फेडूनि डोळ्यांचे ।।११२।। जे वीरमाहेश्वर जन । त्यांनी करावे अन्न-जलदान । शिवयात्रेसी जे करिती गमन । त्यांना मार्गी ठायी ठायी ।।११३।।**

नान्नतोयसमं दानं न चाहिंसापरं तपः । तस्मान्माहेश्वरो नित्यमन्नतोयप्रदो भवेत् ।।४९।।

स्वमार्गाचारवर्तिभ्यः स्वजातिभ्यः सदाव्रती । दद्यात्तेभ्यः समादद्यात् कन्यां कुलसमुद्भवाम् ।।५०।।

**अन्नोदक-दानासमान । अन्य कोणते नसे दान । अहिंसेसारखे श्रेष्ठ आन । तप नसे कोणते ।।११४।।**

म्हणूनि शिवभक्ताने भावे । अन्नोदकाचे दान करावे । सर्व जीवांत शिव स्वभावे । वसतो ऐसे जाणूनी ।।११५।। आपुल्यासम शिवाचारसंपन्न । गृही करावे कन्यादान । आणि अशाच कुलातून । कन्या गृही आणावी ।।११६।।

एवमाचारसंयुक्तो वीरशैवो महाव्रती । पूजयेत्परया भक्त्या गुरुं लिंगं च सन्ततम् ।।५१।।

ऐसा शिवाचारसंपन्न । जो वीरव्रताचे करी पालन । त्या वीरशैवाने लिंगासह अर्चन । गुरूचेही करावे ।।११७।। श्रोतेहो भक्तमार्गक्रियास्थलात । जे विवेचन झाले समस्त । त्यात जहाले प्रति-बिंबित । वीरशैवांचे पंचाचार ।।११८।। ज्यासी म्हणती वीरशैव भक्त । तो राहतो कसा फिरतो जगात । कसे वर्तन त्याच्या मनात । कोणते चिंतन चाललेले? ।।११९।। ते घेतले समजून । तरी कसे वागावे आपण । हे सर्व वीरशैवांलागून । निश्चितचि समजेल ।।१२०।। होईल थोडा विस्तार । तरी कथितो पंचाचार । जिज्ञासू श्रोत्यांनी सादर । परिसावे आवडीने ।।१२१।। लिंगाचार सदाचार । शिवाचार गणाचार । आणि पाचवा भृत्याचार । असे आचार पाच हे ।।१२२।। ज्ञान आणि आचरण । यांचा समन्वय साधून । शिवसामरस्याचे संपादन । करितो तोचि वीरशैव ।।१२३।। जो असतो क्रियाशील । तोचि खरा पंडित केवळ । जो क्रियाशून्य तो वाचाळ । त्याची वाचाळता

व्यर्थ ।।१२४।। पिंजऱ्यातला पोपट । करितो व्यर्थ वटवट । तैसा ज्ञानी परि क्रियेत । पांगळा, व्यर्थ बोलतो ।।१२५।। संत शिरोमणी मन्मथस्वामींनी । अंध-पंगू दृष्टान्त देऊनी । कथिले 'परमरहस्या'तूनी । हेचि पांगळे पांडित्य ।।१२६।। 'दोही पांखाविण पक्ष्यासी । न उडवे जेवी आकाशी । तेवी क्रिया-ज्ञानेविण वस्तुसी । न पाविजे कदा' ।।१२७।। ऐसे स्पष्ट सांगून । ज्ञान-क्रियासमन्वयाचे समर्थन । केले 'परमरहस्या'तून । देऊनि दृष्टान्त पक्ष्याचा ।।१२८।। शिवभक्ताचे डोळे ज्ञान । कर्म हे त्याचे पाय दोन । या दोहोंच्या समन्वयातून । ध्येय साध्य होतसे ।।१२९।। डोळे दाखविती ध्येय । तिकडे घेऊन जाती पाय । असा ज्ञान-कर्माचा समन्वय । कथिला वीरशैवाचार्यांनी ।।१३०।। केवळ ज्ञान हे पांडित्यप्रदर्शन । केवळ कर्म हे कर्मठपण । ज्ञाने कर्मासी येई डोळसपण । कर्मे ज्ञानासी सक्रियता ।।१३१।। म्हणूनि शिवभक्ताने स्वभावे । पंचाचाराचे पालन करावे । धर्मगुरूसी 'आचार्य' या नावे । संबोधिती शास्त्रात ।।१३२।। जो स्वत: करी आचरण । आणि शिष्यांसी देई शिकवण । जो स्वत: ज्ञान-आचारसंपन्न । त्यासी म्हणती आचार्य ।।१३३।। नित्य इष्टलिंगार्चन । मनी लिंगरूपाचे चिंतन । लिंगाचे करणे निदिध्यासन । हाचि असे लिंगाचार ।।१३४।। इष्टलिंगाहूनि मोठे । जगी दैवत नाही कोठे । जो अशा अनन्यनिष्ठे । वागतो तोचि लिंगाचारी ।।१३५।। लिंगसत्तेने वेदागम पूर्ण । जगी

प्रकाशती शिवज्ञान । चाले सूर्यचंद्राचे भ्रमण । लिंगाज्ञेने आकाशी ।।१३६।। लिंगाज्ञेने वाहे वारा । पुण्यसलिला वाहती धारा । अखंड भ्रमतो ब्रह्मांडपसारा । आज्ञेनेच लिंगाच्या ।।१३७।। लिंगसत्तेनेच समग्र । चालतो ब्रह्मांडव्यापार । असा ज्याचा दृढ निर्धार । त्यास नाव लिंगाचारी ।।१३८।। दुराचाररहित आचार । त्याचे नाव सदाचार । आचार हा श्रेष्ठ अलंकार । धन आणि धर्मही ।।१३९।। धर्ममार्गाने द्रव्य संपादून । करावे गुरु-लिंग-जंगमांस संतर्पण । हे सदाचाराचे मुख्य लक्षण । असे जाणा श्रोतेहो ।।१४०।। अहिंसा सत्य अस्तेय । दया क्षमा दान ब्रह्मचर्य । पूजा जप ध्यान ही सर्व । सदाचाराची दहा तत्त्वे ।।१४१।। ही तत्त्वे वाटती साधारण । परि आचरण्यास अति कठीण । ही तंतोतंत आचरे तो धन्य । मृत्युलोकी जाणावा ।।१४२।। अंकुरशील उत्पन्नशील । द्विदलशील प्रवृद्धशील । सप्रकांडशील सशाखशील । सपुष्पशील सफलशील ही ।।१४३।। सदाचाराची ही शीले आठ । 'चंद्रज्ञानागमा'त कथिली स्पष्ट । वीरशैवांनी ती नीट । समजूनि घ्यावी पाळावी ।।१४४।। श्रीगुरूने दीक्षा दिल्यावर । दिव्य होई भक्तशरीर । त्रिमल नाशूनि त्याचे अंतर । भरे दिव्यभावाने ।।१४५।। आपुली ही मांसकाया । मंत्रदीक्षेने मंत्रकाया । झाली तीच समर्थ न्याया । भवसागरी तारूनी ।।१४६।। ऐसा दिव्यभाव अंकुरे । शिवभक्ताच्या हृदयी भरे । तेचि 'अंकुरशील' खरे । पहिले सदाचार-

तत्त्व ।।१४७।। जी दीक्षा घेतली गुरूकडून । तीच पत्नी-पुत्रपौत्रांस देऊन । त्यांच्या सहवासात जाण । राहणे हे 'उत्पन्नशील' ।।१४८।। भस्मरुद्राक्षादी शिवभूषणे । प्रमादरहित नित्य धारण करणे । यास 'द्विदलशील' अभिधाने । संबोधिले शिवागमी ।।१४९।। शिवाचे नित्य गुणसंकीर्तन । शिवमहिमेचे अखंड चिंतन । ते भक्तीच्या वृद्धीसी कारण । म्हणून 'प्रवृद्धशील' ते ।।१५०।। इष्टलिंगपूजेविण । नच करीन काही सेवन । अशा दृढ संकल्पासी जाण । म्हणती 'सप्रकांड-शील' ।।१५१।। इष्टलिंगासी अर्पित । जो केला नाही पदार्थ । तो न स्वीकारणे किंचित । हेचि 'सशाखशील' असे ।।१५२।। जे जे लिंगार्पित केले । ते सर्व पाहिजे स्वीकारिले । यास 'सपुष्पशील' दिले । नाव वीरशैवाचार्यांनी ।।१५३।। गुरू लिंग जंगम हे तीन । यांना मानणे एकसमान । या समत्वभावासी जाण । 'सफलशील' संबोधिती ।।१५४।। गुरू असे दीक्षेसाठी । लिंग असे पूजेसाठी । जंगम असे तत्त्वोपदेशासाठी । हे घ्यावे जाणूनी ।।१५५।। एकच मूर्ती तीन रूपांत । भक्तांसाठी अवतरली जगात । हा भाव बाळगावा मनात । सतत शिवभक्ताने ।।१५६।। ही अष्टशीले सदोदित । जे आचरिती प्रमादरहित । शिवानुग्रहे त्यांना प्राप्त । श्रेष्ठ सिद्धी होतील ।।१५७।। श्रोतेहो ऐका सादर । आता सांगेन शिवाचार । सृष्टी स्थिती संहार । निग्रह अनुग्रह ही पंचकृत्ये ।।१५८।। पंचकृत्यांचा कर्ता

शंकर । त्याविण अन्य गती अणुमात्र । नसे हे जाणणे साचार । हाचि शिवाचार असे ।।१५९।। जे जे मी करितो आचरण । ते ते शिवा तुझे आराधन । या भावनेने करणे वर्तन । हाचि असे शिवाचार ।।१६०।। विश्वोत्पत्तीचे कारण । शिव सकलांचे आश्रयस्थान । म्हणूनि सर्व आश्रय त्यागून । भार टाकावा शिवावरी ।।१६१।। शिवाचार यास म्हणती । याची सोळा अंगे असती । ती जाणूनि घ्यावी प्रीति-। पूर्वक वीरशैवांनी ।।१६२।। द्रव्यशुद्धी क्षेत्रशुद्धी । गृहशुद्धी भांडशुद्धी । तृणशुद्धी काष्ठशुद्धी । वीटिकाशुद्धी सातवी ।।१६३।। पाकशुद्धी रसशुद्धी । भवशुद्धी भूतशुद्धी । भावशुद्धी मार्गशुद्धी । कालशुद्धी चौदावी ।।१६४।। वाक्शुद्धी जनशुद्धी । अशा असती षोडश शुद्धी । त्या जाणूनि आपुली बुद्धी । संस्कारित करावी ।।१६५।। शिवभक्तिहीनाने ज्या दिल्या जाण । त्या फळ-मूळादीवर भस्मप्रोक्षण । करूनि करणे शुद्धीकरण । यास म्हणावे 'द्रव्यशुद्धी' ।।१६६।। शिला वा काष्ठ नंदीमुद्रांकित । ठेवणे शेताच्या चारी कोपऱ्यांत । ही 'क्षेत्रशुद्धी', गृह शिवलिंगांकित । करणे ही 'गृहशुद्धी' ।।१६७।। शिवभक्तांनी निर्मिलेली । अथवा शिवचिन्हे असलेली । गृही असावी भांडी सगळी । हीच असे 'भांडशुद्धी' ।।१६८।। भस्मसिंचित करावे तृण । हीच 'तृणशुद्धी' जाण । तैसे काष्ठही यासमान । ती असे 'काष्ठशुद्धी' ।।१६९।। सुपारी चुना नागवेली पान । यावरी भस्मसिंचन

करून । विडा बनविणे परिपूर्ण । ही असे 'वीटिकाशुद्धी' ।।१७०।। शिवदीक्षायुक्त स्त्रीने । बनविले भोजन-पक्वान्ने । जी न देखिली अभक्ताने । ती जाणावी 'पाकशुद्धी' ।।१७१।। गोदुग्ध-दही-घृत । हेचि स्वीकारावे सदोदित । अन्य पशूंचे वर्जावे समस्त । ही असे 'रसशुद्धी' ।।१७२।। काम्यकर्मे त्यागून । निर्मल ठेवणे अंत:करण । संपादिणे भवमोचक ज्ञान । हीच जाण 'भवशुद्धी' ।।१७३।। भूतदयेने भरावे मानस । वर्जावा पंचमहाभूतांचा दोष । ही 'भूतशुद्धी', शिवभाव विशेष । रुजविणे मनी ही 'भावशुद्धी' ।।१७४।। मार्गी चालता कीटक लहान । मरू नये पायातळी दबून । पावले टाकणे सदा जपून । ही जाणावी 'मार्गशुद्धी' ।।१७५।। नि:शब्द मनोहर वेळी । शास्त्रनिर्दिष्ट काळी । शिवाराधना करणे योग्य वेळी । ही असे 'कालशुद्धी' ।।१७६।। असत्य बीभत्स कठोर । कुत्सित दांभिक शब्दोच्चार । टाळूनि बोलणे मंगल मधुर । याचे नाव 'वाक्शुद्धी' ।।१७७।। बसता उठता करिता प्रवास । असावा सज्जनांचा सहवास । राहणे सद्भक्तांच्या संगतीस । ही असे 'जनशुद्धी' ।।१७८।। अशा शुद्धी षोडश । शिवभक्ताने आचराव्या विशेष । तेणे होई अपार संतोष । शिवास आणि मनासही ।।१७९।। चौथा आचार गणाचार । श्रोतेहो ऐकावा सविस्तर । वीरशैवांचे वर्तन समग्र । तेणे स्पष्ट होईल ।।१८०।। शिवलिंगास वा शिवस्थानी । जरी उपद्रव केला कोणी । तरी त्यास विरोध

करूनी । रक्षिणे लिंग शिवस्थान ।।१८१।। कोणी अधम दुरात्मा बळी । शिवभक्त-जंगमांसी छळी । प्राणपर्वा न करिता त्यावेळी । पीडा दूर करावी ।।१८२।। शिवकार्यास्तव वेचिले प्राण । तरी शिवसायुज्य मिळे जाण । हेचि गणाचाराचे लक्षण । मुख्य जाणावे श्रोतेहो ।।१८३।। गणाचाराचे आचरण । चौसष्ट शीलांत विभागून । वीरशैवाचार्यांनी केले कथन । तेचि आता सांगतो ।।१८४।। वाचिक शीले सात । पाच शीले पाणिगत । चार पादगत, दोन त्वचागत । चक्षुगत दोन शीले ।।१८५।। जिव्हागत घ्राणगत एकेक जाण । श्रोत्रगत शीले दोन । कायिक शीले पाच जाण । मानसिक शीले पस्तीस ।।१८६।। अशी चौसष्ट शीले एकूण । त्यातून विवरिले आचरण । तेचि क्रमशः श्रवण । करावे सुजाण श्रोत्यांनी ।।१८७।। वाचेने यथार्थ बोलावे । असत्य भाषण टाळावे । वेदागम-पुराणादी अभ्यासावे । जे बोधिती धर्म-ज्ञान ।।१८८।। शिव-शिवभक्त-गुरूंसी भावे । निरंतर प्रशंसावे । शिवाविण अन्य प्रशंसू नये । देवता-मनुष्यादिकांसी ।।१८९।। आत्मप्रौढी आत्मस्तुती । कधीही करू नयेच ती । आणि देवता-मनुष्यांप्रती । निंदू नये कधीही ।।१९०।। ही वाचिक शीले सप्त । आता ऐकावी पाणिगत । पाणि म्हणजे दोन हात । ही शीले हस्ताची ।।१९१।। गुरु-लिंग-जंगमांसी जाण । करावे सादर नमन । शिवपूजेसाठी रात्रंदिन । पूजासामग्री मेळवावी ।।१९२।। हाती

घेऊनि रुद्राक्षमाळ । जप करावा सर्वकाळ । गुरु-लिंग-जंगमांसी बहुल । उपचारांनी पूजावे ।।१९३।। यथाशक्ती यथाप्रमाण । गुरु-जंगमांसी द्यावे दान । ही पंचशीले जाण । पाणिगत जाणावी ।।१९४।। आता शीले पादगत । गुरु-जंगमांकडे जावे चालत । आणि प्रदक्षिणा सदोदित । उभयतास घालावी ।।१९५।। संपादिण्यास पूजासाहित्य । पायांस कष्टवावे नित्य । बेल-फुले स्वत: चालत । वनी जाऊनि आणावी ।।१९६।। गुरु-लिंगपूजेकारण । घालावे स्थिर आसन । ही चार शीले जाण । पादगत जाणावी ।।१९७।। धारण करावे इष्टलिंगास । त्याचा स्पर्श व्हावा त्वचेस । देहापासूनि विभक्त त्यास । करू नये कदापि ।।१९८।। इष्टलिंगस्पर्शाने सतत । शरीर व्हावे रोमांचित । ही द्वय शीले त्वचागत । स्पर्शगत हे दुजे नाव ।।१९९।। अनुरागपूर्वक अथकपणे । इष्टलिंगाकडे सतत पाहणे । इष्टलिंग पाहताच आनंदाने । भरूनि यावे द्वय नेत्र ।।२००।। ही दोन शीले चक्षुगत । अमृत मानून लिंगार्पित । नैवेद्य सेवन करणे सतत । शील जिव्हागत हे ।।२०१।। लिंगावरी वाहता फूल । त्याचा दरवळे परिमल । तो घ्राणाने घेणे तरल । हे शील घ्राणगत ।।२०२।। गुरू लिंग आणि भक्त । यांची स्तुती ऐकावी सतत । ऐकू नये निंदा किंचित । ही श्रोत्रगत द्वय शीले ।।२०३।। कायिक शीले पाच जाण । सांगती देहाचे आचरण । गुरु-लिंग-जंगमप्रसाद घेऊन । काया शुद्ध करावी ।।२०४।। निषिद्ध

विषयांपासून । करावे इंद्रियांचे निरोधन । अस्पृश्य वस्तुस्पर्श होता स्नान । जलाने भस्माने करावे ।।२०५।। वीरशैव-दीक्षारहित माणूस । त्याचा टाळावा सदैव स्पर्श । देही इष्टलिंग-भस्म-रुद्राक्षांस । सदा धारण करावे ।।२०६।। मानसिक शीले पस्तीस । श्रोतेहो ऐका सावकाश । शुभ-अशुभ कर्मांस । मनचि असे कारण ।।२०७।। मनात उद्‌भवे संकल्प जाण । मग तसेचि घडते देहाकडून । म्हणूनि मनावरी नियंत्रण । प्रयत्ने लागे ठेवावे ।।२०८।। निषिद्ध भोगविषयांप्रती । संकल्प करू नये चित्ती । भक्तीवाचूनि प्रीती । अन्य विषयी नसावी ।।२०९।। क्रोध नसावा शत्रूवर । तो असावा अधर्मावर । धनलोभापासून राहावे दूर । लोभ असावा शिवपूजेचा ।।२१०।। असावा मोह भक्तांचा । नसावा स्त्रीपुत्रादींचा । मत्सर करावा इंद्रियांचा । व्यक्तीचा मात्र करू नये ।।२११।। जय मिळविला मायेवरी । याचा मद असावा जरी । धर्मपालन-धनार्जनाचा परी । मद किंचित नसावा ।।२१२।। गुरु-जंगमाचे जाण । पाहू नये गुणावगुण। प्राणिमात्रांसी पीडन । करू नये कदापि ।।२१३।। प्राण्यांचे दुःख पाहून । हळवे कातर व्हावे मन । मुक्या जीवाचे सहन । करू नये दुःख कधी ।।२१४।। कोणाचे मन न दुखावे । असे बोलणे वागणे असावे । शत्रु-पुत्रासी पाहावे । समभावाने सर्वकाळ ।।२१५।। गुरूपदिष्ट निगमागम । यांवरी असावी श्रद्धा परम । दुर्धर आपत्तीतही धर्म । सोडू नये

आपुला ॥२१६॥ शत्रूसी न देता दोष । विशाल करूनि  मानस । क्षमा करावी तयास । भोगासक्ती टाळावी ॥२१७॥ इंद्रिये आणि वाचेकडून । कधी न घडावा प्रमाद जाण । शिवसंकल्पावाचून । अन्य संकल्प करू नये ॥२१८॥ परद्रव्याचे अपहरण । कदापि न करावे जाण । वृत्तीत असावे समाधान । इच्छित प्राप्त न झाले तरी ॥२१९॥ ईश्वर-नामरूपस्मरण । शिवनाम-रूप-गुण-चिंतन । करावे आणि शिवाचे पादसेवन । भक्तिपूर्वक करावे ॥२२०॥ शिवमानसपूजा करावी । शिवपदे मनी वंदावी । शिव सेव्य मी दास ही बाळगावी । मनी सदैव भावना ॥२२१॥ शिवासी सखा मानावे । शिवासी सर्वस्व अर्पावे । आपुले बंध-मोक्ष सोपवावे । त्याच्या सर्व इच्छेवरी ॥२२२॥ मूलमंत्राचा करावा जप । हृदयी ध्यावे दिव्य शिवरूप । अखंड तैलधारेसम शिवस्वरूप । हृदयी धारण करावे ॥२२३॥ जशी अखंड तेवते ज्योत । तसे शिवरूपी ठेवावे चित्त । सोऽहंभावाने तयास ध्यात । तोचि मानावा सर्वकर्ता ॥२२४॥ शिवब्रह्म अपरिच्छिन्न । ब्रह्मांडी सर्वत्र राहिले व्यापून । असे जाणूनि अखंड चिंतन । अनुसंधान करावे ॥२२५॥ आपण शिवरूप साक्षात । जाणूनि करावा शिवानंद प्राप्त । पाहावे आत्मरूप जगतात । ऐसी मानसिक शीले ही ॥२२६॥ ही चौसष्ट शीले समस्त । जो आचरितो प्रमादरहित । तोचि खरा 'शीलवंत' । अन्य केवळ नावाचे ॥२२७॥ आता पाचवा आचार । ज्यासी म्हणती

भृत्याचार । सेवाभाव ज्यात साचार । तो भृत्याचार जाणावा ।।२२८।। भृत्य म्हणजे सेवक । शिव-गुरु-जंगमांसवे देख । सेवकभाव ठेवूनि एक । शिवभक्ताने वागावे ।।२२९।। मी आहे सर्वांचा सेवक । त्यागूनिया सर्व लौकिक । सेवा करीन नम्रतापूर्वक । हा असे भृत्यभाव ।।२३०।। श्रेष्ठ शिवभक्तांवाचून । कोणीच नाही जगती अन्य । त्यांचा मी दास ही पूर्ण । मनी ठेवावी भावना ।।२३१।। जो पाळतो भृत्याचार । त्याचा नष्ट होई अहंकार । जो आचरील तो सुंदर । या जगासी करील ।।२३२।। जगातील समस्त जन । करितील पंचाचाराचे आचरण । तरी सर्व कलह पूर्ण । निश्चित संपूनि जातील ।।२३३।। स्वत:पासूनि आरंभावे । इतर जनांसी सांगावे । आपणापासूनि वाढवावे । वर्तुळ पंचाचाराचे ।।२३४।। संथ शांत जलाशयात । खडा पडता अकस्मात । भोवती वर्तुळ उठूनि तेथ । काठापर्यंत ते जाते ।।२३५।। तैसे स्वत: आचरून । इतरांसी सांगावे आपण । पंचाचारे भारिता जन । विश्व होय दोषमुक्त ।।२३६।। आचराया कठीण अत्यंत । ऐसे मानू नये किंचित । पावलापावलाने निश्चित । येते ध्येय गाठता ।।२३७।। करिता अभ्यास सायासे । जगी या अशक्य काही नसे । प्रचंड वाग्ब्रह्म बैसे । जिव्हेवरी येऊनी ।।२३८।। अंध शिकतो अक्षरे । अपंग मार्ग अनुसरे । जे मंदबुद्धी बिचारे । तेही शिकती शाळेत ।।२३९।। ही पाहता धडपड । जो हातपाय-बुद्धीने धड । त्यास काय असे

**अवघड । पंचाचार आचरणे? ।।२४०।। म्हणूनि श्रोतेहो ध्यानी धरा । पंचाचारासी अनुसरा । श्रीगुरुकृपेने पार करा । दुस्तर ऐसा भवाब्धी ।।२४१।। कळाया सर्वांसी पंचाचार । म्हणूनि केला हा विस्तार । सहृदयतेने हा विचार । घ्यावा सर्व समजूनी ।।२४२।। आता श्रीसिद्धान्तशिखामणीतील । निरूपितो उभयस्थल । अगस्त्यासी कथिती समूळ । जगद्गुरू रेणुकाचार्य ।।२४३।।**

**उभयस्थल** - (१०)

गुरोरभ्यर्चनेनापि साक्षादभ्यर्चितः शिवः । तयोर्नास्ति भिदा किंचिदेकत्वात्तत्त्वरूपतः ।।५२।।

यथा देवे जगन्नाथे सर्वानुग्रहकारके । तथा गुरुवरे कुर्यादुपचारान् दिने दिने ।।५३।।

अप्रत्यक्षो महादेवः सर्वेषामात्ममायया । प्रत्यक्षो गुरुरूपेण वर्तते भक्तिसिद्धये ।।५४।।

**श्रीगुरूचे करिता पूजन । घडे परशिवाचेही पूजन । गुरुपूजनात शिवपूजन । अंतर्भूत असेचि ।।२४४।। गुरू आणि परशिव । भिन्न मानती मानव । परि ते एकरूप सर्वथैव । ऐसे सिद्धान्त सांगतो ।।२४५।। सर्व प्राणिमात्रांवर । करी अनुग्रह शंकर । त्या विश्वपतीसी निरंतर । जैसे आपण पूजितो ।।२४६।। तैसेचि पूजोपचारेकरून । श्रीगुरूचेही करावे अर्चन । शिव आणि गुरू भिन्न । ऐसे**

मनी भावू नये ।।२४७।। मायाशक्तीने युक्त । म्हणूनि परशिव अव्यक्त । भक्ती सिद्ध कराया व्यक्त । तोचि झाला गुरूरूप ।।२४८।। पातळ तूप थिजते । ते कणरूपे घट्ट होते । मग बोटावर घेऊनि ते । दाखवितो दुसऱ्यासी ।।२४९।। साकार दिसे कापूर । पण तो सुगंध निराकार । तैसा गुरुरूपाने साचार । शिव प्रत्यक्ष अवतरला ।।२५०।। शिव परब्रह्म पूर्ण । परि तो न करी संभाषण । गुरू मात्र समाधान । करितो आपुल्या शंकांचे ।।२५१।। कधी येता संकटकाळ । परशिव दिसेना जवळ । गुरू मात्र देतो बळ । कर ठेवूनि पाठीवरी ।।२५२।। म्हणूनि गुरू हाचि शिव । ऐसा असावा दृढ भाव । शिवासमानचि सर्व-। भावे त्यासी पूजावे ।।२५३।।

शिवज्ञानं महाघोरसंसारार्णवतारकम् । दीयते येन स गुरुः कस्य वंद्यो न जायते ।।५५।।
यत्कटाक्षकलामात्रात् परमानंदलक्षणम् । लभ्यते शिवरूपत्वं स गुरुः केन नार्चितः ।।५६।।

संसारसागर अति दुस्तर । ज्या ज्ञानाने होतो पार । त्या ज्ञानाचा गुरुवर । करिती स्पष्ट उपदेश ।।२५४।। जन्ममृत्यूने जे पीडले । भवबंधनात अडकले । त्या जीवांसी गुरुपाउले । वंदनीय सर्वथा ।।२५५।। गुरुकृपाकटाक्षेकरून । शिवतत्त्वाचे होई ज्ञान । अशा श्रीगुरूचे पूजन । सर्व करू

इच्छिती ।।२५६।।

हितमेव चरेन्नित्यं शरीरेण धनेन च । आचार्यस्योपशांतस्य शिवज्ञानमहानिधेः ।।५७।।

गुरोराज्ञां न लंघेत सिद्धिकामी महामतिः । तदाज्ञालंघनेनापि शिवाज्ञाच्छेदको भवेत् ।।५८।।

राग-द्वेषरहित निर्मळ । जो शिवज्ञानाचा सागर अखिल । त्या श्रीगुरूसी संतोष होईल । ऐसे असावे आचरण ।।२५७।। तन-मनाने झिजावे । सर्वप्रकारे सुख द्यावे । शिवभक्ताने मनोभावे । सांभाळावे गुरूचे मन ।।२५८।। मुमुक्षू विवेकी भक्ते जाण । गुर्वाज्ञेचे उल्लंघन । करू नये कदापि जाण । ती प्रत्यक्ष शिवाज्ञा ।।२५९।। तिचे करिता उल्लंघन । प्रत्यक्ष शिवाज्ञेचे उल्लंघन । गुरू प्रत्यक्ष शिव म्हणून । असे कधी करू नये ।।२६०।। देवयात्रा तीर्थयात्रा । आणि तिसरी गुरुयात्रा । या त्रययात्रांत गुरुयात्रा । श्रेष्ठ असे मानिली ।।२६१।। विचारांचे आदान-प्रदान । गुरुयात्रेत होते जाण । नष्ट होऊनि अज्ञान । ज्ञान प्रकाशे शिष्यांतरी ।।२६२।। सूर्याकडे पाठ करून । अंगावरी घ्यावे ऊन । अग्नीकडे मुख करून । शेकूनि घ्यावे हलकेच ।।२६३।। सूर्य-अग्नीचा स्वीकार । अंशतः करिती चतुर । तो सर्वभावे केला तर । राख होईल देहाची ।।२६४।। परि श्रीगुरूसी सर्वभावे । वीरशैवाने स्वीकारावे । त्याची सेवा जीवेभावे । करावी तीच शिवसेवा ।।२६५।।

## **त्रिविधसंपत्तिस्थल** - (११)

यथा गुरौ यथा लिंगे भक्तिमान् परिवर्तते । जंगमे च तथा नित्यं भक्तिं कुर्याद्विचक्षणः ।।५९।।

एक एव शिवः साक्षात् सर्वानुग्रहकारकः । गुरुजंगमलिंगात्मा वर्तते भुक्तिमुक्तिदः ।।६०।।

**शिव आणि श्रीगुरूस । एकरूप मानितो विवेकी पुरुष । तैसेचि मानूनि जंगमास । सदोदित पुजावे ।।२६६।। सर्व जीवांवरी कृपा करून । भुक्ती मुक्ती करितो प्रदान । तो शिवचि गुरु-लिंग-जंगम तीन । या रूपांनी वर्ततो ।।२६७।। जीवात्म्याच्या ठायी जाण । भुक्ती मुक्ती इच्छा दोन । अनादिकालापासून । नांदत असती स्वभावत: ।।२६८।। पंच इंद्रियांच्या द्वारे । संसारसौख्य भोगतो सारे । त्यासाठी अनंत जन्मफेरे । घेई जीव पुन:पुन्हा ।।२६९।। संसारसुखाची हाव । याला 'भुक्ती' ऐसे नाव । तिला कंटाळून जीव । पडू पाहे बाहेरी ।।२७०।। तेव्हा त्याच्याठायी पूर्ण । जी इच्छा होते उत्पन्न । तिला 'मुक्ती' ऐसे अभिधान । दिले शास्त्रकर्त्यांनी ।।२७१।। शिव जीवास देई भुक्ती । गुरु-जंगम देती मुक्ती । भुक्ती मुक्ती देण्याप्रती । समर्थ मूर्ती ह्या तीन ।।२७२।। एकचि शिवतत्त्व अव्यक्त । झाले प्रकट तीन रूपांत । गुरुरूपाने शिष्याप्रत । तोचि देतो लिंगदीक्षा ।।२७३।। लिंगरूपे आराध्य होई । जंगमरूपे ज्ञान देई । म्हणूनि या तिन्ही रूपांठायी । समानत्व जाणावे ।।२७४।। तीन**

**पाने दिसती केवळ । परि एकचि असे बिल्वदळ । तैसे गुरु-लिंग-जंगम निखळ । एकचि असे शिवतत्त्व ।।२७५।। गुरु-लिंग-जंगम त्रिमूर्ती । हीच जाणावी त्रिविधसंपत्ती । समदृष्टीने त्यांची भक्ती । करावी विवेकी पुरुषाने ।।२७६।।**

लिंगं च द्विविधं प्रोक्तं जंगमाजंगमात्मना । अजंगमे यथा भक्तिर्जंगमे च तथा स्मृता ।।६१।।

अजंगमं तु यल्लिंगं मृच्छिलादिविनिर्मितम् । तद्वरं जंगमं लिंगं शिवयोगीति विश्रुतम् ।।६२।।

**जंगम आणि अजंगम । असे लिंगाचे भेद दोन । स्थिर लिंग ते अजंगम । जंगम म्हणजे चरलिंग ।।२७७।। अजंगम लिंगाविषयी । जैसी भक्ती धरितो जिवी । तैसीच ती करावी । जंगम-लिंगावरतीही ।।२७८।। मृत्तिका-पाषाणापासून लिंग । घडे ते जाण स्थिर लिंग । त्यापेक्षा श्रेष्ठ जंगमलिंग । त्यास म्हणती 'शिवयोगी' ।।२७९।।**

अचरे मन्त्रसंस्काराल्लिंगे वसति शंकरः । सदाकालं वसत्येव चरलिंगे महेश्वरः ।।६३।।

**स्थिर म्हणजे स्थावर । त्यावरी करिती मंत्रसंस्कार । मग त्या लिंगात शंकर । राहे वास करूनी ।।२८०।। मूर्तिकाराच्या घरात । घडलेली लिंगे अस्ताव्यस्त । पडूनि असती परि वंदीत । नाही कुणी तयांना ।।२८१।। मिळाला आकार लिंगाला । पण मंत्रसंस्कार नाही झाला । म्हणूनि शिवाने नसे**

**केला । वास तेथे लिंगामध्ये ।।२८२।। स्थापित करूनि मंत्रसंस्कार । झाल्यावरी करिती नमस्कार । त्याआधी स्थावरलिंगात शंकर । नाही वास करीत ।।२८३।। परि जंगमलिंगात । महादेवाचे वास्तव्य सदोदित । म्हणूनि जंगमलिंग श्रेष्ठ निश्चित । असे स्थिरलिंगाहूनी ।।२८४।।**

शिवयोगिनि यद्दत्तं तदक्षयफलं भवेत् । तस्मात् सर्वप्रयत्नेन तस्मै देयं महात्मने ।।६४।।

यत्फलं लभते जन्तुः पूजया शिवयोगिनः । तदक्षयमिति प्रोक्तं सकलागमपारगैः ।।६५।।

**शिवयोग्यासी करिता दान । लाभे अक्षय फल पूर्ण । म्हणूनि सर्व प्रयत्नेकरून । त्या महात्म्यास दान द्यावे ।।२८५।। पूजिता शिवयोग्यासी निर्मल । पूजकासी जे लाभते फळ । ते अक्षय असे हे सकल । आगमज्ञाते सांगती ।।२८६।।**

नावमन्येत कुत्रापि शिवयोगिनमागतम् । अवमानाद्भवेत्तस्य दुर्गतिश्च न संशयः ।।६६।।

शिवयोगी शिवः साक्षादिति कैंकर्यभक्तितः । पूजयेदादरेणैव यथा लिंगं यथा गुरुः ।।६७।।

**शिवयोगी भेटता अवचित । करावे वंदनपूर्वक स्वागत । त्यासी करू नये अवमानित । करिता प्राप्त दुर्गती ।।२८७।। शिवयोगी शिवरूप पूर्ण । मानावा गुरु-लिंगासमान । सादर सेवकभावाने पूजन । त्याचे नित्य करावे ।।२८८।। गुरु-लिंग-जंगम त्रिमूर्ती । हीच जाणावी त्रिविध संपत्ती । आता**

**अगस्त्या ऐक पुढती । चतुर्विधसारायस्थल ।।२८९।। विस्तृत विवेचनाचे कथन । करणे थोड्या शब्दांतून । यास 'सार' हे अभिधान । दिले ज्ञानी जनांनी ।।२९०।। कथेचे असते सार । जीवनाचे असते सार । तैसे वीरशैवांचे सार । आहे चार प्रकारचे ।।२९१।। गुरू लिंग जंगम हे तीन । आणि पादोदक-प्रसादसेवन । हे चतुर्विध सार पूर्ण । कथिले या स्थलात ।।२९२।।**

**चतुर्विधसारायस्थल** - (१२)

पादोदकं यथा भक्त्या स्वीकरोति महेशितुः । तथा शिवात्मनोर्नित्यं गुरुजंगमयोरपि ।।६८।।

सर्वमंगलमांगल्यं सर्वपावनपावनम् । सर्वसिद्धिकरं पुंसां शंभोः पादाम्बुधारणम् ।।६९।।

**इष्टलिंगाचे पादोदक । घेतो भक्त भक्तिपूर्वक । तैसेच त्याने घ्यावे देख । गुरु-जंगमांचेही ।।२९३।। गुरू जंगम हे शिवरूप पूर्ण । ही जाणीव असावी अक्षुण्ण । तिघांच्या ठायी एकसमान । भक्तिभाव असावा ।।२९४।। जगी जे जे कल्याणकारक । त्याहूनि अधिक लिंगपादोदक । समस्त पवित्र वस्तूंतही अधिक । पादोदक पवित्र असे ।।२९५।। जो सेवन करी त्यास समृद्धी । प्राप्त होती सर्व सिद्धी । सर्व मांगल्याचा निधी । जाण असे पादोदक ।।२९६।। श्रोतेहो हे पादोदक । त्याचे कथिले अर्थ अनेक । तेही सांगतो एकेक । जिज्ञासू श्रोत्यांकारणे ।।२९७।। 'पा' याचा पाप हा अर्थ ।**

‘दो’ म्हणजे दोष समस्त । ‘द’ म्हणजे दहन करीत । त्यास म्हणती पादोदक ।।२९८।। ‘पाद’ म्हणजे परमानंद जाण । ‘उदक’ म्हणजे ज्ञान । परमानंदाचे देई ज्ञान । ते असे पादोदक ।।२९९।। ‘पाद’ म्हणजे गुरू देख । शिष्य म्हणजे ‘उदक’ । गुरु-शिष्याचा ऐक्य-। बोध जे देते पादोदक ते ।।३००।। ‘काशी मेलिया मुक्ती देत । विश्वासे सेविता गुरुतीर्थ । तरी साक्षात्कारे पावे मुक्त । न मरताचि’ ।।३०१।। अशा नेमक्या शब्दांत । मन्मथस्वामींनी कथिले सत्य । पाहावे ‘परमरहस्या’त । पडताळून श्रोत्यांनी ।।३०२।। मुक्ती मिळाया कारण । काशीत यावे लागे मरण । न मरताचि मुक्ती जाण । पादोदक देतसे ।।३०३।। गंगास्नाने मिळे मुक्ती । पण तेथे बुडण्याची भीती । त्याची न करणे लागे क्षिती । पादोदकसेवनात ।।३०४।। पापरूपी पंकशोषक । ज्ञानज्योतीचे प्रकाशक । टाकिते विलक्षण पादोदक । संसारवृक्ष उन्मळूनी ।।३०५।। जो मनाने भक्तियुक्त । पादोदक सेवी सदोदित । बहरे त्याच्या अंतरात । भक्तिवृक्ष दिनोदिन ।।३०६।।

शिरसा धारयेद्यस्तु पत्रं पुष्पं शिवार्पितम् । प्रतिक्षणं भवेत्तस्य पौण्डरीकक्रियाफलम् ।।७०।।
भुंजीयाद् रुद्रभुक्तान्नं रुद्रपीतं जलं पिबेत् । रुद्राघ्रातं सदा जिघ्रेदिति जाबालिकी श्रुतिः ।।७१।।

जो पुष्प पत्र लिंगार्पित । आदरे शिरी धारण करीत । त्यासी प्रतिक्षणी पुण्य प्राप्त । होई पौंडरीक

**यागाचे ।।३०७।। शिवास अर्पिले पान फूल । त्यास म्हणती शिवनिर्माल्य । ते धारण करिता निर्मल । मन होते भक्ताचे ।।३०८।। शिवासी केला अर्पण । तोचि नैवेद्य करावा भक्षण । शिवार्पित जल प्राशन । करावे शिवभक्ताने ।।३०९।। शिवासी वाहिले जे फूल । तेचि प्रेमे हुंगावे कोमल । जे जे शिवार्पित ते सकळ । स्वीकारार्ह भक्तासी ।।३१०।। वीरशैवांचे नसे भोजन । ते असे प्रसादान्नाचे सेवन । लिंगार्पित केल्यावाचून । काहीच सेवन करितीना ।।३११।। अर्पिता शिवासी अन्न । मग ते होते प्रसादान्न । तो प्रसाद भक्तिभावेकरून । करिती सेवन आनंदे ।।३१२।। प्रसादान्नाचा कणही व्यर्थ । जाऊ नये म्हणूनि भक्त । ताट धुवूनि पाणी प्राशीत । दक्ष राहूनि सर्वदा ।।३१३।।**

अर्पयित्वा निजे लिंगे पत्रं पुष्पं फलं जलम् । अन्नाद्यं सर्वभोज्यं च स्वीकुर्याद् भक्तिमान्नरः ।।७२।।
गुरुत्वात् सर्वभूतानां शम्भोरमिततेजसः । तस्मै निवेदितं सर्वं स्वीकार्यं तत्परायणैः ।।७३।।

**फळ जल फूल पान । अन्नादी भोज्य पदार्थ जाण । करूनि इष्टलिंगासी अर्पण । मग ग्रहण करावे ।।३१४।। शंकर तेजस्वी सामर्थ्यवान । भूषवी सकलांचे गुरुस्थान । त्यास सर्व पदार्थ अर्पण । करूनि स्वीकारावे भक्ताने ।।३१५।।**

ये लिंगधारिणो लोके ये शिवैकपरायणाः । तेषां तु शिवनिर्माल्यमुचितं नान्यजन्तुषु ।।७४।।

अन्नजाते तु भक्तेन भुज्यमाने शिवार्पिते । सिक्थे सिक्थेऽश्वमेधस्य यत्फलं तदवाप्यते ।।७५।।

**लिंगधारी शिवभक्त । त्यांनीच शिवप्रसाद घेणे उचित । अन्य मानवांसी नाही प्राप्त । अधिकार प्रसादसेवनाचा ।।३१६।। शिवार्पित भक्षिता अन्न । त्याच्या एकेक शिताप्रमाण । एकेक अश्वमेध यज्ञाचे पुण्य । लाभे शिवभक्तांना ।।३१७।।**

निर्माल्यं निर्मलं शुद्धं शिवेन स्वीकृतं यतः । निर्मलैस्तत्परैर्धार्यं नान्यैः प्राकृतजन्तुभिः ।।७६।।

शिवभक्तिविहीनानां जन्तूनां पापकर्मणाम् । विशुद्धे शिवनिर्माल्ये नाऽधिकारोऽस्ति कुत्रचित् ।।७७।।

**जे अन्न केले शिवार्पित । ते शिवाने केले स्वीकृत । होई शुद्ध दोषरहित । निर्मल म्हणूनि निर्माल्य ।।३१८।। शिवदीक्षेने जो झाला निर्मल । त्याने स्वीकारावे शिवनिर्माल्य । शिवभक्तिहीन जो त्रिमल-। युक्त त्यासी न स्वीकार्ह ।।३१९।। ज्याचा पाप हाच आचार । जो शिवभक्तिविन्मुख नर । त्यासी नाही अधिकार । शिवनिर्माल्य-प्रसादाचा ।।३२०।।**

शिवलिंगप्रसादस्य स्वीकाराद् यत्फलं भवेत् । तथा प्रसादस्वीकाराद् गुरुजंगमयोरपि ।।७८।।

तस्माद् गुरुं महादेवं शिवयोगिनमेव च । पूजयेत् तत्प्रसादान्नं भुंजीयात् प्रतिवासरम् ।।७९।।

**सेविता लिंगप्रसाद । जे फळ लाभे मोक्षद । सेविता गुरु-जंगमप्रसाद । तेचि फळ लाभते ।।३२१।। म्हणूनि गुरु-लिंग-जंगमांलागून । सर्वदा मानावे एकसमान । त्यांना पूजूनि त्यांचे प्रसादान्न । नित्य भक्षण करावे ।।३२२।। ऐसे हे चतुर्विधसारायस्थल । अगस्त्या तुज निरूपिले निर्मल । आता त्रिविध दानस्थल । याचे निरूपण ऐकावे ।।३२३।।**

## **सोपाधि-निरुपाधि-सहजदानस्थल** - (१३,१४,१५)

शिवलिंगे शिवाचार्ये शिवयोगिनि भक्तिमान् । दानं कुर्याद्यथाशक्ति तत्प्रसादयुतः सदा ।।८०।।

दानं च त्रिविधं प्रोक्तं सोपाधिनिरुपाधिकम् । सहजं चेति सर्वेषां सर्वतन्त्रविशारदैः ।।८१।।

**गुरु-लिंग-जंगमांसी जाण । भक्तीने करावे प्रसन्न । त्यांचा प्रसाद करूनि सेवन । त्यांना दान करावे ।।३२४।। आपुल्या शक्त्यनुसार । दान करावे निरंतर । तेणे तोषवावे अंतर । गुरु-शिवयोग्याचे ।।३२५।। दानप्रकार अनेक । त्यात तीन असती प्रमुख । सोपाधिक आणि निरुपाधिक । सहजदान तिसरे हे ।।३२६।।**

फलाभिसन्धिसंयुक्तं दानं यद्विहितं भवेत् । तत् सोपाधिकमाख्यातं मुमुक्षुभिरनादृतम् ।।८२।।

फलाभिसन्धिनिर्मुक्तमीश्वरार्पितकांक्षितम् । निरुपाधिकमाख्यातं दानं दानविशारदैः ।।८३।।

आदातृदातृदेयानां शिवभावं विचिन्तयन् । आत्मनोऽकर्तृभावं च यद्दत्तं सहजं भवेत् ।।८४।।

**फलाची अपेक्षा ठेवून । जे केले जाते दान । त्यासी नाम 'सोपाधिक' दान । दिले आगम-वेत्त्यांनी ।।३२७।। फलाची अपेक्षा न बाळगता । जे दान देतो दाता । त्यासी 'निरुपाधिक' तत्त्वता । नाव असे शास्त्रात ।।३२८।। घेणारा देणारा आणि दान । हे सर्व शिवरूप मानून । अकर्तृत्वभावे केले दान । ते सहजदान असे ।।३२९।। वस्तू डाव्या हातातली । उजव्या हातात ठेविली । ती कोणी कोणास दिली । पाहावे मनी विचारूनी ।।३३०।। तैसेचि घडे सहजदान । देणारा घेणारा शिवरूप पूर्ण । दानातली वस्तु-धन । हेही असे शिवरूप ।।३३१।। देता घेता नाही उरला । अवघा शिवचि शिव संचला । सहज घडे म्हणूनि या दानाला । सहजदान नाव असे ।।३३२।।**

सहजं दानमुत्कृष्टं सर्वदानोत्तमोत्तमम् । शिवज्ञानप्रदं पुंसां जन्मरोगनिवर्तकम् ।।८५।।

शिवाय शिवभक्ताय दीयते यदि किंचन । भक्त्या तदपि विख्यातं सहजं दानमुत्तमम् ।।८६।।

**सर्व दानांत सहजदान । हेचि मानिती उत्तम पूर्ण । देई शिवजीवैक्यज्ञान । नाशूनिया भवरोग ।।३३३।। शिवास आणि शिवभक्तासही । भक्तीने अर्पिले जरी काही । सहजदानच ठरे तेही । सर्वश्रेष्ठ विख्यात ।।३३४।।**

दानात् स्वर्णसहस्रस्य सत्पात्रे यत्फलं भवेत् । एकपुष्पप्रदानेन शिवे तत्फलमिष्यते ।।८७।।

शिव एव परं पात्रं सर्वविद्यानिधिर्गुरुः । तस्मै दत्तं तु यत्किंचित्तदनन्तफलं भवेत् ।।८८।।

शिवयोगी शिवः साक्षाच्छिवज्ञानमहोदधिः । यत्किंचिद्दीयते तस्मै तद्दानं पारमार्थिकम् ।।८९।।

**सत्पात्रासी सहस्रसुवर्ण । अर्पिता जे लाभे पुण्य । भक्तीने एक फूल शिवालागून । वाहता तेचि लाभते ।।३३५।। सर्व विद्यानिधान उत्तम । जगद्गुरू शिवपरब्रह्म । तोचि दानासाठी परम । पात्र असे सर्वस्वी ।।३३६।। त्यासी दान करिता किंचित । ते दान फळ देई अनंत । शिवयोगीही साक्षात् । भूतलीचे शिवचि ।।३३७।। शिवज्ञानाचे महासागर । ते सर्वसुखाचे आगर । त्यांना सहजदान देता सत्वर । शिवसायुज्य लाभते ।।३३८।।**

शिवयोगी महापात्रं सर्वेषां दानकर्मणि । तस्मान्नास्ति परं किंचित्पात्रं शास्त्रविचारतः ।।९०।।

भिक्षामात्रप्रदानेन शान्ताय शिवयोगिने । यत्फलं लभ्यते नैतद् यज्ञकोटिशतैरपि ।।९१।।

**अगस्त्या उत्तम जंगमाहून । नसे सत्पात्रचि अन्य । ऐसे शास्त्रांचे वचन । म्हणूनि शिवयोगी सत्पात्र ।।३३९।। शांत शिवयोग्यालागून । केले घासभर अन्नदान । तेणे जे लाभते पुण्य पूर्ण । ते कोटी यज्ञे लाभेना ।।३४०।।**

शिवयोगिनि संतृप्ते तृप्तो भवति शंकरः । तत्तृप्त्या तन्मयं विश्वं तृप्तिमेति चराचरम् ।।९२।।

तस्मात् सर्वप्रयत्नेन येन केनापि कर्मणा । तृप्तिं कुर्यात् सदाकालमन्नाद्यैः शिवयोगिनः ।।९३।।

**शिवयोगी होता तृप्त । शिव प्रत्यक्ष होतो तृप्त । शिव तृप्त होता तृप्त । होते चराचर विश्वचि ।।३४१।। म्हणून सर्व प्रयत्नेकरून । अन्न वस्त्र धन अर्पून । शिवयोगी तृप्त करावा पूर्ण । सर्वकाळ भक्ताने ।।३४२।।**

निरुपाधिकचिद्रूपपरानन्दात्मवस्तुनि । समाप्तं सकलं यस्य स दानी शंकरः स्वयम् ।।९४।।

उक्ताखिलाचारपरायणोऽसौ सदा वितन्वन् सहजं तु दानम् ।
ब्रह्मादिसम्पत्सु विरक्तचित्तो भक्तो हि माहेश्वरतामुपैति ।।९५।।

**ज्ञानस्वरूप परशिवात । ज्याचे सर्वस्व झाले समर्पित । तो सहजज्ञानी शिवभक्त । स्वये होतो शिवरूप ।।३४३।। श्रीगुरूला अर्पितो तन । लिंगाला अर्पितो प्राण । जंगमाला अर्पितो धन । तो शिवस्वरूप शिवभक्त ।।३४४।। कथिलेल्या या भक्तस्थलात । आचारांनी संपन्न जो भक्त । तो**

**सहजदानी असे विरक्त । ब्रह्मादीच्या संपत्तीविषयी ।।३४५।। पहिल्या पिंडस्थलापासून । त्रिविध दानस्थलापर्यंत जाण । भक्त परिपक्व होऊन । माहेश्वरस्थली प्रवेशतो ।।३४६।। भक्तस्थलाचे विवेचन । या ठिकाणी झाले पूर्ण । रेणुकाचार्य अगस्त्यालागून । माहेश्वरस्थल निरूपतील ।।३४७।। तो पुढील कथाभाग । परिसावा मनी धरून अनुराग । ग्रंथ विस्तारला तरी राग । धरू नये किंचित ।।३४८।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।३४९।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । नवमोऽध्याय पूर्ण हा ।।३५०।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतभक्तस्थले भक्तमार्गक्रियास्थलादिसप्तविधस्थलप्रसंगो नाम नवमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय दहावा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु चतुर्वक्त्र शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः कठोराय । त्रिपुरांतकाय नमः वृषांकाय । वृषभारूढाय नमः भस्मोद्धूलितविग्रहाय । सामप्रियाय नमः त्रिमूर्तये ।।१।। जैसे सहज घडते दान । तैसे चालले ग्रंथलेखन । तुझ्याकडूनि घेऊनि ज्ञान । तुझे तुलाच अर्पितो ।।२।। असो अध्यायात मागील । पूर्ण जहाले भक्तस्थल । आता षट्स्थलातील दुसरे स्थल । माहेश्वरस्थल विवरितो ।।३।। रेणुकाचार्य अगस्त्यास । करिती शिवसिद्धान्तोपदेश । भाग्यवंत म्हणूनि आपणांस । तो लाभला ग्रंथात ।।४।। भक्तस्थल करूनि श्रवण । अगस्त्य गेले आनंदून । मग त्यांनी केला प्रश्न । जगद्‌गुरू रेणुकांना ।।५।।**

## अंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल

अगस्त्य उवाच-

भक्तस्थलं समाख्यातं भवता गणनायक । केन वा धर्मभेदेन भक्तो माहेश्वरो भवेत् ।।१।।

**हे प्रमथनायक भक्तवरद । भक्तस्थलाचे आचारभेद । निरूपिले आता करा विशद । माहेश्वर-**

**स्थल संपूर्ण ।।६।। पिंडस्थलापासूनि चालत । आला त्रिविधदानस्थलापर्यंत । असा परिपक्व झालेला भक्त । तो कसा होतो माहेश्वर? ।।७।। त्याचे कोणकोणते आचार । माहेश्वरस्थलाचे किती प्रकार । हे जगद्‌गुरो सविस्तर । निरूपावे सुस्पष्ट ।।८।। अगस्त्य मुनीचा ऐकूनि प्रश्न । प्रसन्नले रेणुकाचार्यांचे मन । शांत स्वरात मंद हसून । बोलले अगस्त्य मुनीसी ।।९।।**

श्रीरेणुक उवाच-

केवले सहजे दाने निष्णातः शिवतत्परः । ब्रह्मादिस्थानविमुखो भक्तो माहेश्वरः स्मृतः ।।२।।

भक्तेर्यदा समुत्कर्षो भवेद्वैराग्यगौरवात् । तदा माहेश्वरः प्रोक्तो भक्तः स्थिरविवेकवान् ।।३।।

**मिळावे ब्रह्मादिकांचे ज्ञान । जो सदैव मुक्त ह्या आशेपासून । ऐसा निःस्पृह शिवनिष्ठ पूर्ण । भक्तस्थलातील जो भक्त ।।१०।। तो जेव्हा सहजदानात । होई परिपक्व अत्यंत । तेव्हा तोचि शिवभक्त । होतो जाण माहेश्वर ।।११।। निष्ठाभक्ती त्याच्याठायी । दृढ वसे अगस्त्या पाही । शिवावाचूनि अन्य काही । तो नसेचि जाणत ।।१२।। जैसा स्वाती नक्षत्रामधला । पाऊसथेंब शिंपीत पडला । तो तेजाळ मोती जहाला । मग पुन्हा न होय जलबिंदू ।।१३।। जलाचे होते हिम जाण । ते पुन्हा जलरूप करी धारण । जलाचे बाष्प होऊन । तेही पुन्हा जल होई ।।१४।। परि शिंपल्यातला मोती ।**

**पुन्हा जल न होय निश्चिती । तैसी निष्ठाभक्तीची स्थिती । माहेश्वर साधकाच्या ।।१५।। शिवावरी निष्ठा जडली । ती तेथेच स्थिर झाली । काहीकेल्या कोणेकाळी । अन्य स्थळी जाईना ।।१६।। जैसी अखंड तैलधार । ती खंडित न होई क्षणभर । तैसा चित्तवृत्तीत शंकर । समग्र व्यापूनि राहिला ।।१७।। शिव आनंदसागर पवित्र । त्याच्याशी जुळले एकदा सूत्र । ते अखंड राखणे एकमात्र । हीच निष्ठाभक्ती असे ।।१८।। श्रद्धाभक्ती जी भक्तस्थलात । तीच होऊनि परिणत । येते माहेश्वरस्थलात । जाण निष्ठाभक्ती ती ।।१९।। शिवभक्ताच्या अंगी जाण । वैराग्य दृढ मांडे ठाण । तेणे उत्कर्षाचे गगन । स्पर्शे भक्ती अंतरीची ।।२०।। ऐसा विवेकी पुरुष स्थिर । त्यासी म्हणावे माहेश्वर । नित्यानित्य-आत्मानात्मविचार । दृढ ज्याच्या बुद्धीत ।।२१।।**

माहेश्वरस्थलं वक्ष्ये यथोक्तं शंभुना पुरा । माहेश्वरप्रशंसादौ लिंगनिष्ठा ततः परम् ।।४।।
पूर्वाश्रयनिरासश्च तथाद्वैतनिराकृतिः । आह्वानवर्जनं पश्चादष्टमूर्तिनिराकृतिः ।।५।।
सर्वगत्वनिरासश्च शिवत्वं शिवभक्तयोः । एवं नवविधं प्रोक्तं माहेश्वरमहास्थलम् ।।६।।

**अगस्त्या पूर्वी कथिती शंकर । माहेश्वरस्थलाचे प्रकार । ते तुज सांगतो सविस्तर । ऐक चित्त देऊनी ।।२२।। पहिले माहेश्वरप्रशंसास्थल । दुसरे लिंगनिष्ठास्थल । तिसरे पूर्वाश्रयनिरसनस्थल ।**

**अद्वैतनिरसन ते चौथे ।।२३।। पाचवे आह्वाननिरसन । सहावे अष्टमूर्तिनिरसन । सातवे सर्वगत्व-निरसन । आठवे शिवजगन्मयस्थल ।।२४।। भक्तदेहिकलिंगस्थल नववे । ऐसे नऊ भेद जाणावे । वीरशैवांनी जाणूनि घ्यावे । सर्व विचारपूर्वक ।।२५।।**

**माहेश्वरप्रशंसास्थल** - (१६)

आदितः क्रमशो वक्ष्ये स्थलभेदस्य लक्षणम् । समाहितेन मनसा श्रूयतां भवता मुने ।।७।।
विश्वस्मादधिको रुद्रो विश्वानुग्रहकारकः । इति यस्य स्थिरा बुद्धिः स वै माहेश्वरः स्मृतः ।।८।।

**उपरोक्त उपस्थले नवविध । क्रमाक्रमाने करितो विशद । श्रवण करी आनंद-। पूर्वक हे अगस्त्य मुने ।।२६।। प्राणिमात्र विश्वातील । ज्याचे कृपापोषित सकल । ब्रह्मा विष्णू आदी सकल । देवांहूनि श्रेष्ठ जो ।।२७।। तो रुद्रचि एकमेव । सर्व देवांचाही देव । तोचि महान हा दृढ भाव । ज्याचा तोचि माहेश्वर ।।२८।। विश्वपती महेश्वरावर । अढळ निष्ठा ज्याची अपार । तो भक्तचि माहेश्वर । आहे ऐसे जाणावे ।।२९।।**

ब्रह्माद्यैर्मलिनप्रायैर्निर्मले परमेश्वरे । साम्योक्तिं यो न सहते स वै माहेश्वराभिधः ।।९।।
ईश्वरः सर्वभूतानां ब्रह्मादीनां महानिति । बुद्धियोगात्तदासक्तो भक्तो माहेश्वरः स्मृतः ।।१०।।

**आणव-माया-कार्मिक मलत्रय । यांनी युक्त ब्रह्मादी देव । ते अजन्मा अनादी परशिव । याच्याशी कधी तुळती ना ।।३०।। जरी कोणी करी तुलना । तर जो सहन करीना । तोचि माहेश्वर जाणा । शिव-निष्ठेत तत्पर ।।३१।। सृष्टिकर्ता ब्रह्मदेव । त्याने निर्मिले प्राणी सर्व । त्यांचा प्रेरक परशिव । आणि श्रेष्ठ सर्वांहूनी ।।३२।। ऐसा दृढ बुद्धियुक्त । जो परशिवाठायी आसक्त । तोचि माहेश्वर खचित । सत्य जाण घटोद्भवा ।।३३।।**

ब्रह्मादिदेवताजालं मोहितं मायया सदा । अशक्तं मुक्तिदाने तु क्षयातिशयसंयुतम् ।।११।।
अनादिमुक्तो भगवानेक एव महेश्वरः । मुक्तिदश्चेति यो वेद स वै माहेश्वरः स्मृतः ।।१२।।

**ब्रह्माविष्णवादी देवता जाण । असती जन्ममरणाधीन । त्यांच्यावरी असे आवरण । दाट मायाशक्तीचे ।।३४।। म्हणूनि जीवमात्रांसी मुक्त । करायासी त्या असमर्थ । षट्संपत्तियुक्त अनादिमुक्त । महेश्वर समर्थ मुक्तिदाता ।।३५।। अशा जाणिवेने जो युक्त । तोचि माहेश्वर भक्त । अगस्त्या जाणावे निश्चित । लक्षण हे माहेश्वराचे ।।३६।।**

क्षयातिशयसंयुक्ता ब्रह्मविष्णवादिसम्पदः । तृणवन्मन्यते युक्त्या वीरमाहेश्वरः सदा ।।१३।।
शब्दस्पर्शादिसम्पन्ने सुखलेशे तु निःस्पृहः । शिवानंदे समुत्कण्ठो वीरमाहेश्वरो भवेत् ।।१४।।

**ब्रह्मादी देवांचे ऐश्वर्य । त्यांच्या पाठी वृद्धि-क्षय । म्हणूनि ते तृणवत् मानी सर्व । तोचि वीर-माहेश्वर ।।३७।। शब्दस्पर्शादी विषयांपासून । जो सुखलेश होई उत्पन्न । त्याविषयी जो निरिच्छ पूर्ण । तोचि वीरमाहेश्वर ।।३८।। अवीट परमसुख नित्य ज्यात । तो शिवानंद व्हावा प्राप्त । यासाठी जो उत्कंठित । तोचि वीरमाहेश्वर ।।३९।।**

परस्त्रीसंगनिर्मुक्तः परद्रव्यपराङ्मुखः । शिवार्थकार्यसम्पन्नः शिवागमपरायणः ।।१५।।
शिवस्तुतिरसास्वादमोदमानमनाः शुचिः । शिवोत्कर्षप्रमाणानां सम्पादनसमुद्यतः ।।१६।।
निर्ममो निरहंकारो निरस्तक्लेशपंजरः । अस्पृष्टमदसंबंधो मात्सर्यविशवर्जितः ।।१७।।

**दूर परस्त्रीसंगापासून । परद्रव्याकडे पाहीना चुकून । शिवकार्यात सदैव मग्न । तोचि वीर-माहेश्वर ।।४०।। शिवागमांच्या अध्ययनात । पवित्र जो सर्वदा रत । होय शिवस्तुतिरसाने प्रमुदित । तोचि वीरमाहेश्वर ।।४१।। शिवश्रेष्ठत्व जे सिद्ध करीत । ते ग्रंथ करी संग्रहित । जो ममत्वशून्य अहंकाररहित । तोचि वीरमाहेश्वर ।।४२।। मुक्त पंचक्लेश-पिंजऱ्यातून । जो ज्ञाननभी करी भ्रमण । मुक्त मद-मत्सरांपासून । तोचि वीरमाहेश्वर ।।४३।।**

निरस्तमदनोन्मेषो निर्धूतक्रोधविप्लवः । सदा सन्तुष्टहृदयः सर्वप्राणिहिते रतः ।।१८।।

निवारणसमुद्योगी शिवकार्यविरोधिनाम् । सहचारी सदाकालं शिवोत्कर्षाभिधायिभिः ।।१९।।

शिवापकर्षसम्प्राप्तौ प्राणत्यागेऽप्यशंकितः । शिवैकनिष्ठः सर्वात्मा वीरमाहेश्वरो भवेत् ।।२०।।

**कामवेगापासूनि पूर्ण मुक्त । सदा संतुष्ट क्रोधरहित । मग्न प्राणिमात्र-कल्याणात । तोचि वीर-माहेश्वर ।।४४।। जे रोधिती शिवकार्याप्रत । त्यांचा पूर्णत: करी नि:पात । रमे शिवभक्तसहवासात । तोचि वीरमाहेश्वर ।।४५।। साहेना शिवाचा अवमान । त्यासाठी करी प्राणार्पण । शिवैकनिष्ठ जो सर्वात्मा पूर्ण । तोचि वीरमाहेश्वर ।।४६।। ऐसा शिवयोगी माहेश्वर । त्याची लक्षणे सविस्तर । तुज निरूपिली आता सादर । होई पुढे श्रवणासी ।।४७।।**

**लिंगनिष्ठास्थल** - (१७)

अस्य माहेश्वरस्योक्तं लिंगनिष्ठामहास्थलम् । प्राणात्ययेऽपि सम्पन्ने यदत्याज्यं विधीयते ।।२१।।

अपगच्छतु सर्वस्वं शिरश्छेदनमस्तु वा । माहेश्वरो न मुंचेत लिंगपूजामहाव्रतम् ।।२२।।

**प्राणावरती आले संकट । तरी लिंगत्याग नोहे इष्ट । ऐसे मानितो जो लिंगनिष्ठ । तोचि लिंगनिष्ठस्थली ।।४८।। संपत्तीचा सर्वनाश झाला । वा शिरच्छेदाचा प्रसंग आला । तरी लिंगपूजा महाव्रताला । माहेश्वराने त्यागू नये ।।४९।।**

लिंगपूजामकृत्वा तु ये न भुंजन्ति मानवाः । तेषां महात्मनां हस्ते मोक्षलक्ष्मीरुपस्थिता ।।२३।।

किमन्यैर्धर्मकलिलैः कीकषार्थप्रदायिभिः । साक्षान्मोक्षप्रदः शम्भोर्धर्मो लिंगार्चनात्मकः ।।२४।।

**लिंगपूजा केल्याविण । जे न करिती अन्नग्रहण । मोक्षलक्ष्मी करी पूर्ण । वास त्यांच्या हातात ।।५०।। तळहातावरील आवळा । जैसा स्पष्ट दिसतो डोळा । तैसा मोक्ष लिंगनिष्ठाला । असे सहज सुलभ ।।५१।। लिंगार्चनात्मक धर्म जाण । करी साधकासी मोक्ष प्रदान । मग अन्य धर्माचे प्रयोजन । काय क्षुद्र फलदात्या ? ।।५२।।**

अर्पितेनान्नपानेन लिंगे नियमपूजिते । ये देहवृत्तिं कुर्वन्ति महामाहेश्वरा हि ते ।।२५।।

चिन्मये शांकरे लिंगे स्थिरं येषां मनः सदा । विमुक्तेतरसर्वार्थं ते शिवा नात्र संशयः ।।२६।।

**इष्टलिंगपूजेनंतर जाण । अन्नोदक करिती लिंगार्पण । त्यांचे सेवन करूनि भरणपोषण । जे करिती देहाचे ।।५३।। स्वर्गादी तुच्छ फलाशा त्यागून । जे चिन्मय इष्टलिंगात निमग्न । तेचि माहेश्वर जाण । भूरुद्रचि निस्संशय ।।५४।।**

लिंगे यस्य मनो लीनं लिंगस्तुतिपरा च वाक् । लिंगार्चनपरौ हस्तौ स रुद्रो नात्र संशयः ।।२७।।

लिंगनिष्ठस्य किं तस्य कर्मणा स्वर्गहेतुना । नित्यानन्दशिवप्राप्तिर्यस्य शास्त्रेषु निश्चिता ।।२८।।

लिंगनिष्ठापरं शान्तं भूतिरुद्राक्षसंयुतम् । प्रशंसन्ति सदाकालं ब्रह्माद्या देवता मुदा ।।२९।।

**लिंगध्यानात रमले मन । वाणी लिंगस्तुतीत लीन । लिंगपूजेत हस्त निमग्न । ऐसी त्रिकरणे लिंगनिष्ठ ।।५५।। ऐसा लिंगनिष्ठ माहेश्वर । भूतलीचा साक्षात् शंकर । यात संशय नसे तिळभर । मुनिवर्य अगस्त्या ।।५६।। लिंगनिष्ठ माहेश्वराप्रत । नित्यानंद शिवप्राप्ती निश्चित । वेदागम-पुराणे समस्त । ऐसे गर्जूनि सांगती ।।५७।। ज्याने स्वर्गचि लाभे मात्र । ती कर्मे आणिक अग्निहोत्र । ते त्याने करण्याचे किंचिन्मात्र । प्रयोजन नसेचि ।।५८।। जो भस्मरुद्राक्षांकित । लिंगनिष्ठ राग-द्वेषरहित । अशा माहेश्वरासी समस्त । ब्रह्मादी देव प्रशंसिती ।।५९।। हे जहाले लिंगनिष्ठास्थल । आता पूर्वाश्रय-निरसनस्थल । विवरितो चित्तवृत्ती निश्चल । एकवटूनि ऐक तू ।।६०।।**

**पूर्वाश्रयनिरसनस्थल** - (१८)

लिंगैकनिष्ठहृदयः सदा माहेश्वरो जनः । पूर्वाश्रयगतान् धर्मांस्त्यजेत्स्वाचाररोधकान् ।।३०।।

स्वजातिकुलजान् धर्मान् लिंगनिष्ठाविरोधिनः । त्यजन् माहेश्वरो ज्ञेयः पूर्वाश्रयनिरासकः ।।३१।।

**आचारविचारांशी प्रतिकूल । ऐसे पूर्वाचार प्राकृत सकळ । लिंगनिष्ठ माहेश्वराने समूळ । सर्वतोपरी त्यागावे ।।६१।। लिंगदीक्षेआधी जाण । तो असेल ब्राह्मण अथवा आन । जननमरणादी सूतके**

**पालन । असेल पूर्वी करीत ।।६२।। परि लिंगदीक्षेनंतर । पूर्वकर्मे त्यागितो सत्वर । ऐसा असे जो माहेश्वर । तो पूर्वाश्रयनिरासक ।।६३।। लिंगनिष्ठ माहेश्वरालागून । सूतकपालनाचे नाही कारण । लिंगाचारासी विरोधी म्हणून । पूर्वकर्मे त्यागावी ।।६४।।**

शिवसंस्कारयोगेन विशुद्धानां महात्मनाम् । किं पूर्वकालिकैर्धर्मैः प्राकृतानां हि ते मताः ।।३२।।

शिवसंस्कारयोगेन शिवधर्मानुषंगिणाम् । प्राकृतानां न धर्मेषु प्रवृत्तिरुपपद्यते ।।३३।।

**शिवदीक्षासंस्कारामुळे । ज्याचे किल्मिष मालिन्य पळाले । त्याचे देहमन सगळे । झाले अत्यंत परिशुद्ध ।।६५।। लिंगपूजा एकमेव । हेचि ज्याचे असे ध्येय । त्याने संध्या-श्राद्धादी कार्य । करण्याचे नाही कारण ।।६६।। जो माहेश्वर शिवाचाररत । त्याची प्राकृत आचारधर्मात । प्रवृत्ती न होय किंचित । शिवसंस्काराकारणे ।।६७।।**

विशुद्धाः प्राकृताश्चेति द्विविधा मानुषा स्मृताः । शिवसंस्कारिणः शुद्धाः प्राकृता इतरे मताः ।।३४।।

वर्णाश्रमादिधर्माणां व्यवस्था हि द्विधा मता । एका शिवेन निर्दिष्टा ब्रह्मणा कथिताऽपरा ।।३५।।

शिवोक्तधर्मनिष्ठा तु शिवाश्रमनिषेविणाम् । शिवसंस्कारहीनानां धर्मः पैतामहः स्मृतः ।।३६।।

**विशुद्ध आणि प्राकृत । असे दोन भेद मानवांत । जे शिवसंस्कारयुक्त । ते मानव विशुद्ध ।।६८।।**

ज्यांच्या देह-मनास । नाही संस्काराचा स्पर्श । ते मानवमात्र अशेष । प्राकृत ऐसे जाणावे ।।६९।। धर्मचिन्ह न देही मुळी । गंध-भस्म नाही भाळी । मातृगर्भातूनि जैसा भूतळी । आला तसाचि कोरडा ।।७०।। जैसे निसर्गाने पाठविले । तैसेच जीवन घालविले । आहारनिद्रामैथुनी भरले । त्याचे सर्व जीवितसार ।।७१।। 'मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति' । या उक्तीसम जीवनरीती । अशा मनुष्यासी म्हणती । शास्त्रे 'प्राकृत मानव' ।।७२।। वर्ण-आश्रमादी जाण । त्यांच्या व्यवस्थेचे प्रकार दोन । एक उपदिष्ट शिवाकडून । दुसरी कथिली ब्रह्मदेवे ।।७३।। जे शिवाचारनिष्ठ भक्त । त्यांना शिवोक्त आश्रमधर्म उचित । शिवसंस्कारहीन जे लोक प्राकृत । त्यांना ब्रह्मोक्त आचार ।।७४।। जे युक्त शिवसंस्काराने । त्यांची सदैव संगत करणे । करू नये माहेश्वराने । संगत प्राकृत जनांची ।।७५।। करिता प्राकृत-लोकसंग । निष्ठा होऊ पाहे भंग । म्हणूनि सदैव सत्संग । जाणिवपूर्वक करावा ।।७६।।

शिवसंस्कारयुक्तेषु जातिभेदो न विद्यते । काष्ठेषु वह्निदग्धेषु यथा रूपं न विद्यते ।।३७।।

तस्मात्सर्वप्रयत्नेन शिवसंस्कारसंयुतः । जातिभेदं न कुर्वीत शिवभक्ते कदाचन ।।३८।।

काष्ठे जळता अग्नीत । ती अग्निरूप होती समस्त । त्यांचे वेगळेपण किंचित । उरेचिना मागुते ।।७७।। विस्तव हाती घेऊन । ही बाभूळ हा आम्र हे चंदन । ऐसे सांगू शकेल कोण? । सर्व झाले

**अग्निरूप ।।७८।। तैसा शिवसंस्कार होता । पूर्वीची जाती न उरे तत्त्वता । तो केवळ वीरशैव आता । आहे ऐसे मानावे ।।७९।। जे शिवसंस्कारसंपन्न । त्यांनी सर्वप्रयत्नेकरून । मानावा जातिभेद अप्रमाण । तो कदापि करू नये ।।८०।। शिवाचाराविण अन्य । त्यागणे पूर्वाचार संपूर्ण । हेचि पूर्वाश्रयनिरसन-। स्थल जाणावे अगस्त्या ।।८१।। आता सर्वाद्वैतनिरसन-। स्थल निरूपितो तुज-लागून । कर्णी साठवूनि प्राण । सावधचित्ते ऐकावे ।।८२।।**

### सर्वाद्वैतनिरसनस्थल - (१९)

पूज्यपूजकयोर्लिंगजीवयोर्भेदवर्जने । पूजाकर्माद्यसम्पत्तेर्लिंगनिष्ठाविरोधतः ।।३९।।

सर्वाद्वैतविचारस्य ज्ञानाभावे व्यवस्थितेः । भवेन्माहेश्वरः कर्मी सर्वाद्वैतनिरासकः ।।४०।।

प्रेरकं शंकरं बुद्ध्वा प्रेर्यमात्मानमेव च । भेदात् तं पूजयेन्नित्यं न चाद्वैतपरो भवेत् ।।४१।।

**जीव हा शिवाचा अंश । ही आगमोक्ती सत्य विशेष । तरी ती न ये प्रत्ययास । साधनेच्या आरंभी ।।८३।। शिव-जीवात मानिता अभेद । लिंगनिष्ठेसी येई बाध । पूज्य-पूजक हा संबंध । द्वैतामुळेच शोभतो ।।८४।। उपास्य परशिव महान । आपण भक्त लहान । याचि भावनेने पूजन । घडे इष्टलिंगाचे ।।८५।। जैसी पर्वतपायथ्यावरून । पाहता सृष्टी दिसे लहान । पाहता पर्वतमाथ्यावरून ।**

**तीच दिसे विशाल ।।८६।। तैसे ऐक्यस्थली जाता साधक । अनुभवासी येई शिव एक । परि प्रारंभी भेद अनेक । असती दृष्टीसामोरी ।।८७।। म्हणूनि माहेश्वरस्थलात । पूजनास्तव मान्य द्वैत । अद्वैत-निरासक तेथ । होतो जाण माहेश्वर ।।८८।। बुद्धीचा प्रेरक शिव । आपण प्रेरणा घेतो जीव । ऐसी ठेवूनि भेद-जाणीव । नित्य करावी लिंगपूजा ।।८९।। पूज्य-पूजक हा भाव । जागा चित्ती असावा सदैव । म्हणूनि माहेश्वराने सर्वथैव । अद्वैतनिष्ठ होऊ नये ।।९०।।**

पतिः साक्षान्महादेवः पशुरेष तदाश्रयः । अनयोः स्वामिभृत्यत्वमभेदे कथमिष्यते ।।४२।।

साक्षात्कृतं परं तत्त्वं यदा भवति बोधतः । तदाद्वैतसमापत्तिर्ज्ञानहीनस्य न क्वचित् ।।४३।।

**शिव त्रैलोक्यपती सत्य । जीव पशू त्याचा आश्रित । असे स्वामी-सेवक संबंध दोघांत । नसे तेथे अभेद ।।९१।। तेथे अद्वैत कैसे असेल? । ते मानिता पूजाकर्म सरेल । म्हणून स्वामी-भृत्यभावे सर्वकाळ । लिंगपूजन करावे ।।९२।। श्रीगुरूचा बोध होता । घडे शिवसाक्षात्कार तत्त्वता । मग लाभे शिवभक्ता । अद्वैतसिद्धी तत्काळ ।।९३।। ज्ञानहीन पुरुषास । अद्वैताचा न लाभे अंश । जोवरी प्राप्त न सामरस्य । तोवरी पूजाकर्म करावे ।।९४।।**

भेदस्य कर्महेतुत्वाद् व्यवहारः प्रवर्तते । लिंगपूजादिकर्मस्थो न चाद्वैतं समाचरेत् ।।४४।।

पूजादिव्यवहारः स्याद्भेदाश्रयतया सदा । लिंगपूजापरस्तस्मान्नाद्वैते निरतो भवेत् ।।४५।।

**शिव-जीवभेदाकारणे । शिवपूजादी घडती कर्माचरणे । यास्तव लिंगनिष्ठ माहेश्वराने । अद्वैत न मानावे सर्वथा ।।९५।। करिता भेद निरंतर । चाले लिंगपूजाव्यवहार । म्हणूनि लिंगनिष्ठ जो माहेश्वर । त्याने अद्वैतासक्त न व्हावे ।।९६।। एकचि मी आणि शिव । ऐसा निरर्थक गर्व । करूनि लिंगपूजा सर्वथैव । त्यागू नये कदापि ।।९७।। लिंगावरील भक्ती पूर्ण । व्यक्त व्हावी क्रियेतून । म्हणूनि लिंगपूजापरायण । असावे माहेश्वराने ।।९८।। लिंगपूजा करिता करिता । षट्स्थल-सोपाने चढूनि जाता । ऐक्यस्थली येई हाता । शिवाद्वैत भक्ताच्या ।।९९।। द्वैत आणि अद्वैत । यांचा समन्वय वीरशैवसिद्धान्तात । म्हणूनि 'द्वैताद्वैत मत' । यास ज्ञाते संबोधिती ।।१००।। म्हणूनि माहेश्वरस्थली । शिव, भक्त ही तत्त्वे वेगळी । जाणूनि भेदभावाने केली । पाहिजे जाण लिंगपूजा ।।१०१।। त्यासाठी सर्व-अद्वैतनिरसन । हे स्थल तुज केले कथन । आता आह्वाननिरसन-। स्थल हे तुज निरूपितो ।।१०२।।**

## **आह्वाननिरसनस्थल** - (२०)

लिंगार्चनपरः शुद्धः सर्वाद्वैतनिरासकः । स्वेष्टलिंगे शिवाकारे न तमावाहयेच्छिवम् ।।४६।।

यदा शिवकलायुक्तं लिंगं दद्यान्महागुरुः । तदारभ्य शिवस्तत्र तिष्ठत्याह्वानमत्र किम् ।।४७।।

**जो शुद्ध लिंगपूजापरायण । ज्याने केले सर्वाद्वैतनिरसन । त्या माहेश्वराने शिवासी आवाहन । लिंगपूजेत करू नये ।।१०३।। दीक्षाप्रसंगी इष्टलिंगात । गुरूने शिवासी केले स्थापित । शिव अखंड वसे लिंगात । तेव्हापासूनि जाणावे ।।१०४।। म्हणूनि करिता लिंगपूजन । शिवासी पुन्हा आवाहन । करण्याचे नाही कारण । सत्य जाण अगस्त्या ।।१०५।।**

ससंस्कारेषु लिंगेषु सदा सन्निहितः शिवः । तत्राह्वानं न कर्तव्यं प्रतिपत्तिविरोधकम् ।।४८।।

नाह्वानं न विसर्गं च स्वेष्टलिंगे तु कारयेत् । लिंगनिष्ठापरो नित्यमिति शास्त्रस्य निश्चयः ।।४९।।

**गुरुसंस्कारित इष्टलिंगात । शिवाचा वास असे सदोदित । तेथे पुन्हा आवाहन शिवाप्रत । करणे भक्तिविरोधी ।।१०६।। जो गृही राहतो मुळात । त्यासच म्हणावे 'ये गृहात' । ऐसे घडेल विपरीत । शिवासी करिता आवाहन ।।१०७।। करिता इष्टलिंगपूजन । शिवासी करू नये आवाहन । आणि करू नये विसर्जन । असा शास्त्रनिर्णय असे ।।१०८।। आता अष्टमूर्तिनिरसन-। स्थल तुजला निरूपीन । करी सावधचित्ते श्रवण । मुनिवर्य अगस्त्या ।।१०९।।**

**अष्टमूर्तिनिरसनस्थल** - (२१)

यथात्मशिवयोरैक्यं न मतं कर्मसंगिनः । तथा शिवात्पृथिव्यादेरद्वैतमपि नेष्यते ।।५०।।

पृथिव्याद्यष्टमूर्तित्वमीश्वरस्य प्रकीर्तितम् । तदधिष्ठातृभावेन न साक्षादेकभावतः ।।५१।।

**लिंगनिष्ठ माहेश्वरसाधक । शिव-जीवात न मानी ऐक्य । तैसेचि अष्टमूर्ती पृथिव्यादिक । यांसीही शिवरूप मानीना ।।११०।। शिव आणि अष्टमूर्ती जाण । या परस्परांपासूनि भिन्न । पूज्य-पूजकभावासी बाधक म्हणून । त्यांचा अमान्य अभेद ।।१११।। परशिवाच्या मूर्ती अष्ट । कोणकोणत्या ते सांगतो स्पष्ट । पृथ्वी आप तेज श्रेष्ठ । वायू आकाश सूर्य तो ।।११२।। चंद्र आणि आत्मा जाण । ह्या अष्टमूर्ती महान । या अष्ट शिवरूपांचे पूजन । करिती जन सर्वत्र ।।११३।। परि येथे माहेश्वरस्थली । त्यांची पूजा निषेधिली । जर ही शिवरूपे पूजिली । तर भक्त होई विचलित ।।११४।। इष्टलिंग हेचि केवळ । शिवरूप मानूनि भक्त सकल । पूजा करूनि इच्छितो फळ । शिव-जीवसामरस्याचे ।।११५।। म्हणूनि शिव अष्टमूर्तींत । अधिष्ठातृभावे वास्तव्य करीत । अष्टमूर्ती शिव नव्हे साक्षात । ऐसे मानिले पाहिजे ।।११६।। आत्मा राहतो शरीरात । तैसा शिव वसे अष्टमूर्तींत । ऐसे जाणूनि करितो भक्त । अष्टमूर्तिनिरसन ।।११७।।**

पृथ्व्यादिकमिदं सर्वं कार्यं कर्ता महेश्वरः । नैतत्साक्षान्महेशोऽयं कुलालो मृत्तिका यथा ।।५२।।

पृथिव्याद्यात्मपर्यन्तप्रपंचो ह्यष्टधा स्थितः । तनुरीशस्य चात्मायं सर्वतत्त्वनियामकः ।।५३।।

**जैसा कुंभार मृत्तिकेपासून । घट आदी वस्तू करितो निर्माण । घट हे कार्य कुंभार कारण । ऐसा दोहोंत संबंध ।।११८।। तैसे अष्टमूर्ती हे कार्य जाण । शिव हे त्यांचे निर्मिती-कारण । कार्य-कारणसंबंध म्हणून । त्यांचा अमान्य अभेद ।।११९।। अष्टधा प्रपंच हे शिवशरीर । त्यांचा प्रेरक साक्षी शंकर । देह-देहीभाव व्यवहार । म्हणूनि संबंध विशेष हा ।।१२०।।**

शरीरभूतादेतस्मात् प्रपंचात्परमेष्ठिनः । आत्मभूतस्य देवस्य नाभेदो न पृथक्स्थितिः ।।५४।।

अचेतनात्वात् पृथ्व्यादेरज्ञत्वाद् आत्मनस्तथा । सर्वज्ञस्य महेशस्य नैकरूपत्वमिष्यते ।।५५।।

इति यश्चिन्तयेन्नित्यं पृथिव्यादेरष्टमूर्तितः । विलक्षणं महादेवं सोऽष्टमूर्तिनिरासकः ।।५६।।

**येतसे जे आपुल्या प्रत्ययाला । ते विश्व हा शिवाचा देह झाला । त्याच्या अंतर्यामी वसला । शिव आत्मारूपाने ।।१२१।। विश्व म्हणजे अष्टमूर्ती जाण । त्या शिवापासूनि असती भिन्न । भिन्न असूनही त्या अभिन्न । शिवाशी असती जाणाव्या ।।१२२।। मृत्तिकेचा असे घट । आणि तंतूपासूनि विणला पट । घट आणि पट या दोन्हींत । अत्यंतभेद असे हो ।।१२३।। तैसा भेद अत्यंत । नसे शिव आणि विश्वात । आत्मा वसे शरीरात । तैसा भेद जाणावा ।।१२४।। पृथ्व्यादी महाभूते अचेतन । शरीरस्थ जीवात्मा किंचित ज्ञानवान । नसे शिव विश्व जीव समान । म्हणूनि ते वेगळे ।।१२५।। पृथ्वी आदी**

**अष्टमूर्तींहून । शिव वेगळा विलक्षण । ऐसे जो माहेश्वर करी चिंतन । तो अष्टमूर्तिनिरासक ।।१२६।। हे झाले अष्टमूर्तिनिरसनस्थल । आता सर्वगतनिरसनस्थल । ते विवरितो अवधारी कोमल । मनाने ऋषी अगस्त्या ।।१२७।।**

**सर्वगतनिरसनस्थल** - (२२)

सर्वगत्वे महेशस्य सर्वत्राराधनं भवेत् । न लिंगमात्रे तन्निष्ठो न शिवं सर्वगं स्मरेत् ।।५७।।

सर्वगोऽपि स्थितः शम्भुः स्वाधारे हि विशेषतः । तस्मादन्यत्र विमुखः स्वेष्टलिंगे यजेच्छिवम् ।।५८।।

**शिव सर्वत्र व्याप्त । म्हणजे असे सर्वगत । हे असेल जरी सत्य । तरी इष्ट न पूजेस्तव ।।१२८।। जरी शिव सर्वत्र आहे । तरी त्यासी कोठे कोठे पूजावे? । वृक्षपर्वतसूर्यादी पूजावे । लागेल सर्व विश्वचि ।।१२९।। म्हणूनि इष्टलिंगचि स्वभावे । शिवस्वरूप मानावे । आणि शिवासी नित्य पूजावे । इष्टलिंगरूपातचि ।।१३०।। सर्वव्यापक शिव आहे । विशेषत्वाने इष्टलिंगात राहे । अन्य स्थानी त्यासी न पाहे । माहेश्वर कदापि ।।१३१।।**

शिवः सर्वगतश्चापि स्वाधारे व्यज्यते भृशम् । शमीगर्भे यथा वह्निर्विशेषेण विभाव्यते ।।५९।।

सर्वगत्वं महेशस्य सर्वशास्त्रविनिश्चितम् । तथाप्याश्रयलिंगादौ पूजार्थमधिका स्थितिः ।।६०।।

जैसे सर्व वृक्षांमधून । अग्नी असे विद्यमान । परि शमीवृक्षातून । प्रकटतो विशेषत्वाने ।।१३२।। तैसा सर्वव्यापी शिवभगवान । इष्टलिंग त्याचे आश्रयस्थान । त्याचठायी विशेषेकरून । तो प्रकट होतसे ।।१३३।। सर्वव्यापक असे महेश्वर । हे मानिती शास्त्रे थोर । परि तो गुरु-लिंग-जंगमांत स्थिर । पूजेसाठी राहतो ।।१३४।।

नित्यं भासि तदीयस्त्वं या ते रुद्र शिवा तनूः । अघोराऽपापकाशीति श्रुतिराह सनातनी ।।६१।।

तस्मात्सर्वप्रयत्नेन सर्वस्थानपराङ्मुखः । स्वेष्टलिंगे महादेवं पूजयेत्पूजकोत्तमः।।६२।।

शिवस्य सर्वगत्वेऽपि सर्वत्र रतिवर्जितः । स्वेष्टलिंगे यजन् देवं सर्वगत्वनिरासकः ।।६३।।

रुद्रा तुझे लिंगरूप शरीर । मंगल निर्दोष अभयंकर । त्यात प्रकाशतोसी निरंतर । ऐसे श्रुतिवचन असे ।।१३५।। शिवाचे विशेष वास्तव्य । असे इष्टलिंगात सदैव । या वेदवचनावर सर्वथैव । श्रद्धा माहेश्वराची ।।१३६।। न पाहता स्थानी अन्य । इष्टलिंगातचि शिव जाणून । निरंतर लिंगपूजन । माहेश्वराने करावे ।।१३७।। परशिव व्यापक असून । त्याची अन्य रूपे दुर्लक्षून । जो इष्टलिंगातचि शिवपूजन । करी तो सर्वगतनिरासक ।।१३८।। आता शिवजगन्मयस्थल । तुजसाठी विवरितो सकल । तू शुद्धान्तःकरणी निर्मल । ऐक अगस्त्य मुनिवरा ।।१३९।।

## शिवजगन्मयस्थल - (२३)

पूजाविधौ नियम्यत्वाल्लिंगमात्रे स्थितं शिवम् । पूजयन्नपि देवस्य सर्वगत्वं विभावयेत् ।।६४।।

यस्मादेतत् समुत्पन्नं महादेवाच्चराचरम् । तस्मादेतन्न भिद्येत यथा कुम्भादिकं मृदः ।।६५।।

**शिव असे विश्वात व्यापून । परि पूजासमयी तो भक्ताधीन । जो प्रकाशतो इष्टलिंगातून । तो प्रकाशरूप सर्वव्यापी ।।१४०।। शिवापासूनि झाले उत्पन्न । ते चराचर विश्व शिवाशी अभिन्न । मृत्तिकेचा घडा मृत्तिकेपासून । जसा नसेचि वेगळा ।।१४१।। मृत्तिका घड्याचे उपादानकारण । कर्ता कुंभार हे निमित्तकारण । विश्वाचे निमित्तोपादानकारण । शक्तिविशिष्ट शिवब्रह्म ।।१४२।। म्हणूनि शिवापासूनि पाही । विश्व हे सर्वथा वेगळे नाही । शिव कारण विश्व कार्य ही । दोन्ही असती एकरूप ।।१४३।।**

शिवतत्त्वात्समुत्पन्नं जगदस्मान्न भिद्यते । फेनोर्मिबुद्‌बुदाकारं यथा सिन्धोर्न भिद्यते ।।६६।।

यथा तन्तुभिरुत्पन्नः पटस्तन्तुमयः स्मृतः । तथा शिवात्समुत्पन्नं शिव एव चराचरम् ।।६७।।

**फेस लाटा बुडबुडे सकळ । हे समुद्ररूपचि केवळ । तैसे शिवापासूनि उत्पन्नले अखिल । विश्व हे**

**शिवरूपचि ।।१४४।। तंतूंचे वस्त्र विणले । तंतू आणि वस्त्र नाही वेगळे । तैसे चराचर जग सगळे । शिवरूप सर्वथा ।।१४५।।**

आत्मशक्तिविकासेन शिवो विश्वात्मना स्थितः । कुटीभावाद् यथा भाति पटः स्वस्य प्रसारणात् ।।६८।।

तस्माच्छिवमयं सर्वं जगदेतच्चराचरम् । तदभिन्नतया भाति सर्पत्वमिव रज्जुतः ।।६९।।

**जैसे वस्त्र ताणल्यावर । ते धरी तंबूचा आकार । तैसा आत्मशक्तिविकासे शंकर । धारण करी विश्वरूप ।।१४६।। अंधारात पाहता दोर । तो भासे सर्परूपाकार । तैसा शिव होऊनि निर्विकार । अभिन्न दिसे विश्वाशी ।।१४७।। चराचर विश्वरूपात । शिवचि प्रकाशतो सदोदित । हे जाणूनि घ्यावे सत्य । माहेश्वरस्थली साधकाने ।।१४८।।**

रज्जौ सर्पत्ववद्भाति शुक्तौ च रजतत्ववत् । चोरत्ववदपि स्थाणौ मरीच्यां च जलत्ववत् ।।७०।।

गन्धर्वपुरवद्व्योम्नि सच्चिदानन्दलक्षणे । निरस्तभेदसद्भावे शिवे विश्वं विराजते ।।७१।।

पत्रशाखादिरुपेण यथा तिष्ठति पादपः । तथा भूम्यादिरूपेण शिव एको विराजते ।।७२।।

**दीर्घत्व-रंगामुळे दोरी । भासे सर्पाकार खरी । शुभ्र वर्णामुळे रुपेरी । शिंप दिसे चांदीच ।।१४९।।**

**वृक्षबुंधा आकाराने । भासे रात्री तस्कराप्रमाणे । वाळवंटात उन्हाने । भास होई मृगजळाचा ।।१५०।। वायूने सूर्यकिरणांनी । ढगांचे आकार रंग क्षणोक्षणी । बदलूनि भासती नयनी । गंधर्वनगरे नभात ।।१५१।। तैसे शक्तिस्फुरणाने पाही । सच्चिदानंदरूप शिवाठायी । हा विश्वप्रपंच सर्वही । प्रकाशतो अभिन्नत्वे ।।१५२।। शाखा-पर्ण-पुष्परूपाने । एक वृक्षचि उभा डौलाने । तैसा शिव स्वशक्तियोगाने । पृथिव्यादी रूपाने प्रकाशे ।।१५३।। म्हणूनि आनंदाचा गाभा । शिवचि विश्वरूपात उभा । अनंत ब्रह्मांडांतूनि प्रभा । केवळ त्याची फाकते ।।१५४।। हेचि शिवजगन्मयस्थल । आता माहेश्वरस्थलातील अंतिम स्थल । ते भक्तदेहिकलिंगस्थल । श्रवण करी आवडीने ।।१५५।।**

**भक्तदेहिकलिंगस्थल** - (२४)

समस्तजगदात्माऽपि शंकरः परमेश्वरः । भक्तानां हृदयाम्भोजे विशेषेण विराजते ।।७३।।

कैलासे मन्दरे चैव हिमाद्रौ कनकाचले । हृदयेषु च भक्तानां विशेषेण व्यवस्थितः ।।७४।।

**शिव प्रपंचाचे अधिष्ठान । तो राहिला विश्व व्यापून । परि विशेषत्वाने त्याचे स्थान । वास्तव्याचे कोणते? ।।१५६।। परशिवब्रह्म परमेश्वर । त्याने व्यापिले सर्व चराचर । भक्तहृदयकमळी तो स्थिर ।**

**विशेषत्वाने विराजतो ।।१५७।। तो वसतो कैलासात । मंदराचली हिमालयात । मेरुपर्वती ज्योतिर्लिंगात । तीर्थस्थळीही नांदतो ।।१५८।। परि जेथे शिवकीर्तनी । भक्त डोलती नामस्मरणी । शिवनामघोष घुमे गगनी । तेथे नांदतो शंकर ।।१५९।। शिवकथा ऐकता कानी । ज्याच्या नयनी भरे पाणी । ज्याचे अंतर ये उचंबळूनी । तेथे नांदतो शंकर ।।१६०।। गळा रुद्राक्षांच्या माळा । भस्मे भूषविले भाळा । शिवनामाचा जेथे चाळा । तेथे नांदतो शंकर ।।१६१।। भजनपूजनाच्या छंदे । ज्याचे हृदय डोले मोदे । शिव शिव म्हणता मधेच स्फुंदे । तेथे नांदतो शंकर ।।१६२।। शिव वसतो सर्वठायी । परि विशेषे भक्त-हृदयी । यात संदेह नाही नाही । किंचितही अगस्त्या ।।१६३।।**

सर्वात्माऽपि परिच्छिन्नो यथा देहेषु वर्तते । तथा स्वकीयभक्तेषु शंकरो भासते सदा ।।७५।।
नित्यं भाति त्वदीयेषु या ते रुद्र शिवा तनू: । अघोराऽपापकाशीति श्रुतिराह सनातनी ।।७६।।

**सर्वव्यापक परमेश्वर । देव दानव आणिक नर । यांच्या शरीरात स्थिर । राहे प्रतिबिंब-रूपाने ।।१६४।। तैसाचि तो भक्तहृदयात । सर्वदा असे प्रकाशित । तो अपरिच्छिन्न परि देहांत । परिच्छिन्न भासतो ।।१६५।। लिंगरूप तुझे रुद्र । शांत आणि कल्याणप्रद । नाशी पातके अभद्र । सदा**

**प्रकाशे भक्तहृदयी ।।१६६।। ऐसे श्रुतींचे वचन । ते मानावे लागे प्रमाण । सर्वव्यापक शिव जाण । भक्तहृदयी राहतो ।।१६७।।**

विशुद्धेषु विरक्तेषु विवेकिषु महात्मसु । शिवस्तिष्ठति सर्वात्मा शिवलांछनधारिषु ।।७७।।

नित्यं सन्तोषयुक्तानां ज्ञाननिर्धूतकर्मणाम् । माहेश्वराणामन्तःस्थो विभाति परमेश्वरः ।।७८।।

**विशुद्ध विरक्त षट्स्थलज्ञानी । चरमूर्तींच्या हृदयस्थानी । शुकादी महात्म्यांच्या अंतःकरणी । शिव नित्य राहतो ।।१६८।। विभूति-रुद्राक्षादी शिवभूषणे । जे करिती धारण अतिप्रेमाने । त्या शिव-भक्तांची हृदयस्थाने । शिववासाने शोभती ।।१६९।। परंतु जे भक्तिविरहित । हृदयी जो शिव विराजित । त्याचे अस्तित्व किंचित । त्यांना जाणवेचि ना ।।१७०।। शिवज्ञानाने पापे लोपली । संतोष नांदतो हृदयकमळी । त्यांच्याठायी चंद्रमौळी । स्पष्ट होई प्रतीत ।।१७१।।**

अन्यत्र शम्भो रतिमात्रशून्यो निजेष्टलिंगे नियतान्तरात्मा ।

शिवात्मकं विश्वमिदं विबुध्यन् माहेश्वरोऽसौ भवति प्रसादी ।।७९।।

**शिवावाचूनि अन्य देवांत । प्रेम न ठेवितो किंचित । इष्टलिंगासी अर्चितो सतत । चित्त एकाग्र**

**करूनी ।।१७२।। दृष्टीपुढे जे विश्व चराचर । ते अवघे शिवरूप साचार । ऐसे मानितो जो माहेश्वर । तोच होतो प्रसादी ।।१७३।। असे हे भक्तदेहिकलिंगस्थल । येथे संपले माहेश्वरस्थल । आता प्रसादि-स्थलाची वाटचाल । तुजलागी सांगेन ।।१७४।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१७५।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । दशमोऽध्याय पूर्ण हा ।।१७६।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतमाहेश्वरस्थले माहेश्वरप्रशंसादिनवविधस्थलप्रसंगो नाम दशमः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय अकरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु पंचवक्त्र शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः स्वरमयाय । अजनीश्वराय नमः सर्वज्ञाय । परमात्मने नमः सोमसूर्याग्निलोचनाय । हविषे नमः यज्ञपते ।।१।। नमो शिवा परब्रह्मा । तुझा पार नकळे निगमागमा । नेति नेति हीच सीमा । झाली तुझ्या वर्णनाची ।।२।। तूच सूर्य चंद्र नक्षत्रे । तूच इंद्रिये मन गात्रे । मानवरूपी विचित्र पात्रे । होऊनि तूच खेळतोस ।।३।। रंगभूमी जगद्व्याळ । तीवरी तुझा चालला खेळ । विचार करिता वाटे नवल । तुझ्या लीला-नाटकाचे ।।४।। रात्री निरभ्र अंतराळात । चमचमती ब्रह्मांडे अनंत । ती पाहता भरे मनात । तुझे व्यापक कर्तृत्व ।।५।। ऐसे तुझे प्रचंड कार्य । मग मज कराया लेखनकार्य । शक्ती देणे अशक्य काय । तुला असे शंकरा? ।।६।। असो, रेणुकाचार्य अगस्तीस । करिती शिवसिद्धान्तोपदेश । आता प्रसादिस्थलाचे विशेष । सांगतील माहात्म्य ।।७।। मागे कथिल्या सहा भक्ती । त्यात तिसरी अवधानभक्ती । प्रसादिस्थली साधकाठायी ती । असते नित्य जागृत ।।८।। करिता लिंगप्रसाद-सेवन । असावे लागते पूर्ण अवधान । प्रसादाचा एकही कण । सांडता नये भूतळी ।।९।। ऐसा

**अवधानपूर्वक । वागे प्रसादिस्थलीचा साधक । तुम्हीही आता अवधानपूर्वक । ते निरूपण ऐकावे ।।१०।।**

## अंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

अगस्त्य उवाच -

उक्तो माहेश्वरः साक्षाल्लिंगनिष्ठादिधर्मवान् । कथमेष प्रसादीति कथ्यते गणनायक ।।१।।

**अगस्त्य म्हणती रेणुकाप्रत । जो लिंगनिष्ठाधर्मयुक्त । तो माहेश्वरस्थलीचा भक्त । उभा केला दृष्टीपुढे ।।११।। तो कैसा होतो प्रसादिस्थली । कसे वर्तन लक्षणे वेगळी । ती निरूपावी मज सगळी । कृपा करूनि गणेश्वरा ।।१२।।**

श्रीरेणुक उवाच -

लिंगनिष्ठादिभावेन ध्वस्तपापनिबन्धनः । मनःप्रसादयोगेन प्रसादीत्येष कथ्यते ।।२।।

प्रसादिस्थलमित्येतदस्य माहात्म्यबोधकम् । अन्तरस्थलभेदेन सप्तधा परिकीर्तितम् ।।३।।

**रेणुक म्हणती सांगतो स्पष्ट । धर्माचारे झाली पापे नष्ट । असा माहेश्वर लिंगनिष्ठ । त्यास म्हणती 'प्रसादी' ।।१३।। शिवज्ञानाने ज्याच्या चित्ता । अतीव लाभली प्रसन्नता । तोचि माहेश्वर पुरता । प्रसादिस्थली जाणावा ।।१४।। भक्त आणि माहेश्वर । या स्थलांत कथिला सदाचार । तोचि**

**आधिक्याने सविस्तर । सप्त स्थलांत विवरिला ।।१५।।**

प्रसादिस्थलमादौ तु गुरुमाहात्म्यकं ततः । ततो लिंगप्रशंसा च ततो जंगमगौरवम् ।।४।।

ततो भक्तस्य माहात्म्यं ततः शरणकीर्तनम् । शिवप्रसादमाहात्म्यमिति सप्तप्रकारकम् ।।५।।

**प्रसादिस्थल गुरुमाहात्म्यस्थल । लिंगमाहात्म्यस्थल जंगममाहात्म्यस्थल । भक्तमाहात्म्यस्थल शरणमाहात्म्यस्थल । शिवप्रसादमाहात्म्यस्थल सातवे ।।१६।।**

**प्रसादमाहात्म्यस्थल** - (२५)

क्रमाल्लक्षणमेतेषां कथयामि महामुने ।

नैर्मल्यं मनसो लिंगं प्रसाद इति कथ्यते । शिवस्य लिंगरूपस्य प्रसादादेव सिद्ध्यति ।।६।।

**ही सप्त उपस्थले विवरून । क्रमशः कथितो तुजलागून । मनाचे अतीव निर्मलपण । यास म्हणती प्रसाद ।।१७।। हा निर्मलत्वरूपी प्रसाद । शिवकृपेने होतो सिद्ध । ज्याचे अंतरंग परिशुद्ध । त्यास अक्षय सुख लाभे ।।१८।।**

शिवप्रसादं यद्द्रव्यं शिवाय विनिवेदितम् । निर्माल्यं तत्तु शैवानां मनोनैर्मल्यकारणम् ।।७।।

मनःप्रसादसिद्ध्यर्थं निर्मलज्ञानकारणम् । शिवप्रसादं स्वीकुर्वन् प्रसादीत्येष कथ्यते ।।८।।

**शिवासी जो जो पदार्थ अर्पिला । तो तो प्रसादरूप पावला । त्याचे सेवन निर्मलतेला । मनाच्या ठरे कारण ।।१९।। शिवनिर्माल्याचे सेवन । हे शिवज्ञानासी कारण । जो प्रसाद करितो ग्रहण । तो माहेश्वर प्रसादी ।।२०।।**

अन्नशुद्ध्या हि सर्वेषां तत्त्वशुद्धिरुदाहृता । विशुद्धमन्नजातं हि यच्छिवाय समर्पितम् ।।९।।

तदेव सर्वकालं तु भुंजानो लिंगतत्परः । मनःप्रसादमतुलं लभते ज्ञानकारणम् ।।१०।।

**शिवार्पित करिता अन्न । त्यातील दोष जाती निघून । मग ते अन्न शुद्ध होऊन । होई शिव-प्रसाद ।।२१।। सेवन करिता शिवप्रसाद । मनादी इंद्रिये होती शुद्ध । यास तत्त्वशुद्धी सिद्ध-। पुरुष जाण संबोधिती ।।२२।। अन्नातील मोठा दोष । तो असे ममत्वदोष । 'हे माझे हे माझे' असा घोष । मनुष्य नित्य करीतसे ।।२३।। अन्न करिता शिवार्पण । ते मग परशिवाचे होऊन । अर्पित्याचे स्वामित्व सरून । होतो शिवप्रसाद ।।२४।। मग तो इतरांस देताना । म्हणे 'हा शिवाचा प्रसाद घ्याना' । त्यावेळी 'हा माझा' असे म्हणेना । म्हणे केवळ 'शिवाचा' ।।२५।। ममत्वदोष अन्नातून । जाऊनि ते होई शुद्धान्न । माहेश्वर लिंगपूजापरायण । तेचि नित्य सेवीतसे ।।२६।। प्रसादान्नाच्या सेवनामुळे । अंतरी प्रसन्नता दरवळे । आणि प्रसन्नतेने उजळे । शिवज्ञानाचा प्रकाश ।।२७।।**

आत्मभोगाय नियतं यद्यद् द्रव्यं समाहितम् । तत्तत् समर्प्य देवाय भुंजीतात्म विशुद्धये ।।११।।

नित्यसिद्धेन देवेन भिषजा जन्मरोगिणाम् । यद्यत् प्रसादितं भुक्त्वा तत्तज्जन्मरसायनम् ।।१२।।

**उपभोगार्थ जे जे पदार्थ । संपादिले ते ते शिवार्पित । करूनि सेविता सदोदित । चित्त शुद्ध होतसे ।।२८।। लिंगात वसे शिव नित्यसिद्ध । तो भवरोगनिवारक वैद्य प्रसिद्ध । त्याने दिधला अन्नप्रसाद । तो भक्ताने भक्षावा ।।२९।। ते केवळ नोहे अन्न । जन्ममरण-रोग निवारण । करणारे ते दिव्य रसायन । आहे ऐसे जाणावे ।।३०।।**

आरोग्यकारणं पुंसामन्तःकरणशुद्धिदम् । तापत्रयमहारोगसमुद्धरणभेषजम् ।।१३।।

विद्यावैशद्यकरणं विनिपातविघातनम् । द्वारं ज्ञानावतारस्य मोहोच्छेदस्य कारणम् ।।१४।।

वैराग्यसम्पदो मूलं महानन्दप्रवर्धनम् । दुर्लभं पापचित्तानां सुलभं शुद्धकर्मणाम् ।।१५।।

आदृतं ब्रह्मविष्ण्वाद्यैर्वसिष्ठाद्यैश्च तापसैः । शिवस्वीकृतमन्नाद्यं स्वीकार्यं सिद्धिकांक्षिभिः ।।१६।।

**करिता शिवप्रसाद सेवन । होई भक्ताचे आरोग्यवर्धन । शुद्ध होय अंत:करण । मुक्त त्रिमलांपासूनी ।।३१।। औषधे व्हावा रोगनाश । तैसे नाशती त्रितापदोष । विद्या शुद्ध होऊनि विकास । पावे सर्व परींनी ।।३२।। होई संकटांचा परिहार । मुक्त होऊनि ज्ञानद्वार । अज्ञान उच्छेदूनि**

**समग्र । वाढे वैराग्यसंपत्ती ।।३३।। प्राप्त होई ब्रह्मानंद । ऐसा हा शिवप्रसाद । पुण्यात्मांना सहज उपलब्ध । दुर्लभ मात्र पाप्यांना ।।३४।। ब्रह्मादी देव वसिष्ठादी ऋषींनी जाण । स्वीकारले शिव-प्रसादान्न । म्हणूनि ते करावे भावे सेवन । मुमुक्षू शिवभक्तांनी ।।३५।।**

पत्रं पुष्पं फलं तोयं यच्छिवाय निवेदितम् । तत्तत्स्वीकारयोगेन सर्वपापक्षयो भवेत् ।।१७।।

यथा शिवप्रसादान्नं स्वीकार्यं लिंगतत्परैः । तथा गुरोः प्रसादान्नं तथैव शिवयोगिनाम् ।।१८।।

**पान फूल आणि फळ । अथवा सहजप्राप्त जे जळ । ते शिवार्पित करूनि सेविता समूळ । नष्ट होती पातके ।।३६।। जैसे शिवप्रसादान्नाचे भक्षण । तैसेचि गुरु-जंगमांचे प्रसादान्न । यांचेही भक्तिपूर्वक सेवन । करावे प्रसादी भक्ताने ।।३७।।**

**गुरुमाहात्म्यस्थल** - (२६)

गुरुरेवात्र सर्वेषां कारणं सिद्धिकर्मणाम् । गुरुरूपो महादेवो यतः साक्षादुपस्थितः ।।१९।।

निष्कलो हि महादेवो नित्यज्ञानमहोदधिः । सकलो गुरुरूपेण सर्वानुग्राहको भवेत् ।।२०।।

**भोगमोक्षाच्या प्राप्तीलागून । केवळ गुरू हाचि कारण । शिवचि गुरूचे रूप घेऊन । अवतरलासे भूलोकी ।।३८।। नित्य ज्ञानाचा सागर । निष्कल निरवयव साचार । तो शिवचि कृपा कराया भूवर ।**

**गुरुरूपाने अवतरला ।।३९।।**

यः शिवः स गुरुर्ज्ञेयो यो गुरुः स शिवः स्मृतः । न तयोरन्तरं कुर्याद् ज्ञानावाप्तौ महामतिः ।।२१।।

हस्तपादादिसाम्येन नेतरैः सदृशं वदेत् । आचार्यं ज्ञानदं शुद्धं शिवरूपतया स्थितम् ।।२२।।

**गुरू हाचि शिव असे । शिव हाचि गुरू असे । शिवभक्ताने भाविजे ऐसे । मनामाजी आपुल्या ।।४०।। जो शिवभक्त बुद्धिमान । ज्यासी ज्ञानप्राप्तीची तहान । त्याने शिव-गुरूंत भिन्नपण । करू नये कदापि ।।४१।। ज्याचे निर्मल अंतःकरण । जो देतो परशिवाचे ज्ञान । शिवरूपात स्थिर पूर्ण । ऐसा मोक्षद श्रीगुरू ।।४२।। हस्तपादादी अवयवांनी जाण । तो जरी दिसे मनुष्यासमान । तरी त्यासी न मानावे साधारण । प्रत्यक्ष शिव जाणावा ।।४३।।**

आचार्यस्यावमानेन श्रेयःप्राप्तिर्विहन्यते । तस्मान्निःश्रेयसप्राप्त्यै पूजयेत्तं समाहितः ।।२३।।

गुरुभक्तिविहीनस्य शिवभक्तिर्न जायते । ततः शिवे यथा भक्तिस्तथा भक्तिर्गुरावपि ।।२४।।

**श्रीगुरूसी मानिता सामान्य जन । त्यांचा होतसे अवमान । आणि श्रेयसाच्या प्राप्तीपासून । भक्त वंचित राहतो ।।४४।। भोग मोक्ष प्राप्त कराया । चित्त एकाग्र करूनिया । पुजावे एकमात्र श्रीगुरुराया । नित्य शिवभक्ताने ।।४५।। केली नाही गुरुभक्ती । तरी घडेचिना शिवभक्ती । म्हणूनि शिवासमानचि**

**भक्ती । गुरूची केली पाहिजे ।।४६।।**

**लिंगमाहात्म्यस्थल** - (२७)

गुरुमाहात्म्ययोगेन निजज्ञानातिरेकतः । लिंगस्यापि च माहात्म्यं सर्वोत्कृष्टं विभाव्यते ।।२५।।

शिवस्य बोधलिंगं यद् गुरुबोधितचेतसा । तदेव लिंगं विज्ञेयं शांकरं सर्वकारणम् ।।२६।।

**गुरुमाहात्म्यज्ञानेकरून । दृढ होई स्वस्वरूपज्ञान । तेणे लिंगाचेही माहात्म्य पूर्ण । कळे उत्तम रीतीने ।।४७।। शिवाचे बोधलिंग जाण । हेचि चिन्मयलिंग असून । तेचि विश्वाचे मूळ कारण । विष्णू आदी देवांचे ।।४८।। त्या शांकरलिंगाचे ज्ञान । केवळ गुरूच देती करून । म्हणून अगतिकपणे गुरूसी शरण । जाऊनि ज्ञान संपादावे ।।४९।।**

परं पवित्रममलं लिंगं ब्रह्म सनातनम् । शिवाभिधानं चिन्मात्रं सदानन्दं निरंकुशम् ।।२७।।

कारणं सर्वलोकानां वेदानामपि कारणम् । पूरणं सर्वतत्त्वस्य तारणं जन्मवारिधेः ।।२८।।

ज्योतिर्मयमनिर्देश्यं योगिनामात्मनि स्थितम् । कथं विज्ञायते लोके महागुरुदयां विना ।।२९।।

**शिवलिंग श्रेष्ठ दैवत । परमपवित्र त्रिमलविरहित । ब्रह्मरूप सनातन चैतन्ययुक्त । त्याचे नाम शिव असे ।।५०।। आनंदस्वरूप चिन्मात्र । सर्वलोककारण स्वतंत्र । वेदांचेही एकमात्र । मूलकारण ते**

**असे ।।५१।। सर्व तत्त्वांचे पूरक । संसारसागरतारक । ज्योतिर्मय अनिर्देश्य एक । स्थित योगीहृदयांत ।।५२।। ऐसे हे लिंग परब्रह्म पूर्ण । ते महागुरुकृपेवाचून । जगी या जाणू शकेल कोण । सांग मुनी अगस्त्या? ।।५३।।**

ब्रह्मणा विष्णुना पूर्वं यल्लिंगं ज्योतिरात्मकम् । अपरिच्छेद्यमभवत् केन वा परिचोद्यते ।।३०।।

बहुनात्र किमुक्तेन लिंगं ब्रह्म सनातनम् । योगिनो यत्र लीयन्ते मुक्तपाशनिबन्धनाः ।।३१।।

**वराहरूप घेऊनि प्रबळ । विष्णूने धुंडिले सप्तपाताळ । हंसरूपे शोधिले अंतराळ । ब्रह्मदेवाने अथकपणे ।।५४।। तरीही ज्योतिर्लिंगदर्शन । घडले नाही दोघांलागून । मग सामान्य जे जन । त्यांना कैसे घडेल? ।।५५।। अधिक काय सांगू ऐक । जे पाशमुक्त योगी सनकादिक । ते ज्यात पावती पूर्ण ऐक्य । ते असे लिंग परब्रह्म ।।५६।।**

पीठिका परमा शक्तिर्लिंगं साक्षात्परः शिवः । शिवशक्तिसमायोगं विश्वं लिंगं तदुच्यते ।।३२।।

ब्रह्मादयः सुराः सर्वे मुनयः शौनकादयः । शिवलिंगार्चनादेव स्वं स्वं पदमवाप्नुयुः ।।३३।।

विश्वाधिपत्वमीशस्य लिंगमूर्तेः स्वभावजम् । अनन्यदेवसादृश्यं श्रुतिराह सनातनी ।।३४।।

**क्रियाशक्ती हीच शाळुंका एक । त्यावरी चिद्रूप शिव ही पिंडी देख । पूर्ण विश्व शिवशक्त्यात्मक । हेचि जाणावे विश्वलिंग ।।५७।। ब्रह्मादी देव शौनकादी ऋषिगण । यांनी केले शिवलिंगपूजन । तेणे**

त्यांना लाभले जाण । आपापले अधिकार ।।५८।। लिंगस्वरूप जो शंकर । तो स्वभावत: विश्वस्वामी साचार । त्याशी तुळती ना अन्य सुर । ऐसे श्रुती सांगती ।।५९।। वीरशैवांची आराध्ये तीन । गुरू लिंग जंगम जाण । एक शिवतत्त्व त्रिभाग होऊन । दृष्टीपुढे विलसते ।।६०।। तीन पर्णे बिल्वदलात । परि ते एकचि मानितो भक्त । एक बिल्व लिंगार्पित । करिता तीन न गणितो ।।६१।। तैसा शिवचि गुरू होऊन । दीक्षा देई शिष्यालागून । तोचि लिंगरूपाने रक्षण । राहूनि देही करीतसे ।।६२।। तोचि येऊन जंगमरूपात । पाजितो शिवज्ञानामृत । 'एकमूर्तिस्त्रयोभागः' हे ख्यात । वचन असे आगमांचे ।।६३।। गुरु-लिंगांचे महिमान । अगस्त्या कथिले तुजलागून । आता जंगममाहात्म्य पूर्ण । घेई जाणूनि सद्भावे ।।६४।।

**जंगममाहात्म्यस्थल** - (२८)

गुरुशिष्यसमारूढलिंगमाहात्म्यसम्पदः । सर्वं चिद्रूपविज्ञानाज्जंगमाधिक्यमुच्यते ।।३५।।

जानन्त्यतिशयाद् ये तु शिवं विश्वप्रकाशकम् । स्वस्वरूपतया ते तु जंगमा इति कीर्तिताः ।।३६।।

गुरु-शिष्यांच्या ठायी । लिंगमाहात्म्य दृढ होई । त्या लिंगमाहात्म्य-संपत्तीहूनही । जंगम श्रेष्ठ अधिक ।।६५।। दृष्टीपुढे जे विश्व विलसे । ते सर्व शिवशक्तिमय असे । हे तो जंगम जाणतसे । म्हणूनि तो अधिक ।।६६।। शिवप्रकाशाने समस्त । हे ब्रह्मांड होतसे प्रकाशित । त्या शिवासी जो मानी

**आत्मवत् । तो जंगम शिवयोगी ।।६७।।**

ये पश्यन्ति जगज्जालं चिद्रूपं शिवयोगतः । निर्धूतमलसंस्पर्शास्ते स्मृताः शिवयोगिनः ।।३७।।

घोरसंसारतिमिरपरिध्वंसनकारणम् । येषामस्ति शिवज्ञानं ते मताः शिवयोगिनः ।।३८।।

**शिवयोगसामर्थ्यामुळे । विश्व चिद्रूप जाणूनि डोले । ज्याचे मलत्रय नष्ट झाले । तो जंगम शिवयोगी ।।६८।। घोर संसारतिमिर । जे शिवज्ञान करिते दूर । ते ज्याच्याठायी झाले स्थिर । तो जंगम शिवयोगी ।।६९।।**

जितकामा जितक्रोधा मोहग्रन्थिविभेदिनः । समलोष्टाश्मकनकाः साधवः शिवयोगिनः ।।३९।।

समाः शत्रौ च मित्रे च साक्षात्कृतशिवात्मकाः । निःस्पृहा निरहंकारा वर्तन्ते शिवयोगिनः ।।४०।।

**ज्याने जिंकिला मन्मथ । क्रोधासी मारिली लाथ । मोहग्रंथी निखंदिली समस्त । तो जंगम शिवयोगी ।।७०।। मृत्तिका आणि कांचन । शत्रू मित्र एकसमान । ऐसे जो मानी सज्जन । तो जंगम शिवयोगी ।।७१।। शिवाचा झाला साक्षात्कार । तेणे नष्टला अहंकार । निःस्पृह होऊनि विचरे भूवर । तो जंगम शिवयोगी ।।७२।।**

दुर्लभं हि शिवज्ञानं दुर्लभं शिवचिन्तनम् । येषामेतद्द्वयं चास्ति ते हि साक्षाच्छिवात्मकाः ।।४१।।

पादाग्ररेणवो यत्र पतन्ति शिवयोगिनाम् । तदेव सदनं पुण्यं पावनं गृहमेधिनाम् ।।४२।।

**दुर्लभ अत्यंत शिवज्ञान । तैसेचि दुर्लभ शिवचिंतन । हे साधिती ते शिवयोगी जाण । प्रत्यक्ष शिवरूपचि ।।७३।। त्यांची पडे जेथे पायधूळ । ते गृह होई पुण्यस्थळ । ते गृह सदा सर्वकाळ । करी पुनीत सर्वांसी ।।७४।।**

सर्वसिद्धिकरं पुंसां दर्शनं शिवयोगिनाम् । स्पर्शनं पापशमनं पूजनं मुक्तिसाधनम् ।।४३।।

महतां शिवतात्पर्यवेदिनामनुमोदिनाम् । किं वा फलं न सिद्ध्येत सम्पर्काच्छिवयोगिनाम् ।।४४।।

**घेता शिवयोग्याचे दर्शन । सर्व सिद्धी होती प्रसन्न । त्याच्या स्पर्शे होय पापनाशन । पूजनाने मोक्ष लाभे ।।७५।। जो जाणतो शिवरहस्यास । जो शिवसुखी निमग्न सत्पुरुष । त्याचा घडता सहवास । फळ कोणते न लाभे? ।।७६।। ऐसे जंगमाचे महिमान । आता कथितो भक्तमहिमान । जो नित्य शिवार्चनी लीन । त्याचे लक्षण कोणते ।।७७।।**

**भक्तमाहात्म्यस्थल** - (२९)

गुरोर्लिंगस्य माहात्म्यकथनाच्छिवयोगिनाम् । सिद्धं भक्तस्य माहात्म्यं तथाप्येष प्रशस्यते ।।४५।।

ये भजन्ति महादेवं परमात्मानमव्ययम् । कर्मणा मनसा वाचा ते भक्ता इति कीर्तिताः ।।४६।।

**गुरू लिंग जंगम तीन । यांचे जाणता महिमान । तेणे भक्ताचेही मोठेपण । सिद्ध होते**

**सहजचि ।।७८।। उपासना करिती भक्त । तेणे गुरु-लिंग-जंगमांसी महत्त्व प्राप्त । भक्तचि नसेल उपस्थित । तेथे कोण विचारितो? ।।७९।। भक्त अर्चितो म्हणून । देवासी लाभले देवपण । म्हणूनि भक्तासी संपूर्ण । वेदशास्त्रे प्रशंसिती ।।८०।। जे करांनी करिती पूजन । मनाने करिती शिवध्यान । वाचेने करिती शिवस्तवन । ते शिवभक्त जाणावे ।।८१।।**

दुर्लभा हि शिवे भक्तिः संसारभयतारिणी । सा यत्र वर्तते साक्षात् स भक्तः परिगीयते ।।४७।।

किं वेदैः किं ततः शास्त्रैः किं यज्ञैः किं तपोव्रतैः । नास्ति चेत् शांकरी भक्तिर्देहिनां जन्मरोगिणाम् ।।४८।।

**संसारभयापासूनि करी मुक्त । जी दुर्लभ मानवासी अत्यंत । ती शिवभक्ती दरवळे ज्याच्या मनात । तो शिवभक्त जाणावा ।।८२।। ज्यासी घडेना शिवभक्ती । त्याने वेदाध्ययन केले किती । शिकला शास्त्रे टाकिल्या आहुती । यज्ञी तरी ते सर्व व्यर्थ ।।८३।। काय करावे तप करून । आणि व्रतवैकल्ये आचरून? । ते शिवभक्तिहीन जीवन । जन्ममरणरुग्णाचे ।।८४।।**

शिवभक्तिविहीनस्य सुकृतं चापि निष्फलम् । विपरीतफलं च स्याद् दक्षस्यापि महाध्वरे ।।४९।।

अत्यन्तपापकर्मापि शिवभक्त्या विशुद्ध्यति । चण्डो यथा पुरा भक्त्या पितृहाऽपि शिवोऽभवत् ।।५०।।

**शिवभक्तिहीनाचे सत्कर्म सकल । मुनिवरा निश्चित होय निष्फल । दक्षाने केला महायज्ञ तरी**

**फल । विपरीत पाहा मिळाले ।।८५।। असो पातकी अत्यंत । तो शिवभक्तीने होय पापमुक्त । चंडाने पित्याचा केला घात । भक्तीने झाला शिवरूप ।।८६।।**

सुकृतं दुष्कृतं चापि शिवभक्तस्य नास्ति हि । शिवभक्तिविहीनानां कर्मपाशनिबन्धनम् ।।५१।।
शिवाश्रितानां जन्तूनां कर्मणा नास्ति संगमः । वाजिनां दिननाथस्य कथं तिमिरजं भयम् ।।५२।।

**पुण्य पाप हे काही । शिवभक्तासी नाही नाही । पडे शिवभक्तिहीन पाही । कर्मपाशबंधनी ।।८७।। तो आपुल्या कर्मानुसार । सुखदुःखे भोगी अपार । भ्रमे जन्मजन्मांतर । लक्ष चौऱ्यांशीमधूनी ।।८८।। घाण्यास जुंपला बैल । जसा फिरे सर्वकाळ । तसा स्त्रीपुत्रादिकांस केवळ । प्रदक्षिणाच घालतो ।।८९।। वित्त आणि मालमत्ता । आणि मिळविणे सत्ता । याच कर्दमी पुरता । मंडूकासम गुंतला ।।९०।। देही प्रकाशतो शिव । याची किंचित नाही जाणीव । क्षणिक सुखासाठी जीव । पाखडतो सारखा ।।९१।। शिवभक्तिहीनाची तऱ्हा । किती सांगावी मुनिवरा । त्यासी किंचित लागे न वारा । सदाचार-भक्तीचा ।।९२।। शिवभक्तीत जो लीन । त्यासी नाही कर्मबंधन । सूर्यरथाच्या अश्वांलागून । जसे अंधारभय नसे ।।९३।।**

निरोद्धुं न क्षमं कर्म शिवभक्तान् विशृंखलान् । कथं मत्तगजान् रुन्धेच्छृंखला बिसतन्तुजा ।।५३।।
ब्राह्मणः क्षत्रियो वाऽपि वैश्यो वा शूद्र एव वा । अन्त्यजो वा शिवे भक्तः शिववन्मान्य एव सः ।।५४।।

**पुण्य-पाप कर्मांचे पाश । बांधू न शकती शिवभक्तास । जैसी मदोन्मत्त हत्तीस । कमलतंतूची शृंखला ।।९४।। असो क्षत्रिय वैश्य ब्राह्मण । शूद्र अंत्यज वा असो कोण । जो शिवभक्ती करी तो पूर्ण । मान्य असे शिवासम ।।९५।।**

शिवभक्तिसमावेशे क्व जातिपरिकल्पना । इंधनेष्वग्निदग्धेषु को वा भेदः प्रकीर्त्यते ।।५५।।

शुद्धा नियमसंयुक्ताः शिवार्पितफलागमाः । अर्चयन्ति शिवं लोके विज्ञेयास्ते गणेश्वराः ।।५६।।

**काष्ठे अग्नीत जाळता । ती अग्निरूप होती पूर्णतः । त्यांचे वेगळेपण सांगता । नये जाण कोणासी ।।९६।। तैसे जो असे शिवभक्त । त्याची पाहू नये जात । त्याच्या नांदते अंतरात । ती शिवभक्ती पाहावी ।।९७।। जे शिवदीक्षेने झाले पावन । पूजाफल शिवार्पित करून । शिवाचे करिती अर्चन । ते गणेश्वर जाणावे ।।९८।। ऐसी ही शिवभक्त-लक्षणे । त्यांचे मनन चिंतन करणे । उमजूनि सर्व आचरणे । इष्ट वीरशैवांसी ।।९९।। आता अनन्यभावेकरून । जो शिवासी जातो शरण । त्या शरणाचे महिमान । कथितो ते अवधारी ।।१००।।**

### **शरणमाहात्म्यस्थल** - (३०)

गुरुलिंगादिमाहात्म्यबोधान्वेषणसंगतः । सर्वात्मना शिवापत्तिः शरणस्थानमुच्यते ।।५७।।

ब्रह्मादिविबुधान् सर्वान् मुक्त्वा प्राकृतवैभवान् । प्रपद्यते शिवं यत्तु शरणं तदुदाहृतम् ।।५८।।

**गुरू लिंग जंगम भक्त । यांच्या माहात्म्यज्ञानाने युक्त । केवळ शिवचि आपणा रक्षीत । ऐसे सर्वथा जाणूनी ।।१०१।। जो अनन्यभावेकरून । परशिवासी जातो शरण । हेचि शरणस्थल जाण । साच कुंभोद्भवा तू ।।१०२।। प्राकृतिक वैभवसंपन्न । ब्रह्मादी देवता त्यागून । अनन्य आश्रयितो शिवालागून । तोचि असे शरणभक्त ।।१०३।।**

शरण्यः सर्वभूतानां शंकरः शशिशेखरः । सर्वात्मना प्रपन्नस्तं शरणागत उच्यते ।।५९।।

विमुक्तभोगलालस्यो देवतान्तरनि:स्पृहः । शिवमभ्यर्थयन् मोक्षं शरणार्थीति गीयते ।।६०।।

**जो मस्तकी चंद्र करी धारण । जीवमात्रांचे करितो रक्षण । त्या शंकरासी जो सर्वभावे शरण । जाई तोचि शरणागत ।।१०४।। शरणागतासी देई अभयदान । म्हणूनि शिव असे शरण्य । चंद्रासी रक्षिले अभय देऊन । धारण केले मस्तकी ।।१०५।। भोगलालसेपासूनि मुक्त । ब्रह्माविष्णुपदांविषयी विरक्त । जो मोक्ष मानितो शिवाप्रत । त्यास म्हणती शरणार्थी ।।१०६।। शरण शरणागत शरणार्थी । ह्या तीन वर्णिल्या येथे स्थिती । शरणस्थली भक्ताच्या मन:स्थिती । ह्या असती जाणाव्या ।।१०७।।**

ये प्रपन्ना महादेवं मनोवाक्कायकर्मभिः । तेषां तु कर्मजातेन किं वा देवादितर्पणैः ।।६१।।

सर्वेषामपि यज्ञानां क्षयः स्वर्गः फलायते । अक्षयं फलमाप्नोति प्रपन्नः परमेश्वरम् ।।६२।।

**मन-वाणी-देहकर्मेकरून । जे परशिवासी गेले शरण । त्यांना कशास असे प्रयोजन । यज्ञ-देवतर्पणाचे? ।।१०८।। यज्ञाने स्वर्ग होय प्राप्त । परि तोही असे नाशिवंत । पुण्य सरता पुन्हा रडत । यावे लागे मृत्युलोकी ।।१०९।। जो शरण जाई शंकरास । त्यासी फळ लाभे अविनाश । अन्य सत्कर्माचे त्यास । काही नसे प्रयोजन ।।११०।।**

प्रपन्नपारिजातस्य भवस्य परमात्मनः । प्रपत्त्या किं न जायेत पापिनामपि देहिनाम् ।।६३।।

प्रपन्नानां महादेवं परिपक्वान्तरात्मनाम् । जन्मैव जन्म नान्येषां वृथा जननसंगिनाम् ।।६४।।

**शंकर कल्पवृक्षासमान । भक्तांचे मनोरथ करी पूर्ण । त्यासी जो जाई शरण । जरी तो महा-पातकी ।।१११।। मग त्यासी न लाभ होय । या विश्वात ते असे काय? । त्याची पातके नाशूनि सर्व । पूर्ण होती मनोरथ ।।११२।। ज्याचे पश्चात्तापे पोळते मन । त्याचे पडे मालिन्य गळून । जो शिवास जाई शरण । तो होई पापमुक्त ।।११३।। शिवासी जाऊनि शरण । ज्यांचे मन झाले पक्व प्रसन्न । त्यांच्या जन्मास म्हणावे जन्म । अन्याचा जन्म व्यर्थचि ।।११४।।**

दुर्लभं मानुषं प्राप्य जननं ज्ञानसाधनम् । ये न जानन्ति देवेशं तेषामात्मा निरर्थकः ।।६५।।

तत्कुलं हि सदा शुद्धं सफलं तस्य जीवितम् । यस्य चित्तं शिवे साक्षाद् विलीनमबहिर्मुखम् ।।६६।।

**दुर्लभ लाभला मानवजन्म । तरी जो भक्तास देई आत्मज्ञान । ते जाणिले नाही शिवब्रह्म । असा जन्म निरर्थक ।।११५।। अंतर्बाह्य ज्याचे मन । सदैव लिंगातचि लीन । त्याचे जीवन झाले धन्य । आणि त्याचे कूळही ।।११६।। प्रसादिस्थलातील अंतिम स्थल । कथितो शिवप्रसादमाहात्म्यस्थल । आरंभी प्रसादमाहात्म्य सकळ । विवरिले असे की ।।११७।। मग प्रसादाचे महिमान । का सांगता पुन्हा विवरून । अशी शंका घेईल कोण । म्हणूनि स्पष्ट सांगतो ।।११८।। प्रारंभी विवरिले प्रसादान्न । या स्थलात शिवानुग्रहाचे विवेचन । मुक्ती न मिळे शिवकृपेविण । केवळ साधनाबळाने ।।११९।। शिवकृपा म्हणजे शिवप्रसाद । तेचि करीन आता विशद । श्रवणभक्तीसी होई सिद्ध । मुनिवर्या अगस्त्या ।।१२०।।**

### शिवप्रसादमाहात्म्यस्थल – (३१)

गुरुलिंगादिमाहात्म्यविशेषानुभवस्थितिः । यस्माच्छिवप्रसादात् स्यात्तदस्य महिमोच्यते ।।६७।।

सदा लिंगैकनिष्ठानां गुरुपूजानुषंगिणाम् । प्रपन्नानां विशुद्धानां प्रसीदति महेश्वरः ।।६८।।

**जेणे गुरुलिंगादींचे विशेष । माहात्म्य येते अनुभवास । महत्त्व त्या शिवप्रसादास । किती आहे ते**

**सांगेन ।।१२१।। लिंगनिष्ठ गुरुपूजातत्पर । शुद्धाचरणी शरणागतावर । प्रसन्न होई महेश्वर । अनन्यनिष्ठा जाणूनी ।।१२२।।**

प्रसादोऽपि महेशस्य दुर्लभः परिकीर्त्यते । घोरसंसारसन्तापनिवृत्तिर्येन जायते ।।६९।।

यज्ञास्तपांसि मन्त्राणां जपश्चिन्ता प्रबोधनम् । प्रसादार्थं महेशस्य कीर्तितानि न संशयः ।।७०।।

**संसारताप भयंकर । तो शिवप्रसादाने होई दूर । शिवभक्ताविण जो अन्य नर । त्यासी दुर्लभ प्रसाद ।।१२३।। शिवप्रसाद मिळावा म्हणून । करावे लागे यज्ञ तपाचरण । मंत्रजप ज्ञानार्जन । हेही लागे करावे ।।१२४।।**

प्रसादमूला सर्वेषां भक्तिरव्यभिचारिणी । शिवप्रसादहीनस्य भक्तिश्चापि न सिद्ध्यति ।।७१।।

गर्भस्थो जायमानो वा जातो वा ब्राह्मणोऽथवा । अन्त्यजो वापि मुच्येत प्रसादे सति शांकरे ।।७२।।

**अव्यभिचारी भक्तीचे कारण । असे शिवप्रसादचि जाण । प्रसादहीन जीवाकडून । न घडेचि शिवभक्ती ।।१२५।। सर्व देव असती एक । एका तत्त्वाची रूपे अनेक । परि भक्तीसाठी आवश्यक । असे दृढ एकनिष्ठा ।।१२६।। म्हणूनि अव्यभिचारी भावे । एका शिवाशीच अर्चावे । या भक्तीचा लाभ होये । एका शिवप्रसादाने ।।१२७।। जन्म घेणारा असो वा गर्भस्थ । जन्मलेला वा ब्राह्मण दलित । तो**

**जीव तत्काळ होतो मुक्त । प्राप्त होता प्रसाद ।।१२८।।**

ब्रह्माद्या विबुधाः सर्वे स्वस्वस्थाननिवासिनः । नित्यसिद्धा भवन्त्येव प्रसादात् पारमेश्वरात् ।।७३।।

प्रसादे शाम्भवे सिद्धे परमानन्दकारणे । सर्वं शिवमयं विश्वं दृश्यते नात्र संशयः ।।७४।।

**शिवप्रसादाने असती स्थिर । ब्रह्मादी देव निजपदांवर । त्यांना प्राप्त होती समग्र । ज्या दुर्लभ सिद्धी त्या ।।१२९।। जो परमानंदाचे कारण । तो शिवप्रसाद सिद्ध होता जाण । त्रैलोक्य शिवस्वरूप पूर्ण । दिसे यात न संशय ।।१३०।।**

संसारचक्रनिर्वाहनिमित्तं कर्म केवलम् । प्रसादेन विना शम्भोर्न कस्यापि निवर्तते ।।७५।।

बहुनात्र किमुक्तेन नास्ति नास्ति जगत्त्रये । समानमधिकं चापि प्रसादस्य महेशितुः ।।७६।।

**जीव संसारचक्री फिरे । त्यास कारण कर्मचि ठरे । शिवप्रसादाविण कर्म न सरे । अन्य कोणत्या साधनांनी ।।१३१।। अधिक सांगावे ते काही । शिवप्रसादासम नाही नाही । अन्य या त्रैलोक्यात पाही । श्रेष्ठ शिवप्रसादचि ।।१३२।।**

शिवप्रसादे सति योगभाजि सर्वं शिवैकात्मतया विभाति ।
स्वकर्ममुक्तः शिवभावितात्मा स प्राणलिंगीति निगद्यतेऽसौ ।।७७।।

**शिवप्रसाद होता प्राप्त । जो लीन शिवयोगसमाधीत । त्या शिवयोग्यासी दिसे सदोदित । त्रैलोक्य शिवासमान ।।१३३।। कर्मातूनि मुक्त होऊन । जो करी अभेदभावे शिवचिंतन । त्याच प्रसादी भक्तासी जाण । प्राणलिंगी नाव असे ।।१३४।। प्रसादिस्थल संपले येथ । प्रसादिस्थलीच जाई प्राणलिंगि-स्थलात । त्या स्थलाचे विवरण समस्त । होईल पुढील अध्यायी ।।१३५।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१३६।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । एकादशोऽध्याय पूर्ण हा ।।१३७।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतप्रसादिस्थले प्रसादिस्थलादिसप्तविधस्थलप्रसंगो नाम एकादशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय बारावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु रेणुकाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः सोमाय । पंचवक्त्राय नमः सदाशिवाय । विश्वेश्वराय नमः वीरभद्राय । गणनाथाय नमः प्रजापतये ।।१।। तुझ्यामुळे विश्व स्पंदते । तुझ्या तेजाने प्रकाशते । तुझ्या आनंदे तुष्टते । तू विश्वाशी एकरूप ।।२।। तुझ्या कृपेने ग्रंथलेखन । अर्धे-अधिक झाले पूर्ण । उर्वरित तेही करवून । घेई माझ्याहातूनी ।।३।। असो भक्तस्थलांतर्गत । भक्त-माहेश्वर-प्रसादी स्थले समस्त । विवरिली आतापर्यंत । कथितो प्राणलिंगि-स्थल ।।४।। क्रिया आणि ज्ञान । यांचा समन्वय साधून । घ्यावे लागते करून । प्राप्त शिव-सामरस्य ।।५।। जर पंख असतील दोन । तरीच शक्य आकाशगमन । अन्यथा भूमीवरी राहून । रांगावेचि लागेल ।।६।। म्हणूनि वीरशैवसिद्धान्त । असे ज्ञान-क्रियायुक्त । ज्ञान-क्रियासमन्वयाने भक्त । गाठे गंतव्य आपुले ।।७।। भक्त माहेश्वर प्रसादी जाण । ही तीन स्थले क्रियाप्रधान । प्राणलिंगी शरण ऐक्य ही तीन । देती प्राधान्य ज्ञानासी ।।८।। प्राणलिंगिस्थली स्थिर । असे अनुभवभक्ती साचार । अनुभवभक्तीने साक्षात्कार । होतो शिवजीवैक्याचा ।।९।। आपुल्या

**भाववृत्तीने। प्राणलिंगासी अनुभविणे। याच भक्तीच्या साहाय्याने। गाठे भक्त गंतव्य ।।१०।।**

## अंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

अगस्त्य उवाच–

भक्तो माहेश्वरश्चेति प्रसादीति निबोधितः। एक एव कथं चैषः प्राणलिंगीति कथ्यते ।।१।।

**जगद्गुरू रेणुकाचार्यांलागून। ऋषी अगस्त्य करिती प्रश्न। भक्त होतो माहेश्वर जाण। माहेश्वर होतो प्रसादी ।।११।। आपण हे जे सारे कथिले। ते मला पूर्णतः उमजले। आता आचार्या सांगा वहिले। तो प्राणलिंगी होतो कसा? ।।१२।।**

श्रीरेणुक उवाच–

भक्तो माहेश्वरश्चैष प्रसादीति च कीर्तितः। कर्मप्राधान्ययोगेन ज्ञानयोगोऽस्य कथ्यते ।।२।।

लिंगं चिदात्मकं ब्रह्म तच्छक्तिः प्राणरूपिणी। तद्रूपलिंगविज्ञानी प्राणलिंगीति कथ्यते ।।३।।

**रेणुक अगस्त्यासी सांगती। प्राधान्य देऊन कर्माप्रती। जो आचरे त्या भक्तासी म्हणती। माहेश्वर प्रसादी ।।१३।। त्या प्रसादी साधकाला। ज्ञानयोग प्राप्त झाला। की तोच जातो म्हणविला।**

**प्राणलिंगिस्थली भक्त ।।१४।। लिंग म्हणजे चिदात्मक । त्याची शक्ती प्राणस्वरूप देख । ज्यासी शक्तियुक्त लिंगाचे ज्ञान सम्यक् । तोचि प्राणलिंगिस्थली ।।१५।।**

प्राणलिंगिस्थलं चैतत् पंचस्थलसमन्वितम् । प्राणलिंगिस्थलं चादौ प्राणलिंगार्चनं ततः ।।४।।

शिवयोगसमाधिश्च ततो लिंगनिजस्थलम् । अंगलिंगिस्थलं चाथ क्रमादेषां भिदोच्यते ।।५।।

**प्राणलिंगिस्थलाचे सांगतो भेद । यातील स्थले असती पंचविध । त्यांची नावे करितो विशद । तुज कळावे यासाठी ।।१६।। प्राणलिंगी प्राणलिंगार्चनस्थल । शिवयोगसमाधी निजलिंगस्थल । आणि पाचवे अंगलिंगिस्थल । ऐसे याचे स्थलभेद ।।१७।। या स्थलांचे वेगळेपण । क्रमशः कथितो तुज-लागून । योगमार्गाने यथार्थ ज्ञान । होई प्राणलिंगाचे ।।१८।।**

**प्राणलिंगिस्थल** - (३२)

प्राणापानसमाघातात् कन्दमध्याद्यदुत्थितम् । प्राणलिंगं तदाख्यातं प्राणापाननिरोधिभिः ।।६।।

प्राणो यत्र लयं याति भास्करे तुहिनं यथा । तत्प्राणलिंगमुद्दिष्टं तद्धारी स्यात् तदाकृतिः ।।७।।

**मनुष्यशरीरात जाण । अवस्थित असती पंचप्राण । प्राण अपान उदान । व्यान समान हे पाच ।।१९।। एकचि वायू शरीरी आहे । परि तो भिन्न भिन्न स्थानी राहे । म्हणूनि त्यास भिन्न नावे ।**

दिली योगतज्ज्ञांनी ।।२०।। प्राणवायू हृदयात । अपानवायू मूलाधारात । समानवायू नाभिमंडळात । देही व्याप्त व्यानवायू ।।२१।। कंठस्थानी राहे उदान । अशी वायूंची स्थाने भिन्न । त्यांची कार्ये एकमेकांहून । असती वेगवेगळी ।।२२।। श्वासावाटे प्राण वाहे । म्हणूनि जीव जिवंत राहे । गुदस्थानी अपान आहे । करी मलमूत्रविसर्जन ।।२३।। नाभिस्थानी राहे समान । अन्न-रस-रक्ताचे करी नियंत्रण । नाडीद्वारे रक्ताभिसरण । करी वाहूनि व्यानवायू ।।२४।। कंठस्थानी राहे उदान । ढेकर-शिंकांचे करी नियमन । ऐसी एकाचि वायूसी भिन्न । कार्यांनी नावे मिळाली ।।२५।। गुदस्थान खेचता बळे । अपानवायू वरती वळे । तो प्राणवायूवरी आदळे । जो राहे हृदयात ।।२६।। दोहोंचे होता घर्षण । जणू पेटूनि नाभिस्थान । तेथे ज्योत होई उत्पन्न । तेचि जाण प्राणलिंग ।।२७।। प्राण-अपानाचा निरोध । करिती जे योगी सिद्ध । तेचि नाभिकंदमध्य-। स्थित ज्योत सांगती ।।२८।। ऊर्ध्वमुख होऊनि तीच । अखंड तेवे हृदयी साच । तिला प्राणही पुरवी तोच । हृदयातील प्राणवायू ।।२९।। फाकताचि सूर्यकिरण । धुके जाते वितळून । तैसा प्राणवायू लीन । होई पुढे ज्योतीत ।।३०।। प्राणवायुयुक्त ज्योत । तेचि प्राणलिंग हृदयात । त्याचे चिदहंभावयुक्त । चिंतन करी तो प्राणलिंगी ।।३१।।

ज्ञानिनां योगयुक्तानामन्तः स्फुरति दीपवत् । चिदाकारं परब्रह्मलिंगमज्ञैर्न भाव्यते ।।८।।

अन्तःस्थितं परं लिंगं ज्योतीरूपं शिवात्मकम् । विहाय बाह्यलिंगस्था विमूढा इति कीर्तिताः ।।९।।

**शिवयोग्याचे हृदयकमळ । प्राणलिंगाने उजळे सकळ । जैसी दीपकळी तेजाळ । उजळिते गृहाकाश ।।३२।। परि जे अज्ञ जन प्राकृत । त्यांना न जाणवेचि चिन्ह किंचित । की हृदयी चित्स्वरूप प्रकाशित । असे शिवरूप प्राणलिंग ।।३३।। अज्ञानाचे येता पडळ । वृत्ती बहिर्मुख होती सकळ । हृदयी स्थित प्रभामंडल । जाणवेना किंचित ।।३४।। परि जो वृत्तीस मुरडून । जाई अंतर्यामी घेऊन । त्याला प्राणलिंगाचे दर्शन । घडे सहज हृदयात ।।३५।। तळहातीच्या इष्टलिंगास । जो नेत्रे पाहे अनिमिष । इष्टलिंगाभोवती त्यास । दिसे प्रकाशवर्तुळ ।।३६।। याच दृढ अभ्यासे । इष्टलिंग ज्योतिस्वरूप भासे । तेचि अंतरंगी प्रकाशे । प्राणलिंग होऊनी ।।३७।। ज्योतिस्वरूप प्राणलिंग । त्यजूनि पूजिती स्थावरलिंग । ज्यांचे न रंगेचि अंतरंग । ते विमूढ सर्वस्वी ।।३८।।**

संविल्लिंगपरामर्शी बाह्यवस्तुपराङ्मुखः । यः सदा वर्तते योगी प्राणलिंगी स उच्यते ।।१०।।

मायाविकल्पजं विश्वं हेयं संचिन्त्य नित्यशः । चिदानंदमये लिंगे विलीनः प्राणलिंगवान् ।।११।।

सत्ता प्राणमयी शक्तिः सद्रूपं प्राणलिंगकम् । तत्सामरस्यविज्ञानात् प्राणलिंगीति कथ्यते ।।१२।।

**इष्टलिंग रुळे देहावर । परि ते बाह्यलिंग नोहे साचार । मठात वा मंदिरात जे स्थावर-। लिंग ते**

बाह्य जाणावे ।।३९।। स्थावरलिंगाच्या पूजेत । लिंग वेगळे वेगळा भक्त । भेदभावाने घडे तेथ । पूजन स्थावरलिंगाचे ।।४०।। करिता इष्टलिंगपूजन । लिंग परब्रह्मरूप मानून । 'ते लिंग मी' या भावाने जाण । होई पूजन जाणावे ।।४१।। स्थावरलिंगाची जी पूजा । ती असे उपचारपूजा । इष्टलिंगाची असे समरसपूजा । ऐसे पूजेत भिन्नत्व ।।४२।। बाह्यलिंगाचा पूजापाठ । जो त्याकडे फिरवूनि पाठ । चिद्रूप प्राणलिंगाचे एकनिष्ठ-। पणे करितो चिंतन ।।४३।। तोच असे प्राणलिंगी भक्त । अगस्त्या हे जाण सत्य । बाह्य पूजासामग्रीत । त्यास ममत्व उरेना ।।४४।। मायिक गुणाने उत्पन्न । विश्व हे जहाले जाणून । बाह्यलिंगही मायिक असून । ते त्यागणे उचितचि ।।४५।। हे ध्यानी घेऊनि सारे । बाह्यलिंगापासूनि दूर सरे । चिद्रूप प्राणलिंगासी अनुसरे । मनाचा लय साधूनी ।।४६।। 'मी आहे' ही अहंस्फूर्ती । जी स्पंदते अंतरी तीच प्राणशक्ती । 'मी चैतन्यरूप' हा बोध चित्ती । हेचि प्राणलिंग जाणावे ।।४७।। अहंरूपी शिव महान । सत्तारूपी शक्ती जाण । या दोहोंचे सामरस्यज्ञान । ज्यासी झाले तो प्राणलिंगी ।।४८।। प्राणशक्ती नांदते देहात । लिंग हृदयामाजी स्थित । या दोहोंसी एकरूप मानूनि पूजीत । तोचि जाण प्राणलिंगी ।।४९।। या प्राणलिंगाचे अर्चन । कैसे करावे ते करितो कथन । तेचि प्राणलिंगार्चन-। स्थल आता विवरितो ।।५०।।

**प्राणलिंगार्चनस्थल** - (३३)

अन्तर्गतं चिदाकारं लिंगं शिवमयं परम् । पूज्यते भावपुष्पैर्यत् प्राणलिंगार्चनं हि तत् ।।१३।।

**जल पुष्प बिल्वपत्र हरित् । अक्षता धूप दीप पंचामृत । या पूजोपचारांनी भक्त । पूजितो इष्ट-लिंगासी ।।५१।। परि जे अंतर्यामी स्थिर । त्या प्राणलिंगाची निरंतर । कोणत्या पूजासामग्रीने तत्पर । भक्ताने पूजा करावी ।।५२।। तेचि सांगतो तुजलागून । हे पूजोपचार नसती सामान्य । दृष्टीस न पडती अन्य । पूजासामग्रीप्रमाणे ।।५३।। हृदयी विविध भाववृत्ती । जाण पूजासामग्रीच ती । त्या भावफुलांनीच अर्चिती । चित्स्वरूप प्राणलिंग ।।५४।।**

अन्तः पवनसंस्पृष्टे सुसूक्ष्माम्बरशोभिते । मूर्धन्यचंद्रविगलत्सुधासेकातिशीतले ।।१४।।

बद्धेन्द्रियनवद्वारे बोधदीपे हृदालये ।

पद्मपीठे समासीनं चिल्लिंगं शिवविग्रहम् । भावयित्वा सदाकालं पूजयेद् भाववस्तुभिः ।।१५।।

**प्राणलिंगाचे कोठे स्थान । ते हृदयाकाशी विद्यमान । देहाची नऊ द्वारे बंद करून । ते लागे पाहावे ।।५५।। दोन नेत्र दोन कर्ण । आणि नासिकापुटे दोन । मुख, मल-मूत्र मार्ग दोन । ऐसी देही नवद्वारे ।।५६।। ती द्वारे रोधिता अंतरात । प्रकाशते प्राणलिंगज्योत । जी सूक्ष्माकाशे सुशोभित । असे**

**व्याप्त प्राणवायूने ।।५७।। ती सहस्रारचक्रातील । चंद्रामृताने झाली शीतल । द्वादशदल हृदयकमल-। कर्णिकेत विराजे ।।५८।। ते मंगल चिद्रूप प्राणलिंग । हृदयी स्थित अखंड अभंग । अशा भावनेने यथासांग । भावपुष्पांनी पूजावे ।।५९।। ती भावफुले कोमल । कोणती ती कथितो सकळ । प्राणलिंगी भक्ताची निर्मल । ही असे मानसपूजा ।।६०।।**

क्षमाऽभिषेकसलिलं विवेको वस्त्रमुच्यते । सत्यमाभरणं प्रोक्तं वैराग्यं पुष्पमालिका ।।१६।।

गन्धः समाधिसम्पत्तिरक्षता निरहंकृतिः । श्रद्धा धूपो महाज्ञानं जगद्भासि प्रदीपिका ।।१७।।

भ्रान्तिमूलप्रपंचस्य निवेद्यं तन्निवेदनम् । मौनं घण्टापरिस्पन्दस्ताम्बूलं विषयार्पणम् ।।१८।।

विषयभ्रान्तिराहित्यं तत्प्रदक्षिणकल्पना । बुद्धेस्तदात्मिका शक्तिर्नमस्कारक्रिया मता ।।१९।।

एवंविधैर्भावशुद्धैरुपचारैरदूषितैः । प्रत्युन्मुखमना भूत्वा पूजयेल्लिंगमान्तरम् ।।२०।।

**कराया प्राणलिंगासी अभिषेक । क्षमा हेचि शुद्ध उदक । नित्यानित्यवस्तुविवेक । हेचि वस्त्र जाणावे ।।६१।। सत्यवचन हे अलंकार । वैराग्य हाचि पुष्पहार । समाधिस्थिती हे मनोहर । गंध भस्म जाणावे ।।६२।। अक्षता निरहंकार-भावरूप । दृढ श्रद्धा हाचि धूप । आत्मज्ञान असे दीप । भ्रांतिनिवृत्ती नैवेद्य ।।६३।। धारण करणे मौन । हाच घंटानाद जाण । विषयांचे समर्पण । हाच जाणा**

तांबूल ।।६४।। विषयभ्रमाचा त्याग करणे । हीच प्रदक्षिणा घालणे । बुद्धी प्राणलिंगरूप होणे । हाच असे नमस्कार ।।६५।। अशा भावपुष्पेकरून । प्राणलिंगाचे करावे पूजन । बाह्यलिंगपूजेहून । हे श्रेष्ठ जाणावे ।।६६।। श्रोतेहो प्राणलिंगपूजन । कराया अंगी लागती सद्गुण । त्याविण प्राणलिंगार्चन । साध्य नाही कदापि ।।६७।। जैसे आपुले मन सांगते । तैसे तैसे शरीर वर्तते । शरीरयंत्राचे चालन पुरते । करिते मनचि सर्वदा ।।६८।। जरी मन असेल शुद्ध । तरी शरीरव्यापार राहती शुद्ध । ते जर असेल मळके अशुद्ध । शरीर तसेचि वागते ।।६९।। शरीर गंगेत न्हाणिले । तरी वरी वरी चर्म प्रक्षाळिले । मन असेल बरबटलेले । तरी तो जीव अशुद्ध ।।७०।। बाह्य पूजासामग्री मेळवून । भक्त करितो इष्टलिंगपूजन । तोचि अंगी बाणवूनि सद्गुण । पूजितो प्राणलिंगासी ।।७१।। जरी प्राणलिंगासी पूजावे । त्यासाठी नलगे कोठे जावे । नलगे मठमंदिरी राहावे । नाही कोणत्या तीर्थस्थळी ।।७२।। ते असे अंतरंग-उपासन । करिता येई प्रतिक्षण । आपुल्या जीवनात जाण । अनुभविता येईल ।।७३।। जो आपणाशी दुष्ट वागला । जेव्हा क्षमा केली त्याला । तेव्हा जाणा प्राणलिंगाला । आपण केला अभिषेक ।।७४।। विवेक उगवता मनात । समजावे अर्पिले वस्त्र लिंगाप्रत । मनी वैराग्य होता उदित । जाणा अर्पिला पुष्पहार ।।७५।। चित्त एकाग्र जहाले । समजावे लिंगासी गंध लाविले । निरहंकारे मन

व्यापिले । जणू वाहिली अक्षता ।।७६।। श्रद्धा दृढावता अमूप । जणू तो लिंगापुढे जाळला धूप । हृदयी उजळता ज्ञानदीप । जाणा दीप लाविला ।।७७।। भ्रांतिमूलक अज्ञान । केले परशिवासी अर्पण । तेव्हा प्राणलिंगासी जाण । दाखविला नैवेद्य ।।७८।। जेव्हा मौन होईल सिद्ध । समजा की केला घंटानाद । विषयार्पण करूनि व्हाल शुद्ध । लिंगास अर्पिला तांबूल ।।७९।। नष्ट होईल भेदभ्रांती । तीच प्रदक्षिणा लिंगाभोवती । तदाकार होता बुद्धिशक्ती । तोच जाणा नमस्कार ।।८०।। ऐसे अंतर्मुख होऊन । प्रत्यही करावे प्राणलिंगार्चन । तेणे अंतर्बाह्य उजळून । जाईल जीवन भक्ताचे ।।८१।। विषय कळावा सविस्तर । म्हणूनि केला इतुका विस्तार । याने तोषचि होईल चतुर । गुणग्राहक श्रोत्यांसी ।।८२।। आता शिवयोगसमाधिस्थल । रेणुकाचार्य निरूपतील । ते श्रवण करावे कोमल । हृदयांनी श्रोत्यांनी ।।८३।।

## शिवयोगसमाधिस्थल - (३४)

अन्तःक्रियारतस्यास्य प्राणलिंगार्चनक्रमैः । शिवात्मध्यानसम्पत्तिः समाधिरिति कथ्यते ।।२१।।

शिव-जीवसामरस्याचे अनुसंधान । हीच एक संपत्ती जाण । त्या संपत्तीसी असे अभिधान । शिव-योगसमाधी ।।८४।। भावफुले नित्य अर्पून । जो करितो प्राणलिंगार्चन । त्याच्याठायी विद्यमान । असे हीच संपत्ती ।।८५।। अभिषेकापासूनि ते नमस्कार । या आंतरक्रियांत जो तत्पर । त्याचे मन होई

**स्थिर । शिवयोगसमाधीत ।।८६।।**

सर्वतत्त्वोपरि गतं सच्चिदानन्दभासुरम् । स्वप्रकाशमनिर्देश्यमवाङ्मानसगोचरम् ।।२२।।

उमाख्यया महाशक्त्या दीपितं चित्स्वरूपया ।

हंसरूपं परात्मानं सोऽहंभावेन भावयेत् । तदेकतानतासिद्धिः समाधिः परमो मतः ।।२३।।

परब्रह्म महालिंगं प्राणो जीवः प्रकीर्तितः । तदेकभावमननात् समाधिस्थः प्रकीर्तितः ।।२४।।

**विश्व छत्तीस तत्त्वयुक्त । ऐसी मान्यता सिद्धान्तात । शिवापासूनि पृथ्वीपर्यंत । तत्त्वे कोणती ती ऐक ।।८७।। शिवतत्त्व शक्तितत्त्व । सदाशिवतत्त्व ईश्वरतत्त्व । शुद्धविद्यातत्त्व ही पाच तत्त्वे । शुद्ध तत्त्वे जाणावी ।।८८।। मायातत्त्व कलातत्त्व । विद्यातत्त्व रागतत्त्व कालतत्त्व । नियतितत्त्व पुरुषतत्त्व । ही सप्त शुद्धाशुद्ध तत्त्वे ।।८९।। प्रकृतितत्त्व महत्तत्त्व । अहंकारतत्त्व मनस्तत्त्व । श्रोत्र-त्वक्-चक्षु-जिव्हातत्त्व । घ्राणतत्त्व ही ज्ञानेंद्रिये ।।९०।। वाक्तत्त्व पाणितत्त्व । पादतत्त्व पायुतत्त्व । आणि पाचवे उपस्थतत्त्व । ही पंच कर्मेन्द्रिये ।।९१।। शब्दतत्त्व स्पर्शतत्त्व । रूपतत्त्व रसतत्त्व । आणिक एक गंधतत्त्व । या पंचतन्मात्रा ।।९२।। आकाशतत्त्व वायुतत्त्व । अग्नितत्त्व जलतत्त्व । आणि पाचवे पृथ्वितत्त्व । ही पंच महाभूते ।।९३।। प्रकृती महत् अहंकार मन । पंच ज्ञानेंद्रिये पंच कर्मेंद्रिये जाण ।**

पंच महाभूते पंच तन्मात्रा मिळून । चोवीस तत्त्वे ही अशुद्ध ।।९४।। पाच तत्त्वे शुद्ध । सात तत्त्वे शुद्धाशुद्ध । चोवीस तत्त्वे अशुद्ध । ऐसी तत्त्वे छत्तीस ।।९५।। छत्तीस तत्त्वांचा समूह । हेचि जाणा ब्रह्मांडकटाह । या विश्वरूपातूनि शुद्धविग्रह । शिव दृष्टीपुढे उभा ।।९६।। परशिवब्रह्माची रूपे दोन । एक विश्वात्मा दुसरे विश्वोत्तीर्ण । सकल विश्वात व्याप्त म्हणून । त्यास म्हणती विश्वात्मा ।।९७।। शाखा फुले पर्णसंभार । घेऊनि उभा वृक्ष समोर । तैसा छत्तीस तत्त्वांतूनि ईश्वर । दृष्टीपुढे प्रकाशे ।।९८।। तो जैसा विश्वरूपात दिसे । तैसाचि विश्वातीतही असे । सत्-चित्-आनंदस्वरूपे विलसे । त्यास म्हणती विश्वोत्तीर्ण ।।९९।। जो भावपुष्पांनी सदोदित । प्राणलिंगार्चन करी निष्णात । शिव विश्वरूप परि विश्वातीत । आहे ऐसे जाणतो ।।१००।। या ज्ञानाने तो करीत ध्यान । साधे शिवयोगसमाधी जाण । त्याचे कैसे तादात्म्यचिंतन । तेच येथे सांगतो ।।१०१।। पृथ्वीपासूनि शिवापर्यंत । छत्तीस तत्त्वांच्या अतीत । सत्-चित्-आनंदरूपे प्रकाशित । जे शिव परब्रह्म ।।१०२।। ते प्रकाशे स्वतेजाने । वर्णिता नये वाचेने । सायास करिताही मने । जे आतुडेना कदापि ।।१०३।। जे असे शक्तियुक्त । चित्स्वरूपी उमाशक्तीने प्रकाशित । ते हंसस्वरूप परमात्मतत्त्व । ते मीच ऐसे मानितो ।।१०४।। सोऽहं ही दृढ भावना धरून । शिवाचे करी तादात्म्यचिंतन । ती परम समाधी

**जाण । तीच शिवयोगसमाधी ।।१०५।। महालिंग म्हणजे शिवब्रह्म पूर्ण । प्राण म्हणजे जीव जाण । यांच्या सामरस्याचे करी चिंतन । तो समाधिस्थ शिवयोगी ।।१०६।।**

अन्तः षट्चक्ररूढानि पंकजानि विभावयेत् । ब्रह्मादिस्थानभूतानि भ्रूमध्यान्तानि मूलतः ।।२५।।

भ्रूमध्यादूर्ध्वभागे तु सहस्रदलमम्बुजम् । भावयेत्तत्र विमलं चन्द्रबिम्बं तदन्तरे ।।२६।।

सूक्ष्मरंध्रं विजानीयात् तत्कैलासपदं विदुः । तत्रस्थं भावयेच्छम्भुं सर्वकारणकारणम् ।।२७।।

**जो नेत्रांसी दिसे देह । तो असे केवळ बाह्य । त्याच्या आतही असे एक देह । 'सूक्ष्मदेह' नाव त्यासी ।।१०७।। जीवाच्या सूक्ष्मशरीरात । षट्चक्रे असती अवस्थित । त्यावरी शिवयोग्याने चित्त । स्थिर करावे ध्यानाने ।।१०८।। षट्चक्रे कमलाकृती । त्यांना दले-पाकळ्या असती । त्या दलांची संख्यानिश्चिती । केली योगिजनांनी ।।१०९।। समाधिनिष्ठ शिवयोग्याने । आपुल्या दृढ ध्यानाने । षट्स्थानी षट्चक्रांची मनाने । दृढ भावना करावी ।।११०।। गुदस्थानी आधारचक्र । तेथे कमल-पाकळ्या चार । लिंगस्थानी स्वाधिष्ठानचक्र । तेथे सहा पाकळ्या ।।१११।। नाभिस्थानी मणिपूर-चक्रात । दहा दलांचे कमल विराजित । हृदयस्थानी अनाहतचक्रात । कमल बारा दलांचे ।।११२।। कंठस्थानी विशुद्धिचक्र । तेथे सोळा दले साचार । भ्रूमध्यात आज्ञाचक्र स्थिर । तेथे दोन**

**पाकळ्या ।।११३।। मस्तकी चक्र सहस्रार । तेथे सहस्रदले मनोहर । रंध्र त्याच्या मध्यावर । असे केशाग्रप्रमाण ।।११४।। त्या रंध्रासी योगिजन । स्वानुभवे म्हणती कैलासस्थान । तेथे परब्रह्म शिव विराजमान । असे जाणा निश्चित ।।११५।। ऐसी षट्चक्रे दलांसहित । जाणूनि तेथे मानावी समस्त । सहस्रारचक्री शिवचिंतन सतत । अभेदभावे करावे ।।११६।। शिवयोग्याचे ऐसे चिंतन । हीच सकलसमाधी जाण । तेथे लाभे आनंद पूर्ण । जो इतरत्र दुर्लभ ।।११७।।**

बहिर्वासनया विश्वं विकल्पार्थं प्रकाशते । अन्तर्वासितचित्तानामात्मानन्दः प्रकाशते ।।२८।।

आत्मारणिसमुत्थेन प्रमोदमथनात्सुधीः । ज्ञानाग्निना दहेत्सर्वं पाशजालं जगन्मयम् ।।२९।।

**बाह्य प्रवृत्तीस कारण । शुभाशुभ वासनाच जाण । एकदा घेतल्यावरी अनुभव पूर्ण । पुन्हा वाटे घ्यावासा ।।११८।। हाच वासनासंस्कार । त्या संस्कारे हा विश्वसंसार । संकल्प-विकल्पाने भरपूर । भरला ऐसे भासते ।।११९।। ज्यांना लाभली अंतर्दृष्टी । त्यांना शिवरूप दिसे सृष्टी । आत्मानंदाची होई वृष्टी । त्यांच्या अंतर्विश्वात ।।१२०।। आत्मारूपी अरणीवर । घासता शिवानंदविचार । शिवाद्वैतज्ञान-वैश्वानर । तेथे होई प्रदीप्त ।।१२१।। त्या ज्ञानरूपी अग्नीत । प्रपंचरूप पाश समस्त । जाळूनि आत्मस्वरूप यथार्थ । जाणावे शिवयोग्याने ।।१२२।।**

संसारविषवृक्षस्य पंचक्लेशपलाशिनः । छेदने कर्ममूलस्य परशुः शिवभावना ॥३०॥
अज्ञानराक्षसोन्मेषकारिणः संहृतात्मनः । शिवध्यानं तु संसारतमसश्चण्डभास्करः ॥३१॥

**कर्म हेचि ज्याचे मूळ । तो संसारविषवृक्ष विशाल । पंचक्लेश-पर्णांनी बहुल । गेला असे लहडूनी ॥१२३॥ त्यासी छेदावे मुळापासून । तरी कुठार असे शिवध्यान । तेणे संसारविषतरू दारुण । नष्ट होई क्षणात ॥१२४॥ कोणकोणते पंचक्लेश । तेही अवधारा सावकाश । अविद्या अस्मिता राग द्वेष । अभिनिवेश पाचवा ॥१२५॥ ज्यापासूनि सदोदित । जीवासी दुःख होई प्राप्त । त्यास दिले योग-शास्त्रात । 'क्लेश' नाम पतंजलींनी ॥१२६॥ 'अविद्या' म्हणजे अज्ञान । तिचे चार भेद जाण । त्यांनीच ग्रासिले पूर्ण । जीवास जन्मजन्मांतरी ॥१२७॥ अनित्य वस्तूंत नित्यबुद्धी । अशुची वस्तूंत शुचिबुद्धी । दुःखामध्ये सुखबुद्धी । आत्मबुद्धी अनात्मी ॥१२८॥ प्रपंच असे अनित्य । त्यात परिवर्तन सदोदित । तरी जीव तो मानितो नित्य । ही पहिली अविद्या ॥१२९॥ शरीर स्वभावतः अपवित्र । स्रविती मल-मूत्र-घर्म सर्वत्र । अशुची देहास मानणे पवित्र । ही दुसरी अविद्या ॥१३०॥ शब्दस्पर्शादी विषयसुख । ते मूलतः असे दुःख । त्यांना मानणे सुखरूप । ही तिसरी अविद्या ॥१३१॥ शरीरापासून बुद्धीपर्यंत । सर्व असती अनात्म पदार्थ । त्यांना मानणे आत्मवत् । ही चौथी अविद्या ॥१३२॥**

संसारविषवृक्षाचे दुसरे पर्ण । त्यास 'अस्मिता' असे नाम । सतत करणे अहम् अहम् । हा अहंकार अस्मिता ।।१३३।। स्तुती करिता सुखावतो । निंदा होता दुखावतो । दुखावताचि धावतो । भांडण कराया माणूस ।।१३४।। कलह-दु:खाचे मूळ । हा अहंकारचि केवळ । पंचक्लेशांत तोही सबळ । एक क्लेश मानिला ।।१३५।। 'राग' म्हणजे प्रीत । ती जन्माचे मूळबीज सत्य । प्रपंचाविषयी अनुराग मनात । म्हणूनि जन्मणे पुन:पुन्हा ।।१३६।। देई जन्मदु:ख वारंवार । हा 'राग' क्लेश साचार । त्याची दुसरी बाजू भयंकर । तोचि 'द्वेष' जाणावा ।।१३७।। द्वेष पेटता मनातून । तो गुणांचेही करी अवगुण । द्वेषभरल्या नेत्रांसी सद्‌गुण । दिसतीच न कदापि ।।१३८।। युद्धे महायुद्धे सगळी । द्वेषबुद्धीने भारलेली । होई गुणांची राखरांगोळी । द्वेष भरता मनात ।।१३९।। मरणभय वाटे जीवास । तोचि जाणावा 'अभिनिवेश' । पंडित मूढ स्त्री पुरुष । सर्वांनाच भिववितो ।।१४०।। असंख्य जन्मजन्मांतून । जीवाने अनुभविले मरण । त्याचे नाव घेताचि सकल जन । चळचळा कापती ।।१४१।। अविद्या अस्मिता राग द्वेष । अभिनिवेश हे पंचक्लेश । या पर्णांनी संसारविष-। वृक्ष असे बहरला ।।१४२।। हा विषवृक्ष छेदण्यासाठी । शिवज्ञान-कुऱ्हाड घ्यावी हाती । तेणे नाशूनि वृक्ष, शांती । भक्ताहृदयी नांदेल ।।१४३।। संसार-अंधाररात्री सगळे । अज्ञानराक्षस उतले माजले । त्यांना निवटायासी बळे ।

**समर्थ शिवध्यानभास्कर ।।१४४।। जरी शिवध्यान दृढावले । तरी अज्ञानावरण गळाले । ज्याचे पंचक्लेश निमाले । तो समाधिस्थ शिवयोगी ।।१४५।।**

**लिंगनिजस्थल** - (३५)

स्वान्तस्थशिवलिंगस्य प्रत्यक्षानुभवस्थितिः । यस्यैव परलिंगस्य निजमित्युच्यते बुधैः ।।३२।।

ब्रह्मविष्ण्वादयो देवाः सर्वे वेदादयस्तथा । लीयन्ते यत्र गम्यन्ते तल्लिंगं ब्रह्म केवलम् ।।३३।।

**अंतरंगात जे स्थित । देश-काल-आकाररहित । त्या महालिंगासी जो मानीत । निजस्वरूप आपुले ।।१४६।। ऐसा साधक जो प्राणलिंगिस्थली । तोचि असे निजलिंगस्थली । ऐसी या स्थलाची केली । व्याख्या शास्त्रवेत्त्यांनी ।।१४७।। ते महालिंग केवल ब्रह्म पूर्ण । त्यातूनि विश्व होय उत्पन्न । आणि कल्पांती सामावून । त्यातचि पूर्ण जातसे ।।१४८।।**

चिदानन्दमयः साक्षाच्छिव एव निरंजनः । लिंगमित्युच्यते नान्यद् यतः स्याद्विश्वसंभवः ।।३४।।

बहुनात्र किमुक्तेन लिंगमित्युच्यते बुधैः । शिवाभिधं परं ब्रह्म चिद्रूपं जगदास्पदम् ।।३५।।

**विश्वोत्पत्ती होई ज्यापासून । ते लिंग सच्चिदानंदरूप निरंजन । ते साक्षात् शिवब्रह्म जाण ।**

त्यावाचूनि अन्य काही नसे ।।१४९।। अधिक सांगावे ते काय । जो विश्वाधार चिद्रूप शिव । त्यालाच 'निजलिंग' हे नाव । दिले ज्ञानी लोकांनी ।।१५०।।

वेदान्तवाक्यजां विद्यां लिंगमाहुस्तथापरे । तदसज्ज्ञेयरूपत्वाल्लिंगस्य ब्रह्मरूपिणः ।।३६।।
अव्यक्तं लिंगमित्याहुर्जगतां मूलकारणम् । लिंगी महेश्वरश्चेति मतमेतदसंगतम् ।।३७।।

अहं ब्रह्मास्मि अयमात्मा ब्रह्म । आदी वेदान्तवाक्यांतून । जी विद्या जहाली उत्पन्न । तिला 'लिंग' संबोधिती ।।१५१।। परंतु ते नोहे प्रमाण । विद्या हे शिवज्ञानाचे साधन । त्या विद्येला 'लिंग' अभिधान । देणे असे अयोग्य ।।१५२।। ज्ञान म्हणजे शिव नव्हे । शिव हा ज्ञानविशिष्ट आहे । प्रभा म्हणजे चंद्र नोहे । चंद्राठायी प्रभा असे ।।१५३।। तैसा शिव आणि ज्ञान । यांच्यात तादात्म्यसंबंध पूर्ण । ज्ञानास मानणे शिव जाण । हे अमान्य वीरशैवांसी ।।१५४।। जगताचे मूलकारण । अव्यक्त प्रकृतीसी मानून । तिला 'लिंग' नाम देऊन । शिवास 'लिंगी' मानिती ।।१५५।। परि वीरशैव-सिद्धान्तात । शक्तिविशिष्ट शिव अव्यक्त । त्याच्यातूनि विश्व समस्त । उत्पन्न होते कथिले हे ।।१५६।। शक्त्यंश हे उपादानकारण । शिवांश हे निमित्तकारण । ऐसे अभिन्ननिमित्तोपादानकारण । शिवचि

**समस्त विश्वाचा ।।१५७।। द्रव्य आपुल्या देहातले । काढूनि कोळी विणतो जाळे । तैसे शक्तियुक्त शिवाने निर्मिले । स्वत:तूनि विश्व हे ।।१५८।। सामान्य दृष्टीने पाहता । सृष्टी जड दिसे तत्त्वता । तिला निजलिंग मानणे सर्वथा । अनुचित असे हे ।।१५९।।**

न सूर्यो भाति तत्रेन्दुर्न विद्युन्न च पावकः । न तारका महालिंगे द्योतमाने परात्मनि ।।३८।।
ज्योतिर्मयं परं लिंगं श्रुतिराह शिवात्मकम् । तस्य भासा सर्वमिदं प्रतिभाति न संशयः ।।३९।।

**परब्रह्मस्वरूप साक्षात् । महालिंग स्वयंप्रकाशित । त्याच्या प्रकाशापुढे खद्योत । जाण नक्षत्रे तारका ।।१६०।। सूर्य चंद्र हुताशन । विद्युल्लता नक्षत्रे तारका जाण । ही सर्वही होती प्रभाहीन । प्रकाशमय लिंगापुढे ।।१६१।। महालिंगाच्या प्रकाशाने । नभी प्रकाशती तारांगणे । मग जगासी देती देणे । प्रकाशाचे अपार ।।१६२।। शिवस्वरूप लिंग श्रेष्ठ । ज्योतिर्मय स्वयंप्रकाशित । तत्तेजाने प्रकाशे विश्व समस्त । ऐसे श्रुती सांगती ।।१६३।।**

लिंगान्नास्ति परं तत्त्वं यदस्माज्जायते जगत् । यदेतद्रूपतां धत्ते यदत्र लयमश्नुते ।।४०।।
तस्माल्लिंगं परं ब्रह्म सच्चिदानन्दलक्षणम् । निजरूपमिति ध्यानात् तदवस्था प्रजायते ।।४१।।

**लिंगातूनि जग झाले उत्पन्न । त्याच्यानेच जगद्रक्षण । त्याच्यातचि ते अंती होई विलीन । त्याहूनि श्रेष्ठ अन्य नसे ।।१६४।। लिंग परब्रह्म सच्चिदानंदरूप । ते असे माझे निजरूप । ऐसे ध्यान करिता तद्रूप । होतो निजलिंगस्थली ।।१६५।।**

**अंगलिंगस्थल** - (३६)

ज्ञानमंगमिति प्राहुर्ज्ञेयं लिंगं सनातनम् । विद्यते तद्द्वयं यस्य सोऽगलिंगीति कीर्तितः ।।४२।।

अंगे लिंगं समारूढं लिंगे चांगमुपस्थितम् । एतदस्ति द्वयं यस्य स भवेदंगलिंगवान् ।।४३।।

ज्ञात्वा यः सततं लिंगं स्वान्तस्थं ज्योतिरात्मकम् । पूजयेद्भावयन्नित्यं तं विद्यादंगलिंगिनम् ।।४४।।

**शिवज्ञानसंपन्न जीव । त्यासी 'अंग' असे नाव । जे जाणावयाचे ज्ञेय । त्यास म्हणति 'लिंग' असे ।।१६६।। अंग-लिंगाचे ज्ञान । असे ज्या प्राणलिंगीलागून । त्यासी 'अंगलिंगी' हे जाण । संबोधिती अगस्त्या ।।१६७।। बीजात असे अंकुर सुप्त । आणि बीज सुप्त अंकुरात । तैसे अंगात लिंग व्याप्त । लिंगात असे अंगही ।।१६८।। या दोहोंचे सामरस्यज्ञान । झाले ज्या प्राणलिंगीस जाण । त्याला अंगलिंगी हे शोभून । नाम सत्य दिसे हे ।।१६९।। जे प्राणलिंग हृदयस्थ । त्या जाणूनि**

**ज्योतिर्मय लिंगाप्रत । जो करी पूजाध्यान सतत । त्यास म्हणावे अंगलिंगी ।।१७०।।**

ज्ञायते लिंगमेवैकं सर्वैः शास्त्रैः सनातनैः । ब्रह्मेति विश्वधामेति विमुक्तेः पदमित्यपि ।।४५।।

मुक्तिरूपमिदं लिंगमिति यस्य मनःस्थितिः । स मुक्तो देहयोगेऽपि स ज्ञानी स महागुरुः ।।४६।।

अनादिनिधनं लिंगं कारणं जगतामिति । ये न जानन्ति ते मूढा मोक्षमार्गबहिष्कृताः ।।४७।।

**लिंग हेचि परब्रह्म । त्रैलोक्याधार मोक्षधाम । ते असे मोक्षकारण परम । असे प्रत्यक्ष मोक्षचि ।।१७१।। ऐसी निगमागमादिंकरून । सर्व शास्त्रे जी सनातन । ती ग्वाही देती गर्जून । घंटाघोषपूर्वक ।।१७२।। हे दृढ जो धरी मनात । तो जिवंत असे तरी जीवन्मुक्त । तो महाज्ञानी निश्चित । श्रेष्ठ गुरू जाणावा ।।१७३।। लिंगासी नाही जन्ममरण । लिंग विश्वोत्पत्तीचे कारण । अशा लिंगास न जाणती जे अज्ञ जन । त्यांना मोक्ष दुर्लभ ।।१७४।।**

यः प्राणलिंगार्चनभावपूर्वैर्धर्मैरुपेतः शिवभावितात्मा ।

स एव तुर्यः परिकीर्तितोऽसौ संविद्विपाकाच्छरणाभिधानः ।।४८।।

**भक्तिरूपी पुष्पेकरून । करी प्राणलिंगार्चन । शिवाचारयुक्त शिवस्मरण । सदैव करी जो प्राणलिंगी ।।१७५।। परिपक्व झाले त्याचे ज्ञान । तोचि शरणस्थलात जाऊन । करी पुढील**

**मार्गक्रमण । जाण अगस्त्य मुनिवरा ।।१७६।। आता पुढील अध्यायात । शरणस्थलाची महिमा समस्त । अवधारूनि अनुभवावी चित्तात । परम भाविक श्रोत्यांनी ।।१७७।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१७८।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । द्वादशोऽध्याय पूर्ण हा ।।१७९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतप्राणलिंगिस्थले प्राणलिंगिस्थलादिपंचविधस्थलप्रसंगो नाम द्वादशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय तेरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु दारुक शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः दुर्धर्षाय । अनघाय नमः गिरीशाय । गिरिशाय नमः भुजंगभूषणाय । भर्गाय नमः हिरण्यरेतसे ।।१।। उत्पत्ती स्थिती आणि लय । यांचा साक्षी तू स्वयमेव । अवघे ब्रह्मांड शिवमय । तू निमित्तोपादान जगताचे ।।२।। शक्तीचे करूनि निमित्त । तूचि धरिशी रूपे अनंत । सकल चराचरा चाळवीत । परि सर्वांवेगळा तू ।।३।। जळ भरलेले सागरी । त्यावरी नाचती लहरी । लहरी भिन्न भासती परी । त्या अभिन्न सागरासी ।।४।। सिंधू आणि बिंदू । यांचा जैसा संबंधू । तैसा तुझा दीनबंधू । साच संबंधू जीवांसी ।।५।। असो मी प्रवर्तलो येथ । विवराया वीरशैवसिद्धान्त । देई सामर्थ्य मजप्रत । ग्रंथसिद्धीपुरते गा ।।६।। आता श्रोत्यांनी व्हावे सावध । करितो शरणस्थल विशद । त्याचा हळुवारपणे आस्वाद । घ्यावा मधुमक्षिकेसम ।।७।। शरणस्थलात जी राहे । तिला आनंदभक्ती नाव आहे । शिवरूपासमीप जाता पाहे । वाढे आनंद अपार ।।८।। प्राणलिंगिस्थलात चिद्रूप ज्योती । तिची घेतली अनुभूती । त्या अनुभवाचा आनंद चित्ती । या स्थली ये दाटूनी ।।९।। रेणुकाचार्य जगद्गुरुवर । अगस्तीसी कथिती सविस्तर । तो

**शरणस्थलाचा विचार । घ्यावा समजून सकलांनी ।।१०।।**

## अंगस्थलांतर्गत शरणस्थल

अगस्त्य उवाच-

माहेश्वरः प्रसादीति प्राणलिंगीति बोधितः । कथमेष समादिष्टः पुनः शरणसंज्ञकः ।।१।।

श्रीरेणुक उवाच-

अंगलिंगी ज्ञानरूपः सती ज्ञेयः शिवः पतिः । यत्सौख्यं तत्समावेशे तद्वान् शरणनामवान् ।।२।।

**अगस्त्य पुसती रेणुकांलागून । भक्त-माहेश्वर-प्रसादि-प्राणलिंगी जाण । आपण बोधिली ही स्थले पूर्ण । आता निवेदावे शरणस्थल ।।११।। जो साधक प्राणलिंगार्चनरत । तो कैसा जातो शरण-स्थलात । त्याचे आचरण लक्षणे समस्त । विवरूनिया सांगावी ।।१२।। रेणुक म्हणती अगस्त्या ऐक । शिवज्ञानयुक्त प्राणलिंगी साधक । तो अनुभवितो लिंगांग-ऐक्यसुख । पति-पत्नीभावाने ।।१३।। शिव पती साधक सती । हा दृढभाव धरूनि चित्ती । लिंग-अंग-सामरस्य स्थिती । शरणस्थली भोगतो ।।१४।। जो ऐसे भोगितो सुख । तोचि जाण शरणस्थली साधक । या शरणस्थलाचे चार भेद**

**देख । तेही तुजसी सांगतो ।।१५।।**

स्थलमेतत्समाख्यातं चतुर्धा धर्मभेदतः । आदौ शरणमाख्यातं ततस्तामसवर्जनम् ।।३।।

ततो निर्देशमुद्दिष्टं शीलसम्पादनं ततः । क्रमाल्लक्षणमेतेषां कथयामि निशाम्यताम् ।।४।।

**पहिले जाण शरणस्थल । दुसरे तामसवर्जनस्थल । तिसरे स्थल निर्देशस्थल । शीलसंपादनस्थल चतुर्थ ।।१६।। त्यांचे क्रमशः विवरण । करीन ऐक लक्ष देऊन । ऐक्यस्थलाआधीचा सोपान । शरणस्थल हा असे ।।१७।।**

**शरणस्थल** – (३७)

सतीव रमणे यस्तु शिवे शक्तिं विभावयन् । तदन्यविमुखः सोऽयं ज्ञातः शरणनामवान् ।।५।।

**प्राणप्रिय पतीप्रती । एकनिष्ठ असे स्त्रीसती । पतीविण न चिंती कल्पांती । चित्ती परपुरुष ।।१८।। तैसा आपुला पती शिव । मी त्याची सती हा दृढभाव । शिवासी मानितो सर्वस्व । तोचि शरण-साधक ।।१९।। पती पत्नीस प्रेमभरे । सुख देतो सर्वप्रकारे । तीही एकनिष्ठ अनुसरे । जन्मवरी त्यालाच ।।२०।। तैसा भक्तपत्नीस देख । शिवपती देई परमानंदसुख । जे अवीट आणि अलौकिक । किती भोगिता न सरे ।।२१।। म्हणूनि या शरणस्थलात । आनंदभक्ती असे स्थित । अनुपमेय**

**परमानंदस्रोत । शिव साक्षात जाणावा ।।२२।। पती पत्नी लौकिकातील । त्यांच्यात वियोग घडवी काळ । परि भक्तसतीवर ही वेळ । येत नाही कधीही ।।२३।। शिवास पती मानील कोणी । तरी त्याची सौभाग्यलेणी । घेऊ शकेल हिरावूनी । ऐसा कोण ब्रह्मांडी? ।।२४।। 'लिंग' पती 'अंग' सती । ऐसी ज्याची स्थिर मती । तोचि जाणावा निश्चिती । शरणस्थली साधक ।।२५।।**

परिज्ञाते शिवे साक्षात् को वाऽन्यमभिकांक्षति । निधाने महति प्राप्ते कः काचं याचतेऽन्यतः ।।६।।

शिवानन्दं समासाद्य को वाऽन्यमुपतिष्ठते । गंगामृतं परित्यज्य कः कांक्षेन्मृगतृष्णिकाम् ।।७।।

**विश्व सुखी ज्याच्यामुळे । ज्याच्या तेजाने ब्रह्मांड उजळे । तो परशिव ज्यासी मिळे । त्याने काय अपेक्षावे? ।।२६।। धनाच्या हंड्यावरी बैसून । भीक मागेल शहाणा कोण? । द्रव्यनिधी लाभता जाण । कोण मागेल काचमणी? ।।२७।। तैसे श्रुतिप्रमाणांनी । शिव श्रेष्ठ ब्रह्मादिकांहूनी । हे जाणले तो ज्ञानी । अन्य देवा का इच्छील? ।।२८।। जो शरणस्थली साधक । तो न मानी ब्रह्मादिक । त्याची अविचल निष्ठा देख । एका शिवाठायी असे ।।२९।। ज्यासी शिवानंद लाभला । तो अन्य देव वंदील कशाला? । त्यागूनि अमृतासम गंगाजला । मृगजळापाठी कोण धावे? ।।३०।।**

संसारतिमिरच्छेदे विना शंकरभास्करम् । प्रभवन्ति कथं देवाः खद्योता इव देहिनाम् ।।८।।
संसारार्तः शिवं यायाद् ब्रह्माद्यैः किं फलं सुरैः । चकोरस्तृषितः पश्येच्चन्द्रं किं तारका अपि ।।९।।

**अंधाराचा कराया नाश । समर्थ नसे खद्योतप्रकाश । उजळता सूर्याचा प्रकाश । अंधार जाई पळूनी ।।३१।। तैसा संसाररूप अंधार । नष्ट करी शिवभास्कर । शिवापुढे काजवे साचार । असती अन्य देवता ।।३२।। जो चंद्रामृताचे करितो पान । तो चकोर पक्षी लागता तहान । चंद्राकडे पाहे होऊनि दीन । नच अन्य ताऱ्यांकडे ।।३३।। तैसा संसारदुःखाने पीडला । त्याने शरण जावे शंकराला । ब्रह्मादी देवांसी शरण गेला । तरी लाभे न काहीच ।।३४।। म्हणूनि एका शिवासी शरण । जाई शरणस्थली जाण । अन्य देवतांचे प्रयोजन । त्यास काही नसेचि ।।३५।।**

शिव एव समस्तानां शरण्यः शरणार्थिनाम् । संसाररोगदष्टानां सर्वज्ञः सर्वदोषहा ।।१०।।
शिवज्ञाने समुत्पन्ने परानन्दः प्रकाशते । तदासक्तमना योगी नान्यत्र रमते सुधीः ।।११।।
तस्मात्सर्वप्रयत्नेन शंकरं शरणं गतः । तदनन्तसुखं प्राप्य मोदते नान्यचिन्तया ।।१२।।

**संसाररूपी सर्पविष । जो तत्काळ उतरितो अशेष । शरणार्थींचे हरूनि दोष । रक्षितो शिव तो एकचि ।।३६।। झाले शिवमाहात्म्यज्ञान । त्या आनंदात जो निमग्न । तो शिवयोगी न रमे आन ।**

**कोणत्याही सुखानंदी ।।३७।। मन-वाचा-कायेकरून । जो शिवासी अनन्यशरण । तो त्यागितो अन्य देवताध्यान । आनंदमग्न शरण तो ।।३८।। आता तामसनिरसन-। स्थलाचे करितो वर्णन । अवधारी सादर होऊन । मुनिवर्या अगस्त्या ।।३९।।**

### तामसनिरसनस्थल - (३८)

शिवासक्तपरानन्दमोदिना गुरुणा यतः । निरस्यन्ते तमोभावाः स तामसनिरासकः ।।१३।।

यस्य ज्ञानं तमोमिश्रं न तस्य गतिरिष्यते । सत्त्वं हि ज्ञानयोगस्य नैर्मल्यं विदुरुत्तमाः ।।१४।।

**शिवावरी निष्ठा ठेवून । जो नित्य परमानंदात मग्न । तमोविकारांचे करी निवारण । तामसनिरासक शरण तो ।।४०।। सत्त्व रज तम जाण । हे प्रकृतीचे तीन गुण । ते जीवाठायी विषम होऊन । सदोदित राहती ।।४१।। त्यांचे प्रमाण न्यूनाधिक । तेणे राजस तामस सात्त्विक । असे संबोधिती लोक । त्यानुसार जीवासी ।।४२।। ज्याच्याठायी सत्त्व अधिक । तो माणूस असे 'सात्त्विक' । रजोगुण अधिक होता देख । त्यास म्हणती 'राजस' ।।४३।। ज्याच्याठायी अधिक तमोगुण । तो 'तामस' मनुष्य जाण । जैसे त्रिगुणांचे भिन्न प्रमाण । तैसा माणूस वागतो ।।४४।। शरणस्थलीचा साधक । पूर्णतः असे सात्त्विक । तरीही उरला असे देख । तमोगुण किंचित् ।।४५।। शुभ्र वस्त्रावरी लहान । डागही दिसे**

**अधिक उठून । तैसा शरणाठायी तमोगुण । उरला दिसे किंचित् ।।४६।। प्रमाद आलस्य निद्रा जाण । हे तमोगुणाचे लक्षण । ते टाकितो जो पूर्ण निवटून । तो तामसनिरासक ।।४७।। ज्ञानी परि तमोगुण-युक्त । त्यासी सद्‌गती नाही प्राप्त । ज्ञानयोग्यासी उपयुक्त । असे केवळ सत्त्वगुण ।।४८।।**

शमो दमो विवेकश्च वैराग्यं पूर्णभावना । क्षान्तिः कारुण्यसम्पत्तिः श्रद्धा सत्यसमुद्भवा ।।१५।।
शिवभक्तिः परो धर्मः शिवज्ञानस्य बान्धवाः । एतैर्युक्तो महायोगी सात्त्विकः परिकीर्तितः ।।१६।।

**तमोगुणासी दूर सारून । अंगी बाणवी उत्तम गुण । तो शिवयोगी सात्त्विक पूर्ण । सत्य जाण अगस्त्या ।।४९।। ते कोणते गुण सात्त्विक । तेही तुजसी कथितो देख । शम दम आणि विवेक । वैराग्य पूर्णभावना ।।५०।। क्षान्ती कारुण्यसंपत्ती । श्रद्धा आणि शिवभक्ती । परमधर्म हे असती । दहा गुण सात्त्विक ।।५१।। अंतरेंद्रिय म्हणजे मन । त्याचे करणे नियंत्रण । याचे नाम 'शम' जाण । हेचि कठीण सर्वांत ।।५२।। मन इंद्रियांचा स्वामी । त्याच्या आज्ञेने इंद्रिये कर्मी । तो सांगेल तैसे वर्तूनी । त्यासी सदा तोषविती ।।५३।। कर्म-ज्ञानेंद्रियांद्वारे । मनचि भोगे विषय सारे । त्यासी करणे बुद्धीद्वारे । नियंत्रित तो 'शम' ।।५४।। बाह्येंद्रियांचे करणे दमन । याचे नाव 'दम' जाण । इंद्रियांच्या दश द्वारांतून । मन धावे बाहेरी ।।५५।। जर द्वार केले बंद । तर मनावरी येई निर्बंध । आणि विषयांपासूनि**

निषिद्ध । ते वळेल माघारी ।।५६।। शम साधिता घडे दम । दम साधिता घडे शम । ते परस्परसापेक्ष गुणधर्म । विवेकाने साधिती ।।५७।। नित्य-अनित्यविवेक । आत्म-अनात्मविवेक । ऐसा द्विविध असे देख । 'विवेक' गुण तिसरा ।।५८।। गृह दारा सत्ता वित्त । आदी वस्तू अनित्य समस्त । त्यांच्याकडे मन प्रवृत्त । होऊनि धावे सर्वकाळ ।।५९।। प्रपंच अनित्य ईश्वर नित्य । ऐसा विचार करी चित्त । तोचि नित्यानित्यविवेक सत्य । जाण महर्षी अगस्त्या ।।६०।। आत्मबुद्धी अनात्म वस्तूत । ती रोधूनि स्थिर आत्म्यात । करणे यासचि म्हणत । आत्मानात्मविवेक ।।६१।। मनातील स्पृहा जाण । जाणे संपूर्ण विरून । सर्व विश्वचि वाटे तृण । यास म्हणती 'वैराग्य' ।।६२।। विषयभोगाचा अभिलाष । त्याचा न उरे किंचित लेश । आत्मचिंतनी मग्न नि:शेष । तेचि वैराग्य जाणावे ।।६३।। पडे अखंड तैलधार । तैसे अंतरी ध्यान स्थिर । चित्ता स्पर्शेना अन्य विचार । तीच 'पूर्णभावना' ।।६४।। अंगी असता सामर्थ्य । अपराध्यासी न दंडिता किंचित । सुधाराया सोडणे मुक्त । यास 'क्षान्ती' हे नाव ।।६५।। मोह भय आणि स्वार्थ । यांपासूनि राहूनि अलिप्त । करणे ती क्षमाचि असत । जाण क्षान्ती अगस्त्या ।।६६।। प्राणिमात्रांविषयी कणव । त्यास 'कारुण्यसंपत्ती' हे नाव । पायातळी चिरडू नये जीव । म्हणूनि जपून चालणे ।।६७।। सत्य वस्तू शिव जाण । त्यावरी दृढ विश्वास पूर्ण । असणे

**यासी 'श्रद्धा' नाम । जी असते एकनिष्ठ ।।६८।। पडे दान सुखदुःखाचे । ते सर्व देणे शंकराचे । दुःख मिळे तरी साचे । ते सुखचि मानणे ।।६९।। ऐसिया दृढभावा । श्रद्धा म्हणावे कुंभोद्भवा । अनन्यभावे भजणे शिवा । ती जाणावी 'शिवभक्ती' ।।७०।। वीरशैव पंचाचार संपूर्ण । त्यांचे निष्ठापूर्वक करणे पालन । हाचि 'परमधर्म' जाण । ऐसे दश गुण सात्त्विक ।।७१।। हे सात्त्विक गुण साचार । शिवज्ञानाचे सहोदर । हे ज्याच्याठायी पूर्ण स्थिर । तोचि शरण सात्त्विक ।।७२।।**

कामक्रोधमहामोहमदमात्सर्यवारणाः । शिवज्ञानमृगेन्द्रस्य कथं तिष्ठन्ति सन्निधौ ।।१७।।

यत्र कुत्रापि वा द्वेष्टि प्रपंचे शिवरूपिणि । शिवद्वेषी स विज्ञेयो रजसाविष्टमानसः ।।१८।।

**काम क्रोध महामोह मद मत्सर । हे जणू हत्तीच प्रचंड विकार । ते शिवज्ञानमृगेंद्रासमोर । कैसे जिवंत राहतील? ।।७३।। जे झाले रजोगुणापासून । कामक्रोधादी विकार उत्पन्न । या विकारांनी मलिन । चित्त ज्याचे झालेले ।।७४ ।। तो मनुष्य राजस । करी शिवरूप प्रपंचाचा द्वेष । ऐसा जो रजोगुणी माणूस । त्यास म्हणती शिवद्रोही ।।७५।। काम क्रोध लोभ जाण । ही नरकाची द्वारे तीन । ज्ञानरूपी रत्नाचे हरण । करिती हे तस्कर ।।७६।। कामक्रोधांचे वादळ । येता संपे विवेक समूळ । मनुष्य वाहवत जाई प्रबळ । कामक्रोधसंगतीने ।।७७।। ऋषिमुनी ज्ञाते भले । या वादळात हरवले ।**

**ज्याने विवेकशक्तीने ठेविले । नियंत्रण तो वाचला ।।७८।। महामोह म्हणजे अज्ञान । तो तमोगुणाचे संतान । मद म्हणजे अभिमान । विद्या-धन-रूपाचा ।।७९।। कोणी विद्यामदे डोले । कोणी धनमदे उताणा चाले । कोणी रूपमदे तिरके डोळे । करूनि पाहे लोकांसी ।।८०।। दुसऱ्याचा उत्कर्ष उज्ज्वल । पाहता पोटी उठे शूल । तो मत्सराचा निखळ । पुतळाचि जाणावा ।।८१।। ऐसे हे प्रबळ दुर्गुण । मदोन्मत्त हत्तीसमान । कराया त्यांचे दमन । शिवज्ञानचि समर्थ ।।८२।।**

यो द्वेष्टि सकलान् लोकान् यो वाऽहंकुरुते सदा । योऽसत्यभावनायुक्तः स तामस इति स्मृतः।।१९।।

तमोमूला हि संजाता रागद्वेषादिपादपाः । शिवज्ञानकुठारेण छेद्यन्ते हि निरन्तरम् ।।२०।।

शिवज्ञाने समुत्पन्ने सहस्रादित्यसन्निभे । कुतस्तमोविकाराः स्युर्महतां शिवयोगिनाम् ।।२१।।

**जो अहंकाराने फुगला । असत्य भावनांनी भारला । द्वेषे झिडकारितो सकला । तो मनुष्य तामसी ।।८३।। शिवमय असे सर्व संसार । त्यात कोणाचा झाला अनादर । तर त्याने अवमानिला शंकर । असे निश्चित जाणावे ।।८४।। तमोगुणाने उत्पन्नले । रागद्वेषादी वृक्ष सगळे । ते जाती समूळ छेदिले । शिवज्ञानकुठाराने ।।८५।। तेजस्वी सहस्र सूर्यांसमान । प्रकाशमय शिवज्ञान । ते प्राप्त त्या शिवयोग्यालागून । अज्ञानांध:कार कुठे मग? ।।८६।। शरणस्थलातील साधक पूर्ण । ऐसे करी**

**तामसनिरसन । आता निर्देशस्थलाचे विवरण । अवधारी मुनिवर्या ।।८७।।**

**निर्देशस्थल** - (३९)

निराकृत्य तमोभागं संसारस्य प्रवर्तकम् । निर्दिश्यते तु यज्ज्ञानं स निर्देश इति स्मृतः ।।२२।।

गुरुरेव परं तत्त्वं प्रकाशयति देहिनाम् । को वा सूर्यं विना लोके तमसो विनिवर्तकः ।।२३।।

**जो संसाराचे मूलकारण । तो घालवूनि तमोगुण । श्रीगुरू जे उपदेशिती ज्ञान । त्यास म्हणती 'निर्देश' ।।८८।। करूनि अंधाराचा नाश । विश्वाला देणे प्रकाश । हे सूर्यावाचूनि कोणास । शक्य जैसे नसेचि ।।८९।। तैसा तमोगुण नाशून । परतत्त्व प्रकाशून । शिष्यासी दाखवी ऐसा कोण । श्रीगुरूवाचूनि नसेचि ।।९०।। श्रीगुरूचि खरे मार्गदर्शक । परमार्थपथावरी साहाय्यक । परशिव-तत्त्वदिग्दर्शक । अन्य कोणी नसेचि ।।९१।। जो बोधितो शिवज्ञान । जो तोडितो संसारबंधन । जो साधवी आत्मकल्याण । तोचि खरा सद्गुरू ।।९२।।**

अन्तरेण गुरुं सिद्धं कथं संसारनिष्कृतिः । निदानज्ञं विना वैद्यं किं वा रोगो निवर्तते ।।२४।।

अज्ञानमलिनं चित्तदर्पणं यो विशोधयेत् । प्रज्ञाविभूतियोगेन तमाहुर्गुरुसत्तमम् ।।२५।।

**रोगाचे करूनि निदान । वैद्य करी रोगनिवारण । तैसे ज्ञानसिद्ध गुरुबोधेकरून । नष्ट होई भवरोग ।।९३।। दर्पणावरी साठता धूळ । त्याचे लोपे रूप निर्मळ । त्यात पाहता दिसे मळ । प्रतिबिंब मात्र दिसेना ।।९४।। तैसा चित्तदर्पणावरी । अज्ञानमळ साठला जन्मांतरी । तो ज्ञानविभूती घासूनि दुरी । करिता होई निर्मल ।।९५।। मग त्या शुद्ध दर्पणात । आत्मरूप होई प्रतिबिंबित । हे करी त्यासचि गुरू निश्चित । मानावे शिष्यवराने ।।९६।।**

अपरोक्षिततत्त्वस्य जीवन्मुक्तस्वभाविनः । गुरोः कटाक्षे संसिद्धे को वा लोकेषु दुर्लभः ।।२६।।

कैवल्यकल्पतरवो गुरवः करुणालयाः । दुर्लभा हि जगत्यस्मिन् शिवाद्वैतपरायणाः ।।२७।।

**ज्याने परतत्त्व जाणले । जो जीवन्मुक्त होऊनि डोले । त्या श्रीगुरूचे कृपाकटाक्ष लाभले । मग जगी दुर्लभ काय? ।।९७।। त्याच्या नेत्रसंकेतेकरून । सर्व सिद्धी क्षाळतील चरण । इंद्रादी देव कर जोडून । पुढे उभे राहतील ।।९८।। ऐसा उदार श्रीगुरू । तो कैवल्याचा कल्पतरू । ऐसा शिवाद्वैतनिष्ठ सद्‌गुरू । जगी दुर्लभ अत्यंत ।।९९।।**

क्षीराब्धिरिव सिन्धूनां सुमेरुरिव भूभृताम् । ग्रहाणामिव तिग्मांशुर्मणीनामिव कौस्तुभः ।।२८।।

द्रुमाणामिव भद्रश्रीर्देवानामिव शंकरः । गुरुः शिवः परः श्लाघ्यो गुरूणां प्राकृतात्मनाम् ।।२९।।

**श्रेष्ठ क्षीरसिंधू समुद्रांत । मेरू श्रेष्ठ सर्व गिरींत । भानू श्रेष्ठ सर्व ग्रहांत । तैसा गुरूंत सद्‌गुरू ।।१००।। रत्नांत श्रेष्ठ कौस्तुभरत्न । वृक्षांत श्रेष्ठ वृक्ष चंदन । देवांत श्रेष्ठ त्रिलोचन । तैसा लौकिक गुरूंत सद्‌गुरू ।।१०१।। ऐसा शिवाद्वैततत्पर । लौकिक गुरूंत श्रेष्ठतर । तो परमगुरू संसार-। सागरातूनि पार करी ।।१०२।। शरणस्थलातील अंतिम जाण । ते स्थल शीलसंपादन । ते करितो आता कथन । सर्व लक्षणांसहित ।।१०३।।**

### **शीलसंपादनस्थल** - (४०)

जिज्ञासा शिवतत्त्वस्य शीलमित्युच्यते बुधैः । निर्देश्ययोगादार्याणां तद्वान् शीलीति कथ्यते ।।३०।।

प्रपन्नार्तिहरे देवे परमात्मनि शंकरे । भावस्य स्थिरतायोगः शीलमित्युच्यते बुधैः ।।३१।।

**श्रीगुरुबोधेकरून । शिवतत्त्व घ्यावे जाणून । या जिज्ञासेला जाण । ज्ञाते 'शील' संबोधिती ।।१०४।। ज्याच्या मनी ती उद्‌भवते । त्यास 'शीली' म्हणती ज्ञाते । ज्याला जाणल्यावरी जाणण्याते । काही अन्य उरेना ।।१०५।। विश्व छत्तीस तत्त्वयुक्त । ऐसे मानितो वीरशैवसिद्धान्त । शिवतत्त्व हे पहिले त्यात । पृथ्वितत्त्व अंतिम ।।१०६।। पस्तीस तत्त्वांचा विचार त्यागून । शिवतत्त्वाविषयी उत्पन्न । जागृत होई जिज्ञासा पूर्ण । तीच शील जाणावी ।।१०७।। जो भक्त येई**

**शरण । त्याचे ताप करितो हरण । म्हणूनि शिवास 'हर' हे अभिधान । असे सत्य जाण हे ।।१०८।। त्या परब्रह्म शिवाठायी । जो चित्त ठेवितो अक्षयी । त्यास 'शीली' नाम पाही । दिले ज्ञानी लोकांनी ।।१०९।।**

शीलं शिवैकविज्ञानं शिवध्यानैकतानता । शिवप्राप्तिसमुत्कण्ठा तद्योगी शीलवान् स्मृतः ।।३२।।

शिवादन्यत्र विज्ञाने वैमुख्यं यस्य सुस्थिरम् । तदासक्तमनोवृत्तिस्तमाहुः शीलभाजनम् ।।३३।।

**सर्वोत्तम हे शिवध्यान । अन्य ध्यान न करणे त्याविण । शिवप्राप्तीस्तव उत्कंठित मन । यास 'शील' हे नाव ।।११०।। ज्याच्याठायी वसे शील । त्यास शीलवान म्हणती सकळ । शिवज्ञानाविण अन्य तळमळ । त्याच्या मनी वसेना ।।१११।। शिवज्ञानातचि ज्याचे मन । सदैव राहते गुंतून । तोचि खरा शीलवान । अन्य केवळ नावाचे ।।११२।।**

पतिव्रताया यच्छीलं पतिरागात् प्रशस्यते । तथा शिवानुरागेण सुशीलोऽभक्त उच्यते ।।३४।।

पतिं विना यथा स्त्रीणां सेवान्यस्य तु गर्हणा । शिवं विना तथान्येषां सेवा निन्द्या कृतात्मनाम् ।।३५।।

**जैसे पतिप्रेमातूनि उत्कट । पतिव्रतेचे शील होय प्रकट । तैसी दृढ शिवभक्तीने स्पष्ट । होई सुशीलता भक्ताची ।।११३।। पतीवरील पत्नीची प्रीत । जसजशी होई वृद्धिंगत । तसतसे तिचे जाई होत । पातिव्रत्य दृढतर ।।११४।। तैसा शरणस्थलीचा भक्त । शिवावरी अत्यंत अनुरक्त । तो जे**

**करी कृत्य युक्त । ते केवळ शिवास्तव ।।११५।। शिवासाठी शिजवी अन्न । शिवासाठी उद्योगी मग्न । चाले बोले करी कर्माचरण । सर्व शिवाप्रीत्यर्थ ।।११६।। जैसी पतिव्रता पतीविण । अन्य पुरुषाचे न करी चिंतन । तैसेच अन्य देवतार्चन । शरण भक्तासी निषिद्ध ।।११७।।**

बहुनात्र किमुक्तेन शिवज्ञानैकनिष्ठता । शीलमित्युच्यते सद्भिः शीलवांस्तत्परो मतः ।।३६।।

शिवात्मबोधैकरतः स्थिराशयः
शिवं प्रपन्नो जगतामधीशम् ।
शिवैकनिष्ठाहितशीलभूषणः
शिवैक्यवानेष हि कथ्यते बुधैः ।।३७।।

**दृढ शिवनिष्ठेस म्हणावे शील । अधिक काय सांगू सकळ । ते अंगी ज्याच्या तो शीलवान निर्मळ । ऐसे सज्जन सांगती ।।११८।। एकनिष्ठ लिंगांगज्ञानी रत । जगदीश्वर शिवासी शरणागत । सति-पतिभाव दृढ मनात । अलंकृत शिवैकनिष्ठा-शीलाने ।।११९।। तोचि शिवज्ञानी सत्यशरण । पुढे ऐक्यस्थली जाऊन । राहतो शिवैक्य होऊन । असे सांगती शिवज्ञानी ।।१२०।। ऐक्यस्थल हा अंतिम क्षण । तो साधावया जन्मांतरातून । जीवाचे चालले अखंड भ्रमण । ते स्थल पुढे निरोपू ।।१२१।।**

**शिवस्वरूप जगद्‌गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१२२।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्‌भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । त्रयोदशोऽध्याय पूर्ण हा ।।१२३।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतशरणस्थले शरणस्थलादिचतुर्विधस्थलप्रसंगो नाम त्रयोदशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु घंटाकर्ण शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः गिरिधन्वने । गिरिप्रियाय नमः जगद्रूपिणे । कृत्तिकावाससे नमः अनेकात्मने । पुरारातये नमः भगवते ।।१।। तूचि श्रीगुरुरूप धरून । भक्तांसी देतोसी शिवज्ञान । करिसी मुक्त संसारातून । ऐसा भवभयमोचक तू ।।२।। तुझ्या रूपाहूनि अधिक । गुरुरूपाचे माहात्म्य देख । तोचि करूनि देई ओळख । तुझ्या शिवरूपाची ।।३।। तोच दीक्षा देतो बोधितो । हृदय भरता अश्रू पुसतो । तोच भक्तासी हृदयी धरितो । संकटी दावितो मार्गही ।।४।। म्हणूनि श्रीगुरुरूपी शंकरा । मजला मार्गदर्शन करा । ग्रंथरचना-उद्योग सारा । न्यावा तुम्ही सिद्धीसी ।।५।। असो श्रोते सावध चित्ते । सादर व्हावे श्रवणी पुरते । ऐक्यस्थलाचे निरूपण येथे । रेणुकाचार्य करितील ।।६।। अंग-षट्स्थलांमधील । अंतिम असे हे ऐक्यस्थल । जीवाची धावाधाव सरेल । ऐक्यस्थल साधिता ।।७।। गंगा सागरासी मिळे । ती पुन्हा मागुती न वळे । तैसे जे ऐक्यस्थलास पावले । ते न येती माघारी ।।८।। जेथे पोचल्यावरी जीव । परतायाचे न घे नाव । जन्मजन्मांतरीची धाव । सरे जेथे गाव ते ।।९।। याचसाठी जन्मफेरे । याचसाठी

शिणणे सारे । जपतपादिकांचे भारे । माथ्यावरी साहिले ।।१०।। येथे जीव-शिवाची भेटी । परमात्म-लिंगासी घालूनि मिठी । जीवाचे जीवत्व शेवटी । सरूनि तो शिव होय ।।११।। श्रद्धा निष्ठा अवधान । अनुभव आनंद समरस जाण । या सहा भक्तींचे विवरण । मागे असे जहाले ।।१२।। त्यात समरसभक्ती सहावी । ती ऐक्यस्थली जाणावी । जीव शिवसामरस्य अनुभवी । म्हणूनि समरस-भक्ती ती ।।१३।। अगस्त्य मुनी करितील प्रश्न । रेणुकाचार्य करितील विवरण । ते चित्त एकाग्र करून । अनुभवावे श्रोत्यांनी ।।१४।।

## अंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

अगस्त्य उवाच-

तामसत्यागसम्बन्धान्निर्देशाच्छीलतस्तथा । शरणाख्यस्य भूयोऽस्य कथमैक्यनिरूपणम् ।।१।।

अगस्त्यांनी केला प्रश्न । शरणाचे तामसगुणनिरासक ज्ञान । निर्देश आणि शीलसंपादन । आचार्यवरा निरूपिले ।।१५।। त्याद्वारा शरणस्थली साधक । कैसे साधितो शिवजीवैक्य । ते मज बोधावे मी अत्यधिक । आतुर असे श्रवणासी ।।१६।।

श्रीरेणुक उवाच-

प्राणलिंगादियोगेन सुखातिशयमेयिवान् । शरणाख्यः शिवेनैक्यभावनादैक्यवान् भवेत् ।।२।।

ऐक्यस्थलमिदं प्रोक्तं चतुर्धा मुनिपुंगव ।

ऐक्यमाचारसम्पत्तिरेकभाजनमेव च । सहभोजनमित्येषां क्रमाल्लक्षणमुच्यते ।।३।।

**रेणुक सांगती अगस्त्यालागून । जो करीत अखंड प्राणलिंगध्यान । होई शिवानंदरस परिपूर्ण । दृढ शिवैक्यभावनेने ।।१७।। तोचि शरण साधक निर्मल । सहज गाठतो ऐक्यस्थल । आता ऐक्यस्थलाचे भेद सकल । सांगतो ऐक ऋषिश्रेष्ठा ।।१८।। ऐक्यस्थल आचारसंपत्तिस्थल । एकभाजनस्थल सहभोजनस्थल । अशा चार स्थलांची सकळ । लक्षणे क्रमशः ऐकावी ।।१९।।**

## **ऐक्यस्थल** - (४१)

विषयानन्दकणिकानिःस्पृहो निर्मलाशयः । शिवानन्दमहासिन्धुमज्जनादैक्यमुच्यते ।।४।।

निर्धूतमलसम्बन्धो निष्कलंकमनोगतः । शिवोऽहमिति भावेन निरूढो हि शिवैक्यताम् ।।५।।

**विषयसुखी होऊनि विरक्त । जो डुंबे शिवानंद-महासागरात । त्या निर्मल शरणाच्या स्थितीप्रत ।**

**ऐक्यस्थल संबोधिती ।।२०।। आणव-माया-कार्मिक मल । नाशूनि जो झाला निर्मल । शिवोऽहं-भावे असे चिंतनशील । त्यास लाभे ऐक्यस्थिती ।।२१।। समुद्रजलाचे होऊनि बाष्प । नभी धरिते मेघरूप । तेचि भूवरी वर्षूनि अमूप । रूप घेई सरितांचे ।।२२।। गंगायमुनादी घेऊनि नावे । तेचि समुद्राकडे धावे । त्यात विलीन होऊनि स्वभावे । पुन्हा होई समुद्र ।।२३।। जेथूनिया ते आले । तेथेचि मागुते गेले । तैसे जीव जाती सगळे । येती जेथून तेथेचि ।।२४।। शिवापासूनि आला जीव । म्हणूनि त्याची तिकडे धाव । जपतपादी साधने सर्व । त्याचसाठी आचरिती ।।२५।। ऐक्यस्थलीचा साधक । शिवोऽहंभावनेने साधे ऐक्य । बिंदू सिंधूत मिळता देख । जैसा होई समरस ।।२६।। करूनि अखंड शिवचिंतन । शिवस्वरूप होई शरण । जैसा भ्रमरचिंतन करून । कीटक होय भ्रमरचि ।।२७।।**

शिवेनैक्यं समापन्नश्चिदानन्दस्वरूपिणा । न पश्यति जगज्जालं मायाकल्पितवैभवम् ।।६।।

ब्रह्माण्डबुद्बुदोद्भेदविजृम्भी तत्त्ववीचिमान् । मायासिन्धुर्लयं याति शिवैक्यवडवानले ।।७।।

**शिव सच्चिदानंदस्वरूप । त्याच्याशी झाला एकरूप । तो ऐक्यस्थली साधक शिवरूप । पाहे सर्व विश्वात ।।२८।। मायानिर्मित जगज्जाल । त्यासी दिसे शिवमय अखिल । जैसे अलंकाराठायी केवळ । सुवर्ण पाहे सुवर्णकार ।।२९।। ग्राहकासी दिसे भूषण । परि सोनारासी ते केवळ सुवर्ण । तो तोलतो**

**सोने म्हणून । अलंकार म्हणूनि नव्हे ।।३०।। जशी आहे तशीच सृष्टी । केवळ शिवभक्तांची बदले दृष्टी । सृष्टिरूपात तो शिवपरमेष्ठी । पाहे ऐक्य झाल्याने ।।३१।। ब्रह्मांडरूपी बुडबुड्यांमुळे । भरूनि जो वरती उफाळे । छत्तीस तत्त्वरूपी लाटांनी फुले । मायासमुद्र अपार ।।३२।। तो मायासागर पूर्ण । शिवैक्य-वडवाग्नीत होई लीन । ऐक्यस्थली साधकासी जाण । दिसेना विश्वप्रपंच ।।३३।।**

मायाशक्तितिरोधानाच्छिवे भेदविकल्पना । आत्मनस्तद्विनाशे तु नाद्वैतात्किंचिदिष्यते ।।८।।

पशुत्वं च पतित्वं च मायामोहविकल्पितम् । तस्मिन् प्रलयमापन्ने कः पशुः को नु वा पतिः ।।९।।

**असे मायाशक्तीचे आवरण । म्हणूनि जीव-शिवात दिसे भिन्नपण । मायाशक्ती संकोचता पूर्ण । दोघात नांदे अभेद ।।३४।। जे राहती शिवाजवळी । ते न फसती मायाजाळी । जैसे जाळे फेकितो कोळी । जळी मासे धराया ।।३५।। जे दूर कोळ्यापासून । ते जाळ्यात फसती मीन । जे घुटमळती पायाशी लागून । ते न फसती जाळ्यात ।।३६।। तैसा जो शिवासन्निध राहे । त्याकडे वक्रदृष्टीने कोण पाहे? । तो मायामोहे न मोहे । केवळ जाणतो शिवासी ।।३७।। जीव पशू शिव पती । ही असे केवळ मायाभ्रांती । माया विरल्यावरी सरती । पशू-पती हे भेद ।।३८।। पशुभाव आणि पतिभाव । ऐक्यस्थली हे विरती सर्व । केवळ राहे एकमेव । शिवतत्त्व संचूनी ।।३९।।**

घोरसंसारसर्पस्य भेदवल्मीकशायिनः । बाधकं परमाद्वैतभावना परमौषधम् ।।१०।।

भेदबुद्धिसमुत्पन्नमहासंसारसागरम् । अद्वैतबुद्धिपोतेन समुत्तरति देशिकः ।।११।।

**संसारसर्प महाविषयुक्त । तो राहे भेद-वारुळात । वारूळ खणूनि त्याचा अंत । करी अद्वैत-भावना ।।४०।। भेद असे पंचविध । तोही अगस्त्या करितो विशद । जड-जडातील भेद । भेद जीव-जीवातला ।।४१।। जड-जीवातील भेद । जड-शिवातील भेद । जीव-शिवातला भेद । ऐसे पंच प्रकार ।।४२।। झाडे माती दगड । आदी जगी पदार्थ जड । त्यांच्यात अभेद करणे अवघड । हा भेद जड-जडातला ।।४३।। संसारात अनंत जीव । पशू पक्षी असंख्य मानव । ते नसती एकजीव । हा भेद जीव-जीवातला ।।४४।। विश्वातील जड पदार्थ । आणि जीव चेतनयुक्त । यांच्यात नसे अद्वैत । हा भेद जड-जीवातला ।।४५।। जड प्रपंच आणि शिवब्रह्म पूर्ण । हे एकमेकांपासूनि भिन्न । त्यांच्यात नसे एकपण । हा भेद जड-शिवातला ।।४६।। जीव अल्पज्ञ अल्पकर्ता । शिव सर्वज्ञ सर्वकर्ता । यांच्यात भेद दिसे तत्त्वता । तो भेद जीव-शिवातला ।।४७।। अशा पंचभेद-वारुळात । बैसला संसारसर्प फुत्कारत । त्यासी माराया घ्यावी करात । अद्वैतभावना-कुदळ ।।४८।। भेदरूपी वारूळ खणावे । संसारसर्पासी जीवे मारावे । मग संसारभय सरे आघवे । ऐक्यस्थलीच्या साधकाचे ।।४९।। जो**

**भेदबुद्धीतूनि उत्पन्नला । तो संसारमहासागर उधाणला । अद्वैतनौकेतूनि तयाला । पार करितो ऐक्यस्थली ।।५०।।**

अज्ञानतिमिरोद्रिक्ता कामरक्षःक्रियाकरी । संसारकालरात्रिस्तु नश्येदद्वैतभानुना ।।१२।।
तस्मादद्वैतभावस्य सदृशो नास्ति योगिनाम् । उपायो घोरसंसारमहातापनिवृत्तये ।।१३।।

**जी अज्ञानांध:कारे व्याप्त । कामदैत्याचे वाढवी सामर्थ्य । ती संसार-काळरात्र जगात । व्यापिलेली सर्वत्र ।।५१।। भौतिक अंधार बाहेर । ह्रदयात वसे अज्ञानांध:कार । अंधारी वाढतो थोर । कामदैत्य मनात ।।५२।। कामावेग केला शांत । तरी तो सदैव राहे अतृप्त । भोगच भोगिती मनुष्याप्रत । नाही भोगीत मनुष्य ।।५३।। ऐसी संसाररात्र भयंकर । प्रकटता अद्वैतज्ञानभास्कर । क्षणार्धात पळते दूर । ऐक्यस्थलीच्या ह्रदयातूनी ।।५४।। हराया घोर संसारभय । अद्वैतभावना हाचि उपाय । शिवोऽहं-भावनेने उदय । होई अद्वैतसूर्याचा ।।५५।।**

अद्वैतभावनाजातं क्षणमात्रेऽपि यत्सुखम् । तत्सुखं कोटिवर्षेण प्राप्यते नैव भोगिभिः ।।१४।।
चित्तवृत्तिसमालीनजगतः शिवयोगिनः । शिवानन्दपरिस्फूर्तिर्मुक्तिरित्यभिधीयते ।।१५।।

**अद्वैतभावनेने एक क्षण । जे परमसुख होई उत्पन्न । ते कोटी वर्षे भोग भोगून । न लाभे भोगी जीवाला ।।५६।। शिवचिंतन केल्यामुळे । चित्ती अपार शांती खेळे । तिच्या शतांशाशी न तुळे । भोग कोटी जन्मांतील ।।५७।। ज्याच्या चित्तवृत्तीत जाण । विश्वचि सामावले पूर्ण । त्या शिवयोग्यासी जे परिस्फुरण । होई शिवानंदाचे ।।५८।। त्यालाच मुक्ती ऐसे नाव । जीवात्म्याचे ते अंतिम गाव । जेथे सरते धावाधाव । जन्ममरण-भ्रमणाची ।।५९।। तेथे नाही शत्रू मित्र । नाही पुत्र नाही कलत्र । निखळ उरे एकमात्र । परमानंद परमानंद ।।६०।। ऐक्यस्थलीचा साधक । त्याचे आचरण कैसे चोख । ते कथितो आता ऐक । ऋषिश्रेष्ठ अगस्त्या ।।६१।।**

## आचारसंपत्तिस्थल - (४२)

शिवैकभावनापन्नशिवत्वो देहवानपि । देशिको हि न लिप्येत स्वाचारैः सूतकादिभिः ।।१६।।
शिवाद्वैतपरिज्ञाने स्थिते सति मनस्विनाम् । कर्मणा किं नु भाव्यं स्यादकृतेन कृतेन वा ।।१७।।

**जीवन्मुक्त जो जहाला । तो कर्मांनी न जाई लिंपला । जळातील कमलपत्राला । जैसे जळ लिंपेना ।।६२।। जरी लाभली जीवन्मुक्ती । तरी देहाची न संपे गती । प्रारब्धकर्मे भोगूनि ती ।**

**संपल्यावरी देहपात ।।६३।। कंदुक भिरकाविता एकीकडे । गती संपता खाली पडे । तैसे देहपतन घडे । प्रारब्धकर्म सरल्यावरी ।।६४।। जीवन्मुक्त झाल्यावर । वाहावे लागते शरीर । आणि कर्मेही घडणार । देहाकडूनि निश्चित ।।६५।। शिवसामरस्य-भावनेने । शिवत्व प्राप्त केले ज्याने । तो कर्मातूनि मनाने । असे अलिप्त सर्वस्वी ।।६६।। शिवत्वप्राप्त देशिक । जरी असे देहधारक । तरी त्यासी न होय बाधक । सूतकादी कर्म ते ।।६७।। त्याचे मनोव्यापार जाण । झाले लिंगैक्यभावात लीन । त्याने केले कर्माचरण । ते फळेना कदापि ।।६८।। त्याने सत्कर्म आचरिले । किंवा जरी दुष्कर्म घडले । तरी त्याचे फल न मिळे । मग ते भोगणे दूरचि ।।६९।। जैसी दग्ध बीजे पेरिली । ती उगवतीच ना कोणेकाळी । तैसी त्याची कर्मे सगळी । चालती कर्मफलाविण ।।७०।।**

शम्भोरेकत्वभावेन सर्वत्र समदर्शनः । कुर्वन्नपि महाकर्म न तत्फलमवाप्नुयात् ।।१८।।
सुकृती दुष्कृती वापि ब्राह्मणो वान्त्यजोऽपि वा । शिवैकभावयुक्तानां सदृशो भवति ध्रुवम् ।।१९।।

**शिवतत्त्व सर्वत्र व्याप्त । या अनुभवे जो जहाला तृप्त । जो सर्व विश्वासी देखत । समत्वबुद्धी ठेवूनी ।।७१।। त्याने सत्कर्म मोठे केले । अथवा महापापही घडले । तरी त्यास कर्मांची फळे । भोगावी**

**न लागती ।।७२।। पापात्मा असो वा पुण्यवान । अंत्यज असो वा ब्राह्मण । त्याच्या दृष्टीत सर्व समान । शिवाद्वैतदृष्टीमुळे ।।७३।।**

वर्णाश्रमसदाचारैर्ज्ञानिनां किं प्रयोजनम् । लौकिकस्तु सदाचारः फलाभावेऽपि भाव्यते ।।२०।।

निर्दग्धकर्मबीजस्य निर्मलज्ञानवह्निना । देहिवद्भासमानस्य देहयात्रा तु लौकिकी ।।२१।।

**जो शिवाद्वैतज्ञाने पूर्ण । त्यास नाही वर्णाश्रमबंधन । सदाचारपालनाचे प्रयोजन । कशास शिवयोग्याला? ।।७४।। तरीही तो फलप्राप्तीविण । करी नित्यनैमित्तिक कर्माचरण । ते आचरावयाचे बंधन । नसे जाण त्याच्यावरी ।।७५।। त्याची कर्मबीजे समस्त । दग्ध जहाली ज्ञानाग्नीत । किती कर्म केले तरी प्राप्त । नाही त्यासी कर्मफळ ।।७६।। त्याचे कर्माचरण सकळ । हे दिसण्यापुरते केवळ । त्याची देहयात्रा निखळ । चाले कर्मफलाविना ।।७७।। वस्त्रांचा ढीग जळाला । तरी तो तसाच दिसे दृष्टीला । परि त्याचा नसे कोणाला । किंचितही उपयोग ।।७८।। तैसा जरी दिसे तो देहधारी । परि लिप्त नोहे कर्मांतरी । नित्य नैमित्तिक कर्मे जरी नाचरी । तरी न लागे पातक ।।७९।।**

शिवज्ञानसमापन्नस्थिरवैराग्यलक्षणः । स्वकर्मणा न लिप्येत पद्मपत्रमिवाम्भसा ।।२२।।

गच्छंस्तिष्ठन् स्वपन् वापि जाग्रन् वापि महामतिः । शिवज्ञानसमायोगाच्छिवपूजापरः सदा ।।२३।।

**जे शिवज्ञानाने उत्पन्नले । ते वैराग्य मनी बिंबले । त्याने कितीही कर्म केले । तरी मुक्त फळातूनी ॥८०॥ कमलपत्र जळी राहून । जलाने न जाय भिजून । तैसा सर्व कर्मी वर्तून । ऐक्यस्थली अलिप्त ॥८१॥ तो चालत असो वा बसलेला । जागृत असो वा निजलेला । तो समजावा गढलेला । असे शिवपूजेतचि ॥८२॥**

यद्यत्पश्यति सामोदं वस्तु लोकेषु देशिकः । शिवदर्शनसम्पत्तिस्तत्र तत्र महात्मनः ॥२४॥

यद्यच्चिन्तयते योगी मनसा शुद्धभावनः । तत्तच्छिवमयत्वेन शिवध्यानमुदाहृतम् ॥२५॥

**तो पाहे मोदे जिकडे । शिवसंपत्तीच लाभे तिकडे । परशिवाविण दृष्टीपुढे । अन्य वस्तूचि दिसेना ॥८३॥ तो जे जे करी चिंतन । त्यात शिवचि राहिला भरून । म्हणूनि त्याचे शिवध्यान । अविरत चाललेले ॥८४॥**

यत्किंचिद्भाषितं लोके स्वेच्छया शिवयोगिना । शिवस्तोत्रमिदं सर्वं यस्मात् सर्वात्मकः शिवः ॥२६॥

या या चेष्टा समुत्पन्ना जायते शिवयोगिनाम् । सा सा पूजा महेशस्य सर्वदा तद्गतात्मनाम् ॥२७॥

**तो जे जे बोले बोल । ते शिवस्तोत्रचि निखळ । जे जे कर्म करी सकळ । तीच असे शिव-पूजा ॥८५॥ ज्याच्या दृष्टीत संचला शिव । त्यासी शिवमय जग सर्व । शिवावाचूनि अन्य जाणीव ।**

**त्याच्या चित्ता शिवेना ।।८६।। ऐसा ज्ञानोत्तर आचार । तुज निरूपिला साचार । आता एकभाजन-स्थल सविस्तर । निरूपितो ऐक ऋषिवरा ।।८७।।**

**एकभाजनस्थल** - (४३)

विश्वं शिवमयं चेति सदा भावयतो धिया । शिवैकभाजनात्मत्वादेकभाजनमुच्यते ।।२८।।

स्वस्य सर्वस्य लोकस्य शिवस्याद्वैतदर्शनात् । एकभाजनयोगेन प्रसादैक्यमतिर्भवेत् ।।२९।।

**सकल विश्व असे शिवमय । याचा जो नित्य घेई अनुभव । शिव सर्वांचा आश्रय ही जाणीव । हेच एकभाजनस्थल ।।८८।। लाटा बुडबुडे जाण । हे नामरूपांनी दिसती भिन्न । परंतु ते समुद्राहून । वेगळे नसती कदापि ।।८९।। तैसे प्रपंचातील सर्व जीव । हे असती केवळ शिव । प्रपंच शिवमयचि सर्व । असे जाण अगस्त्या ।।९०।। अहं म्हणजे जीव । इदं म्हणजे प्रपंच सर्व । आणि तत् म्हणजे शिव । ही एकरूप तिन्ही तत्त्वे ।।९१।। जेव्हा बुद्धीत संपूर्ण । हे दृढ होई एकपण । त्याला म्हणती एकभाजन । हेचि असे स्थल हे ।।९२।। दूध अनेक भांड्यांतले । एका भांड्यात ओतले । तरी ते 'एकभाजन' झाले । भाजन म्हणजे भांडेच ।।९३।। तैसे शिव जीव प्रपंच । हे जेव्हा होती एकच । एकभाजनस्थल तेच । जाणूनि घ्यावे ज्ञात्यांनी ।।९४।। येता अद्वैताची अनुभूती । प्राप्त होते एकभाजनस्थिती । मग**

**प्रसादाविषयी ऐक्यमती । होते स्थिर भक्तमनी ।।९५।। आपुला प्रसाद तो शिवप्रसाद । शिवप्रसाद हा आपुला प्रसाद । शिवभक्तांचाही प्रसाद । शिवप्रसादचि असे ।।९६।। गुरू लिंग जंगम तीन । यांचा प्रसाद नसे भिन्न । ही दृढ होई पूर्ण । ऐक्यबुद्धी मनात ।।९७।।**

शिवे विश्वमिदं सर्वं शिवः सर्वत्र भासते । आधाराधेयभावेन शिवस्य जगतः स्थितिः ।।३०।।

चिदेकभाजनं यस्य चित्तवृत्तेः शिवात्मकम् । नान्यत्तस्य किमेतेन मायामूलेन वस्तुना ।।३१।।

**शिवामध्ये विश्व स्थित । शिव स्थित चराचरात । आधार-आधेय संबंध दोघांत । जैसा असे बीजांकुरी ।।९८।। तूप असे दुधात । आणि तेल असे तिळात । तैसा शिव अवस्थित । असे सर्व विश्वामधी ।।९९।। तूप तेल प्राप्त कराया । करावी लागे काही प्रक्रिया । तैसा शिव विश्वात पाहाया । करावी लागे साधना ।।१००।। ती साधना म्हणजे शिवचिंतन । ते दृढ होता परिपूर्ण । विश्वात शिव राहिला व्यापून । ऐसा येई अनुभव ।।१०१।। मग एकभाजन-स्थितीत । भेद न दिसती मायाकल्पित । ते असले जरी व्यवहारात । त्यांचे न काही घेणे देणे ।।१०२।।**

चित् प्रकाशयते विश्वं तद्भिना नास्ति वस्तु हि । चिदेकनिष्ठचित्तानां किं मायापरिकल्पितैः ।।३२।।

वृत्तिशून्ये स्वहृदये शिवलीने निराकुले । यः सदा वर्तते.योगी स मुक्तो नात्र संशयः ।।३३।।

**ज्याच्या चित्तवृत्तीत व्यापून । राहिला शिवचि परिपूर्ण । त्यासी काय असे प्रयोजन । प्रपंचातील वस्तूंचे ? ।।१०३।। प्रपंचातील वस्तुजात । शिवचैतन्याने प्रकाशित । तेणेचि त्या होती प्रतीत । हे तो जाणे एकचि ।।१०४।। जो सर्वदा वृत्तिशून्य । क्षोभरहित लिंगात लीन । तोचि जीवन्मुक्त जाण । यात नसे संदेह ।।१०५।। हे विवरिले एकभाजन । आता कथितो सहभोजन । कर्णी एकवटूनि प्राण । ऐक मुनी अगस्त्या ।।१०६।।**

### **सहभोजनस्थल** - (४४)

गुरोः शिवस्य शिष्यस्य स्वस्वरूपतया स्मृतिः । सहभोजनमाख्यातं सर्वग्रासात्मभावतः ।।३४।।

शिवं विश्वं गुरुं साक्षाद्योजयेन्नित्यमात्मनि । एकत्वेन चिदाकारे तदिदं सहभोजनम् ।।३५।।

**श्रीगुरू शिव ही स्वरूपे जाण । भिन्न नसती स्वस्वरूपाहून । या शिष्याच्या जाणिवेलागून । सर्वग्रासात्मभाव म्हणती ।।१०७।। गुरू शिव आणि आपण । एकचि ऐसे तादात्म्यचिंतन । या सर्वग्रासात्मभावासी जाण । म्हणती सहभोजनस्थल ।।१०८।। बोध्य बोधक बोधन । ही त्रिपुटी जाते सरून । सर्व स्वात्मरूप असे घडे चिंतन । सहभोजनस्थलात ।।१०९।। चिद्रूप आत्मस्वरूपात । शिव**

**गुरू आणि जगत् । असे एकरूप समस्त । हे चिंतन सहभोजन ।।११०।।**

अयं शिवो गुरुश्चैष जगदेतच्चराचरम् । अहं चेति मतिर्यस्य नास्त्यसौ विश्वभोजकः ।।३६।।

अहं भृत्यः शिवः स्वामी शिष्योऽहं गुरुरेव वै । इति यस्य मतिर्नास्ति स चाद्वैतपदे स्थितः ।।३७।।

**हा शिव हा गुरुदेव । हे विश्व आणि मी जीव । या भेदबुद्धीसी ठाव । जेथे उरे न किंचित् ।।१११।। तोचि विश्वभोजक जाण । तो सर्व भेदांचे करी भक्षण । ज्याच्याठायी असे भेद विद्यमान । तो नव्हे विश्वभोजक ।।११२।। शिव स्वामी मी सेवक । तो गुरू मी शिष्य एक । ऐसी भेदबुद्धी नसे देख । तो स्थित झाला अद्वैतपदी ।।११३।।**

पराहन्तामये स्वात्मपावके विश्वभास्वति । इदन्ताहव्यहोमेन विश्वहोमीति कथ्यते ।।३८।।

अहं शिवो गुरुश्चाहमहं विश्वं चराचरम् । यया विज्ञायते सम्यक् पूर्णाहन्तेति सा स्मृता ।।३९।।

**मी देह हा भाव अहंता । मी जगद्रूप हा भाव पराहंता । संसारबंधनी घालिते अहंता । पराहंता ते तोडिते ।।११४।। जी करी विश्व प्रकाशित । त्या मूल पराहंतारूप अग्नीत । होमितो इदंतारूप हविर्द्रव्ये समस्त । तो जाणावा विश्वहोमी ।।११५।। 'हे' या शब्दे जे दर्शविती । त्यास 'इदं' ज्ञाते म्हणती ।**

**इदंरूपी हविर्द्रव्याची आहुती । द्यावी ज्ञान-अग्नीत ।।११६।। जैसे काष्ठ होमिता अग्नीत । ते होई अग्निरूपचि समस्त । तैसे होमिता इदंरूप प्रपंच होत । पूर्ण परमात्मरूपचि ।।११७।। मीच गुरू मीच शंकर । मीच विश्व चराचर । ऐसा जो शुद्ध अहंकार । तिला नाव पूर्णाहंता ।।११८।। पूर्णाहंता होता जागृत । विश्व दिसे आत्मरूपात । यत्र तत्र सर्वगत । व्यापूनि राहे स्व-रूप ।।११९।।**

आधारवह्नौ चिद्रूपे भेदजातं जगद्धविः । जुहोति ज्ञानयज्वा यः स ज्ञेयो विश्वहव्यभुक् ।।४०।।

चिदाकारे पराकाशे परमानन्दभास्वति । विलीनचित्तवृत्तीनां का वा विश्वक्रमस्थितिः ।।४१।।

**आज्ञाचक्रस्थित ज्ञानाग्नीत जाण । जो भेदरूपी विश्व करी हवन । त्यास विश्वहव्यभुक् हे नाम । आणि ज्ञानयज्ञदीक्षित असे ।।१२०।। हृदयाकाशी चैतन्यमय । परमानंदरूपी उगवे सूर्य । त्यात झाला पूर्ण विलय । ज्याच्या चित्तवृत्तींचा ।।१२१।। जगव्यवहार चालला । की तो पूर्णत: थांबला । याच्याशी घेणे देणे त्याला । काही असेनाच की ।।१२२।।**

निरस्तविश्वसम्बाधे निष्कलंके चिदम्बरे । भावयेल्लीनमात्मानं सामरस्यस्वभावतः ।।४२।।

सैषा विद्या परा ज्ञेया सत्तानन्दप्रकाशिनी । मुक्तिरित्युच्यते सद्भिर्जगन्मोहनिवर्तिनी ।।४३।।

नाही जन्ममरणाचे बंधन । निष्कलंक चिदाकाश पूर्ण । त्यात समरसभावे लीन । झालो ऐसे समजावे ।।१२३।। अंग-लिंगातील समरसभाव । तिला पराविद्या असे नाव । ती सच्चिदानंद-स्वरूपिणी सर्व । नाशिते भेदभावांसी ।।१२४।। तिलाच म्हणती परामुक्ती । जी करी विश्वभेदाची निवृत्ती । शिवात समरसूनि जीव अंती । होतो शिवस्वरूप ।।१२५।। गंगा सागरासी मिळाली । ती समुद्ररूपचि जहाली । येथे जीवाची धाव सरली । तो झाला शिवरूप ।।१२६।।

भक्तादिधामार्पितधर्मयोगात् प्राप्तैकभावः परमाद्भुतेन ।
शिवेन चिद्व्योममयेन साक्षान् मोक्षश्रियो भाजनतामुपैति ।।४४।।

ऐसे भक्तादी षट्स्थलांतून । भक्त सदाचारांचे करीत पालन । चिन्मय अद्भुत शिवासी ऐक्य पावून । संपादितो मोक्षलक्ष्मी ।।१२७।। संपले युगानुयुगे धावणे । अनंत जन्मांचे ओझे वाहणे । थांबले पावलांचे चालणे । ते हे परम ऐक्यस्थल ।।१२८।। उगवणे मावळणे हे काही । आता येथे उरलेचि नाही । जन्ममरणचक्राचे भ्रमणही । आता थांबले पूर्णतः ।।१२९।। आता नाही येणे जाणे । नाही संसारदुःख भोगणे । रडणे पडणे उतणे मातणे । आक्रोश करणे सरले हे ।।१३०।। जन्म घेतले कोट्यनुकोटी । हेचि स्थल साधण्यासाठी । आता सरली आटाआटी । केवळ शिव शिवचि ।।१३१।।

**अगस्त्या हे ऐक्यस्थल । येथे संपले अंगषट्स्थल । पुढे निरूपीन लिंगषट्स्थल । ऐक सादर होऊनी ।।१३२।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१३३।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । चतुर्दशोऽध्याय पूर्ण हा ।।१३४।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ अंगस्थलांतर्गतऐक्यस्थले ऐक्यस्थलादिचतुर्विधस्थलप्रसंगो नाम चतुर्दशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय पंधरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगदगुरु धेनुकर्ण शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः प्रमथाधिपाय । मृत्युंजयाय नमः व्योमकेशाय । महासेनजनकाय नमः चारुविक्रमाय । रुद्राय नमः भूतपतये ।।१।। तुझ्यावरी टाकूनि भार । ग्रंथलेखनी झालो सादर । मुंगीने गाठावया गिरिशिखर । आस धरावी तैसे हे ।।२।। संस्कृताचे नाही ज्ञान । नाही जाणत तत्त्वज्ञान । नाही आपुल्या शक्तीचे भान । तरी पुढेच चाललो ।।३।। कोणी दिव्य रथातून । ऐटीत करी मार्गक्रमण । कोणी जाई हत्तीवरून । कोणी अन्य वाहनी ।।४।। ज्याच्याकडे ना हत्ती-रथ । त्याने क्रमू नये का पथ? । की पंगूसी नाही प्राप्त । अधिकार मार्गक्रमणाचा? ।।५।। म्हणूनि देवा तुझ्या बळे । माझी चावळी अखंड चाले । जमेल तैसे मी केले । तुझे हे शिवकीर्तन ।।६।। मी केले हे निमित्त । तू करवूनि घेतले हे निश्चित । आता शिवा उत्तररंगात । रंग भरी आगळे ।।७।। असो श्रोतेहो अंगस्थल । तुम्ही अवधारिले सकळ । आता ऐकाया लिंग-स्थल । व्हावे पुढती सावध ।।८।। जे जगताचे मूलकारण परम । ज्यासी म्हणती लिंग परब्रह्म । त्याला 'स्थल' ऐसे नाम । आहे वीरशैवशास्त्रात ।।९।। सृष्टिनिर्मितीपूर्वी अवस्थित । हेचि होते स्थलतत्त्व ।

त्याच्याठायी अविभक्त । होती चिच्छक्तीही ।।१०।। शिव शक्ती नामभेदे । एकचि शिवपण नांदे । वसे अविनाभावसंबंधे । शक्ती शिवाठायीच ।।११।। एक शब्द दोही ओठी । नेत्र दोन एक दृष्टी । तैसे शिव आणि शक्ती । नावे दोन तत्त्व एक ।।१२।। होते स्थलतत्त्व एकटे । त्यास लीला करावी वाटे । म्हणूनि दोही ठायी ते । विभागले स्वत:च ।।१३।। एक भाग झाला 'अंग' । दुसरा भाग झाला 'लिंग' । चिच्छक्तीही दोन भाग । झाली त्याच्यासारखी ।।१४।। एक भाग 'कला' नामाने । राहे लिंगाच्या आश्रयाने । दुजा भाग 'भक्ती' नावाने । राहे अंग-आश्रये ।।१५।। 'लिंग' म्हणजे शिवब्रह्म पूर्ण । 'अंग' हे जीवात्म्यासी अभिधान । लिंगतत्त्व पुन्हा विभागून । झाले सहा ठिकाणी ।।१६।। आचारलिंग गुरुलिंग । शिवलिंग जंगमलिंग । प्रसादलिंग महालिंग । ऐसे भेद हे सहा ।।१७।। अंगतत्त्वही सहा ठायी । विभक्त होऊनिया राही । भक्त-माहेश्वर-प्रसादी पाही । प्राणलिंगि-शरण-ऐक्य ।।१८।। हे जाणावे षट्स्थल । हेचि रेणुकाचार्यांनी समूळ । विवरिले अगस्त्य मुनीजवळ । प्रतिपाद्य या ग्रंथाचे ।।१९।। लिंग पूज्य अंग पूजक । लिंग आराध्य अंग आराधक । लिंग साध्य अंग साधक । ऐसा संबंध दोहोंत ।।२०।। 'अंग'चि करिते भक्तरूपे । माहेश्वर-प्रसादिरूपे । प्राणलिंगि-शरण-ऐक्यरूपे । 'लिंग'तत्त्वाचे अर्चन ।।२१।। अर्चन करिता करिता जाण । 'अंग' 'लिंगा'त जाते

समरसून । यालाच 'लिंगांगसामरस्य' अभिधान । दिले वीरशैवाचार्यांनी ।।२२।। बिंदू सिंधूमाजी मिळे । आणि सिंधू होऊनि खेळे । तैसा भक्त साधनाबळे । होई शिवस्वरूप ।।२३।। जीवत्व सरूनि होणे शिव । याला कैवल्य मुक्ती नाव । जाणूनि घ्यावे हे तत्त्व । वीरशैवांचे पूर्णपणे ।।२४।। अंग-षट्स्थलांमधून । कथिला भक्ताचा विकासक्रम । भक्त-माहेश्वरादी स्थले पार करून । तो होतो ऐक्यस्थली ।।२५।। ऐक्यस्थली शिवसामरस्यप्राप्ती । होऊनि त्यासी लाभते मुक्ती । 'अंग' 'लिंग'रूप झाल्यावरती । तो कैसा वर्ततो ।।२६।। ज्ञानोत्तर स्थितीत जीवन्मुक्त । कसा बोलतो वागतो जगात । त्याची कथिली जीवनरीत । लिंगस्थलांमधूनी ।।२७।। रेणुकाचार्य अगस्तीस । करिती लिंग-स्थलोपदेश । स्थिर करूनिया मानस । अवधारावे श्रोत्यांनी ।।२८।।

## लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल

श्रीरेणुक उवाच-

षट्स्थलोक्तसदाचारसम्पन्नस्य यथाक्रमम् । लिंगस्थलानि कथ्यन्ते जीवन्मुक्तिपराणि च ।।१।।

रेणुकाचार्य शांत स्वरात । बोलती मुनी अगस्त्याप्रत । भक्तस्थलापासूनि ऐक्यस्थलापर्यंत । अंगस्थले विवरिली ।।२९।। भक्त करीत मनोविकास । कैसा पोचतो ऐक्यस्थलास । त्याचा सकल

**अध्यात्मप्रवास । तुजलागी कथियेला ।।३०।। अंगस्थलात कथिलेले । जो आचरितो सदाचार सगळे । त्या जीवन्मुक्ताची लिंगस्थले । आता क्रमाने सांगेन ।।३१।।**

अगस्त्य उवाच-

भक्ताद्यैक्यावसानानि षडुक्तानि स्थलानि च । लिंगस्थलानि कानीह कथ्यन्ते कति वा पुनः ।।२।।

**अगस्त्य म्हणती रेणुकांलागून । विवरिली अंगस्थले पूर्ण । आता लिंगस्थले मजलागून । कोणती किती ती सांगावी ।।३२।।**

श्रीरेणुक उवाच-

गुर्वादिज्ञानशून्यान्ता भक्तादिस्थलसंश्रिताः । स्थलभेदाः प्रकीर्त्यन्ते पंचाशत् सप्त चाधुना ।।३।।

आदौ नवस्थलानीह भक्तस्थलसमाश्रयात् । कथ्यन्ते गुणसारेण नामान्येषां पृथक् शृणु ।।४।।

**रेणुक म्हणती अगस्त्या ऐक । भक्तस्थलापासूनि ऐक्य-। स्थलापर्यंत षट्स्थले त्यात अनेक । उपस्थलेही असती ।।३३।। प्रथम दीक्षागुरुस्थल । अंतिम ज्ञानशून्यस्थल । भेद सत्तावन्न सकळ । असती लिंगस्थलाचे ।।३४।। लिंगस्थलातील भक्तस्थलात । नऊ उपस्थले असती ख्यात । नावे गुणानुसार स्थलांप्रत । सांगेन ती श्रवण करी ।।३५।।**

दीक्षागुरुस्थलं पूर्वं ततः शिक्षागुरुस्थलम् । प्रज्ञागुरुस्थलं चाथ क्रियालिंगस्थलं ततः ।।५।।

भावलिंगस्थलं चाथ ज्ञानलिंगस्थलं ततः । स्वयं परं चरं चेति तेषां लक्षणमुच्यते ।।६।।

**दीक्षागुरुस्थल शिक्षागुरुस्थल । प्रज्ञागुरुस्थल क्रियालिंगस्थल । भावलिंगस्थल ज्ञानलिंगस्थल । स्वयस्थल आणि परस्थल ।।३६।। चरस्थल हे नववे जाण । ऐसी नऊ स्थले एकूण । त्यांची लक्षणे सांगेन । अवधानपूर्वक ऐक तू ।।३७।।**

**दीक्षागुरुस्थल** - (४५)

दीयते परमं ज्ञानं क्षीयते पाशबन्धनम् । यया दीक्षेति सा तस्यां गुरुर्दीक्षागुरुः स्मृतः ।।७।।

गुणातीतं गुकारं च रूपातीतं रुकारकम् । गुणातीतमरूपं च यो दद्यात् स गुरुः स्मृतः ।।८।।

**जिच्यामुळे लाभे शिवज्ञान । गळे त्रिमलपाशबंधन । तिला 'दीक्षा' हे अभिधान । जी देती श्रीगुरू ।।३८।। दीक्षा-लिंग-शिवाचे ज्ञान । जो शिष्यांसी उपदेशी परिपूर्ण । त्यास दीक्षागुरू म्हणून । संबोधिती शास्त्रात ।।३९।। जीवाहृदयीचा अज्ञानांध:कार । जो उपदेशाने करी दूर । त्यासाठी करी दीक्षासंस्कार । देहावरी तो श्रीगुरू ।।४०।। गु म्हणजे गुणातीत । रू म्हणजे रूपातीत । शिवतत्त्व गुण-रूपरहित । त्याचे ज्ञान देई तो गुरू ।।४१।। द्विपाद पशू असे माणूस । त्यासी करूनि ज्ञानोपदेश ।**

**त्याच्या निवारूनि पशुत्वास । शिवत्व देई तो गुरू ।।४२।।**

आचिनोति च शास्त्रार्थानाचारे स्थापयत्यलम् । स्वयमाचरते यस्मादाचार्यस्तेन चोच्यते ।।९।।

षडध्वातीतयोगेन यतते यस्तु देशिकः । मायाब्धितारणोपायहेतुर्विश्वगुरुः शिवः ।।१०।।

अखण्डं येन चैतन्यं व्यज्यते सर्ववस्तुषु । आत्मयोगप्रभावेण स गुरुर्विश्वभासकः ।।११।।

**वीरशैवशास्त्रांचा रहस्यार्थ । जो सर्व करूनि संग्रहित । शिष्यांसी उपदेशी यथार्थ । तो जाणावा श्रीगुरू ।।४३।। स्वतः करी सदाचरण । तैसे शिष्यांकडूनि घेई करवून । स्वये आचरी परिपूर्ण । म्हणूनि श्रीगुरू आचार्य ।।४४।। वर्णादी सहा अध्वातीत । जो निरंतर शिवयोगरत । पार कराया मायासमुद्राप्रत । जो मार्ग दाखवितो ।।४५।। त्यासी म्हणती देशिक । तो सन्मार्गाचा दिग्दर्शक । आत्मदृष्टीने पाही विश्व एक । म्हणूनि तो विश्वगुरू ।।४६।। विश्वातील सर्व वस्तूंत । सच्चिदानंदरूपी चैतन्य व्याप्त । हे ज्ञान ज्यामुळे प्रकाशित । तो गुरू विश्वप्रकाशक ।।४७।। शिष्याचे दूर करी अज्ञान । म्हणूनि 'श्रीगुरू' त्यासी अभिधान । सदाचार बोधूनि करी आचरण । म्हणूनि असे 'आचार्य' ।।४८।। मुक्तिमार्गाचे करी दिग्दर्शन । म्हणूनि 'देशिक' तो पूर्ण । विश्वात पाही आत्मरूप म्हणून । म्हणती त्यास 'विश्वगुरू' ।।४९।। ऐसा श्रीगुरू उद्धारक । परममुक्तिप्रदायक । म्हणूनि**

**शिष्याने सात्त्विक-। भावे शरण त्यास जावे ।।५०।। जो कथिला दीक्षागुरू । तोचि होतो शिक्षागुरू । आता पुढे कथन करू । त्याच्या सर्व लक्षणांचे ।।५१।।**

## शिक्षागुरुस्थल - (४६)

दीक्षागुरुरसौ शिक्षाहेतुः शिष्यस्य बोधकः । प्रश्नोत्तरप्रवक्ता च शिक्षागुरुरितीर्यते ।।१२।।

बोधकोऽयं समाख्यातो बोध्यमेतदिति स्फुटम् । शिष्ये नियुज्यते येन स शिक्षागुरुरुच्यते ।।१३।।

**करावया शिष्यासी बोध । जो सर्वदा असे सिद्ध । शिष्याचा करी संशयच्छेद । तो जाणावा शिक्षागुरू ।।५२।। शिष्याने पुसिले प्रश्न । त्यांचे करी समाधान । देई सुसंस्कार अनुशासन । तो जाणावा शिक्षागुरू ।।५३।। जो असे दीक्षागुरू । तोचि होय शिक्षागुरू । त्याच्याठायी भिन्न भाव धरू । नये कदापि शिष्याने ।।५४।। तो शिवज्ञानाचा बोधक । परतत्त्वाचा प्रकाशक । आचारमार्गाचा निरूपक । म्हणूनि नाम शिक्षागुरू ।।५५।। बोध्य असे शिवज्ञान । त्याचा बोधक गुरू जाण । हे ज्ञान उपदेशी शिष्यालागून । म्हणूनि तो शिक्षागुरू ।।५६।।**

संसारतिमिरोन्माथिशरच्चन्द्रमरीचयः । वाचो यस्य प्रवर्तन्ते तमाचार्यं प्रचक्षते ।।१४।।

ददाति यः पतिज्ञानं जगन्मायानिवर्तकम् । अद्वैतवासनोपायं तमाचार्यवरं विदुः ।।१५।।

**शरदातील टिपूर चांदणे । ते शीतल प्रकाशाचे देणे । तैसी गुरूची अमृतवचने । सुखकर चंद्रकिरणासम ।।५७।। श्रीगुरूच्या उपदेशामुळे । संसारांध:कार दूर पळे । शिष्याचे चित्ताकाश उजळे । शिवज्ञानचंद्रिकेने ।।५८।। जो संसारतापाने पोळला । ज्याचा प्राण कंठी आला । गुरुवाणी करी तयाला । शांती शीतलता प्रदान ।।५९।। ऐसा श्रीगुरूचि जाण । आचार्य असे परिपूर्ण । देती भेदभ्रांतिनाशक पतिज्ञान । म्हणूनि ते आचार्य श्रेष्ठ ।।६०।।**

पूर्वपक्षं समादाय जगद्भेदविकल्पनम् । अद्वैतकृतसिद्धान्तो गुरुरेष गुणाधिकः ।।१६।।
सन्देहवनसन्दोहसमुच्छेदकुठारिका । यत्सूक्तिधारा विमला स गुरूणां शिखामणिः ।।१७।।

**भेदवादी विचार संदिग्ध । जे जीवासी करिती बद्ध । तो पूर्वपक्ष खंडूनि, सिद्ध । करी शिवाद्वैत जो ।।६१।। भेदबुद्धी करूनि नष्ट । करी शिवाद्वैत स्पष्ट । तो शिक्षागुरू सर्वश्रेष्ठ । नि:संशय मानावा ।।६२।। संसाराच्या निबिड वनात । गोंधळूनि जीव भ्रमे सतत । ते संसार-अरण्य छेदी क्षणात । निजवाचा-कुठाराने ।।६३।। नेत्रात गेले कुसळ । ते जैसे काढावे तत्काळ । तैसे संशयवन समूळ । छेदी शिष्य-मनातले ।।६४।। ज्याची संसारच्छेदक वाणी । तो गुरूंचा शोभे शिखामणी । शिष्यासी शिवज्ञान बोधूनी । नि:संदेह करी तो ।।६५।।**

यत्सूक्तिदर्पणाभोगे निर्मले दृश्यते सदा । मोक्षश्रीर्बिम्बरूपेण स गुरुर्भवतारकः ।।१८।।

शिष्याणां हृदयालेख्यं प्रद्योतयति यः स्वयम् । ज्ञानदीपिकयाऽनेन गुरुणा कः समो भवेत् ।।१९।।

परमाद्वैतविज्ञानपरमौषधिदानतः । संसाररोगनिर्माथी देशिकः केन लभ्यते ।।२०।।

**जैसे निर्मल दर्पणात । प्रतिबिंब दिसे बिंबवत् । तैसी ज्याच्या उपदेशात । मोक्षलक्ष्मी दिसे सदा ।।६६।। तो तारूनि संसारसागर । शिष्यासी नेई पैलपार । उघडे शिवसामरस्याचे द्वार । ऐसा भवतारक तो ।।६७।। शिष्यहृदयी निज स्वरूपचित्र स्थित । जो करी स्वज्ञानतेजे प्रकाशित । त्या शिक्षागुरूसी तुळे जगात । ऐसा कोण असेल? ।।६८।। देऊनि शिवज्ञान-रसायन । करी संसाररोग-निवारण । ऐसा देशिक लाभे ज्याला तो कोण । या जगती भाग्यवंत? ।।६९।। जो असे शिक्षागुरू । तोचि होतो ज्ञानगुरू । त्याचे रूप उभे करू । तुझ्या दृष्टीसामोरी ।।७०।।**

**ज्ञानगुरुस्थल** - (४७)

उपदेष्टोपदेशानां संशयच्छेदकारकः । सम्यग्ज्ञानप्रदः साक्षादेष ज्ञानगुरुः स्मृतः ।।२१।।

निरस्तविश्वसम्भेदं निर्विकारं चिदम्बरम् । साक्षात्करोति यो युक्त्या स ज्ञानगुरुरुच्यते ।।२२।।

**उपदेशी शिवज्ञान-रहस्यार्थ । शिष्यासी करी संदेहमुक्त । जो शिक्षागुरू तो शिवचि साक्षात ।**

**त्यास म्हणती ज्ञानगुरू ।।७१।। शिव विश्वरूपात झाला व्यक्त । तरी तो असे अविकृत । सुवर्ण न होता विकृत । जैसे होती अलंकार ।।७२।। सुवर्णाचे भूषण । जरी मोडिले केले नूतन । तरी ते राहे शुद्ध सुवर्ण । त्यात न ये विकार ।।७३।। दुधाचे दही-लोणी झाले । लोण्यापासूनि तूप केले । तरी दूध विकारी झाले । मूळरूपात उरेना ।।७४।। होऊनि जगद्रूपी साकार । शिवाठायी नाही विकार । चित्‌रूप आकाश त्याचे अंबर । म्हणूनि चिदंबर तो ।।७५।। अशा निर्विकार चिदंबर । शिवाचा घडवी जो साक्षात्कार । शास्त्रोक्त युक्ती बोधूनि थोर । तोचि जाण ज्ञानगुरू ।।७६।।**

कलंकवानसौ चन्द्रः क्षयवृद्धिपरिप्लुतः । निष्कलंकस्थितो ज्ञानचन्द्रमा निर्विकारवान् ।।२३।।

पार्श्वस्थतिमिरं हन्ति प्रदीपो मणिनिर्मितः । सर्वगामि तमो हन्ति बोधदीपो निरंकुशः ।।२४।।

**आकाशी प्रकाशे चंद्रमा । तो कलंकाने जहाला उणा । अमावस्या आणि पौर्णिमा । यांनी गेला पीडूनी ।।७७।। परि शिष्य-चिदाकाशात । जो ज्ञानचंद्र प्रकाशे सतत । तो असे निष्कलंक आणि मुक्त । क्षय-वृद्धीपासूनी ।।७८।। रत्नदीप जरी असेल । तो भोवतीचा अंधार नाशेल । परि ज्ञानदीप शिष्यहृदयातील । सर्व अंधार नाशितो ।।७९।। उजळता ज्ञानदिवा अंतरी । शिवतत्त्व दिसे सर्व चराचरी । अज्ञान-अंधारासी उरी । ठाव मिळेना किंचित ।।८०।।**

सर्वार्थसाधकज्ञानविशेषादेशतत्परः । ज्ञानाचार्यः समस्तानामनुग्रहकरः शिवः ।।२५।।

कटाक्षचन्द्रमा यस्य ज्ञानसागरवर्धनः । संसारतिमिरच्छेदी स गुरुर्ज्ञानपारगः ।।२६।।

**सर्वार्थसाधक शिवज्ञानविचार । विशेषरूपे जो उपदेशाया तत्पर । जो अनुग्रह करी मुमुक्षूंवर । तो ज्ञानगुरू शिवचि ।।८१।। ज्याच्या कृपाकटाक्षचंद्रामुळे । शिष्यज्ञानसागर उचंबळे । संसारांध:कार पूर्ण निवळे । तो गुरू ज्ञानपारंगत ।।८२।।**

बहिस्तिमिरविच्छेत्ता भानुरेष प्रकीर्तितः । बहिरन्तस्तमश्छेदी विभुर्देशिकभास्करः ।।२७।।

कटाक्षलेशमात्रेण विना ध्यानादिकल्पनम् । शिवत्वं भावयेद्यत्र स वेदः शाम्भवो मतः ।।२८।।

शिववेदकरे ज्ञाने दत्ते येन सुनिर्मले । जीवन्मुक्तो भवेच्छिष्यः स गुरुर्ज्ञानसागरः ।।२९।।

**आकाशातील भास्कर । नाशी सृष्टीतील अंधार । परि गुरुसूर्य करी दूर । अंतर्बाह्य काळोख ।।८३।। विश्व आणि शिव वेगळे । हे अज्ञान बाह्य जगातले । मी आणि शिव भिन्न हे मनातले । असे जाण अज्ञान ।।८४।। अंतर्बाह्य अज्ञान सगळे । गुरुसूर्य उगवता पळे । म्हणूनि ज्ञानगुरूसी मानिले । श्रेष्ठ जगी सूर्याहूनी ।।८५।। ध्यानधारणादी संकल्पावाचून । केवळ गुरुकृपा-कटाक्षेकरून । जे प्राप्त होते शिवज्ञान । ते ज्ञान शांभव ।।८६।। ज्याच्या निर्मल उपदेशेकरून ।**

**शिष्यासी लाभे शिवज्ञान । ज्याने होई शिष्यालागून । लाभ जीवन्मुक्तीचा ।।८७।। तो गुरू ज्ञानाचा सागर । साक्षात् शिवाचा अवतार । तो सहज मुक्तिदाता उदार । शिष्यवत्सल ज्ञानगुरू ।।८८।।**

**क्रियालिंगस्थल** - (४८)

गुरोर्विज्ञानयोगेन क्रिया यत्र विलीयते । तत्क्रियालिंगमाख्यातं सर्वैरागमपारगैः ।।३०।।

परानन्दचिदाकारं परब्रह्मैव केवलम् । लिंगं सद्रूपतापन्नं लक्ष्यते विश्वसिद्धये ।।३१।।

**गुरूच्या विशेष ज्ञानेकरून । जेथे क्रिया होते लीन । त्यासी 'क्रियालिंग' नाम पूर्ण । दिले आगमज्ञात्यांनी ।।८९।। वक्ष:स्थळावरी रूळते लिंग । ज्यासी म्हणती इष्टलिंग । त्याचेच नाव क्रियालिंग । सत्य जाण कुंभोद्भवा ।।९०।। इष्टलिंगपूजा नित्यकर्म जाण । ते करण्याचे वीरशैवांसी बंधन । शरीरी असेतो प्राण । आचरावे लागते ।।९१।। नित्यकर्म केल्यामुळे । जरी विशेष फळ न मिळे । जरी केले नाही तरी त्यामुळे । पाप लाभे निश्चित ।।९२।। इष्टलिंगपूजेने समस्त । क्रियांना होई पूर्णत्व प्राप्त । म्हणूनि इष्टलिंगचि निश्चित । जाण असे क्रियालिंग ।।९३।। क्रिया होती भक्ताकडून । त्या सफल करायासी जाण । क्रियालिंगरूप करी धारण । ज्ञानरूप ब्रह्म स्वये ।।९४।।**

लिंगमेव परं ज्योतिर्भवति ब्रह्म केवलम् । तस्मात् तत्पूजनादेव सर्वकर्मफलोदयः ।।३२।।

परित्यज्य क्रियाः सर्वा लिंगपूजैकतत्पराः । वर्तन्ते योगिनः सर्वे तस्माल्लिंगं विशिष्यते ।।३३।।

**परंज्योतिरूप परब्रह्म चिद्घन । तेचि क्रियालिंग जाण । सकल सत्कर्मांचे फल पूर्ण । लाभे पूजन केल्याने ।।९५।। सनकसानंदादी मुनी । सर्व योगसाधने त्यागूनी । रत झाले इष्टलिंगपूजनी । म्हणूनि लिंग सर्वश्रेष्ठ ।।९६।।**

यज्ञादयः क्रियाः सर्वा लिंगपूजांशसंमिताः । इति यत्पूज्यते सिद्धैस्तत्क्रियालिंगमुच्यते ।।३४।।

किं यज्ञैरग्निहोत्राद्यैः किं तपोभिश्च दुश्चरैः । लिंगार्चनरतिर्यस्य स सिद्धः सर्वकर्मसु ।।३५।।

ब्रह्मविष्ण्वादयः सर्वे विबुधा लिंगमाश्रिताः । सिद्धाः स्वस्वपदे भान्ति जगत्तन्त्राधिकारिणः ।।३६।।

**यज्ञयागादी क्रियाकर्म जाण । ते लिंगपूजेच्या अंशासमान । त्या क्रिया फलप्राप्ती पूर्ण । न देती ऐसे जाणूनी ।।९७।। त्या त्यागूनि सनकादी सिद्धमहर्षी । ज्यासी पुजिती अहर्निशी । जे सर्वफलप्रद त्यासी । संबोधिती क्रियालिंग ।।९८।। ज्यास लिंगार्चनी रती । त्याची कर्मे सिद्ध होती । सहज इष्टफलप्राप्ती । होऊनि तो सिद्ध होय ।।९९।। मग अग्निहोत्र घेणे । यज्ञ कठोर तपाचरणे । यांच्याशी त्याचे घेणे देणे । कशास ते असेल? ।।१००।। देव विष्णू विष्णुतनय । सृष्टिसृजनादी कार्य । घेऊनि इष्टलिंगाश्रय । करिती योग्य रीतीने ।।१०१।।**

**भावलिंगस्थल** - (४९)

क्रिया यथा लयं प्राप्ता तथा भावोऽपि लीयते । यत्र तद्देशिकैरुक्तं भावलिंगमिति स्फुटम् ।।३७।।

भावेन गृह्यते देवो भगवान् परमः शिवः । किं तेन क्रियते तस्य नित्यपूर्णो हि स स्मृतः ।।३८।।

**ज्यात क्रिया होती लीन । त्यास 'क्रियालिंग' अभिधान । तैसा भाव ज्यात विलीन । त्यास म्हणती 'भावलिंग' ।।१०२।। येथे प्राणलिंगासी भले । भावलिंग असे संबोधिले । भावलिंगास पुढे दिले । नाव ज्ञानलिंग असे ।।१०३।। म्हणूनि अगस्त्या घेई ध्यानी । जे भावलिंग या स्थानी । ते प्राणलिंग असे जाणूनी । घेई अवधानपूर्वक ।।१०४।। षड्गुणैश्वर्यमंडित शंकर । होय निर्मल भावनेसी गोचर । त्या नित्यपूर्णास काय साचार । प्रयोजन बाह्य क्रियांचे? ।।१०५।। ज्यासी जाणतो भावनेने । त्या सूक्ष्म तत्त्वासी स्पर्श करणे । बेल फुले अक्षता वाहणे । नसे शक्य कदापि ।।१०६।। म्हणूनि भावफुलांनी जाण । त्याचे करावे लागे अर्चन । बाह्य पूजाद्रव्यांचे प्रयोजन । येथे नसे कोणते ।।१०७।।**

अखण्डपरमानन्दबोधरूपः परः शिवः । भक्तानामुपचारेण भावयोगात् प्रसीदति ।।३९।।

मृच्छिलाविहिताल्लिंगाद्भावलिंगं विशिष्यते । निरस्तसर्वदोषत्वाद् ज्ञानमार्गप्रवेशनात् ।।४०।।

**अखंड परमानंदरूप । शिव श्रेष्ठ ज्ञानस्वरूप । भावपूजा करिता अमूप । प्रसन्न होतो**

**भक्तावरी ।।१०८।। मृत्तिका-पाषाणलिंगांहून । भावलिंग हे श्रेष्ठ जाण । मुक्त सर्वदोषांपासून । नेई ज्ञानमार्गात ।।१०९।। म्हणूनि प्राणलिंगार्चक भक्त । करिती इष्टलिंगपूजा संक्षेपात । आणि प्राणलिंगार्चनरत । अधिक काळ राहती ।।११०।।**

विहाय बाह्यलिंगानि चिल्लिंगं मनसि स्मरन् । पूजयेद् भावपुष्पैर्यो भावलिंगीति कथ्यते ।।४१।।

मूलाधारेऽथवा चित्ते भ्रूमध्ये वा सुनिर्मलम् । दीपाकारं यजन् लिंगं भावद्रव्यैः स योगवान् ।।४२।।

**स्थावरलिंगपूजा त्यागून । हृदयी चिद्रूप लिंग स्मरून । त्याचे भावफुलांनी करी पूजन । त्यास म्हणती भावलिंगी ।।१११।। मूलाधारचक्रात वा हृदयात । अथवा भ्रूकुटि-मध्यात । जो ज्योतिर्मय लिंग पूजी सदोदित । त्यासी म्हणावे शिवयोगी ।।११२।।**

स्वानुभूतिप्रमाणेन ज्योतिर्लिंगेन संयुतः । शिलामृद्दारुसंभूतं न लिंगं पूजयत्यसौ ।।४३।।

क्रियारूपा तु या पूजा सा ज्ञेया स्वल्पसंविदाम् । आन्तरा भावपूजा तु शिवस्य ज्ञानिनां मता ।।४४।।

**शिवयोगी स्वानुभूतिबळावर । होऊनि प्राणलिंगयुक्त तत्पर । शिला-मृत्तिका-काष्ठनिर्मित स्थावर-। लिंगपूजन न करी ।।११३।। शिवाचे क्रियारूप पूजन । ते करिति सामान्य जन । अंतरंगीचे शिवपूजन । ज्ञानी जनांचे मानिले ।।११४।। म्हणूनि क्रियालिंगपूजेहून । श्रेष्ठ असे भावलिंगपूजन । परि**

**वीरशैवांनी इष्टलिंगपूजन । त्यागू नये कदापि ।।११५।। 'क्रिया करिता वस्तुचि जऱ्ही जाला । तऱ्ही न त्यागिजे आचाराला । जरी आचार त्यागी तरी मोडला । भक्तिपंथ आपणेचि' ।।११६।। ऐसे शिवयोगी मन्मथस्वामींनी । सांगितले 'परमरहस्या'तूनी । हे घ्यावे वीरशैवांनी । पूर्ण ध्यानी आपुल्या ।।११७।। म्हणूनि वीरशैवांनी पूर्ण । ज्ञानोत्तरही करावे आचरण । ऐक्यस्थली झाला म्हणून । लिंगपूजन त्यागू नये ।।११८।।**

**ज्ञानलिंगस्थल** - (५०)

तद्भावज्ञापकज्ञानं लयं यत्र समश्नुते । तज्ज्ञानलिंगमाख्यातं शिवतत्त्वार्थकोविदैः ।।४५।।

त्रिमूर्तिभेदनिर्मुक्तं त्रिगुणातीतवैभवम् । ब्रह्म यद्बोध्यते तत्तु ज्ञानलिंगमुदाहृतम् ।।४६।।

**भावलिंगप्रकाशक ज्ञान । ज्याठायी लय पावते पूर्ण । त्यास ज्ञानलिंग म्हणती जाण । शिवतत्त्वार्थकोविद ।।११९।। विष्णू रुद्र विष्णुसुत । या त्रिमूर्तिभेदरहित । सत्त्व-रज-तमोगुणरहित । वैभवसंपन्न ब्रह्म जे ।।१२०।। त्याचे ज्यामुळे होते ज्ञान । तेचि ज्ञानलिंग जाण । जे ज्ञानाचे आश्रयस्थान । तृप्तिलिंगही नाव त्यासी ।।१२१।।**

स्थूले क्रियासमापत्तिः सूक्ष्मे भावस्य सम्भवः । स्थूलसूक्ष्मपदातीते ज्ञानमेव परात्मनि ।।४७।।

कल्पितानि हि रूपाणि स्थूलानि परमात्मनः । सूक्ष्माण्यपि च तैः किं वा परबोधं समाचरेत् ।।४८।।

**स्थूल इष्टलिंग पूजिणे । ते गंधपुष्पादी सामग्रीने । सूक्ष्म भावलिंग निर्मल मने । भावपुष्पांनी पूजावे ।।१२२।। स्थूल-सूक्ष्माच्या अतीत जे । अंतरी तृप्तिलिंग विराजे । त्याची ज्ञानानेच साजे । पूजा अगस्त्य मुनिवरा ।।१२३।। स्थूल आणि सूक्ष्म जाण । ही परशिवाची रूपे दोन । ती मायाकल्पित पूर्ण । मुमुक्षूसी न उपयुक्त ।।१२४।। म्हणूनि स्थूलसूक्ष्मातीत पूर्ण । त्या ज्ञानलिंगाचे उपासन । मुमुक्षूंनी करावे जाण । जे असे सर्वश्रेष्ठ ।।१२५।।**

परात्परं तु यद्ब्रह्म परमानन्दलक्षणम् । शिवाख्यं ज्ञायते येन ज्ञानलिंगीति कथ्यते ।।४९।।

बाह्यक्रियां परित्यज्य चिन्तामपि च मानसीम् । अखण्डज्ञानरूपत्वं यो भजेन्मुक्त एव सः ।।५०।।

**परात्पर आनंदलक्षण परम । जे शिवनामक परब्रह्म । ते जो जाणतो त्यासी नाम । असे ज्ञानलिंगी हे ।।१२६।। बाह्यक्रिया मानसध्यान त्यागून । जो अखंड ज्ञानलिंगाचे निदिध्यासन । करी तो खरा मुक्त पूर्ण । आहे ऐसे जाणावे ।।१२७।।**

**स्वयस्थल** - (५१)

तद्भावज्ञापकं ज्ञानं यत्र ज्ञाने लयं व्रजेत् । तद्भानेष समाख्यातः स्वाभिधानो मनीषिभिः ।।५१।।

स्वच्छन्दाचारसन्तुष्टो ज्योतिर्लिंगपरायणः । आत्मस्थसकलाकारः स्वाभिधो मुनिसत्तमः ।।५२।।

**भावलिंगासी करी प्रकाशित । ते ज्ञान लय पावे जेथ । त्या ज्ञानलिंगिस्थलीप्रत । स्वयस्थल संबोधिती ।।१२८।। तो स्वच्छंदाचारी संतुष्ट चित्त । सदा लीन अंतर्लिंगात । आत्मरूप पाहे जगतात । स्वयनामक मुनिश्रेष्ठ ।।१२९।। मनी आले तरीच बोले । नातरी मौनातचि डोले । हसे नाचे कधी खेळे । जसे बाळ निरागस ।।१३०।।**

निर्ममो निरहंकारो निरस्तक्लेशपंचकः । भिक्षाशी समबुद्धिश्च मुक्तप्रायो मुनिर्भवेत् ।।५३।।

यदृच्छालाभसन्तुष्टो भस्मनिष्ठो जितेन्द्रियः । समवृत्तिर्भवेद्योगी भिक्षुके वा नृपेऽथवा ।।५४।।

**नाही ममत्व नाही मीपण । नाही शरीराचेही भान । तेथे दारा-गृह-वित्ताचा जाण । कोण करील विचार? ।।१३१।। अविद्यादी क्लेश किंचित । नच स्पर्शिती त्याचे चित्त । भिक्षा मिळे तरी तृप्त । नातरी तृप्तचि अंतरी ।।१३२।। विश्व असे काही वेगळे । असे हे दृष्टीसच नातळे । जे सहज काहीतरी मिळे । त्यावरी सदा संतुष्ट ।।१३३।। भस्मधारण भस्मोद्धूलन । यावरी निष्ठा परिपूर्ण । जितेंद्रिय तो करी समत्व वर्तन । राजा असो वा रंकाशी ।।१३४।।**

पश्यन् सर्वाणि भूतानि संसारस्थानि सर्वशः । स्मयमानः परानन्दे लीनात्मा वर्तते सुधीः ।।५५।।

ध्यानं शैवं तथा ज्ञानं भिक्षा चैकान्तशीलता । यतेश्चत्वारि कर्माणि न पंचममिहेष्यते ।।५६।।

**प्राणिमात्र या विश्वात । रमती संसारसुखात । भ्रमती जन्ममरणचक्रात । पाहूनि विस्मित तो अंतरी ।।१३५।। स्वये परमानंदी लीन । अंतर्मुख वृत्ती पूर्ण । बाह्य जगाचे नाही भान । ऐसा ज्ञानी स्वयस्थली ।।१३६।। शिवज्ञान-ध्यानाची आवड । एकांतवासाची असे ओढ । लागे भिक्षान्नचि गोड । याविण अन्य नलगे ।।१३७।। ऐसा आत्मतृप्त चरस्थली । त्याची लक्षणे विवरिली । त्याचीच मन:स्थिती पुढली । सांगेन ऐक एकचित्ते ।।१३८।।**

**चरस्थल** - (५२)

स्वरूपज्ञानसम्पन्नो ध्वस्ताहंममताकृतिः । स्वयमेव स्वयं भूत्वा चरतीति चराभिधः ।।५७।।

कामक्रोधादिनिर्मुक्तः शान्तिदान्तिसमन्वितः । समबुद्ध्या चरेद् योगी सर्वत्र शिवबुद्धिमान् ।।५८।।

**अहंता ममता झाल्या ध्वस्त । जो स्वस्वरूपज्ञानाने युक्त । ऐसा तो स्वयस्थली नित्य भ्रमत । त्यासी शोभे 'चर' नाम ।।१३९।। पाण्याने सतत वाहावे । साधूने सदैव चालावे । तरीच ते दोघे स्वभावे । परिशुद्ध राहती ।।१४०।। जो आत्मानंदी निमग्न । तो चक्रवर्ती सार्वभौम पूर्ण । चालेना कोणाचे शासन । त्याच्यावरी किंचित ।।१४१।। तैसा चरस्थली मुक्त चाले । जिकडे त्याची दृष्टी वळे । तिकडे चालती पावले । दाही दिशा धुंडाळीत ।।१४२।। कामक्रोधांपासूनि मुक्त । शांती-दांती**

**दशगुणयुक्त । त्रैलोक्य पाहात शिवस्वरूपात । अखंड करी संचार ।।१४३।।**

इदं मुख्यमिदं हीनमिति चिन्तामकल्पयन् । सर्वत्र संचरेद् योगी सर्वं ब्रह्मेति भावयन् ।।५९।।

न सम्मानेषु सम्प्रीतिं नावमानेषु च व्यथाम् । कुर्वाणः संचरेद्योगी कूटस्थे स्वात्मनि स्थितः ।।६०।।

**हे श्रेष्ठ हे कनिष्ठ होत । असा विचार न ये मनात । ब्रह्ममय विश्व समस्त । मानूनि सर्वत्र संचरे ।।१४४।। कोणी करिता सन्मान । गर्वे न जाय उतून । जहाला कोठे अपमान । तरी खिन्न न होय तो ।।१४५।। सदा सर्वदा समचित्त । स्थिर कूटस्थ आत्म्यात । सहज सर्वत्र भ्रमत । मंद पवनासारखा ।।१४६।।**

अप्राकृतैर्गुणैः स्वीयैः सर्वं विस्मापयन् जनम् । अद्वैतपरमानन्दमुदितो देहिवच्चरेत् ।।६१।।

न प्रपंचे निजे देहे न धर्मे न च दुष्कृते । गतवैषम्यधीर्धीरो यतिश्चरति देहिवत् ।।६२।।

प्राकृतैश्वर्यसम्पत्तिपराङ्मुखमनस्थितिः । चिदानन्दनिजात्मस्थो मोदते मुनिपुंगवः ।।६३।।

**त्याचे अलौकिक गुण । पाहूनि स्तिमित होती जन । तो परमानंदात निमग्न । दिसे सामान्य जनासम ।।१४७।। चित्ती नसेचि वैषम्य । धर्माधर्मी दिसे साम्य । पाप असो की पुण्य । धनी न होय कदापि ।।१४८।। ब्रह्मा-विष्णूंच्या प्राकृतिक । ऐश्वर्यापासूनि तो विमुख । चिदानंदरूपी आत्म्यात देख । रमलेला मुनिश्रेष्ठ ।।१४९।। असूनि आत्मरूपी स्थिर । जनांसी बोधाया शिवविचार । तो सर्वत्र करी संचार । म्हणूनि 'चर' नाम त्यासी ।।१५०।। हाचि ज्ञानी चरस्थली । पुढती जाई परस्थली ।**

**त्याची लक्षणे मी सगळी । निरूपीन ऐक तू ।।१५१।।**

**परस्थल** - (५३)

स्वयमेव स्वयं भूत्वा चरतः स्वस्वरूपतः । परं नास्तीति बोधस्य परत्वमभिधीयते ।।६४।।

स्वतन्त्रः सर्वकृत्येषु स्वं परत्वेन भावितः । तृणीकुर्वन् जगज्जालं वर्तते शिवयोगिराट् ।।६५।।

**स्वये स्वस्वरूप जाणून । जो विचरे स्वयंसिद्ध होऊन । अन्य नसे स्वस्वरूपाहून । हे जाणे तो परस्थली ।।१५२।। पर म्हणजे दुसरा जाण । जगी पर नाही माझ्याहून । हे दृढ ज्याच्याठायी ज्ञान । तो परस्थली जाणावा ।।१५३।। आपण विश्वाधिक शिवतत्त्व । जाणे सर्वकार्यस्वतंत्र स्वयमेव । संसार मानितो तृणवत् हेय । तो असे शिवयोगीश्वर ।।१५४।। असे वर्तावे न वर्तावे त्यास । शास्त्रे न देऊ शकती आदेश । तो वर्ते जे येई मनास । सर्व कर्मी स्वतंत्र ।।१५५।।**

वर्णाश्रमसमाचारमार्गनिष्ठापराङ्मुखः । सर्वोत्कृष्टं स्वमात्मानं पश्यन् योगी तु मोदते ।।६६।।

विश्वातीतं परं ब्रह्म शिवाख्यं चित्स्वरूपकम् । तदेवाहमिति ज्ञानी सर्वोत्कृष्टः स उच्यते ।।६७।।

अचलं ध्रुवमात्मानमनुपश्यन्निरन्तरम् । निरस्तविश्वविभ्रान्तिर्जीवन्मुक्तो भवेन्मुनिः ।।६८।।

**त्याने वर्णाश्रमांचे पालन । करावे ऐसे नसे बंधन । सर्वोत्कृष्ट आत्मरूप न्याहाळून । तो आनंदी सर्वदा ।।१५६।। विश्वातीत चिद्रूप ब्रह्म निरंजन । ते मीच ऐसे स्थिर ज्ञान । ज्या ज्ञानयोग्याठायी**

**जाण । तो असे सर्वोत्कृष्ट ।।१५७।। अविचल आणि शाश्वत । आत्मरूप पाहे आपणात । मनातूनि विश्वकल्पना भ्रांत । नष्ट झाली सर्वस्वी ।।१५८।। तो देहाने जरी जिवंत । तरी आचरे होऊनि जीवन्मुक्त । पुनर्भवाचे कारण किंचित् । नसे त्यासी घटोद्भवा ।।१५९।।**

ब्रह्माद्याः किं नु कुर्वन्ति देवताः कर्ममार्गगाः । कर्मातीतपदस्थस्य स्वयं ब्रह्मस्वरूपिणः ।।६९।।

स्वेच्छया संचरेद्योगी विमुंचन् देहमानिताम् । दर्शनैः स्पर्शनैः सर्वानज्ञानपि विमोचयेत् ।।७०।।

**सर्व कर्मांचे सकळ । ब्रह्मादी देवता देती फळ । जो कर्मातीत स्थितीत अचल । जो ब्रह्मरूप शिवयोगी ।।१६०।। त्याने कर्म केले काही । त्याचे फल न देती पाही । त्याचे अहित काहीही । करू न शकती देवता ।।१६१।। त्यागूनि देहाभिमान समस्त । तो स्वच्छंद विचरे जगात । दर्शने स्पर्शने अज्ञ जनांप्रत । देई श्रेष्ठ मुक्तिपद ।।१६२।। चरस्थली हे पावन क्षेत्र । त्याचे ज्ञानामृत हे तीर्थ पवित्र । त्याच्या सत्संगाने सर्वत्र । मुक्त होती अज्ञ जीव ।।१६३।।**

नित्ये निर्मलभावने निरुपमे निर्धूतविश्वभ्रमे
सत्तानन्दचिदात्मके परशिवे साम्यं गतः संयमी ।
प्रध्वस्ताश्रमवर्णधर्मनिगलः स्वच्छन्दसंचारवान्
देहीवाद्भुतवैभवो विजयते जीवन्विमुक्तः सुधीः ।।७१।।

**नित्य निर्मल निरुपम । विश्वभ्रमरहित सच्चिदानंद ब्रह्म । त्याशी सामरस्य पावूनि वर्णाश्रम-। शृंखला तो तोडितो ।।१६४।। मानवरूपे जीवन्मुक्त । विचरे सर्व विश्वात । अलौकिक वैभवाने युक्त । होऊनि होतो विजयी ।।१६५।। जाणे शिवतत्त्व म्हणून स्वयस्थली । भ्रमण करी म्हणूनि चरस्थली । जीवाचे अज्ञान दूर करी परस्थली । अशा तीन अवस्था ।।१६६।। लिंग-षट्स्थलांतील भक्तस्थल । त्याचे विवरण केले समूळ । आता सांगेन माहेश्वरस्थल । ते घ्यावे जाणूनी ।।१६७।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१६८।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । पंचदशोऽध्याय पूर्ण हा ।।१६९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतभक्तस्थले दीक्षागुरुस्थलादिनवविधस्थलप्रसंगो नाम पंचदशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय सोळावा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु विश्वकर्ण शिवाचार्याय नमः ।। ॐ शिवाय नमः सूक्ष्मतनवे । अहिर्बुध्न्याय नमः जगद्‌गुरवे । दिगंबराय नमः स्थाणवे । सात्त्विकाय नमः अष्टमूर्तये ।।१।। श्रोतेहो मागील अध्यायात । लिंगस्थलांतर्गत । भक्तस्थलातील उपस्थले समस्त । निरूपिली सविस्तर ।।२।। आता लिंगस्थलातील । बोधितील माहेश्वरस्थल । जगद्‌गुरू रेणुकाचार्य प्रेमळ । मुनिवर्य अगस्त्यासी ।।३।।**

## लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल

अगस्त्य उवाच-

स्थलानां नवकं प्रोक्तं भक्तस्थलसमाश्रयम् । माहेश्वरस्थले सिद्धं स्थलभेदं वदस्व मे ।।१।।

**रेणुकांसी म्हणति मुनिवर । भक्तस्थल निरूपिले सविस्तर । लिंगस्थलातील माहेश्वर-। स्थलभेद आता निरूपावे ।।४।।**

श्रीरेणुक उवाच-

माहेश्वरस्थले सन्ति स्थलानि नव तापस । क्रियागमस्थलं पूर्वं ततो भावागमस्थलम् ।।२।।

ज्ञानागमस्थलं चाथ सकायस्थलमीरितम् । ततोऽकायस्थलं प्रोक्तं परकायस्थलं ततः ।।३।।

धर्माचारस्थलं चाथ भावाचारस्थलं ततः । ज्ञानाचारस्थलं चेति क्रमादेषां भिदोच्यते ।।४।।

**रेणुक सांगती अगस्त्याप्रत । नऊ उपस्थले माहेश्वरस्थलात । ती अवधारूनिया विस्तृत । करावे आचरण तैसेचि ।।५।। क्रियागमस्थल भावागमस्थल । ज्ञानागमस्थल सकायस्थल । अकायस्थल परकायस्थल । धर्माचारस्थल सातवे ।।६।। आठवे भावाचारस्थल । नववे ज्ञानाचारस्थल । करीन या उपस्थलांतील । आता विशद आशय ।।७।।**

**क्रियागमस्थल** - (५४)

शिवो हि परमः साक्षात् पूजा तस्य क्रियोच्यते । तत्परा आगमा यस्मात् तदुक्तोऽयं क्रियागमः ।।५।।

प्रकाशते यथा नाग्निररण्यां मथनं विना । क्रियां विना तथान्तस्थो न प्रकाशो भवेच्छिवः ।।६।।

**शिवस्वरूप परस्थलीकडून । जे घडते पूजाकर्म आचरण । त्यासीच 'क्रिया' म्हणती जाण । सर्वागमपंडित ।।८।। ज्ञानी पुरुषाच्या क्रिया ग्रथित । केल्या असती ज्या शास्त्रात । त्यास 'क्रियागम' समस्त । म्हणती शास्त्रकोविद ।।९।। अरणी-काष्ठात अग्नी सुप्त । तो मंथन करिता होई व्यक्त । तैसा शिव असे लिंगात । तो प्रकटे क्रियेमुळे ।।१०।। जो मनुष्य क्रियाहीन । कधीच न करी पूजा-चिंतन ।**

त्यासी कैसे शिवदर्शन । घडेल सांग अगस्त्या? ।।११।। गाठायाचे असेल गाव । तरी वाटेवरी घ्यावी लागे धाव । स्वग्रामाची न ओलांडी शीव । तो कैसा पोचेल? ।।१२।। व्हावया शिवसाक्षात्कार । पूजा-चिंतनी व्हावे तत्पर । क्रमाक्रमाने उजळूनि अंतर । भेटेल शिवपरमात्मा ।।१३।।

न यथा विधिलोपः स्याद्यथा देवः प्रसीदति । यथागमः प्रमाणं स्यात्तथा कर्म समाचरेत् ।।७।।

विधिः शिवनियोगोऽयं यस्माद्विहितकर्मणि । शिवाराधनबुद्ध्यैव निरतः स्याद्विचक्षणः ।।८।।

न लोपता विधिविधान । ज्यासी असे आगम प्रमाण । जेणे शिव होई प्रसन्न । ऐसी कर्मे आचरावी ।।१४।। जरी झाला जीवन्मुक्त । तरी राहावे लागे लोकांत । त्याचा आचार पाहूनि समस्त । लोक तैसेचि वर्तती ।।१५।। म्हणूनि जीवन्मुक्तालागून । जरी नसे कर्मबंधन । तरी लोकांसी लावाया वळण । त्याने शास्त्रोक्त वर्तावे ।।१६।। विधी म्हणजे शिवाज्ञा पूर्ण । त्यानुसारचि करावे पूजन । विधी न पाळिता क्रम जाण । पूजनाचा बिघडतो ।।१७।। आधी भस्म बेलफुले । वाहूनि इष्टलिंग पूजिले । मग त्यावरी जल घातले । तरी चुकले विधान ।।१८।। कर्माचरणी नसेल मन । वाटेल तैसे केले पूजन । तरी शिव होई अप्रसन्न । मनही होई तैसेच ।।१९।। म्हणूनि शास्त्रोक्त विधिपूर्वक । लिंगपूजन करावे देख । त्यात करू नये चूक । भक्ताने वा जीवन्मुक्ताने ।।२०।। विहित कर्म लिंगपूजन । ती

**प्रत्यक्ष शिवाज्ञाच जाण । तिचे करिता उल्लंघन । नरकप्राप्ती निश्चित ।।२१।। शिवाराधनबुद्धीने निरंतर । लिंगपूजनी असावे तत्पर । ज्या करांनी शिवपूजा घडे ते कर । पवित्र असती जाणावे ।।२२।। त्या करांनी जे घडे कार्य । ते पवित्र असे शिवकार्य । त्या करांनी कल्याणचि सर्व । जीवांचे जाण घडेल ।।२३।।**

गुरोरादेशमासाद्य पूजयेत् परमेश्वरम् । पूजिते परमेशाने पूजिताः सर्वदेवताः ।।९।।
सदा शिवार्चनोपायसामग्रीव्यग्रमानसः । शिवयोगरतो योगी मुच्यते नात्र संशयः ।।१०।।

**गुरूपदेशाप्रमाणे । नित्य शिवाची पूजा करणे । जो एका शिवास पूजितो त्याने । सर्व देवांसी पूजिले ।।२४।। 'लिंगमध्ये जगत्सर्वम्' । ऐसे सांगती शिवागम । विष्णू लक्ष्मी आदी देवता परम । असती शिवाठायीच ।।२५।। म्हणूनि पूजिता एक शिव । त्याने पूजिले सर्व देव । करू नये धावाधाव । पुजाया अन्य देवांसी ।।२६।। नित्य शिवपूजा करणे । लागती फूल बेलपाने । त्यासाठी पूजाद्रव्ये मेळविणे । यात व्यग्र शिवयोगी ।।२७।। शिवयोगसमाधीत । जो निरंतर असे रत । तो शिवयोगी नित्यमुक्त । सत्य जाण अगस्त्या ।।२८।।**

अंधपंगुवदन्योन्यसापेक्षे ज्ञानकर्मणी । फलोत्पत्तौ विरक्तस्य तस्मात्तद्द्वयमाचरेत् ।।११।।

ज्ञाने सिद्धेऽपि विदुषां कर्मापि विनियुज्यते । फलाभिसन्धिरहितं तस्मात् कर्म न सन्त्यजेत् ।।१२।।

**कर्म अंध ज्ञानाविण । कर्माविण पंगू ज्ञान । दोन्ही असती अवलंबून । परस्परांवरती ते ।।२९।। म्हणूनि ज्ञानी झाला पूर्ण । तरी त्यागू नये कर्म जाण । ज्ञान आणि कर्म दोन । असती मुक्ति-साधने ।।३०।। फलापेक्षा न ठेवता किंचित । कर्मे आचरावी समस्त । ज्ञान-कर्मसमन्वयाने मुक्त । होई योगी नि:संशय ।।३१।। जरी ज्ञानसिद्धी झाली । तरी कर्मे पाहिजे केली । फलापेक्षेविण सगळी । मात्र असावी लागती ।।३२।। करावया आकाशी उड्डाण । पक्ष्यासी लागती पंख दोन । तैसे कर्म आणि ज्ञान । लागती मुक्तीसाठी ते ।।३३।। वडीलधारे जे जे करिती । त्यासचि लोक धर्म म्हणती । ज्ञानी वागतो तैसे वर्तती । त्याकडे पाहूनि जनलोक ।।३४।। जरी ज्ञानी करी पूजात्याग । लोक तैसेचि वर्ततील मग । कंठीचे लिंग काढूनि भोग । भोगाया मुक्त होतील ।।३५।। जैसा शाळेतील शिक्षक । गिरवी मुळाक्षरे सुरेख । त्यासी नसे आवश्यक । स्वत:साठी गिरविणे ।।३६।। मुलांना शिकविण्या-साठी । तो रेखितो अक्षरे गोमटी । तैसे ज्ञानी पुरुषाने अज्ञांसाठी । कर्माचरण करावे ।।३७।। आणखीही सांगतो ऐक । लिंगदीक्षा घेतेवेळी देख । 'लिंगपूजाक्रम चोख । आमरण तू आचरी' ।।३८।। ऐसी गुरूने केली आज्ञा । आणि शिष्याने केली प्रतिज्ञा । लाभली मुक्ती तरी गुर्वाज्ञा । कैसी मोडूनि**

**चालेल? ॥३९॥ जोवरी आले नाही मरण । तोवरी करणे लिंगपूजन । म्हणूनि ज्ञानी पुरुषाने कर्माचरण । सोडू नये कदापि ॥४०॥**

आचार एव सर्वेषामलंकाराय कल्प्यते । आचारहीनः पुरुषो लोके भवति निन्दितः ॥१३॥
ज्ञानेनाचारयुक्तेन प्रसीदति महेश्वरः । तस्मादाचारवान् ज्ञानी भवेदादेहपातनम् ॥१४॥

**आचार हा अलंकार । त्याने जीवन होई सुंदर । जैसे सुवर्णभूषणे शरीर । सुशोभित होतसे ॥४१॥ सजविला स्थूल देह किती । मनात मात्र धूळ-माती । तरी निंदनीय अती । देह नटवा जाणावा ॥४२॥ शरीरी सुवर्णाचे भूषण । आणि चिंती जनांचे अकल्याण । तरी तो देह शोभायमान । नसे किंचित् अगस्त्या ॥४३॥ शिवासी नावडे अवडंबर । त्यासी प्रिय सदाचार । तेचि खरे अलंकार । असती शिवभक्ताचे ॥४४॥ जो नर दुराचाररत । तो निंदनीय सर्व जगात । म्हणूनि सदाचारयुक्त । असावे सर्व लोकांनी ॥४५॥ जो पाळी ज्ञानयुक्त आचार । त्यावरी प्रसन्न होई महेश्वर । ज्ञानी पुरुषाने मृत्यू येईतोवर । असावे सदाचाररत ॥४६॥**

**भावागमस्थल** - (५५)

भावचिन्हानि विदुषो यानि सन्ति विरागिणः । तानि भावागमत्वेन वर्तन्ते सर्वदेहिनाम् ॥१५॥

शिवोऽहमिति भावोऽपि शिवतापत्तिकारणम् । न ज्ञानमात्रं नाचारो भावयुक्तः शिवो भवेत् ।।१६।।

**असे जो युक्त वैराग्याने । त्या शिवयोग्याची जी भावलक्षणे । ती प्राकृत लोकांकारणे । ठरती दिशादर्शक ।।४७।। त्यांचे करावे अनुकरण । ऐसे जे भावरूप शास्त्र जाण । त्यालाचि नाव भावागम-। स्थल असे अगस्त्या ।।४८।। शिवयोग्याची मन:स्थिती । तिला 'भाव' ऐसे म्हणती । शिवाठायीच सदैव ती । असे लीन संपूर्ण ।।४९।। ज्ञानयुक्त आचाराने केवळ । शिवप्राप्तीचे न मिळे फळ । त्यास्तव शिवत्वभावनेचे बळ । असावेचि लागते ।।५०।। दृढ होता शिवोऽहंभाव । लाभे शिवसामरस्यवैभव । ज्ञानयुक्त सदाचारासह । भावना हवी संगतीला ।।५१।। निगूढ खोल शिवालयी । प्रणवघोष निनादत राही । तैसी अंतर्बाह्य देही । घुमे शिवोऽहंभावना ।।५२।। ती शिवत्वप्राप्तीचे कारण । केवळ नसे कर्म ज्ञान । ज्ञान-कर्म-भाव मिळून । ठरती मुक्तिसाधने ।।५३।।**

ज्ञानं वस्तुपरिच्छेदो ध्यानं तद्भावकारणम् । तस्माद् ज्ञाते महादेवे ध्यानयुक्तो भवेत्सुधीः ।।१७।।

अन्तर्बहिश्च सर्वत्र परिपूर्णं महेश्वरम् । भावयेत् परमानन्दलब्धये पण्डितोत्तमः ।।१८।।

**जाणणे वस्तुरूप यथार्थ । यासी 'ज्ञान' म्हणती पंडित । वस्तूचे तदाकारे चिंतन सतत । यास 'ध्यान' संबोधिती ।।५४।। शिव सत्-चित्-आनंदस्वरूप । ऐसे शास्त्रे वर्णिती रूप । या केवळ ज्ञानाने**

**शिवरूप । होत नाही साधक ।।५५।। जरी झाले स्वरूपज्ञान । तरी अंतरी नाही तादात्म्य पूर्ण । म्हणूनि ते ठरे जाण । शब्दज्ञान निरर्थक ।।५६।। भाकरीचे स्वरूप दिसे स्पष्ट । ती भक्षिता भरते पोट । हे केवळ जाणूनि तुष्ट । जगी कोण होईल? ।।५७।। ती गेल्यावरी उदरात । तरीच होईल पूर्ण तृप्त । तैसा शिवोऽहंभावे निश्चित । शिवानंद लाभेल ।।५८।। म्हणूनि शिवशास्त्रात जो पंडित । त्याने परमानंद कराया प्राप्त । शिव व्यापूनि राहिला जगतात । या भावे ध्यान करावे ।।५९।। घडा गंगाजली बुडाला । तो अंतर्बाह्य जलेचि व्यापिला । तैसा आतबाहेरी जगाला । शिव राहिला व्यापूनी ।।६०।। तोच सुरूप तोच कुरूप । तोच दुःख आनंदरूप । तोच देह आत्मरूप । आत आणि बाहेरी ।।६१।। तोच द्वेष तोच राग । भोग तोच तोच योग । तोच जन्म मृत्युयोग । तोच सर्व शुभाशुभ ।।६२।। तोच राम रावण तोच । तोच कृष्ण कंस तोच । तोच भक्त देव तोच । तोच तोच सर्वत्र ।।६३।। ऐसा व्यापिला जगी समस्त । तो शिव मीच सर्वगत । या भावनेने होऊनि युक्त । सर्वदा ध्यान करावे ।।६४।।**

अर्थहीना यथा वाणी पतिहीना यथा सती । श्रुतिहीना यथा बुद्धिर्भावहीना तथा क्रिया ।।१९।।

चक्षुर्हीनो यथा रूपं न किंचिद्वीक्षितुं क्षमः । भावहीनस्तथा योगी न शिवं द्रष्टुमीश्वरः ।।२०।।

**जैसे बोलणे अर्थहीन । किंवा सती राहे पतीविण । बुद्धी वेदज्ञानशून्य । हे असे अयोग्य ।।६५।। तैसी**

**भावहीन क्रिया । जाण गेली गेली वाया । त्यासी लाभेना मुनिवर्या । सत्कर्माचे फलही ।।६६।। जरी केले अन्नदान । त्यात नसेल भाव पूर्ण । तरी न केल्यातचि जाण । ते गणले जाईल ।।६७।। देवळाबाहेरी भिक्षुक । जरी मागे नाणे एक । ते क्रोधाने देता देख । गेले दानकर्म व्यर्थ ।।६८।। बाहेरी पाहता दिसे दान । परि ते पापकर्मचि जाण । दात्यास न लाभे पुण्यकण । लाभे मात्र पापचि ।।६९।। मन:पूर्वक नाही केले । तरी ते सर्व व्यर्थचि गेले । म्हणूनि भावनेच्या बळे । आकळावा भगवंत ।।७०।। रूप पाहाया किंचित। नेत्रहीन नसे समर्थ । तैसा भावहीन योगी असमर्थ । शिवदर्शन करावया ।।७१।।**

भावशुद्धेन मनसा पूजयेत्परमेष्ठिनम् । भावहीनां न गृह्णाति पूजां सुमहतीमपि ।।२१।।

नैरन्तर्येण सम्पन्ने भावे ध्यातुं शिवं प्रति । तद्भावो जायते यद्वत् क्रिमेः कीटस्य चिन्तनात् ।।२२।।

निष्कलंकं निराकारं परब्रह्म शिवाभिधम् । निर्ध्यातुमसमर्थोऽपि तद्विभूतिं विभावयेत् ।।२३।।

**ज्याचे भावशुद्ध मन । त्याचे सफल होई शिवपूजन । त्याने अर्पिले जल पर्ण । तरी तुष्टे शंकर ।।७२।। त्याला हवा शुद्ध भाव । नको रेशीमवस्त्रे धनैश्वर्य । जो दाखवी पूजेचे वैभव । ती अमान्य करी पूजा ।।७३।। शुद्धभावे वाहिली माती । ती प्रिय होते शिवाप्रती । भावशून्य मने वाहिले मोती । तरी त्यासी अप्रिय ।।७४।। ज्याने विश्व केले निर्माण । त्यासी काय करावे अर्पण । जे मूर्ख तेचि**

**प्रदर्शन । करिती धन अर्पिण्याचे ।।७५।। भस्म त्याचे त्याचे जळ । फुले त्याची त्याचा बेल । पूजाद्रव्ये संपत्ती सकळ । ब्रह्मांड अवघे तयाचे ।।७६।। मग त्याला काय अर्पावे । त्याचे त्यालाच लागे द्यावे । वस्तूत भाव घालूनि करावे । त्याचे त्याला अर्पण ।।७७।। वस्तू त्याची आपुला भाव । देता तुष्टे सदाशिव । भावशून्य मने अर्पिले वैभव । तरी न होय संतुष्ट ।।७८।। भ्रमरध्यान निरंतर । करिता कीटक होई भ्रमर । तैसा भक्त होई शंकर । त्याच्या सतत ध्यानाने ।।७९।। ज्याला व्हावयाचे विशाल । त्याने शिव चिंतावा सर्वकाळ । व्यक्तित्व पालटणे सकळ । हे सामर्थ्य ध्यानात ।।८०।। आनंदरूप शिव जाण । त्याचे करिता सदैव चिंतन । आनंदसागरी परिपूर्ण । भक्त डुंबत राहतो ।।८१।। मग संसारदुःखाचा लेश । नच स्पर्शे त्याच्या मनास । ऐसे ध्यानमाहात्म्य विशेष । ध्यानी घेई अगस्त्या ।।८२।। निष्कलंक निराकार । परब्रह्म शिवशंकर । त्याच्या स्वरूपध्यानासी जो नर । असमर्थ असेल ।।८३।। त्याने सर्वज्ञादी ऐश्वर्ययुक्त । सगुण शिवरूपाचे सदोदित । ध्यान करावे भावयुक्त । तरी लाभेल सत्य शिव ।।८४।।**

### ज्ञानागमस्थल – (५६)

परस्य ज्ञानचिन्हानि यानि सन्ति शरीरिणाम् । तानि ज्ञानागमत्वेन प्रवर्तन्ते विमुक्तये ।।२४।।

भावेन किं फलं पुंसां कर्मणा वा किमिष्यते । भावकर्मसमायुक्तं ज्ञानमेव विमुक्तिदम् ।।२५।।

**भावागमसंपन्न शिवयोग्यास । ज्ञानागमस्थल हे नाव विशेष । त्याची ज्ञानचिन्हे सामान्यांस । सद्गतिप्रद शास्त्रागम ।।८५।। केवळ भाव वा कर्माने । शिवप्राप्ती नाही होणे । जे ज्ञान असे युक्त भाव-कर्माने । ते ठरे मुक्तिसाधन ।।८६।। कर्म भाव आणि ज्ञान । यांच्या समन्वयाने पूर्ण । भक्तासी होई प्राप्त जाण । अखंड शिवसामरस्य ।।८७।। भावयुक्त कर्म फलप्रद । भावयुक्त ज्ञान मुक्तिप्रद । ऐसा दोहोंसी जोडे संबंध । भाव राहूनि मध्यस्थली ।।८८।। कर्म-भावयुक्त ज्ञान । हेचि मोक्षाचे साधन । नव्हे केवळ शुष्क ज्ञान । जाण मोक्षदायक ।।८९।।**

केवलं कर्ममात्रेण जन्मकोटिशतैरपि । नात्मनां जायते मुक्तिर्ज्ञानं मुक्तेर्हि कारणम् ।।२६।।

ज्ञानहीनं सदा कर्म पुंसां संसारकारणम् । तदेव ज्ञानयोगेन संसारविनिवर्तकम् ।।२७।।

**यज्ञयागादी कर्मयोगाने । कोटी कोटी जन्म घेणे । तरीही न येई ठाणे । दृष्टिपथात मोक्षाचे ।।९०।। ज्ञानशून्य कर्म जाण । असे जन्ममरणासी कारण । म्हणूनि मोक्षप्राप्तीचे साधन । ज्ञान एकमेवचि ।।९१।। खांद्यावरी लोहगोळा । घेऊनि जो नदीत पोहला । सांग तो तरला की गेला । यमलोकीच्या वाटेने? ।।९२।। त्याच लोहपत्र्यातून । नौका करूनिया निर्माण । जरी त्यात गेला बैसून । तरी पोचला ना पार? ।।९३।। तैसे कर्मांनी ज्ञानहीन । पडे संसारदु:खाचे बंधन । तीच कर्मे**

**करिता ज्ञानपूर्ण । संसारातूनि होई मुक्त ।।९४।।**

फलं क्रियावतां पुंसां स्वर्गाद्यं नश्वरं यतः । तस्मात्स्थायिफलप्राप्त्यै ज्ञानमेव समभ्यसेत् ।।२८।।

शास्त्राभ्यासादियत्नेन सद्‌गुरोरुपदेशतः । ज्ञानमेव समभ्यस्येत् किमन्येन प्रयोजनम् ।।२९।।

**यज्ञादी कर्मे केल्यामुळे । स्वर्गसुखाचे फळ मिळे । परि ते नश्वरचि सगळे । पुण्य सरता ओसरे ।।९५।। जे टिकते चिरकाल । ते मोक्षसुखचि केवळ । ते लाभावया सबळ । ज्ञानाभ्यासचि कारण ।।९६।। गुरूपदेश करूनि ग्रहण । करावे शिवशास्त्राचे अध्ययन । ज्याने जन्माचे कल्याण । होई तेचि अभ्यासावे ।।९७।। शास्त्रे महाशब्दजाल । अडकता होई दिशाभूल । जैसा नवखा भ्रमे विकल । होऊनिया अरण्यात ।।९८।। केला शास्त्राभ्यास सकल । नाही शिकला पोहणे केवळ । कैसा भवसागरात तरेल । ग्रंथभार घेऊनी? ।।९९।। म्हणूनि श्रीगुरू वाट दाखविती । आणि शिवशास्त्र बोधिती । तेचि अभ्यासावे निश्चिती । अन्य शास्त्रे त्यागूनी ।।१००।। होती मोकळ्या हृदयग्रंथी । शास्त्राभ्यासे जड झाली मती । त्याही सुटूनि शास्त्रग्रंथी । दृश्य होई मोक्षमार्ग ।।१०१।।**

ज्ञानं परशिवाद्वैतपरिपाकविनिश्चयः । येन संसारसम्बन्धविनिवृत्तिर्भवेत् सताम् ।।३०।।

शिवात्मकमिदं सर्वं शिवादन्यन्न विद्यते । शिवोऽहमिति या बुद्धिस्तदेव ज्ञानमुत्तमम् ।।३१।।

**अन्य नाही परशिवाविण । ऐसा दृढनिश्चय म्हणजे ज्ञान । या ज्ञानानेचि मिळे जाण । मुक्ती संसारपाशातूनी ।।१०२।। सर्व जग शिवस्वरूप पाही । शिवाविण अन्य नसेचि काही । शिवस्वरूपचि असे मीही । ही जाणीवच श्रेष्ठ ज्ञान ।।१०३।। वटवृक्षाचा पाहता विस्तार । जो जिज्ञासू असे नर । त्याच्या मनी येई विचार । त्याच्या बीजरूपाचा ।।१०४।। इतुका प्रचंड वृक्ष झाला । तो आभाळातूनि नाही पडला । भूमीतूनचि उगवला । एका सूक्ष्म बीजातूनी ।।१०५।। तैसे अफाट ब्रह्मांड सकळ । त्याचे कोठेतरी असेल मूळ । हीच जिज्ञासा नेई सरळ । ब्रह्मतत्त्वापर्यंत ।।१०६।। त्यासी ब्रह्म म्हणा वा शिव । ते विश्वकारण एकमेव । त्या विश्वकारणाची जाणीव । हेचि असे श्रेष्ठ ज्ञान ।।१०७।।**

अन्धो यथा पुरस्थानि वस्तूनि च न पश्यति । ज्ञानहीनस्तथा देही नात्मस्थं वीक्षते शिवम् ।।३२।।

शिवस्य दर्शनात् पुंसां जन्मरोगनिवर्तनम् । शिवदर्शनमप्याहुः सुलभं ज्ञानचक्षुषाम् ।।३३।।

दीपं विना यथा गेहे नान्धकारो निवर्तते । ज्ञानं विना तथा चित्ते मोहोऽपि न निवर्तते ।।३४।।

**अंधापुढे ठेविला पदार्थ । तो त्यास न दिसे किंचित । तैसे अज्ञांसी हृदयस्थ । शिव कधी दिसेना ।।१०८।। ज्यास लाभे ज्ञानदृष्टी । त्यास शिवरूप दिसे सृष्टी । ती जन्ममरणरोग निवटी । आणि लाभे मोक्षपद ।।१०९।। जैसा गृहातील अंधार दाट । दीप लाविल्याविण न होय नष्ट । तैसा**

**मनातील मोह-अंधार अनिष्ट। ज्ञानाविण न नाशतो ।।११०।।**

**सकायस्थल** - (५७)

परस्य या तनुर्ज्ञेयाऽदेहकर्माभिमानिनः । तया सकायो लोकोऽयं तदात्मत्वनिरूपणात् ।।३५।।

कायं विना समस्तानां न क्रिया न च भावना । न ज्ञानं यत्ततो योगी कायवानेव संचरेत् ।।३६।।

**देहाचा देहजन्य कर्मांचा । किंचित नसे अभिमान साचा । अशा शिवज्ञानयुक्त शिवयोग्याचा । मुनिवरा जो देह असे ।।१११।। ज्या देही आत्मतत्त्व प्रतीत । होई दृष्टीपुढे प्रतिबिंबित । त्या शिवयोग्यासचि निश्चित । 'सकाय' ऐसे संबोधिती ।।११२।। त्याला जहाले आत्मज्ञान । देहाचे सरले प्रयोजन । परि त्या देहाने लोककल्याण । होतसे जाण सत्य हे ।।११३।। त्याचा देह सामान्य नसे । तो देहधारी शिवचि असे । भ्रमे लोककल्याणमिषे । भूमीवरी सर्वत्र ।।११४।। काया म्हणजे देह । कायाधारी म्हणूनि तो सकाय । आणि अशक्य शरीराशिवाय । क्रिया-भावना-ज्ञानही ।।११५।। जरी नसेल शरीर । तरी पूजा कैसी करील नर? । चिंतन-भावनेसही आधार । असे शरीराचाच की ।।११६।। म्हणूनि ज्ञानोत्तर अवस्थेत । सकाय होऊनि मन:पूत । संचार करावा जगतात । शिवयोग्याने सर्वकाळ ।।११७।। काही लोक देहधारी । काही लोक तनुधारी । आणि असती**

**कायधारी । लोक काही जगात ।।११८।। देहास आत्मा मानूनि चोख । त्याचेच करिती कोडकौतुक । खाऊन पिऊन फुगविती अशेख । लोक ते जाण 'देहधारी' ।।११९।। व्रतवैकल्ये तपाचरण । करूनि करिती देहशोषण । कृश करिती देहालागून । ते जाणावे 'तनुधारी' ।।१२०।। दीक्षा घेती श्रीगुरू-कडून । सुसंस्कारित जे होती जन । ज्यांचा मांसपिंड मंत्रपिंड जाण । झाला ते जाणा 'काय-धारी' ।।१२१।। शरीर मूलत: मांसपिंड । तो दीक्षा घेता होई मंत्रपिंड । ऐसा साधक भक्तचि पिंड-। स्थली होऊनि उद्धरतो ।।१२२।। ज्ञानप्राप्ती होईतोवर । स्वत:साठी असे शरीर । परि ते ज्ञानप्राप्ती-नंतर । जनकल्याणास्तव असे ।।१२३।। म्हणूनि शिवयोग्याने ज्ञानोत्तर । 'सकाय' होऊनि विचरावे भूवर । आपुल्या कायास्पर्शे नारी नर । उद्धरावे सकळीक ।।१२४।।**

शिवैकज्ञानयुक्तस्य योगिनोऽपि महात्मनः । काययोगेन सिद्ध्यन्ति भोगमोक्षादयः सदा ।।३७।।

काष्ठं विना यथा वह्निर्जायते न प्रकाशवान् । मूर्तिं विना तथा योगी नात्मतत्त्वप्रकाशवान् ।।३८।।

**शिवयोगी जो शिवज्ञानयुक्त । त्यास कायेनेच मुक्ती होय प्राप्त । भोगमोक्षादी सिद्धी समस्त । केवळ लाभती कायेने ।।१२५।। देहधारी नसे जो जीव । त्याला घेता नये अनुभव । म्हणूनि सकाय होऊनि सदैव । संचरे शिवयोगीही ।।१२६।। अग्नितत्त्वाचे काष्ठाविण । होऊ न शके प्रकटन । तैसे**

**आत्मतत्त्व देहाविण । प्रकटेना शिवयोग्याचे ।।१२७।।**

मूर्त्यात्मनैव देवस्य यथा पूज्यत्वकल्पना । तथा देहात्मनैवास्य पूज्यत्वं परयोगिनः ।।३९।।

निष्कलो हि महादेवः परिपूर्णः सदाशिवः । जगत्सृष्ट्यादिसंसिद्ध्यै मूर्तिमानेव भासते ।।४०।।

**पूजा करावयासाठी । घडवावी लागे देवमूर्ती । मूर्तीमुळे भक्ती-प्रीती । भक्तमनी उद्भवे ।।१२८।। शिवयोग्याचा पाहता देह । मनी जागे पूज्यभाव । आत्मप्रभेचे वैभव । देहातूनि ओसंडते ।।१२९।। शिवयोग्याचे करावे पूजन । ते शक्य नसे कायेविण । जीवन्मुक्तीचा आनंद पूर्ण । कायेनेच ये भोगता ।।१३०।। निराकार परिपूर्ण महादेव । विश्वसृजनादी कार्यास्तव । करितो धारण दिव्यदेह । ऐसे महिमान देहाचे ।।१३१।।**

ब्रह्माद्या देवताः सर्वा मुनयोऽपि मुमुक्षवः । कायवन्तो हि कुर्वन्ति तपः सर्वार्थसाधकम् ।।४१।।

तपो हि मूलं सर्वासां सिद्धीनां यज्जगत्त्रये । तपस्तत्कायमूलं हि तस्मात् कायं न सन्त्यजेत् ।।४२।।

**ब्रह्मादी देव मुमुक्षू ऋषिगण । करूनि सर्वही शरीरधारण । सर्वार्थसाधक तपाचरण । आचरिती अत्यादरे ।।१३२।। सर्वसिद्धीप्राप्तीलागून । तपश्चर्या असे कारण । शरीर हेचि तपःसाधन । म्हणूनि ते त्यागू नये ।।१३३।। येथे संपले सकायस्थल । आता विवरीन अकायस्थल । तुजसी अभिनव वाटेल ।**

सर्वही हे ऋषिवरा ।।१३४।।

## अकायस्थल - (५८)

औपचारिकदेहित्वाज्जगदात्मत्वभावनात् । मायासम्बन्धराहित्यादकायो हि परः स्मृतः ।।४३।।

**सकाय योग्याचे देहधारण । असे औपचारिक पूर्ण । तो घेई आत्मरूपी जगदर्शन । मायासंबंधरहित असे ।।१३५।। सामान्य जीव संसारी । तैसा तोही दिसे देहधारी । देहसंबंध न उरे परी । म्हणूनि तो 'अकाय' ।।१३६।। काया असूनही त्याला । देहाभिमान नाही उरला । म्हणूनि तो अकाय झाला । ध्यानी घेई अगस्त्या ।।१३७।। खोबरे ओल्या नारळातले । असे करवंटीस चिकटले । नारळ फोडिता आतले । फुटे खोबरे कवचासह ।।१३८।। परि जे असे पक्व नारळ । त्यात कवचापासूनि वेगळा डौल । कवच फोडिता ते सरळ । निघे वेगळे न फुटता ।।१३९।। तैसा राहूनि देहाआत । देहाहंकारे नोहे लिप्त । सामान्य जनांच्या दृष्टीप्रत । दिसे देहात वसलेला ।।१४०।। त्याचा देहसंबंध देख । तो असे केवळ औपचारिक । जैसा धर्मशाळेत यात्रिक । काही काळ राहतो ।।१४१।। धर्मशाळा हे आपुले घर । ऐसा कधी न करी विचार । दुसरे दिनी निघे सत्वर । पुन्हा आपुल्या वाटेने ।।१४२।। तैसे औपचारिकपणे । अकाय योग्याचे देही राहणे । आणि ज्ञानदृष्टीने पाहणे । जगी शिवशक्ति-**

**विलास ।।१४३।। विश्वातील कणाकणांत । एकमेव शिव असे व्याप्त । या साक्षात्काराने पाहे समस्त । शिवरूप विश्वाला ।।१४४।। साखरेच्या केल्या बाहुल्या । त्या आकाराने दिसती वेगळ्या । परि साखररूपचि सगळ्या । दिसती भिन्न परि एक ।।१४५।। तैसे विश्वात जीव पदार्थ । जरी असती अगणित । भासती भिन्न परि समस्त । असती सत्य शिवरूप ।।१४६।। दगड धोंडे वृक्ष वल्लरी । पशू पक्षी जलचर नर नारी । शिव-शक्तीचीच रूपे सारी । दृश्य असो वा अदृश्य ।।१४७।। मायागुणाने सृष्टी सगळी । दिसे भेदांनीच भरलेली । ती माया मुळी न उरली । शिवयोग्याच्या अंतरी ।।१४८।। देहसंबंधी त्यागूनि मोह । जो शिवासी अर्पितो 'काय' । त्याचा देह होई 'प्रसादकाय' । तोचि 'अकाय' जाणावा ।।१४९।। ऐसा देही राहूनि विदेही । म्हणूनि तो अकाय पाही । त्याची कथिली समस्तही । लक्षणे तुज कुंभोद्भवा ।।१५०।।**

परस्य देहयोगोऽपि न देहाश्रयविक्रिया । शिवस्येव यतस्तस्मादकायोऽयं प्रकीर्तितः ।।४४।।
परलिंगे विलीनस्य परमानन्दचिन्मये । कुतो देहेन सम्बन्धो देहिवद्भासनं भ्रमः ।।४५।।

**परशिवासी नसे देहविकार । तैसा जो शिवस्वरूप योगिवर । कामक्रोधादी विकारांपासूनि दूर ।**

**म्हणूनि तो अकाय ।।१५१।। परमानंद-चिद्रूप परलिंगात । ज्याचे विलीन झाले चित्त । तो देहरूपे होई प्रतीत । परि अलिप्त देहाहूनी ।।१५२।।**

देहाभिमानहीनस्य शिवभावे स्थितात्मनः । जगदेतच्छरीरं स्याद् देहेनैकेन का व्यथा ।।४६।।

शिवज्ञानैकनिष्ठस्य नाहंकारभवभ्रमः । न चेन्द्रियभवं दुःखं त्यक्तदेहाभिमानिनः ।।४७।।

न मनुष्यो न देवोऽहं न यक्षो नैव राक्षसः । शिवोऽहमिति यो बुद्ध्यात् तस्य किं देहकर्मणा ।।४८।।

**ज्याचा सुटला देहाभिमान । चित्त परशिवात झाले लीन । त्यासी हे विश्वचि पूर्ण । भासे शरीर आपुले ।।१५३।। त्याचे ममत्व देहापुरते । न राहता ते व्यापी विश्वाते । समग्र विश्वचि दिसते । त्यासी घर आपुले ।।१५४।। प्रपंचातील सर्व देह । ज्याला भासती आपुले देह । मग त्याचा एक देह । काय बाधा करील? ।।१५५।। त्याने त्यागिला देहाभिमान । 'मी न शिव' हा अहंकारजन्य । भ्रम नसे, त्यासी इंद्रियजन्य । दुःखे मुळी न स्पर्शती ।।१५६।। मी न देव नाही मनुष्य । राक्षस नव्हे नाही यक्ष । मी तर शिवचि प्रत्यक्ष । ऐसी ज्याची मती स्थिर ।।१५७।। त्या अकाय शिवयोग्यास । देहपीडा बाधे कशास? । आणि शारीर कर्मांशीही त्यास । असे काय घेणे देणे? ।।१५८।। ऐसे हे अकायस्थल । तुज निरूपिले सकळ । अगस्त्या तू असशी प्रेमळ । ऐक स्थल परकाय ।।१५९।।**

## **परकायस्थल** - (५९)

वशीकृतत्वात् प्रकृतेर्मायामार्गातिवर्तनात् । परकायोऽयमाख्यातः सत्यज्ञानसुखात्मकः ।।४९।।

परब्रह्मवपुर्यस्य प्रबोधानन्दभासुरम् । प्राकृतेन शरीरेण किमेतेनास्य जायते ।।५०।।

**प्रकृतीसी वश करून । गेला मायामार्ग उल्लंघून । झाला सच्चिदानंदरूप ब्रह्म पूर्ण । तो शिवयोगी परकाय ।।१६०।। परब्रह्म म्हणजे 'पर' । 'काय' म्हणजे शरीर । ज्याचे शरीर ब्रह्ममय समग्र । झाले तोचि 'परकाय' ।।१६१।। चिदानंदाने प्रकाशित । त्याचा देह लखलखीत । तो प्राकृतिक देह किंचित । नसे त्यासी बाधक ।।१६२।। जे शरीर शिवार्पित । जे सहभागी शिवकार्यात । त्या शरीराचे सामर्थ्य । किती म्हणूनि तुज सांगू? ।।१६३।। त्याचे पदकमळ पडती ज्यावर । ते स्थान होई पुण्यक्षेत्र । तो जे जल स्पर्शे क्षणमात्र । ते तीर्थ होई तत्काळ ।।१६४।। ज्याच्या मस्तकी तो ठेवी हस्त । तो क्षणात होई मुक्त । तो जे सहज उच्चारीत । ते शब्द होती मंत्ररूप ।।१६५।। त्याची भाळी लावी पायधूळ । त्याचे नाशती मनोमळ । त्याचा आदरसत्कार करील । त्यावरी शिव प्रसन्न ।।१६६।। जे परब्रह्मरूप शरीर । त्याचे सामर्थ्य अगाध अपार । तो चालता बोलता शंकर । भूलोकीचा जाणावा ।।१६७।।**

सम्यग्ज्ञानाग्निसन्दग्धजन्मबीजकलेवरः । शिवतत्त्वावलम्बी यः परकायः स उच्यते ।।५१।।

इन्द्रियाणि मनोवृत्तिवासनाः कर्मसंभवाः । यत्र यान्ति लयं तेन सकायोऽयं परात्मना ।।५२।।

**शिवाद्वैतज्ञानाग्नीत । सूक्ष्मशरीर भस्मसात । झाले जे ते बीज निश्चित । असे पुनर्जन्माचे ।।१६८।। संचितकर्म गेले जळून । प्रारब्धकर्म संपेल भोगून । फलापेक्षा नसे म्हणूनि क्रियमाण । झाले निष्फल सर्वही ।।१६९।। जेथे कर्मफलाचे नाही नाव । तेथे कैसा असेल पुनर्भव? । परशिवस्वरूप स्वयमेव । असे परकाय शिवयोगी ।।१७०।। ज्या झाल्या कर्मपाशाने उत्पन्न । मनोवृत्तींच्या वासना जाण । त्या इंद्रियव्यापारांसह विलीन । होती परब्रह्माठायी ।।१७१।। ते परब्रह्मचि शरीराने । जो जहाला सर्वार्थाने । त्याला परकाय मी म्हणे । योगी जाण अगस्त्या ।।१७२।।**

पराहन्तामनुप्राप्य पश्येद् विश्वं चिदात्मकम् । सदेहोऽतिभ्रमस्तस्य निश्चिता हि शिवात्मता ।।५३।।

स्वस्वरूपं चिदाकारं ज्योतिः साक्षाद्विचिन्तयन् । देहवानपि निर्देहो जीवन्मुक्तो हि साधकः ।।५४।।

**मी शिव मी विश्व परिपूर्ण । या पराहंतेने भरले मन । तो चित्‌रूपातचि दर्शन । घेई समग्र विश्वाचे ।।१७३।। आप पर ऐसा भाव । नेणेचि तयाची जाणीव । विश्वातील समस्त जीव । स्वस्वरूपचि जाणतो ।।१७४।। त्याचे शरीरही असे शिवमय । यात नसेचि काही संदेह । ऐसा परकायस्थली अंतर्बाह्य । शिवरूपचि जहाला ।।१७५।। त्यासी मानणे देहधारी । ही भ्रांतीच जाणावी**

**भारी । त्याच्या रूपे शिवचि भूवरी । वर्तती हेचि खरे असे ।।१७६।। आत्मा ज्योतिर्मय जाणून । जो त्याचे नित्य करी ध्यान । तो देहधारी दिसे तरी जाण । असे विदेही जीवन्मुक्त ।।१७७।।**

देहस्तिष्ठतु वा यातु योगिनः स्वात्मबोधिनः । जीवन्मुक्तिर्भवेत् सद्यश्चिदानन्दप्रकाशिनी ।।५५।।
आत्मज्ञानावसानं हि संसारपरिपीडनम् । सूर्योदयेऽपि किं लोकस्तिमिरेणोपरुध्यते ।।५६।।
देहाभिमाननिर्मुक्तः कलातीतपदाश्रयः । कथं याति परिच्छेदं शरीरेषु महाबुधः ।।५७।।

**ज्यासी जहाला साक्षात्कार । त्यासी असो वा नसो शरीर । त्यास चिदानंदप्रकाशिनी सत्वर । जीवन्मुक्ती प्राप्तचि ।।१७८।। जैसा प्रकाशता दिनकर । तत्काळ नाश पावे अंधार । तैसी आत्म-ज्ञानानंतर । संसारपीडा दूर होई ।।१७९।। पंच कलांच्या जे अतीत । ते परब्रह्मपद केले प्राप्त । म्हणूनि देहाभिमानमुक्त । परकायस्थली झाला असे ।।१८०।। मी आहे एकाच शरीरात । ऐसी जी भावना परिमित । ती तो कैसा करील खचित । सांग मज अगस्त्या? ।।१८१।। साडे तीन हातांचा देह । त्यात न राहे परकाय । त्याने व्यापिले विश्व सर्व । देहधारी नसे तो ।।१८२।। ऐसा परकायस्थली जाण । ठरे लोकांचे प्रेरणास्थान । कैसे तेही तुजलागून । निरूपितो ते ऐकावे ।।१८३।।**

**धर्माचारस्थल** - (६०)

तस्यैव परकायस्य समाचारो य इष्यते । स धर्मः सर्वलोकानामुपकाराय कल्प्यते ।।५८।।

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा । दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः ।।५९।।

**परब्रह्मरूप ज्याचे शरीर । तो परकायस्थली विचरे भूवर । त्याचे वर्तन हाचि धर्माचार । ठरे अन्य जनांसाठी ।।१८४।। तो आचरण करी जैसे । जनलोकही वर्तती तैसे । लोकोपकारासाठीच असे । शिवयोग्याचे आचरण ।।१८५।। अनुकरणप्रिय असती लोक । त्यांना न कळे उपदेश मार्मिक । जैसे पाहूनि वागे बालक । मायपित्याचे वर्तन ।।१८६।। तैसे शिवयोग्याचे वर्तन । पाहूनि वर्तती सामान्य जन । परोपकारासाठी जाण । त्याचे असे वागणे ।।१८७।। अहिंसा सत्य अस्तेय जाण । ब्रह्मचर्य दया क्षमा दान । पूजा जप आणि ध्यान । धर्माचार दहा हे ।।१८८।। हे दश धर्म जो आचरे । त्याचे जन्ममरण-दुःख सरे । उघडती मोक्षसदनाची दारे । त्याच्यासाठी सहज ।।१८९।। जो करीना धर्माचरण । तो जरी मनुष्य तरी पशूसमान । द्विपाद प्राण्यातचि गणन । त्याचे केले शास्त्रांत ।।१९०।। विद्या मित्र प्रवासात । गृहस्थास पत्नी मित्रवत् । औषध मित्र रुग्णाप्रत । धर्म मित्र मरत्याचा ।।१९१।। इहलोक सोडता शेवटी । सोबत न ये भूमी धनकोटी । धर्म बांधिला असेल गाठी । तोचि करितो**

**संगत ।।१९२।। मरत्या जीवाची शिदोरी । दशधर्मचि असती खरी । म्हणूनिया ते नानापरी । प्रयत्नांनी संपादावे ।।१९३।। हे दशधर्म कोण कोण । संक्षेपे सांगतो तुजलागून । जे सर्वांसी ज्ञात परि स्मरण । करूनि द्यावे लागते ।।१९४।। काया-वाचा-मनाने । कोणतीही हिंसा न करणे । हा 'अहिंसाधर्म', सर्वदा बोलणे । खरे हा जाण 'सत्यधर्म' ।।१९५।। न करणे चौर्य अपहार । यासी 'अस्तेय' म्हणती चतुर । स्वस्त्रीशी शास्त्रविहित व्यवहार । करणे हेचि 'ब्रह्मचर्य' ।।१९६।। प्राणिमात्रांविषयी कणव । यास 'दयाधर्म' नाव । अपराधा क्षमापिणे सर्व । हा जाण 'क्षमाधर्म' ।।१९७।। सत्पात्रासी देणे वस्तू धन । हाचि जाणावा धर्म 'दान' । फलाशेविण करणे इष्टलिंगपूजन । हाचि 'पूजाधर्म' असे ।।१९८।। पंचाक्षरी मंत्राचे उच्चारण । हाचि 'जपधर्म' परम जाण । अखंड करणे शिवचिंतन । यासी 'ध्यान' म्हणावे ।।१९९।। हे आचरिता दशधर्म पूर्ण । होई धर्मसंग्रह जाण । यांचे करावे आचरण । मुमुक्षू मुक्त सकलांनी ।।२००।।**

शिवेन विहितो यस्मादागमैर्धर्मसंग्रहः । तस्मात्तमाचरन् विद्वान् तत्प्रसादाय कल्प्यते ।।६०।।

अधर्मं न स्पृशेत् किंचिद् विहितं धर्ममाचरेत् । तं च कामविनिर्मुक्तं तमपि ज्ञानपूर्वकम् ।।६१।।

**शिवे उपदेशिले हे धर्माचार । वर्णिले आगमांत सविस्तर । ते आचरी निष्ठेने जो नर । त्यावरी होय**

**शिवकृपा ।।२०१।। शास्त्रनिषिद्ध कर्मे टाळून । करावे विहित कर्माचरण । ज्ञानपूर्वक, निष्काम पूर्ण । भाव त्यात असावा ।।२०२।।**

आत्मवत् सर्वभूतानि संपश्येद् योगवित्तमः । जगदेकात्मताभावान्निग्रहादिविरोधतः ।।६२।।

एक एव शिवः साक्षाज्जगदेतदिति स्फुटम् । पश्यतः किं न जायेत ममकारो हि विभ्रमः ।।६३।।

**जग परब्रह्मरूप या भावे । प्राणिमात्र आत्मत्वे पाहावे । निग्रह-अनुग्रह न करावे । कोणावरी शिवयोग्याने ।।२०३।। परशिवब्रह्म साक्षात । जगद्रूपाने जहाला व्यक्त । हे जाणतो त्यासी अप्राप्त । जगती काय असेल? ।।२०४।। वस्तु-व्यक्तींत ममत्वभाव । हा असे भ्रमात्मक सर्व । ऐसे जाणूनि शिवमय । सर्व सृष्टीसी पाहतो ।।२०५।।**

धर्म एव समस्तानां यतः संसिद्धिकारणम् । निःस्पृहोऽपि महायोगी धर्ममार्गं च न त्यजेत् ।।६४।।

ज्ञानामृतेन तृप्तोऽपि योगी धर्मं न संत्यजेत् । आचारं महतां दृष्ट्वा प्रवर्तन्ते हि लौकिकाः ।।६५।।

सदाचारप्रियः शम्भुः सदाचारेण पूज्यते । सदाचारं विना तस्य प्रसादो नैव जायते ।।६६।।

**भोग मोक्ष सिद्धी निश्चित । धर्माचारेचि होती प्राप्त । म्हणूनि तो न वर्जावा खचित । निःस्पृह महायोग्याने ।।२०६।। शिवज्ञाने झाला तृप्त । त्याने त्यागू नये धर्माचरणाप्रत । त्याचे वर्तन पाहूनि**

**प्रवृत्त । होती लोक आचाराकडे ।।२०७।। आदर्श आपुल्या सदाचरणाने । लोकांपुढे उभा करणे । म्हणूनि असावे ज्ञानी पुरुषाने । धर्माचरणी रत सदा ।।२०८।। सदाचारप्रिय अशा शंभूसी । आचारे पूजावे अहर्निशी । त्याविण तो न देई भक्तासी । कृपाप्रसाद निश्चित ।।२०९।।**

**भावाचारस्थल** - (६१)

भाव एवास्य सर्वेषां भावाचारः प्रकीर्तितः । भावो मानसचेष्टात्मा परिपूर्णः शिवाश्रयः ।।६७।।

भावनाविहितं कर्म पावनादपि पावनम् । तस्माद् भावनया युक्तं परधर्मं समाचरेत् ।।६८।।

**धर्माचारयुक्त योगिमनात । जो शिवभाव नांदतो सतत । त्याला भावाचार सत्य । नाम असे अगस्त्या ।।२१०।। शिवयोग्याच्या भावामुळे । लोकमानसी तो भाव दरवळे । अंतर्बाह्य शिवार्पित चाले । मनोव्यापार तो 'भाव' ।।२११।। भाव मनाची वृत्ती जाण । करी सांसारिक विषयग्रहण । तेव्हा तिला असे अभिधान । वैषयिकवृत्ती ऐसे ।।२१२।। परि ती घेई शिवाश्रय । तेव्हा तिला म्हणती 'भाव' । ती दृढ होता तुटे भव-। संग मुमुक्षू जीवाचा ।।२१३।। अगस्त्या चित्त आणि वित्त । मनुष्यापाशी असे खचित । अनेकांसी वाटता येई वित्त । चित्त मात्र एकासी ।।२१४।। एका परशिवाप्रती । अर्पिता पूर्ण चित्तवृत्ती । तीच जाणावी भाववृत्ती । जी घेते शिवाश्रय ।।२१५।। अशा**

**शुद्ध भाववृत्तीने । घडती जी शिवपूजादी कर्माचरणे । ती परमपवित्र जाणे । सर्व पावन कर्मांहूनी ।।२१६।। म्हणूनि शिवभावयुक्त । होऊनि आचरावे धर्मकृत्य सतत । ते जरी घडेना भावयुक्त । तरी जाणावे निष्फळ ।।२१७।।**

भावेन हि मनः शुद्धिर्भावशुद्धिश्च कर्मणा । इति संचिन्त्य मनसा योगी भावं न सन्त्यजेत् ।।६९।।

शिवभावनया सर्वं नित्यनैमित्तिकादिकम् । कुर्वन्नपि महायोगी गुणदोषैर्न बाध्यते ।।७०।।

**शिवपूजने होई भावशुद्धी । भावशुद्धीने होई मन:शुद्धी । म्हणूनि शिवयोग्याने कधी । त्यागू नये सद्भाव ।।२१८।। नित्य नैमित्तिक कर्मे त्याने । आचरिली जर शिवभावनेने । तरी कर्मांच्या दोष-गुणे । शिवयोगी लिंपेना ।।२१९।। म्हणूनि निष्काम भावेकरून । त्याने करावे कर्माचरण । मग न होय कर्मबंधन । त्यास बाधक कदापि ।।२२०।।**

अन्तः प्रकाशमानस्य संवित्सूर्यस्य सन्ततम् । भावेन यदुपस्थानं तत्सन्ध्यावन्दनं विदुः ।।७१।।

आत्मज्योतिषि सर्वेषां विषयाणां समर्पणम् । अन्तर्मुखेन भावेन होमकर्मेति गीयते ।।७२।।

**ऊर्ध्वमुखी हृत्कमलात । ज्ञानसूर्य प्रकाशे सदोदित । त्याचे चिंतन भावयुक्त । तेचि जाण संध्यावंदन ।।२२१।। आत्मरूपी चिदग्नीत । करणे विषय समर्पित । हेचि जाणावे निश्चित । वीरशैवांचे**

**होमकर्म ।।२२२।। सागर-तरंगन्यायाने । आत्म्याशी लयचिंतन करणे । तेचि वीरशैवाकारणे । असे जाण होमकर्म ।।२२३।। ज्ञानाग्नीत विषय होमावे । म्हणजे ते शिवार्पित करावे । आणि प्रसाद म्हणूनि सेवावे । हाचि होम अंतरीचा ।।२२४।।**

भावयेत् सर्वकर्माणि नित्यनैमित्तिकानि च । शिवप्रीतिकराण्येव संगराहित्यसिद्धये ।।७३।।

शिवे निवेश्य सकलं कार्याकार्यं विवेकतः । वर्तते यो महाभागः स संगरहितो भवेत् ।।७४।।

आत्मानमखिलं वस्तु शिवमानन्दचिन्मयम् । एकभावेन सततं संपश्यन्नेव पश्यति ।।७५।।

**संसारबंधनातून व्हावया मुक्त । करावी नित्यनैमित्तिक कर्मे समस्त । ते करिताना शिव व्हावे संतृप्त । अशी असावी भावना ।।२२५।। या भावनेने करिता आचरण । न बाधे कदा संसारबंधन । आणि संसारसंगातून । मुक्त होई शिवयोगी ।।२२६।। करण्या-न करण्याजोगी कर्मे । जो शिवार्पित करी विवेकाने । तो भाग्यशाली पुरुष मने । होई संसारसंगमुक्त ।।२२७।। शिव विश्व आणि आपण । एकचि ऐसे दृढ जाणून । जो वर्ते सर्वात्मक होऊन । तोचि खरा शिवज्ञाता ।।२२८।। जो वेदाध्ययनाने न कळे । यज्ञयागांनी न आकळे । तो शिवपरमात्मा भावबळे । सापडे आत्मरूपात ।।२२९।। आता लिंग-माहेश्वरस्थलातील । अंतिम जे ज्ञानाचारस्थल । ते विवरीन आता समूळ । ऐक मुनी अगस्त्या ।।२३०।।**

## ज्ञानाचारस्थल - (६२)

अस्य ज्ञानसमाचारो योगिनः सर्वदेहिनाम् । ज्ञानाचारो यदुक्तोऽयं ज्ञानाचारः स कथ्यते ।।७६।।

शिवाद्वैतपरं ज्ञानं ज्ञानमित्युच्यते बुधैः । सिद्धेन वाप्यसिद्धेन फलं ज्ञानान्तरेण किम् ।।७७।।

**शिवयोगी भावाचारसंपन्न । त्याचे शिवज्ञानयुक्त आचरण । तेचि शिवभक्तासाठी जाण । असे ज्ञानाचारस्थल ।।२३१।। शिवाद्वैतपर ज्ञान । तेचि ज्ञानी मानिती प्रधान । शास्त्राद्वारे सिद्धासिद्ध अन्य ज्ञान । ते नसेचि फलप्रद ।।२३२।।**

निर्मलं हि शिवज्ञानं निःश्रेयसकरं परम् । रागद्वेषादिकलुषं भूयः संसृतिकारणम् ।।७८।।

परिपूर्णं महाज्ञानं परतत्त्वप्रकाशकम् । अवलम्ब्य प्रवृत्तो यो ज्ञानाचारः स उच्यते ।।७९।।

**जे आणवादी मलरहित । ते श्रेष्ठ ज्ञान शिवाद्वैत । मोक्षदायक पवित्र अत्यंत । त्यासम अन्य नसेचि ।।२३३।। त्या ज्ञानाव्यतिरिक्त । जे राग-द्वेषाने कलुषित । ज्याने भेद होई प्रतीत । ते ज्ञान संसारकारण ।।२३४।। शिवभक्तीने नष्टले अज्ञान । म्हणूनि नाही भेदज्ञान । भेद नाही म्हणूनि जाण । नसती राग-द्वेषही ।।२३५।। राग-द्वेष नाही म्हणून । जन्ममरणाचे नाही कारण । जेथे नाही जन्म-मरण । तेथे उभी मुक्तीच ।।२३६।। परिपूर्ण शिवाद्वैत । त्याने परतत्त्व होई प्राप्त । तदाधारे जो होई**

**प्रवृत्त । तोचि असे ज्ञानाचार ।।२३७।। छत्तीस तत्त्वांत शिवतत्त्व जाण । हे एकमात्र असे परिपूर्ण । म्हणूनि त्याचे परम ज्ञान । ते असे परिपूर्णचि ।।२३८।।**

निर्विकल्पे परे धाम्नि निष्कले शिवनामनि । ज्ञानेन योजयेत् सर्वं ज्ञानाचारी प्रकीर्तितः ।।८०।।

ज्ञानं मुक्तिप्रदं प्राप्य गुरुदृष्टिप्रसादतः । कः कुर्यात् कर्मकार्पण्ये वांच्छां संसारवर्धने ।।८१।।

**निराकार निर्विकल्प पूर्ण । त्या शिवात विश्व वसे अभिन्न । या अभेदभावे करी वर्तन । तो शिवयोगी ज्ञानाचारी ।।२३९।। गुरुदृष्टि-प्रसादामुळे । मोक्षद शिवज्ञान लाभले । मग ज्याने दुःखद संसार फळे । ते कर्म करील कोण? ।।२४०।।**

कर्म ज्ञानाग्निना दग्धं न प्ररोहेत् कथंचन । यदाहुः संसृतेर्मूलं प्रवाहानुगतं बुधाः ।।८२।।

ज्ञानेन हीनः पुरुषः कर्मणा बद्ध्यते सदा । ज्ञानिनः कर्मसंकल्पा भवन्ति किल निष्फलाः ।।८३।।

**कर्म हे संसाराचे मूळ । ते अनादी अनंत काळ । जैसे अखंड वाहते जळ । तैसे आले चालत ।।२४१।। शिवज्ञानाच्या अग्नीत । कर्म झाल्यावरी भस्मसात । ते पुन्हा न होय अंकुरित । ऐसे ज्ञानी सांगती ।।२४२।। जो नर शिवज्ञानहीन । त्यालाच पडे कर्मबंधन । ज्ञानीही करिती कर्म जाण । परि फलाशा त्यागिती ।।२४३।। त्याने कर्मे केली किती । तरी ती त्याला न बांधू शकती । कर्माची असे**

**गहन गती । परि ज्ञान्यापुढे ती व्यर्थ ।।२४४।।**

शुद्धाचारे शुद्धभावो विवेकी ज्योतिः पश्यन् सर्वतश्चैकमेवम् ।
ज्ञानध्वस्तप्राकृतात्मप्रपंचो जीवन्मुक्तश्चेष्टते दिव्ययोगी ।।८४।।

**तो परिशुद्ध ज्ञानाचाराने । संपन्न निर्मल भावाने । अनुभवितो शिवतेजाने । व्याप्त विश्व समग्र ।।२४५।। देहादी प्रपंच प्राकृत । ज्याने शिवज्ञाने केला ध्वस्त । तो विवेकी दिव्ययोगी जीवन्मुक्त । होऊनि वर्ते सामान्य ।।२४६।। ऐसे हे असे ज्ञानागमस्थल । संपले लिंगमाहेश्वरस्थल । अगस्त्या आता लिंगप्रसादिस्थल । निरूपीन यापुढे ।।२४७।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।२४८।। श्रीसिद्धान्तशिखामणि-तत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । षोडशोऽध्याय पूर्ण हा ।।२४९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतमाहेश्वरस्थले क्रियागमस्थलादिनवविधस्थलप्रसंगो नाम षोडशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय सतरावा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु रेवणाराध्याय नमः ।। ॐ शिवाय नमः शुद्धविग्रहाय । खंडपरशवे नमः शाश्वताय । अजाय नमः पाशविमोचकाय । मृडाय नमः पशुपतये ।।१।। तुझ्या कृपाकटाक्षे-करून । जन्मांधासी लाभती नयन । मूढाचे हृदयाकाश उजळून । जाई ज्ञानप्रकाशाने ।।२।। तैसी परी झाली येथ । मुंगीने लंघावा पर्वत । जे असंभाव्य ते घडत । दिसे चालले दिनोदिन ।।३।। हे घडावे तुझे मानस । ऐसा मनी जागला विश्वास । आता तूचि धरूनि करांस । पूर्ण करवी ग्रंथकार्य ।।४।। लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल । जगद्‌गुरू रेणुकाचार्य निरूपतील । ते अवांतरस्थलभेदांसह सकल । अवधारावे श्रोत्यांनी ।।५।।**

## लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

अगस्त्य उवाच-

स्थलानि तानि चोक्तानि यानि माहेश्वरस्थले । वदस्व स्थलभेदं मे प्रसादिस्थलसंश्रितम् ।।१।।

**अगस्त्य म्हणती रेणुकांप्रत । निरूपिले माहेश्वरस्थल समस्त । आता प्रसादिस्थल उपस्थलांसहित । स्पष्ट करूनि सांगावे ।।६।।**

श्रीरेणुक उवाच-

स्थलभेदा नव प्रोक्ताः प्रसादिस्थलसंश्रिताः । कायानुग्रहणं पूर्वमिन्द्रियानुग्रहं ततः ।।२।।

प्राणानुग्रहणं पश्चात् ततः कायार्पितं मतम् । करणार्पितमाख्यातं ततो भावार्पितं मतम् ।।३।।

शिष्यस्थलं ततः प्रोक्तं शुश्रूषुस्थलमेव च । ततः सेव्यस्थलं चैषां क्रमशः शृणु लक्षणम् ।।४।।

**रेणुक वदती शांत स्वरात । प्रसादिस्थलाचे अंगभूत । नऊ भेद असती येथ । कथितो ऐक सादर ।।७।। कायानुग्रहस्थल इंद्रियानुग्रहस्थल । प्राणानुग्रहस्थल कायार्पितस्थल । करणार्पितस्थल भावार्पितस्थल । शिष्यस्थल हे सातवे ।।८।। सुश्रूषुस्थल सेव्यस्थल । ऐसी ही उपस्थले सकल । त्यांचे लक्षणांसह समूळ । करितो आता विवरण ।।९।।**

### **कायानुग्रहस्थल** - (६३)

अनुगृह्णाति यल्लोकान् स्वकायं दर्शयन्नसौ । तस्मादेष समाख्यातः कायानुग्रहनामकः ।।५।।

यथा शिवोऽनुगृह्णाति मूर्तिमाविश्य देहिनः । तथा योगी शरीरस्थः सर्वानुग्राहको भवेत् ।।६।।

**जो शिवयोगी ज्ञानाचारसंपन्न । ज्याचे शरीरचि परब्रह्म पूर्ण । त्या शरीराचे देऊनि दर्शन । कृपा करी लोकांवरी ।।१०।। दर्शवूनि आपुला देह । सामान्य जनांवरी करी अनुग्रह । म्हणूनि त्यासी 'कायानुग्रह' । नामे ज्ञाते जाणती ।।११।। शिव निर्गुण निराकार । धारण करूनि लीलावतार । करितो प्राणिमात्रांवर । अनुग्रहाचा वर्षाव ।।१२।। तैसा शिवयोग्याचा देह । शिवदीक्षासंस्कारित तेजोमय । त्याद्वारे तो कृपानुग्रह । करी सर्व जीवांवरी ।।१३।। ज्याच्यापाशी देण्याएवढे । जरी धनाचे असे गाठोडे । त्याचा हातचि सदैव पुढे । होई दान करावया ।।१४।। तैसी अनुग्रहशक्ती । ज्याच्या भरूनि वाहे चित्ती । तोच करितो सर्वांवरती । अनुग्रहाचा वर्षाव ।।१५।। ऐसा अनुग्रहशक्तियुक्त । कायानुग्रहस्थली विचरे जगात । कृपा करूनि उद्धरीत । सकल जीवमात्रांसी ।।१६।।**

शिवः शरीरयोगेऽपि यथा संगविवर्जितः । तथा योगी शरीरस्थो निःसंगो वर्तते सदा ।।७।।

शिवभावनया युक्तः स्थिरया निर्विकल्पया । शिवो भवति निर्धूतमायावेशपरिप्लवः ।।८।।

**शिव अवतार करी धारण । परि अलिप्त देहसंगापासून । तैसा शरीरामाजी राहून । योगी असे निःसंग ।।१७।। तो असे सर्वदा भेदरहित । दृढ शिवोऽहंभावे युक्त । मायाक्लेशविरहित । शिवस्वरूप प्रत्यक्ष ।।१८।।**

चित्तवृत्तिषु लीनासु शिवे चित्सुखसागरे । अविद्याकल्पितं वस्तु नान्यत् पश्यति संयमी ।।९।।

नेदं रजतमित्युक्ते यथा शुक्तिः प्रकाशते । नेदं जगदिति ज्ञाते शिवतत्त्वं प्रकाशते ।।१०।।

**जो शिव ज्ञानानंदसागर । त्या शिवात विलीनले मनोव्यापार । म्हणूनि मायाजन्य वस्तुविकार । त्याच्या दृष्टीस न स्पर्शिती ।।१९।। शिंप दिसे चांदीसम । न्याह्याळिता दूर होई भ्रम । तैसा शिवतत्त्वावरी विश्वभ्रम । दिसे अज्ञानाकारणे ।।२०।। परि होता आत्मज्ञान । शिवचि दिसे विश्वातून । शिवयोग्यासही घडे दर्शन । विश्वाठायी शिवाचे ।।२१।।**

यथा स्वप्नकृतं वस्तु प्रबोधेनैव शाम्यति । तथा शिवस्य विज्ञाने संसारं नैव पश्यति ।।११।।

अज्ञानमेव सर्वेषां संसारभ्रमकारणम् । तन्निवृत्तौ कथं भूयः संसारभ्रमदर्शनम् ।।१२।।

गलिताहंकृतिग्रन्थिः क्रीडाकल्पितविग्रहः । जीवन्मुक्तश्चरेद्योगी देहिवन्निरुपाधिकः ।।१३।।

**स्वप्नामाजी जे होती प्रतीत । ते जागे होता न दिसती पदार्थ । तैसे शिवज्ञान होता समस्त । प्रपंच होई नाहीसा ।।२२।। बोधावया गूढ तत्त्वार्थ । जरी दिला स्वप्न-जागृती दृष्टान्त । तरी अगस्त्या वीरशैवसिद्धान्त । जगासी मिथ्या मानीना ।।२३।। अंधारी पाहताना दोरी । ती सर्पचि भासे खरी । पण दिवा घेऊनि पाहिल्यावरी । कळे होता तो भ्रम ।।२४।। जैसे स्वप्नासी अस्तित्व नसे । दोरीठायी सर्प**

**आभासे । ब्रह्मतत्त्वावरी तैसे । विश्व दिसे भ्रमाने ।।२५।। त्याला अस्तित्वचि नाही । ऐसे वेदान्त मानितो पाही । परि सिद्धान्तास कालत्रयी । विश्व मिथ्या हे पटेना ।।२६।। सिद्धान्त म्हणे शिवाची शक्ती । विकासली आपुल्या दृष्टीपुढती । सत्यचि शिवरूप सृष्टि-प्रकृती । ती नव्हे स्वप्न-सर्पासम ।।२७।। शाखा फुले पर्णसंभार । घेऊनि उभा वृक्ष डौलदार । तैसा जगद्रूपाने दृष्टीसमोर । शिवचि उभा प्रत्यक्ष ।।२८।। शिवविषयक जे अज्ञान । तेचि संसारभ्रमाचे कारण । ते नाहीसे होता संपूर्ण । मग भ्रम दिसेल कैसा? ।।२९।। जो शिवज्ञानी योगीश्वर । त्याचा देहाभिमान झाला दूर । तो आपुल्या इच्छेनुसार । क्रीडा करी जगात ।।३०।। तो मुळी जीवन्मुक्तचि असे । परि शरीररूपात जनांसी दिसे । लोकानुग्रहासाठी देही वसे । संचरे दाही दिशांतरी ।।३१।।**

### इन्द्रियानुग्रहस्थल - (६४)

दर्शनात्परकायस्य करणानां विवेकतः । इन्द्रियानुग्रहः प्रोक्तः सर्वेषां तत्त्ववेदिभिः ।।१४।।

इन्द्रियाणां समस्तानां स्वार्थेषु सति संगमे । रागो वा जायते द्वेषस्तौ योगी परिवर्जयेत् ।।१५।।

इन्द्रियाणां बहिर्वृत्तिः प्रपंचस्य प्रकाशिनी । अन्तः शिवे समावेशो निष्प्रपंचस्य कारणम् ।।१६।।

**शिवयोग्याचे घेता दर्शन । सामान्य जनांचे पालटे मन । इंद्रियनिग्रह करावा आपण । ऐसा जागे**

**विवेक ।।३२।। शिवयोग्याचा इंद्रियानुग्रह । लोकांच्या इंद्रियांवरी करी अनुग्रह । म्हणूनि त्यास 'इंद्रियानुग्रह' । असे येथे संबोधिले ।।३३।। शब्दस्पर्शादी विषयांपासून । आपुली इंद्रिये वळवून । शिवतत्त्व हा एकमेव जाण । विषय त्यांना भोगवी ।।३४।। ऐसा आपुल्या इंद्रियांवरी । शिवयोगी अनुग्रह करी । त्याची कृपा दोहींवरी । तेणे तो इंद्रियानुग्रहस्थली ।।३५।। विषयांशी येता संबंध । इंद्रिये वर्तती अनिर्बंध । राग-द्वेषादी भावनाबंध । जीवास दृढ जखडिती ।।३६।। म्हणूनि शिवयोग्याने सवेग । राग-द्वेषाचा करावा त्याग । त्यांनी स्पर्शू नये अंग । म्हणूनि सावध असावे ।।३७।। इंद्रियांची बाह्यप्रवृत्ती जाण । असे संसारव्यवहारासी कारण । ती शिवाशी जाता समरसून । ठरे कारण मोक्षासी ।।३८।। शिवयोगी होऊनि अंतर्मुख । भोगितो परमानंदसुख । अंतरी उचंबळे देख । जैसा महासागर ।।३९।।**

क्षणमन्तः शिवं पश्यन् केवलेनैव चेतसा । बाह्यार्थानामनुभवं क्षणं कुर्वन् दृगादिभिः ।।१७।।

सर्वेन्द्रियनिरूढोऽपि सर्वेन्द्रियविहीनवान् । शिवाहितमना योगी शिवं पश्यति नापरम् ।।१८।।

**तो क्षणात हृदयी पाहे शिव । क्षणात घेई विषयानुभव । सामान्यासम इंद्रिये वर्तती सर्व । परि असून नसल्यासम ।।४०।। इंद्रियांसी विषय एक । शिवब्रह्म सर्वव्यापक । त्याविण अन्य काही देख । येत**

**नसेचि प्रत्यया ।।४१।। सामान्यांसी जे जग दिसे । ते शिवयोगी न पाहातसे । त्याच्या बहिर्मुख इंद्रियांसी दिसे । जगाठायी शिवरूप ।।४२।।**

न जरा मरणं नास्ति न पिपासा न च क्षुधा । शिवाहितेन्द्रियस्यास्य निर्मानस्य महात्मनः ।।१९।।

मनो यत्र प्रवर्तेत तत्र सर्वेन्द्रियस्थितिः । शिवे मनसि सल्लीने क्व चेन्द्रियविचारणा ।।२०।।

**इंद्रियव्यापार शिवात लीन । उरला नाही देहाभिमान । त्यासी नसे जरा-मरण । कारण की ते देहधर्म ।।४३।। नसे भूक नसे तहान । कारण ते प्राणाचे धर्म जाण । ऐसा शिवयोगी विलक्षण । जगी राहूनि वेगळा ।।४४।। जिकडे मन होते प्रवृत्त । तिकडे इंद्रिये धावती समस्त । मन जेथे राहे स्थित । इंद्रिये तेथे राहती ।।४५।। शिवाठायी ते होता स्थिर । कैसी इंद्रिये धावतील बाहेर? । इंद्रियांचा बाह्य व्यवहार । थांबे जाण योग्याचा ।।४६।।**

यद्यत् पश्यन् दृशा योगी मनसा चिन्तयत्यपि । तत्तत् सर्वं शिवाकारं संविद्रूपं प्रकाशते ।।२१।।

करणैः सहितं प्राणं मनस्याधाय संयमी । योजयेत् स शिवः साक्षात् यत्र नास्ति जगद्भ्रमः ।।२२।।

सर्वेन्द्रियप्रवृत्त्या च बहिरन्तः शिवं यजन् । स्वच्छन्दचारी सर्वत्र सुखी भवति संयमी ।।२३।।

**तो जे जे पाहतो नेत्राने । तो जे चिंतन करितो मनाने । ते चिद्रूप शिवरूपाने । असे सारे**

**प्रकाशमान ।।४७।। ऐसा आत आणि बाहेर । होई शिवसाक्षात्कार । त्याच्या अंतर्बाह्य विश्वी समग्र । शिवचि व्यापूनि राहिला ।।४८।। इंद्रियांसहित प्राण । करूनि मनामाजी धारण । ते मन तो स्थिर करी पूर्ण । परशिवब्रह्मात ।।४९।। इंद्रिये मन आणि प्राण । जो शिवासी करितो समर्पण । तो साक्षात शिवरूपचि जाण । विश्वभ्रांती नसे तया ।।५०।। ऐसा सर्वेंद्रियांद्वारे । शिवासी पूजितो सर्वप्रकारे । तो स्वच्छंदाचारी होऊनि विचरे । सर्वसुखी होऊनी ।।५१।।**

### **प्राणानुग्रहस्थल** - (६५)

शिवस्य परकायस्य यत् तात्पर्यावलोकनम् । तत्प्राणानुग्रहः प्रोक्तः सर्वेषां तत्त्वदर्शिभिः ।।२४।।

प्राणो यस्य लयं याति शिवे परमकारणे । कुतस्तस्येन्द्रियस्फूर्तिः कुतः संसारदर्शनम् ।।२५।।

**इंद्रियानुग्रहाने संपन्न । योगी कुंभकाने निरोधूनि प्राण । सर्व जग दृश्यमान । पाहे शिव-स्वरूप ।।५२।। तैसा लोकांनी प्राणनिग्रह । करावा ऐसा धरूनि आग्रह । त्यांच्यावरी करी अनुग्रह । हेचि प्राणानुग्रहस्थल ।।५३।। योगी प्राणायामयुक्त । तेणे प्राण झाला नियंत्रित । हा प्राणवायूवरी केला खचित । शिवयोग्याने अनुग्रह ।।५४।। झाला नियंत्रित प्राण । तो जाई शिवाकडे घेऊन । हा प्राणानेचि केला जाण । शिवयोग्यावरी अनुग्रह ।।५५।। ज्या शिवयोग्याचा प्राण । परमकारण शिवात लीन ।**

**त्यास कसले संसारदर्शन । आणि इंद्रियव्यापारही? ।।५६।।**

करणेषु निवृत्तेषु स्वार्थसंगात् प्रयत्नतः । तैः समं प्राणमारोप्य स्वान्ते शान्तमतिः स्वयम् ।।२६।।

शान्तत्वात् प्राणवृत्तीनां मनः शाम्यति वृत्तिभिः । तच्छान्तौ योगिनां किंचिच्छिवादन्यन्न दृश्यते ।।२७।।

**करूनि प्राणायाम कुंभक । सर्वेंद्रियांसी यत्नपूर्वक । विषयांपासूनि करी विमुख । योगी प्राणानुग्रह-स्थली ।।५७।। अंतर्मुख इंद्रिये प्राणात । विलीन करूनि राहे शांत । अनुभवी आतल्या आत । परमानंद अपार ।।५८।। प्राणवृत्ती होता शांत । प्रशांत होऊनि राहे चित्त । मग परशिवाव्यतिरिक्त । त्यासी काही दिसेना ।।५९।। कमलदलाच्या ताटात । जो जेविला चंद्रामृत । तो चकोर काय वाळवंटात । वाळू चुंबीत भ्रमेल? ।।६०।। तैसा जो शिवानंदी लीन । त्याची इंद्रिये पुन्हा फिरून । न करिती विषयसेवन । सत्य जाण अगस्त्या ।।६१।।**

प्राण एव मनुष्याणां देहधारणकारणम् । तदाधारः शिवः प्रोक्तः सर्वकारणकारणम् ।।२८।।

निराधारः शिवः साक्षात् प्राणस्तेन प्रतिष्ठितः । तदाधारा तनुर्ज्ञेयः जीवो येनैव चेष्टते ।।२९।।

शिवे प्राणो विलीनोऽपि योगिनो योगमार्गतः । स्वशक्तिवासनायोगाद् धारयत्येव विग्रहम् ।।३०।।

**मनुष्याचे जे देहधारण । त्याला प्राणचि मुख्य कारण । त्या प्राणासही असे कारण । सर्वकारण**

**परशिव ।।६२।। शिव स्वये निराधार । परि तो ब्रह्मांडांसी आधार । प्रत्यक्ष प्राणासही साचार । असे आधार शिवचि ।।६३।। त्या प्राणाधारेचि शरीर । मृत्युलोकी राहते स्थिर । चलनवलनादी व्यवहार । जीव करी प्राणाधारे ।।६४।। शरीरी जोवरी राहे प्राण । तोवरी शरीराचे चलनवलन । प्राण जाता होई निष्प्राण । मृत म्हणती लोक सर्व ।।६५।। होई शिवयोग्याचा प्राण । योगमार्गाने शिवात लीन । तरी तो करी देहधारण । शक्तिसंस्कारबळाने ।।६६।। प्राण लोपला शिवाठायी । तरी देहाचे न विघडे काही । जो प्राणासही प्राणदायी । तो शिव अंतरी म्हणूनी ।।६७।। ज्या शिवाच्या प्रेरणेमुळे । अवघे ब्रह्मांड हले डुले । तो शिव ज्याच्या हृदयी खेळे । त्याच्या देहासी भय काय? ।।६८।।**

स चाभ्यासवशाद्भूयः सर्वतत्त्वातिवर्तिनि । निष्कलंके निराकारे निरस्ताशेषविक्लवे ।।३१।।

चिद्विलासपरिस्फूर्तिपरिपूर्णसुखाद्वये । शिवे विलीनः सर्वात्मा योगी चलति न क्वचित् ।।३२।।

प्रध्वस्तवासनासंगात् प्राणवृत्तिपरिक्षयात् । शिवैकीभूतसर्वात्मा स्याणुवद्भाति संयमी ।।३३।।

**जो निष्कलंक सर्वतत्त्वातीत । निराकार सर्वबाधारहित । चिद्विलासस्फुरणे पूर्ण आनंदयुक्त । अद्वितीय परशिव ।।६९।। त्या शिवात अभ्यासेकरून । योग्याने प्राण केला विलीन । म्हणूनि तो चलनवलन-। विरहित राहे होऊनी ।।७०।। त्याच्या वासना झाल्या ध्वस्त । प्राणव्यवहार झाला**

**स्थगित । तो निश्चल राहे स्थाणुवत् । लिंगी समरस होऊनी ।।७१।।**

**कायार्पितस्थल** - (६६)

शिवस्य पररूपस्य सर्वानुग्राहिणोऽर्चने । त्यागो देहाभिमानस्य कायार्पितमुदाहृतम् ।।३४।।

यदा योगी निजं देहं शिवाय विनिवेदयेत् । तदा भवति तद्रूपं शिवरूपं न संशयः ।।३५।।

**सर्वानुग्रहकारक शिवयोगी । इष्टलिंगपूजाप्रसंगी । देहाभिमान त्यागूनि शिवालागी । देह करी अर्पण ।।७२।। काया शिवासी करणे अर्पित । हेचि स्थल असे कायार्पित । जे दिले शिवाने ते परत । शिवासी लागे करावे ।।७३।। विचारे पाहता मनुष्यशरीर । परशिवाची कलाकृतीच सुंदर । हे अद्भुत शरीरयंत्र । त्याने कैसे निर्मिले? ।।७४।। अस्थी मज्जा मांस जाण । झाकिले त्वचा पांघरून । सामर्थ्यशाली विलक्षण । मेंदू अद्भुत निर्मिला ।।७५।। सूक्ष्म जीव जसा तीळ । मातृगर्भी धरितो मूळ । त्याचे पालनपोषण सकळ । होई मातृदेहात ।।७६।। दिसामासी वाढे जीव । त्यास फुटती अवयव । मग सानुले अभिनव । धरी रूप गोजिरे ।।७७।। यात मानवी कर्तृत्व काही । जाणत्यासी दिसत नाही । माता-पिता असती दोही । निर्मितीचे माध्यम ।।७८।। त्यांच्या द्वाराच प्रकृती । जी परशिवाची शक्ती । तीच करिते निर्मिती । यात नसे संशय ।।७९।। जर तिच्या आले मना । तरी बीज एकही फळेना ।**

**कन्या पुत्र संततीविना । जीव जगी वर्तती ।।८०।। ऐसा आपुला देह जाण । जो ज्या शिवाने केला प्रदान । तो त्यालाच करावा लागे अर्पण । मोक्षमार्गी चालताना ।।८१।। म्हणूनि शिवयोगी निश्चित । काया करी शिवार्पित । तेणे तो शिवरूपचि होत । यात न काही संदेह ।।८२।। कापूर अग्नीत मिळाला । तो अग्निरूपचि होऊनि ठेला । तैसा शिवाठायी राहिला । शिव होऊनि शिवयोगी ।।८३।।**

इन्द्रियप्रीतिहेतूनि विषयासंगजानि च । सुखानि सुखचिद्रूपे शिवयोगी निवेदयेत् ।।३६।।

दर्शनात् स्पर्शनाद् भुक्तेः श्रवणाद् घ्राणनादपि । विषयेभ्यो यदुत्पन्नं शिवे तत्सुखमर्पयेत् ।।३७।।

देहद्वारेण यद्यत् स्यात् सुखं प्रासंगमात्मनः । तत्तन्निवेदयन् शम्भोर्योगी भवति निर्मलः ।।३८।।

**इंद्रियांसी ज्यांची प्रीती । जी विषयांपासूनि सुखे मिळती । चिदानंदरूप शिवाप्रती । तीही अर्पण करावी ।।८४।। शब्दस्पर्शादी विषयांपासून । जी सुखे होती उत्पन्न । ती सर्वही शिवास अर्पण । करावी शिवयोग्याने ।।८५।। ऐकतो स्पर्शितो पाहतो काही । चाखितो हुंगितो ते सर्वही । शिवासाठीच करितो पाही । ऐसा भाव असावा ।।८६।। खाणे पिणे भोग जे जे । ते ते सर्व शिवासी अर्पिजे । शिवार्पण करूनि स्वीकारिजे । प्रसादरूप म्हणूनी ।।८७।। शब्दप्रसाद स्पर्शप्रसाद । रूपप्रसाद रसप्रसाद । गंधप्रसाद ऐसे प्रसाद-। रूप व्हावे विषय सर्व ।।८८।। ऐसी घडता सहज क्रिया । तीच पूजा असे**

मुनिवर्या । शिवार्पित सकल दिनचर्या । असे शिवयोग्याची ।।८९।। मग त्याचे सहज चालणे । म्हणजे प्रदक्षिणाच घालणे । त्याचे सहज शब्द बोलणे । होई शिवस्तोत्रचि ।।९०।। ऐसी दशेंद्रियांकडून । जी सुखे लाभती त्यास पूर्ण । ती सर्व करूनि शिवार्पण । तो होई निर्लिप्त ।।९१।। ऐसी कायिक सुखे जाण । परशिवासी करणे अर्पण । हेचि असे कायार्पण । मुनिवर्या अगस्त्या ।।९२।।

**करणार्पितस्थल** - (६७)

आसंजनं समस्तानां करणानां परात्परे । शिवे यत् तदिदं प्रोक्तं करणार्पितमागमे ।।३९।।

यद्यत्करणमालम्ब्य भुंक्ते विषयजं सुखम् । तत्तच्छिवे समर्प्यैष करणार्पक उच्यते ।।४०।।

आंतर बाह्य इंद्रिये समस्त । परात्पर शिवाशी करणे संयुक्त । यास म्हणती करणार्पित-। स्थल शिवागमांमध्ये ।।९३।। इंद्रियांद्वारे जे विषयसुख । उत्पन्न होते ते अशेख । जो शिवार्पित करी त्यास 'करणार्पक' । नाव असे मुनिवरा ।।९४।। शरीर एकदा केले अर्पण । मग इंद्रियार्पणाचे काय प्रयोजन । इंद्रियांचा समूह पूर्ण । हेचि असे शरीर ।।९५।। या शंकेसी उत्तर एक । इंद्रियांद्वारे सुख वैषयिक । मिळे तेही भक्तिपूर्वक । अर्पण करावे शिवासी ।।९६।। ज्ञान-कर्मेंद्रिये दहा घोडे । शरीररथाला जुंपिले पुढे । मनसारथी नेईल तिकडे । शरीररथ धावतो ।।९७।। भल्या भल्या ज्ञानी पुरुषांसी । चकवती इंद्रिये

पाडिती फशी । म्हणूनि निरोधूनि इंद्रियांसी । योगी करितो नियंत्रित ।।९८।। इंद्रिये करिता शिवार्पित । ती सहज होती नियंत्रित । हेचि बोधिले करणार्पित-। स्थली मुनी अगस्त्या ।।९९।।

अहंकारमदोद्रिक्तमन्तःकरणवारणम् । बध्नीयाद् यः शिवालाने स धीरः सर्वसिद्धिमान् ।।४१।।

इन्द्रियाणां समस्तानां मनः प्रथममुच्यते । वशीकृते शिवे तस्मिन् किमन्यैस्तद्वशानुगैः ।।४२।।

अंत:करणरूपी कुंजर । त्यास अहंकारमद चढे अनिवार । तेणे उन्मत्त होऊनि सान थोर । जुमानीना कोणासी ।।१००।। त्या उन्मत्त मन-हत्तीला । जो बांधे शिवरूपी स्तंभाला । तोचि धैर्यधर म्हणविला । सिद्धिप्राप्त शिवयोगी ।।१०१।। इंद्रिये करणे शिवार्पण । तरी मनचि करावे अर्पण । मन वश होताचि पूर्ण । इंद्रियेही वश होती ।।१०२।। शत्रुसेनेचा सेनापती । युद्धामध्ये लागता हाती । त्याच्यामागे सर्व सेनाही ती । येई शरण निमूटपणे ।।१०३।। तैसे इंद्रियस्वामी मनास । अर्पण केले जर शिवास । तरी त्याचे सेवकही अशेष । इंद्रिये होती अर्पित ।।१०४।। इंद्रियांत प्रमुख मन । ते होता परशिवात लीन । अन्य इंद्रियांसी ठेवणे अधीन । याचे कारण नसेचि ।।१०५।। जैसी देवमूर्तीच्या गळा । एकचि घातली फुलमाळा । त्यातील सर्वचि फुले तिला । सहज होती समर्पित ।।१०६।। एकेक फूल करणे अर्पण । याचे नसेचि काही कारण । तैसे एकचि अर्पिता मन । होती इंद्रिये

**समर्पित ।।१०७।।**

इन्द्रियाणां वशीकारो निवृत्तिरिति गीयते । लक्ष्यीकृते शिवे तेषां कुतः संसारगाहनम् ।।४३।।

संसारविषकान्तारसमुच्छेदकुठारिका । उपशान्तिर्भवेत् पुंसामिन्द्रियाणां वशीकृतौ ।।४४।।

**वश करूनि इंद्रियांप्रत । त्यांना करणे नियंत्रित । यासी नाम दिले येथ । निवृत्ती हे अगस्त्या ।।१०८।। इंद्रिये शिवाठायी अर्पित । झाल्यावरी भवसागरात । बुडण्याचे भय किंचित । सांग कोणा वाटेल? ।।१०९।। संसार असे विषारण्य । विखारी विषयफळे खाऊन । किती वेळा भोगले मरण । जीवाने हे सांगता नये ।।११०।। जो जो जन्मा येथे आला । तो तो मृत्युपंथे गेला । संसारविष-वनी अमर झाला । ऐसा नसे कोणीही ।।१११।। जोवरी हे विषकानन । हृदयी बैसले मांडूनि ठाण । तोवरी चुकेनाच जन्ममरण । संसारातील जीवांसी ।।११२।। इंद्रिये वश झाल्यावर । छेदाया संसारविषकांतार । शांतिरूपी लाभे कुठार । तेणे विषवन छेदावे ।।११३।। सर्व इंद्रिये होता शांत । मन:शांती सहज होते प्राप्त । मन:शांतीनेच संसार निवृत्त । होई योगिमनातूनी ।।११४।।**

इन्द्रियैरेव जायन्ते पापानि सुकृतानि च । तेषां समर्पणादीशे कुतः कर्मनिबन्धनम् ।।४५।।

प्रकाशमाने चिद्वह्नौ बहिरन्तर्जगन्मये । समर्प्य विषयान् सर्वान् मुक्तवज्जायते जनः ।।४६।।

**इंद्रिये जे करिती कर्माचरण । पुण्यपाप उद्‌भवे त्यातून । इंद्रियेच करिता शिवार्पण । कर्मबंधन उरे कैसे? ।।११५।। इंद्रिये होता शिवार्पण । घडेना पापपुण्य त्यांच्याकडून । पापपुण्य नाही म्हणून । जन्म मिळेना जीवासी ।।११६।। जन्म नाही तर मृत्यू नाही । थांबे जन्ममृत्यूचक्र पाही । जन्ममृत्यूतूनि मुक्त होणे ही । मुक्ती सांगती शास्त्रात ।।११७।। शिव हा चित्‌रूप असे अग्नी । अंतर्बाह्य जग राहिला व्यापूनी । त्यात होमिले ते सर्व जळूनी । होते रूप त्याचेच ।।११८।। त्या चिदग्नीत होमितो विषय । तो विषयांसह होई चिन्मय । नाशूनि जन्ममरणभय । त्यासी मुक्ती लाभते ।।११९।।**

चित्तद्रव्यं समादाय जगज्जातं महाहविः । चिद्वह्नौ जुह्वतामन्तः कुतः संसारविप्लवः ।।४७।।

आत्मज्योतिषि चिद्रूपे प्राणवायुनिबोधिते । जुह्वन् समस्तविषयान् तन्मयो भवति ध्रुवम् ।।४८।।

इन्द्रियाणि समस्तानि शरीरं भोगसाधनम् । शिवपूजांगभावेन भावयन् मुक्तिमाप्नुयात् ।।४९।।

**हृत्कमलातील चिदग्नीत । विषयरूप संसार चित्तासहित । जो होमितो त्या योग्याप्रत । कशी असेल संसारबाधा? ।।१२०।। परशिवावाचूनि काही । या ब्रह्मांडी भिन्न नाही । शिवस्वरूप असे मीही । हे ज्ञान असे चिदग्नी ।।१२१।। या ज्ञानाग्नीत जाण । 'हे माझे नव्हे' म्हणून । विषय चित्त जो करी अर्पण । त्यास संसार बाधेना ।।१२२।। प्राणवायूने प्रज्वलित । आत्मज्योतिरूप शिवाग्नीत । इंद्रियजन्य**

**सुखे करी अर्पित । तो असे चिन्मय शिवयोगी ।।१२३।। शरीर हे असे भोगसाधन । ते आणि दशेंद्रिये पूर्ण । यांना मानी जो शिवपूजासाधन । त्यासी लाभे मोक्षपद ।।१२४।।**

**भावार्पितस्थल** - (६८)

शिवे निश्चलभावेन भावानां यत्समर्पणम् । भावार्पितमिदं प्रोक्तं शिवसद्भाववेदिभिः ।।५०।।

चित्तस्थसकलार्थानां मननं यत्तु मानसे । तदर्पणं शिवे साक्षान्मानसो भाव उच्यते ।।५१।।

**निश्चलपणे आपुले भाव । जो शिवार्पित करी सर्व । त्यासी भावार्पितस्थल हे नाव । दिले सद्भाव-ज्ञात्यांनी ।।१२५।। वेलीस जावया वर वर । काठी-भिंतीचा लागे आधार । तैसा भावनेसही संसार-। विषयांचा लागे आश्रय ।।१२६।। संसारविषय दूर सारून । तिला शिवाधार दिला पूर्ण । तर तीच जाते घेऊन । मोक्षाकडे जीवाला ।।१२७।। म्हणूनिया भावना समस्त । शिवासी करावी समर्पित । हेचि सार या भावार्पित-। स्थलाचे जाण अगस्त्या ।।१२८।। अनुभवरूपे पदार्थचिंतन । मनी चाले तो भाव जाण । तेचि चिंतन संसाराकडून । शिवाकडे वळविणे ।।१२९।। संसाराशी जुळले मन । किती युगे गेली उलटून । किती जन्म झाले घेऊन । सांगता नये कोणासी ।।१३०।। इतुका जुना संबंध तोडणे । मन परशिवाशी जुळविणे । हे कठीण असे तरी करणे । अशक्य मात्र नसेचि ।।१३१।।**

भाव एव हि जन्तूनां कारणं बन्धमोक्षयोः । भावशुद्धौ भवेन्मुक्तिर्विपरीते तु संसृतिः ।।५२।।

भावस्य शुद्धिराख्याता शिवोऽहमिति योजना । विपरीतसमायोगे कुतो दुःखनिवर्तनम् ।।५३।।

**भाव असे बंध-मोक्षासी कारण । अशुद्धभावे संसारबंधन । भाव शुद्ध होता पूर्ण । लाभे श्रेष्ठ मुक्तिपद ।।१३२।। शिवोऽहम् म्हणजे मी शिव । हे स्वरूपचिंतन हा शुद्ध भाव । त्याने दूर होऊनि भव । मुक्ती लाभे जीवासी ।।१३३।। 'मी शिव नसे' या विपरीत । भावनेने जर व्यापिले चित्त । तरी संसारदुःखातूनि मुक्त । जीव कैसा होईल? ।।१३४।।**

भोक्ता भोग्यं भोजयिता सर्वमेतच्चराचरम् । भावयन् शिवरूपेण शिवो भवति वस्तुतः ।।५४।।

मिथ्येति भावयन् विश्वं विश्वातीतं शिवं स्मरन् । सत्तानन्दचिदाकारं कथं बद्धुमिहार्हति ।।५५।।

**भोक्ता भोग्य ईश्वर । आणि विश्व चराचर । शिवरूप हा भाव ज्याचा स्थिर । तो होय शिव-स्वरूप ।।१३५।। मिथ्या मानूनि जगास सर्व । विश्वातीत सच्चिदानंदरूप असे शिव । ऐसा दृढ ठेवूनि भाव । जो स्मरीत शिव सदा ।।१३६।। त्यासी मलमायापाश जाण । सांग करतील कैसे बंधन? । त्याच्या लेखी संसारालागून । नसे काही अस्तित्व ।।१३७।। प्रपंचासी मिथ्या ऐसे । येथे म्हटले बोधनमिषे । तरी प्रपंचास अस्तित्व नसे । ऐसा नाही अभिप्राय ।।१३८।। ज्यांनी विश्व मिथ्या मानिले ।**

ते सर्व हे जग सोडूनि गेले । विश्व आहे तसेचि राहिले । हे ध्यानी धरावे ।।१३९।। जे विश्व शिवनिर्मित । ते कैसे असेल असत्य? । अगस्त्या वीरशैवसिद्धान्तात । विश्व सत्य मानिले ।।१४०।। विश्वावरील ममत्व त्यागणे । म्हणजे विश्व मिथ्या मानणे । हाचि अर्थ सुज्ञ जने । येथे पाहिजे घेतला ।।१४१।।

सर्वं कर्मार्चनं शम्भोर्वचनं तस्य कीर्तनम् । इति भावयतो नित्यं कथं स्यात्कर्मबन्धनम् ।।५६।।

सर्वेन्द्रियगतं सौख्यं दुःखं वा कर्मसम्भवम् । शिवार्थं भावयन् योगी जीवन्मुक्तो भविष्यति ।।५७।।

मी करितो जे कर्माचरण । ते ते सर्व शिवार्चन । मी जे बोलतो ते शिवकीर्तन । ऐसा दृढ भाव ज्याचा ।।१४२।। अशा शिवयोग्यालागून । कैसे कर्माचे पडेल बंधन? । त्याचे अंतर्बाह्य विश्व पूर्ण । शिवभावाने व्यापिले ।।१४३।। इंद्रियांद्वारे मिळे सुख । अथवा दुष्कर्मांनी मिळे दुःख । ते सर्वही करी देख । परशिवासी अर्पण ।।१४४।। अशा दृढ भावे जो युक्त । तो शिवयोगी जाण जीवन्मुक्त । ऐसे असे हे स्थल भावार्पित । ध्यानी घेई मुनिवरा ।।१४५।। आता सांगेन शिष्यस्थल । शिष्यलक्षणे उत्तम निर्मळ । ती तुझ्याठायीच सकळ । वसती अगस्त्य शिष्यवरा ।।१४६।। जी लक्षणे शिष्याठायी । श्रीगुरूने अपेक्षावी । ती सर्वही तुझ्या देही । सहजभावे नांदती ।।१४७।। जी आधीच तुला अवगत । तीच तुज निरूपितो येथ । तुझे करूनिया निमित्त । जगासाठी सांगणे ।।१४८।। देखणे लाभले शरीर ।

**सुलक्षणी पत्नीही सुंदर । मेरूइतुकी संपत्ती थोर । जरी कोणास लाभली ।।१४९।। कीर्ती गाजे दशदिशांत । परि गुरुचरणकमलात । जरी नसेल त्याचे चित्त । तरी सारे व्यर्थचि ।।१५०।। ईश्वर भोग करी प्रदान । गुरू मुक्त करी भोगांपासून । म्हणूनि श्रीगुरू ईश्वराहून । थोर मानिला संतांनी ।।१५१।। गुरू उत्तम गुणमंडित । शिवाद्वैतशास्त्रपारंगत । तरी शिष्यही तैसाचि खचित । त्यास शोभेसा लागेल ।।१५२।। ज्ञान द्यावया गुरू अधीर । शिष्य श्रवण कराया तत्पर । ऐसा जुळे योग तेथे मधुर । भवहर ज्ञान प्रकाशे ।।१५३।। ती उत्तम शिष्यलक्षणे । ऐक अगस्त्या स्थिर मनाने । जगासी प्रकाशाचे देणे । देणे तुझ्या निमित्ते ।।१५४।।**

**शिष्यस्थल** - (६९)

शासनीयो भवेद्यस्तु परकायेन सर्वदा । तत्प्रसादात्तु मोक्षार्थी स शिष्य इति कीर्तितः ।।५८।।

भावो यस्य स्थिरो नित्यं मनोवाक्कायकर्मभिः । गुरौ निजे गुणोदारे स शिष्य इति गीयते ।।५९।।

**भावार्पितयुक्त परयोग्याकडून । जो प्राप्त करूनि घेई ज्ञान । गुरुकृपेने मोक्ष पूर्ण । अपेक्षितो तो शिष्य ।।१५५।। मुक्तीची पूर्ण तळमळ । ज्याच्या मनी नांदते प्रबळ । तोचि शिष्य जाण निर्मळ । मुनिवर्य अगस्त्या ।।१५६।। ज्ञानवैराग्यादी गुणांनी । मंडित जो गुरू कैवल्यदानी । त्याच्याठायी मन-**

**वाचा-कर्मांनी । जो स्थिर असे तो शिष्य ।।१५७।। गुरुध्यान गुरुस्तोत्र । करी गुरुपूजा पवित्र । गुरुठायी एकमात्र । ज्ञान पाहे मूर्तिमंत ।।१५८।।**

शान्तो दान्तस्तपश्शीलः सत्यवाक् समदर्शनः । गुरौ शिवे समानस्थः स शिष्याणामिहोत्तमः ।।६०।।

गुरुमेव शिवं पश्येच्छिवमेव गुरुं तथा । नैतयोरन्तरं किंचिद्विजानीयाद्विचक्षणः ।।६१।।

**तपोनिष्ठ शांत दांत । सत्यवादी समदृष्टियुक्त । अभेद मानी गुरु-शिवात । तोचि शिष्य सर्वोत्तम ।।१५९।। मनावरी ठेवणे नियंत्रण । तो जाणावा 'शांत' गुण । करणे दशेंद्रियांचे नियमन । त्याला 'दांत' म्हणावे ।।१६०।। 'तप' त्रिविध असे देख । कायिक वाचिक मानसिक । देहाने सेवा करणे हे कायिक । माता-पिता-गुरु-शिवाची ।।१६१।। शिवनाम-मंत्रजप करणे । शब्दे कोणास न दुखविणे । सत्य आणि प्रिय बोलणे । हे तप असे वाचिक ।।१६२।। भगवन्नामाचे सर्वदा चिंतन । इच्छिणे प्राणिमात्रांचे कल्याण । हे मानसिक तप जाण । तप म्हणजे सहनशक्ती ।।१६३।। मृत्तिका आणि कांचन । शत्रू आणि मित्र जाण । यांना लेखणे समसमान । हेचि 'समदर्शित्व' ।।१६४।। या उत्तम गुणांनी युक्त । भेद न करी गुरु-शिवात । तोचि सर्वोत्तम शिष्य निश्चित । गुरुपदासी पात्र तो ।।१६५।। गुरू हाचि असे**

**शिव । शिव हाचि गुरुदेव । ऐसा अभेद जाणे सर्व । तो शिष्य विचक्षण ।।१६६।।**

शिवाचारे शिवध्याने शिवज्ञाने च निर्मले । गुरोरादेशमात्रेण परां निष्ठामवाप्नुयात् ।।६२।।

ब्रह्माण्डबुद्बुदोद्भूतं मायासिन्धुं महत्तरम् । गुरोः कवलयत्याशु कटाक्षवडवानलः ।।६३।।

**शिवाचार आणि शिवध्यान । निर्मल असे जे शिवज्ञान । याविषयी गुर्वाज्ञा प्रमाण । मानावी शिष्यवराने ।।१६७।। वीरशैवांचे तत्त्वज्ञान । षट्स्थल पंचाचार अष्टावरण । हे सर्वही घ्यावे जाणून । गुरूकडूनि शिष्याने ।।१६८।। असेल मनी शंका देख । ती गुरूसी विचारावी निःशंक । अज्ञान-आवरणे एकेक । गुरूपदेशे फेडावी ।।१६९।। जैसे बुडबुडे समुद्रावर । तैसी ब्रह्मांडे उठती ज्यावर । तो मायासागर आटवी दुस्तर । गुरुकृपाकटाक्ष-वडवाग्नी ।।१७०।।**

गुरोः कटाक्षवेधेन शिवो भवति मानवः । रसवेधाद् यथा लोहो हेमतां प्रतिपद्यते ।।६४।।

न लंघयेद् गुरोराज्ञां ज्ञानमेव प्रकाशयन् । शिवासक्तेन मनसा सर्वसिद्धिमवाप्नुयात् ।।६५।।

**जैसे रसायन-प्रक्रियेने । लोखंडाचे होई सोने । तैसा गुरुकृपाकटाक्षस्पर्शाने । शिष्य होई शिवरूप ।।१७१।। गुर्वाज्ञा न उल्लंघावी । शिवावरी दृढ भक्ती असावी । तेणे शिवज्ञान प्रकाशूनि**

**सर्वही । सिद्धी प्राप्त होतील ।।१७२।।**

शिवादन्यज्जगन्मिथ्या शिवः संवित्स्वरूपकः । शिवस्त्वमिति निर्दिष्टो गुरुणा मुक्त एव सः ।।६६।।

गुरोर्लब्ध्वा महाज्ञानं संसारामयभेषजम् । मोदते यः सुखी शान्तः स जीवन्मुक्त एव हि ।।६७।।

**जग शिवाहूनि असे भिन्न । हे असत्य असे विधान । शिव ज्ञानस्वरूप पूर्ण । तूही असशी शिवरूप ।।१७३।। ऐसा गुरूकडूनि उपदेश । प्राप्त होई ज्या शिष्यास । तो जीवन्मुक्तचि अशेष । नि:संशय जाणावा ।।१७४।। संसार-महारोग घोर । त्यासी महाज्ञान-औषध करी दूर । ते गुरूकडूनि घेऊनि अपार । रमे शिवसुखानंदी ।।१७५।। तो शिष्य गुरुकृपायुक्त । होऊनि राग-द्वेषविरहित । अगस्त्या होतो जीवन्मुक्त । ऐसे असे हे शिष्यस्थल ।।१७६।।**

**शुश्रूषुस्थल** - (७०)

बोध्यमानः स गुरुणा परकायेन सर्वदा । तच्छुश्रूषारतः शिष्यः शुश्रूषुरिति कीर्त्यते ।।६८।।

किं सत्यं किं नु वासत्यं क आत्मा कः परः शिवः । इति श्रवणसंसक्तो गुरोः शिष्यो विशिष्यते ।।६९।।

**परब्रह्मरूप श्रीगुरूकडून । ज्याने घेतला उपदेश पूर्ण । त्याच्या श्रवणात आसक्त मन । तो शिष्य**

शुश्रूषु ।।१७७।। काय सत्य असत्य जाण । जीव कोण शिव कोण । हे जाणायाची मनी पूर्ण । ज्याच्या असे उत्कंठा ।।१७८।। ऐसा जो शिष्य ज्ञानलालस । तो जो अंगे सेवितो श्रीगुरूस । त्याच्याहूनही श्रेष्ठ विशेष । असे जाण घटोद्भवा ।।१७९।। सुवर्णकुंडले माणिक-रत्ने । ही नव्हेत कर्णाची भूषणे । गुरूपदेश श्रवण करणे । हेचि भूषण कर्णाचे ।।१८०।। म्हणूनि करावी श्रवणभक्ती । गुरूपदेश साठवावा चित्ती । 'आत्मा वा अरे श्रोतव्य:' ही श्रुती । ध्यानी धरावी शिष्याने ।।१८१।।

श्रुत्वा श्रुत्वा गुरोर्वाक्यं शिवसाक्षात्क्रियावहम् । उपशाम्यति यः स्वान्ते स मुक्तिपदमाप्नुयात् ।।७०।।

न बुध्यति गुरोर्वाक्यं विना शिष्यस्य मानसम् । तेजो विना सहस्रांशोः कथं स्फुरति पंकजम् ।।७१।।

जी घडविती शिवसाक्षात्कार । ऐसी गुरुवाक्ये वारंवार । ऐकूनि अंतरी शांती अपार । अनुभवूनि तो मुक्त होय ।।१८२।। जोवरी दृढ न होई ज्ञान । तोवरी श्रीगुरूपाशी जाऊन । पुन:पुन्हा करावा श्रवण । गुरूपदेश एकाग्रतेने ।।१८३।। पोट भरे तोवरी भोजन । तृषा भागेतोवरी जल-प्राशन । तैसाचि उपदेश करावा श्रवण । आत्मज्ञान होईतोवरी ।।१८४।। सूर्यकिरण-स्पर्शाविण । कमलिनी न विकासे पूर्ण । तैसे गुरुवाक्य-श्रवणाविण । शिष्य हृत्कमल विकासेना ।।१८५।। गुरूपदेशाविण निश्चित । शिष्यासी न होय ज्ञान प्राप्त । म्हणूनि निजहृदयसंपुटात । गुरुवाक्ये

**जपावी ।।१८६।।**

सूर्यस्योदयमात्रेण सूर्यकान्तः प्रकाशते । गुरोरालोकमात्रेण शिष्यो बोधेन भासते ।।७२।।

अद्वैतपरमानन्दप्रबोधैकप्रकाशकम् । उपायं शृणुयाच्छिष्यः सद्‌गुरुं प्राप्य सांजलिः ।।७३।।

**सूर्याचा उदय होताक्षणी । प्रकाशतो सूर्यकांत मणी । तैसा गुरुकृपाकटाक्षे ज्ञानी । शिष्य जगी प्रकाशे ।।१८७।। जाऊनिया श्रीगुरूसमोर । जोडूनिया दोन्ही कर । जेणे परमानंद प्रकाशे अपार । तो उपाय ऐकावा ।।१८८।।**

किं तत्त्वं परमं ज्ञेयं केन सर्वे प्रतिष्ठिताः । कस्य साक्षात्क्रिया मुक्तिः कथयेति समासतः ।।७४।।

इति प्रश्ने कृते पूर्वं शिष्येण नियतात्मना । ब्रूयात्तत्त्वं गुरुस्तस्मै येन स्यात् संसृतेर्लयः ।।७५।।

**जाणण्यायोग्य श्रेष्ठ तत्त्व ते । श्रीगुरुदेवा विश्वी कोणते? । हे समग्र चराचर राहते । स्थिर सांगा कशावरी? ।।१८९।। कोणाच्या साक्षात्काराने प्राप्त । मोक्ष होतो जीवाप्रत? । हे कृपा करूनि समस्त । मज गुरुराया सांगावे ।।१९०।। ऐसे शिष्याचे ऐकूनि प्रश्न । श्रीगुरूने करावे समाधान । ज्यायोगे संसारलय होई पूर्ण । तो तत्त्वोपदेश करावा ।।१९१।।**

शिव एव परं तत्त्वं चिदानंदसदाकृतिः । स यथार्थस्तदन्यस्य जगतो नास्ति नित्यता ।।७६।।

अयथार्थप्रपंचोऽयं प्रतितिष्ठति शंकरे । सदात्मनि यथा शुक्तौ रजतत्त्वं व्यवस्थितम् ।।७७।।

**सच्चिदानंदस्वरूप शिवतत्त्व । तेचि ज्ञेय परमतत्त्व । त्याहूनि भिन्न तत्त्वांसी नित्यत्व । नसे, हेचि सनातन ।।१९२।। शिंपल्याठायी चांदी भासे । त्या भ्रांतीस आधार शिंपचि असे । नामरूपात्मक प्रपंचासही तैसे । अधिष्ठान शिवाचे ।।१९३।। नित्य परशिवतत्त्वावर । स्थिरावला अनित्य संसार । अस्थिर प्रपंचासी आधार । असे स्थिर शिवतत्त्व ।।१९४।।**

शिवोऽहमिति भावेन शिवे साक्षात्कृते स्थिरम् । मुक्तो भवति संसारान्मोहग्रन्थेर्विभेदतः ।।७८।।

शिवं भावय चात्मानं शिवादन्यं न चिन्तय । एवं स्थिरे शिवाद्वैते जीवन्मुक्तो भविष्यसि ।।७९।।

एवं प्रचोदितः शिष्यो गुरुणा गुणशालिना । शिवमेव जगत् पश्यन् जीवन्मुक्तोऽभिजायते ।।८०।।

**'मी शिव' या भावे साचार । होई शिवसाक्षात्कार । सुटूनि संसारमोहग्रंथी सत्वर । मोक्ष येई हातासी ।।१९५।। 'मी शिवरूप' हा भाव । हृदयी दृढ धरी सदैव । शिवाशी अभिन्न प्रपंच सर्व । ऐसे करी चिंतन ।।१९६।। ज्ञान शिवाद्वैतपर । तुझ्याठायी होईल स्थिर । मग जीवन्मुक्तिसुख निरंतर । अनुभवशील शिष्यवरा ।।१९७।। ऐसा ज्ञानवैराग्ययुक्त । श्रीगुरूकडूनि उपदेश होता प्राप्त । शिष्य**

**होई जीवन्मुक्त । विश्वी शिवास पाहूनी ।।१९८।। येथे संपले शुश्रूषुस्थल । आता प्रसादिस्थलातील अंतिम स्थल । तुज निरूपितो सेव्यस्थल । श्रवण करी मुनिवर्या ।।१९९।।**

**सेव्यस्थल** - (७१)

गुरुवाक्यामृतास्वादात् प्राप्तबोधमहाफलः । शुश्रूषुरेव सर्वेषां सेव्यत्वात् सेव्य उच्यते ।।८१।।
गुरूपदिष्टे विज्ञाने चेतसि स्थिरतां गते । साक्षात्कृतशिवः शिष्यो गुरुवत् पूज्यते सदा ।।८२।।

**आस्वादूनि गुरुवाक्यामृत । शिवाद्वैतज्ञान केले प्राप्त । तो शुश्रूषु सेवा घ्यावया उचित । ठरे म्हणूनि तो सेव्यस्थल ।।२००।। जो जहाला जीवन्मुक्त । तो पूज्य ठरतो लोकांत । लोक सेवा करिती खचित । म्हणूनि तो सेव्य असे ।।२०१।। अमृतत्व करी प्रदान । ऐसे श्रेष्ठ असे गुरु-वचन । ते करूनि सादर श्रवण । जो आचरण करी तो मुक्त ।।२०२।। मनी शिवज्ञान सुस्थिर । झाला शिवाचा साक्षात्कार । तो शिष्यही पूज्य निरंतर । होई गुरूसमानचि ।।२०३।।**

ज्ञानादाधिक्यसम्पत्तिर्गुरोर्यस्मादुपस्थिता । तस्माज्ज्ञानागमाच्छिष्यो गुरुवत् पूज्यतां व्रजेत् ।।८३।।
शिवोऽहमिति भावस्य नैरन्तर्याद्विशेषतः । शिवभावे समुत्पन्ने शिववत् पूज्य एव सः ।।८४।।

विषयासक्तचित्तोऽपि विषयासंगवर्जितः । शिवभावयुतो योगी सेव्यः शिव इवापरः ।।८५।।

**गुरू श्रेष्ठ ज्या ज्ञानामुळे । तेचि ज्ञान शिष्यासी मिळे । म्हणूनि त्यासही लाभले । गुरूसारखे पूज्यत्व ।।२०४।। शिवोऽहंभावाभ्यासेकरून । ज्याच्याठायी शिवभाव पूर्ण । जागे तो शुश्रूषुही शिवासमान । पूज्य ठरे जगात ।।२०५।। शुश्रूषु जो शिवभावेयुक्त । तो विषयांसंगे दिसे वर्तत । परि तो नसे विषयासक्त । विषयसंगरहित असे ।।२०६।। त्याचे मन शिवात लीन । म्हणूनि तो विषय-संगहीन । जगात परशिवासमान । त्यासी लाभे पूज्यता ।।२०७।।**

मुक्तः संशयपाशतः स्थिरमना बोधे च मुक्तिप्रदे
मोहं देहभृतां दृशा विघटयन् मूलं महासंसृतेः ।
सत्तानन्दचिदात्मके निरुपमे शैवे परस्मिन् पदे
लीनात्मा क्षयितप्रपंचविभवो योगी जनैः सेव्यते ।।८६।।

**जो संसारपाशातूनि मुक्त । जो स्थिर मुक्तिप्रद शिवाद्वैतात । घोर संसारकारण मोह निवृत्त । जो करी कृपाकटाक्षाने ।।२०८।। सच्चिदानंदरूप निरुपम । शिवात जो जहाला लीन । प्रपंचवैभवही**

**झाले विलीन । ज्याच्या अध्यात्मज्ञानात ।।२०९।। तो योगी शिवरूप होऊन । ठरे जगात पूज्यमान । सेवा सर्व जनांकडून । घेण्यासी पात्र ठरे तो ।।२१०।। लिंगषट्स्थलांतर्गत । प्रसादिस्थल संपले येथ । पुढे प्राणलिंगिस्थल विस्तृत । विशद करीन अगस्त्या ।।२११।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।२१२।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । सप्तदशोऽध्याय पूर्ण हा ।।२१३।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतप्रसादिस्थले कायानुग्रहादिनवविधस्थलप्रसंगो नाम सप्तदशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय अठरावा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु मरुळाराध्याय नमः ।। ॐ शिवाय नमः देवाय । महादेवाय नमः अव्ययाय । अव्यग्राय नमः दक्षाध्वरहराय । पराय नमः पूषदन्तभिदे ।।१।। विश्व चाळवूनि सगळे । आपण राहणे नामानिराळे । यात प्राविण्य तू मिळविले । ऐसे मला भासते ।।२।। मज लावूनि लेखनकाम । तू सुखे करितोस आराम । हा करितो काय म्हणून । दुरूनि पाहतो गंमत ।।३।। तरी तू बैस ठेवूनि लक्ष । मी कार्यात राहीन दक्ष । जैसे सूर्यासी ठेवूनि साक्ष । जगी चालती व्यवहार ।।४।। असो श्रोतेहो सावधान । ऐका पुढील विवेचन । जे अगस्तीस कथितील गहन । जगद्‌गुरू रेणुकाचार्य ।।५।।**

## लिंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

अगस्त्य उवाच-

प्रसादिस्थलसम्बद्धाः स्थलभेदाः प्रकीर्तिताः । प्राणलिंगिस्थलारूढान् स्थलभेदान् वदस्व मे ।।१।।

**रेणुकाचार्यांसी म्हणती अगस्त्य । प्रसादिस्थलासी संबंधित । उपस्थले कथिली समस्त । आता**

**सांगा प्राणिलिंगिस्थल ।।६।।**

श्रीरेणुक उवाच-

स्थलानां नवकं प्रोक्तं प्राणलिंगिस्थलाश्रितम् । आदावात्मस्थलं प्रोक्तमन्तरात्मस्थलं ततः ।।२।।

परमात्मस्थलं पश्चान्निर्देहागमसंज्ञकम् । निर्भावागमसंज्ञं च ततो नष्टागमस्थलम् ।।३।।

आदिप्रसादनामाथ ततोऽप्यन्त्यप्रसादकम् । सेव्यप्रसादकं चाथ शृणु तेषां च लक्षणम् ।।४।।

**रेणुकाचार्य म्हणती अगस्त्याप्रत । नऊ उपस्थले प्राणलिंगिस्थलात । त्यांची नावे लक्षणांसहित । आता सर्व निरूपीन ।।७।। आत्मस्थल अंतरात्मस्थल । परमात्मस्थल निर्देहागमस्थल । निर्भावागमस्थल नष्टागमस्थल । आदिप्रसादिस्थल सातवे ।।८।। आठवे अंत्यप्रसादिस्थल । नववे सेव्यप्रसादिस्थल । त्यांची लक्षणेही सकल । आता श्रवण करावी ।।९।।**

### आत्मस्थल - (७२)

जीवभावं परित्यज्य यदा तत्त्वं विभाव्यते । गुरोश्च बोधयोगेन तदात्मायं प्रकीर्तितः ।।५।।

वालाग्रशतभागेन सदृशो हृदयस्थितः । अश्नन् कर्मफलं सर्वमात्मा स्फुरति दीपवत् ।।६।।

**गुरूपदिष्ट शिवज्ञानामुळे । सेव्यस्थलीचा जीवभाव मावळे । त्याचे वर्तन होई सगळे । परब्रह्म-**

**भावाने ।।१०।। स्थिर होई आत्मभाव । म्हणूनि आत्मस्थल हे नाव । देहाभिमानाचे नाव । त्याच्याठायी उरेना ।।११।। केशाग्राच्या शतांशासमान । सूक्ष्म जीवात्मा हृदयी राहून । शुभाशुभ कर्मांची जाण । फळे भोगी आपुल्या ।।१२।। घराच्या एका कोपऱ्यात । जैसा दीप असे तेवत । तरी तो करी प्रकाशित । सर्व घर तेजाने ।।१३।। तैसा जीवात्मा हृदयस्थ । सर्व शरीरी राहूनि व्याप्त । शरीर करीत प्रकाशित । कर्मफले भोगितो ।।१४।।**

आत्मापि सर्वभूतानामन्तःकरणमाश्रितः । अणुभूतो मलासंगादादिकर्मनियन्त्रितः ।।७।।
जपायोगाद्यथा रागः स्फटिकस्य मणेर्भवेत् । तथाऽहंकारसम्बन्धादात्मनो देहमानिता ।।८।।

**आत्मा पंचमहाभूतांसी आश्रयभूत । त्यात परिपूर्ण असे व्याप्त । तरी आणवादी मलांनी आवृत्त । होऊनि राहे अणुरूप ।।१५।। तो शुद्ध नित्य मुक्त जाण । परि कर्मपाशांनी बद्ध होऊन । अंत:करणाचा आश्रय घेऊन । कर्मफले भोगितो ।।१६।। जास्वंदफुलावरी एक । जैसा ठेविता स्फटिक । तो रक्तवर्णाने रंगला देख । दिसे आपुल्या डोळ्यांसी ।।१७।। तैसा मुळातचि काही । आत्मा देहाभिमानी नाही । अहंकारासंबंधाने देही । त्याने धरिला अभिमान ।।१८।। मग जन्मजन्मांतरात । कर्मे करूनि झाला लिप्त । भ्रमत राहिला भोगीत । दु:खे जन्ममरणाची ।।१९।।**

अशरीरोऽपि सर्वत्र व्यापकोऽपि निरंजनः । आत्मा मायाशरीरस्थः परिभ्रमति संसृतौ ।।९।।

आत्मस्वरूपविज्ञानं देहेन्द्रियविभागतः । अखण्डब्रह्मरूपेण तदात्मप्राप्तिरुच्यते ।।१०।।

**तो शरीररहित निरंजन । तरी सर्वत्र विद्यमान । मायाकल्पित देही स्थिर होऊन । भ्रमण करी संसारी ।।२०।। मी एक असूनि अनेक व्हावे । हा संकल्प शिवाठायी उद्भवे । क्षणार्धात माया उभी राहे । विश्वरूप घेऊनी ।।२१।। प्रपंच शिवरूपचि मुळात । परि तो दिसे मायारूपात । तीच नटे होऊनि मूर्त । लाघवी विश्वरूपाने ।।२२।। जैसा सूर्य झाकिला मेघांनी । तो दिसेनाच नयनांनी । मेघ दिसती तेही सूर्यकिरणांनी । प्रकाशित झालेले ।।२३।। तैसा मायेचा व्यवहार । अवलंबूनि असे शिवावर । परि शिवासी लपवूनि समोर । तीच उभी राहते ।।२४।। आत्मा शिवांशचि खचित । परि राहे देही मायाकल्पित । आणि भ्रमे संसारात । भोगीत फळे कर्मांची ।।२५।। जैसा एकचि वासरमणी । बिंबे अनेक दर्पणांतूनी । तैसे अनेक देहांतूनी । दिसे एकचि आत्मतत्त्व ।।२६।। प्राकृत शरीरेंद्रियांपासून । आत्मतत्त्व असे भिन्न । ते ब्रह्मस्वरूप असे हे होता ज्ञान । जीवासी प्राप्त आत्मत्व ।।२७।।**

न चास्ति देहसम्बन्धो निर्देहस्य स्वभावतः । अज्ञानकर्मयोगेन देही भवति भुक्तये ।।११।।

नासौ देवो न गन्धर्वो न यक्षो नैव राक्षसः । न मनुष्यो न तिर्यक्च न च स्थावरविग्रहः ।।१२।।

जो स्वभावत: असे देहरहित । तो देहाने न होय लिप्त । अज्ञान-कर्माने सुखदु:खभोगार्थ । तो होतो देहधारी ।।२८।। आत्मा जीव न देव न गंधर्व । नव्हे यक्ष राक्षस तिर्यक् जीव । नव्हे स्थावरवृक्षादी सर्व । नव्हे स्त्रीपुरुषादी ।।२९।। तो धारण करी ज्या देहाला । त्या नावाने जाई ओळखिला । नसे त्याच्या निजरूपाला । कोणतेही नाव ते ।।३०।।

नानाकर्मविपाकाश्च नानायोनिसमाश्रिताः । नानायोगसमापन्ना नानाबुद्धिविचेष्टिताः ।।१३।।

नानामार्गसमारूढा नानासंकल्पकारिणः । अस्वतन्त्राश्च किंचिज्ज्ञाः किंचित्कर्तृत्वहेतवः ।।१४।।

रंगभूमी हे विश्व विशाल । त्यावरी चाले शिवाचा खेळ । असंख्य जीव जगातील । पात्रे त्याच्या नाटकातली ।।३१।। पात्रे बाहुल्यांच्या जाती । सूत्रदोरी त्याच्या हाती । तोच खेळवी नाना रीती । आपुल्या इच्छेप्रमाणे ।।३२।। जसे ज्याचे कर्म फळे । तसा जीवासी जन्म मिळे । देव तिर्यक् मनुष्य होऊनि खेळे । भोगी नाना सुखदु:खे ।।३३।। प्रत्येकाची बुद्धी भिन्न । धर्म पंथ वेगळा जाण । भिन्न भिन्न संकल्प करून । भिन्न मार्ग चोखाळती ।।३४।। जीव पराधीन अल्पज्ञानी । किंचित कर्तृत्वाचे धनी । शिवाच्या लीलानाटकातूनी । करिती भूमिका सादर ।।३५।। तो एकलाच सूत्रधार । सारे हालवी चराचर । चाले विश्व-रंगमंचावर । त्याचे अखंड नाटक ।।३६।।

लीलाभाजनतां प्राप्ताः शिवस्य परमात्मनः । चोदिताः परमेशेन स्वस्वकर्मानुरूपतः ।।१५।।
स्वर्गं वा नरकं वापि प्राणिनो यान्ति कर्मिणः । पुनः कर्मविशेषेण जायन्ते गर्भकोटरात् ।।१६।।
जाता मृताः पुनर्जाताः पुनर्मरणभाजिनः । भ्रमन्ति घोरसंसारे विश्रान्तिकथया विना ।।१७।।

**ज्याच्या त्याच्या कर्मामुळे । त्याला तैसा जन्म मिळे । कोणाचे पुण्यकर्म फळे । तो भोगी स्वर्ग-सुख ।।३७।। कोणी जाई स्वर्गलोकी । कोणी पिचत पडे नरकी । स्वर्ग-नरक-मृत्युलोकी । जीव करी प्रवास ।।३८।। शिवाची प्रेरणाच जाण । या सर्वांसी असे कारण । शिवाच्या प्रेरणेवाचून । जगी काही घडेना ।।३९।। भोगूनि कर्म राहे शेष । ते भोगाया पुन्हा गर्भवास । जन्ममृत्यूचा प्रवास । ऐसा अखंड चाललेला ।।४०।। मुळी न होता विश्रांत । होऊनि जन्म मरणासक्त । जीव घोर संसारसागरात । घेती बुडी पुन:पुन्हा ।।४१।।**

जीवत्वं दुःखसर्वस्वं तदिदं मलकल्पितम् । निरस्यते गुरोर्बोधाज्ज्ञानशक्तिः प्रकाशते ।।१८।।

**आणवादी मलांनी कल्पित । जीवत्व आत्म्यासी झाले प्राप्त । ते गाठोडेच दु:खाचे समस्त । असे सत्य ऋषिवरा ।।४२।। श्रीगुरूच्या उपदेशातून । लाभता शिवाद्वैतज्ञान । जीवत्वाचे पूर्ण निरसन । होऊनि ज्ञान प्रकाशते ।।४३।। ऐसे हे निरूपिले तुज । अगस्त्या आत्मस्थलाचे गुज । उपरी**

**अन्तरात्मस्थलाचे सहज । करीन आता विवेचन ।।४४।।**

**अन्तरात्मस्थल** - (७३)

यदा निरस्तं जीवत्वं भवेद् गुर्वनुबोधतः । तदान्तरात्मभावोऽपि निरस्तस्य भवेद् ध्रुवम् ।।१९।।

देहस्थितोऽप्ययं जीवो देहसंगविवर्जितः । बोधात् परात्मभावित्वादन्तरात्मेति कीर्तितः ।।२०।।

**गुरूपदेशाने जीवभाव । जेव्हा निवृत्त होई सर्व । तेव्हा हृदयी अन्तरात्मभाव । दृढ होई निश्चित ।।४५।। जीव देहाच्या आत असला । तरी देहसंगरहित होऊनि राहिला । स्वस्वरूपज्ञाने प्राप्त झाला । त्याला अन्तरात्मभाव ।।४६।। तेणे अन्तरात्मा म्हणून । त्यासी ओळखिती ज्ञानी जन । तो जीवभावातून । पूर्ण झाला वेगळा ।।४७।। आत्मा भोगी सुखदुःखे । ऐसे बोलती जरी कौतुके । तरी शुद्धात्म्यासी न स्पर्शू शके । लेप किंचित भोगाचा ।।४८।। गढूळ जलात बिंबले जैसे । सूर्यबिंब मलिन दिसे । परि सूर्यासी न स्पर्शे । किंचितही मालिन्य ।।४९।। हे होई ज्यासी ज्ञान । तोचि अन्तरात्मस्थली जाण । सुखदुःख-भोगांपासून । तो अलिप्त सर्वस्वी ।।५०।।**

आत्मान्तरालवर्तित्वाज्जीवात्मपरमात्मनोः । योगादुभयधर्माणामन्तरात्मेति कीर्तितः ।।२१।।

अहंकारस्य सम्बन्धान्मनुष्यत्वादिविभ्रमः । न स्वभाव इति ज्ञानादन्तरात्मेति कथ्यते ।।२२।।

सुखी दुःखी कर्ता भोक्ता । ही जीवात्म्याची लक्षणे तत्त्वता । असंग अकर्ता अभोक्ता । ही परमात्मलक्षणे ।।५१।। जीवात्मा-परमात्म्यामधील । अगस्त्या जे असे मध्यस्थल । तेचि जाण अंतरात्मस्थल । तो जाणतो दोहींना ।।५२।। तो जेव्हा बहिर्मुख तो जीवभाव । तो अंतर्मुख असे तो शिवभाव । या दोही भावांचा अनुभव । घेई म्हणूनि 'अंतरात्मा' ।।५३।। पात्रामाजी ठेविली फुले । ती काढूनि पात्र स्वच्छ केले । तरी फुलांचा गंध दरवळे । पात्रातूनि मंदसा ।।५४।। तैसा ज्ञानोत्तर अवस्थेत । अविद्यालेश उरे किंचित । तेणे जीवभाव होय जागृत । क्षणकाल योग्याचा ।।५५।। मूर्च्छितासी यावी शुद्ध । आणि तो पुन्हा व्हावा बेशुद्ध । तैसा दोन्ही भावांचा संबंध । असे अन्तरात्मस्थलात ।।५६।। क्षणी जीव क्षणी शिव । ऐसे जागवी दोन्ही भाव । परि जीवत्व हा स्व-भाव । नाही ऐसे जाणतो ।।५७।। जेव्हा अहंकारसंबंध घडे । तेव्हा जीवत्वाची मिठी पडे । या पूर्ण जाणिवेने न मोडे । आत्मभाव अंतरीचा ।।५८।।

यथा पद्मपलाशस्य न संगो वारिणा भवेत् । तथा देहजुषोऽप्यस्य न शरीरेण संगतिः ।।२३।।
नीडस्थितो यथा पक्षी नीडाद्भिन्नः प्रदृश्यते । देहस्थितस्तथात्मायं देहादन्यः प्रकाशते ।।२४।।

कमल जन्मते जलात । तरी ते जलापासूनि अलिप्त । तैसा अंतरात्मा दिसे देहस्थ । तरी त्यापासूनि

**वेगळा ।।५९।। राहे घरट्यात विहग । तरी तो घरट्यापासूनि अलग । तैसा देहात राहूनि देहसंग । न घडे अंतरात्म्यासी ।।६०।।**

आच्छाद्यते यथा चन्द्रो मेघैरासंगवर्जितैः । तथात्मा देहसंगातैरसंगपरिवेष्टितः ।।२५।।

निर्ममो निरहंकारो निरस्तोपाधिविक्लवः । देहस्थोऽपि सदा ह्यात्मा शिवं पश्यति योगतः ।।२६।।

**पूर्णचंद्र आकाशातला । दाट मेघांनी आच्छादिला । दिसे परि तो पूर्ण वेगळा । दूर मेघांपासूनी ।।६१।। तैसा गेला जीवभाव । तो दिसे देही सावयव । परि देहसंगाचा अभाव । असे अंतरात्मस्थली ।।६२।। तो निर्मम निरहंकार । देहेंद्रियादी उपाधींपासूनि दूर । योगसाधनेने त्यास साक्षात्कार । झाला असे शिवाचा ।।६३।।**

भोक्तृभोज्यपरित्यागात् प्रेरकस्य प्रसादतः । भोक्तृताभावगलितः स्फुरत्यात्मा स्वभावतः ।।२७।।

सर्वेषां प्रेरकत्वेन शम्भुरन्तःस्थितः सदा । तत्परिज्ञानयोगेन योगी नन्दति मुक्तवत् ।।२८।।

**मी जीव आणि विषय भोज्य । या भावांसी मानूनि त्याज्य । शिवप्रसादे आत्मरूप-राज्य । अंतरात्मस्थली संपादितो ।।६४।। सर्वांना होऊनि प्रेरक । हृदयी विराजे जगन्नायक । या ज्ञाने मुक्तात्म्यासम देख । तो भोगितो आनंद ।।६५।। आता शिष्यवरा निर्मळा । निरूपीन मी परमात्म-**

**स्थला । ठेवूनि हृदयी तू जिव्हाळा । ऐक आदरपूर्वक ।।६६।।**

**परमात्मस्थल** - (७४)

निर्धूते तत्प्रबोधेन मले संसारकारणे । सामरस्यात् परात्मस्थात् परमात्मायमुच्यते ।।२९।।

सर्वेषामात्मभेदानामुत्कृष्टत्वात् स्वतेजसा । परमात्मा शिवः प्रोक्तः सर्वगोऽपि प्रकाशवान् ।।३०।।

**जे संसारकारण अज्ञान । ते शिवाद्वैतज्ञाने नाशून । शिवसामरस्यभाव प्राप्त होता पूर्ण । त्यास म्हणती परमात्मा ।।६७।। स्वयंप्रकाशित शिव जाण । स्वतेजे विश्वी राहिला व्यापून । जे श्रेष्ठ असे सर्व आत्म्यांहून । ते परमात्मस्वरूप ।।६८।।**

ब्रह्माण्डबुद्बुदस्तोमा यस्य मायामहोदधौ । उन्मज्जन्ति निमज्जन्ति परमात्मा स उच्यते ।।३१।।

यस्मिन् ज्योतिर्गणाः सर्वे स्फुलिंगा इव पावकात् । उत्पत्य विलयं यान्ति तद्रूपं परमात्मनः ।।३२।।

**ज्याच्या मायासागरात । ब्रह्मांड-बुद्बुद्समूह अगणित । उपजती निमती समस्त । ते परमात्मस्वरूप ।।६९।। निरभ्र रात्री आकाशी । दिसती अनंत तारकाराशी । त्या पाहता कळे जाणत्याशी । विशालता विश्वाची ।।७०।। ऐसी विशाल विश्वे अनंत । घडती मोडती जेथे सतत । तो मायासमुद्र ज्यात स्थित । ते परमात्मस्वरूप ।।७१।। स्फुल्लिंग अग्नीतूनि जन्मती । आणि अग्नीतचि**

**विलीन होती । तैसे जीव शिवातूनि उद्भवती । अंती पावती लय त्यात ।।७२।।**

यस्मिन् समस्तवस्तूनि कल्लोला इव वारिधौ । सम्भूय लयमायान्ति तद्रूपं परमात्मनः ।।३३।।

निरस्तमलसम्बन्धं निःशेषजगदात्मकम् । सर्वतत्त्वोपरि प्रोक्तं स्वरूपं परमात्मनः ।।३४।।

**समुद्री लाटा उठती निमती । तैसी भूम्यादी तत्त्वे प्रकृती । ज्यात जन्मती लय पावती । ते परमात्मस्वरूप ।।७३।। मलत्रयसंबंधरहित । नामरूपात्मक जगासी आधारभूत । छत्तीस तत्त्वांहूनि जे श्रेष्ठ सर्वगत । ते परमात्मस्वरूप ।।७४।। बुंधा शाखा फूल पर्ण । या रूपात वृक्ष विद्यमान । तैसे ब्रह्मांडरूपे जे विराजमान । ते परमात्मस्वरूप ।।७५।।**

यथा व्याप्य जगत्सर्वं स्वभासा भाति भास्करः । तथा स्वशक्तिभिर्व्याप्य परमात्मा प्रकाशते ।।३५।।

विश्वतो भासमानोऽपि विश्वमायाविलक्षणः । परमात्मा स्वयंज्योतीरूपो जीवात्मनां भवेत् ।।३६।।

**स्वतेजे सर्व विश्व व्यापून । स्वये प्रकाशे सूर्य आपण । तैसा परमात्मा स्वशक्तींनी जाण । विश्व व्यापूनि प्रकाशे ।।७६।। धूमावता-शक्तीने पृथ्वीत । ल्हाद-पालनशक्तीने जलात । भास्वती-सृष्टिशक्तीने अग्नीत । वायूत स्पंद-संहारशक्तीने ।।७७।। विभ्वी-अनुग्रहशक्तीने आकाशात । ऐसा पंचभूतात्मक प्रपंचात । व्यापूनि होई प्रकाशित । सर्वव्यापी परमात्मा ।।७८।। तो होई विश्वात भासमान ।**

**परि विश्वमायेपासूनि विलक्षण । तो जीवात्म्यांसाठी जाण । असे स्वयंप्रकाशरूप ।।७९।।**

**निर्देहागमस्थल** - (७५)

देहिनोऽपि परात्मत्वभाविनो निरहंकृतेः । निरस्तदेहधर्मस्य निर्देहागम उच्यते ।।३७।।

गलिते ममताहन्ते संसारभ्रमकारणे । पराहन्तां प्रविष्टस्य कुतो देहः कुतो रतिः ।।३८।।

**परमात्मभावाने युक्त । जो शिवयोगी अहंकाररहित । तो होतो देहधर्मरहित । त्यासी नाव निर्देहागम ।।८०।। ज्याच्या मनातूनि संपूर्ण । देहभावाचे झाले निर्गमन । निर्देही स्थिती प्राप्त म्हणून । त्यासी म्हणती निर्देही ।।८१।। जे संसारभ्रमासी कारण । ते अहंकार-ममत्व गेले नाशून । पराहंता लाभता पूर्ण । त्याला देह कशाचा? ।।८२।। ज्याचा देहाभिमान गळाला । त्याला देह तरी असेल कशाला? । आणि देहाविषयी त्याला । प्रेमही कैसे असेल? ।।८३।।**

केवले निष्प्रपंचौघे गम्भीरे चिन्महोदधौ । निमग्नमानसो योगी कथं देहं विचिन्तयेत् ।।३९।।

अपरिच्छेद्यमात्मानं चिदम्बरमिति स्मरन् । देहयोगेऽपि देहस्थैर्विकारैर्न विलिप्यते ।।४०।।

**केवल निष्प्रपंच गंभीर । जो चैतन्यरूपी महासागर । त्यात जो पूर्ण डुंबला तो शरीर-। चिंता करील कशाला? ।।८४।। जे चिदाकाशरूप अपरिच्छिन्न । ते मी आत्मस्वरूप परिपूर्ण । ऐसे सदैव जो करी**

**चिंतन । तो देहविकारे लिंपेना ।।८५।। मानवी मन असे विलक्षण । त्याच्या चार अवस्था जाण । आसक्त अनुरक्त मग्न । आणि निमग्न ही चौथी ।।८६।। मुले क्रीडेत आसक्त । तरुण तरुणीवर अनुरक्त । वृद्ध मग्न चिंतेत । भविष्याच्या आपुल्या ।।८७।। यापुढील अवस्था निमग्न । ज्यात चित्तवृत्ती होती लीन । योग्याठायीच ही पूर्ण । प्रत्ययास येतसे ।।८८।। आत्मचैतन्यसागरात । ज्याचे निमग्न झाले चित्त । तो शिवयोगी बसेल वाहात । कशास चिंता देहाची? ।।८९।।**

अखण्डसंविदाकारमद्वितीयं सुखात्मकम् । परमाकाशमात्मानं मन्वानः कुत्र मुह्यति ।।४१।।

उपाधिविहिता भेदा दृश्यन्ते चैकवस्तुनि । इति यस्य मतिः सोऽयं कथं देहमितो भवेत् ।।४२।।

**अखंड चिदानंदस्वरूप । अद्वितीय पराकाशरूप । ते मी असे आत्मरूप । असे जो जाणे शिवयोगी ।।९०।। आत्मरूपाव्यतिरिक्त । जगी अन्य काही न अस्तित्वात । मग तो कशाने मोहित । होईल सांग मुनिवरा? ।।९१।। आकाश जरी एकचि असे । परि घटी मठी ते भिन्न भासे । तैसे अखंड चिदाकाश दिसे । देहोपाधीने भिन्न भिन्न ।।९२।। ऐसी बुद्धी ज्याची स्थित । तो देहाने कसा होईल सीमित? । म्हणूनि देहधारी परि देहात । राहे अलिप्त होऊनी ।।९३।।**

भेदबुद्धिः समस्तानां परिच्छेदस्य कारणम् । अभेदबुद्धौ जातायां परिच्छेदस्य का कथा ।।४३।।

शिवोऽहमिति यस्यास्ति भावना सर्वगामिनी । तस्य देहेन सम्बन्धः कथं स्यादमितात्मनः ।।४४।।

**हे वेगळे आणि ते वेगळे । हा व्यवहार भेदबुद्धीमुळे । ती मावळूनि अभेद उजळे । मग द्वैताची काय कथा? ।।९४।। मी शिवस्वरूप एक । ही शिवाद्वैतभावना व्यापक । दृढ बिंबे ज्याच्याठायी देख । त्यास कैसा देहसंबंध? ।।९५।। देहसंबंध नाही जेथे । देहविकार कैसे तेथे? । अशा निर्देहावस्थेसी येथे । म्हटले निर्देहागम ।।९६।।**

**निर्भावागमस्थल** - (७६)

व्यतिरेकात्स्वरूपस्य भावान्तरनिराकृतेः । भावो विकारनिर्मुक्तो निर्भावागम उच्यते ।।४५।।

अहं ब्रह्मेति भावस्य वस्तुद्वयसमाश्रयः । एकीभूतस्य चिद्व्योम्नि तदभावो विनिश्चितः ।।४६।।

**आत्मस्वरूपावाचून । ज्या भावना असती भिन्न । त्यांचे करूनि निराकरण । उरे विकारशून्य भाव ।।९७।। भाव होणे विकारमुक्त । तोचि निर्भाव जाण निश्चित । निर्भावागमस्थल येथ । त्यासी दिले हे नाव ।।९८।। काढता भावनेचा बाह्य आधार । ती आत्म्याठायीच होते स्थिर । गृहाचे बंद करिता द्वार । जैसे राहणे गृहातचि ।।९९।। 'मी ब्रह्म' हा भाव जाण । तेथे अहं आणि ब्रह्म या वस्तू दोन । परि चिदाकाशी समरसता पूर्ण । द्वैत काही उरेना ।।१००।। द्वैताचा होता अभाव । उरे केवळ ब्रह्मभाव ।**

**म्हणूनि त्यासी निर्भाव । असे जाण संबोधिती ।।१०१।। भाव शिवमय होता पूर्ण । तेथे मनचि होते मौन । अन्य भावांसी उरेना कारण । म्हणूनि तो निर्भाव ।।१०२।।**

एकभावनिरूढस्य निष्कलंके चिदम्बरे । क्व जातिवासनायोगः क्व देहित्वं परिभ्रमः ।।४७।।

शून्ये चिदम्बरे स्थाने दूरे वाङ्मनसाध्वनः । विलीनात्मा महायोगी केन किं वापि भावयेत् ।।४८।।

**निष्कलंक चिदाकाशात । जो तादात्म्यभावे झाला युक्त । त्यास असे कोणती जात । आणि वर्ण आश्रम? ।।१०३।। त्याला न शरीरसंबंध काही । संसारचक्री भ्रमणे नाही । तो वसलेला दिसे देही । परि अलिप्त त्याहूनी ।।१०४।। जे वाणी-मनास अगोचर । त्या निराकार चिदाकाशी जो स्थिर । त्याने भावना करावी होऊनि तत्पर । कोणती कोण्याप्रकारे? ।।१०५।।**

अविशुद्धे विशुद्धे वा स्थले दीप्तिर्यथा रवेः । पतत्येवं सदाद्वैती सर्वत्र समवृत्तिमान् ।।४९।।

न बिभेति जरामृत्योर्न क्षुधाया वशं व्रजेत् । परिपूर्णनिजानन्दं समास्वादन् महासुखी ।।५०।।

**जैसे शुद्ध अशुद्ध स्थळ । न कधी पाहे सूर्य तेजाळ । तो समानतेने सकळ । विश्व करी प्रकाशित ।।१०६।। तैसेचि पूर्ण समवृत्तीने । शिवयोग्याचे असे वागणे । समग्र विश्व समदृष्टीने । तो सर्वदा पाहतो ।।१०७।। तो न भितो जरा-मरणाला । वश न होय क्षुधा-तृषेला । स्वरूपानंदातचि**

**झाला । सर्वकाळ निमग्न ।।१०८।।**

**नष्टागमस्थल** - (७७)

भेदशून्ये महाबोधे ज्ञात्रादित्रयहीनकः । ज्ञानस्य नष्टभावेन नष्टागम इहोच्यते ।।५१।।

अद्वैतवासनाविष्टचेतसां परयोगिनाम् । पश्यतामन्तरात्मानं ज्ञातृत्वं कथमन्यथा ।।५२।।

**द्वैतशून्य महाशिवज्ञानात । ज्ञेय-ज्ञाता-ज्ञानयुक्त । हा त्रिपुटीभेदमय प्रपंच समस्त । नष्टला म्हणून नष्टागम हे ।।१०९।। शिव महान सुखरूप । प्रपंच लहान दुःखरूप । प्रपंचातूनि सुख मिळे अल्प । दुःख मात्र अपार ।।११०।। प्रपंचाठायी दिसे सुखलेश । तो परमात्मसुखाचाच अंश । सागरजल ओंजळ भरून दुसऱ्यास । द्यावे तैसे घडे हे ।।१११।। जैसा परमात्मा महान । तैसेचि त्याचे ज्ञान महान । प्रमाता प्रमेय प्रमाण । ही त्रिपुटी नसे तेथे ।।११२।। अद्वैतवासनायुक्त हृदयात । तो अंतरात्म्यासी पाहतो स्थित । मग त्यासी अन्य पदार्थ । कसे ज्ञात असतील? ।।११३।।**

अकर्ताऽहमवेत्ताहमदेहोऽहं निरंजनः । इति चिन्तयतः साक्षात् संविदेव प्रकाशते ।।५३।।

निरस्तभेदजल्पस्य निरीहस्य प्रशाम्यतः । स्वे महिम्नि विलीनस्य किमन्यज्ज्ञेयमुच्यते ।।५४।।

**मी न कर्ता ज्ञाता नाही । मी निष्कलंक मी निर्देही । ऐसे त्रिपुटीरहित होऊन पाही । जो करितो**

**चिंतन ।।११४।। त्याच्याठायी शिवाद्वैत । ज्ञानचि होते प्रकाशित । अगस्त्या म्हणती त्या योग्याप्रत । नष्टागमप्रकाश ।।११५।। करण्याजोगे उरले नाही । म्हणूनि तो अकर्ता पाही । जाणण्याजोगे नसे काही । म्हणूनि तो अवेत्ता ।।११६।। त्यासी देहाभिमान नाही । म्हणूनि तो असे अदेही । निरसूनि भेदभावना तीही । झाला राग-द्वेषमुक्त ।।११७।। विमर्शशक्तीत झाला विलीन । त्या विरक्त शिवयोग्यालागून । जी वस्तू घ्यावी अशी जाणून । ती असे कोणती प्रपंचात? ।।११८।।**

एकीभूते निजाकारे संविदा निष्प्रपंचया । केन किं वेदनीयं तद्वेत्ता कः परिभाष्यते ।।५५।।

महासत्ता महासंविद् विश्वरूपा प्रकाशते । तद्विना नास्ति वस्त्वेकं भेदबुद्धिं विमुंचतः ।।५६।।

**जो शिवाद्वैतज्ञानाने । स्व-रूपी समरसला पूर्णपणे । त्याने काय जाणावे कशाने । आणि जाणे तरी कोण? ।।११९।। ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । ही त्रिपुटीच गेली निरसून । म्हणूनि भेदरूप प्रपंचाचे दर्शन । त्यासी कधी घडेना ।।१२०।। त्यास आत्मरूपाविण काही । सर्वथा दिसतचि नाही । पाहणारा पाहणे हे सर्वही । विराले आत्मरूपात ।।१२१।। सत् असत् वस्तू व्यापून । महाज्ञानरूप ब्रह्मचैतन्य जाण । प्रपंचरूप करूनि धारण । सर्वकाळ प्रकाशते ।।१२२।। या ज्ञाने भेदबुद्धी नाही । म्हणूनि ब्रह्माविण न दिसे काही । सागर-तरंगन्याये विश्वही । दिसे ब्रह्मरूपचि ।।१२३।।**

## आदिप्रसादिस्थल - (७८)

सर्वाधिष्ठातृकः शम्भुरादिस्तस्य प्रसादतः । आदिप्रसादीत्युक्तोऽयं निर्विकारपदे स्थितः ।।५७।।

अनेकजन्मशुद्धस्य निरहंकारभाविनः । अप्रपंचस्यादिदेवः प्रसीदति विमुक्तये ।।५८।।

**जो विश्वाचे अधिष्ठान । पंचकृत्यांचे मूळ कारण । त्या शंभूसी 'आदि' जाण । नाव असे मुनिवरा ।।१२४।। त्या आदी शंभूच्या प्रसादाने । विकाररहित स्थिती ज्याने । प्राप्त केली त्यास ओळखणे । आदिप्रसादी या नावे ।।१२५।। जन्मजन्मांतरात । ज्याने साठविले पुण्यसंचित । देहाहंकार-प्रपंचभेदरहित । जो जहाला शिवयोगी ।।१२६।। त्याला मोक्ष देण्यास्तव । तो परमात्मा आदिदेव । करी त्याच्यावरी अनुग्रह । प्रसन्नचित्त होऊनी ।।१२७।।**

शिवप्रसादसम्पत्त्या शिवभावमुपेयुषि । शिवादन्यज्जगज्जालं दृश्यते न च दृश्यते ।।५९।।

शम्भोः शिवप्रसादेन संसारच्छेदकारिणा । मोहग्रन्थिं विनिर्भिद्य मुक्तिं यान्ति विवेकिनः ।।६०।।

**शिवप्रसादसंपत्तीने । विश्वसमूह शिवरूप पाहणे । त्याविण भिन्न असे नयने । त्यास काही दिसेना ।।१२८।। सागरावरी उठती तरंग । ते जैसे सागराचेचि अंग । तैसे शिवरूपातचि हे जग । तो पाहे आपुल्या दृष्टीने ।।१२९।। शिवाचा मंगलप्रसाद जाण । तो संसारनिवृत्तीसी कारण । तेणे**

अज्ञानग्रंथी  भेदून । मोक्ष मिळवी विवेकी ।।१३०।।

विना प्रसादमीशस्य संसारो न निवर्तते । विना सूर्योदयं लोके कुतः स्यात् तमसो लयः ।।६१।।

सर्वानुग्राहकः शम्भुः केवलं कृपया प्रभुः । मोचयेत् सकलान् जन्तून् न किंचिदिह कारणम् ।।६२।।

साधके कितीही साधना केली । परि शिवकृपा नाही झाली । तरी त्याची साधनावेली । फुले-फळेना किंचित ।।१३१।। जोवरी नाही शिवकृपा । तोवरी नसे मार्ग सोपा । साधकासही जन्मखेपा । कराव्याच लागती ।।१३२।। झाल्याविण सूर्योदय । समूळ नासेना अंधारभय । तशी शिव-प्रसादाशिवाय । संसारनिवृत्ती होईना ।।१३३।। नसो साधनेचे बळ । असो पुण्यात्मा वा खळ । शिवकृपा होता तत्काळ । त्याला लाभे मुक्तिपद ।।१३४।। सर्वतंत्र स्वतंत्र शंकर । कृपा करी सर्वांवर । संसारपाश करूनि दूर । मुक्त करी जीवामात्रा ।।१३५।। जीवांवरी अनुग्रह । करणे हा त्याचा  स्वभाव । त्याचा अनुग्रहचि सर्व । कारण पाशमोचनासी ।।१३६।। शिव सृष्टीचा आदिदेव । तैसेचि त्यास 'अन्त्य' हे नाव । सृष्टिविलयानंतरही एकमेव । अस्तित्व त्याचे असेचि ।।१३७।। त्या अन्त्यप्रसादिस्थलाचे । आता करीन विवरण साचे । कर्ण करूनि सर्वेंद्रियांचे । श्रवण करी अगस्त्या ।।१३८।।

## अन्त्यप्रसादिस्थल - (७९)

लयः सर्वपदार्थानामन्त्य इत्युच्यते बुधैः । प्रसादोऽनुभवस्तस्य तद्वानन्त्यप्रसादवान् ।।६३।।

देवतिर्यङ्मनुष्यादिव्यवहारविकल्पना । मायाकृता परे तत्त्वे तल्लये तत्क्षयो भवेत् ।।६४।।

**भूमीपासूनि शिवतत्त्वापर्यंत । सर्वांच्या लयासी आश्रयीभूत । त्या परशिवासी ज्ञानी 'अन्त्य' । या नामे संबोधिती ।।१३९।। अन्त्य शिवाचा साक्षात्कार । तोच अन्त्यप्रसाद साचार । तो ज्याला लाभे तो नर । असे अन्त्यप्रसादी ।।१४०।। सृष्टीचा झाल्यावरी विलय । जे अवशिष्ट असे शिवतत्त्व । त्याचा आत्मरूपे घेई अनुभव । तो जाण अन्त्यप्रसादी ।।१४१।। हा देव हा प्राणी हा नर । ऐसा मायाकल्पित असे व्यवहार । माया शिवात लीन होता विकार । मायानिर्मित नाशती ।।१४२।। पृथ्वीचा लय जलात । जलाचा लय तेजात । तेजाचा लय वायूत । आकाशात वायूचा ।।१४३।। आकाशाचा लय मायेत । मायेचा लय परशिवात । ऐसे लयचिंतन सदोदित । करीतसे शिवयोगी ।।१४४।। सृष्टी ज्या क्रमे होई उत्पन्न । त्याच्या उलट क्रमे चिंतन । करणे हेचि लयचिंतन । असे शिव-योग्याचे ।।१४५।। ऐसे लयचिंतन करता अशेष । अंती जे शिवतत्त्व राहे शेष । आत्मरूपी पाहणे त्या तत्त्वास । हेचि अन्त्यप्रसादिस्थल ।।१४६।।**

साक्षात्कृते परे तत्त्वे सच्चिदानन्दलक्षणे । क्व पदार्थपरिज्ञानं कुतो ज्ञातृत्वसंभवः ।।६५।।

सुषुप्तस्य यथा वस्तु न किंचिदपि भासते । तथा मुक्तस्य जीवस्य न किंचिद्वस्तु दृश्यते ।।६६।।

**सच्चिदानंदरूप शिवब्रह्म जाण । ज्याच्या अंतरी प्रकाशे पूर्ण । तेथे माया अस्तित्वहीन । होई साक्षात्काराने ।।१४७।। मायाचि नसे अस्तित्वात । मग पदार्थ मायानिर्मित । त्याचे ज्ञान आणि ज्ञातृत्व तेथ । कैसे जाण संभवेल? ।।१४८।। जेथे ज्ञेय प्रपंच नाही । तेथे ज्ञाता कैसा राही? । आणि ज्ञानासी अस्तित्वही । कैसे असेल मुनिवरा? ।।१४९।। जो गाढ निद्रेत मग्न । त्यासी वस्तूचे राहीना भान । तैसे मुक्तात्म्यासी जाण । प्रपंचभान असेना ।।१५०।।**

यथाकाशमविच्छिन्नं निर्विकारं स्वरूपतः । तथा मुक्तस्य जीवस्य स्वरूपमवशिष्यते ।।६७।।

न किंचिदपि मुक्तस्य दृश्यं कर्तव्यमेव वा । सुखस्फूर्तिस्वरूपेण निश्चला स्थितिरुच्यते ।।६८।।

शिवाद्वैतपरिज्ञानशिथिलाशेषवस्तुनः । केवलं संविदुल्लासदर्शिनः केन को भवेत् ।।६९।।

**आकाश अखंड निर्विकार । तैसा जीवन्मुक्त योगी साचार । अखंड प्रकाशूनि भूवर । विचरे स्वच्छंदपणाने ।।१५१।। त्याला प्रपंच न दिसे । त्याला कर्तव्य काही नसे । तो कृतकृत्य होऊनि वसे । आनंदमय निश्चल ।।१५२।। तो शिवाद्वैतज्ञाने परिपूर्ण । त्याचे नष्टले प्रपंचज्ञान ।**

**इंद्रियव्यवहाराचे प्रयोजन । त्यास उरेना किंचित ।।१५३।। ऐसे हे अन्त्यप्रसादिस्थल । आता सांगेन अंतिम स्थल । ज्यासी सेव्यप्रसादिस्थल । ऐसे ज्ञाते संबोधिती ।।१५४।।**

**सेव्यप्रसादिस्थल** - (८०)

सेव्यो गुरुः समस्तानां शिव एव न संशयः । प्रसादोऽस्य परानन्दप्रकाशः परिकीर्त्यते ।।७०।।

सेव्यो गुरुः स्मृतो ह्यस्य प्रसादोऽनुभवो मतः । तदेकावेशरूपेण तद्वान् सेव्यप्रसादवान् ।।७१।।

**श्रीगुरू सर्वांसी असे सेव्य । तो असे साक्षात् परशिव । गुरूचा असे अनुग्रह । परमानंद-प्रकाशक ।।१५५।। शिवस्वरूप गुरू जाण । सेव्य असे सर्वांकडून । तो उपदेशी जे शिवज्ञान । तोचि जाणावा प्रसाद ।।१५६।। गुरू आणि गुरुप्रसाद । यात जो मानितो अभेद । तोचि सेव्यप्रसादी सिद्ध । पुरुष जाण मानिती ।।१५७।।**

गुरुदेवः परं तत्त्वं परतत्त्वं गुरुः स्मृतः । तदेकत्वानुभावेन न किंचिदवशिष्यते ।।७२।।

अपरिच्छेद्यमात्मस्थमवाङ्मनसगोचरम् । आनन्दं पश्यतां पुंसां रतिरन्यत्र का भवेत् ।।७३।।

**शिव हाचि गुरू गुरू हाचि शिव । ऐसे सांगती शास्त्रे सर्व । गुरु-शिवात ठेविता अभेदभाव । उरे न काही जाणाया ।।१५८।। जे वाणी-मनासी अगोचर । त्या परमानंदात निमग्न निरंतर । त्याची अन्य**

**विषयांवर । प्रीती कैसी राहील? ।।१५९।।**

ज्ञानामृतेन तृप्तस्य किमन्यैर्भोज्यवस्तुभिः । ज्ञानादेव परानन्दं प्रकाशयति सच्छिवः ।।७४।।

मुक्तिरेव परा तृप्तिः सच्चिदानन्दलक्षणा । नित्यतृप्तस्य मुक्तस्य किमन्यैर्भोगसाधनैः ।।७५।।

न बाह्यकर्म तस्यास्ति न चान्तर्नैव कुत्रचित् । शिवैक्यज्ञानरूढस्य देहभ्रान्तिं विमुंचतः ।।७६।।

**जो पूर्ण तृप्त ज्ञानामृताने । अन्य काय इच्छावे त्याने? । ज्याने चंद्रामृताचे केले पारणे । तो का इच्छील वालुका? ।।१६०।। ज्याच्या ओठी अमृतवाटी । तो लाळ घोटील का कांजीसाठी? । ज्याने परमानंद बांधिला गाठी । त्यास भोज्य काही नसे ।।१६१।। सच्चिदानंदस्वरूप मुक्ती । हीच सर्वोत्कृष्ट तृप्ती । नित्यतृप्तास हवी प्राप्ती । कशास भोगसाधनांची? ।।१६२।। ज्याने शिवैक्यज्ञान प्राप्त केले । देहाभिमानासी त्यागिले । त्याला बाह्याभ्यंतर कर्मांत उरले । नसे काही कर्तव्य ।।१६३।।**

न कर्मबन्धे न तपोविशेषे
न मन्त्रयोगाभ्यसने तथैव ।
ध्याने न बोधे च तथात्मतत्त्वे
मनःप्रवृत्तिः परयोगभाजाम् ।।७७।।

**ज्याने शिवयोग केला प्राप्त । त्याची मंत्रयोग-हठयोगांत । राजयोग-लययोगांत । नसेचि मन:प्रवृत्ती ।।१६४।। नाही कर्माचे बंधन । नाही तपश्चर्येचे कारण । योगाभ्यास मंत्र जप ध्यान । त्याच्यासाठी व्यर्थचि ।।१६५।। जे मिळवाया जन्मजन्मांत । धावाधाव केली समस्त । ते त्यासी जहाले पूर्ण प्राप्त । आता थांबले धावणे ।।१६६।। येथे लिंगस्थलातील । संपले प्राणलिंगिस्थल । आता पुढे शरणस्थल । विवरीन मुनिवरा ।।१६७।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।१६८।। श्रीसिद्धान्तशिखामणि-तत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । अष्टादशोऽध्याय पूर्ण हा ।।१६९।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतप्राणलिंगिस्थले आत्मस्थलादिनवविधस्थलप्रसंगो नाम अष्टादशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय एकोणिसावा

**श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्‌गुरु एकोरामाराध्याय नमः ।। ॐ शिवाय नमः हराय । भगनेत्रहृते नमः अव्यक्ताय । सहस्राक्षाय नमः अपवर्गाय । अनंताय नमः सहस्रपदे ।।१।। शिवा शंकरा मायबापा । तुझी होता पूर्ण कृपा । मोक्षमार्ग होय सोपा । प्राकृत अज्ञ जनांसी ।।२।। कोण कोठली भिल्लीण । तिने वाहता बेलपान । तिला नेले उद्धरून । शिवलोकी कृपाळा ।।३।। अल्पभक्तीने संतुष्टे । ऐसा कोणता देव कोठे? । जप तप साधन मोठे । तुला न लागे काहीच ।।४।। तुझ्या कृपेने लेखणीत । सामर्थ्य भरले किंचित । चाललो अक्षर-बीजे पेरीत । शुभ्र कृषीत कागदाच्या ।।५।। भक्तहृदयीची भाव-ओल । लाभता हे क्षेत्र पिकेल । भक्तिपीक सेवूनि होतील । तृप्त शिवभक्त अंतरी ।।६।। असो लिंगषट्स्थलांतील । आता अवधारावे शरणस्थल । अगस्त्याच्या प्रश्नाचे करितील । समाधान रेणुकाचार्य ।।७।।**

## लिंगस्थलांतर्गत शरणस्थल

अगस्त्य उवाच-

स्थलभेदाः समाख्याताः प्राणलिंगिस्थलाश्रयाः । कथय स्थलभेदं मे शरणस्थलसंश्रितम् ।।१।।

**अगस्त्य म्हणती केले विशद । आचार्या प्राणलिंगिस्थलाचे भेद । आता निरूपावे स्थलभेद । मजसी शरणस्थलाचे ।।८।। आपण येथवरी जे कथिले । तेणे चित्त संतुष्ट झाले । परि अजूनि नाही भरले । मन माझे गुरुवर्या ।।९।। तृप्त होईतो पूर्ण मन । आपण करावे तत्त्वविवेचन । ऐसे बोलूनि धरिले चरण । जगद्गुरूंचे तेधवा ।।१०।। रेणुक झाले प्रसन्नचित्त । ठेविला मस्तकी वरदहस्त । म्हणती तू शोभसी समस्त । जिज्ञासूंचा मुकुटमणी ।।११।। सुक्षेत्री पेरिता बीज । तरीच ते विरूढे सहज । म्हणूनि जे गुजाचे गुज । ते सांगेन तुजलागी ।।१२।।**

श्रीरेणुक उवाच-

शरणस्थलमाश्रित्य स्थलद्वादशकं मया । उच्यते नाम सर्वेषां स्थलानां शृणु तापस ।।२।।

**तू असशी पूर्ण ज्ञानी । तरी जिज्ञासा तुझ्या मनी । शिवाद्वैत प्रकटे जनी । पूर्ण तुझ्या निमित्ताने ।।१३।। चातकाचे मिष करून । पृथ्वीवरी वर्षे घन । त्याची चिमुकली असे तहान । परि जग तृप्त होई ।।१४।। तैसे अगस्त्या तुझ्यामुळे । जगी शिवाद्वैत पूर्ण उजळे । तुझे नाव अमीट रेखिले । जाईल काळ-माथ्यावरी ।।१५।। शरणस्थलाचे भेद द्वादश । त्यांचे स्वरूप कथीन क्रमश: । श्रवण करी सावकाश । चित्त एकाग्र करूनिया ।।१६।।**

दीक्षापादोदकं पूर्वं शिक्षापादोदकं ततः । ज्ञानपादोदकं चाथ क्रियानिष्पत्तिकं ततः ।।३।।
भावनिष्पत्तिकं चाथ ज्ञाननिष्पत्तिकं ततः । पिण्डाकाशस्थलं चाथ बिन्द्वाकाशस्थलं ततः ।।४।।
महाकाशस्थलं चाथ क्रियायाश्च प्रकाशनम् ।
भावप्रकाशनं पश्चात् ततो ज्ञानप्रकाशनम् । स्वरूपं पृथगेतेषां कथयामि यथाक्रमम् ।।५।।

**दीक्षापादोदक शिक्षापादोदकस्थल । ज्ञानपादोदक क्रियानिष्पत्तिस्थल । भावनिष्पत्ति ज्ञाननिष्पत्ति-स्थल । पिंडाकाशस्थल सातवे ।।१७।। बिंद्वाकाशस्थल महाकाशस्थल । क्रियाप्रकाशस्थल भाव-प्रकाशस्थल । बारावे ज्ञानप्रकाशस्थल । ऐसी बारा स्थले ही ।।१८।।**

**दीक्षापादोदकस्थल** - (८१)

दीक्षयाऽपगतद्वैतं यज्ज्ञानं गुरुशिष्ययोः । आनन्दस्यैक्यमेतेन दीक्षापादोदकं स्मृतम् ।।६।।
अथवा पादशब्देन गुरुरेव निगद्यते । शिष्यश्चोदकशब्देन तयोरैक्यं तु दीक्षया ।।७।।

**गुरु-शिष्यातील द्वैतज्ञान । गुरुदीक्षेने जाई मावळून । मग गुरु-शिष्याच्या आनंदाचे जाण । होतसे ऐक्यज्ञान जे ।।१९।। ते शिष्यमनी उदित झाले । तेचि दीक्षापादोदक बोलिले । गुरु-शिष्याच्या आनंदामधले । द्वैत मावळले पूर्णतः ।।२०।। जो निजानंद गुरूठायी । तोचि प्रकाशे शिष्यहृदयी । गुरु-**

**शिष्याचा आनंद पाही । झाला एकरूप या स्थली ।।२१।। आनंद पाहता एक जाण । परि गुरु-शिष्य या उपाधी दोन । तेणे दो ठायी दिसे भिन्न । परि तो मुळी एकचि ।।२२।। जैसे दोन घटांमधले । गंगाजल दिसे वेगळे । परि विचार करिता त्यामधले । जाणवे एकरूपत्व ।।२३।। तैसे गुरु शिष्य जरी दोन । परि त्यांचा आनंद एकसमान । हेचि दीक्षापादोदकस्थल जाण । मुनिवर्य अगस्त्या ।।२४।। अथवा आणिकही एक । अर्थ तुज सांगेन सुरेख । गुरू हा 'पाद' आणि 'उदक' । शिष्य हाच जाणावा ।।२५।। दीक्षासंस्काराने देख । गुरु-शिष्यात होय भावैक्य । तेचि दीक्षापादोदक । ज्ञानी जनांनी समजावे ।।२६।।**

परमानन्द एवोक्तः पादशब्देन निर्मलः । ज्ञानं चोदकशब्देन तयोरैक्यं तु दीक्षया ।।८।।

परसंवित्प्रकाशात्मा परमानन्दभावनाम् । अधिगम्य महायोगी न भेदं क्वापि पश्यति ।।९।।

**निर्मल परमानंद जाण । त्यास 'पाद' असे अभिधान । आणि 'उदक' शब्दे ज्ञान । सूचित होई जाणावे ।।२७।। दीक्षासंस्काराने देख । हृदयी आनंद-ज्ञानाचे ऐक्य । होई तेचि दीक्षापादोदक । ऐसे समजावे ज्ञात्यांनी ।।२८।। योगी दीक्षापादोदकसंपन्न । परब्रह्मस्वरूप ज्ञानप्रकाशरूप होऊन । परमानंदभाव प्राप्त करून । भेद कोठे न पाहतो ।।२९।।**

देशकालाद्यवच्छेदविहीनं नित्यनिर्मलम् । आनन्दं प्राप्य बोधेन नान्यत् कांक्षति संयमी ।।१०।।

ज्ञानामृतमपि स्वच्छं गुरुकारुण्यसम्भवम् । आस्वाद्य रमते योगी संसारामयवर्जितः ।।११।।

**देशकालभेदविरहित । जो सर्वठायी परिपूर्ण स्थित । तो ब्रह्मानंद झाला प्राप्त । ज्या संयमी शिवयोग्याला ।।३०।। तो अन्य अपेक्षीना काही । प्रपंचासी पाहत नाही । त्याच्या दृष्टीस सर्वठायी । दिसे ब्रह्म केवळ ।।३१।। गुरुकृपेने जे झाले प्राप्त । ते आस्वादी निर्मल ज्ञानामृत । तो शिवयोगी भवरोगमुक्त । क्रीडे आत्मस्वरूपी ।।३२।।**

**शिक्षापादोदकस्थल** - (८२)

गुरुशिष्यमयं ज्ञानं शिक्षा योगिनमीर्यते । तयोः समरसत्वं हि शिक्षापादोदकं स्मृतम् ।।१२।।

मथिताच्छास्त्रजलधेर्युक्तिमन्थानवैभवात् । गुरुणा लभ्यते बोधसुधा सुमनसां गणैः ।।१३।।

**गुरूने बोधिले जे ज्ञान । त्याचे शिष्याने करणे मनन । त्या मननासचि जाण । 'शिक्षा' ऐसे नाव असे ।।३३।। गुरु-शिष्यातील ऐक्य । या ज्ञानासाठी शिक्षा प्रेरक । ती शिक्षा आणि ऐक्यज्ञान एक । होणे शिक्षापादोदक हे ।।३४।। दीक्षानुभवाने सिद्ध ज्ञान । त्याचे करणे सर्वदा मनन । अगस्त्या तेचि मनन जाण । तो शिक्षागुरूजाणावा ।।३५।। गुरु-शिष्याचे ऐक्यज्ञान । आणि मननरूपी शिक्षण । यांच्या**

**सामरस्याने होई उत्पन्न । जे सुख ते शिक्षापादोदक ।।३६।। इंद्रसंपत्तीच्या अमोल राशी । दुर्वासशापाने समुद्रतळाशी । पडल्या त्या वरती काढायासी । झाले समुद्रमंथन ।।३७।। मंदराचलाची करूनि रवी । वासुकीची दोरी बरवी । तिने देवासुरांनी पूर्वी । घुसळिला समुद्र ।।३८।। देवाहाती अमृत आले । आणि त्यांना ऐश्वर्य लाभले । वासुकीचे मात्र प्राशिले । विष समस्त शंकरांनी ।।३९।। तैसा निगमागम महासागर । युक्ति-रवीने मंथिल्यावर । लाभे शिवाद्वैतज्ञानामृत मधुर । शुद्ध मनाच्या शिष्यासी ।।४०।।**

ज्ञानचन्द्रसमुद्भूतां परमानन्दचन्द्रिकाम् । पश्यन्ति परमाकाशे मुक्तिरात्रौ महाधियः ।।१४।।

दृष्टे तस्मिन् परानन्दे देशकालादिवर्जिते । द्रष्टव्यं विद्यते नान्यच्छ्रोतव्यं ज्ञेयमेव वा ।।१५।।

**शिवाद्वैतज्ञानचंद्रातून । परमानंद-चांदणे झाले उत्पन्न । त्याने शिष्याचे हृदयगगन । उजळे मुक्तिरात्रीत ।।४१।। ते परमानंदाचे चांदणे । शिष्य अनुभविती नाजूकपणे । जैसे टिपती अमृतदाणे । चकोर चंद्रकिरणांतले ।।४२।। ते परमानंदाचे अमृत । देश-काले न होय खंडित । त्याच्या साक्षात्कारे मुक्त । झाला असे शिवयोगी ।।४३।। मग त्यासी पाहण्याजोगे । ऐकण्याजोगे जाणण्याजोगे । नुरेचि काही, केवळ जागे । अंतर्बाह्य शिवतत्त्व ।।४४।।**

आत्मानन्देन तृप्तस्य का स्पृहा विषये सुखे । गंगाजलेन तृप्तस्य कूपतोये कुतो रतिः ।।१६।।

यस्मिन्नप्राप्तकल्लोले सुखसिन्धौ निमज्जति । सामरस्यान्महायोगी तस्य सीमा कुतो भवेत् ।।१७।।

गुरुप्रसादचन्द्रेण निष्कलंकेन चारुणा । यन्मनःकुमुदं नित्यबोधितं तस्य को भ्रमः ।।१८।।

**ज्याचे घर गंगेकाठी । तो का श्रमेल विहिरीसाठी? । अमृत पडले ज्याच्या ओठी । तो का कांजी इच्छील? ।।४५।। ज्याच्या घरी पंचपक्वान्न । नित्य ठेविले असे रांधून । तो शिळ्या तुकड्यासाठी वणवण । करीत फिरेल का दारोदार? ।।४६।। राग-द्वेषाच्या नुठती लहरी । समरसला त्या सौख्यसागरी । त्याच्या आनंदासी खरी । कैसी सीमा असेल? ।।४७।। निष्कलंक गुरुप्रसाद-चंद्रामुळे । ज्याचे चित्तकमल नित्य विकासले । त्याच्याठायी सांग उरले । असती कैसे भेदभ्रम? ।।४८।। श्रीगुरूच्या मार्गदर्शनाने । सर्व शास्त्रांचे मंथन करणे । परमानंदामृते तृप्त होणे । हे शिक्षापादोदकस्थल ।।४९।।**

## **ज्ञानपादोदकस्थल** - (८३)

तदैक्यसम्पदानन्दज्ञानं ज्ञानगुरुर्मतः । तत्सामरस्यं शिष्यस्य ज्ञानपादोदकं विदुः ।।१९।।

अविद्याराहुनिर्मुक्तो ज्ञानचन्द्रः सुनिर्मलः । प्रकाशते पराकाशे परानन्दमहाद्युतिः ।।२०।।

**आनंदाचे होणे ज्ञान । यास 'ज्ञानगुरू' मानिती विद्वान । ज्ञान-आनंदाचे ऐक्य जाण । हेचि**

**ज्ञानपादोदक ।।५०।। अज्ञानराहूचा नसे स्पर्श । मलवासनांचा नाही लेश । ऐसा ज्ञानचंद्र परमानंद महाप्रकाश । होऊनि प्रकाशे हृदयाकाशी ।।५१।।**

अज्ञानमेघनिर्मुक्तः पूर्णज्ञानसुधाकरः । आनन्दजलधेर्वृद्धिमनुपश्यन् विभासते ।।२१।।

ज्ञानचन्द्रोदये जाते ध्वस्तमोहतमोभराः । पश्यन्ति परमां काष्ठां योगिनः सुखरूपिणीम् ।।२२।।

**अज्ञानमेघ होऊनि दूर । प्रकटे पूर्ण शिवज्ञान-सुधाकर । मग निजानंदरूपी सागर । भरती येऊनि उधाणे ।।५२।। होता शिवज्ञानचंद्रोदय । मोहांध:काराचा होई लय । परमानंदस्वरूपाचा अनुभव । शिवयोगी तो घेतसे ।।५३।।**

मायारजन्या विरमे बोधसूर्ये प्रकाशिते । निरस्तसर्वव्यापारश्चित्रं स्वपिति संयमी ।।२३।।

अनाद्यविद्याविच्छित्तिवेलायां परयोगिनः । प्रकाशते परानन्दः प्रपंचेन विना कृतः ।।२४।।

**उगवताचि ज्ञानतरणी । तत्काळ निरसे मायारजनी । व्यापारशून्य होऊनि ज्ञानी । निद्रा करी नवल हे ।।५४।। जेथे असे संसारव्यवहार । तेथे जागा सामान्य नर । योगी मात्र निद्रेत चूर । म्हणजे असे विमुख ।।५५।। जेथे असे परमार्थ । तेथे सामान्य नर निद्रिस्त । योगी मात्र पूर्ण जागृत । म्हणजे असे**

**सन्मुख ।।५६।। अनादी अविद्या होता निवृत्त । परयोग्यासी प्रपंचविरहित । निरुपाधिक परमानंदाचा सतत । येई पूर्ण अनुभव ।।५७।।**

नित्यानन्दे निजाकारे विमले परतेजसि । विलीनचेतसां पुंसां कुतो विश्वविकल्पना ।।२५।।

कुतो ब्रह्मा कुतो विष्णुः कुतो रुद्रः कुतो रविः । साक्षात्कृतपरानन्दज्योतिषः साम्यकल्पना ।।२६।।

**नित्यानंदस्वरूप निर्मल । निजस्वरूप परतेजात केवळ । ज्याचे चित्त निमग्न तो करील । कैसी विश्वकल्पना? ।।५८।। कोण ब्रह्मा विष्णू कोण? । कोण रुद्र सूर्य कोण? । आत्मस्वरूपानंद-तेजासमान । ब्रह्मांडात असेना ।।५९।।**

अपरोक्षपरानन्दविलासस्य महात्मनः । ब्रह्मविष्णवादयो देवा विशेषाः सुखबिन्दवः ।।२७।।

यन्मात्रासहितं लोके वांच्छन्ति विषयं नराः । तदप्रमेयमानन्दं परमं को न वांच्छति ।।२८।।

**अपरोक्ष आत्मानंद प्राप्त । झाला ज्या शिवयोग्याप्रत । त्यास ब्रह्मादी देवांची बिंदुवत् । सुखे क्षुद्र वाटती ।।६०।। आत्मानंदचि विषयसुखात । असे जाण अंशरूपात । ते विषयसुख समस्त । वांच्छिताती जनलोक ।।६१।। मग जो अप्रमेय अपरिमित । चिदानंद सर्वश्रेष्ठ विख्यात । त्यासी अपेक्षीना असा जगात । सांग कोण असेल? ।।६२।।**

## **क्रियानिष्पत्तिस्थल** - (८४)

परकाये क्रियापत्तिः कल्पितैव प्रकाशते । रज्जौ भुजंगवद् यस्मात् क्रियानिष्पत्तिमानयम् ।।२९।।

ज्ञानिनां यानि कर्माणि तानि नो जन्महेतवः । अग्निदग्धानि बीजानि यथा नांकुरकारणम् ।।३०।।

**शिवयोगी जो परब्रह्मशरीरी । त्याची क्रियाकर्मे सारी । सर्पाकार भासे दोरी । तैसी असती भासमान ।।६३।। कर्तृत्वभाव नसे म्हणून । कर्मफल न होय निष्पन्न । त्यास क्रियानिष्पत्तिमान । ऐसे जाण संबोधिती ।।६४।। ढीग वस्त्रांचा जळाला । तो दिसे जैसा रचिलेला । तैसा दिसण्यापुरताच उरला । कर्माचार योग्याचा ।।६५।। किंवा बीजे अग्नीत भाजली । ती न अंकुरती जरी पेरिली । तैसी न ठरती कर्मे सगळी । पुनर्जन्मासी कारण ।।६६।। त्याचे संचित कर्म पूर्ण । गेले ज्ञानाग्नीत जळून । कर्तृत्वभाव नसे म्हणून । क्रियमाण कर्म निष्फळ ।।६७।। प्रारब्धकर्म संपेतोवर । जिवंत असे त्याचे शरीर । ते भोगूनि संपल्यावर । शरीर पडे गळूनी ।।६८।। तो शरीर असेतोवर । जीवन्मुक्त होऊनि विचरे भूवर । जेव्हा गळूनि पडे शरीर । तेव्हा विदेहमुक्त होय ।।६९।।**

कर्मणा किं कृतेनापि ज्ञानिनो निरहंकृतेः । विक्रिया प्रतिबिम्बस्था किं करोति हिमद्युतेः ।।३१।।

चन्द्रस्य मेघसम्बन्धाद् यथा गमनकल्पना । तथा देहस्य सम्बन्धादारोप्या स्यात् क्रियात्मनः ।।३२।।

**जैसा जलाशयी चंद्र बिंबला । त्यात कोणी खडा टाकिला । तेव्हा दिसे शतखंडित झाला । चंद्र जलाशयात ।।७०।। परि चंद्राठायी काही । तो विकार उठला नाही । तैसे अहंकारशून्य योग्यासही । कर्मे स्पर्शू न शकती कधी ।।७१।। कर्मे घडती देहाकडून । त्यात गुंतेचिना अभिमान । म्हणूनि कर्मफळभोगासी कारण । त्याच्यासाठी उरेना ।।७२।। चंद्र आकाशात चाले । ऐसे भासे मेघांमुळे । तैसे देहसंबधे आरोपिले । आत्म्यावरी कर्तृत्व ।।७३।। आत्मा चालेना बोलेना । काही कर्मही करीना । देहच करी चेष्टा नाना । आत्मा असे अलिप्त ।।७४।।**

ज्ञानी कर्मनिरूढोऽपि लिप्यते न क्रियाफलैः । घृतादिना यथा जिह्वा भोक्त्री चापि न लिप्यते ।।३३।।

निरस्तोपाधिसम्बन्धे जीवे या या क्रियास्थितिः । सा सा प्रतीतिमात्रेण निष्फला चात्र लीयते ।।३४।।

**ज्ञानी कर्मी दिसे प्रवृत्त । परि कर्मफलाने न होय लिप्त । जिव्हा आस्वादिते तेल घृत । परि ती त्याने लिंपेना ।।७५।। तैसा शिवाद्वैतज्ञानी । सर्व कर्मी तत्पर राहूनी । परि कर्मांच्या फलांनी । लिप्त मुळी होईना ।।७६।। मी कर्मकर्ता आहे । ऐसा अभिमान जो वाहे । त्याला भोगणेचि आहे । कर्मफळ निश्चित ।।७७।। परि शिवयोग्याठायी । ऐसा अभिमान नाही । तेणे निष्फल होऊनि कर्मही । लीन होई आत्म्यात ।।७८।।**

गच्छंस्तिष्ठन् स्वपन् वापि न निष्कर्मास्ति कश्चन । स्वभावो देहिनां कर्म ज्ञानिनां तत्तु निष्फलम् ।।३५।।

परिपूर्णमहानन्दभाविनः शुद्धचेतसः । न भवेत् कर्मकार्पण्यं नानाभोगफलप्रदम् ।।३६।।

**कर्म केल्यावाचूनि राहे । ऐसा जगी कोण आहे? । जो जो प्राणी देह वाहे । कर्म लागे करावे ।।७९।। चालणे फिरणे बोलणे पाहणे । उठणे बसणे निद्रा घेणे । ऐसे कर्मचक्र अखंडपणे । भ्रमत आहे विश्वात ।।८०।। परि हे सारे करी शरीर । आत्मा अलिप्त निर्विकार । हे जो जाणतो तोचि धीर । सुटे कर्मचक्रातूनी ।।८१।। नैष्कर्म्याचा इतुकाचि अर्थ । फलापेक्षा न ठेवणे मनात । मग कर्मी रतला जरी सतत । तरी कर्मे लिंपेना ।।८२।। सदोदित करणे कर्म । हा देहाचा स्वभावधर्म । हे जाणूनि करितो कर्म । ज्ञानी फलापेक्षेविण ।।८३।। शिवयोग्याचे अंत:करण । निर्मल नित्य परिपूर्ण । अशा आनंदानुभवाने भरून । राहे सदासर्वकाळ ।।८४।। तो करितो कर्मे सकळ । परि ती सर्व होती निष्फल । पुण्य-पापकर्मांचे फळ । त्यासी भोगणे नलगे ।।८५।।**

**भावनिष्पत्तिस्थल** - (८५)

भावः प्रतीयमानोऽपि परकाये तु कल्पितः । शुक्तौ रजतवद् यस्माद्भावनिष्पत्तिमानयम् ।।३७।।

भावेन नास्ति सम्बन्धः केवलज्ञानयोगिनः । तथापि भावं कुर्वीत शिवे संसारमोचके ।।३८।।

**ज्या मनोवृत्तीत एकमेव । भरूनि राहिला असे शिव । त्या वृत्तीसी म्हणती 'भाव' । जगी ज्ञानी सर्वचि ।।८६।। मनोवृत्ती असती असंख्य । परि त्या सर्वचि सांसारिक । त्यात भाववृत्ती असे एक । जी देव दाखविते ।।८७।। भावाचे मोडूनि चंचलपण । ती शिवाठायी स्थिरावे पूर्ण । त्या स्थितीसी नाव जाण । असे 'भावनिष्पत्ती' ।।८८।। तो भाव परिपक्व होऊन । योग्याठायी दिसे भासमान । शिंपल्यावरी शुक्तिका पूर्ण । जैसी होई प्रतीत ।।८९।। तैसा भाव केवळ आभासे । तो शिवात विलीन झालासे । म्हणूनि भावनिष्पत्तिमान् ऐसे । त्यासी म्हणती ज्ञानी जन ।।९०।। जरी ज्ञानयोग्यास काही । भावासी देणे घेणे नाही । तरी संसारमोचक शिवाठायी । त्याने भाव ठेवावा ।।९१।।**

परिपूर्णप्रबोधेऽपि भावं शम्भौ न वर्जयेत् । भावो हि निहितस्तस्मिन् भवसागरतारकः ।।३९।।

निवर्त्य जन्मजं दुःखं भावः शैवो निवर्तते । यथा काष्ठादिकं दग्ध्वा स्वयं शाम्यति पावकः ।।४०।।

**जरी तो पूर्ण ज्ञानी झाला । तरी त्यागू नये शिवभावनेला । संसारसागर तरावयाला । तीच होई साहाय्यक ।।९२।। अग्नी काष्ठाठायी प्रकटे । जाळून टाकी सर्व काष्ठे । अंती आपणही मिटे । शांत होऊनि पूर्णतः ।।९३।। तैसा शिवयोग्याठायी । शिवभाव उत्पन्न होई । त्याचे जन्मदुःख नाशूनि**

**स्वत:ही । विलीन होई शिवात ।।९४।। ऐसा योगी निर्भाव होता । प्राप्त होई विदेहावस्था । शरीरभान हरूनि सर्वथा । मुक्त विचरे स्वच्छंदे ।।९५।। दिशा हेचि त्याचे अंबर । वस्त्रे असली नसली देहावर । मग भरावयासी उदर । शिते उष्टी वेचणे ।।९६।। बोलणे तरी असंबद्ध । ते असावे व्याकरणशुद्ध । ऐसा त्याच्यावरी कोण निर्बंध । घालू शकेल पंडित? ।।९७।। ब्रह्मानंदी लागली टाळी । तेथे देहासी कोण सांभाळी? । ऐसी विदेहावस्था वर्णिली । पूर्ण अध्यात्मशास्त्रात ।।९८।।**

प्रकाशिते शिवानन्दे तद्भावैः किं प्रयोजनम् । सिद्धे साध्ये चिरेणापि साधनैः किं प्रयोजनम् ।।४१।।

एकीकृते शिवे भावे ज्ञानेन सह संयमी । विस्मितात्मसमावेशः शिवभावे विभासते ।।४२।।

न भावेन विना ज्ञानं न भावो ज्ञानमन्तरा । मोक्षाय कारणं प्रोक्तं तस्मादुभयमाश्रयेत् ।।४३।।

**बहु काळ लोटता जाण । साध्य सिद्ध होता पूर्ण । मग साधनाचे प्रयोजन । काही उरेनाच की ।।९९।। तैसा शिवानंद सदोदित । शिवयोग्यासी होता प्राप्त । शिवभावाचे त्यासी किंचित । प्रयोजनचि उरेना ।।१००।। ज्ञानासह भाव पूर्ण । परशिवात होई विलीन । संयमी चकित होऊन । स्वस्वरूपी प्रकाशे ।।१०१।। भावाविण नोहे ज्ञान । भावप्राप्ती न ज्ञानाविण । मुक्तीसाठी दोन्ही कारण । म्हणूनि प्राप्त करावे ते ।।१०२।।**

## ज्ञाननिष्पत्तिस्थल - (८६)

ज्ञानस्य व्यवहारेऽपि ज्ञेयाभावात् स्वभावतः । स्वप्नवज्ज्ञाननिष्पत्त्या ज्ञाननिष्पन्न इत्यसौ ।।४४।।

स्वप्नजातं यथा ज्ञानं सह स्वार्थैर्निवर्तते । तथात्मनि प्रकाशे तु ज्ञानं ज्ञेयं निवर्तते ।।४५।।

**स्वस्वरूपज्ञानात विलीन । जो शिवयोगी झाला पूर्ण । त्याने जी घ्यावी जाणून । ऐसी प्रपंचात वस्तू नसे ।।१०३।। स्वप्नातील वस्तुज्ञान । जागृत होता जाई नाशून । तैसे स्वप्नवत् व्यवहारज्ञान । ठरे शिवयोग्याचे ।।१०४।। जेथे ज्ञेयचि मुळी नसे । तेथे ज्ञान होईल कैसे? । योग्यासी प्रपंचचि न दिसे । मग ज्ञान कैसे संभवेल? ।।१०५।। ज्याचे व्यावहारिक ज्ञान । स्वस्वरूपज्ञानात झाले विलीन । त्यास ज्ञाननिष्पत्तिमान । ऐसे ज्ञाते संबोधिती ।।१०६।। स्वप्नातूनि होता जागृत । नाशे स्वप्नज्ञान स्वप्नपदार्थ । तैसे स्वस्वरूपज्ञान होता प्रकाशित । प्रपंच नाशे ज्ञानासह ।।१०७।।**

परिपूर्णे महानन्दे परमाकाशलक्षणे । शिवे विलीनचित्तस्य कुतो ज्ञेयान्तरे कथा ।।४६।।

अखण्डानन्दसंवित्तिस्वरूपं ब्रह्म केवलम् । मिथ्या तदन्यदित्येषा स्थितिर्ज्ञानमिहोच्यते ।।४७।।

**परिपूर्ण महानंदस्वरूप शिवात । ज्याचे विलीन झाले चित्त । त्याने जाणावा ऐसा पदार्थ । अन्य कोणता असेल? ।।१०८।। ज्याचे मन शिवाकडे । त्यासी प्रपंच न सापडे । नेत्र जरी प्रपंचाकडे । तरी**

**तो मनी शिरेना ।।१०९।। जी मन:पूर्वक पाहिली आहे । त्या वस्तूचे स्मरण राहे । जी मन:पूर्वक नर न पाहे । ती पाहून न पाहिल्यासमचि ।।११०।। शिवयोग्याच्या मनी भरून । शिवचि राहिला परिपूर्ण । मग त्याचे कैसे होईल मन । प्रपंचाकडे प्रवृत्त? ।।१११।। अखंड आनंद-ज्ञानस्वरूप शिव । हेचि सत्य असे एकमेव । त्याहूनि भिन्न जे सर्व । ते मिथ्या असे हेचि ज्ञान ।।११२।। नाशूनि सर्व भेदज्ञान । एकचि जाणणे ब्रह्म पूर्ण । ऐसे शिवयोग्याचे ज्ञान । पाहे सर्वत्र शिवरूप ।।११३।।**

सत्तात्मनानुवृत्तं यद् घटादिषु परं हि तत् । व्यावर्तमाना मिथ्येति स्थितिर्ज्ञानमिहोच्यते ।।४८।।

अकारणमकार्यं यदशेषोपाधिवर्जितम् । तद्ब्रह्म तदहं चेति निष्ठा ज्ञानमुदीर्यते ।।४९।।

ज्ञाताप्यहं ज्ञेयमिदमिति व्यवहृतिः कुतः । अभेदब्रह्मस्वारस्ये निरस्ताखिलवस्तुनि ।।५०।।

**घटपटादी वस्तूंत पूर्ण । ब्रह्माचे सत्‌रूपचि विद्यमान । त्यांची नामरूपे ही जाण । असती मिथ्या पूर्णत: ।।११४।। दूर सारूनि नामरूप । तेथे पाहणे शिवरूप । ऐसे परब्रह्माचे सत्यरूप । जाणणे हेचि असे ज्ञान ।।११५।। जेथे कार्यकारणभाव नाही । नसे उपाधीही काही । ते ब्रह्म मी तेच प्रपंचही । ही दृढ निष्ठा हेचि ज्ञान ।।११६।। अद्वितीय प्रापंचिक भेदविहीन । अशा परशिवात झाला लीन । त्याला ज्ञाता-ज्ञेय ऐसा जाण । कसा असेल व्यवहार? ।।११७।। जेथे ज्ञाता ज्ञेय न उरे । तेथे ज्ञान सहजचि**

**सरे । मग उरे सर्व व्यापूनि सारे । एकमात्र शिवरूप ।।११८।।**

**पिंडाकाशस्थल** - (८७)

यथा पिण्डस्थ आकाशस्तथात्मा पूर्ण उच्यते । एतदर्थविवेको यः पिण्डाकाशस्थलं विदुः ।।५१।।

घटोपाधिर्यथाकाशः परिपूर्णः स्वरूपतः । तथा पिण्डस्थितो ह्यात्मा परिपूर्णः प्रकाशते ।।५२।।

**पिंडी म्हणजे देहात । एकचि आत्मा अवस्थित । तो दिसला जरी देहस्थ । तरी अखंड परिपूर्ण ।।११९।। जैसे घटात मठात । एकचि आकाश असे व्याप्त । परि ते न होय खंडित । घट मठ या उपाधींनी ।।१२०।। घटात मठात दिसे वेगळे । परि ते अखंड, नाही भंगले । तैसे आत्मतत्त्वही देहांतले । असे अखंड परिपूर्ण ।।१२१।। ऐसा शिवयोग्याठायी सम्यक् । वसतो जो पूर्ण विवेक । त्याला नाम असे देख । 'पिंडाकाशस्थल' हे ।।१२२।। आकाश घटोपाधीने युक्त । तरी ते व्यापक मुळात । तैसा आत्माही शरीरात । व्यापकपणे प्रकाशतो ।।१२३।। ज्या जीवाठायी वसे अज्ञान । तो आत्म्यास मानी भिन्न भिन्न । प्रत्येक पिंडात वेगळा जाण । आत्मा वसे मानितो ।।१२४।। परि शिवयोगी आत्मानुभवी । सर्व पिंडांत आत्मरूपे पाही । आपणचि वसतो सर्व देही । ऐसे पूर्ण जाणतो ।।१२५।। आकाशीचा चंद्र एक । जलभरल्या घटी अनेक । बिंबूनि भासे पृथक् पृथक् । तैसा आत्मा सर्व देही ।।१२६।।**

अन्तःस्थितं पराकाशं शिवमद्वैतलक्षणम् । भावयेद् यः सुमनसा पिण्डाकाशः स उच्यते ।।५३।।
शिवागारमिदं प्रोक्तं शरीरं बोधदीपितम् । षट्त्रिंशत्तत्त्वघटितं सुमनःपद्मपीठकम् ।।५४।।
पराकाशस्वरूपेण प्रकाशः परमेश्वरः । हृदाकाशगुहालीनो दृश्यतेऽन्तः शरीरिणाम् ।।५५।।

**अद्वितीय शिव वसे हृदयात । त्याचे पराकाशस्वरूपात । जो शुद्धमने ध्यान करी सतत । त्यासी म्हणती पिंडाकाश ।।१२७।। छत्तीस तत्त्वांनी घडलेले । हृदय-कमलासन असलेले । ज्ञानदीपाने उजळलेले । शरीरचि असे शिवालय ।।१२८।। जेथे राहतो भगवंत । त्या मंदिरास वंदिती जन समस्त । तैसा शिवयोग्याचा देह जगात । वंदनीय पूर्ण ठरे ।।१२९।। शरीरधारी जीव असंख्य । त्यांना न वंदिती कधी लोक । परि शिवयोग्याचा देह एक । पूज्य वंद्य मानिती ।।१३०।। ज्याचा देह शिवमंदिर । त्याच्या हृदय-गाभाऱ्यात परमेश्वर । ज्ञानप्रकाशरूपे होऊनि स्थिर । गोचर होई भक्तांना ।।१३१।। जैसे आकाश लीन गुहेत । तैसा शिव हृदयगुहेत स्थित । राहूनि कृपावर्षाव करीत । समस्त शिवभक्तांवरी ।।१३२।।**

एतच्छिवपुरं प्रोक्तं सप्तधातुसमावृतम् । अत्र हृत्पंकजं वेश्म सूक्ष्माम्बरमनोहरम् ।।५६।।
तत्र सन्निहितं साक्षात् सच्चिदानन्दलक्षणम् । नित्यसिद्धः प्रकाशात्मा जलस्थाकाशवच्छिवः ।।५७।।

**शिवयोग्याचे शरीर । जणू सप्तधातूंनी घडले नगर । शिव राहे म्हणूनि ते शिवपुर । शिवराज्याची राजधानी ।।१३३।। सूक्ष्म आकाशयुक्त मनोहर । हृदयकमल हे अंत:पुर । तेथे सच्चिदानंदरूप शिव स्थिर । नित्यसिद्ध प्रकाशरूप ।।१३४।। आकाश राहे जली बिंबून । तैसा परशिव प्रकाशमान । शिवयोग्याचे हृदय व्यापून । राहे परिपूर्णतेने ।।१३५।।**

अन्तराकाशबिम्बस्थमशेषोपाधिवर्जितम् । घटाकाश इव च्छिन्नं भावयेच्चिन्मयं शिवम् ।।५८।।

**एकचि महाकाश घटोपाधीमुळे । भासे खंडित वेगवेगळे । परि ते किंचितही भंगले । नसे जैसे कुठेच ।।१३६।। तैसा चिन्मय शिव उपाधिविहीन । सूक्ष्म हृदयाकाशी स्थिर होऊन । दिसे उपाधीमुळे परिच्छिन्न । ऐसी जाणीव असावी ।।१३७।।**

### **बिंद्वाकाशस्थल** – (८८)

यथाकाशो विभुर्ज्ञेयः सर्वप्राण्युपरि स्थितः । तथात्मेत्युपमानार्थं बिन्द्वाकाशस्थलं विदुः ।।५९।।

यथैको वायुराख्यातः सर्वप्राणिगतो विभुः । तथात्मा व्यापकः साक्षात् सर्वप्राणिगतः स्वयम् ।।६०।।

**सृष्टिनिर्मितीआधी विश्व । ज्यात सामावूनि असे सर्व । त्या बृहत् तत्त्वासी नाव । 'बिंदू' ऐसे असे जाण ।।१३८।। नाद बिंदू आणि कला । यांचा अर्थ कथितो तुजला । जे सूक्ष्म शिवतत्त्व त्याला । 'बिंदू'**

ऐसे संबोधिती ।।१३९।। तैसीच जी शक्ती सूक्ष्म जाण । तिला 'नाद' ऐसे अभिधान । नाद-बिंदूंच्या आश्रयातून । जन्मे विश्व ते 'कला' ।।१४०।। जैसी कलावंताची कृती । त्यास म्हणती कलाकृती । तैसी नाद-बिंदूंची निर्मिती । असे विश्वरूपी 'कला' ।।१४१।। नाना रूप-रंगांनी नटलेले । ज्यावरी नाना जीव बहरले । हे अद्भुत चराचर जाण सगळे । शिव-शक्तीची कलाकृती ।।१४२।। बिंदुरूप शिवतत्त्व सूक्ष्म जाण । तैसे आकाशतत्त्वही सूक्ष्म पूर्ण । देऊनि आकाशाचे उपमान । तेचि येथे विवरिले ।।१४३।। म्हणूनि नाम या स्थलास । असे जाण बिंद्वाकाश । जे बिंदुरूप सूक्ष्म असे ते जगतास । राहे सर्व व्यापूनी ।।१४४।। सर्व प्राणिमात्रांस वरती दिसे । ते आकाश सर्वव्यापक असे । तैसा शिवयोग्याचा आत्मा देही भासे । परि तो सर्वव्यापक ।।१४५।। प्राणवायु-रूपाने देख । प्राणिमात्रांच्या ठायी एक । वायू असे सर्वव्यापक । तैसा आत्मा जाणावा ।।१४६।।

यथा वह्निरमेयात्मा सर्वत्रैकोऽपि भासते । तथा शम्भुः समस्तात्मा परिच्छेदविवर्जितः ।।६१।।

सर्वेषां देहिनामन्तश्चित्ततोऽयं प्रकाशते । तस्मिन् प्रतिफलत्यात्मा शिवो दर्पणवद् विभुः ।।६२।।

एकचि अग्नी अपरिमित । व्यापूनि होई प्रकाशित । तैसा सर्वात्मा शिव भेदरहित । आत्मरूपी स्थित व्यापक ।।१४७।। अग्नी मुळात अव्यक्त । तो अनेक रूपांत होई व्यक्त । कधी स्फुल्लिंगाच्या

**रूपात । येई सूक्ष्मरूपाने ।।१४८।। कधी घेई विद्युल्लतेचे रूप । उडवी काळजाचा थरकाप । हे अग्नीचे दिव्याग्नी रूप । देही पडता कोळसा ।।१४९।। समुद्री वसतो जो अग्नी । त्यासी म्हणती वडवाग्नी । तो असे सामर्थ्य ठेवूनी । समुद्र सुकविण्याचे ।।१५०।। पोटी भुकेचा डोंब उसळता । हे खाऊ की ते गिळू आता । ऐसी जीवाची करी अवस्था । त्यास म्हणती जठराग्नी ।।१५१।। जन्मभरी टाकिल्या आहुती । तरी त्याची न होय तृप्ती । मानवा लाचार बनवी किती । तो हा असे जठराग्नी ।।१५२।। जो स्मशानी जाळी प्रेतास । कालाग्नी म्हणती त्यास । एका अग्नीचीच ही विशेष । रूपे असती अगस्त्या ।।१५३।। ऐसा एकचि अग्नी अव्यक्त । सर्वत्र व्याप्त कणाकणांत । तैसा आत्माही प्राणिमात्रांत । व्यक्त अव्यक्त राहतो ।।१५४।। प्रतिबिंब दिसे दर्पणात । तैसा चित्तरूपी निर्मल जलात । व्यापक शिवचि प्रतिबिंबित । होई आत्मारूपाने ।।१५५।।**

एको वशीकृतः संवित्प्रकाशात्मा परात्परः । सर्वप्राणिगतो भाति तथापि विभुरुच्यते ।।६३।।

एक एव यथा सूर्यस्तेजसा भाति सर्वगः । तथात्मा शक्तिभेदेन शिवः सर्वगतो भवेत् ।।६४।।

**स्वतंत्र श्रेष्ठ पराशक्तीहून । शिव अद्वितीय चित्प्रकाशघन । तो सर्वहृदयी विराजूनि परिच्छिन्न । भासे तरी व्यापक ।।१५६।। एकचि सूर्य स्वप्रकाशेकरून । सर्व विश्वाला राहतो व्यापून । तैसा**

**इच्छा-क्रिया-ज्ञानशक्तींनी पूर्ण । शिव व्यापितो जगासी ।।१५७।। बिंदुरूप परिपूर्ण शिवाने । जग व्यापिले आकाशाप्रमाणे । हे सर्वव्यापकत्व जाणणे । हेचि बिंद्वाकाशस्थल ।।१५८।।**

**महाकाशस्थल** - (८९)

पिण्डाण्डस्थं महाकाशं न भिन्नं तद्वदात्मनः । अभिन्नः परमात्मेति महाकाशस्थलं विदुः ।।६५।।

यथा न भिन्नमाकाशं घटेषु च मठेषु च । तथाण्डेषु च पिण्डेषु स्थितो ह्यात्मा न भिद्यते ।।६६।।

**पिंडातील आकाश जाण । वेगळे नसे महाकाशाहून । तैसा शिवयोग्याचा आत्मा भिन्न । नसे परम-आत्म्याहूनी ।।१५९।। ऐसी जी पूर्ण जाणीव । तिला 'महाकाशस्थल' नाव । अणुरेणूहूनि सूक्ष्म शिव । तो महानाहूनही महान ।।१६०।। आकाश घटात असो वा मठात । ते भिन्न भासे तरी अविभक्त । तैसा पिंड-ब्रह्मांडात जो व्याप्त । तो आत्मा असे एकचि ।।१६१।। जैसे धान्यातील कीडे । पुनःपुन्हा जन्मती बापुडे । आत्मज्ञानहीन त्यांच्याएवढे । जगतो जिणे निरर्थक ।।१६२।। परि जो आत्मज्ञानी पूर्ण । आत्मा व्यापक आकाशासमान । तो जाणतो म्हणूनि संसारचक्रातून । मुक्त होई निश्चित ।।१६३।।**

अनिर्देश्यमनौपम्यमवाङ्मानसगोचरम् । सर्वतोमुखसम्पन्नं सत्तानन्दं चिदात्मकम् ।।६७।।

कालातीतं कलातीतं क्रमयोगादिवर्जितम् । स्वानुभूतिप्रमाणस्थं ज्योतिषामुदयस्थलम् ।।६८।।

शिवाख्यं परमं ब्रह्म परमाकाशलक्षणम् । लिंगमित्युच्यते सद्भिर्यद्विना न जगत्स्थितिः ।।६९।।

**जे दाविता नये प्रमाणांस । जे अगोचर वाणी-मनास । जे सर्वतोमुख सच्चिदानंदरूप, अडतीस । कलांच्या जे पलीकडले ।।१६४।। भूत-वर्तमान-भविष्यातीत । उत्पत्ति-स्थिति-लयसंबंधरहित । अनुभवगम्य जे सतत । ते शिव नामक परब्रह्म ।।१६५।। ते नक्षत्रांचे जन्मस्थान । परमाकाशस्वरूप परिपूर्ण । ते शिवब्रह्म हे महालिंग जाण । ऐसे ज्ञानी सांगती ।।१६६।। ते विश्वाचे अधिष्ठान । ते आहे म्हणूनि विश्व विद्यमान । त्याच्याविण अस्तित्वहीन । विश्व पूर्ण जाणावे ।।१६७।।**

परमाकाशमव्यक्तं प्रबोधानन्दलक्षणम् । लिंगं ज्योतिर्मयं प्राहुर्लीयन्ते यत्र योगिनः ।।७०।।

संविदेव परा काष्ठा परमानन्दरूपिणी । तामाहुः परमाकाशं मुनयो मुक्तसंशयाः ।।७१।।

**अव्यक्त ज्ञानानंदरूप महालिंगी । ज्यात ऐक्य पावतो शिवयोगी । त्या ज्योतिर्मय परमाकाशास योगी । ज्योतिर्लिंग संबोधिती ।।१६८।। आत्मरूपाच्या ज्ञानामुळे । जो निर्भेळ आनंद मिळे । तो जगी अन्य कशामुळे । मिळेचिना निश्चित ।।१६९।। त्या परमानंदस्वरूप चैतन्यास । ओळखूनि म्हणती महाकाश । ज्यांनी तोडिले संशयपाश । ते वसिष्ठादी ऋषिगण ।।१७०।।**

तरंगादि यथा सिन्धोः स्वरूपान्नातिरिच्यते । तथा शिवाच्चिदाकाशाद् विश्वमेतन्न भिद्यते ।।७२।।

यथा पुष्पपलाशादि वृक्षरूपान्न भिद्यते । तथा शिवात् पराकाशाज्जगतो नास्ति भिन्नता ।।७३।।

**समुद्र आणि तरंग । हे भासती परि नसती अलग । तैसे चिदाकाशस्वरूप शिवाहूनि जग । भिन्न नसेचि सर्वथा ।।१७१।। बुंधा शाखा पुष्प पर्ण । हे वृक्षाहूनि नसती भिन्न । तैसे शिवातूनि जे झाले उत्पन्न । ते जग अभिन्न शिवाशी ।।१७२।। शाखा फुले पर्ण मिळून । वृक्षाचे साकारते वृक्षपण । तैसा जगद्रूपाने संपूर्ण । शिवचि उभा दृष्टीपुढे ।।१७३।।**

यथा ज्योतींषि भासन्ते भूताकाशे पृथक्पृथक् । तथा भान्ति पराकाशे ब्रह्माण्डानि विशेषतः ।।७४।।

निरस्तोपाधिसम्बन्धं निर्मलं संविदात्मकम् । पराकाशं जगच्चित्रविलासालम्बभित्तिकम् ।।७५।।

**जे दिसे भूताकाश विशाल । त्यात तळपती असंख्य ग्रहगोल । तैसी अनंत ब्रह्मांडे तेजाळ । परमाकाशी प्रकाशती ।।१७४।। विराट ब्रह्मांडचित्र सुंदर । रेखावे ज्या विशाल भिंतीवर । ती आधारभिंत असे मनोहर । ज्ञानस्वरूप महाकाश ।।१७५।। ते सर्वोपाधीपलीकडले । आणवादी मलरहित आगळे । हे विश्वचित्रचि आधारले । त्याच्यावरी संपूर्ण ।।१७६।।**

## क्रियाप्रकाशस्थल - (९०)

शिवस्य परिपूर्णस्य चिदाकाशस्वरूपिणः । आत्मत्वेनानुसन्धानात् क्रियाद्योतनवान् यमी ।।७६।।

निष्कलंकचिदानन्दगगनोपमरूपिणः । शिवस्य परिपूर्णस्य वृत्तिश्चैतन्यरूपिणी ।।७७।।

**चिदाकाशरूप शिवाचे परिपूर्ण । जो आत्मरूपाने करी ध्यान । तो असे क्रियाप्रकाशवान । शिवयोगी संयमी ।।१७७।। ज्या क्रियेमाजी मन स्थिरावे । तीच क्रिया महत्त्व पावे । आत्मचिंतन हीच सहजभावे । क्रिया घडे या स्थली ।।१७८।। निष्कलंक चिदानंद-आकाशासमान । तो शिव मीच असे परिपूर्ण । ऐसी चिंतनरूप मनोवृत्ती जाण । असे शिवासम ज्ञानरूप ।।१७९।। चिद्रूपाचे चिंतन करिता । वृत्ती चिद्रूप होय सर्वथा । मग चित्तवृत्तिनिरोधाची चिंता । वाहावीच नलगे ।।१८०।। ज्याच्या मनी प्रपंच वसे । त्यास बाहेरही तोचि दिसे । जो शिवासी मनी वाहातसे । त्यास शिवचि दिसे बाहेरी ।।१८१।। वृत्ती होता परब्रह्ममय । त्यास दिसे न काही ब्रह्माशिवाय । ऐसे वृत्तीसी करणे चैतन्यमय । हाचि जाण शिवयोग ।।१८२।।**

निष्कलंके निराकारे नित्ये परमतेजसि । विलीनचित्तवृत्तस्य तथा शक्तिः क्रियोच्यते ।।७८।।

सर्वज्ञः सर्वकर्ता च सर्वगः परमेश्वरः । तदैक्यचिन्तया योगी तादृशात्मा प्रकाशते ।।७९।।

**निष्कलंक नित्य निराकार । परम तेज:स्वरूप जो शंकर । त्याच्या तेजात चित्तव्यापार । शिवयोग्याचे लीन होती ।।१८३।। त्याची आत्मानुसंधान-क्रिया । तीच क्रियाशक्ती जाण मुनिवर्या । ती असे तेजोरूपिणी क्रिया । शिवासमान संपूर्ण ।।१८४।। सर्वज्ञ सर्वकर्ता परमेश्वर । जो व्यापूनि राहिला चराचर । त्याच्या ऐक्यचिंतने शिवयोगीश्वर । तत्स्वरूप होऊनि प्रकाशे ।।१८५।। शिवाशी समरस होता पूर्ण । शिवाचे षडैश्वर्यादी गुण । शिवयोग्याठायी बाणून । सिद्धिसामर्थ्य लाभते ।।१८६।।**

सर्वेन्द्रियाणां व्यापारे विद्यमानेऽपि संयमी । प्रत्युन्मुखेन मनसा शिवं पश्यन् प्रमोदते ।।८०।।

कूटस्थमचलं प्राज्ञं गुणातीतं गुणोत्तरम् । शिवतत्त्वं स्वरूपेण पश्यन् योगी प्रमोदते ।।८१।।

परात्मनि क्रिया सर्वा गन्धर्वनगरीमुखा । प्रकाशत इति प्रोक्तं क्रियायास्तु प्रकाशनम् ।।८२।।

**सर्वेन्द्रियव्यवहारात । तो संयमी वर्ते यथावत् । परि त्याविपरीत त्याचे चित्त । प्रमोदे शिव-दर्शनाने ।।१८७।। चालणे ऐकणे खाणे पिणे । त्याचे सामान्य असे वर्तणे । हृदयी शिवासी अंतर्दृष्टीने । पाहूनि मनी आनंदे ।।१८८।। ज्ञानवैराग्यादी गुणांनी युक्त । श्रेष्ठ आणि मायिक गुणरहित । जो सर्वसाक्षी शिव सर्वगत । प्राज्ञ आणि निश्चल ।।१८९।। तो पाहूनि स्वस्वरूपात । आनंदे उचंबळे आतल्या आत । बाहेर पाहता दिसे तटस्थ । आत शिवानंदी निमग्न ।।१९०।। त्याच्या बाह्य क्रिया**

शारीर । गंधर्वनगरासमान अस्थिर । क्षणोक्षणी बदलती आकार । ढगांचे जैसे आकाशी ।।१९१।। अन्य क्रिया भासमान । परि दृढ क्रिया आत्मचिंतन । त्या क्रियेचे येथे प्रकाशन । म्हणून क्रियाप्रकाश- स्थल हे ।।१९२।।

**भावप्रकाशस्थल - (९१)**

तरंगाद्या यथा सिन्धौ न भिद्यन्ते तथात्मनि । भावा बुद्ध्यादयः सर्वे यत्तद् भावप्रकाशनम् ।।८३।।

शिव एव जगत्सर्वं शिव एवाहमित्यपि । भावयन् परमो योगी भवदोषैर्न बाध्यते ।।८४।।

कर्म घडेना भावेविण । आणि प्राप्तही होईना ज्ञान । कर्म-ज्ञानाचा संबंध जाण । भावनाच जुळविते ।।१९३।। परिपक्व होता फळ । त्याचा दरवळे परिमळ । तैसा शिवभाव पिकता निर्मळ । तो प्रकाशत राहतो ।।१९४।। मनुष्याचे हावभाव । प्रकट करिती आंतरभाव । ज्ञान्याच्या मुखमंडलावरी सर्व । ब्रह्मनिष्ठत्व प्रकाशते ।।१९५।। जैसे सागरी उठती तरंग । ते सागराचेचि असती अंग । तैसे शिवयोग्याचे भावतरंग । आत्म्याहूनि न वेगळे ।।१९६।। वृत्ती शिवमय होणे सर्व । तिलाच 'भाव' ऐसे नाव । भाव प्रकाशित करी शिव । म्हणूनि भावप्रकाशस्थल हे ।।१९७।। प्रपंच असे परमात्मस्वरूप । मीही असे परशिवरूप । ऐसा दृढभाव ज्याचा तो निर्लेप । संसारदोषांपासूनी ।।१९८।। त्याच्या

**मिटल्या नेत्रांपुढे । शिवरूपचि दिसे गाढे । तो नेत्र उघडी तरी पुढे । शिवचि विश्वरूपात ।।१९९।।**

शिवभावे स्थिरे जाते निर्लेपस्य महात्मनः । ये ये भावाः समुत्पन्नास्ते ते शिवमयाः स्मृताः ।।८५।।

अद्वितीयशिवाकारभावनाध्वस्तकर्मणा । न किंचिद्भाव्यते साक्षात् शिवादन्यन्महात्मना ।।८६।।

**अंतरी शिवभाव स्थिरावे पूर्ण । तो अलिप्त असे विषयांपासून । जे भाव मनी होती उत्पन्न । ते सर्वचि शिवमय ।।२००।। मळविले तरी आकाश मळेना । रंगविले तरी कधी रंगेना । तैसा शिवयोगी कधी होईना । लिप्त प्रपंचव्यापारी ।।२०१।। ज्याचे कर्मबंधन ध्वस्त झाले । त्यासी अद्वितीय शिवभावामुळे । शिवाविण काही वेगळे । येईचना अनुभवा ।।२०२।। शिवाविण अन्य काही । तो कोठे पाहतचि नाही । येथे तेथे सर्वठायी । शिवचि शिव संचला ।।२०३।।**

गलिताज्ञानबन्धस्य केवलात्मानुभाविनः । यत्र यत्र इन्द्रियासक्तिस्तत्र तत्र शिवात्मता ।।८७।।

रागद्वेषादयो भावाः संसारक्लेशकारणम् । तेषामुपरमो यत्र तत्र भावः शिवात्मकः ।।८८।।

यथा सूर्यसमाक्रान्तौ न शक्नोति तमः सदा । तथा प्रकाशमात्मानं नाविद्याक्रमति स्वयम् ।।८९।।

**अज्ञानाच्या शृंखला पूर्ण । त्याच्या सर्व पडल्या गळून । शिवस्वरूपानुसंधानात मग्न । तो राहे सर्वदा ।।२०४।। इंद्रिये आसक्त होती जेथ । शिवभावचि जाणवे तेथ । परशिवाविण दृष्टीप्रत । अन्य**

काही दिसेना ।।२०५।। तो पाहतो ऐकतो ते शिव । तो स्पर्शितो चाखतो ते शिव । तो हुंगतो अनुभवितो ते शिव । शिव सर्व शिवचि ।।२०६।। शिव भरला भावनेत । मग शिवचि दिसे जेथ तेथ । ऐसी तदाकार स्थिती प्राप्त । होई शिवयोग्यासी ।।२०७।। राग-द्वेषादी भावना जाण । संसारक्लेशांसी असती कारण । त्या शिवयोग्याठायी पूर्ण । शिवात्मक होऊनि राहती ।।२०८।। तेजोनिधी सूर्यास जाण । न पडे अंधाराचे आवरण । तैसे प्रकाशरूप आत्म्यासी अज्ञान । झाकू शकेना कदापि ।।२०९।।

**ज्ञानप्रकाशस्थल - (९२)**

मुख्यार्थेऽसम्भवे जाते लक्षणायोगसंश्रयात् । तज्ज्ञानयोजनं यत्तदुक्तं ज्ञानप्रकाशनम् ।।९०।।

मुक्तस्य ज्ञानसम्बन्धो ज्ञेयाभावः स्वभावतः । उपाधिसहितं ज्ञानं न भेदमतिवर्तते ।।९१।।

शिव-जीवातील अभेद । वाच्यार्थाने न होय विशद । तेधवा तो करणे सिद्ध । लक्ष्यार्थाने कुंभोद्भवा ।।२१०।। लिंग-अंगाचे सामरस्यज्ञान । लक्ष्यार्थाने घेणे जाणून । यास ज्ञानप्रकाशन-। स्थल या नावे संबोधिती ।।२११।। ज्याचा सहज समजे अर्थ । त्यास म्हणती वाच्यार्थ । जो प्रयत्ने समजून घेणे अर्थ । तो लक्ष्यार्थ जाणावा ।।२१२।। दोन घटांतील आकाश एक । परि ते एक करणे अशक्य । घट भंगल्यावरी ऐक्य । होईल घटाकाशाचे ।।२१३।। भासे घटोपाधीमुळे । दोन्ही घटांतील

**आकाश वेगळे । तैसे देह-मनाच्या उपाधींमुळे । जीव वेगळे भासती ।।२१४।। दोन घटांतील आकाश देख । वेगळे असूनही असे एक । ऐसा करणे विवेक । हाचि असे लक्ष्यार्थ ।।२१५।। तैसे देहधारी जीव असंख्य । परि ते आत्मरूपाने असती एक । उपाधिरूप वाच्यार्थ त्यागूनि देख । आत्मरूप लक्ष्यार्थ जाणावा ।।२१६।। जीवन्मुक्त शिवयोग्यासी पूर्ण । स्वभावत: असे लक्ष्यार्थज्ञान । त्याने घ्यावे जे जाणून । ते ज्ञेयचि नसे उरलेले ।।२१७।। उपाधियुक्त जे ज्ञान । ते भेदासी असे कारण । जे ज्ञान उपाधिशून्य । ते अभेद दर्शविते ।।२१८।।**

ज्ञानमित्युच्यते सद्भिः परिच्छेदोऽपि वस्तुनः । परात्मन्यपरिच्छेदे कुतो ज्ञानस्य सम्भवः ।।९२।।

ज्ञानस्याविषये तत्त्वे शिवाख्ये चित्सुखात्मनि । आत्मैकत्वानुसन्धानं ज्ञानमित्युच्यते बुधैः ।।९३।।

**जेथे ज्ञेय ज्ञाता भिन्न । ते जाणावे भेदज्ञान । जेथे सर्व आत्मरूप जाण । ते अभेदज्ञान असे ।।२१९।। जेथे मी आणि घट वेगळे । तेथे भेदज्ञान साचले । जेथे मीच आत्मा हे जाणले । तेथे अभेद-ज्ञानचि ।।२२०।। लिंग अंग मानिता भिन्न । त्यास म्हणती द्वैतज्ञान । अखंड परमात्मा जेथे पूर्ण । तेथे द्वैत न संभवे ।।२२१।। जो ज्ञानाचा विषय नसे । तो चिदानंदस्वरूप शिव असे । तोच मी करणे चिंतन ऐसे । यास ज्ञान संबोधिती ।।२२२।।**

अपरिच्छिन्नमानन्दं सत्ताकारं जगन्मयम् । ब्रह्मेति लक्षणं ज्ञानं ब्रह्मज्ञानमिहोच्यते ।।९४।।

ब्रह्मज्ञाने समुत्पन्ने विश्वोपाधिविवर्जिते । सर्वं संविन्मयं भाति तदन्यन्नैव दृश्यते ।।९५।।

तस्मादद्वैतविज्ञानमपवर्गस्य कारणम् । भावयन् सततं योगी संसारेण न लिप्यते ।।९६।।

**अखंड आनंदस्वरूप सद्रूप जाण । विश्वमय हे ज्याचे लक्षण । ते परब्रह्म असे, त्याचे ज्ञान । हे ब्रह्मज्ञान जाणावे ।।२२३।। विश्वभेदरहित ब्रह्मज्ञान । जेव्हा हृदयी प्रकाशे पूर्ण । तेव्हा सर्वत्र ज्ञानमय शिवरूप पूर्ण । दिसे, दिसेना अन्य काही ।।२२४।। शिवाद्वैताचे पूर्ण ज्ञान । हे मोक्षासी असे कारण । ऐसे भावितो मनी पूर्ण । त्यास संसारदुःख स्पर्शेना ।।२२५।।**

नित्ये निर्मलसत्त्वयोगिषु परे निर्वासिने निष्कले
सर्वातीतपदे चराचरमये सत्तात्मनि ज्योतिषि ।
संविद्व्योम्नि शिवे विलीनहृदयस्तद्भेदवैमुख्यतः
साक्षात् सर्वगतो विभाति विगलद्विश्वः स्वयं संयमी ।।९७।।

**नित्य निरवयव वासनारहित । जे निर्मल सात्त्विक हृदयी स्थित । परंधाम विश्वोत्पत्तीस कारणीभूत । सद्रूप प्रकाशरूप ।।२२६।। त्या ज्ञानाकाशरूप महालिंगात । ज्याचे विलीन झाले चित्त ।**

**तो सर्वगत संयमी भेदभ्रांतिरहित । होऊनि स्व-रूपे प्रकाशे ।।२२७।। ऐसी लिंगषट्स्थलांतर्गत । शरणस्थलाची उपस्थले समस्त । तुज निरूपिली लक्षणांसहित । मुनिश्रेष्ठा अगस्त्या ।।२२८।। अजूनि जिज्ञासा असेल । तरी विवरीन ऐक्यस्थल । जी जी बोलूनि निश्चल । अगस्त्य उगेचि राहिले ।।२२९।। आता अध्यायात पुढील । श्रोतेहो लिंगषट्स्थलांतील । जे अंतिम ऐक्यस्थल । ते निरूपतील जगद्गुरू ।।२३०।। ते भक्तिपूर्ण अंत:करणाने । श्रवण करावे उत्कंठेने । कर्णाचे पूर्ण पारणे । घ्यावे सहज फेडूनी ।।२३१।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।२३२।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । एकोनविंशोऽध्याय पूर्ण हा ।।२३३।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतशरणस्थले दीक्षापादोदकस्थलादिद्वादशविधस्थलप्रसंगो नाम एकोनविंशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय विसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु पंडिताराध्याय नमः।। ॐ शिवाय नमः तारकाय । परमेश्वराय नमः नमः शिवाय । नमः शिवाय नमः शिवाय । नमः शिवाय शिवाय नमः ।।१।। तुझी अष्टोत्तरशत नावे । महादेवा मी जपली भावे । ग्रंथपाठकासी लाभावे । या जपाचे पुण्यफळ ।।२।। देवा नकळत तुझे नाम । सहज उच्चारी खळ अधम । त्यासही देतोसी पद परम । ऐसी ख्याती तुझी गा ।।३।। भस्मासुराने दुष्ट भावे । तुझे वरदान मागावे । आणि त्याच्यापुढे तू पळावे । भस्म करील म्हणूनी ।।४।। तुझ्यासारखा देव भोळा । मी पुराणांतरी नाही पाहिला । पापिणीने वारिले श्वानाला । हड हड ऐसे बोलूनी ।।५।। तिच्या मुखी नव्हते दात । म्हणूनि ती बोबडे बोलत । हड म्हणता हर उच्चारीत । तिलाही तू उद्धरिले ।।६।। शिवा मी मागतो कृपा केवळ । या ग्रंथाचे पठण-पारायण करील । त्यासी अष्टोत्तरशत नामजपाचे पुण्यफल । देई अष्टोत्तरशत गुणे ।।७।। भोळा चक्रवर्ती तू उदार । मला वरदान देशील सत्वर । यात शंका नसे तिळभर । भोळ्या माझ्या महादेवा ।।८।। असो आता लिंगस्थलांतील । अंतिम स्थल जे ऐक्यस्थल । ते अगस्त्य मुनीस कथितील । जगद्गुरू रेणुकाचार्य ।।९।। ते श्रवण

**करूनि भावे । षट्स्थल आचरणात आणावे । आणि जन्ममृत्यूची नावे । पूर्ण पुसूनि टाकावी ।।१०।।**

## लिंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

अगस्त्य उवाच-

स्थलभेदास्त्वया प्रोक्ताः शरणस्थलसंश्रिताः । ऐक्यस्थलगतान् ब्रूहि स्थलभेदान् गणेन्द्र मे ।।१।।

**अगस्त्य म्हणती कृपासागरा । मम चित्तचकोरसुधाकरा । बरवे निरूपण केले दातारा । माझ्या आवडीसारखे ।।११।। पूर्वी षडाननाने कथिले । शिवधर्मोत्तरशास्त्र वहिले । आता हृदय पूर्ण धाले । तुमच्या उपदेशामृताने ।।१२।। भोजन करिता पोट भरे । जल प्राशिता तृषा सरे । परि ज्ञानामृत सेविता पुरे । म्हणेचिना मन माझे ।।१३।। सर्वेन्द्रिये कर्णी साठवून । गणेश्वरा मी केले श्रवण । तरी अजूनि माझे मन । हवे हवे असे म्हणे ।।१४।। शरणस्थलाचा गुरुवरा । विचार मज उमजला पुरा । आता पूर्ण कथन करा । ऐक्यस्थलाची उपस्थले ।।१५।।**

श्रीरेणुक उवाच-

स्थलानां नवकं चैक्यस्थलेऽस्मिन् परिकीर्त्यते ।।२।।

तत्स्वीकृतप्रसादैक्यस्थलमादौ प्रकीर्तितम् । शिष्टोदनस्थलं चाथ चराचरलयस्थलम् ।।३।।

भाण्डस्थलं ततः प्रोक्तं भाजनस्थलमुत्तमम् । अंगालेपस्थलं पश्चात् स्वपराज्ञस्थलं ततः ।।४।।

भावाभावविनाशं च ज्ञानशून्यस्थलं ततः । तदेषां क्रमशो वक्ष्ये शृणु तापस लक्षणम् ।।५।।

**रेणुकाचार्य बोलती हसून । अगस्त्या तू शास्त्रनिपुण । असशी आणि विचक्षण । गुरूसी बोलता करणारा ।।१६।। जसजसा बाळ चोखी स्तन । तसतसा तो अधिक येई भरून । तैसी तुझ्या-माझ्यात जाण । गोष्ट झाली वाटते ।।१७।। मी निरूपीत गेलो पुढे । तैसी तुझी तहान वाढे । ज्ञानामृताचे हेचि कोडे । प्राशिता मन भरेचिना ।।१८।। आता षट्स्थलातील अंतिम । जे जीवाचे परमधाम । जेथे सर्व पावे विराम । ते ऐक्यस्थल सांगतो ।।१९।। नऊ उपस्थले या स्थलात । ती निरूपीन लक्षणांसहित । एकाग्र करूनिया चित्त । ऐक शिष्यवरा तू ।।२०।। पहिले स्वीकृतप्रसादैक्यस्थल । शिष्टोदनस्थल चराचरलय-स्थल । भांडस्थल भाजनस्थल । अंगालेपस्थल सहावे ।।२१।। स्वपराज्ञस्थल भावाभावविनाशस्थल । आणि अंतिम ज्ञानशून्यस्थल । षट्स्थलांची मिळूनि सकळ । एकशे एक उपस्थले ।।२२।।**

**स्वीकृतप्रसादैक्यस्थल** - (९३)

मुख्यार्थो लक्षणार्थश्च यत्र नास्ति चिदात्मनि । विशृंखलतया तस्य प्रसादः स्वीकृतो भवेत् ।।६।।

**आत्मज्ञानप्राप्तीस्तव । शिष्य गुरूचे धरी पाय । ते त्यासी उपदेशिती अभिनव । 'तत्त्वमसि'**

महावाक्य ।।२३।। 'तत् त्वम् असि'चा मुख्यार्थ । 'ते तू आहेस' असा होत । तत् पदाने शिव होय सूचित । त्वम् पदाने जीव तो ।।२४।। शिव सर्वज्ञ सर्वकर्ता । जीव अल्पज्ञ अल्पकर्ता । या दोहोंमध्ये सर्वथा । अभेद कैसा जाणावा? ।।२५।। शिव मायाशक्तिविशिष्ट । जीव अविद्याशक्तिविशिष्ट । माया अविद्या या उपाधी सारिता स्पष्ट । दोहोंत दिसे अभेद ।।२६।। ऐसा दोहोंत अभेद जाणणे । यास लक्ष्यार्थ म्हणती शहाणे । परि हे दोन्ही अर्थ होती उणे । ऐक्यस्थली अगस्त्या ।।२७।। मुख्यार्थ लक्ष्यार्थ ही जाणीव । जेथे विरूनि जाई सर्व । शिवजीवैक्य-ज्ञानप्रसाद सदैव । तो स्वीकारी अखंड ।।२८।। स्वीकृतप्रसादी म्हणून । त्यासी जाणती ज्ञानी जन । ऐसे हे स्वीकृतप्रसादैक्यस्थल जाण । घेई जाणूनि मुनिवरा ।।२९।।

मातृमेयप्रमाणादिव्यवहारे विहारिणीम् । संवित्साक्षात्कृतिं लब्ध्वा योगी स्वात्मनि तिष्ठति ।।७।।

अद्वैतबोधनिर्धूतभेदावेशस्य योगिनः । साक्षात्कृतमहासंवित्प्रकाशस्य क्व बन्धनम् ।।८।।

जोवरी नाही ज्ञानप्राप्ती । तोवरी प्रमेय-प्रमाता-प्रमाण त्रिपुटी । याद्वारे चाले आटाआटी । ज्ञानसंपादनाची ।।३०।। प्रमेय म्हणजे शिव जाण । प्रमाता जीवात्म्यासी अभिधान । शब्दादी प्रमाणे हे प्रमाण । यांस म्हणती त्रिपुटी ।।३१।। ज्ञानोत्तर अवस्थेत । हे तिन्ही एकरूप होत । त्यात नांदूनि

**अद्वैत । होती सर्व शिवरूप ।।३२।। जी त्रिपुटीव्यवहाराचे कारण । त्या चित्शक्तीचा साक्षात्कार मिळवून । स्वस्वरूप-चिंतनात मग्न । स्थिर होई शिवयोगी ।।३३।। शिवाद्वैतज्ञान-प्रसादामुळे । ज्याचे भेदबंधन गळाले । त्यास पंचपाशांचे कोठले । बंधन मग असेल? ।।३४।। द्वैताचे भूत प्रचंड । झडपी जीवात्मारूपी झाड । विश्व करूनि खंडविखंड । माजवी बंड भेदांचे ।।३५।। हा वेगळा तो वेगळा । एकत्व दिसेनाच डोळा । भेदाचा उडवी धुरोळा । करी आंधळा जीवात्मा ।।३६।। मग श्रीगुरुरूपी मांत्रिक । टाकूनि अद्वैतमंत्र बोधक । घालविती भूत भयानक । शिष्य-मनाबाहेरी ।।३७।। पिंजऱ्यात बैसूनि पोपट । पारतंत्र्याचे घेऊनि घोट । व्यर्थ करीतसे वटवट । जग मानूनि पिंजऱ्यासी ।।३८।। तैसा भेदसंसार-बंधनी । जीवात्मा परम सुख मानी । जन्मफेरे घालघालूनी । व्यर्थ शिणतो अपार ।।३९।। गुरुकृपेने भेदपडळ । निरसता विश्वात दिसे अखिल । शिवरूप केवळ निर्मळ । मग पाश बांधू शकेना ।।४०।।**

चिदात्मनि शिवे न्यस्तं जगदेतच्चराचरम् । ज्ञायते तन्मयं सर्वमग्नौ काष्ठादिकं यथा ।।९।।

न भाति पृथ्वी न जलं न तेजो नैव मारुतः । नाकाशो न परं तत्त्वं शिवे दृष्टे चिदात्मनि ।।१०।।

**अग्नीत जळाले काष्ठ । त्याचे मूळरूप होई नष्ट । अग्निरूपचि ते स्पष्ट । होई प्रतीत सर्वांसी ।।४१।। तैसे चिदग्निरूप परशिवात । भेदकाष्ठे जळूनि जात । मग चिन्मयचि सर्व जगत् । दिसे**

शिवयोग्याला ।।४२।। त्याच्या दृष्टीस जे जे पडे । ते शिवरूपचि दिसे गाढे । प्रपंचनामक वस्तू न सापडे । त्याच्या दृष्टीस शोधूनी ।।४३।। दृष्टी शिवमय होता पूर्ण । सर्वत्र होई शिवदर्शन । हे दृष्टीतील परिवर्तन । सृष्टी जैसी तैसी असे ।।४४।। शिव व्यापूनि राहिला हृदयी । पृथ्वी आप तेज वायू आकाश ही । पंचमहाभूते आणि सर्वही । दिसती सर्वदा शिवरूप ।।४५।। घडा जहाला मृत्तिकेपासून । तो जैसा मृण्मय असे जाण । तैसे जे उत्पन्न झाले शिवातून । ते विश्व शिवमय सर्वचि ।।४६।।

ज्योतिर्लिंगे चिदाकारे ज्वलत्यन्तर्निरन्तरम् । विलीनं निखिलं तत्त्वं पश्यन् योगी न लिप्यते ।।११।।

अन्तर्मुखेन मनसा स्वात्मज्योतिषि चिन्मये । सर्वानप्यर्थविषयान् जुह्वन् योगी प्रमोदते ।।१२।।

सच्चिदानन्दजलधौ शिवे स्वात्मनि निर्मलः । समर्प्य सकलान् भुंक्ते विषयान् तत्प्रसादतः ।।१३।।

जे आपुल्या हृदयकमलात । ज्योतिर्लिंग नित्य प्रकाशित । त्यात लयचिंतन करी सतत । छत्तीसही तत्त्वांचे ।।४७।। मग हे छत्तीस तत्त्वयुक्त । विश्व त्यासी न करी लिप्त । तो वावरे जरी भोगसाधनांत । तरी अलिप्त त्याहूनी ।।४८।। मन ज्या वस्तूसी करी स्पर्श । ती बद्ध करिते जीवास । होय जेथे केवळ देहस्पर्श । मन अणुमात्र स्पर्शेना ।।४९।। मग त्या शिवयोग्यासी पाही । बांधू शकेल असे काही । त्रिभुवनात शोधूनही । सापडेल का अगस्त्या? ।।५०।। त्याने भोगिले राजभोग । की भिक्षुक होऊनि

भ्रमला जग । यास अर्थ असे का सांग । तूच मजला मुनिवरा? ।।५१।। शिवयोगी कर्मकर्दमी रुतला । ऐसे नर जो बडबडला । त्याने पाहिले वंध्यापुत्राला । ऐसे निश्चित जाणावे ।।५२।। की आकाशास फूल लहडले । ते तयाने खुडले हुंगले । जे पाहतीना कुणाचे डोळे । ते पाहिले जाण त्याने ।।५३।। अंतर्मुख करूनि चित्त । आत्मज्योतिरूप अग्नीत । ज्याने होमिले विषयपदार्थ । तो आनंदी असे सदा ।।५४।। शिव सच्चिदानंदसागर । तो ज्याच्या आत्मरूपी स्थिर । तो शिवासी विषय समर्पूनि समग्र । ते प्रसादरूपे स्वीकारी ।।५५।। शब्दस्पर्शादी विषय सकळ । प्रसादरूप पावती निर्मळ । मग ते सेविताही मळ । त्याच्या मनासी लागेना ।।५६।। ऐसे हे स्वीकृतप्रसादैक्यस्थल । प्रेमळा तुज निरूपिले सकळ । आता विवरीन शिष्टोदनस्थल । श्रवण करी साक्षेपे ।।५७।।

**शिष्टोदनस्थल – (९४)**

प्रकाशते या सर्वेषां माया सैवोदनाकृतिः । लीयते तत्र चिल्लिंगे शिष्टं तत्परिकीर्तितम् ।।१४।।

जगदंगे परिग्रस्ते मायापाशविजृम्भिते । स्वात्मज्योतिषि बोधेन तदेकमवशिष्यते ।।१५।।

परशिवासी पूर्ण जाणले । मग मागे काय राहिले? । भोजन झाल्यावरी ताटात उरले । त्यास म्हणती शिष्टोदन ।।५८।। झाल्यावरी शिवज्ञान । मागे उरे जी माया जाण । तीही चिल्लिंगात विलीन ।

पूर्णतया होतसे ।।५९।। स्वीकृतप्रसादी योग्यालागून । ती असे शिष्टोदनासमान । म्हणूनि मायेसी शिष्टोदन । ऐसे येथे संबोधिले ।।६०।। प्रपंचातील जीवांसी जाण । मायेचे घडे स्पष्ट दर्शन । 'माया' पाहावया परिश्रम न । घ्यावे लागती किंचित ।।६१।। परि जो दडला मायेआड । त्या 'मायी'स पाहणे अवघड । मायीस झाकूनि माया उघड-। पणे सामोरी राहते ।।६२।। चर्मचक्षूंसी जे जे दिसे । ते ते सर्व माया असे । तिच्यामागे शिव वसे । ढगाआड चंद्र जसा ।।६३।। तनू करण भुवन भोग । हे मायेचे रूपरंग । या मायावी रूपांनी भोग । भोगवी नाना जीवासी ।।६४।। 'तनू' म्हणजे शरीर । 'करण' म्हणजे इंद्रिये समग्र । पंच ज्ञानेंद्रिये पंच कर्मेंद्रिये साचार । ही बाह्य दर्शेंद्रिये ।।६५।। मन बुद्धी चित्त अहंकार । ही अंतरेंद्रिय चार । या चतुर्दश इंद्रियांसी चतुर । करण नामे जाणती ।।६६।। 'भुवने' असती चौदा देख । जैसा म्हणती मृत्युलोक । तैसे सात ऊर्ध्व लोक । अधोलोकही सप्तचि ।।६७।। भूलोक भुवर्लोक । स्वर्लोक महर्लोक । जनलोक तपोलोक । सत्यलोक ही सप्तभुवने ।।६८।। अतल वितल सुतल । तलातल रसातल । महातल पाताल । हे सप्त अधोलोक ।।६९।। शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पंचविषय म्हणजे 'भोग' । तनू करण भुवन भोग । ऐसी मायेची चार रूपे ।।७०।। ऐसी चार रूपे घेऊनी । माया मोहवी जीवालागूनी । चौऱ्यांशी लक्ष योनींमधूनी । महायात्रा घडविते ।।७१।। शिवयोगी

**आत्म्याठायी । परशिवब्रह्माचे दर्शन घेई । अवशिष्ट मायेस सोडूनि देई । ती माया म्हणजे शिष्टोदन ।।७२।। कलेपासूनि भूमीपर्यंत । तीस तत्त्वरूपी मायापाशांनी व्याप्त । या विश्वरूपी शरीरात । जी माया राहते ।।७३।। आत्मज्योतीत विलीन । जरी जग जहाले संपूर्ण । तरी तीस तत्त्वांसी जी कारण । ती माया राहे अवशिष्ट ।।७४।।**

अखण्डसच्चिदानन्दपरब्रह्मस्वरूपिणः । जीवन्मुक्तस्य धीरस्य माया कैंकर्यवादिनी ।।१६।।
विश्वसंमोहिनी माया बहुशक्तिनिरंकुशा । शिवैकत्वमुपेतस्य न पुरः स्थातुमीहते ।।१७।।

**अखंड सच्चिदानंदरूप ब्रह्म पूर्ण । जो स्वये जहाला आपण । त्या जीवन्मुक्तापुढे माया जाण । दासी होऊनि राहते ।।७५।। समस्त जीवांसी घाली मोहिनी । जी बहुविधसामर्थ्यशालिनी । ती उभी न राहे मोहरूप धरूनी । शिवैक्यप्राप्त योग्यापुढे ।।७६।।**

ज्योतिर्लिंगे चिदाकारे निमग्नेन महात्मना । भुज्यमाना यथायोगं नश्यन्ति विषयाः स्वतः ।।१८।।
शब्दादयोऽपि विषया भुज्यमानास्तदिन्द्रियैः । आत्मन्येव विलीयन्ते सरितः सागरे यथा ।।१९।।
अर्थजातमशेषं तु ग्रसन् योगी प्रशाम्यति । स्वात्मनैवास्थितो भानुस्तेजोजालमशेषतः ।।२०।।

**जो चिद्रूप ज्योतिर्लिंगात । तो निमग्न महात्मा जे भोगी समस्त । ते विषयही आत्मरूपात । लय**

पावती स्वतःच ।।७७।। आपुली नामरूपे हरवून । सरिता सागरी होती विलीन । तैसे जे विषय भोगिले इंद्रियांकडून । ते आत्म्यात लय पावती ।।७८।। आवरूनि किरणे आपुली । सूर्य डुबे अस्ताचली । तैसी भोगूनि विषयग्रामे सगळी । योगी होय परमशांत ।।७९।। शिष्टोदनस्थलाची अवस्था । तुजसी कथिली पूर्णतः । चराचरलयस्थलाची कथा । आता तुज सांगेन ।।८०।।

**चराचरलयस्थल** - (९५)

लिंगैक्ये तु समापन्ने चरणाचरणे गते । निर्देही स भवेद्योगी चराचरविनाशकः ।।२१।।

शिष्टोदन-अवस्थेत । मायांश उरे किंचित । तोही नाश पावे जेथ । ते हे स्थल मुनिवरा ।।८१।। शिवसामरस्यप्राप्त योग्याठायी । चराचर प्रपंचाचा लय होई । मग तो शिवयोगी होई विदेही । चराचरविनाशक ।।८२।। जो चाले फिरे तो चर । जो एकेठायी स्थिर तो अचर । त्यांना जंगम आणि स्थावर । ही असती पर्यायनामे ।।८३।। शिवे निर्मिली चराचर सृष्टी । जीवात्म्याच्या उपभोगासाठी । म्हणूनि करावा लागे शेवटी । त्यास चराचराचा लय ।।८४।। आत्मतृप्तस्य का स्पृहा? । उपनिषदांनी केला प्रश्न हा । जो भोजने तृप्त त्यास पुन्हा । इच्छा कैसी अन्नाची? ।।८५।। विषयभोग भोगिले किती । तरी त्याने न होय पूर्ण तृप्ती । ते भोगावयाची प्रवृत्ती । पुन्हा होय जीवाला ।।८६।। जो

**आत्मज्ञाने पूर्ण तृप्त । स्पृहा नसे त्याच्या मनात । तो आपुल्या आत्मरूपात । घेई शिवदर्शन ।।८७।। त्याची वृत्ती अंतरी स्थिर । ती कधी धावेच ना बाहेर । म्हणूनि त्याच्यापुरते चराचर । लय पावले जाणावे ।।८८।। बाहेरचा संसार देख । जीवास नसे क्लेशदायक । आतला वासनासंसार दुःख । देई त्याला अपार ।।८९।। नौकेबाहेरचे जळ । जीवाचा कधी ठरेना काळ । ते नौकेत शिरता तत्काळ । जलसमाधी निश्चित ।।९०।। तैसा मनातला संसार पूर्ण । ज्याने टाकिला निरसून । त्याला सुखदुःखांचे भोग दारुण । भोगणे न पडे कधी ।।९१।। ऐसा अलिप्त वर्ते जगी । तो राजमहाली राहूनि योगी । या विपरीत वर्ते तो भोगी । जरी राहे झोपडीत ।।९२।।**

अनाद्यविद्यामूला हि प्रतीतिर्जगतामियम् । स्वात्मैकबोधात्तन्नाशे कुतो विश्वप्रकाशनम् ।।२२।।

यथा मेघाः समुद्भूता विलीयन्ते नभस्थले । तथात्मनि विलीयन्ते विषयाः स्वानुभाविनः ।।२३।।

**अगस्त्या अनादी अविद्येमुळे । जग प्रतीत होई सगळे । ती अविद्या नाशे आत्मबोधामुळे । मग जग कैसे दिसेल? ।।९३।। घटाचे उपादानकारण । ती मृत्तिकाच नाशिली पूर्ण । मग तिचे कार्य घट जाण । तो कैसा उद्भवेल? ।।९४।। प्रपंचाचे मूळ कारण । ती अविद्या गेली मनातून । तेणे शिवयोग्याच्या अंतरीचा पूर्ण । प्रपंच होई नाहीसा ।।९५।। जैसे आकाशी मेघ जन्मले । ते आकाशातचि विलीन**

**झाले । तैसे आत्मज्ञान्याठायी सगळे । विषय होती विलीन ।।९६।। आत्मानुभव येता पूर्ण । सुटे संसारविषयांचे चिंतन । पूर्ण निरभ्र व्हावे गगन । तैसे निर्मळ मन होई ।।९७।।**

स्वप्ने दृष्टं यथा वस्तु प्रबोधे लयमश्नुते । तथा सांसारिकं सर्वमात्मज्ञाने विनश्यति ।।२४।।

जाग्रत्स्वप्नसुषुप्तिभ्यः परावस्थामुपेयुषः । किं वा प्रमाणं किं ज्ञेयं किं वा ज्ञानस्य साधनम् ।।२५।।

**स्वप्नातील पदार्थ समस्त । विलीन होती जागृतीत । तैसे आत्मज्ञाने संसारपदार्थ । लय होऊनि नाशती ।।९८।। स्वप्नातील जग जैसे । जागृत होता पूर्ण नाशे । तैसा तुर्यावस्थेत जो योगी वसे । त्यास जग स्वप्नवत् ।।९९।। जागृती स्वप्न सुषुप्ती । या तीन असती मनाच्या स्थिती । स्वप्न-जागृती नसे ती सुषुप्ती । अवस्था म्हणजे गाढ निद्रा ।।१००।। गाढ निद्रेमाजी जीव । घेई आनंदाचा अनुभव । तिच्या पलीकडे जी तिला नाव । तुर्यावस्था ऐसे असे ।।१०१।। त्या अवस्थेत जो पोचला । तो त्रिपुटीमय संसारापल्याड गेला । मग होईना कदापि तयाला । संसाराचे दर्शन ।।१०२।। प्रमेय प्रमाता प्रमाण । हा त्रिपुटीव्यवहार थांबे पूर्ण । आत्मरूपचि साचले म्हणून । भेद मुळी दिसेना ।।१०३।।**

तुर्यातीतपदं यत्तद् दूरं वाङ्मनसाध्वनः । अनुप्रविश्य तद्योगी न भूयो विश्वमीक्षते ।।२६।।

नान्यत् पश्यति योगीन्द्रो नान्यज्जानाति किंचन । नान्यच्छृणोति सन्दृष्टे चिदानन्दमये शिवे ।।२७।।

असदेव जगत्सर्वं सदिव प्रतिभासते । ज्ञाते शिवे तदज्ञानं स्वरूपमुपपद्यते ।।२८।।

**तुर्यातीतपदाच्या राज्यपदी । बैसूनि डोलतो आत्मानंदी । तो नेत्रे पाहीनाच कधी । विश्वाकडे वळूनी ।।१०४।। जे स्तुति-ध्यानासही अगोचर । ते तुर्यातीत पद साचार । ते प्राप्त होता विश्वसंसार । प्रतीत त्यासी होईना ।।१०५।। चिदानंदरूप शिवसाक्षात्कार । ज्यास जहाला तो योगीश्वर । आत्मरूपाविण काही पर । न पाहे जाणे न ऐके ।।१०६।। जरी जहाला बहिर्मुख । तरी सत्वर होई अंतर्मुख । आणि अवीट आत्मसुख । भोगी आपुल्या अंतरी ।।१०७।। जग शिवाहूनि नाही भिन्न । तरी मायेने दिसे परिच्छिन्न । साक्षात्कारे नाशूनि अज्ञान । सर्व दिसे स्वात्मरूप ।।१०८।। चराचर-भेद-भावना । नच स्पर्शे त्याचिया मना । ऐसे हे चराचरलयस्थल जाणा । असे अगस्त्य मुनिवरा ।।१०९।।**

**भाण्डस्थल** - (९६)

ब्रह्माण्डशतकोटीनां सर्गस्थितिलयान् प्रति । स्थानभूतो विमर्शो यस्तद्भाण्डस्थलमुच्यते ।।२९।।

विमर्शाख्या पराशक्तिर्विश्वोद्भासनकारिणी । साक्षिणी सर्वभूतानां समिन्धे सर्वतोमुखी ।।३०।।

**अनंत ब्रह्मांडांची उत्पत्ती । स्थिती आणि लयाप्रती । जी आधार ती पराशक्ती । तिला 'भांड' हे नाव ।।११०।। भांड म्हणजे भांडे । ज्यात वसती ब्रह्मांडे । त्या शक्तीचा विचार मांडे । ते हे असे**

**भाण्डस्थल ।।१११।। शिवाठायी जी वसे शक्ती । तिला 'कला' ऐसे संबोधिती । जीवाठायी जी राहे शक्ती । तिला 'भक्ती' हे नाव ।।११२।। जीव भक्तीचा विकास करून । तिचे 'कलाशक्ती'त करी परिवर्तन । 'भक्ती'ची 'कला' होता पूर्ण । भक्त होई शिवरूप ।।११३।। विमर्शशक्ती महामाया । कुंडलिनी शुद्धमाया । शब्दब्रह्म पराबिंदू या । नामेही कलेसी जाणती ।।११४।। जीवाठायी वसे माया । तिला म्हणती अधोमाया । जीवासी संसारी भ्रमवाया । ती असे कारण ।।११५।। शिवाठायी वसे माया । तिला नाव शुद्धमाया । जीवासी संसारी ताराया । ती ठरे कारण ।।११६।। शुद्धमाया जी विमर्शशक्ती । तिलाच येथे 'भांड' म्हणती । तिचा विचार जेथे त्याप्रती । भाण्डस्थल हे नाव ।।११७।। विमर्श नामक पराशक्ती । प्रकाशित करी विश्वाप्रती । सर्व भूतांसी साक्षिभूत ती । राहे सर्वतोमुखी होऊनी ।।११८।। जीवाच्या अवतीभोवती । तिची सर्वत्र उपस्थिती । त्यांच्या सर्व व्यवहारास ती । असे साक्षी सर्वदा ।।११९।।**

विश्वं यत्र लयं याति विभात्यात्मा चिदाकृतिः । सदानन्दमयः साक्षात् सा विमर्शमयी कला ।।३१।।

पराहन्तासमावेशपरिपूर्णविमर्शवान् । सर्वज्ञः सर्वगः साक्षी सर्वकर्ता महेश्वरः ।।३२।।

**विश्वाचा लय जिच्यात । जिच्यामुळे आत्मा प्रकाशित । जी सदानंदस्वरूप साक्षात । ती जाण**

विमर्शकला ।।१२०।। अविनाभावसंबंधे । ती शिवाठायी नित्य नांदे । शिव शक्ती नामभेदे । एकचि तत्त्व प्रकाशे ।।१२१।। चंद्र आणि प्रभामंडल । पुष्प आणि परिमल । हे एकरूपचि केवळ । तैसे शिव-शक्तीही ।।१२२।। शिवाठायी विमर्शशक्तीमुळे । सत्-चित्-आनंदस्वरूप बोध उजळे । ती नसती तर जड ठरले । असते परशिवब्रह्म गा ।।१२३।। शिव आणि जीवाठायी । एकचि आत्मतत्त्व वसे पाही । विमर्शशक्तीने आत्म्यात होई । पराहंतेचा समावेश ।।१२४।। मग तो महेश्वर परिपूर्ण । होई पूर्ण विमर्शवान् । सर्वज्ञ सर्वकर्ता जाण । सर्वव्यापक सर्वसाक्षी ।।१२५।। जरी नसती आत्मतत्त्वात । विमर्शशक्ती उपस्थित । तरी ते प्रकाशमय तरी स्फटिकवत् । जड असते जहाले ।।१२६।।

विश्वाधारमहासंवित्प्रकाशपरिपूरितम् । पराहन्तामयं प्राहुर्विमर्शं परमात्मनः ।।३३।।

विमर्शभाण्डविन्यस्तविश्वतत्त्वविजृम्भणः । अनन्यमुखसम्प्रेक्षी मुक्तः स्वात्मनि तिष्ठति ।।३४।।

आधारभूत जी विश्वासी जाण । महाज्ञानप्रकाशाने परिपूर्ण । त्या विमर्शशक्तीलागून । ज्ञानी म्हणती पराहंता ।।१२७।। जी देहासी राहे व्यापून । तिला 'अहंता' हे अभिधान । जी ब्रह्मांड व्यापिते संपूर्ण । ती 'पराहंता' जाणावी ।।१२८।। तुर्यावस्थेत जी अहंता राहे । ती गगनास गवसणी घालू पाहे । तिला पूर्णाहंता पराहंता हे । नाव साजे अगस्त्या ।।१२९।। विमर्शशक्तिरूपी भांड्यात । छत्तीस तत्त्वरूपी

**विश्व समस्त । अंतर्मुख होऊनि ठेवितो जो मुक्त । तो स्थिर होय स्व-रूपी ॥१३०॥**

**भाजनस्थल** - (९७)

समस्तजगदण्डानां सर्गस्थित्यन्तकारणम् । विमर्शो भासते यत्र तद्भाजनमिहोच्यते ॥३५॥

विमर्शाख्या पराशक्तिर्विश्ववैचित्र्यकारिणी । यस्मिन् प्रतिष्ठिता ब्रह्म तदिदं विश्वभाजनम् ॥३६॥

**ब्रह्मांडभुवने अनंत असती । ती उपजती राहती लयासी जाती । त्याचे कारण विमर्शशक्ती । असे जाण मुनिवरा ॥१३१॥ ती ज्या परशिवब्रह्मात जाण । होई प्रकाशित परिपूर्ण । त्या परब्रह्म शिवासी भाजन । येथे असे संबोधिले ॥१३२॥ विश्व वैचित्र्यपूर्ण सारे । एकासारखे नसे दुसरे । एका मायबापाची लेकरे । नसती एकसारखी ॥१३३॥ पशू पक्षी वनस्पती । सूक्ष्म महाकाय जीव किती । असंख्य रूप वर्ण करिता गणती । अनेक जन्म पुरतीना ॥१३४॥ ही करणी जिने केली । ती विमर्शशक्ती म्हणविली । ती अविनाभावसंबंधाने झाली । प्रतिष्ठित ज्याठायी ॥१३५॥ ते परशिवब्रह्म पूर्ण । त्यास म्हणती विश्वभाजन । जे कारणांचेही कारण । परिपूर्ण एकमेव ॥१३६॥**

अन्तःकरणरूपेण जगदंकुररूपतः । यस्मिन् विभाति चिच्छक्तिर्ब्रह्मभूतः स उच्यते ॥३७॥

यथा चन्द्रे स्थिरा ज्योत्स्ना विश्ववस्तुप्रकाशिनी । तथा शक्तिर्विमर्शात्मा प्रकारे ब्रह्मणि स्थिता ॥३८॥

**जगनिर्मितीसी जो कारण । त्या मूल अहंकाराचे रूप करूनि धारण । चिच्छक्ती जेथे होई भासमान । ते जाणावे परब्रह्म ।।१३७।। हा प्रचंड विश्वविस्तार । परि तो परब्रह्मासमोर । जैसा लहान अंकुर । असे तैसा जाणावा ।।१३८।। चांदणे चंद्राठायी राहून । विश्व प्रकाशित करी पूर्ण । तैसी शक्ती शिवात राहून । विश्व प्रकाशे एकांशाने ।।१३९।।**

अकारः शिव आख्यातो हकारः शक्तिरुच्यते । शिवशक्तिमयं ब्रह्म स्थितमेकमहंपदे ।।३९।।

अहन्तां परमां प्राप्य शिवशक्तिमयीं स्थिराम् । ब्रह्मभूयंगतो योगी विश्वात्मा प्रतिभासते ।।४०।।

वृक्षस्थं पत्रपुष्पादि वटबीजस्थितं यथा । तथा हृदयबीजस्थं विश्वमेतत् परात्मनः ।।४१।।

**'अहं' मधील 'अ'कार । तो शिव जाण परमेश्वर । आणि त्यातील 'ह'कार । शक्तिरूप समजावा ।।१४०।। जी देशकालाच्या अतीत । असे शिवशक्तिरूपयुक्त । ती स्थिर पराहंता ज्या योग्यास प्राप्त । तो विश्वरूप होऊनि प्रकाशे ।।१४१।। वटवृक्षाची पर्ण फुले समस्त । असती बीजात सूक्ष्मरूपे स्थित । तैसे ब्रह्मरूप योग्याच्या हृदयबीजात । वसे समस्त विश्व हे ।।१४२।।**

## **अंगालेपस्थल** - (९८)

दिक्कालाद्यनवच्छिन्नं चिदानन्दमयं महत् । यस्य रूपमिदं ख्यातं सोऽङ्गालेप इहोच्यते ।।४२।।

देशकालादी परिच्छेदरहित । जे महान चिदानंदमय रूप ख्यात । त्या शिवयोग्यासचि येथ । अंगालेप संबोधिले ।।१४३।। प्रारब्धकर्म संपत नाही । तोवरी त्यास राहणे देही । मग देहाकडूनि काही । घडती कर्मव्यवहार ।।१४४।। त्या कर्मव्यवहारात । त्याची कैसी वर्तनरीत । तेचि अंगालेप-स्थलात । विवरिले असे मुनिवरा ।।१४५।। जलबिंदू कमलपत्रावर । पडताक्षणी ओघळती सत्वर । तैसा शरीरी व्यवहार । शिवयोग्याचा अलिप्त ।।१४६।। शरीराकडूनि काही घडे । तरी अंतरीचे अलिप्तपण न मोडे । कर्मलेप अंगासी न जडे । म्हणूनि अंग-अलेप तो ।।१४७।। त्याची परब्रह्मरूप स्थिती । त्यास न मर्यादा न मिती । तो आत्मरूपे विश्वाप्रती । व्यापूनि पूर्ण उरलासे ।।१४८।। जगातील सर्व पदार्थांत । तो असे सदा अवस्थित । भूत-भविष्य-वर्तमानांत । त्याचे असे अस्तित्व ।।१४९।। तो नाही ऐसे स्थान । ब्रह्मांडी असेचिना जाण । सर्वठायी तो व्यापून । परिपूर्ण भरलेला ।।१५०।। दशदिशांकडे सन्मुख । तो ऐसा विश्वतोमुख । तो जिकडे पाहेना ती देख । दिशा नाही जगात ।।१५१।। दिक्-काल-वस्तु-देश । बांधू न शकती तयास । ओलांडूनि सर्व भेदांस । तो स्थिर आत्मरूपी ।।१५२।। अस्ति जायते वर्धते । विपरिणमते अपक्षीयते । निधन हे षड्विकार त्याते । स्पर्शती न किंचित ।।१५३।। अस्तित्व प्रकाश आनंद । ही त्याची लक्षणे सिद्ध । ऐसा तो सच्चिदानंद-। रूप स्वये जहाला ।।१५४।। झाला परब्रह्मरूप

**म्हणून । तो अलिप्त कर्मांपासून । राग-द्वेषाने त्याचे अंत:करण । मळेचिना कदापि ।।१५५।। अंत:करणास न लागे लेप । म्हणूनि जाण तो अंगालेप । त्याचे विवरिले स्वरूप । तुझ्यासाठी शिष्यवरा ।।१५६।।**

समस्तजगदात्माऽपि संविद्रूपो महामतिः । लिप्यते नैव संसारैर्यथा धूमादिभिर्नभः ।।४३।।

न विधिर्न निषेधश्च न विकल्पो न वासना । केवलं चित्स्वरूपस्य गलितप्राकृतात्मनः ।।४४।।

**आकाशी दाटला धूर । तरी ते धुराने लिंपेना रतिभर । मेघ करिती स्वैर संचार । लिप्त त्याने होईना ।।१५७।। आकाश ऐसे महाभूत । ज्यात अनंत ब्रह्मांडे अवस्थित । सर्व व्यवहार होती त्यात । तरी ते निर्लेप सर्वदा ।।१५८।। तैसा महामती ज्ञानस्वरूप । शिवयोगी व्यापक विश्वरूप । तरी संसारकर्मांचा लेप । त्यास मुळी लागेना ।।१५९।। त्याची कर्मी नसे प्रवृत्ती । तो ज्ञानाची निखळ मूर्ती । त्यास विहित निषिद्ध कर्मे नसती । नसती विकल्प वासना ।।१६०।। त्याने हे करावे ते नाही । ऐसा शास्त्रादेश नाही । विकल्प वासना नुठती काही । त्याच्या अंत:करणात ।।१६१।। तो कर्म करिताना दिसे । परि कर्मबंधनी न फसे । लिप्त कदा होत नसे । ऐसा अंगालेपस्थली ।।१६२।।**

घटादिषु पृथग्भूतं यथाऽऽकाशं न भिद्यते । तथोपाधिगतं ब्रह्म नानारूपं न भिद्यते ।।४५।।

अनश्वरमनिर्देश्यं यथा व्योम प्रकाशते । तथा ब्रह्मापि चैतन्यमत्र वैशेषिकी कला ।।४६।।

न देवत्वं न मानुष्यं न तिर्यक्त्वं न चान्यथा । सर्वाकारत्वमाख्यातं जीवन्मुक्तस्य योगिनः ।।४७।।

**पाहा सहस्र घट निर्मिले । त्यात आकाश दिसे वेगळे । परि ते नाही फाटले भंगले । दृष्टीसी भिन्न भासते ।।१६३।। भिंती बांधूनिया चार । वरती घातले छप्पर । की निर्माण होई घर । सहजचि कोणाचे ।।१६४।। चार भिंतींच्या आत । जे आकाश असे व्याप्त । ते कोंडले की फाटले? मनात । करूनि पाहावा विचार ।।१६५।। ते नाही आले गेले । न फाटले न भंगले । जिथल्या तिथे राहूनि भासले । वेगळेचि गृहाकाश ।।१६६।। तैसे देहरूपाने ब्रह्म जाण । अखंड परि भासते भिन्न । हे ऐसे अभेद ज्ञान । ते शिवयोग्याचे स्वरूप ।।१६७।। आकाश हे महाभूत । ते असे अविनाशी उपमारहित । परि त्यासही असे आदि-अंत । ते सूक्ष्म भूत म्हणूनी ।।१६८।। त्यासी अविनाशी म्हणणे । ते अन्य भूतांच्या तुलनेने । त्याचा आदि-अंत नयने । कोणी नसे पाहिला ।।१६९।। त्या सूक्ष्म आकाशासमान । ब्रह्म अविनाशी निरुपम जाण । त्याच्याठायी चिद्रूप कला पूर्ण । विशेषरूपाने प्रकाशे ।।१७०।। आकाशाचे उपमान । परब्रह्माशी मुळी साजे न । परि मोठी त्यासमान । दुसरी वस्तू नसेचि ।।१७१।। समुद्र पाहिला नाही ज्याने । त्यास जलाशय दाखविणे । समुद्राची विशालता देणे । समजावून तैसे**

हे ।।१७२।। आकाश हे जड भूताकाश । परब्रह्म हे चिद्रूपाकाश । परब्रह्माशी तुळेना आकाश । परि सांगावे लागते ।।१७३।। आकाश भिजविले तरी भिजेना । रंगविले तरी रंगेना । जाळिले तरी जळेना । ऐसे अलिप्त ते असे ।।१७४।। तैसा जो परब्रह्मरूपप्राप्त । शिवयोगी गढला दिसे प्रपंचात । तरी तो सर्वस्वी अलिप्त । असे सर्व कर्मांतूनी ।।१७५।। ज्याचे पुण्य असे अधिक । तो देव होऊनि भोगी स्वर्गसुख । ज्याचे पुण्यपाप समान देख । तो जन्मे मनुष्य होऊनी ।।१७६।। ज्याचे पाप अधिक भरे । तो पापयोनीत जन्मूनि झुरे । ज्याचे पापपुण्यचि सरे । तो जन्मेल कोणत्या योनीत? ।।१७७।। म्हणूनि शिवयोगी असे कोण? । तो देव न मनुष्य न तिर्यक् जाण । तो चिदाकाशस्वरूप परिपूर्ण । शिव साक्षात जाणावा ।।१७८।। नाही भेदभावना उरली । म्हणूनि तो अंगालेपस्थली । त्याची सर्व लक्षणे निरूपिली । तुजलागी मुनिवरा ।।१७९।।

**स्वपराज्ञस्थल - (९९)**

अप्रमेये चिदाकारे ब्रह्मण्यद्वैतवैभवे । विलीनः किं नु जानाति स्वात्मानं परमेव वा ।।४८।।

यत्र नास्ति भिदायोगादहं त्वमिति विभ्रमः । न संयोगो वियोगश्च न ज्ञेयज्ञातृकल्पना ।।४९।।

जे अपरिमित चिद्रूप । अद्वितीय असे ब्रह्मस्वरूप । त्यात झाला एकरूप । आत्मत्वे जो

**शिवयोगी ।।१८०।। तो जाणेना आपणाला । आणि जाणेना परशिवाला । 'मी' आणि 'तो' या जाणिवेला । त्याने दिली तिलांजली ।।१८१।। 'मी शिव आहे' ही जाणीव । तेथे किंचित राहे द्वैतभाव । तीही जाऊनि केवळ शिव-। तत्त्व उरे एकमात्र ।।१८२।। जेथे स्व आणि पर हे भेदज्ञान । संपूर्ण गेले नष्ट होऊन । ते स्व-पर-अज्ञस्थल जाण । असे महर्षी अगस्त्या ।।१८३।। कापूर ठेविता बाहेर । तो विरूनि होई निराकार । तैसा जीव-शिवाचा स्व-पर । भेद जाई विरूनी ।।१८४।। तेथे जीव नसेना शिव । मी-तो हा नसे भेदभाव । नाही संयोग वियोग संभव । न ज्ञेयज्ञातृकल्पना ।।१८५।।**

न बन्धो न च मुक्तिश्च न देवाद्यभिमानिता । न सुखं नैव दुःखं च नाज्ञानं ज्ञानमेव वा ।।५०।।

नोत्कृष्टत्वं न हीनत्वं नोपरिष्टान्न चाप्यधः । न पश्चान्नैव पुरतो न दूरे किंचिदन्तरे ।।५१।।

**तेथे बंध नाही मोक्ष नाही । देवत्वादीचा अभिमान नाही । सुख नाही दुःख नाही । नाही ज्ञान-अज्ञान ।।१८६।। ते श्रेष्ठ नाही हीन नाही । वरती नाही खाली नाही । मागे नाही पुढे नाही । नाही दूर-समीपही ।।१८७।।**

सर्वाकारे चिदानन्दे सत्यरूपिणि शाश्वते । पराकाशमये तस्मिन् परे ब्रह्मणि निर्मले ।।५२।।

एकीभावमुपेतानां योगिनां परमात्मनाम् । परापरपरिज्ञानपरिहासकथा कुतः ।।५३।।

देशकालानवच्छिन्नतेजोरूपसमाश्रयात् । स्वपरज्ञानविरहात् स्वपराज्ञस्थलं विदुः ।।५४।।

जे सर्वरूप चिद्रूप । शाश्वत आणि सत्यरूप । जे निर्मल पराकाशरूप । त्या परशिवब्रह्मात ।।१८८।। जो सामरस्याने एक झाला । त्या परकाय शिवयोग्याला । थट्टेपुरताही न उरला । आपपरभाव तो ।।१८९।। देशकालवस्तुमर्यादारहित । ज्ञानप्रकाशरूप शिवब्रह्मात । जो समरसला त्याच्याठायी किंचित । स्व-परज्ञान उरेना ।।१९०।। तेणे त्यास स्व-पर-अज्ञ म्हणून । ओळखिती ज्ञानी जन । त्याच्या या अवस्थेस जाण । म्हणती स्वपराज्ञस्थल ।।१९१।।

**भावाभावलयस्थल** - (१००)

त्वन्ताहन्ताविनिर्मुक्ते शून्यकल्पे चिदम्बरे । एकीभूतस्य सिद्धस्य भावाभावकथा कुतः ।।५५।।

अहंभावस्य शून्यत्वादभावस्य तथात्मनः । भावभावविनिर्मुक्तो जीवन्मुक्तः प्रकाशते ।।५६।।

अहम् त्वम् या दोन्ही भावना । जेथे मुळीच उरतीना । तेथे मग असे काय हा मना । प्रश्न कोणाच्या पडेल ।।१९२।। अहम् त्वम् भाव पडता गळून । तेथे उरते केवळ 'शून्य' । या शून्याचेच संपादन । साधनेद्वारा करावे ।।१९३।। शून्य म्हणजे परिपूर्ण । येथे अभाव हा अर्थ अमान्य । जे परिपूर्ण शिवब्रह्म जाण । तेचि 'शून्य' येथले ।।१९४।। आत्मा मानणे शरीरास । विद्वान 'भाव' म्हणती यास । आत्मा न

**मानणे शरीरास । यास म्हणती 'अभाव' ।।१९५।। तूपण-मीपण-भावरहित । शून्य कल्प चिदाकाशात । जो जहाला समरसभूत । स्वपराज्ञ शिवयोगी ।।१९६।। त्याच्याठायी भाव-अभाव । या दोन्हीसही नसे ठाव । भावाभावाची कथा सर्व । त्याच्यासाठी निरर्थक ।।१९७।। 'माझा देह आत्मा' हा अहंभाव । 'देह आत्मा नाही' हा अभाव । हे दोन्ही त्यागूनि भाव-अभाव । तो जीवन्मुक्त प्रकाशतो ।।१९८।।**

सुखदुःखादिभावेषु नाभावो भाव एव वा । विद्यते चित्स्वरूपस्य निर्लेपस्य महात्मनः ।।५७।।

यस्मिन् ज्योतिषि चिद्रूपे दृश्यते नैव किंचन । सद्रूपं वाप्यसद्रूपं भावाभावं विमुंचतः ।।५८।।

प्रतीयमानौ विद्येते भावाभावौ न कुत्रचित् । लिंगैक्ये सति यत्तस्माद्भावाभावलयस्थलम् ।।५९।।

**निर्लेप चित्स्वरूप महात्म्याठायी । सुखदुःखांत भावाभाव नाही । यापासूनि अलिप्त पाही । भावाभावलयस्थली ।।१९९।। ज्याच्या अंतरी चित्ज्योत । झाली असे प्रकाशित । त्यास सद्रूप असद्रूप दिसत । नाही कोणता पदार्थ ।।२००।। जो लिंगात ऐक्य झाला । बाह्य प्रपंचातील भावाभाव त्याला । कोठे न दिसती या अवस्थेला । म्हणती 'भावाभावलयस्थल' ।।२०१।। आता सर्व षट्स्थलांतील । जे अंतिम ज्ञानशून्यस्थल । ते ऐकूनि कृतार्थ होशील । ऋषिश्रेष्ठा अगस्त्या ।।२०२।। जिवाचे कर्ण करून । तू जे ऐकिले निरूपण । त्याचे सार्थकत्व जाण । या स्थलात होईल ।।२०३।।**

**याचसाठी केला अट्टहास । याचसाठी केला प्रवास । श्रवणमनन निदिध्यासाभ्यास । याच स्थलाच्या प्राप्तीसाठी ।।२०४।। जलात मिळावे जल निर्मल । तैसी समरसता जेथे केवळ । ते निरूपीन ज्ञानशून्यस्थल । ऐक सर्वेन्द्रियांनी ।।२०५।।**

**ज्ञानशून्यस्थल** - (१०१)

परापरसमापेक्षभावाभावविवेचनम् । ज्ञानं ब्रह्मणि तन्नास्ति ज्ञानशून्यस्थलं विदुः ।।६०।।

जले जलमिव न्यस्तं वह्नौ वह्निरिवार्पितम् । परे ब्रह्मणि लीनात्मा विभागेन न दृश्यते ।।६१।।

**पर-अपरावर अवलंबून । जे भाव-अभावाचे करी विवेचन । परब्रह्मरूप शिवयोग्याठायीं ते ज्ञान । न राहेचि किंचित ।।२०६।। भेदज्ञानशून्यतेचे प्रतिपादन । या स्थलात असे म्हणून । यासी संबोधिती ज्ञानी जन । ज्ञानशून्यस्थल ऐसे ।।२०७।। सर्व प्रपंचव्यवहार । आधारलेला द्वैतावर । जेथे स्व असे तेथे पर । उपस्थित असेचि ।।२०८।। माझ्या स्वरूपाचे आहे ज्ञान । असे जो म्हणे त्याचे सापेक्ष ज्ञान । तो इतरांस स्वत:पासून । भिन्न मानूनि बोलतो ।।२०९।। भाव असे तेथे अभाव । अभाव असे तेथे भाव । ऐसा परस्परसापेक्ष भावाभाव-। व्यवहार होई जगात ।।२१०।। 'मी विश्व पाहिले पाहिले' । ऐसे जो सहजचि बोले । त्याने विश्वासी मानिले । वेगळे स्वत:पासूनी ।।२११।। परि ज्याच्या दृष्टीत । दुसरी**

वस्तूचि नसे अस्तित्वात । त्याचा ज्ञानव्यवहार निश्चित । शून्य झाला जाणावे ।।२१२।। हा मी आणि तू वेगळा । तो परका हा आपुला । असा भेदचि नाही उरला । ज्याच्या दृष्टीत किंचित ।।२१३।। तो शिव जीव आपण । मी भक्त तो भगवान । हा भेद जेथे होय शून्य पूर्ण । ते हे ज्ञानशून्यस्थल ।।२१४।। जल मिसळले जलात । अग्नी घातला अग्नीत । त्यांचे भिन्न अस्तित्व किंचित । जैसे कोठे दिसेना ।।२१५।। तैसा परशिवब्रह्माठायी । शिवयोगी समरस होई । त्याचे वेगळे अस्तित्व काही । उरेचिना मागुते ।।२१६।। विषयप्रतिपादनार्थ । द्यावे लागती दृष्टान्त । परि ते नसती यथार्थ । उणेच ते विषयाहूनी ।।२१७।। जल एका भांड्यातले । दुसऱ्या भांड्यात ओतले । जल जलात समरसले । हाच येथला मुख्यार्थ ।।२१८।। परि पहिल्या भांड्यातले । जल थोडे कमी झाले । दुसऱ्या भांड्यातले वाढले । ही झाली हानि-वृद्धी ।।२१९।। शिवयोगी परशिवाठायी । जेव्हा पूर्ण समरस होई । तेथे हानि-वृद्धी किंचितही । संभवेना अगस्त्या ।।२२०।। या समरसतेमुळे । जीवतत्त्वासी उणेपण आले । की शिवतत्त्व वृद्धी पावले । ऐसे काही घडेना ।।२२१।। तो हानि-वृद्धीविण । शिवाशी समान समरस होऊन । शिवस्वरूपचि होई पूर्ण । हे ध्यानी धरावे ।।२२२।।

सर्वात्मनि परे तत्त्वे भेदशंकाविवर्जिते । ज्ञात्रादिव्यवहारोत्थं कुतो ज्ञानं विभाव्यते ।।६२।।

निर्विकारं निराकारं नित्यं सीमाविवर्जितम् । व्योमवत् परमं ब्रह्म निर्विकल्पतया स्थितम् ।।६३।।

**घटाकाश मठाकाश दोन । भिन्न नसती महाकाशाहून । तैसा आत्मा परमात्म्याहून । भिन्न कदा असेना ।।२२३।। विश्वरूप परमात्म्याठायी । भेदशंका नसे पाही । ज्ञेय ज्ञाता ज्ञान त्रिपुटीही । तेथे उरली नसेचि ।।२२४।। मग त्रिपुटीव्यवहारातून । जे जन्मते भेदज्ञान । ते अनुभवासी येईल जाण । कैसे शिवयोग्याच्या? ।।२२५।। विषय इंद्रिये आणि भोक्ता । हे तिन्ही उपस्थित असता । भेदज्ञान संभवे, अन्यथा । ते न होई जीवाला ।।२२६।। जेथे मुळी ज्ञाताचि नाही । तेथे ज्ञेय असेना काही । ज्ञेय नसे म्हणूनि ज्ञानही । तेथे मुळी संभवेना ।।२२७।। तेथे निर्विकार निराकार । नित्य निस्सीम अपरंपार । परब्रह्म आकाशासम स्थिर । निर्विकल्प होऊनि वसे ।।२२८।।**

न पृथ्व्यादीनि भूतानि न ग्रहा नैव तारकाः । न देवा न मनुष्याश्च न तिर्यंचो न चापरे ।।६४।।

तस्मिन् केवलचिन्मात्रसत्तानन्दैकलक्षणे । त्वन्ताहन्तादिसंरूढं विज्ञानं केन भाव्यते ।।६५।।

**त्या परशिवब्रह्माठायी । नसती पृथ्व्यादी भूते काही । सूर्यचंद्रादी ग्रहगोल नाही । नसती तारका नक्षत्रे ।।२२९।। त्याच्या दृष्टीत नसती देव । नसती पशू पक्षी मानव । भेदभावाचा पूर्ण अभाव । नांदे त्याच्या स्वरूपी ।।२३०।। सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म पूर्ण । एकमेव राहिले व्यापून । तेथे मी-तूपणाचे**

**भेदज्ञान । कोण सांग अनुभवील? ।।२३१।।**

ज्ञेयाभावाद्विशेषेण शून्यकल्पं विभाव्यते । ज्ञातृज्ञेयादिभिः शून्यं शून्यं ज्ञानादिभिर्गुणैः ।।६६।।

आदावन्ते च मध्ये च शून्यं सर्वत्र सर्वदा । द्वितीयेन पदार्थेन शून्यं शून्यं विभाव्यते ।।६७।।

**अगस्त्या ज्ञेयचि नसेल जेथे । ज्ञान कोणाचे होईल तेथे? । ज्ञाताचि उरला नसेल जेथे । तेथे ज्ञान घेईल कोण? ।।२३२।। जे जाणावे ते ज्ञेय नसे । म्हणूनि ते ज्ञान शून्य भासे । ज्ञाताज्ञेयादी काही नसे । म्हणूनि ते शून्यचि ।।२३३।। ज्ञान-इच्छादी गुणांनी शून्य । आदिमध्यान्ती ते शून्य । सर्वत्र सर्वकाळ शून्य । शून्य आणि शून्यचि ।।२३४।। ज्ञेय पदार्थ नसे अन्य । म्हणूनि त्याचे ज्ञान शून्य । म्हणूनि हे स्थल ज्ञानशून्य । असे जाण अगस्त्या ।।२३५।। शिवयोग्याच्या ठायी । ज्ञानाची जाणीवचि नाही । तेणे त्याची स्थितीही । असे ज्ञानशून्यचि ।।२३६।।**

केवलं सच्चिदानन्दप्रकाशाद्वयलक्षणम् । शून्यकल्पं पराकाशं परब्रह्म प्रकाशते ।।६८।।

शून्यज्ञानादिसंकल्पे शून्यसर्वार्थसाधने ।

ज्योतिर्लिंगे चिदाकारे स्वप्रकाशे निरुत्तरे । एकीभावमुपेतस्य कथं ज्ञानस्य सम्भवः ।।६९।।

**शून्य म्हणजे काही नाही । ऐसी स्थिती येथे नाही । परशिवाचे अस्तित्व पाही । भरले असे**

पूर्णतः ।।२३७।। ब्रह्म सच्चिदानंदप्रकाशलक्षण । अद्वयस्वरूप महाकाश जाण । तेचि शून्यसदृश होऊनि पूर्ण । प्रकाशमान झाले असे ।।२३८।। ज्ञान आदी संकल्पहीन । मुक्त पुरुषार्थसाधनेपासून । ज्यापलीकडे नसेचि तत्त्व आन । ऐसे निरुत्तर जे ।।२३९।। चिद्रूप स्वयंप्रकाशित । अशा परिपूर्ण ज्योतिर्लिंगात । जो ऐक्य झाला त्या योग्याप्रत । ज्ञान कैसे होईल? ।।२४०।। जो स्वये ज्ञानस्वरूप झाला । त्याचा ज्ञानविषयचि सरला । तेथे अवकाश ज्ञानाला । किंचितही असेना ।।२४१।।

यस्य कार्यदशा नास्ति कारणत्वमथापि वा । शेषत्वं नैव शेषित्वं स मुक्तः पर उच्यते ।।७०।।

त्याला नसे कार्य काही । आणि कोणते कारण नाही । त्याला नसे शेष काही । आणि शेषिभाव नसे ।।२४२।। त्याने केले जे करण्याजोगे । त्याने जाणले जे जाणण्याजोगे । आता त्याच्या पुढे मागे । उरले नाही काहीच ।।२४३।। तो जहाला पूर्ण कृतार्थ । सच्चिदानंदस्वरूप परमुक्त । लिंगांगसामरस्य प्राप्त । झाले त्यासी जाणावे ।।२४४।। ऐसी त्याची स्थिती निश्चल । अगस्त्या हेचि ज्ञानशून्यस्थल । हे षट्स्थलशास्त्र सकळ । तुजलागी उपदेशिले ।।२४५।। शुद्धान्तःकरणी शिवभक्ताने । प्रथम पिंडस्थली होणे । मग सर्व लंघूनि षट्सोपाने । प्रवेशावे ऐक्यस्थली ।।२४६।। तेथे परशिवब्रह्म 'लिंग' । त्यात समरसे भक्तरूपी 'अंग' । मग लिंगांगसामरस्य अभंग । पूर्ण जाण होतसे ।।२४७।। पुन्हा त्यासी

नाही येणे । मग असेल कैसे जाणे ? । जन्ममरणाचे गाऱ्हाणे । सर्व सरले येथेच ।।२४८।। प्राप्त करणे शिवजीवैक्य । हेचि जीवाचे ध्येय एक । याचसाठी भ्रमला अनेक । जन्मजन्मांतरातूनी ।।२४९।। एका वास्तूभोवती देख । जर फेऱ्या घातल्या असंख्य । तरी पदरी पडणे एक । कंटाळाच निश्चित ।।२५०।। तैसा जो जन्मफेऱ्यांसी कंटाळे । तोचि मुक्तिमार्गाकडे वळे । मग त्याची पडती पावले । पिंडस्थलाच्या दिशेने ।।२५१।। तो गुरु-शिवकृपेकरून । पिंडस्थलात प्रवेशून । साधनाबळे शतस्थले पार करून । येई ज्ञानशून्यस्थली ।।२५२।। तेथे लिंग आणि अंगात । सामरस्य होई निभ्रांत । मग जन्ममरणभयमुक्त । होऊनि होय शिवरूप ।।२५३।। अगस्त्या हा सर्व प्रवास । अंतरीचा असे अशेष । मनी आणिता सर्व जीवांस । तो साधतो सायासे ।।२५४।। एकोत्तरशत स्थले ऐकून । ज्याची आधीच उडे गाळण । तो अधिकारी येथला जाण । नाही ऐसे समजावे ।।२५५।। अंधार असो किती घनदाट । आणि दूर पसरली वाट । हाती दीप धरला नीट । तरी नसे अवघड ।।२५६।। ज्ञानदीप तेवतो हृदयात । आणि पाठीवर श्रीगुरूचा हात । मग अशक्य काय येथ । असेल सांग मला तू? ।।२५७।। ही वाट नोहे अंधारभरली । ही तर आत्मप्रकाशे उजळलेली । शिवप्रसाद लाभता सरली । कधी तेही कळेचिना ।।२५८।। जैसे सहज कमल उमले । तैसी प्रकाशती षट्स्थले । म्हणूनि

**त्यागूनि किंतु सगळे । व्हावे षट्स्थलज्ञानी तू ।।२५९।।**

एतावदुक्त्वा परमप्रबोधमद्वैतमानन्दशिवप्रकाशम् ।
देव्यै पुरा भाषितमीश्वरेण तूष्णीमभूद् ध्यानपरो गणेन्द्रः ।।७१।।

एवमुक्त्वा समासीनं शिवयोगपरायणम् । रेणुकं तं समालोक्य बभाषे प्रांजलिर्मुनिः ।।७२।।

**ऐसे शिवानंदप्रकाशक । अद्वितीय स्वरूपज्ञानबोधक । पूर्वी जे शिवाने पार्वतीस देख । गुप्तपणे उपदेशिले ।।२६०।। तेचि पिंडस्थलापासून । ज्ञानशून्यस्थलापर्यंत जाण । उपदेशिले वीरशैवशास्त्र पूर्ण । रेणुकांनी अगस्तीसी ।।२६१।। ते विवरूनिया समस्त । रेणुकाचार्य जहाले ध्यानस्थ । मौन होऊनि तटस्थ । तैसे उगे राहिले ।।२६२।। जैसी कधी खळाळत कधी संथ । गंगा धावते अविरत । सागरी विलीन होता शांत । स्थिर होऊनि राहते ।।२६३।। तैसे शिवयोगध्यानी निमग्न । रेणुक झाले हे पाहून । विनयपूर्वक कर जोडून । वदले अगस्त्य तेधवा ।।२६४।।**

शिवयोगविशेषज्ञ शिवज्ञानमहोदधे । समस्तवेदशास्त्रादिव्यवहारधुरन्धर ।।७३।।

आलोकमात्रनिर्धूतसर्वसंसारबन्धन । स्वच्छन्दचरितोल्लासस्वप्रकाशात्मवच्छिव ।।७४।।

अवतीर्णमिदं शास्त्रमनवद्यं त्वदाननात् । श्रुत्वा मे मोदते चित्तं ज्योतिः पश्ये शिवाभिधम् ।।७५।।

**गणश्रेष्ठा शिवयोगरहस्यास । आपण जाणले असे विशेष । हृदयी शिवज्ञानसागरास । ठेविले असे साठवूनी ।।२६५।। वेदागम पुराणे शास्त्रे समस्त । यांत आपण पूर्ण पारंगत । तुमच्या दृष्टिक्षेपे त्वरित । गळे संसारबंधन ।।२६६।। तुम्ही स्वच्छंद स्वयंप्रकाशरूप । गुरुदेवा साक्षात शिवस्वरूप । तुमच्या मुखातूनि प्रकटले अमूप । अद्‌भुत शिवशास्त्र हे ।।२६७।। माझे मन पूर्ण धाले । अपार आनंदित झाले । ज्योतिस्वरूप शिवदर्शन घेतले । हृदयी त्याच्या योगाने ।।२६८।।**

अद्य मे सफलं जन्म गतो मे चित्तविभ्रमः । संजाता पाशविच्छित्तिस्तपांसि फलितानि मे ।।७६।।

इदानीमेव मे जातं मुनिराजोत्तमोत्तमम् । इतः परं मया नास्ति सदृशो भुवनत्रये ।।७७।।

**मानवजन्मी जे करावे प्राप्त । ते मज सापडले अवचित । मनातील भ्रम निवृत्त । झाले माझ्या गुरुदेवा ।।२६९।। श्रुती सांगती द्वैत-अद्वैत । त्याने होतो मी संभ्रमचित्त । परंतु आता फिटली भ्रांत । शिवशास्त्रश्रवणाने ।।२७०।। माझा जहाला जन्म सफल । माझ्या तपासी लाधले फल । पाश तुटूनि समूळ । झालो मुक्त आज मी ।।२७१।। ऋषिगणांत श्रेष्ठ ठरलो । माझ्यासमान मीच उरलो । आत्मरूपाने मीच राहिलो । भरूनि सर्व जगात ।।२७२।।**

शास्त्रं तव मुखोद्गीर्णं शिवाद्वैतपरम्परम् । मां विना कस्य लोकेषु श्रोतुमस्ति तपः शुभम् ।।७८।।

तपसां परिपाकेन शंकरस्य प्रसादतः । आगतस्त्वं महाभाग मां कृतार्थयितुं गिरा ।।७९।।

**ज्याने केले हे शास्त्रश्रवण । असा अन्य भाग्यवंत कोण? । पृथ्वीवरती मलाच आपण । श्रोता पहिला निवडिले ।।२७३।। रेणुक गणेश्वरांनी सांगावे । आणि आपण श्रोता व्हावे । यासाठी पाठीशी असावे । लागे महान तपोबळ ।।२७४।। परशिवानुग्रहामुळे । माझे तपचि आज फळले । मज कृतार्थ कराया सगळे । आला अवतार घेऊनी ।।२७५।।**

इति स्तुवन्तं विनयादगस्त्यं मुनिपुंगवम् । आलोक्य करुणादृष्ट्या बभाषे स गणेश्वरः ।।८०।।

अगस्त्य मुनिशार्दूल तपःसिद्धमनोरथ । त्वां विना शिवशास्त्रस्य कः श्रोतुमधिकारवान् ।।८१।।

पात्रं शिवप्रसादस्य भवानेको न चापरः । इति निश्चित्य कथितं मया ते तन्त्रमीदृशम् ।।८२।।

**अगस्त्यांची ऐकूनि स्तुती । रेणुके उघडिली नेत्रपाती । करुणार्द्र दृष्टीने पाहूनि त्याप्रती । वदले रेणुकगणेश्वर ।।२७६।। अगस्त्या तू मुनींत श्रेष्ठ । तुझे तपःसामर्थ्य वरिष्ठ । तेणे तुझे सर्व अभीष्ट । पुरले बा मनोरथ ।।२७७।। हे शिवशास्त्र कराया श्रवण । अधिकारी कोण तुझ्याविण? । तूच अधिकारी म्हणून । तुज सर्व निरूपिले ।।२७८।। शिवप्रसाद हे शिवशास्त्र । ते श्रवण कराया लागे पात्र । तूचि पात्र भूवरी सर्वत्र । ऐसा करूनि निश्चय ।।२७९।। तुलाचि हे कथिले पूर्ण । तू सकल**

**शास्त्रांत परायण । जिज्ञासा मनी धरून । तूही पुसिले पुनःपुन्हा ।।२८०।। श्रवणाची जेथ आवड । तेथे कथनही होते गोड । तुझ्या प्रश्नसिंचने झाड । बहरले शास्त्रकथनाचे ।।२८१।।**

स्थाप्यतां सर्वलोकेषु तन्त्रमेतत् त्वया मुने । ईदृशं शिवबोधस्य साधनं नास्ति कुत्रचित् ।।८३।।

रहस्यमेतत् सर्वज्ञः सर्वानुग्राहकः शिवः । अवादीत् सर्वलोकानां सिद्धये पार्वतीपतिः ।।८४।।

**अगस्त्या सर्व लोकांत । शिवशास्त्र हे करी प्रसृत । कराया शिवज्ञान प्राप्त । याविण नाही साधन ।।२८२।। तुला जो कथिला शिवसिद्धान्त । तो कोणासही नाही ज्ञात । उद्धराया जनलोक समस्त । हा स्थापन करी भूवरी ।।२८३।। परम कृपाळू उमारमण । भोग-मोक्ष मिळाया लोकांस जाण । त्यास्तव हे रहस्यमय ज्ञान । त्यांनी पूर्ण उपदेशिले ।।२८४।।**

तदिदं शिवसिद्धान्तसाराणामुत्तमोत्तमम् । वेदवेदान्तसर्वस्वं विद्याचारप्रवर्तकम् ।।८५।।

वीरमाहेश्वरग्राह्यं शिवाद्वैतप्रकाशकम् । परीक्षितेभ्यो दातव्यं शिष्येभ्यो नान्यथा क्वचित् ।।८६।।

**जे अठ्ठावीस शिवागम । त्यांचे सारसर्वस्व परम । सर्व वेदोपनिषदांचे उत्तम । सार यात साठले ।।२८५।। ज्ञान आणि क्रिया पूर्ण । यांचे करी हे निरूपण । करी शिवाद्वैताचे प्रकाशन । स्वीकारिले वीरमाहेश्वरांनी ।।२८६।। जो शिष्य अधिकारी पूर्ण । त्यासी नीट परीक्षून । त्यासचि**

**उपदेशावे, पण । सांगू नये अन्यासी ।।२८७।। ज्यासी मूलतत्त्वाची नाही जाण । त्यास कैसे कळेल तत्त्वज्ञान? । ज्याच्याठायी शिवजिज्ञासा पूर्ण । त्यास करावा उपदेश ।।२८८।।**

एतच्छ्रवणमात्रेण सर्वेषां पापसंक्षयः ।

अवतीर्णं मया भूमौ शास्त्रस्यास्य प्रवृत्तये । प्रवर्तय शिवाद्वैतं त्वमपि ज्ञानमीदृशम् ।।८७।।

**या शास्त्राचे करिता श्रवण । नाश पावती पातके पूर्ण । शिवाज्ञेने भूलोकी प्रवर्तन । कराया वीरशैवशास्त्राचे ।।२८९।। मी घेऊनिया अवतार । अगस्त्या आलो भूतलावर । तुला उपदेशूनि अंतर । तृप्त झाले शिष्यवरा ।।२९०।। ज्ञानप्रवाह वाहावा अखंड । यासाठी तुझी केली निवड । हे ज्ञान बोधूनि त्रिखंड । उजळूनि तू टाकावे ।।२९१।। अगस्त्यासी आदेश देऊन । रेणुकाचार्य पावले अंतर्धान । अगस्त्य महर्षी विस्मित होऊन । पाहातचि राहिले ।।२९२।। श्रोतेहो ऐसे षट्स्थलज्ञान । एकशे एक स्थलांतून । अगस्त्य महर्षींना पूर्ण । रेणुकाचार्यांनी उपदेशिले ।।२९३।। रचूनि श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ । शिवयोगी शिवाचार्यांनी समस्त । तेचि आत्मकल्याणार्थ । लोकांप्रती उपदेशिले ।।२९४।। ते मूळ संस्कृत ग्रंथामधले । मराठीत ओवीबद्ध केले । तुम्हांलागी निरूपिले । मी यथाशक्तीने ।।२९५।। जैसा काजव्याचा प्रकाश । क्षणकालचि भासे नेत्रांस । परि तो तेजाचाचि**

**अंश । असे जाणावे सत्य हे ।।२९६।। तुमची तहान असे मोठी । परि शक्ती माझी असे थिटी । तरी ओंजळ भरूनि शेवटी । केली रिती तुम्हांपुढे ।।२९७।। तुम्ही तुष्टाल किंवा नाही । हा विवेक नाही माझ्याठायी । धन्याने दे म्हणता पाही । दिले जमेल तेवढे ।।२९८।। येथे जे जे उत्तम भासे । ते मूळ ग्रंथकाराचे असे । आणि जेथे अस्पष्ट दिसे । ती माझी न्यूनता जाणावी ।।२९९।। श्रीकाशीजगद्गुरूंचा आशीर्वाद । मज लाभला असे प्रसाद । त्याच बळावरी बोलिलो शब्द । तरी अब्द मागे राहिले ।।३००।। शिवस्वरूप जगद्गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर । रचितो शेषनारायण ।।३०१।। श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्भावे परिसोत शिवभक्त । होतील मने भक्तियुक्त । विंशोऽध्याय पूर्ण हा ।।३०२।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिंगस्थलांतर्गतऐक्यस्थले स्वीकृतप्रसादैक्यस्थलादिनवविधस्थलप्रसंगो नाम विंशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

# अध्याय एकविसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीजगद्गुरु विश्वाराध्याय नमः ।। ॐ नमो सदाशिवलिंगा । निज-भक्तजनभवभंगा । ज्योतिर्मयस्वरूपा अभंगा । सच्चिदानंदस्वरूपा ।।१।। ब्रह्ममुरारिसुरार्चिता । निर्मलभसितसुशोभिता । देवमुनिप्रवरार्चिता । सदाशिवलिंगा तुज नमो ।।२।। जन्मजदु:खविनाशका । रावणदर्पनिवारका । दक्षकुयज्ञविनाशका । सदाशिवलिंगा तुज नमो ।।३।। शुद्धसुगंधसुलेपिता । सिद्धसुरासुरवंदिता । कनकमहामणिभूषिता । सदाशिवलिंगा तुज नमो ।।४।। बुद्धिविवर्धनकारणा । भावविवर्धनकारणा । सर्वसमुद्भवकारणा । सदाशिवलिंगा तुज नमो ।।५।। फणिपतिवेष्टितशोभिता । कुंकुमचंदनलेपिता । पंकजहारसुशोभिता । सदाशिवलिंगा तुज नमो ।।६।। कामदहना करुणाकरा । दिनकरकोटिप्रभाकरा । परमात्मका परात्परा । सदाशिवलिंगा तुज नमो ।।७।। देवगणावलिसेविता । अष्टदलै: परिवेष्टिता । सुरगुरुसुरवरपूजिता । सदाशिवलिंगा तुज नमो ।।८।। संचितपापविनाशका । अष्टदरिद्रविनाशका । अनंतब्रह्मांडनायका । सदाशिवलिंगा तुज नमो ।।९।। सुरवनपुष्पसमर्चिता । कल्मषमोचना अपरिमिता । कलिमलदहना मायातीता । सदाशिवलिंगा तुज नमो ।।१०।। देवा

**पिपीलिकेकडून । करविसी समुद्राचे पालाण । लंघवशील पंगूकडून । गिरिशिखरे उत्तुंग ॥११॥ ऐसा आला अनुभव । तुझे अतर्क्य लीलालाघव । मज पामराहातूनि अभिनव । ग्रंथ पूर्णत्व पावला ॥१२॥ शिवागमांचे करूनि मंथन । शिवयोगी शिवाचार्यांनी संपूर्ण । रचिला जो ग्रंथ महान । तो हा श्रीसिद्धान्तशिखामणी ॥१३॥ तो करावया ओवीबद्ध । मी प्रवर्तलो जरी निर्बुद्ध । तरी तू करविला सिद्ध । हे तुझेच महिमान ॥१४॥ श्रीकाशीजगद्गुरूंचा वरदहस्त । मम मस्तकी होता सतत । तेणेचि हे अघटित । कार्य पूर्ण जहाले ॥१५॥ संस्कृतात राहाटेना मती । नाही तत्त्वज्ञानात गती । तरीही कार्यसिद्धी, हे किती । नवलचि घडले वाटते ॥१६॥ कराया कळसाध्याय पूर्ण । शक्ती देई मज-लागून । तूचि कर्ता करविता जाण । निमित्तास कारण मी ॥१७॥ श्रोत्यांनी व्हावे सावधान । अंतिम अध्याय करावा श्रवण । अगस्त्य मुनीसी उपदेशून । स्तब्ध झाले रेणुकाचार्य ॥१८॥**

इत्युक्त्वा पश्यतस्तस्य पुरस्तादेव रेणुकः । अन्तर्दधे महादेवं चिन्तयन्नन्तरात्मना ॥१॥

य इदं शिवसिद्धान्तं वीरशैवमतं परम् । शृणोति शुद्धमनसा स याति परमां गतिम् ॥२॥

स्वच्छन्दाचाररसिकः स्वेच्छानिर्मितविग्रहः । आससाद पुरीं लंकां रेणुको गणनायकः ॥३॥

**अगस्त्य मुनीसी बोधून । मनी करीत शिवध्यान । अकस्मात अंतर्धान । रेणुकाचार्य जहाले ॥१९॥**

अगस्त्य मुनी विस्मित । होऊनि राहिले पाहात । परि अत्यंत संतुष्टचित्त । जहाले होते बोधामृते ।।२०।। हा वीरशैवधर्मसंमत । सर्वोत्कृष्ट शिवसिद्धान्त । शुद्ध मने जो अवधारीत । त्यास लाभे परमुक्ती ।।२१।। मलयपर्वतावरून । रेणुक पावूनि अंतर्धान । लंकानगरीत येऊन । प्रकट झाले तेधवा ।।२२।। स्वच्छंदे करणे वर्तन । करणे आकाशगमन । आणि स्वेच्छेने देहधारण । ऐसे सिद्धिप्राप्त ते ।।२३।। हृदयी करुणा ओतप्रोत । शिवभक्तांसी व्हावे साह्यभूत । म्हणूनि लंकानगरीप्रत । झाले प्रकट जगद्‌गुरू ।।२४।।

समागतं महाभागं सर्वागमविशारदम् । विभीषणः समालोक्य गेहं प्रावेशयन्निजम् ।।४।।

भद्रासने निजे रम्ये निवेश्य गणनायकम् । अर्घ्यपाद्यादिभिः सर्वैरुपचारैरपूजयत् ।।५।।

पूजितेन प्रसन्नेन रेणुकेन निरूपितः । निषसाद तदभ्याशे स निजासनमाश्रितः ।।६।।

रेणुक आले रेणुक आले । ऐसे सर्वत्र विदित झाले । दर्शन घेण्यासाठी जमले । लंकापुरीचे पौरजन ।।२५।। भस्मोद्धूलित शरीर । जणू दुजा कर्पूरगौर । कंठात रुळती मनोहर । रुद्राक्षमाळा तेजस्वी ।।२६।। सूर्यासम मुखमंडल । भाळी त्रिपुंड्र विलसे निर्मल । आकर्ण नेत्र विशाल । करुणा अपार वर्षती ।।२७।। ऐसे रूप सर्वांगसुंदर । पाहूनि संतुष्ट नारीनर । साष्टांग करूनि नमस्कार । मनी अनुभविती धन्यता ।।२८।। आला बिभीषण लंकानरेश । सद्‌भावे वंदिले चरणांस । प्रार्थूनिया

**राजगृहास । घेऊनि गेला तेधवा ।।२९।। रमणीय सिंहासनी बैसविले । यथासांग पूजन केले । पादपूजा करूनि घेतले । पादोदक आदरे ।।३०।। बिभीषणाची भक्ती पाहून । रेणुकाचार्य झाले प्रसन्न । त्यांच्या आज्ञेने आसन ग्रहण । केले दुजे तयाने ।।३१।।**

आबभाषे गणेन्द्रं तं कृतांजलिर्विभीषणः । मानुषाकारसम्पन्नं साक्षाच्छिवमिवापरम् ।।७।।

रेणुक त्वां गणाधीश शिवज्ञानपरायण । अवतीर्णं महीमेनामिति सम्यक् श्रुतं मया ।।८।।

मद्भाग्यगौरवादद्य समायास्त्वं पुरीमिमाम् । कथं भाग्यविहीनानां सुलभाः स्युर्भवादृशाः ।।९।।

**मग म्हणे कर जोडून । जरी देहधारी आपण । तरी साक्षात शिवभगवान । अवतरले भूवरी ।।३२।। हे शिवज्ञानपरायणा । गणाधिपती रेणुक गणा । आपण अवतरला हे जाणा । वृत्त होते ऐकिले ।।३३।। तुमचे पद पाहायासाठी । पुण्य लागते शतकोटी । ते होते माझिया गाठी । म्हणूनि घडले दर्शन ।।३४।। आपुल्या पदरजांनी लंका । झाली पावन नाही शंका । गाजेल त्रिलोकात डंका । माझ्या महद्‌भाग्याचा ।।३५।। पुण्यसंचित असेल महान । तेणे घडले देवा दर्शन । जे पामर भाग्यहीन । त्यांना कैसे घडेल ? ।।३६।।**

मत्समो नास्ति लोकेषु भाग्यातिशयवत्तया । यस्य गेहं स्वयं प्राप्तो भवान् साक्षान्महेश्वरः ।।१०।।

कृतार्था मे पुरी ह्येषा कृतार्थो राक्षसान्वयः । जीवितं च कृतार्थं मे यस्य त्वं दृष्टिगोचरः ।।११।।

इति ब्रुवाणं कल्याणं राक्षसेन्द्रं गणेश्वरः । बभाषे सस्मितो वाणीं विश्वोल्लासकरीं शुभाम् ।।१२।।

**घेतला भूवरी अवतार । आपण साक्षात महेश्वर । माझ्यासम भाग्यवंत थोर । जगी दुसरा असेना ।।३७।। आपुले पद येथे पडले । माझे राजगृह धन्य झाले । माझ्या प्रजेचेही उजळले । महद्भाग्य दयाळा ।।३८।। दर्शने धन्य झाले जीवन । तैसीच लंकानगरीही पावन । माझा राक्षसवंश जाण । आज जहाला कृतार्थ ।।३९।। ईश्वरासी काय मागू आणिक । माझ्या जन्माचे झाले सार्थक । ऐसे बोलूनि वंदी देख । पुन:पुन्हा चरणांसी ।।४०।। बिभीषणाच्या अशा बोले । मंद स्मित मुखावरी आले । त्याची भक्ती जाणूनि बोलले । रेणुकाचार्य जगद्गुरू ।।४१।। शब्द प्रकटती मुखातून । जैसा नभी गर्जे मंद घन । ऐकत्याचे उल्हासे मन । धीर मंगल स्वराने ।।४२।।**

विभीषण महाभाग जाने त्वां धर्मकोविदम् । त्वां विना कस्य लोकेषु जायते भक्तिरीदृशी ।।१३।।

समस्तशास्त्रसारज्ञं सर्वधर्मपरायणम् । अध्यात्मविद्यानिरतमाहुस्त्वां राक्षसेश्वर ।।१४।।

त्वदीयधर्मसम्पत्तिं श्रुत्वाहं विस्मिताशयः । व्रजन् कैलासमचलं त्वदन्तिकमुपागतः ।।१५।।

**बिभीषणा तू भाग्यवंत । धर्मज्ञ धर्माचरणी रत । तुझी कीर्ती विख्यात । मी जाणतो सर्वही ।।४३।। जी स्थित तुझ्या हृदयी । दृढ भक्ती प्रेममयी । ती त्रिभुवनांत कवणाठायी । तुझ्याविण असेल? ।।४४।।**

**राक्षसेश्वरा तू समस्त । शास्त्रांचा जाणसी रहस्यार्थ । सर्वधर्मकार्यात निष्णात । आसक्त अध्यात्म-विद्येतही ।।४५।। असूनि ऐश्वर्यसंपन्न । असशी अध्यात्मशास्त्रात मग्न । सत्तामदाने तुझे मन । किंचित नाही स्पर्शिले ।।४६।। षट्स्थलशास्त्राचा उपदेश । अगस्त्यमुनीसी करूनि विशेष । लक्षूनिया मी कैलासास । होतो गमन करीत ।।४७।। तुझ्या धर्मसंपत्तीची कीर्त । माझ्या कर्णी पडली अवचित । तेणे होऊनि मी विस्मित । आज येथे पातलो ।।४८।। राक्षसकुळी जन्मून । तू धर्मज्ञ धर्मपरायण । चतुर्दश विद्यांत प्रवीण । दक्ष प्रजाहितकार्यी ।।४९।। याचे वाटले नवल । माझे थबकले पाऊल । आणि प्रविष्ट झालो तत्काळ । तुझ्या लंकानगरीत ।।५०।।**

प्रीतोऽस्मि तव चारित्रैः शोभनैर्लोकविश्रुतैः । दास्यामि ते वरं साक्षात् प्रार्थयस्व यथेप्सितम् ।।१६।।

इति प्रसादसुमुखे भाषमाणे गणेश्वरे । प्रणम्य परया प्रीत्या व्याजहार विभीषणः ।।१७।।

**तुझे मंगलमय चरित । तिन्ही लोकी जहाले ख्यात । मी प्रसन्न झालो, तुझे ईप्सित । असेल काही माग ते ।।५१।। तू मागशील जे वरदान । ते मंगलकारकचि असेल पूर्ण । तुझे ईप्सित पुरवीन । माग मनी असेल जे ।।५२।। प्रसन्नमुखे बोलले गणेश्वर । ऐकूनि आनंदला रावणसहोदर । दीर्घ दंडवत भूमीवर । त्याने सामोरी घातला ।।५३।। मग आसनावरी बैसून । मनी भक्तिभाव धरून । दोन्ही**

**करसंपुट जोडून । जगद्गुरूंसी बोलला ।।५४।।**

आगमानुग्रहादेव भवतः शिवयोगिनः । दुर्लभाः सर्वलोकानां समपद्यन्त सम्पदः ।।१८।।

तथापि प्रार्थनीयं मे किंचिदस्ति गणेश्वर । सुकृते परिपक्वे हि स्वयं सिद्ध्यति वांच्छितम् ।।१९।।

रावणो हि मम भ्राता माहेश्वरशिखामणिः । अदृष्टशत्रुसम्बाधं शशास हि जगत्त्रयम् ।।२०।।

**तुमचे आगमन गणेश्वरा । हाचि अनुग्रह असे खरा । तुमच्या कृपेने सर्व नरा । प्राप्त दुर्लभ संपदा ।।५५।। जे वांच्छिले माझ्या मनाने । ते पुरले तुमच्या आगमनाने । पुण्य परिपक्व होता तेणे । पुरती सर्व मनोरथ ।।५६।। तरी गणनायका माझी देख । तुमच्या चरणी प्रार्थना एक । तुम्हांसाठी अल्प, परि प्रमुख । असे माझ्यासाठी ती ।।५७।। रावण माझा भ्राता वरिष्ठ । सर्व शिवभक्तांत श्रेष्ठ । तो त्रिलोकांतरी बलिष्ठ । होता राज्य करीत ।।५८।। शत्रुपीडेपासूनि मुक्त । अतुल शौर्य प्रतापी बहुत । त्याच्याकडूनि झाले पराभूत । इंद्रादी समस्त देवगण ।।५९।। राज्यवैभव गमावून । ते बैसले बलहीन होऊन । निष्कंटक राज्य पूर्ण । रावण करी प्रतापे ।।६०।।**

यस्य प्रतापमतुलं सोढुमक्षमशक्तयः । इन्द्रादयः सुराः सर्वे राज्यलक्ष्म्या वियोजिताः ।।२१।।

स तु कालवशेनैव स्वचरित्रविपर्ययात् । रणे विष्णववतारेण रामेण निहतोऽभवत् ।।२२।।

स तु रामशराविद्धः कण्ठस्खलितजीवितः । अवशिष्टं समालोक्य मामवादीत् सुदुःखितः ।।२३।।

विभीषण विशेषज्ञ महाबुद्धे सुधार्मिक । अवशिष्टोऽसि वंशस्य रक्षसां भाग्यगौरवात् ।।२४।।

**महापराक्रमी अजेय रावण । कालगतीने जहाला चारित्र्यहीन । सीतेचे केले अपहरण । त्याने विपरीत बुद्धीने ।।६१।। पुढे महासंग्राम झाला । श्रीरामाने रावण वधिला । रामशराने विद्ध झाला । पडला रणी भूमीवरी ।।६२।। तेव्हा प्राण कंठी धरून । मजसी वदला होऊनि दीन । बिभीषणा तू विचक्षण । बुद्धिवादी धार्मिक ।।६३।। राक्षसवंशी भाग्यवंत । तूचि एकटा असशी जिवंत । कालगतीने विपरीत । आम्ही ठरलो अभागी ।।६४।।**

वयमज्ञानसम्पन्ना महत्सु द्रोहकारिणः । ईदृशीं तु गतिं प्राप्ता दुस्तरा हि विधिस्थितिः ।।२५।।

नवकं लिंगकोटीनां प्रतिष्ठाप्यमिह स्थले । इति संकल्पितं पूर्वं मया तदवशिष्यते ।।२६।।

कोटिषट्कं तु लिंगानां मया साधु प्रतिष्ठितम् । कोटित्रयं तु लिंगानां स्थापनीयमतस्त्वया ।।२७।।

**अज्ञानाने जहालो ग्रस्त । महानांशी द्रोह केला बहुत । त्याने ही दैन्यावस्था प्राप्त । पाहा ऐसी जहाली ।।६५।। जैसे विधीने भाळी लिहिले । तैसेचि पाहा येथे घडले । दुस्तर दैवगतीसी ओलांडिले । नसे आजवर कोणीही ।।६६।। या सुवर्णलंकेत जाण । नऊ कोटी लिंगे करावी स्थापन । ऐसा माझा**

**संकल्प अपूर्ण । अजूनि थोडा राहिला ।।६७।। शास्त्रविधिनुसार वहिली । सहा कोटी शिवलिंगे स्थापिली । अजूनि स्थापायाची उरली । तीन कोटी शिवलिंगे ।।६८।। माझे मरण आता अटळ । माझ्या हाती नुरला काळ । माझा संकल्प तू सफल । करी लिंगे स्थापूनी ।।६९।।**

इति तस्य वचः श्रुत्वा दीनबुद्धेर्मरिष्यतः । तथा साधु करोमीति प्रतिज्ञातं मया तथा ।।२८।।

युगपच्छिवलिंगानां कोटित्रयमनुत्तमम् । प्रतिष्ठाप्यं यथाशास्त्रमिति मे निश्चयोऽभवत् ।।२९।।

**मरणोन्मुख रावण दीन । त्याच्या शब्दांस देऊनि मान । तीन कोटी लिंगे स्थापीन । ऐसी केली प्रतिज्ञा ।।७०।। लंकेमाजी तीन कोटी । शिवलिंगे स्थापावी गोमटी । रावणाने व्यक्त केला शेवटी । तो संकल्प पूर्ण व्हावा ।।७१।। ऐसा माझा मनोदय । गणेश्वरा पूर्ण असे निश्चय । परि पूर्णत्वाचे गाव । त्यास नाही सापडले ।।७२।।**

लिंगकोटित्रयस्येह युगपत् स्थापनाविधौ । अविदन्नेकमाचार्यमहमेवमवस्थितः ।।३०।।

शिवशास्त्रविशेषज्ञ शिवज्ञाननिधिर्भवान् । आचार्यभावमासाद्य मम पूरय वांच्छितम् ।।३१।।

तस्येति वचनं श्रुत्वा राक्षसेन्द्रस्य धीमतः । तथेति प्रतिशुश्राव सर्वज्ञो गणनायकः ।।३२।।

**या मनोहर लंकानगरीत । तीन कोटी शिवलिंगे स्थापित । करील ऐसा कोणी समर्थ । आचार्य नाही**

**मिळाला ।।७३।। तेणे मी झालो निराश । शब्द दिला रावणास । ठरलो असमर्थ ही मनास । खंत लागूनि राहिली ।।७४।। तुम्ही शिवशास्त्राचे ज्ञाते । शिवज्ञानाचा सागर पुरते । गणनायका माझ्या मनोरथाते । द्यावे आता पूर्णत्व ।।७५।। तीन कोटी गुरुरूपे धारण । करूनि आचार्य व्हावे आपण । आणि माझा संकल्प पूर्ण । एकावेळी करावा ।।७६।। राक्षसराज बिभीषणाचे । बोल ऐकूनि वदले वाचे । 'तथास्तु' ते ऐकूनि कर्णांचे । पांग फिटले नरेशाच्या ।।७७।।**

तत्रः सन्तुष्टचित्तस्य पौलस्त्यस्येष्टसिद्धये ।

कोटित्रयं तु लिंगानां यथाशास्त्रं यथाविधि । त्रिकोट्याचार्यरूपेण स्थापितं तेन तत्क्षणे ।।३३।।

तादृशं तस्य माहात्म्यं समालोक्य विभीषणः । प्रणनाम मुहुर्भक्त्या पादयोस्तस्य विस्मितः ।।३४।।

**बिभीषण झाला संतुष्टचित्त । त्याचा सिद्ध कराया मनोरथ । त्रिकोटी गुरूंची समस्त । रूपे केली धारण ।।७८।। लंकानगरीत एका वेळी । विधिपूर्वक लिंगे स्थापिली । तेणे विस्मित जहाली । सर्व प्रजा लंकेची ।।७९।। बिभीषणासी वाटले अशक्य । ते सर्वचि झाले शक्य । जगद्गुरूंचे सामर्थ्य अलौकिक । आले प्रत्यया तेधवा ।।८०।। रेणुकाचार्यांचा असाधारण । बिभीषणाने महिमा पाहून । अति विस्मयाने त्यांचे चरण । वंदिले भक्तिभावनेने ।।८१।।**

प्रणतं विनयोपेतं प्रहृष्टं राक्षसेश्वरम् । अनुगृह्य स्वमाहात्म्याद् रेणुकोऽन्तर्हितोऽभवत् ।।३५।।

विभीषणोऽपि हृष्टात्मा रेणुकस्य प्रसादतः । शिवभक्तिरसासक्तः स्थिरराज्यमपालयत् ।।३६।।

**नम्र संतुष्ट बिभीषण । त्यावरी कृपेचा वर्षाव करून । जगद्गुरू पावले अंतर्धान । आपुल्या सिद्धिसामर्थ्याने ।।८२।। रेणुकाचार्यांचा लाभला प्रसाद । घेत शिवभक्तिरसाचा स्वाद । बिभीषणाने भोगिले चिरकाल राज्यपद । पालन करीत प्रजेचे ।।८३।।**

रेणुकोऽपि महातेजाः संचरन् क्षितिमण्डले । प्रच्छन्नश्च प्रकाशश्च परमाद्वैतभावितः ।।३७।।

कांश्चिद् दृष्टिनिपातेन करुणारसवर्षिणा । अपरानुपदेशेन शिवाद्वैताभिमर्शिना ।।३८।।

अन्यांश्च सहवासेन समस्तमलहारिणा । कृतार्थयन् जनान् सर्वान् कृतिनः पक्वकर्मिणः ।।३९।।

दर्शयित्वा निजाधिक्यं शिवदर्शनलालसः । खण्डयित्वा दुराचारान् पाषण्डान् भिन्नदर्शनान् ।।४०।।

यन्त्रमन्त्रकलासिद्धान् विमतान् सिद्धमण्डलान् ।
विजित्य स्वप्रभावेण स्थापयित्वा शिवागमान् । आजगाम निजावासं कोल्लिपाक्यभिधं पुरम् ।।४१।।

**रेणुकाचार्य तेजःपुंज । शिवाद्वैतभावे विचरती सहज । सप्तशत वर्षे गुप्त सतेज । राहूनि विचरले महीवरी ।।८४।। सप्तशत वर्षे प्रकट राहिले । भूवरी सर्वत्र संचारले । आपुल्या कृपाकटाक्षजळे । चिंब**

**केले कितीक जन ।।८५।। शिवाद्वैतज्ञान उपदेशून । उद्धरिले किती जन । त्रिमलनाशक सहवासाने जाण । कृतकृत्य केले कितीकांना ।।८६।। ज्यांचे कर्म पक्व झाले । त्या जनांसी कृतार्थ केले । आपुले माहात्म्य दाखविले । पाखंडी दुराचाऱ्यांना ।।८७।। नास्तिक दर्शनांसी खंडिले । यंत्रमंत्रकलेत जे सिद्ध झाले । त्या सिद्धसमूहासी जिंकिले । आपुला प्रभाव दर्शवूनी ।।८८।। शिवसिद्धान्त प्रतिष्ठापून । शिवदर्शनाची कांक्षा धरून । जे आपुले मूलस्थान । त्या कोल्लिपाकी पातले ।।८९।।**

तत्र सम्भावितः सर्वैर्जनैः शिवपरायणैः । सोमनाथाभिधानस्य शिवस्य प्राप मन्दिरम् ।।४२।।

पश्यतां तत्र सर्वेषां भक्तानां शिवयोगिनाम् । तन्वानो विस्मयं भावैस्तुष्टाव परमेश्वरम् ।।४३।।

**रेणुकाचार्य आले आले । ऐकूनि जन सगळे जमले । सर्वही चरणांवरी लोटले । त्यांना भावे वंदायासी ।।९०।। जने आणिल्या फुलमाला । त्यांनी कंठी धारण केल्या । स्वीकारूनि सत्कार सगळा । आले सोमनाथमंदिरी ।।९१।। हीच लिंगातूनि प्रकटली मूर्ती । भक्त आश्चर्ययुक्त नेत्रे पाहाती । त्यांच्या सवे तेही येती । सोमनाथाच्या मंदिरी ।।९२।। रेणुक उभे लिंगापुढती । कर जोडूनि करिती स्तुती । सर्व जन विस्मये पाहती । काय घडते म्हणूनी ।।९३।।**

देव देव जगन्नाथ जगत्कारणकारण । ब्रह्मविष्णुसुराधीशवन्द्यमानपदाम्बुज ।।४४।।

संसारनाटकभ्रान्तिकलानिर्वहणप्रद । समस्तवेदवेदान्तपरिबोधितवैभव ।।४५।।

**देवाधिदेवा उमापती । तू सर्व जगाचा अधिपती । तू कारण विश्वाच्या उत्पत्ती-। स्थिती आणि लयासी ।।९४।। ब्रह्माविष्णुइंद्रादी देव किती । तव चरणांसी सेविती । या संसारनाटकाची भ्रांती । तूच दूर दवडितो ।।९५।। वेद उपनिषदे सर्व । तुझेच गाती देवा वैभव । तुझ्यासमान महादेव । अन्य कोणता असेना ।।९६।।**

संसारवैद्य सर्वज्ञ सर्वशक्तिनिरंकुश । सच्चिदानन्द सर्वस्व परमाकाशविग्रह ।।४६।।

समस्तजगदाधारज्योतिर्लिंगविजृम्भण । सदाशिवमुखानेकदिव्यमूर्तिकलाधर ।।४७।।

**संसाररोगाचे निवारण । करिशी तू वैद्यनाथ होऊन । तू सर्वज्ञ सर्वशक्तिमान । सच्चिदानंदरूप चिदाकाश ।।९७।। तू सर्व जगासी आधार । ज्योतिर्लिंगरूपे वसशी भूवर । सदाशिवादी दिव्य रूपे साचार । तुझीच लीलामूर्ती ती ।।९८।।**

गुणत्रयपदातीत मलत्रयविनाशन । जगत्त्रयविलासात्मन् श्रुतित्रयविलोचन ।।४८।।

पाहि मां परमेशान पाहि मां पार्वतीपते ।

त्वदाज्ञया मयैतावत्कालमात्रं महीतले । अचारि भवदुक्तानामागमानां प्रसिद्धये ।।४९।।

अतः परं स्वरूपं ते प्राप्तुकामोऽस्मि शंकर । अन्तरं देहि मे किंचिदनुकम्पाविशेषतः ।।५०।।

**तू गुणत्रयातीत पूर्ण । मलत्रयाचे करिसी निरसन । तुझ्या कृपेने भक्तजन । होती मुक्त मलांतूनी ।।९९।। विश्वोत्पत्ति-स्थिति-संहार । ही तव सहजलीला साचार । ऋक् यजुः साम हे त्रिनेत्र । तुझे असती सदाशिवा ।।१००।। हे परमेश्वरा रक्षण कर । हे पार्वतीपते रक्षण कर । तवाज्ञेने भूतली केला संचार । आगमांच्या प्रसिद्धीस्तव ।।१०१।। तुझ्या स्वरूपी व्हावे विलीन । ऐसी कांक्षा मनी पूर्ण । तुझ्याठायी मला स्थान । देई आता शंकरा ।।१०२।।**

इत्युक्ते गणनायकेन सहसा लिंगात् ततः शांकरात् वत्सागच्छ महानुभाव भवतो भक्त्या प्रसन्नोऽस्म्यहम् ।
इत्युच्चैरगदाद् वचस्तनुभृतामाश्चर्यमासीत्तदा दिव्यो दुंदुभिराननाद गगने पुष्पं ववर्षुर्गणाः ।।५१।।

**रेणुक-प्रार्थना होता पूर्ण । अवघे मंदिर गेले गर्जून । तत्क्षणी सोमेश्वरलिंगातून । धीरगंभीर स्वर आला ।।१०३।। 'हे महानुभाव वत्सा रेणुका ये । तव भक्तीने मी प्रसन्न आहे' । ऐसी वाणी ऐकता आश्चर्ये । सकळ जन पाहती ।।१०४।। अंतरिक्षी दुंदुभी झडली । शिवगणांनी पुष्पवृष्टी केली । रेणुकाची मूर्ती तळपली । दिव्य तेजाने संपूर्ण ।।१०५।।**

श्रुत्वा लिंगाद् वचनमुदितं शांकरं सानुकम्पं संहृष्टात्मा गणपतिरथो ज्योतिषा दीप्यमानः ।

जातोत्कण्ठैः परमनुचरैर्योगिभिः स्तूयमानो ज्योतिर्लिंगं परमनुविशत् स्वप्रकाशं तदानीम् ।।५२।।

**परशिवाची हाक ऐकून । संतुष्टले रेणुक गण । दिव्य तेजाने तळपून । सोमेश्वरलिंगी प्रवेशले ।।१०६।। शिवयोगी होऊनि चकित । स्तुतिस्तोत्रे होते गात । सर्व जन असता पाहात । लीन झाले लिंगामाजी ।।१०७।। रेणुकाचे दिव्य शरीर । लिंगात विलीन झाले समग्र । जैसा शुद्ध सुगंध कर्पूर । सहज विरे वायूत ।।१०८।।**

लीने तस्मिन् शांकरे स्वप्रकाशे दिव्याकारे रेणुके सिद्धनाथे ।

सर्वो लोको विस्मितोऽभूत्तदानीं शैवी भक्तिः सप्रमाणा बभूव ।।५३।।

**दिव्यदेही रेणुक गण । प्रकाशमय लिंगी झाले विलीन । ते पाहूनि सकल जन । मानसी विस्मित जहाले ।।१०९।। तेव्हापासूनि शिवभक्ती । सर्वोत्कृष्ट ठरली जगती । प्रत्यक्ष प्रमाणानेच ती । सिद्ध तेथे जहाली ।।११०।।**

श्रीवेदागमवीरशैवसरणिं श्रीषट्स्थलोद्यन्मणिं

श्रीजीवेश्वरयोगपद्मतरणिं श्रीगोप्यचिन्तामणिम् ।

श्रीसिद्धान्तशिखामणिं लिखयिता यस्तं लिखित्वा परान्

श्रुत्वा श्रावयिता स याति विमलां भुक्तिं च मुक्तिं पराम् ।।५४।।

**हा श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ । वेदागमप्रतिपादित । जो मंगल वीरशैवसिद्धान्त । त्याचे करी अनुसरण ।।१११।। एकोत्तरशत स्थलांनी युक्त । षट्स्थलमार्ग करी प्रकाशित । ऐसे उज्ज्वल कांतियुक्त । रत्न असे हे अमोल ।।११२।। शिवजीवैक्यरूपी ज्ञानकमल । विकसित करी हे सूर्यमंडल । शिवाद्वैतज्ञान-गुप्तधन सकल । दाता हा चिंतामणी ।।११३।। हा श्रेष्ठ सिद्धान्तांत सर्व । म्हणूनि 'श्रीसिद्धान्तशिखामणी' नाव । अन्वर्थक आणि अभिनव । या ग्रंथासी ठेविले ।।११४।। या ग्रंथाचे जो करी लेखन । किंवा अन्याकडूनि घेई लिहवून । जो करी वा करवी श्रवण । त्यास लाभे भुक्ती मुक्ती ।।११५।। श्रोतेहो संपले ग्रंथलेखन । माझे झाले धन्य जीवन । कोण्या जन्मीचे फळले पुण्य । नसे मजला ठाऊक ।।११६।। श्रीकाशीजगद्गुरूंनी आज्ञापिले । आणि मी लेखनकार्य केले । गुरु-शिवकृपेने पूर्ण झाले । हे परमभाग्य माझे ।।११७।। मी ठरलो लेखनिक । माझ्याहातूनि लिहवी देख । अज्ञात शक्ती हाचि विवेक । जागा होता मनात ।।११८।। संस्कृताचे नाही ज्ञान । तत्त्वज्ञानाची नसे जाण । तरीही झाले पूर्ण लेखन । हे अघटित घडले की ।।११९।। दृष्टीपुढे दिसली वाट । तिकडे**

पावले टाकली धीट । जमेल तैसी खटपट । केली गुरुबळावरी ।।१२०।। या ग्रंथात जे उत्तम जाण । ते मूळ ग्रंथकाराचे असे पूर्ण । आणि दिसेल जेथे न्यून । ते सर्वचि माझे असे ।।१२१।। आबालजनांसी सुबोध । व्हावा शिवसिद्धान्तबोध । त्यासाठी हा ग्रंथ सिद्ध । झाला असे निश्चित ।।१२२।। येथे पांडित्य दाखविणे । अथवा मिरविणे साहित्यलेणे । किंचितही या हेतूने । नाही स्पर्शिले मनासी ।।१२३।। परि एक घडले येथ । मीच ज्ञानगंगेत झालो सुस्नात । माझेचि फळले संचित । झालो कृतकृत्य मी ।।१२४।। त्या ज्ञानमहासमुद्रातील । मी भरूनि घेतली ओंजळ । ह्या लेखनकार्याचे फळ । मला इतुके लाभले ।।१२५।। जो पठण करील हा ग्रंथ । त्यासी लाभतील इष्टार्थ । त्याच्या जीवनास परम अर्थ । निश्चितचि लाभेल ।।१२६।। या ग्रंथाचे नित्य पारायण । जो करील भक्तिभावे पूर्ण । त्यास घडेल शिवदर्शन । आत्मस्वरूपी आपुल्या ।।१२७।। बाबा विश्वनाथाची नगरी । अविमुक्त क्षेत्र काशीपुरी । तेथे जंगमवाडी मठाभीतरी । ज्ञानसिंहासन विराजे ।।१२८।। अथपासूनि इतिपर्यंत । हा पूर्ण जहाला ग्रंथ । पवित्र काशी जंगमवाडी मठात । सद्भाग्याने माझिया ।।१२९।। श्रीकाशीजगद्गुरूंनी पूर्ण । करवूनि घेतले लेखन । त्यांच्या मंगलाशीर्वादाने जीवन । माझे धन्य जहाले ।।१३०।। शके एकोणिसशे चौतीस । कार्तिक शुद्ध षष्ठीस । पूर्णत्व लाभले ग्रंथास । जंगमवाडी मठात ।।१३१।।

कार्तिक शुद्ध षष्ठीस जाण । स्कंदषष्ठी असे अभिधान । स्कंदानेचि अगस्त्यालागून । सर्वप्रथम उपदेशिले ॥१३२॥ स्कंदाने उपदेशिले थोर । तेचि शास्त्र शिवधर्मोत्तर । त्याच्या श्रवणाने अंतर । तृप्त झाले महर्षीचे ॥१३३॥ रेणुके उपदेशिले अगस्त्याप्रत । तेचि श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथात । शिवयोगी शिवाचार्यांनी ग्रथित । केले असे कलियुगी ॥१३४॥ स्कंदषष्ठीच्या सुमुहूर्तावरी । नंदननाम संवत्सरी । सोमवारी सायंप्रहरी । ग्रंथ पूर्णत्व पावला ॥१३५॥ शिवाद्वैतज्ञानाचे उपदेशक । श्रीस्कंद आणि आचार्य श्रीरेणुक । यांच्या चरणी भक्तिपूर्वक । समर्पिला ग्रंथ हा ॥१३६॥ पवित्र कैलासमंटपात । श्रीविश्वाराध्यांच्या सान्निध्यात । ज्ञानसिंहासनासमीप ग्रंथ । भक्तिभावे समर्पिला ॥१३७॥ जे ज्ञानपीठावरी होऊनि गेले । त्या सर्व जगद्गुरूंसी वंदिले । त्यांची परमपावन पाउले । मी ध्याइली हृदयात ॥१३८॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर । विद्यमान जगद्गुरू श्रीचंद्रशेखर । ज्ञानतेजाने तळपे भास्कर । त्यांना वंदिले साष्टांग ॥१३९॥ विदर्भप्रांती क्षेत्र वत्सगुल्म । ज्यास सांप्रत म्हणती 'वाशीम' । त्याजवळी 'केकतउमरा' ग्राम । ते माझे जन्मस्थल ॥१४०॥ देवाप्पा-विठाबाईच्या उदरी । जन्मलो नंदननाम संवत्सरी । साठ वर्षांनी याच संवत्सरी । ग्रंथ रचूनि जहाला ॥१४१॥ कृतार्थतेने भरले मानस । ओवीरचनेचा होता ध्यास ।

**याचसाठी केला अट्टहास । बालपणापासूनी ।।१४२।। आता कृतकार्य होऊन । आदरे माय-पित्यासी वंदून । संपविले ग्रंथलेखन । तृप्त अंत:करणाने ।।१४३।। शिवस्वरूप जगद्‌गुरुवर । श्रीकाशीमहास्वामीजी चंद्रशेखर । त्यांच्या आज्ञेने रचिला मधुर । ग्रंथ शेषनारायणाने ।।१४४।। इति श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत । सद्‌भावे परिसोत शिवभक्त । सर्वांसी शिवसामरस्य होवो प्राप्त । एकविंशोऽध्याय पूर्ण हा ।।१४५।।**

।। ॐ तत्सदिति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्यसंवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ विभीषणाभीष्टवरप्रदानप्रसंगो नाम एकविंशः परिच्छेदः ।।

**।। श्रीशिवार्पणमस्तु ।।**

## ।। इति श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृतं समाप्तम् ।।

एकूण श्लोकसंख्या १४०५ । एकूण ओवीसंख्या ३८११

## श्रीसिद्धान्तशिखामणेः आरार्तिक्यम्

(श्रीसिद्धान्तशिखामणीची आरती)

जय रेणुकगीते मातः! जय रेणुकगीते । रेणुक-हृदय-विहारिणि जय जय शिवगीते ।।धृ.।।

श्रीसिद्धान्तशिखामणिसंज्ञे सुख्याते । कलशीसम्भवमुनिवर-सुकृतैरवतीर्णे ।।१।।

एकोत्तरशतसंख्यस्थल-मणिमयदीपे । शिवयोगिशिवाचार्यैः स्वर्णाक्षररचिते ।।२।।

अष्टावरणविधायिनि षट्स्थलसोपाने । पंचाचारविमर्शिनि तत्त्वत्रयगीते ।।३।।

गुरु-चर-लिंगसपर्यादीक्षाविख्याते । शतशतभक्तसुगीते विद्ये ब्रह्मपरे ।।४।।

शरणागतकरुणारस-घटशोभितहस्ते । निश्चलभक्तिविधायिनि मलहारिणि गंगे ।।५।।

श्रीशिवयोगिसुवेद्ये शैवागमविद्ये । षडधिकत्रिंशद्बुद्बुद-शिवसागररम्ये ।।६।।

काशीपीठाधीशैः कांक्षितदिग्विजयैः । प्रवचनमालाग्रथिता भूमण्डलधार्या ।।७।।

ज्ञानामृतपरितृप्तैः कोटिजनैर्वन्द्ये । सा त्वं भगवति मातः! जय रेणुकगीते ।।८।।

।। श्रीसिद्धान्तशिखामणीची आरती ।। ५०१ ।।

## आरती श्रीसिद्धान्तशिखामणीची

आरती रेणुकगीतेची । भवभयहारिणी मातेची ।।धृ. ।।

रेणुकमुखातुनी पूर्ण । झालीस माते अवतीर्ण।
धन्य ते कर्ण अगस्तीचे । झाले अमृत जीवनाचे ।
सुकृत जन्मांचे फळले, जगद्‌गुरु वक्ता, अगस्त्य श्रोता,
उजळली शिवाद्वैतप्राची। आरती रेणुकगीतेची... ।।१।।

'श्रीसिद्धान्तशिखामणी' । नामे ओळखिती ज्ञानी ।
श्रीशिवयोगी शिवाचार्ये । केले श्लोकबद्ध माये।
एकशे एक स्थले दीप, जणु उजळून, भक्तमनातुन,
दवडिली रात अविद्येची। आरती रेणुकगीतेची... ।।२।।

षट्स्थल-अष्टावरणांना । बोधिसी पंचाचारांना ।
शरणागतांवरी कृपा। करूनि दाविशी निजरूपा।
त्रिमलहारिणी तू गंगे, वंद्य विश्वात, झाली विख्यात,
खरी तू माउली 'शेषा'ची। आरती रेणुकगीतेची... ।।३।।

।। श्रीसिद्धान्तशिखामणीची आरती ।। ५०२ ।।